

# 'भारता'साठी

शरद जोशी

# ‘भारता’साठी

शरद जोशी

जनशक्ती वाचक चळवळ

जनशक्ती
वाचक
चळवळ

'भारता'साठी । शरद जोशी

प्रकाशक
जनशक्ती वाचक चळवळ
पिनाक, २४४-समर्थनगर,
औरंगाबाद-४३१००१-३१
दूरभाष : (०२४०) २३४१००४.
Email : janshakti.wachak@gmail.com

© शरद जोशी
अंगारमळा, आंबेठाण - ४१०५०१
ता. खेड, जि. पुणे.

मुद्रक
रुद्रायणी, औरंगाबाद.

मुखपृष्ठ
श्रीकृष्ण उमरीकर

अक्षरजुळणी
जनशक्ती वाचक चळवळ,
औरंगाबाद.

प्रथमावृत्ती
१० नोव्हेंबर २०१०
(शेतकरी महामेळावा, शेगाव)

**मूल्य रु. ३००/-**

## प्रकाशकाचे मनोगत

'इंडिया' आणि 'भारत' ही मांडणी मोठ्या प्रभावीपणे शरद जोशी यांनी केली. आता ही मांडणी बरेचजण वापरत आहेत. मुक्त अर्थव्यवस्थेच्या काळातही हा भेद भारतीय सरकारने ठसठशीतपणे तसाच ठेवला. शरद जोशी यांचे सर्व लिखाण संकलित करून ग्रंथस्वरूपात आणत असताना 'भारता'साठी या नावाने चौऱ्याहत्तर लेख वेगळे काढले. त्या सर्व लेखांचे परत दोन भाग केले– अर्थ, उद्योग, व्यापार, कामगार या प्रश्नांवरचे लेख वेगळे केले तर राखीव जागा वीज दरवाढ, छोटी राज्ये, सामाजिक समस्या आदी संदर्भांतल्या लेखांचे संकलन भारतासाठी या नावाने ठेवले.

या संकलनासोबत शरद जोशी यांचे समग्र लिखाण प्रकाशित करण्याचा प्रकल्प आम्ही पूर्ण करीत आहोत. 'पोशिंद्याची लोकशाही' हे पुस्तक या सोबतच प्रकाशित होत आहे. शेगाव येथील शेतकरी महामेळाव्यात या दोन्ही पुस्तकांचे प्रकाशन होत आहे.

शरद जोशी यांची एकूण १५ पुस्तके आम्ही प्रकाशित केली. यापैकी चार पुस्तके यापर्वीच प्रकाशित झालेल्या पुस्तिका, लेखसंग्रह यावर आधारित आहेत तर अकरा पुस्तके पूर्णतः नवीन आहेत. शरद जोशी यांनी प्रामुख्याने 'शेतकरी संघटक' या पाक्षिकातून लिखाण केले, तसेच याशिवाय दै. लोकमत, दै. देशोन्नती यातील लिखाण या पुस्तकांमध्ये समाविष्ट आहे. 'द हिंदू बिझनेस लाईन' मध्ये त्यांनी लिहिलेल्या इंग्रजी लेखांचे अनुवाद 'शेतकरी संघटक'मध्ये प्रकाशित झालेले होते, तेही विविध पुस्तकांमध्ये समाविष्ट केले आहेत.

अभ्यासकांसाठी हे सर्व लिखाण पुस्तकस्वरूपात उपलब्ध करून आम्हाला आवश्यक वाटत होते त्याप्रमाणे ही पुस्तके उपलब्ध आहेत. जुन्या पुस्तकांमधील त्रुटी पुढील आवृत्तीच्या वेळी दुरुस्त केल्या जातील.

**श्रीकांत अनंत उमरीकर**

## लेखानुक्रम


०१) राखीव जागा: समाज-अर्थशास्त्रीय अर्थ ..............................७
०२) समुद्राला मीठ हरवून चालणार नाही ..................................२२
०३) खोटा निधर्मवाद आणि दुष्ट राष्ट्रवाद ..................................२७
०४) 'भारता'च्या मानगुटी नेहरूवादाचे भूत ...............................३४
०५) 'नीरो'चे वारस ............................................................४०
०६) अयोध्या प्रश्न सोडवण्याची कुणाला इच्छा आहे का हो?...........५०
०७) काळ्या इंग्रजाची भगवी 'स्वदेशी' .......................................५९
०८) दुसरे गणराज्य की यादवी? ................................................६७
०९) आता लोकांनीच सरकारला शिस्त लावावी ...............................७४
१०) डॉ. कुरियन हज चले .......................................................७९
११) नकली आणि करंटा राष्ट्रभिमान ..........................................८२
१२) अति दक्षता विभाग-रोगी भारत ..........................................८५
१३) किल्लारीचे पाप राजाचे ....................................................८९
१४) बेचाळीसचे गौडबंगाल ......................................................९४
१५) हे 'अग्निदिव्य' आवश्यक आहे ..........................................१०१
१६) आता कुटुंबकल्याणाचे कल्याण ..........................................१०६
१७) महात्माजींचा पराभव ........................................................१११
१८) कोसळत्या व्यवस्थेतील पडझड ...........................................११९
१९) वीजदरवाढ-धोक्याची घंटा .................................................१२३
२०) बळीराज्य मराठवाडा ........................................................१३८
२१) 'नियतीशी गाठ' हुकल्याचा महोत्सव ....................................१५३
२२) तेव्हा कुठे जातो तुमचा धर्म? .............................................१५८
२३) पुतळ्यांचे माणसांवर राज्य ...............................................१६३
२४) ना! नानी ना! ...................................................................१७०
२५) विद्यार्थ्यांनो विद्यार्थी बना ...................................................१७४
२६) स्वातंत्र्य म्हणजेच प्रगती ...................................................१८९
२७) पौरुषहीनांचे इतिहासप्रेम ...................................................१९३
२८) स्वदेशीची तिसरी लढाई .....................................................२०७

२९) गुजरातचा कायाकल्प गुजरातलाच करू द्या ..............................२२७
३०) 'कोटा' राज्य संपले, 'कोटा' राज्य चालूच आहे ........................२३१
३१) तंत्रज्ञानाचे अग्निदिव्य ....................................................२३६
३२) स्वातंत्र्य म्हणजे न्याय, न्याय म्हणजे स्वातंत्र्य ..........................२४१
३३) पंतप्रधान 'इंडिया' विरुद्ध 'पोखरण' करणार? ..........................२४८
३४) हिमतीचे झाड उगवते कसे? ..............................................२५४
३५) कॅनकूल : कोण जिंकले कोण हरले? ....................................२६७
३६) बळीराज्य विदर्भ ..........................................................२७५
३७) मुंबईकर, मुंग्या आणि मधमाश्या .........................................२७९
३८) साठ वर्षांच्या कर्माचे फळ : ...............................................२८६
३९) स्वातंत्र्याच्या हरिक महोत्साची पार्श्वभूमी ...............................२९१
४०) नरसिंह रावांच्या कारकीर्दीचे वेगळेपण ....................................३०२
४१) नवव्या अनुच्छेदाच्या तबेल्याची साफसफाई ...........................३०९
४२) मुर्दाडांचा देश, कचखाऊ शासन ...........................................३१४
४३) आतंकवाद्यांचे भारतावर उपकार ..........................................३२०
४४) स्वतंत्रते भगवती ..........................................................३२८

# राखीव जागा : समाज-अर्थशास्त्रीय अर्थ

मंडल आयोगाच्या शिफारशी शासनाने मान्य केल्या आहेत आणि त्यांची अंमलबजावणी ७ ऑगस्ट १९९० पासून सुरू होईल अशी घोषणा पंतप्रधानांनी लोकसभेमध्ये केली. या अंमलबजावणीचा अर्थ असा, की आतापर्यंत अनुसूचित जाती आणि जमाती यांच्याकरिता ज्या जागा राखून ठेवण्यात आल्या होत्या त्याच्या पलीकडे इतर मागासवर्गीय जातींकरितासुद्धा जागा राखून ठेवल्या जातील. त्यामुळे सरकारी सेवेमध्ये भरती करताना जवळजवळ ५० टक्के जागा राखीव राहतील.

ही घोषणा झाल्यानंतर बिहारमध्ये काही निदर्शनं झाली. प्रामुख्यानं विद्यार्थ्यांनी ही आंदोलनं केली. त्या आंदोलनांची लाट पसरता पसरता बिहार, मध्य प्रदेश, दिल्ली इथे मोठी उग्र आंदोलनं सुरू आहेत. गेल्या आठ दिवसांमध्ये दिल्लीमधील वाहतूक जवळजवळ थांबली आहे. २९ ऑगस्टच्या दिल्लीच्या महाबंदमध्ये संपूर्ण दिल्ली बंद राहिली, एवढंच नव्हे तर त्या दिवसापासून दिल्लीमधल्या सर्व शाळांना आणि तांत्रिक शाळांना ३० दिवसांची सुटी जाहीर करण्यात आली.

एका बाजूने राखीव जागांच्या विरोधी आंदोलनं पसरत आहेत आणि त्याचवेळी रामविलास पासवान आणि शरद यादव यांनी 'राखीव जागा' समर्थकांनासुद्धा रस्त्यावर येण्याचं आवाहन केले आहे. दोन दिवसांपूर्वी दिल्लीमध्ये त्यांचाही मोठा मेळावा भरला आणि कोणत्याही क्षणी दोन्ही आंदोलनं एकमेकांशी भिडतील आणि संघर्ष चालू होईल असा धोका तयार झालेला आहे.

यापूर्वी मंडल आयोगाच्या शिफारशी राज्यपातळीवर अंमलात आणण्याची घोषणा गुजरात राज्याने केली होती आणि त्याहीवेळी अहमदाबादमध्ये मोठ्या दंगली झाल्या होत्या. त्या दंगलींचं लोण महाराष्ट्रातसुद्धा पसरेल असं वाटत होतं. मराठा महासंघाने अशाच तऱ्हेचं राखीव जागाविरोधी आंदोलन सुरू

करण्याची घोषणा केली होती. त्यावेळी शेतकरी संघटनेने राखीव जागाविरोधी किंवा राखीव जागांच्या बाजूने कोणतंही आंदोलन खेडेगावात पोहोचू देऊ नये, गावात त्याला प्रवेश मिळू नये असा आदेश आपल्या कार्यकर्त्यांना दिला होता आणि त्यानंतर ते आंदोलन बारगळलं. त्यानंतर केंद्र शासनाने सर्व राज्य शासनांना सल्ला दिला, की मंडल आयोगासंबंधीचा निर्णय हा केंद्र शासनाने घ्यायचा आहे; कोणत्याही राज्याने राज्यपातळीवर त्याची अंमलबजावणी करण्याचा प्रयत्न करू नये.

राष्ट्रीय मोर्चाच्या लोकसभा निवडणुकीच्या जाहीरनाम्यामध्ये 'मंडल आयोगाच्या शिफारशी' अंमलात आणण्यात येतील असं स्पष्ट आश्वासन दिलं होतं आणि त्या आश्वासनाप्रमाणे पंतप्रधानांनी लोकसभेमध्ये ही घोषणा केली. त्यासंबंधी आधी काही चर्चा व्हायला हवी होती, वेगवेगळ्या पक्षांशी विचारविनिमय व्हायला पाहिजे होता असं अनेक मंडळी आज म्हणताहेत; पण प्रत्यक्षात जर इतिहास पाहिला तर दहा वर्षांपूर्वी मंडल आयोगाचा अहवाल शासनापुढे आला किंवा खरा इतिहास पाहायचा झाला तर त्याच्याही आधी जाऊन, काका कालेलकर समितीकडे आपल्याला लक्ष द्यावे लागेल.

१९५३ मध्ये प्रख्यात गांधीवादी विचारवंत काकासाहेब कालेलकर यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमण्यात आली. या समितीचा उद्देश असा, की देशातल्या यच्चयावत् नागरिकांना नोकरी किंवा इतर सर्व बाबतींमध्ये समान संधी मिळाली पाहिजे अशी घटनेतील तरतूद आहे; पण देशामध्ये अनेक मागासलेले वर्ग, जाती-जमाती आहेत त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहाच्या बरोबरीने येता यावं याकरिता काही विशेष तरतुदी आणि योजना करण्याचाही अधिकार शासनाला देण्यात आला; पण नेमके मागासलेले वर्ग कोणते, मागासलेले वर्ग (Classes) म्हणजे मागासलेल्या जाती-जमातीच काय? Class आणि Caste या दोन्हींमध्ये फरक आहे; पण घटनेमध्ये वापरण्यात आलेला शब्द वर्ग असा आहे आणि त्याच्याबरोबर मागासलेले सेक्टर (Sector) किंवा सेक्शन (Section) असाही शब्द वापरण्यात आला आहे. तेव्हा याचा नेमका अर्थ काय? मागासलेल्या वर्गांना देशाच्या मुख्य प्रवाहाबरोबरीने कोणाला आणायचं हे ठरविण्याकरिता काका कालेलकर समिती नेमण्यात आली. त्या समितीच्या अहवालामध्ये, अर्थातच मागासवर्गीय जाती-जमातींना राखीव जागा ठेवण्याची तरतूद करण्यात आली; पण विशेष गोष्ट अशी की हा अहवाल तयार होताना समितीच्या अध्यक्षांच्याच मनात या सर्व प्रश्नाविषयी काही शंका तयार होऊ

लागल्या. अहवाल बदलणं तर शक्य नव्हतं. त्या अहवालाविरोधी मतप्रदर्शन करणाऱ्यांनीही आपल्या विरोधी टिपण्याही लिहिलेल्या होत्या. अध्यक्षांना काही अशी विरोधी टिप्पणी लिहिण्याची शक्यता नव्हती. तेव्हा अध्यक्षांनी हा अहवाल राष्ट्रपतींकडे पाठविताना तीस पानी पत्र लिहिलं आणि त्या पत्रामध्ये एकूणच राखीव जागा ठेवण्याच्या कल्पनेच्या परिणामकारकतेबद्दल मोठी शंका व्यक्त केली. एक अहवाल, त्याला तीन विरोधी मतप्रदर्शनं आणि अध्यक्षांच्या पत्रामध्ये त्या अहवालाबद्दल शंका व्यक्त केलेल्या. असा विचित्र अहवाल समोर आल्यानंतर साहजिकच शासनाला त्याविषयी काही कार्यवाही करणं शक्य नव्हतं. तो अहवाल बासनात बांधून ठेवण्यात आला.

पण १९७७ च्या निवडणुकांच्या वेळी त्यावेळच्या जनता पक्षाने आपल्या निवडणुकीच्या जाहीरनाम्यामध्ये असं स्पष्ट आश्वासन दिलं होतं की कालेलकर समितीचा अहवाल अंमलात आणण्यात येईल. अनपेक्षितपणे जनता पक्ष निवडून आला; पण या कालेलकर अहवालाच्या अंमलबजावणीबद्दल मात्र अडचणी निर्माण झाल्या आणि जाहीरनाम्यात स्पष्ट आश्वासन दिलेलं असतानासुद्धा त्या अहवालावर अंमलबजावणी करण्याऐवजी त्यावेळचे पंतप्रधान मोरारजी देसाई यांनी एक नवीन आयोग नेमला, तो मंडल यांच्या अध्यक्षतेखाली.

मंडल आयोगाचा अहवाल १९८० मध्ये शासनाकडे आला. गेली दहा वर्षे या अहवालाला हात लावण्याची कोणाची हिंमत झाली नाही. महाराष्ट्रामध्ये 'नामांतर' प्रकरणी जशी परिस्थिती आहे तशीच काहीशी परिस्थिती या मंडल आयोगाच्या अहवालासंबंधीही तयार झाली. उघडपणे त्याला विरोध करण्याची कुणाचीही तयारी नाही. जसं, नामांतर झालं पाहिजे असं सगळे पक्ष जाहीररित्या व्यासपीठावरून, मंचावरून बोलतात; पण प्रत्यक्षात मात्र नामांतर झालंच पाहिजे अशी तळमळ नाही किंवा इच्छाही नाही; तसंच, मागासवर्गीय हे देशातले जवळजवळ ५२ टक्के आहेत. ५२ टक्के मतदारांना राग येईल अशी कृती जाहीररित्या करण्याची तयारी नाही. जाहीररित्या तर मंडल आयोग अहवालाला पाठिंबा द्यायचा पण आतून प्रत्यक्षात मंडल आयोग अहवाल अमलात येऊ नये अशा हालचाली हे आतापर्यंतच्या सगळया पक्षांचं धोरण. जनता दलाने पहिल्यांदा आपला निवडणुकीचा जाहीरनामा गंभीरपणे घ्यायचा प्रयत्न केला आहे असं दिसतं आणि त्यांनी कदाचित एखाद्या विशिष्ट राजकीय परिस्थितीमुळे असेल, काही वेगळ्या कारणांमुळे असेल, नवीन निवडणुकीची तयारी म्हणून असेल पण मंडल आयोगाच्या अहवालाची अंमलबजावणी होईल असं जाहीर केलं

आहे. म्हणजे निदान, ३७ वर्षे देशापुढे हा प्रश्न आहे. ३७ वर्षे आणि विशेषतः गेली १० वर्षे देशामध्ये या विषयावर चर्चा होते आहे, काही चर्वितचर्वण होत आहे. आणखी काही चर्चा होण्यासारखी बाब शिल्लक राहिली होती असं म्हणणं कठीण आहे. तेव्हा चर्चा न करता, विचारविनिमय न करता हा निर्णय घेण्यात आला हे म्हणणं काही फारसं बरोबर नाही; पण तरीसुद्धा, इतर कोणत्याही मुद्द्यावर जितकं प्रखर आंदोलन उभं राहत नाही इतकं मोठं आंदोलन या विषयावर उभं राहत आहे; संघर्ष उभा राहत आहे एवढंच नव्हे, तर या रागातूनच पुन्हा एकदा देशाचे तुकडे पडायची वेळ येते की काय अशी भीती निर्माण झालेली आहे.

देशाचे मुख्य प्रश्न हे आर्थिक आहेत. गरिबी हा सगळयात महत्त्वाचा प्रश्न; पण तरीसुद्धा गरिबीच्या प्रश्नावर लोकांच्या भावना जितक्या प्रखर होत नाहीत तितक्या प्रखर भावना जातीवार जागा राखीव ठेवण्याबद्दल तयार होतात. हा काय प्रकार आहे, हे समजून घेणे आवश्यक आहे. इतक्या मोठ्या प्रखर भावना ज्या विषयावर तयार होतात, ज्याच्यावर महाभारतासारखं युद्ध होतं. दुर्दैवाची गोष्ट अशी, की एक बाजू खरी आणि एक बाजू खोटी असं म्हणणं फार कठीण होतं. कौरव आणि पांडवांच्या युद्धामध्ये सर्व बरोबर असं कुणाचंच नव्हतं. दोन्ही बाजूच्या चुका होत राहिल्या; पण दोघांमध्येही एकदा अभिमान आणि अभिनिवेश तयार झाला की मग त्यातून महाभारत युद्ध तयार होतं आणि हताशपणे सर्व धृतराष्ट्र आणि सर्व कृष्णसुद्धा महाभारताच्या युद्धामध्ये सामील होतात. हाच इतिहास थोड्याफार प्रमाणामध्ये इथं पुन्हा घडतो आहे.

नोकरी ही गोष्ट गेल्या काही वर्षांत, विशेषतः स्वातंत्र्यानंतर मोठी आकर्षक ठरली आहे. उत्तम शेती तर बाजूलाच राहिली, मध्यम व्यापार हीही गोष्ट बाजूला राहिली आणि आता सगळयात सुखाचं आयुष्य कुणाचं असेल तर ते नोकरदारांचं आणि विशेषतः सरकारी नोकरदारांचं अशी परिस्थिती तयार झाली आहे. स्वातंत्र्य मिळालं त्यावेळी प्राथमिक शिक्षक हा सार्वजनिक करुणेचा विषय होता. प्राथमिक शिक्षकांची परिस्थिती थोडीफार सुधारली पाहिजे, नाहीतर गुरुजींनी काम कसं करायचं, नवी पिढी तयार करणं हे ज्याचं काम, त्या नव्या पिढीच्या शिल्पकारांना थोडंफार तरी चांगलं जगता आलं पाहिजे अशी त्यावेळी चर्चा होत असे. आज परिस्थिती अशी आहे की प्राथमिक शिक्षकाच्या नोकरीकरिता ज्यांचे अर्ज येतात ते अर्जदार नोकरी मिळावी म्हणून २०/२५ हजारापर्यंत आणि बिहारसारख्या राज्यात ४०/५० हजार रुपयांपर्यंत रक्कम देण्याकरिता तयार

होतात. इतकं या नोकऱ्यांचं आकर्षण वाढलं आहे.

महाराष्ट्रामध्ये अगदी गावोगावीसुद्धा शेतमालाच्या भावाच्या कार्यक्रमाला शह देऊन शिवसेना ही पुढे येऊ शकली याचं कारण असं की शिवसेना ही नोकऱ्यांच्या प्रश्नाला जास्त प्राधान्य देते. आणि शेतकऱ्यांच्या मुलांच्या मनातसुद्धा, कधीकाळी शेतीमालाला भाव मिळेल, कधीकाळी शेती हा प्रतिष्ठेचा व्यवसाय होईल यापेक्षा आपल्याला जर कुठं पटकन नोकरी मिळून गेली तर आपले प्रश्न सुटतील आणि आपण या शेतीच्या चिखलातनं बाहेर पडून आनंदमय, सुखमय अशा मध्यमवर्गीय शहरी आयुष्यात प्रवेश करू अशी आशा कुठंतरी वाटत असते. त्यामुळे नोकरीच्या प्रश्नावर सर्वांच्याच भावना थोड्या तीव्र आहेत. आणि त्या नोकऱ्यांमध्ये ५० टक्के टक्के जागा आता यापुढे आपल्या सवर्ण वर्गाला बंद होणार, त्यातल्या त्यात सुधारलेल्या वर्गाला बंद होणार असं म्हटल्यावर विशेषत: विद्यार्थ्यांच्या मनामध्ये राग राहावा, आधीच बेकारीचा काच, त्यात ५० टक्के जागा आपल्याला अ-प्राप्य असं झालं तर त्याबद्दल लोकांच्या भावना तीव्र व्हाव्यात हे साहजिकच आहे.

मागासलेल्या जातीजमातींनी गेली हजारो वर्षे गुलामगिरीपेक्षाही खालचं असं आयुष्य कंठलं आहे. पन्नास टक्के राखीव जागांना आज विरोध होतो; पण हजारो वर्षे सर्व विद्येच्या साधनांमधल्या सर्व शंभर टक्के जागा या फक्त सवर्णांकरिताच खुल्या होत्या आणि बाकीच्या मागासवर्गियांना त्यात प्रवेश नव्हता हीही गोष्ट खरी आहे. केवळ शाळांचा प्रश्न नाही. सर्व शासन हे सवर्णांच्या हाती, एवढंच नव्हे तर काही जातीजमातींचा स्पर्श काय सावलीसुद्धा विटाळाची अशा परिस्थितीमध्ये या समाजाने अनेक वर्षे काढली. विद्या ही आपल्याकरता नसतेच; परमेश्वराने आपल्याला या जातीत जन्म दिला आहे तर याच पद्धतीनं कसंबसं हे आयुष्य कंठायचं; फार तर विरंगुळा म्हणून देवाचं नाव घ्यायचं अशा मानसिकतेमध्ये देशातला जवळजवळ तीन चतुर्थांश समाज जगत आला.

त्यांच्याकरिता काहीतरी करणं आवश्यक आहे यात काही वाद नाही. पंतप्रधानांनी लोकसभेमध्ये एक वाक्य वापरलं ते फार महत्त्वाचं आहे. पंतप्रधान म्हणाले की आर्थिक परिस्थिती बदलता येते, कालची गरीब माणसं आज बऱ्यापैकी होतात किंवा श्रीमंतही होतात; धर्मसुद्धा बदलता येतो; हिंदूंना मुसलमान होता येतं, मुसलमानाला ख्रिश्चन होता येतं, हिंदूंना ख्रिश्चन होता येतं. धर्मांतर करता येतं; पण जी कधी जात नाही ती खरी जातच राहते. हिंदू मुसलमान झाले

तरी त्या धर्मातही त्यांची जात कायम राहते. काही दिवसांपूर्वी दिल्लीला राखीव जागांचा फायदा मिळावा  याकरिता ख्रिश्चन दलितांचा एक मेळावा झाला. ज्या ख्रिश्चन आणि मुसलमान धर्मांनी सर्व माणसं सारखी आहेत असं तत्त्व मांडलं तेच धर्म हिंदुस्थानात आल्यानंतर त्या धर्मात गेलेल्या लोकांची जात दूर करण्याचं सामर्थ्य या धर्मांमध्येसुद्धा राहिलेलं नाही. मग मागासलेल्या जातींना देशाच्या मुख्य प्रवाहामध्ये आणण्याकरिता काय करता येईल?

राखीव जागा त्यांच्याकरिता ठेवणं हा कार्यक्रम त्यांचं मागासलेपण दूर करण्याकरता प्रभावी आहे का? जोतिबा फुल्यांनीसुद्धा असा मुद्दा मांडला होता. त्याचवेळी काही राखीव जागांचा प्रश्न नव्हता; पण सर्व अधिकाराच्या जागा, शासनातल्या जागा, कचेरीतल्या जागा, न्यायालयातल्या जागा या भटकारकुनांनी भरलेल्या आहेत; आणि त्यांच्या जागी जर का कुणब्यांची मुलं शिकून जाऊन बसली तर कुणब्यांवरचा (शूद्रातिशूद्रावरचा) अन्याय  मोठ्या प्रमाणात दूर होईल अशी एक कल्पना जोतिबा फुल्यांनी मांडली. जोतिबांनीच वापरलेली कल्पना, कदाचित्, आज पंतप्रधान वापरीत आहेत. लाल किल्ल्यावरून बोलताना पंतप्रधानांनी असं म्हटलं की मागासलेल्या जातीजमातींना केवळ आर्थिक लाभ मिळवून देऊन भागणार नाही, तर त्यांच्या हाती राजकीय सत्तासुद्धा जाण्याची आवश्यकता आहे.

राजकीय किंवा शासकीय सत्ता मागासलेल्या समजल्या जाणाऱ्या वर्गांच्या हाती स्वातंत्र्यानंतर किती गेली? मंडल आयोगाने यासंबंधी मान्य केले आहे की १९४७ नंतर पहिल्यांदा जेव्हा काँग्रसची मंत्रिमंडळं तयार झाली त्या मंत्रिमंडळांमध्ये बहुतेक राज्यांतले मुख्यमंत्री हे ब्राह्मण किंवा त्याच्या बरोबरीच्या समजल्या जाणाऱ्या जातीतले होते. आज ब्राह्मण मुख्यमंत्री ही हिंदुस्थानामधली अपवादात्मक गोष्ट झाली आहे. भारतीय जनता पार्टीची राज्यं जिथं याच वेळी आली आहेत त्याच्यामधील जोशी, शेखावत अशी काही नावं सोडली तर ब्राह्मण मुख्यमंत्री हा राहिलेला नाही. लोकसभेमध्ये किंवा वेगवेगळ्या राज्यांच्या विधानसभांमध्ये निवडून आलेले प्रतिनिधी जर पाहिले तर त्यातसुद्धा ब्राह्मण किंवा त्यांच्या बरोबरीने समजल्या जाणाऱ्या जातींची संख्याही अत्यंत कमी आहे. तेव्हा एका अर्थाने शासकीय सत्ता जरी नसली तरी राजकीय सत्ता ही मोठ्या प्रमाणात अनुसूचित जाती, जमाती आणि इतर मागासवर्गीय यांच्या हाती आलेली आहे.

पण शासकीय सत्तेबद्दल मात्र अशी परिस्थिती नाही. साडेसत्तावीस टक्के जागा अनुसूचित जाती-जमातींकरिता राखून ठेवलेल्या आहेत; पण जवळजवळ

४० वर्षे ही योजना राबवल्यानंतर प्रत्यक्ष आकडेवारी पाहायला गेलो तर प्रथम श्रेणीच्या नोकऱ्यांमध्ये अनुसूचित जाती-जमातींचं प्रमाण हे फक्त साडेआठ टक्के आहे. आणि चतुर्थ श्रेणीच्या नोकऱ्यांमध्ये म्हणजे जमादार, पट्टेवाले, साफसफाई कामगार हे जरी घेतले तरी त्यांचं प्रमाणसुद्धा साडेसत्तावीस टक्क्यांच्या आसपास आलेलं नाही, आजही त्यांची टक्केवारी २० ते २२ च्या दरम्यानच आहे.

म्हणजे आपल्याला दोन विभिन्न प्रवाह दिसतील. राजकीय सत्ता, निदान संख्या पाहिली तर इतर जमातींच्या हाती गेलेली आहे. शासकीय सत्ता पाहिली तर ती मात्र अजूनही सवर्णांच्या आणि त्यातल्या त्यात उच्च सवर्णांच्या हाती राहिली आहे. असे हे दोन वेगळे प्रवाह आहेत.

पण शेवटी नोकरशाही ही राजकीय सत्तेची नोकर आहे. एखाद्या मंत्रालयाचा सचिव जरी झाला तरी तो शेवटी मंत्र्याच्या हाताखाली, मंत्र्याच्या आदेशआज्ञांप्रमाणे काम करतो. मग राजकीय सत्ता मागासलेल्या वर्गांच्या हाती गेली किंवा ब्राह्मणेतर वर्गांच्या हाती गेल्यानंतर या नोकरशाहीकडून त्यांनी आपल्याला पाहिजे तसं काम करून घेणं शक्य होतं, आवश्यक होतं; पण प्रत्यक्षात असं घडलेलं मात्र दिसत नाही. असं का होतं?

एक दुसरं उदाहरण मी तुमच्यापुढं ठेवतो. अमेरिकेमध्ये अब्राहम लिंकन आणि यादवी युद्धानंतर गुलामगिरीची प्रथा संपली. आणि सर्व काळ्या माणसांना निदान कागदोपत्री घटनेत समान हक्क देण्यात आले. काहींची आर्थिक परिस्थितीसुद्धा सुधारू लागली आणि ज्यांची आर्थिक परिस्थिती सुधारत होती ते निग्रो प्रतिष्ठा म्हणून गोरे लोक ज्या भागामध्ये राहतात त्याच भागामध्ये घर घेण्याचा प्रयत्न करू लागले. म्हणजे ज्यांची परिस्थिती सुधारली त्यांनी उरलेल्या निग्रो लोकांच्या सुधारणेकरिता काम करण्याऐवजी त्यांच्यापासून अंतर राखायला सुरुवात केली. एवढंच नव्हे तर गोऱ्यांच्या वस्तीमध्ये जाऊन गोऱ्यांच्याच पद्धतीने, काही बाबींमध्ये गोऱ्यांच्याही पेक्षा जास्त गोऱ्यांसारखं वागण्याचा त्यांनी प्रयत्न केला. जिथं गोऱ्यांच्या वस्तीमध्ये काळ्यांची संख्या वाढत चालली तिथं असं लक्षात आलं, की काही दिवसांनी गोऱ्यांनीच त्या वस्त्या सोडून दुसरीकडे जायला सुरुवात केली आणि या पद्धतीने अमेरिकेतल्या जवळजवळ सगळ्या मोठ्या शहरांमध्ये जुन्या काळी शहराच्या मध्यभागी असलेल्या ज्या काही वस्त्या प्रतिष्ठित समजल्या जात होत्या त्या सगळ्या वस्त्या आता जवळजवळ काळ्या लोकांच्याच झाल्या आहेत. आणि गोऱ्या लोकांच्या सगळ्या वस्त्या मोठ्या शहरांच्या बाहेर जी उपनगरं आहेत, त्यामध्ये उभ्या राहिल्या. त्याचप्रमाणे काही

प्रकार हिंदुस्थानात घडतो आहे असं दिसतं आहे.

मी नेहमी म्हणत असतो की शेतकऱ्याच्या मुलाइतका शेतकऱ्याचा शत्रू दुसरा कोणी नाही. शेतकऱ्याचा मुलगा मंत्री झाला, अधिकारी झाला आणि त्याचं पोट शेतीवर अवलंबून राहिनासं झालं की मग तो शेतकऱ्याची फारशी काळजी करत नाही. आईबापांनासुद्धा पैसे पाठविण्याचं काम करत नाही. तो आपण नवीन संस्कृतीमध्ये कसे सामावून जाऊ, त्यातच कशी प्रतिष्ठा प्राप्त करून घेऊ याचा प्रयत्न करायला लागतो. त्याप्रमाणेच, राज्याच्या सत्तेची जी काही चिन्हं आहेत, खुणा आहेत, प्रतिकं आहेत ती सगळी मागासवर्गीयांच्या हाती गेली; पण ती त्यांच्याकडे जाईपर्यंत त्यांच्या मनामध्ये मागसवर्गीयांचे प्रतिनिधी म्हणून आपण इथं आलो आहोत ही भावना राहिली नाही. उलट आपण शहरातल्या उच्चभ्रू समाजामध्ये त्यातल्या त्यात प्रतिष्ठेने, त्यातल्या त्यात थाटामाटाने कसं राहू ही इच्छा त्यांच्या मनात तयार झाली आणि राजकीय सत्ता हाती आल्यानंतरसुद्धा नोकरशाहीचा प्रभाव वाढत राहिला. पंतप्रधानांच्यासुद्धा हाती जितकी सत्ता नाही तितकी नोकरशाहीच्या हाती सत्ता आली हे उघड दिसतं आहे. त्याची कारणं अनेक आहेत. त्यांच्यातलं महत्त्वाचं कारण मला एक असं दिसतं की जातिभावना असो किंवा नसो; पण सर्व समाजाला ब्राह्मणवर्ग किंवा सवर्ण जे काही करेल तेच प्रतिष्ठेचं आहे आणि आपली सगळी जगण्याची जी काही पद्धत आहे ती कुठंतरी कमी आहे अशा एक प्रकारच्या न्यूनगंडानं ग्रासलं आहे. त्यामुळे सवर्ण जे करतील तेच श्रेष्ठ; राजकीय सत्ता आपल्या हाती आली असली तरी सवर्ण जे करतात त्यालाच प्रतिष्ठा आपोआप प्राप्त होते असा काहीसा प्रकार आपल्यासमोर घडताना दिसतो आहे.

जातीयतेचा एक परिणाम दिसतो की हजारो वर्षे श्रेष्ठ मानल्या गेलेल्या जाती जे करतील तेच श्रेष्ठ आहे, त्यांच्या हाती काल परवापर्यंत प्रतिष्ठेची जी काही साधनं किंवा प्रतिकं होती ती आमच्या हाती आली तर त्यातली प्रतिष्ठा किंवा महत्त्व निघून जातं असा काहीतरी एक विचित्र प्रकार समोर घडताना दिसतो आहे. राखीव जागांचा एक प्रयोग देशात झाला. गेली चाळीस वर्षे झाला आणि राखीव जागांचा प्रयोग ही काही तशी साधी गोष्ट नाही. राजकयी संस्थांच्या निवडणुकींमध्ये राखीव जागा असू नसेत, विशेषतः हरिजनांसाठी, अस्पृश्यांसाठी म्हणून मतदारसंघ वेगळे करू नयेत याकरिता स्वतः महात्मा गांधींनी उपोषण केले होते. डॉ. आंबेडकर आणि महात्मा गांधी यांच्यामध्ये त्यावेळी या विषयावर मोठा संघर्ष तयार झाला. आपले प्राण पणाला लावून हरिजनांसाठी, अस्पृश्यांसाठी

मतदारसंघ वेगळे करू नयेत याकरिता स्वत: महात्मा गांधींनी उपोषण केलं होतं. डॉ. आंबेडकर आणि महात्मा गांधी यांच्यामध्ये या विषयावर मोठा संघर्ष तयार झाला होता. गांधीजींनी हरिजनांचा मतदारसंघ हिंदूंपेक्षा वेगळा असू नये असं ठामपणानं मांडलं. स्वातंत्र्यानंतर गांधीजींची ही कल्पना बाजूला ठेवण्यात आली, राजकीयदृष्ट्या अनुसूचित जाती-जमातींकरिता वेगळे राखीव मतदारसंघ देण्यात आले. एवढंच नव्हे तर नोकऱ्यांतसुद्धा त्यांच्याकरिता राखीव जागा ठेवण्यात याव्यात असं ठरलं; ४० वर्षे त्याचा प्रयोग झाला.

वर आलेल्या आकडेवारीप्रमाणे साडेसत्तावीस टक्क्यांच्या आसपास भरती तर प्रत्यक्षात कुठेच झालेली दिसत नाही आणि जी काही भरती झाली त्यामुळेसुद्धा अनुसूचित जातीजमातींच्या सर्वसामान्य माणसांना काही फायदा झाला असंही दिसत नाही. दलित वर्गामध्ये काही 'ब्राह्मण' तयार झाले. भारतातून इंडियात गेलेली शेतकऱ्यांची मुलं जशी इंडियाची झाली; हनुमान लंकेला पाठवला आणि रावणाचं वैभव पाहून तो तिथंच राहावा असा जो काही प्रकार शेतकऱ्यांच्या बाबतीत घडला, तसंच दलितांच्या बाबतीतसुद्धा. ज्यांना राखीव जागांचा फायदा मिळाला ते पुढारी अत्यंत पाश्चिमात्य पद्धतीनं राहू लागले. संध्याकाळची व्हिस्की त्यांना आग्रहाने लागू लागली आणि त्यांचं जीवनमान सुधारल्यानंतरसुद्धा अनुसूचित जातीजमातींच्या सर्वसामान्य माणसांना या राखीव जागांचा फायदा मिळू शकला नाही. काही माणसं याचा गैरफायदा घेऊन गेली. दोन तीन पिढ्यांमध्ये बाप हा मोठा सरकारी अधिकारी झाला, त्याचा मुलगा मोठा डॉक्टर, वकील झाला आणि तरीदेखील अनुसूचित जाती जमातींकरिता मिळणारा फायदा हा त्यांच्या या तिसऱ्या पिढीतल्या अनुसूचित जाती-जमातीच्या माणसाला मिळू लागला; त्याच्या तुलनेने सर्वच दृष्टींनी मागासलेल्या सवर्ण वर्गाच्या विद्यार्थ्यांना किंवा माणसांना नाकारून त्यांना हा हक्क मिळू लागला. या परिस्थितीमध्ये साहजिकच काही तेढ आणि काही संघर्ष तयार होणं समजण्यासारखं आहे. एवढंच नव्हे तर अरुण शौरी यांनी त्यांच्या लेखात एक उदाहरण दिलं आहे. १९५७ मध्ये नोकरीला लागलेल्या एका माणसाची १९६६ मध्ये जन्मलेली एक मुलगी आहे. राजस्थानमधलं त्यांनी एक उदाहरण दिलं आहे की अनुसूचित जाती जमातीच्या एका अधिकाऱ्याला एकाच दिवशी दोन बढत्या मिळाल्या. राखीव जागांचे जे काही नियम करण्यात आले आहेत त्याचे असे हे काही विचित्र परिणाम दिसू लागले आहेत. त्यामुळे साहजिकच या सर्व राखीव जागा ठेवण्याच्या पद्धतीबद्दल इतरांच्या मनांत जबरदस्त शंका झाल्या.

काही माणसं नोकरीमध्ये घेतली म्हणजे त्याने सबंध समाजाचा फायदा होतो का? एका अर्थाने होतो. प्रथम श्रेणीमध्ये आठ टक्के नोकरदार अनुसूचित जाती जमातीतून आले हे खरं. कदाचित काही कुटुंबांनाच या राखीव जागांचा फायदा मिळू लागला हेही खरं; पण त्याबरोबर, सगळ्या देशातला मध्यम वर्ग जो एकाच जातीतला होता त्यात निदान थोडी विविधता तर आली! पूर्वी सर्वच मध्यम वर्ग हा सवर्णांचा होता. आज आर्थिकदृष्ट्या मध्यम वर्ग हा केवळ सवर्णांचा न राहता त्या वर्गांमध्ये आणखी काही जातीजमातींची माणसं आली. हासुद्धा फायदा अगदी काही नाकारण्यासारखा नाही. यापलीकडे, आता इतर मागासलेल्या जातींनासुद्धा याच तऱ्हेची सवलत जाहीर करण्यात आली आहे. त्यामुळे साहजिकच, ४० वर्षांमध्ये जो प्रयोग यशस्वी झाला नाही, साडेसत्तावीस टक्क्यांकरिता यशस्वी झाला नाही तो ५० टक्क्यांकरिता कसा यशस्वी होईल असा युक्तिवाद केला जात आहे.

मनुष्य स्वत:चा स्वार्थ कशात आहे ते पाहतो आणि त्या स्वार्थाचं तत्त्वज्ञान करायला लागतो. या अनुसूचित जातीजमाती आणि इतर मागासवर्गीय जाती यांच्याकरिता ठेवायच्या राखीव जागा यासंबंधीसुद्धा जो तो आपापल्या स्वार्थाप्रमाणे तत्त्वज्ञान तयार करतो आहे. अरुण शौरीसारख्या संपादकांनी एक मुद्दा मांडला आहे तो असा की शेवटी गुणवत्तेला काही वाव आहे की नाही? जी काही माणसं शासनामध्ये नेमली जायची ती गुणवत्तेच्या आधारानं नेमली जायची का जातीच्याआधारवर नेमली जायची? या प्रश्नांना काय उत्तर आहेत? गुणवत्ता म्हणजे काय? समजा, एखाद्या मुलाने वनस्पतिशास्त्र किंवा भूगोल विषय घेऊन पदवी परीक्षा दिल्यानंतर जर त्याला एखाद्या खात्यामध्ये नेमलं. भूगोल जो त्याने शिकलेला असतो किंवा वनस्पतिशास्त्र जे शिकलेलं असतं त्या विषयांच्या ज्ञानाचा त्याला काही फारसा उपयोग होतो असं नाही; पण शिकता शिकता विचार करण्याचा आणि निर्णय करण्याच्या प्रक्रिया त्यानं ज्या आत्मसात केलेल्या असतात त्यांचा उपयोग त्याला या नोकरीत होतो. काय शिकला आहे यापेक्षा शिकता शिकता त्याच्या बुद्धीचा जो विकास झाला तो महत्त्वाचा आहे; पण गुण कशावर मिळतात? काही प्रमाणात बुद्धीवर मिळतात हे खरे; पण परीक्षेमध्ये मिळणारे गुण हे पुष्कळदा घोकंपट्टी केलेल्या उत्तरांवरच मिळतात. मग नोकरीकरता निवड करताना गुणवत्ता म्हणजे त्या परीक्षेत मिळालेले गुण हे काही तितके महत्त्वाचे नाही. त्याच्या पलीकडे दुसरा मुद्दा येतो, की सवर्णांचे ९२ टक्के गुण आणि मागासवर्गियांचे ४५ टक्के गुण यांची तुलना खरंच जर

करायला गेलो तर ४५ टक्के गुणांची किंमत काही जास्त आहे किंवा नाही? समाजाचा सबंध तराजूच हा मुळी दीडदांडीचा आहे. आणि आतापर्यंत त्या दीडदांडीच्या तराजूमध्ये त्यांना मापलं जात होतं; पण सर्व सामाजिक अडचणी लक्षात घेऊन त्यांनी मिळविलेल्या ४५ टक्के गुणांचं मूल्य हे दोघांची तुलना करून पाहता किती मानलं पाहिजे? सरळ मार्गावरून धावणारा खेळाडू आणि अनेक अडथळे पार करत तितकेच अंतर धावावे लागणारा खेळाडू यांना लागणारा वेळ सारखाच मोजणार का? तसा तो मोजणं योग्य होणार नाही. मी ब्राह्मण घरात अगदी गरीब अवस्थेतल्या कुटुंबात जन्मलो. तरीसुद्धा, घरामधल्या ब्राह्मणी, सुशिक्षित वातावरणाचा परिणाम माझ्या शिक्षणावर झाला आणि बाकीची सर्व गरिबी असूनसुद्धा शिक्षणामध्ये मी इतर विद्यार्थ्यांपेक्षा दोन पावलं पुढं राहू शकलो. माझ्या वर्गामध्ये ब्राह्मण नसलेले, अस्पृश्य असलेले, घरची परिस्थिती आमच्यापेक्षा बरी असलेले असे बरेच विद्यार्थी होते; पण त्यांच्यापेक्षासुद्धा शिक्षणामध्ये मला काही फायदा मिळत होता. मग त्या मुलाने मिळविलेले ४५ टक्के गुण माझ्या ९२ टक्क्यांइतके नसतील; पण त्याचे ४५ गुण हे काही केवळ ४५ नाहीत. ते निदान ५०/६०/७० पर्यंततरी आहेत हे आपल्याला पहिल्यांदा मानलं पाहिजे आणि गुणवत्तेने शासनातल्या सर्व जागा भरायच्या हा जर मुद्दा मान्य केला तर मला वाटतं इंग्रजांना काढून लावणं हे मुळातच चूक होतं. कारण शासकीय कर्तबगारीच पाहायची झाली तर सध्याच्या शासनव्यवस्थेपेक्षा इंग्रजांची शासनव्यवस्था चांगली चालली होती हे मान्यच करायला हवं; पण 'स्वराज्याची तहान सुराज्याने भागणार नाही, आमची माणसं तिथं असणं आवश्यक आहे.' असं म्हणून आपण इंग्रजांना काढलं आणि आमची म्हणून जी माणसं बसवली ती समाजातल्या एका विशिष्ट थरातीलच बसवली. त्यानंतर उरलेल्या लोकांनी जर आता असं म्हणायला सुरुवात केली की इंग्रजांचं राज्य गेलं, त्याच्यापेक्षा कमी कुशलतेचं, कमी कर्तबगारीचं असं राज्य आम्ही स्वीकारलं; पण या राज्यामध्ये आमचीसुद्धा माणसं तिथं बसली पाहिजेत, भले ती आणखी कमी कर्तबगार असली तरी चालतील. इंग्रजी आणि सवर्णांचं शासन यांच्या कर्तबगारीमध्ये जी काही तफावत होती तितकीच, कदाचित् जास्त तफावत सवर्णांचं शासन आणि मागासलेल्या जातींचं शासन यांच्यात असेल; पण भले असो. आमची स्वराजाची तहान सुराज्याने भागणार नाही. आमची माणसं तिथं आली पाहिजेत, असा जर आग्रह धरला तर त्यात काय चूक आहे?

पण तरीसुद्धा एक महत्त्वाचा प्रश्न राहतो. आमचं काय चूक आहे, आम्हाला

संधी नको काय? सवर्ण म्हणतील, आम्ही काही आग्रहाने सवर्णांचा जन्म मागून घेतला नव्हता. आमच्या पूर्वजांनी काही अन्याय केले असतील; पण त्यांचा दोष आमच्यावर का? यालाही खरं म्हटलं तर उत्तर आहे. सवर्ण घरामध्ये जन्माला आल्यानंतर जे काही फायदे मिळाले ते फायदे तुम्हाला नाकारता येण्यासारखे नाहीत. मग त्यामुळे येणारे गैरफायदेसुद्धा तुम्ही नाकारणे योग्य नव्हे.

एकूणच परिस्थितीबद्दल वितंडवाद उभे करायच्या आधी या सर्व प्रश्नांकडे एका वेगळ्या दृष्टिकोनातून पाहणे आवश्यक आहे. आज हिंदुस्थानातली आर्थिक परिस्थिती थोडी वेगळी असती असं आपण गृहीत धरू. मग काय झालं असतं? यूरोप, अमेरिकेमध्ये शाळा, कॉलेजांच्या नोटीस बोर्डावर दररोज जाहिराती लागतात, की अमक्या अमक्या कंपनीला काम करण्याकरिता माणसं हवीत. तुम्हाला दोन तास काम करायचं असेल तर दोन तास करा, चार तास करायचं असेल तर चार तास करा; कंपनीमध्ये तुम्ही येणार असाल तर आनंदच आहे, नाहीतर जिथं तुम्हाला सोयीस्कर असेल तिथं काम पाठवू, जी त्यातल्या त्यात हुशार मुलं असतात त्या मुलांवर मोठमोठ्या कंपन्या नजर ठेवून असतात, त्यांना शिक्षणाकरिता पैसे कमी पडत असतील तर ते पैसेसुद्धा पुरवतात. अशा अपेक्षेने की त्यांचं शिक्षण झाल्यानंतर त्यांनी आपल्या कंपनीत काही काळासाठीतरी यावे. तिथं अर्जदार नोकऱ्यांकरता धावत नसून नोकऱ्या देणारे उमेदवारांकरिता धावताहेत अशी परिस्थिती आहे. अशी जर परिस्थिती आपल्या देशात असती तर राखीव जागांच्या या सबंध प्रश्नाला काही अर्थ राहिला असता का? मग हे इथं हे असं का नाही?

एक भाकरी. जी खाण्याकरता चौघे टपलेत. आणि म्हणून त्या चौघांमध्ये, म्हणजे त्या चार गरिबांमध्ये भांडणे. देशामध्ये एकूण शंभर बेकार तयार होत असतील तर तयार होणाऱ्या नोकऱ्यांची संख्या आहे दहाच आणि त्या दहांपैकी दोन सवर्णांना जायच्या का अनुसूचित जातीजमातींना जायच्या याच्याकरिता आपण एकमेकांची डोकी फोडतो आहोत; पण सगळयाच्या सगळया नोकऱ्या जर सवर्णांना द्यायच्या ठरवल्या म्हटलं तरी सवर्णांतील बेकारीचा प्रश्न सुटणार नाही. सगळ्याच्या सगळ्या नोकऱ्या राखीव ठेवल्या गेल्या तरीसुद्धा दलित तरुणांच्याही बेकारीचा प्रश्न सुटत नाही. असं असताना आपण एकमेकांची डोकी फोडायला तयार होतो. याचं कारण मुळामध्ये आर्थिक व्यवस्था चुकीची आहे हे आहे. हा मुद्दा मी या आधी अनेकवेळा मांडला आहे.

जातीजमातींच्या प्रश्नावर बोलणारी काही माणसं अशी दिसतात की एकाच वेळी जातिव्यवस्थेचं समर्थन करतात आणि दुसऱ्या बाजूला मागासलेल्या जातीजमातींना विशेष सवलती देण्यालासुद्धा विरोध करतात. खरं म्हटलं तर, १९५० मध्ये घटना तयार झाली त्यावेळी जातीजमाती नष्ट करण्याऐवजी भारताने जातीव्यवस्था मान्य केली असती तर जास्त चांगलं झालं असतं. सर्व देशामध्ये ज्या काही जातिव्यवस्था आणि त्या जातिव्यवस्थांप्रमाणे जे काही व्यवसाय चालत होते त्याप्रमाणे ही व्यवस्था पुढे चालू राहिली पाहिजे होती. उदा. सिव्हिल इंजिनिअरिंगच्या कॉलेजमध्ये प्रवेश फक्त 'गवंड्यां'च्या मुलांना मिळेल किंवा लेदर टेक्नॉलॉजी शिकायला फक्त 'चांभारां'च्या मुलांना जाता येईल. मेटॅलर्जी कोर्स हा फक्त तांबट, लोहार, सोनार अशा ज्या काही जाती आहेत त्यांच्याच मुलांकरिता खुला राहील; शल्यचिकित्सा (सर्जरी) फक्त न्हाव्यांच्याच मुलांना शिकता येईल. ब्राह्मणांकरिता फक्त शिक्षक आणि तेसुद्धा भाषेचे किंवा तत्त्वज्ञानाचे शिक्षक एवढंच क्षेत्र खुलं राहील असं जर त्यावेळी घटनेत घातलं असतं तर ते अधिक संयुक्तिक झालं असतं. जातीयता नष्ट करण्याची भूमिका घेतली ती काही कुणाला दलितांबद्दल कळवळा आला म्हणून नव्हे तर नवीन जे काही औद्योगिक युग चालू व्हायचं आहे त्या औद्योगिक युगामध्ये आता इतके दिवस हीन मानले गेलेले व्यवसायच जास्त फायद्याचे होणार आहेत असं लक्षात आल्यानंतर सवर्णांचा डोळा त्या जागांकडे लागला आणि ते व्यवसाय आपल्याला हाती घेता यावेत एवढ्यापुरतीच जातिव्यवस्था त्यांनी नष्ट केली. १९५० मध्ये आपण जर उलटं चित्र मांडलं असतं तर आजचा हा प्रश्न कदाचित अगदी वेगळ्या स्वरूपात दिसायला लागला असता.

काही माणसं असं म्हणतात, की शासकीय सत्ता हीसुद्धा मागासलेल्या जातीजमातींच्या हाती येणे आवश्यक आहे. सर्व सचिवालयांमध्ये सवर्ण भरले आहेत, शहरी भरले आहेत आणि ते शेतकऱ्यांच्या मागण्यांनासुद्धा कडाडून विरोध करतात असं म्हणून काही दिवसांपूर्वी चौधरी देवीलालांनी कल्पना मांडली की सर्व सचिवालयांमध्ये शेतकऱ्यांची मुलं आली पाहिजेत; नियोजनामध्ये शेतकऱ्यांचे प्रतिनिधी पाहिजेत. एवढंच नव्हे तर परदेशांमध्ये पाठविले जाणारे राजदूतसुद्धा मु.पो. अमुक तमुक (खेडेगाव) असा पत्ता असलेले असले पाहिजेत. ही कल्पना प्रत्यक्षात आपण जर अंमलात आणली तर त्यातून शेतकऱ्यांचं भलं होईल का? अशा तऱ्हेने शेतकऱ्यांचं भलं होणार असेल तर मग त्या जागी मागासलेल्या वर्गांचे प्रतिनिधी पाठविले तर त्यांचंसुद्धा भलं होईल असं म्हणायला

काही हरकत नसावी. प्रत्यक्षात असं काही घडताना दिसत नाही. नोकरीत जाणारी माणसं आपल्या आईबापांनासुद्धा विसरतात. एवढंच नव्हे तर मागे राहिलेल्या आपल्या जातीजमातींच्या माणसांवर आणखी कठोर अन्याय करायलासुद्धा तयार होतात. कारण 'सचिवालया'ची यंत्रणा मुळामध्ये शोषकांची यंत्रणा आहे; इंडियाची यंत्रणा आहे. त्या यंत्रणेमधले काही नटबोल्ट काढून त्या बदली आपले नटबोल्ट बसवले म्हणजे ते यंत्र काही वेगळं काम करील अशी कल्पना करणं साफ चूक आहे. जे यंत्र हजारो, लाखो माणसांना गिळून टाकू शकतं त्याचा आपण भाग बनल्याने आपल्या समाजाचा काही फायदा होईल अशी आशा ठेवणं फोल आहे. जर का शासकीय यंत्रणेवर मागासलेल्या जातींचा किंवा अनुसूचित जातीजमातींचा किंवा शेतकऱ्यांचा प्रभाव पाहिजे असे वाटत असेल तर त्याकरिता त्या यंत्रात जाऊन काही जमायचं नाही. जी काही सत्ता आहे ती त्या यंत्रातून बाहेर पडून जिथं शेतकरी आहे तिथं येईल अशी जर व्यवस्था झाली तर परिस्थितीमध्ये काहीतरी फरक पडण्याची शक्यता आहे. शेतकरी 'सचिवालया'त जाऊन बदल घडणार नाही पण 'सचिवालया'त घ्यावयाचे निर्णय जर पंचायत राज्यामार्फत गाव पातळीवर, तालुका पातळीवर, जिल्हा पातळीवर होऊ लागले तरच फक्त काही बदल होण्याची शक्यता आहे.

नोकरी देणारे उमेदवारांच्या मागे धावताहेत अशी स्थिती असती तर काय झालं असतं, १९५० मध्ये घटना बनवताना जातिनिर्मूलनाची भाषा करण्याऐवजी रूढ जातिव्यवस्था कायम ठेवून त्या त्या जातीतील तरुणांना त्यांच्या परंपरागत चालत आलेल्या उद्योगातील विकसित तंत्रज्ञानाचा लाभ मिळू दिला असता तर काय झालं असतं आणि शासकीय यंत्रणेमध्ये, 'सचिवालयां'मध्ये सवलतींमुळे जाऊन बसलेली मंडळीही त्यांच्या समाजाच्या उत्थानाच्या दृष्टीने कशी निष्प्रभ ठरली आहे अशी तीन चित्रं मी समोर मांडली आहेत.

खरं तर, जातीजमातीचा प्रश्न खऱ्या अर्थानं सुटावा ही इच्छा सवर्णांनाही नाही आणि वेगवेगळ्या जातींच्या पुढाऱ्यांनाही नाही. मुळातली इंडियाची लुटालुटीची व्यवस्था कायम ठेवून त्या व्यवस्थेची जी काही शिंतं आहेत त्यातील जास्तीत जास्त आपल्या हाती कशी पडतील असा प्रयत्न सगळेजण करताहेत; व्यवस्था बदलण्याचा विचार कुणाच्या मनात येतच नाही. आणि खेदजनक गोष्ट अशी दिसते, की स्वच्छ आर्थिक पातळीवर विचार मांडणाऱ्या संघटनांची पीछेहाट होत आहे, त्या मागे हटताहेत, त्यांची आंदोलनं त्यामानाने निष्प्रभ होताहेत. आम्हाला माणसासारखं जगण्याचा हक्क आहे असं म्हणणाऱ्या चळवळी मागे

पडताहेत आणि अशा हक्काची पायमल्ली करणाऱ्या यंत्रणेतील नोकरीमध्ये आम्हाला हक्क मिळाला पाहिजे, त्या नोकऱ्यांमध्ये राखीव जागा मिळाल्या पाहिजेत किंवा दुसऱ्या कुणाला मिळता कामा नयेत असं म्हणणाऱ्यांची आंदोलनं प्रखर होताहेत; गाड्या जळताहेत, रस्ते बंद पडताहेत, राजधानी बंद पडते आहे. एकूणच परिस्थिती निराशा तयार करणारी आहे. एका अर्थाने, हा आर्थिक विचार मांडणाऱ्या सर्वांचा पराभव आहे.

*(६-२१ सप्टेंबर १९९०)*

◆◆

# समुद्राला मीठ हरवून चालणार नाही

"बौद्ध किंवा हरिजन समाज तसेच मुसलमान हेही भारतीय जनता पक्ष, शिवसेनेप्रमाणे अत्यंत कडवे जातीयवादी आहेत आणि ते जातीयतेच्या आधारावर हिंदुधर्मियांवर आक्रमक दृष्टीने प्रचार करतात, 'हिंदू को मिटा डालो, बौद्ध धर्म लाओ' असे नारे लावत हिंदुधर्मियांच्या मोहल्ल्यांतून मिरवणुका काढतात तेव्हा शेतकरी संघटना कोणतेही आंदोलन उभं करीत नाही; आपल्या धार्माबद्दल बौद्ध किंवा मुसलमान अभिमान बाळगतात तेवढाच अभिमान हिंदूंनीही आपल्या धर्माबद्दल बाळगला तर त्यात हिंदूंचे काय चुकले?" अशा शंका विचारणारी शेतकरी संघटनेच्या कार्यकर्त्यांची व हितचिंतकांची पत्रे संघटनेने जातीयवादाविरुद्ध घेतलेल्या ठाम भूमिकेच्या अनुषंगाने आली आहेत. या शंकांचे सामूहिक निरसन करण्याचा हा प्रयत्न आहे.

स्वधर्माविषयी अभिमान बाळगणे हे आवश्यक आहे; जो स्वधर्माविषयी अभिमान बाळगत नाही त्याचा विनाश अटळ आहे.

माझा धर्म कोणता? मी कोणत्या धर्माचा अभिमान बाळगायचा?

"धारयति इति धर्मः।" म्हणजे, संगोपन करतो तो धर्म अशी व्याख्या धर्ममार्तंडच अनेक वेळा देतात आणि अशा धर्माचे रक्षण केले तर तो धर्म आपले रक्षण करतो– "धर्मो रक्षति रक्षितः।" असेही आग्रहाने सांगतात.

पण, "धारयति इति धर्मः।" असे वचन आहे, "अधारयत् इति धर्मः।" असे नाही. म्हणजे, संगोपन करतो तो धर्म असे वचन आहे, ज्याने कधीकाळी भूतकाळात संगोपन केले तो धर्म असे वचन नाही.

एके काळी जे चांगले असेल तेच आजही चांगले असेल असे थोडेच आहे?

या विश्वाची उत्पत्ती कशी झाली, त्याचे चलनवलन कसे चालते आणि या सगळ्या व्यापाचा अर्थ काय या प्रश्नांची उत्तरे एका काळी ऋषिमुनींनी, साधुसंतांनी,

पैगंबर प्रेषितांनी चिंतन, मनन करून, कठोर तपस्या करून देण्याचा प्रयत्न केला. त्यांनी दिलेली उत्तरे त्या काळची परिस्थिती पाहता खरोखर अद्‌भूत वाटतात. आज याच प्रश्नांची उत्तरे लक्षावधी शास्त्रज्ञ अंतराळात दूरवर दृष्टी लावून आणि पदार्थमात्रांच्या खोल खोल आत शिरून देण्याचा प्रयत्न करीत आहेत. विश्वाचे रहस्य सोडवण्याकरिता आणि समजण्याकरिता आपण कुणाचे बोट धरून चालणार? ऋषिमुनी आमचे पूर्वज होते म्हणून त्यांनी सांगितले ते मानणार काय? त्यांना मानले तर आपण खरा 'स्वधर्म' बुडवला असे होईल आणि भूतकाळातल्या एका जुन्यापुराण्या धर्माचे पालन केले असे होईल. धर्माने विश्वाची उत्पत्ती सांगण्याचा प्रयत्न केला आणि त्याआधारे समाजातील मनुष्यमात्रांना त्यांच्या दैनंदिन वागण्यासंबंधी काही नियम घालून दिले. हे नियम त्या त्या काळात, त्या त्या समाजपरिस्थितीत योग्य असतीलही, पण म्हणून आजही ते योग्य आहेत असे पक्के धरून चालणे मोठे धोक्याचे आहे.

उदाहरणार्थ, एका काळी कदाचित काही समर्थन असलेली वर्ण आणि जाती व्यवस्था आजही आग्रहाने मानायची म्हटली तर अशा धर्मपालनाने तारण होणार नाही, मरण येईल.

'स्वधर्म' या शब्दातील 'स्व' हे अक्षर महत्त्वाचे आहे. ज्याचा अभिमान धरावा आणि ज्यासाठी प्रसंगी प्राण ठेवण्यास तयार व्हावे असा तो स्वधर्म कोणता हे समजणे अति परिश्रमाचे काम आहे. ऐऱ्यागैऱ्याला एवढे काबाडकष्ट व्हायचे नाहीत. त्यांच्या सोयीकरिता काही धर्मांच्या घाऊक वखारी टाकल्या आहेत. त्यातील कोणतीही एक वखार ते स्वीकारू शकतात. प्रत्यक्षात, वाडवडिलांच्या परंपरेने ज्या वखारीचे गिऱ्हाईकपण चालून आले तेथलीच गिऱ्हायकी कायम ठेवली जाते.

मी ज्या वर्षी आंबेठाणला आलो त्या वर्षी गावात एका लग्नाच्या जेवणानंतर शेकडो लोकांना विषबाधा झाली. शिजवलेल्या भातात काही दोष होते एवढे सिद्ध झाले, पण तांदुळात तर काही दोष दिसेना. प्रयोगशाळेत शेवटी ठरले की तांदूळ शिजविल्यानंतर भात गरम आणि ताजा वाढला असता तर काही दोष झाला नसता. दोष झाला तो भात शिजवून साठवल्यामुळे. जेवणावळ मोठी असल्यामुळे कढया कढया भात शिजवून शिजलेल्या भाताचा ढीग घालत होते. या ढिगातच भातावर काही बुरशीसारखी वाढ झाली. नेहमीच्या चांगल्या तांदळात असा दोष येत नाही. जेवणावळीकरिता स्वस्तात आणलेल्या तांदळात हा दोष होता.

धर्म हा सुद्धा ताजा आणि उनउनीत खाण्याचा पदार्थ आहे. साठवणीतला जुना धर्म हा विषारीच होय.

माझा धर्म कोणता याच्या मी सतत शोधात आहे. हा शोध प्राण असेपर्यंत चालणार आहे. २० वर्षांपूर्वी मला जो माझा धर्म वाटत होता तो आज मला वाटत नाही. कदाचित १० वर्षांनंतर, आज मला जो माझा धर्म वाटतो त्याबद्दल ममत्व राहणार नाही. प्रत्येक क्षणाचा धर्म हा अपूर्णच असतो; पण त्यावेळी त्या व्यक्तीचा जो स्वधर्म असतो त्या वेळी, त्या स्थळी त्या धर्माच्या रक्षणाकरिता सर्वस्व फेकून देण्याची तयारी असावी लागते. धर्माचे रक्षण हे असेच सतीचे वाण आहे. कोण्या एका वखारीच्या गर्वाचा झेंडा घेऊन दुसऱ्या वखारीचा तिरस्कार करणे इतके काही धर्मरक्षण सोपे नाही.

पण माझ्या स्वतःच्या धर्मसाधनेपलीकडे मला सार्वजनिक धर्मवखारींपैकी हिंदू वखारीबद्दल काहीशी आपुलकी आहे. या आपुलकीचे कारण माझा जन्म हिंदू आईबापांच्या पोटी झाला हे नाही. जन्माच्या अपघाताने मिळालेले धर्माचे, जातीचे, भाषेच्या अहंकाराचे संस्कार प्रयत्नपूर्वक काढून टाकण्याची मी पराकाष्ठा केली आहे.

हिंदू वखारीविषयीच्या आपुलकीचे कारण ही वखार काही चांगली आहे हेही नाही. या वखारीने भावाभावात विषमता सांगितली, बहुजन समाजाला शिक्षणापासून वंचित ठेवले, धर्मग्रंथ वाचू दिले नाहीत, देवळात जाऊ दिले नाही, गावाच्या वेशीत राहू दिले नाही, माणसाचा स्पर्श माणसाला बाटणारा ठरवला, स्त्रियांना हजारो वर्षे दुःखात पिचत ठेवले. या धर्माने कोणाची धारणा केली असेल तर ती ब्राह्मणांची किंवा इतर पुढारलेल्या जातींची. बहुसंख्य समाजाकरिता या वखारीची व्यवस्था म्हणजे रौरव नरक. इतर वखारींतही असाच कारभार नाही असे नाही. थोडक्यात, मी गुणवत्तेच्या आधाराने हिंदू वखारीबद्दल आपुलकी बाळगत नाही.

हिंदू वखारीबद्दल आपुलकी वाटते ती त्या व्यवस्थेतील व्यापकतेबद्दल आणि सोशिकतेबद्दल. प्रत्येकाचा स्वतःचा असा स्वधर्म असतो. वेगवेगळ्या समाजाबद्दल असेच म्हणता येईल. त्यांचा त्यांचा धर्म त्यांच्या त्यांच्या प्रकृतीस आणि परिस्थितीस जुळणारा असतो. कधीकाळी कोणाला चंडिकेसमोर नवयुवतींचा बळी देणारा अघोरघंटक कपाल कुंडलांचा मार्ग परमधर्म वाटला, तर कोणाला श्वासोच्छ्वासातही अजाणतेपणीसुद्धा एखाद्या जीवाणूचीही हत्या होऊ नये इतकी परम करुणेचीही अहिंसा धर्म वाटली. हिंदू म्हणवणाऱ्या वखारीत दुसऱ्याच्या

विचाराबद्दल एक समजूतदारपणा आहे. या वखारीचा कुणी एक प्रमाणग्रंथ नाही, कुणी एक प्रेषित नाही. हा एक प्रवाह आहे – सतत बदलणारा आणि सर्व सामावून घेणारा.

इतर वखारींचे तसे नाही. तिथले नियम फार कडक. हा एक ग्रंथ, त्यात हजार दोन हजार वर्षांपूर्वी जे लिहिले असेल तेच काय ते सत्य; अमक्या महात्म्याने, प्रेषिताने जे काय सांगितले असेल तेच सत्य. या धर्मांनी अशी असहिष्णुता शिकविली आहे असे नाही; पण व्यवहारात परिस्थितीनुरूप अशी असहिष्णुता इतर वखारींत बोकाळली आहे.

बौद्ध म्हणा, मुसलमान म्हणा हिंदूना डिवचण्याचा, खिजवण्याचा प्रयत्न करतात हे कदाचित संकुचित आणि मर्यादित धर्म–संकल्पनेशी सुसंगतही असेल; पण स्वत:ला हिंदू म्हणविणारा समाजही इतरांना चिडविण्याचे, डिवचण्याचे काम सतत करतच असतो. किंबहुना, अशा डिवचण्यासाठी त्याला काही करावेच लागत नाही.

बौद्ध म्हणा, मुसलमान म्हणा एक दलित तर दुसरा दलितातील दलित. आर्थिक, सामाजिक, राजकीय – सर्वच क्षेत्रांत मागे पडलेले. आसपासच्या बहुसंख्य समाजाविषयी त्यांच्या मनात रोष आहेच. तो रोष दाखवण्याला त्यांच्याकडे साधने काय? शाळेतल्या पोरांना एखाद्या बलदंडाचा जाच होतो, त्याला उपाय काहीच करता येत नाही. मग ती पोरं चिडवाचिडवीचा प्रकार सुरू करतात. जातिव्यवस्थेवर आधारलेली आपली समाजरचना हा एक सततचा जाच आहे. बौद्धांनाही आहे, मुसलमानांनाही आहे आणि हिंदू समाजातील बहुसंख्य लोकांनाही आहे. ज्याला बलुतेदारी आणि हुन्नर बुडून गेली आहे, ज्याची नोकरी मिळण्याची काही आशा नाही अशा कुणालाही ही समाजव्यवस्था जाचाचीच वाटणार.

मग, या जाचाबद्दल त्यांनी ओरडायचे कसे? हे दु:ख व्यक्त करण्याकरिता बौद्ध आणि मुसलमान झेंड्याचा उपयोग मोठा सोयीस्कर असतो.

पण, म्हणून हिंदू वखारीने आपला बहुमूल्य पंचप्राण सहिष्णुताच सोडून दिली तर त्या वखारीत वाखाणण्यासारखे काहीच राहणार नाही. हिंदुत्वाचा झेंडा विवेकानंदांनी फडकवला, सावरकरांनीही पुढे नेला. हिंदू धर्मातल्या चांगल्या गोष्टींना उजाळा देत आणि वाईट गोष्टी दूर करीत त्यांनी हे काम केले. हिंदुत्वाचे आधुनिक पुरस्कर्ते हिंदू समाजातही इतर समाजातील असहिष्णुता आणि संकुचितपणा वाणवण्यात धन्यता मानत आहेत. मला चिंता आहे ती ही की,

हिंदू सहिष्णुता संपली तर पुन्हा सहिष्णुता उत्पन्न करायची कोठून? समुद्राने खरटपणा सोडला तर मीठ आणायचे कोठून?

हिंदू वखारीची श्रेष्ठता ही काही उखाळ्यापाखाळ्यांत वरचढ ठरून होणार नाही; दंगे, मारामाऱ्या करूनही हे साध्य होणार नाही. सगळ्या मशिदी पाडल्या आणि त्या जागी देवळे बांधली तरी हे सिद्ध होणार नाही. हिंदू समाजाने आपले श्रेष्ठत्व सिद्ध करण्यासाठी स्वतःच्याच रणभूमीवर राहिले पाहिजे; इतर संकुचित चिखलदऱ्यांत उतरता कामा नये. ज्या दिवशी सहिष्णुतेचे उपासक असहिष्णु बनतील आणि विटेला वीट, दगडाला दगड असे उत्तर देऊ लागतील त्या दिवशी सहिष्णुतेचा पराभव स्वयंसिद्धच असेल. हिंदुत्ववादी जिंकतील; पण हिंदुत्वाचा पराभव झाला असेल. हिंदू शब्दाबद्दल ज्यांना ज्यांना अभिमान असेल, त्या धर्माचे रक्षण करावे अशी तळमळ असेल त्यांनी काम केले पाहिजे; गुंड पुंड मौलागिरी नाही. आपली समाजव्यवस्था ही श्रेष्ठ आहे, कार्यक्षम आहे असे दाखवून दिले पाहिजे. या व्यवस्थेत कुणी एक दुसऱ्याच्या कष्टावर जगत नाही, येथे अबलांवर अत्याचार होत नाही, माणसाला माणूस म्हणून जगण्याची संधी आहे अशी व्यवस्था झाली तर तिचा पराभव कोण करू शकेल?

आपल्या मनातील खरी कळकळ काय आहे? हिंदुत्वाच्या नालायक वारसदारांना मोठे सिद्ध करणे ही आहे की हिंदुत्वाचा आत्मा जोपासणे ही आहे? या प्रश्नाचे जे उत्तर त्याप्रमाणे तुमचा मार्ग ठरेल.

तुमच्या प्रश्नाला उत्तर कदाचित मिळालेले नाही असे तुम्हाला वाटले तर पुन्हा एकदा हे वाचून पाहा. हिंदुत्वाच्या आत्म्याच्या तुम्ही जवळ असाल, कुडीच्या नाही, तर तुम्हाला शेतकरी संघटनेची भूमिका पटल्याशिवाय राहाणार नाही.

*(६ जून १९९१)*

◆◆

# खोटा निधर्मवाद आणि दुष्ट राष्ट्रवाद

भारतीय जनता पार्टी आणि लालकृष्ण अडवाणी मोठ्या विचित्र पेचात सापडले आहेत. १९८४ मध्ये त्यांच्या पक्षाची धूळधाण उडाली. पुऱ्या लोकसभेत फक्त दोन खासदार निवडून आले. पक्षाला देशाच्या राजकारणात पुन्हा स्थान मिळावे यासाठी 'घटम् भिद्यात्, पटम् छिन्द्यात्' एवढेच नव्हे तर अगदी 'रासभरोहण' करून का होईना, येन केन प्रकारेण पुन्हा एकदा सत्ता मिळविणे हे त्यांचे उद्दिष्ट राहिले. त्यासाठी आत्यंतिक जातीयवादी संस्थांनी हाती घेतलेले रामाच्या अयोध्या मंदिराचे प्रकरण त्यांनी उचलून धरले. शिलापूजनाच्या कार्यक्रमाने इ.स. १९८९ च्या निवडणुकीत फायदा झाला तर रथयात्रेने इ.स. १९९१ च्या निवडणुकीत भरभराट झाली. लोकसभेत १२३ खासदार निवडून आले भारतातील सर्वांत प्रचंड राज्य उत्तर प्रदेश हाती आले; पण एवढे होऊनही भारतीय जनता पार्टीच्या गोटात वातावरण फारसे आनंदाचे नाही.

सोळा महिन्यांपूर्वीच ज्या राज्यांत भारतीय जनता पार्टीचे शासन आले त्या राज्यांतच त्यांची पीछेहाट झाली. उत्तर प्रदेशातील सत्ता पुढच्या निवडणुकीत हातात राहीलच याची काहीच खातरी नाही. ज्या राममंदिराच्या नावाने गदारोळ माजवला ते राममंदिर बाबरी मशिदीच्या जागीच बांधणे हे काही केंद्र शासन हाती आल्याशिवाय शक्य नाही. अयोध्येतील कायदा आणि सुव्यवस्थेची जबाबदारी भाजपावर; पण बाबरी मशिदीला धक्का लावल्यास राज्यात राष्ट्रपती राजवट लागू होण्याची निश्चिती आणि स्वत:च उभी केलेली आणि उत्तेजन दिलेली विश्व हिंदू परिषद, बजरंग दल, शिवसेना अशी भुतावळ थयथयाट करीत असलेली! प्रसिद्ध पुरुष होण्यासाठी गाढवावर बसणे सोपे आहे; पण एखाद्या हिंस्त्र श्वापदावर आरूढ झाले तर मांड ठेवावी तरी पंचाईत आणि उतरू पहावे तरी जीवाशी गाठ अशा परिस्थितीत भाजपाची मंडळी सापडली आहेत. निवडणुकीतील यशानंतर

इ.स. १९८४ च्या पराभवाचे दुःख शमले तरी या यशाकरिता आपण काय करून बसलो आहोत याची थोडीफार जाणीव भाजपाच्या नेत्यांना होऊ लागली आहे. यांपैकी अनेक शिवसेनेच्या बाळ ठाकरे यांचे वर्णन, खाजगीत, ''हलक्या कानाचा, छोट्या मनाचा, फाटक्या तोंडाचा-इ.इ.'' असे करतात; पण या दुष्कर परिस्थितीत जोडलेल्या दोस्तांचा बंदोबस्त कसा करावा याची त्यांना चिंता लागली आहे. राममंदिराबद्दल दिलेल्या बेफाट आश्वासनातून थोडीफार सुटका कशी करून घ्यायची ही त्यांची आज मोठी चिंता आहे.

पण त्यांनी पाय हळूहळू मागे घ्यायला सुरुवात केली आहे. असे करण्यापलीकडे त्यांना काही गत्यंतरही नाही. दूरदर्शनवर दिलेल्या मुलाखतीत अडवाणी म्हणाले,

''राममंदिर ही काही महत्त्वाची गोष्ट नाही; पण राममंदिराच्या निमित्ताने खोटा निधर्मवाद उजेडात आणण्याचे काम आम्ही साध्य केले आहे.''

भारतीय घटनेत महत्त्वाचे स्थान असलेला निधर्मवाद हा दिखावू आहे? खोटा आहे? फाळणीनंतर पाकिस्तान मुसलमान राष्ट्र झाले पण, भारताने मात्र निधर्मवाद स्वीकारला याचे कारण भारत बहुसंख्य हिंदू आणि म्हणून सहिष्णू आहे हेच होय. हिंदूवाद हाच खऱ्या अर्थाने निधर्मवाद आहे आणि हा हिंदूवाद देशाच्या परंपरेशी, इतिहासाशी व संस्कृतीशी सुसंगत आहे. याउलट, घटनेतील निधर्मवाद हा पाश्चिमात्य तोंडवळ्याचा आहे. राजकीय क्षेत्रात धर्माला स्थान नाकारण्याची एक युरोपीय परंपरा आहे. राजसत्ता व धर्मसत्ता यांच्यात शतकानुशतके चाललेल्या भीषण संघर्षाचा, युरोपीय निधर्मवाद हा परिणाम आहे. या पाश्चिमात्य निधर्मवादाऐवजी हिंदुराष्ट्रवाद स्वीकारला जावा कारण तो एतद्देशीय आहे, लोकांच्या प्रवृत्तीस जुळणारा आहे आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे भारताच्या ऐतिहासिक सांस्कृतिक परंपरेस जुळणारा आहे.

हिंदुराष्ट्रवादाची गंभीर मांडणी अशाप्रकारे केली जाते. आपल्याला हीच मांडणी विचारात घ्यायची आहे. निरर्गल आणि अश्लील भाषा वापरणाऱ्या अनभ्यस्त हृदयसम्राटांची नाही.

पहिला महत्त्वाचा मुद्दा, भारतीय घटनेतील निधर्मवाद पाश्चिमात्य तोंडवळ्याचा आहे काय? याचे स्पष्ट उत्तर नाही असे आहे. निधर्मवादाच्या शब्दकोशीय अर्थातही धार्मिक सत्याविषयी केवळ उदासीनताच नव्हे तर काहीशी कुत्सितताही गृहित धरली आहे. भारतीय राजकारणात मध्य प्रवाहातील नेतेमंडळीत तरी धर्माविषयी जाहीररित्या अनादर दाखविणारासुद्धा महापुरुष कुणी झाला नाही. अगदी विज्ञान आणि तंत्रज्ञानाचा उद्घोष करणारे आणि एकविसाव्या शतकाची

तुतारी वाजविणारे नेतेसुद्धा मोठे तोलून मापून शब्द वापरतात. विज्ञानाबरोबर आध्यात्मिक अंगाकडे पुरेपूर लक्ष देणे आवश्यक आहे अशी निदान तोंडदेखली, सारवासारव करतात. शासकीय आकाशवाणी आणि दूरदर्शन यांवर सर्व धर्मांच्या संबंधीचे भजनकीर्तनांचे कार्यक्रम होतात. खुद्द पंतप्रधानही वेगवेगळ्या प्रार्थनामंदिरांत आणि वैष्णोदेवी, तिरुपती अशा मंदिरांत विशेष भक्तिभावाने जातात. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री भवानी मातेची आणि पंढरपूरच्या विठ्ठलाची शासकीय महापूजा मोठ्या थाटामाटाने पार पाडतात. बहुतेक उद्घाटन इत्यादी प्रसंगी काही ना काही धार्मिक विधी होतातच आणि आजपर्यंत चार आजी आणि दोन माजी पंतप्रधानांचे हिंदू अंत्यविधी अगदी विस्तारा-विस्ताराने रेडिओ आणि दूरदर्शनवर दाखविण्यात आले आहेत. भारतीय राज्यव्यवस्था धर्मांविषयी उदासीन नाही. ती गांधीवादी तोंडवळ्याची आहे. सर्व धर्मांना समान मानण्याची आहे. किंबहुना, भारतीय घटनेतील निधर्मवाद खऱ्या अर्थाने सर्व धर्म समभावच आहे. घटनेतील निधर्मवाद खरा नाही; पण अडवाणी म्हणतात त्या अर्थाने नव्हे तर त्याच्या नेमक्या उलट्या अर्थाने.

या सर्वधर्मसमभावात अल्पसंख्याकांच्या अनुनयाची एक प्रवृत्ती आहे काय? शहाबानो प्रकरणी सर्वोच्च न्यायालयाने दिलेला निर्णय राजीव गांधी शासनाने फिरवला हे मुस्लिम अनुनयाचे एक मोठे उदाहरण म्हणून सांगितले जाते. ख्रिस्ती किंवा पारशी यांचा अनुनय होत असल्याची तक्रार कुणी करीत नाही. पंजाबातील बहुसंख्य शेतकरी असलेल्या शिखांची, त्यांचे शोषण होत असल्याची उलट तक्रार आहे.

शहाबानो प्रकरणी राजीव गांधींची भूमिका फारशी समर्थनीय होती असे मला वाटत नाही; पण ती भूमिका समजून घेणे आवश्यक आहे. मध्यपूर्वेतील संघर्षमय सामाजिक वातावरणात लिहिले गेलेले इस्लामचे सामाजिक नियम स्त्रियांना काही बाबतीत मोठे जाचक आहेत. बदललेल्या परिस्थितीत यातील अनेक नियम अगदी दुष्ट आणि विक्राळ वाटतात; पण सामाजिक परिवर्तन काही केवळ कायद्याने होत नाही. उलट, समाजाच्या विरोधात केलेले कायदे निष्फळ ठरतात; एवढेच नव्हे तर त्याचे दुष्परिणामही होतात. शहाबानो प्रकरणी सर्वोच्च न्यायालयाने पोटगीसंबंधी भारतीय दंडविधानाचा स्पष्ट अर्थ लावला या निर्णयाबद्दल मुस्लिम सनातनी पुरुषांनी आरडाओरड सुरू केली यात काही आश्चर्य नाही. आश्चर्याची गोष्ट ही की मुसलमान स्त्रियाही अन्यायकारक कुराणप्रणीत नियमच आम्हाला हवेत, असे बोलू लागल्या. असे अनेकदा होते. राजस्थानातील देवराला

येथील सतीप्रकरणानंतर अगदी आंग्लविद्याविभूषित राजस्थानी हिंदू स्त्रियाही सती परंपरेची महती गाऊ लागल्या होत्या. मुसलमान स्त्रियांची परिस्थिती तर त्याहून बिकट. स्त्रियांची दु:खे दारूण खरी, पण समाजावर हल्ला होत असेल तर त्या दु:खाबद्दल धिटाईने बोलणेही शक्य नाही.

मुस्लिम पुरुषांची हृदये काय सगळी दगड आहेत काय? मुस्लिम स्त्रियांची 'पण लक्षात कोण घेतो?' स्थिती त्यांनाही समजते; पण, त्याबद्दल काही करता येत नाही. आजच्या मुसलमान समाजातील धुरिणांचीही स्थिती ८० वर्षांपूर्वीच्या लोकमान्य टिळकांच्या परिस्थितीसारखीच आहे. अल्पवयीन मुलींची लग्ने समजाच्या अंत:करणाला स्पर्श करीत होती. देवलांच्या शारदेच्या 'मूर्तिमंत भीती उभी' या पदाने डोळ्यातून पाणी आले नाही असा माणूस त्या काळी विरळा; पण संमतीवयाचा कायदा करण्याचा प्रस्ताव आल्यावर लोकमान्य टिळकांनीही त्याला कडाडून विरोध केला. आमच्या समाजातील दोष आम्ही दूर करू, परकीय शासनाने त्यात ढवळाढवळ करण्याचे काही कारण नाही; म्हातारी मेल्याचे दु:ख नाही, काळ सोकावतो अशी लोकमान्य टिळकांची भूमिका होती. आजच्या मुसलमान मुल्लांची हीच भूमिका आहे.

देशातील सर्व समाजांना एकच कायदा, एकाच तऱ्हेचे नीतिनियम लागू असावेत याबद्दल दुमत नाही; पण समान कायदे सक्तीने लादून काही उपयोग नाही; समजुतीसमजुतीने, धीमेपणाने, पावलापावलाने बदल घडवून आणायचा अशी भारतीय घटनेची भूमिका आहे. समान कायद्याला मुसलमानच विरोध करतात असे नाही, हिंदू समाजही करील. आज बहुसंख्य हिंदुत्वनिष्ठांची अशी कल्पना आहे की समान नागरी कायद्यातील तरतुदी या जवळजवळ हिंदू पद्धतीतील तरतुदीच असणार आहेत. किंबहुना, समान नागरी कायदा म्हणजे इतर समाजांवर हिंदू कायदा लादणे अशी त्यांची गैरसमजूत आहे. सत्य परिस्थिती अशी आहे की न्याय्य आणि आदर्श समान नागरी कायद्यातील स्त्रियांविषयीच्या तरतुदींचा तोंडवळा हा मनुस्मृतीपेक्षा शरीयतीशी अधिक मिळताजुळता असण्याची शक्यता आहे. उदाहरणार्थ, विवाह हा संस्कार आहे की कल्पना हे कोणताही नागरी कायदा मानू शकणार नाही; विवाह झाला म्हणजे मुलगी मेली हे 'एकच प्याला' तत्त्वज्ञान नागरी कायदा मानू शकणार नाही. आईबापांची मुलीबद्दलची जबाबदारी अखेरपर्यंत कायम राहते असे कायद्याने सांगितले तर हिंदू समाजही काही कुरबूर केल्याखेरीज ते मान्य करील अशी शक्यता दिसत नाही.

पण, गंमतीची गोष्ट अशी की स्त्रियांच्या दु:खाचा प्रश्न बाजूलाच राहिला;

वाद सुरू झाला वेगवेगळया धर्मांतील पुरुषांचा! हिंदू धर्ममार्तंड समग्र स्त्रीसमाजाचे कैवारी असल्याचा आव आणून बोलू लागले. संख्याशास्त्रीय सत्य हे आहे, की हिंदू समाजातच व्यापक प्रमाणावर नव्याने लग्न लागून सासरी आलेल्या मुली जाळल्या जातात. सत्य हे आहे की, दर हजारी लोकसंख्येत स्त्रियांचे प्रमाण हिंदू समाजात जितके कमी आहे तितके दुसऱ्या कोणत्याही समाजात नाही. सर्वांत स्त्रीदुष्ट समाज कोणता असेल तर तो हिंदू समाजच आहे.

मग, अल्पसंख्यचा अनुनय होतो की नाही? होतो. अपरिहार्यपणे होतो. लोकशाहीच्या आणि निवडणुकीच्या गणिताच्या सोयीसाठी अपरिहार्यपणे होतो; पण असा अनुनय मुसलमानांचाच होतो असे नाही. देशमुखांचा होतो, मराठ्यांचा होतो, माळयांचा होतो, कोष्टी, साळी बुद्ध – प्रत्येक समाजाचा असा अनुनय होतो. लोकशाहीच्या व्यवस्थेतील ही एक मर्कटप्रवृत्ती आहे, तिच्याकडे थोडे उदारतेने पाहावे, कुचेष्टेने पहावे आणि मामला सोडून द्यावा. हे बुद्धिमंतांना शोभेल.

घटनेतील निधर्मवाद ही काही एक निश्चित बांधीव विचारसरणी नाही. तो एक प्रवास आहे. उद्दिष्ट थोडेफार स्पष्ट आहे; पण वाट मात्र वेडीवाकडी, चढउतारांची आणि सर्व तऱ्हेच्या अडचणींनी भरलेली आहे.

भारतीय राज्यघटनेतील निधर्मवादाच्या या सर्व त्रुटी सर्वमान्य आहेत; पण या त्रुटींबद्दल सहानुभूतीची आवश्यकता आहे; कुचेष्टेची नाही. कारण या मोडक्यातोडक्या का होईना निधर्मवादाला काही पर्याय संभवत नाही. अडवाणी आणि इतर हिंदुत्ववाद्यांना हिंदुत्व हा पर्यायी मार्ग दिसतो. या राष्ट्राचे स्वरूप हिंदू आहे, राष्ट्राची परंपरा आणि इतिहास हिंदुत्वाचा आहे आणि त्यामुळे हिंदू झेंड्याखाली एक सामर्थ्यशाली आणि स्वाभिमानी राष्ट्र उभे राहील अशी त्यांची कल्पना आहे.

हिंदू धर्म हा खरोखर एकसंध धर्म असता आणि इतर धार्मिकांशी सहिष्णुतेने वागणारा समाज असता तर हिंदुत्ववाद्यांची ही कल्पना सहज मान्य होऊ शकली असती; पण ही कल्पना मान्य होऊ शकली नाही याचे महत्त्वाचे कारण म्हणजे भगवा झेंडा हा 'एकमय लोकां'चे प्रतीक नाही. खरी अडचण ही आहे.

हिंदुत्वाचा इतिहास नेमका कोणता? हिंदुत्ववाद्यांच्या दृष्टीने सर्व भारतखंडामध्ये राजेरजवाडे गुण्यागोविंदाने नांदत होते, एकमेकांविषयी सहिष्णुता होती, दूधमधाच्या नद्या वाहत होत्या आणि एकदम वायव्येकडून मुसलमानांचे हल्ले चालू झाले. कत्तली, जाळपोळ, लुटालूट, बलात्कार यांचे जंगली युग चालू झाले ते इंग्रज प्रवेश करीपर्यंत! इंग्रज गेल्यानंतर आता पुन्हा इतिहासात मागे जाऊन प्राचीन

परंपरा पुनर्स्थापित करणे आवश्यक आहे.

सर्व विनम्रता बाळगून असे आग्रहाने म्हटले पाहिजे की भारतीय इतिहासाचा हा ब्राह्मणी किंवा सवर्ण अर्थ आहे. मुसलमानी आक्रमणाच्या आधीही अनेक आक्रमणांच्या लाटा वेगवेगळया दिशांनी आल्या आहेत. अगदी रामायणकाळापासूनसुद्धा वेगवेगळे राजे परस्परांत सतत लढाया करीत असत, लूट करीत असत. एवढेच नव्हे तर बलात्कारही करीत असत. बौद्ध-ब्राह्मण संघर्षात व हिंदू राजा-राजांतील लढायांतही हे सर्व प्रकार घडले. अगदी मंदिरांचासुद्धा विद्ध्वंस झाला; पण या लढाया म्हणजे काही खराखुरा इतिहास नव्हे. खरा इतिहास या कागदोपत्री नोंदल्या गेलेल्या सनावळींच्या पलीकडे आहे. समाजातील सर्व उत्पादनाचे काम जातिव्यवस्थेच्या आधाराने बहुसंख्य समाजावर लादले गेले. राज्यव्यवस्था आणि राजा-राजांतील लढाया या कष्टकरी शेतकरी, बलुतेदार, व्यापारउदीम करणारे यांच्या श्रमाचे फळ हिरावून नेण्याच्या दृष्टीनेच होत असत. बहुसंख्य समाजाला शिक्षणाचा अधिकार नव्हता, मंदिरात जाण्यास बंदी होती, धर्मग्रंथ पाहण्याचीही मनाई होती; इतर समाजाशी रोटीचाही संबंध नाही मग बेटीचा दूरच. आयुष्यभर गुलामासारखे राबणे एवढेच त्यांचे भविष्य आणि ही फलनिष्पत्ती त्यांच्या पूर्वजन्मी केलेल्या पापांमुळे ही धर्माची शिकवण!

ज्याला आज हिंदू धर्म म्हटले जाते त्याला दक्षिणपूर्वेतील कंबोडिया, थायलंड यांसारख्या देशांत सरळसरळ ब्राह्मणधर्मच म्हटले जाते. तेथील इतिहासात वर्णने आहेत ती बौद्ध विरुद्ध ब्राह्मण लढायांची. तेथील देवळांमध्ये शंकराच्या मूर्तिऐवजी बुद्धाच्या मूर्ती आणि बुद्धाच्या मूर्तीऐवजी शंकराच्या मूर्ती असे आळीपाळीने कित्येकवेळा घडले आहे. आपल्याकडेही त्याचे नावच वर्णाश्रमधर्म असे आहे. पुनर्जन्म आणि कर्मसिद्धान्त यांच्या आधाराने तयार करण्यात आलेली ही समाजव्यवस्था होती.

मुसलमान येण्यापूर्वी सर्वजण गुण्यागोविंदाने, सुखासमाधानाने नांदत होते असे नाही. बहुजन समाज अन्याय आणि शोषणाखाली भरडून निघत होता. परिस्थिती इतकी दुःसह होती की, मुसलमान आक्रमकांनी येऊन स्थानिक राजांचा उच्छेद केला तरीही, बहुजन एतद्देशीय आणि तथाकथित स्वधर्मी राजांच्या मदतीस धावून गेले नाहीत. किंबहुना, त्यांनी, ज्योतिबा फुल्यांच्या शब्दांत, 'महंमदाच्या जवांमर्द शिष्यां'चे विमोचक म्हणून स्वागत केले. हे असे नसते तर अल्पसंख्य मुसलमान आक्रमकाना इतक्या सहजपणे आसेतुहिमाचल देश पादाक्रांत करताही आला नसता व त्यावरील सत्ता इतक्या दीर्घकाळ टिकवून

ठेवताही आली नसती.

अडवाणी आणि इतर हिंदुत्वनिष्ठांना मुस्लिम आक्रमणाचा प्रतिशोध घ्यायचा आहे. त्यासाठी ते आज सर्व जातीजमातींच्या हिंदूना भगव्या झेंड्याखाली आणू पाहत आहेत. अडचण ही आहे की, बहुजन कष्टकऱ्यांच्या मनात इतिहासाचा आणखी एक प्रतिशोध घेण्याची एक सुप्त पण समर्थ इच्छा आहे. हिंदू हे राष्ट्र बनायचे असेल तर हिंदू व्यवस्थेतील शोषणाचे संबंध नष्ट करणे हे काम हिंदुत्ववाद्यांनी उत्साहाने हाती घेतले पाहिजे.

भारताच्या इतिहासाला, संस्कृतीला, परंपरेला खरा धोका आहे तो इतिहासात पाडल्या गेलेल्या मंदिरांमुळे नाही. पाश्चिमात्य विचारांचे, शिक्षणाचे शहरांतील भद्र लोक आज भारताची संस्कृती उद्ध्वस्त करून इंडियाची संस्कृती लादू पाहाताहेत. हा लढा मोठा कठीण आहे, प्रतिकात्मक नाही. कोण्या एका जागी मंदिर उभारण्याने हा प्रश्न सुटणार नाही.

अयोध्येचे राममंदिर हे एक प्रतिकात्मक आंदोलन आहे असे अडवाणी म्हणाले. हिंदुराष्ट्र एकसंध लोक म्हणून तयार करण्याच्या दृष्टीने राम हे चुकीचे प्रतीक आहे. शूद्र असूनही तपस्या करणाऱ्या शंबुकाचे शीर उडविणारा राम नव्या एकात्म राष्ट्राचे प्रतीक कसा काय होईल? अग्निदिव्यानंतरही गर्भारशी सीतेला वनवासात जावे लागले आणि बाळंतपणानंतर मूठभर गव्हासाठी अयोध्येच्या एकेकाळच्या महाराणीस भीक मागावी लागली. रामकथा ही जानकीची जीवनव्यथा आहे. त्या सीतेच्या मानसकन्यांच्या दृष्टीने राम हा एकात्म राष्ट्रांचे प्रतीक कसा काय होऊ शकेल? नवे एकात्मक राष्ट्र उभारण्याची ज्यांना खरोखर कळकळ असेल त्यांनी राममंदिराच्याही आधी शंबुकाचे मंदिर आणि सीतेचे मंदिर बांधायचा संकल्प सोडायला हवा होता.

सर्व इतिहासात आणि अगदी प्राचीन काळीही हा देश कधी एकछत्री, एकमय लोकांचे राष्ट्र होते असे दिसत नाही. आजपर्यंतचा सर्व इतिहास लढायांचा, रक्तपातांचा, लुटालुटींचा, बलात्कारांचा, दुष्काळांचा, उपासमारीचा, रोगराईचा, निरक्षरतेचा राहिला आहे. राष्ट्र बनवायचे असेल तर त्याकरिता भविष्याकडे पाहावे लागेल, भूतकाळाकडे पाहून काय उपयोग? भविष्यकाळाकडे वाटचाल करण्याचा घटनेतील निधर्मवाद हा पुष्कळ त्रुटी असलेला पण सर्वांत श्रेयस्कर मार्ग आहे. तो निधर्मवाद खोटा असेल पण त्याला पर्याय दुष्ट हिंदुराष्ट्रवाद खचित होऊ शकत नाही.

*(६ जुलै १९९१)*

◆◆

# ‘भारता’च्या मानगुटी नेहरूवादाचे भूत

२३ मे रोजी जवाहरलाल नेहरू यांची पुण्यतिथी देशभर साजरी झाली. नेहरू-गांधी घराण्यातील एकामागोमाग एक तीन पंतप्रधान झाले. त्या तिघांपैकी प्रत्येकाची जयंती आणि पुण्यतिथी असे दोन दिवस पाळले जातात. त्याखेरीज मोतीलाल नेहरू आणि संजय गांधी यांच्या नावेही आकाशवाणी, दूरदर्शन यांवर एक कोणतातरी दिवस पाळला जातोच. म्हणजे, नेहरू-गांधी घराण्यातील व्यक्तींकरिता एकूण आठ दिवस पाळले जातात.

तीन पंतप्रधानांच्या जन्मदिनी आणि मृत्युदिनी यमुनाकाठच्या त्यांच्या शांति आणि शक्तीस्थलांवर सगळ्या अतिविशिष्ट व्यक्तींची रीघ लागते; राष्ट्रपतींपासून सुरुवात करून ते शेवटी वसंतराव साठ्यांसारख्या माजी मंत्र्यांपर्यंत. पुष्पमाला अर्पण करण्याचा हा कार्यक्रम सर्व बातमीपत्रांत दिवसभर दाखविला, ऐकविला जातो. नंतर कुठेतरी अगदी सात्त्विक स्वरूपाचा भजन इत्यादींचा कार्यक्रम होतो. त्यालाही अतिविशिष्ट मंडळी मोठी आवर्जून उपस्थित राहातात. दिवसभर मोठ्या मोठ्या शहरांत पक्षांतर्फे सभा घेतल्या जातात. त्यांना थोडीफार निष्ठावान आणि पुष्कळशी आशाळभूत मंडळी हजर राहतात. आणि मग या नेत्यांच्या गुणवर्णनाला काही धरबंधच राहात नाही.

गेल्या २३ मे च्या कार्यक्रमात पंडित नेहरूंच्या स्मृतीवर अशाच स्तुतिसुमनांचा ढीग घालण्यात आला. भारताचा जवाहर, लोकांचे लाडके, स्वातंत्र्यलढ्यातील झुंजार नेते, देशाकरिता अमिरी फेकून देऊन वनवास हसत हसत पत्करणारे असे गुणवर्णन सर्वसामान्यपणे सहजच होते; पण त्यापलीकडे, समाजवादी औद्योगीकरणाचे द्रष्टे, भारतीय निधार्मिकतेचे आधारस्तंभ, भारतीय लोकशाही परंपरांचे जनक आणि आंतरराष्ट्रीय क्षेत्रातील तटस्थ राष्ट्रांच्या चळवळीचे अध्वर्यू अशीही त्यांची भलावण मागील वर्षीपेक्षाही अधिक धूमधामीने करण्यात आली.

जवाहरलाल नेहरूंशी प्रत्यक्ष परिचय असलेली काही मंडळी मग

'पंडितजींचे कैंचें बोलणें,
पंडितजींचें कैंचें चालणें,
पंडितजींची सलगी देणें,
कैंचें असें'

या सुरावर त्यांच्या शुभ्र वेषापासून मोहक हास्यापर्यंत आणि छातीवरील लाल गुलाबापासून गालावरील रक्तिम्यापर्यंत वर्णन करण्यात रंगून गेली होती.

जन्मतिथी, पुण्यतिथी असली म्हणजे त्या दिवसाच्या नायकाविषयी सत्य असो, कल्पित असो – चांगले बोलायचे असा शिष्टाचार आहे आणि तो सुसंस्कृतपणास धरूनही आहे. विशेषत:, मृताविषयी काही कोणाच्या मनाला लागेलसे बोलू नये, हे योग्यही आहे; पण तरीही, वास्तवाचे काही भान सुटले तर स्तुतिपर भाषणेसुद्धा हास्यास्पद वाटू लागतात. कोणी उठून म्हणू लागले की पंडित नेहरू बारा फूट उंच होते आणि त्यांनी एकट्यांनी उत्तरेतील सरहद्दीवर जाऊन चिनी सैन्याचा पराभव केला तर ते गुणवर्णन नाही, कुचेष्टाच होईल. शिष्टाचारालाही वास्तवाचे काहीसे कुंपण असलेच पाहिजे.

देशाच्या इतर थोर नेत्यांबाबत, स्वातंत्र्यसेनानींबाबत, अगदी महात्मा गांधींबद्दल बोलतानासुद्धा वास्तवाचे कांही किमान भान ठेवले जाते. मौलाना आझादांविषयी बोलतांना अखेरच्या वर्षांत त्यांच्या मनात जी कटुता निर्माण झाली होती तिचा तिरकस तरी उल्लेख होतोच. सरदार वल्लभभाईंच्या तथाकथित जातीय दृष्टिकोनाविषयी अगदी उघड उघड लिहिले, बोलले जाते. "देशाच्या शत्रूचा शत्रू तो आपला मित्र, गुलाम देशाला परराष्ट्रीय धोरण एवढेच असते." या भूमिकेतून स्वत:च्या आयुष्याची होळी करणाऱ्या सुभाषबाबूंवरसुद्धा त्यांना नेहरूंसारखी आंतरराष्ट्रीय दृष्टी नव्हती अशी टीकाटिप्पणी होतेच आणि महात्माजींवर तर त्यांच्या चरख्यापासून नौखालीतील ब्रह्मचर्याच्या प्रयोगांपर्यंत अनेक गोष्टींवरून हल्ले चढविले जातात.

आश्चर्याची गोष्ट अशी की आज सगळा नेहरूवाद कोसळून पडला आहे आणि तरीदेखील नेहरूंच्या शुभ्र अचकनीवर कुठे एक डाग पडलेला नाही.

नेहरू पद्धतीच्या नियोजनाने देशाचे दिवाळे निघाले आणि आजची आर्थिक दुरवस्था उभी ठाकली. नेहरूप्रणित इंग्रजी मुखवट्याची संसदीय लोकशाही कशीबशी लंगडत चालली आहे. देशातील वेगवेगळ्या धर्मां-जातींच्या अस्मितांना मान्यतेची तहान आहे तोपर्यंत युरोपियन तोंडवळ्याची निधर्मिकता निरर्थक आहे. अयोध्या, काश्मीर, पंजाब, आसाम, मंडल आयोग यांप्रश्नी उफाळलेले

उद्रेक हेच स्पष्ट करतात आणि समाजवादी रशियाचे सगळे साम्राज्यच कोसळून पडल्यामुळे समाजवाद या संकल्पनेलाच काही प्रतिष्ठा राहिली नाही; एवढेच नव्हे तर, आंतरराष्ट्रीय संघर्षातील एक पक्षच नाहीसा झाल्यामुळे तटस्थता या शब्दालाही काही अर्थ उरला नाही. नेहरूंनी ज्याला ज्याला हात लावला त्याची त्याची आज माती झालेली आहे. अशी वास्तव परिस्थिती एका बाजूला आणि दुसऱ्या बाजूला जयंती असो वा पुण्यतिथी असो, इतर काही प्रयोजन असो नसो, नेहरूंचे सर्व क्षेत्रातील कर्तबगारीबद्दल गुणगान असा मोठा विचित्र व्यतिरेक दिसून येतो.

इतिहासाने ज्यांना सर्वस्वी खोटे पाडले अशांच्या नशिबी नेहरूंचे हे भाग्य सहसा येत नाही. जुनी गाडलेली प्रेते उकरूनसुद्धा त्यांच्यावर रागरोष व्यक्त केला जातो. गेल्या दोन तीन वर्षांतच पूर्व युरोपातील अनेक देशांत हे घडले. स्टॅलिनचे पुतळे केव्हाच उखडले गेले. लेनिनचे पुतळे आता खाली येत आहेत. त्यांची नावे दिलेली गावे, संस्था इत्यादींची नावे बदलून पुन्हा नवीन नावे दिली जात आहेत; पण भारतात असे काही घडताना दिसत नाही. नेहरूंनी हात लावलेली प्रत्येक संकल्पना इतिहासाने भली खोटी पाडलेली असो, अजून कोठे नेहरूंचे पुतळे पाडल्याचे किंवा उतरविल्याचे ऐकिवात नाही. उलट, नव्या नव्या विमानतळांना, बंदरांना आणि प्रतिष्ठेच्या संस्थांना नेहरूंचे नाव नव्याने देण्याची पद्धत अजून चालूच आहे.

याचे एक कारण नेहरूंचे व्यक्तिगत भाग्य आणि त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील राजबिंडेपणा हे आहे. सुवेज कालव्यावरील आक्रमण फसले आणि इंग्लंडचे पंतप्रधान अँथनी ईडन यांना चोवीस तासांत पंतप्रधानाची खुर्ची खाली करून चालते व्हावे लागले. ईशान्य सरहद्दीवर भारतीय सैन्याला मोठी अपमानास्पद शरणागती स्वीकारावी लागली. चीनसंबंधीचे सर्व धोरण पंडित नेहरूंनी व्यक्तिशः आखलेले होते; पण संरक्षणमंत्री कृष्ण मेनन यांना जावे लागले. पंडित नेहरूंना त्याचा धक्का बसला नाही. एवढेच नव्हे तर उलट लोकांची उदंड सहानुभूती मिळाली. मोठे भाग्य असल्याखेरीज हे शक्य नाही!

नेहरूंचा राजबिंडेपणाही त्यांचे स्थान अबाधित राहण्याचे महत्त्वाचे कारण आहे. त्यांच्या हातून कितीही मोठ्या चुका घडल्या असोत, अनेक वेळा त्यांच्या मनाचा कोतेपणाही उघड झाला; पण त्यांच्या चेहऱ्यावर कधी विक्राळ भाव आला नाही एवढेच नव्हे तर चेहऱ्यावरचे हसूही कधी मावळले नाही. भारतीयांची ही एक विशेषता आहे; कोणा राजबिंड्याने हंसत हंसत कितीही मोठी गफलत केली तरी लोकक्षोभ होत नाही. रौद्र मुद्रा असल्याखेरीज ते कोणाला खलपुरुष

मानायला तयार होत नाहीत. भारतीय चौकटीत एखाद्या लोहियाला मान्यता मिळणे दुष्कर पण जवाहराची मान्यता अबाधितच राहते.

स्वातंत्र्याच्या आंदोलनात दरिद्री अडाणी, शोषित-पीडित कोट्यवधी जनतेला इंग्रजांविरुद्ध उभे करण्यासाठी गांधीजींनी सत्य, अहिंसा इत्यादी धर्माधिष्ठित नैतिकतेचा वापर केला. या नैतिकतेच्या आधाराने लोक इंग्रजांविरुद्ध लढायला तयार झाले यात काही तथ्य आहे; पण इंग्रजांची भीती चेपण्याकरिता इंग्रजाइतका गोरा, त्याच्यासारखेच इंग्रजी बोलणारा जवाहरलाल अगदी तुरुंगातसुद्धा चहाचा डबा फेकून देतो आणि जेलरच्या घरून चहाचा ट्रे मागवतो या प्रतिमेचेही महत्त्वाचे स्थान होते.

चंपारण्यातील न्यायालयात जबाब देताना गांधीजींनी एकदा म्हटले होते की, ''खेड्यापाड्यांतील गरीब जनतेवर गोरे इंग्रज आणि एतद्देशीय शहरवासी जे अन्याय करताहेत त्याचा त्यांना ईश्वराच्या दरबारात एकदा जाब द्यावा लागेल.'' महात्माजींनी हे म्हटले खरे पण स्वातंत्र्याचे आंदोलन चालवताना हे शहरवासी स्वातंत्र्याचा मंगल कलश पळवून नेणार नाहीत याची त्यांनी काही खबरदारी घेतली नाही. जवाहरलाल नेहरू हे स्वातंत्र्याच्या आंदोलनातील या एतद्देशीय 'इंग्रजां'चे प्रतिनिधी होते. त्यामुळे सुशिक्षित भद्र लोकांत त्यांची लोकप्रियता मोठी उदंड; इतकी की देशाच्या आर्थिक भवितव्यासंबंधी नेहरूंशी पराकोटीचे मतभेद असतानाही महात्माजींना त्यांनाच आपले राजकीय वारस म्हणून जाहीर करणे भाग पडले.

स्वातंत्र्य अगदी उंबरठ्यावर आले असताना महात्माजींनी स्पष्टपणे सांगीतले,

''जवाहरला आज पर्याय नाही, इंग्रजांकडून सत्तेचे हस्तांतरण होत असताना तरी नाही. तो हॅरोत शिकला आहे. केंब्रिजचा पदवीधर आहे बॅरिस्टर आहे. इंग्रजांशी वाटाघाटी करायला त्याची गरज आहे.''

अशा राजबिंड्याच्या स्मृतीचा अवमान करण्याचे कोणाला काय कारण आहे? त्याचे पुतळे पाडण्याची काय आवश्यकता आहे? त्याच्या नावाची स्मारके उधळण्याची काय गरज आहे?

स्टॅलिन, लेनिनचे पुतळे खाली आले कारण स्टॅलिनवाद, लेनिनवाद खोटा पडला एवढेच नव्हे तर, त्या वादांच्या खोटेपणामुळे कित्येकांची आयुष्ये उजाड झाली आणि सर्वसामान्य माणसांना पावाच्या तुकड्यासाठी रात्र-रात्र थंडीत कुडकुडत रांगेत उभे राहण्याची वेळ आली.

नेहरूप्रणित समाजवादी औद्योगीकरण फसले असेल पण त्याचे दुःख कोणाला?

कारखानदारांना दुःख होण्याचे कारण नाही. उलट, पुन्हा थोडे शब्दांचे जंजाळ उभे करून उद्योगधंद्यांच्या पदरात अधिक सवलती पाडून घ्यायला ते पुढे सरसावले आहेत, आणि त्यात त्यांना मोठे यश मिळत आहे. नेहरूंनी उभ्या केलेल्या सार्वजनिक उद्योगधंद्यांत लक्षावधी लोकांना नोकऱ्या मिळाल्या. त्यांचे उत्पादन काही नसले तरी त्यांना भरमसाठ पगार आणि भत्ते मिळताहेत. देशाचे काही झाले तरी नेहरूंमुळे त्यांना मिळालेली ही मिरासदारी अबाधित राहिली पाहिजे असा त्यांचा आग्रह आहे; आणि त्यापुढे सरकार मान तुकवीत आहे. 'इंडिया'तील मंडळींना नेहरू व्यवस्था म्हणजे मिळालेले घबाड आहे. देश जगो वा मरो, त्या घबाडाला कोठे धक्का लागणार नाही याची त्यांना खात्री आहे. त्या सगळ्या ऐतखाऊंचे दैवतच नेहरू आहे. नेहरूंचे पुतळे खाली ओढून विनाकारणच एक नवा वाद तयार करण्याची त्यांना काही आवश्यकता नाही.

नेहरूंनी आखलेले धोरण पार अपयशी झाले. आता नवीन खुले आर्थिक धोरण स्वीकारले पाहिजे असा सगळीकडे गवगवा चालू आहे. खुली व्यवस्था कोठे कोठे येत आहे. नेहरूप्रणित समाजवादी नियोजनात, लायसेन्स-परमिटांच्या तटबंदीत गलेलठ्ठ झालेल्या कारखानदारांना खुल्या बाजारपेठेच्या झेंड्याखाली आणखी नवी मलई चारण्याडा कार्यक्रम अमलात येतो आहे. नेहरू 'इंडिया'वाल्यांचे पुढारी. मृत्यूनंतर पाव शतक होऊन गेले तरी ते 'इंडियाचे' भले करतच आहेत.

त्यांची दुष्मनी काय ती 'भारता'शी. शेतकरी, शेतीचे अर्थशास्त्र आणि शेतकऱ्यांच्या संघटना याबद्दल त्यांच्या मनात 'समाजवादी' तिरस्कार होता. शेतकऱ्यांची आंदोलने महात्माजींनी केली, वल्लभभाईंनी केली. नेहरू त्यावेळी स्पेनमधील यादवी, मेक्सिकोतील क्रांती आणि फॅसिझम्चा उदय यांवरील आपली ब्रिटिश मते इंग्रजीत मांडीत होते. शेतकरी हे पोत्यात भरलेल्या बटाट्यांप्रमाणे आहेत हे मार्क्स्चे मत त्यांनाही मान्य होते. कै. शंकरराव मोहिते यांनी महाराष्ट्रात शेतकरी संघटना काढली, हिरव्या गणवेशात तीसचाळीस हजार शेतकरी सोलापूरच्या मेळाव्यात उभे केले तेव्हा ती संघटना ताबडतोब बंद करण्याची सूचना पंडितजींनी शंकररावांना दिली. सहकारी शेती करण्याचा त्यांचा डाव चौधरी चरणसिंगांनी हाणून पाडला. गरिबी दूर करण्याच्या नावाखाली शेतकऱ्यांच्या जमीनधारणेवर नेहरूंनी मर्यादा घातली. रफी अहमद किडवाईंनी सार्वजनिक वितरण व्यवस्था बंद करून टाकली होती ती नेहरूंनी पुन्हा चालू केली आणि शेतीमालाचे भाव पाडण्यासाठी कडेकोट व्यूहरचना केली. सक्तीची वसुली, जिल्हाबंदी, राज्यबंदी, साठेबंदी, निर्यातबंदी, प्रक्रियांवर बंदी, परदेशातून भरमसाठ आयात असल्या वेगवेगळ्या

मार्गांनी त्यांनी शेतकऱ्यांची पोरे देशोधडीला लावली.

आज नेहरूवादी नियोजनाचा सर्वतोपरी पराभव झाला आहे असे मनोमन सर्वांना पटले आहे, पण कोणी तसे मोठ्याने बोलत नाहीत; तसे खुलेआम बोलले तर मोठा गहजब होईल. नेहरू-अर्थकारणातील विकृती 'इंडिया'पुरती दूर करायची आहे, 'भारता'त नेहरूवादाचा नंगानाच चालू राहिलाच पाहिजे असा 'इंडिया'वाल्यांचा आणि सत्ताधाऱ्यांचा हितसंबंध गुंतलेला आहे.

खुल्या बाजारपेठेचा उदोउदो भले चालू असो, शेतीच्या क्षेत्रात मात्र अजून नेहरू व्यवस्थाच थैमान घालत आहे. देशात परकीय चलनाचा मोठा तुटवडा आहे, पण कापूस निर्यातीस बंदी आहे, कांदा निर्यातीवर बंधने आहेत. देश परकीयांच्या कर्जात बुडतो आहे तरी परदेशात साडेचारशे ते सहाशे रुपये प्रती क्विंटल भावाने गहू आणून तो देशातील बाजारात सव्वातीनशे रुपयांनी ओतण्याचे धोरण नव्या पंतप्रधानांनी जाहीर केले आहे. नेहरूवादाच्या या भुताने शेतकऱ्यांची आहे त्याहूनही धुळधाण होणार आहे; पण शेतकरी बिचारा सज्जन आहे. तो चिडत नाही. तो रागावत नाही. त्याला संताप येत नाही. पोरेबाळे उपाशी राहिली तरी तो शांत राहतो. बायकापोरे दुष्काळी कामावर खडी फोडायला जातात याचेही त्याला दुःख नाही. त्याला जोपर्यंत संताप येत नाही तोपर्यंत नेहरूंचे पुतळे पांढरी शुभ्र अचकन, राजबिंडे हास्य व छातीवरील गुलाब यांच्यासकट शेतकऱ्यांच्या छातीवर पाय देऊन उभे राहणारच आहेत.

*(२१ जून १९९२)*

◆◆

# ‘नीरो’चे वारस

“शेतकऱ्यांना शेतीमाल देशात किंवा देशाबाहेर विकण्याचे स्वातंत्र्य दिले तर त्यामुळे ग्रमीण भागातील लोकांवर, निसर्गावर आणि एकूणच अन्नसंस्कृतीवर विपरित परिणाम होईल.”

“शेतीच्या कामातून निघून दुसऱ्या व्यवसायात जाणाऱ्या शेतकऱ्यांवर बंधने असली पाहिजेत.”

ही मते आणि विधाने कोणाची असावीत? एकेकाळी राव वीरेंद्रसिंग किंवा प्रा. दांतवाला यांसारखी मंडळी शेतकऱ्यांविरुद्ध अशी गरळ खुलेआम ओकत असत. शेतकरी आंदोलन चालू झाल्यापासून असे लिहिण्या-बोलण्याची फारशी हिम्मत सहसा कोणी करीत नसे; पण, पुन्हा असा विचार मांडणारे एक नवा मुखवटा घेऊन पुढे येत आहेत.

**लुटीची तत्त्वज्ञाने**

शेतीमध्ये होणाऱ्या गुणाकाराची लूट करणाऱ्यांनी इतिहासामध्ये वेगवेगळ्या कालखंडांत वेगवेगळ्या सबबी आणि तत्त्वज्ञाने सांगितली आहेत. धर्मप्रसाराकरिता म्हणून शेतकऱ्यांची लूट झाली, धर्मसंरक्षणाकरिता शेतकऱ्यांची लूट झाली, राष्ट्रसंरक्षणाच्या नावाने शेतकऱ्यांची लूट झाली आणि दुसऱ्या देशावर आक्रमण करून स्वराष्ट्राची शान वाढविण्याच्या घोषणेखालीही शेतकऱ्यांची लूट झाली. पृथ्वीच्या पाठीवर सर्वत्र साम्राज्य पसरविणाऱ्यांनी वसाहती तयार केल्या; त्यासाठीसुद्धा त्यांनी धर्मप्रसार आणि संस्कृतीप्रसार (White Man's Burden) यांची सबब सांगितली.

स्वातंत्र्यानंतर, गोऱ्या इंग्रजांच्या आमदनीतील गांधीजींचा आर्थिक दृष्टिकोन नेहरूंनी पायदळी तुडविला आणि शेतकऱ्यांच्या लुटीवर आधारित अशी औद्योगीकरणाची योजना आखली. या औद्योगीकरणाच्या धोरणाचा पाठपुरावा

करण्यासाठी एक विचाराचा आणि तत्त्वज्ञानाचा डोलारा पंडित नेहरूंनी उभा केला. या डोलाऱ्याचे तीन खांब समाजवाद, नियोजन आणि शास्त्रविज्ञान.

**नेहरूवादाची त्रिसूत्री**

*** समाजवाद**

पंडित नेहरू काही मोठे निष्ठावंत समाजवादी होते असे नाही. किंबहुना, काँग्रेसमधील समाजवादी गटाचा त्यांनी नेहमी रागराग केला; पण, रशियातील क्रांतीनंतर तेथे समाजवादाचा जो प्रयोग झाला त्याची त्यांनी एकदा धावती पाहणी केली तेव्हा त्या प्रयोगाच्या भव्यतेने ते दिपून गेले आणि त्यातील काव्याने ते मोहरून गेले. समाजवादाची भाषा नेहरूंनी वापरली ती एक आर्थिक-सामाजिक दर्शन म्हणून नव्हे. कामगारवर्गाचे आणि नेहरूंचे फार काही कळकळीचे संबंध होते असेही नाही. नेहरू हे सर्वार्थाने गुलाबी राजबिंड्या शहरवासियांचे प्रतिनिधी होते. समाजवादाचा उद्‌घोष करायचा, कामगारांच्या क्रांतीची भाषा वापरायची, पण प्रत्यक्षात, पांढरपेशांच्या आणि नोकरशहांच्या हाती सत्ता काबीज करायची या प्रवृत्तीचे ते अग्रेसर नेते होते. नेहरूंचा समाजवाद म्हणजे काव्य आणि नोकरशाही यांचे अजब मिश्रण होते.

*** नियोजन**

नियोजनाची नेहरूप्रणित संकल्पना ही अशीच भद्र लोकांच्या सोयीसोयीची होती. नियोजन म्हणजे शेतकऱ्यांची लूट, कारखानदारीची बरकत. आणि हे सर्व चक्र चालविण्याची सर्वंकष सत्ता नोकरशहांच्या हाती अशा तऱ्हेने की लायसेन्स-परमिट. राज्यांत आपल्या मर्जीतल्या लाडक्या कारखानदारांच्या सोयीने सर्व चालावे. नेहरू-नियोजनाचा खरा अर्थ असा होता. निदान त्या नियोजनाचे पर्यवसान तरी भ्रष्टाचार, अकार्यक्षमता आणि देशाची दिवाळखोरी यातच झाले.

*** शास्त्रविज्ञान**

औद्योगीकरणावर भर देण्यासाठी नेहरूंनी शास्त्र आणि तंत्रज्ञानाचा खूप बोलबाला केला. आजही त्यांना इंडियातील आधुनिक युगाचे प्रणेते मानले जाते. शेती, विशेषत: पारंपरिक शेती म्हणजे सगळा जुनाट गबाळग्रंथी कारभार आहे, त्यातून बाहेर पडून शास्त्र आणि विज्ञान यांच्या आधाराने उद्योगधंदे तातडीने उभे राहिले पाहिजेत असे आपले मत पंडितजी आग्रहाने मांडत असत.

**चैत्रगौरी औद्योगीकरण**

औद्योगीकरण झपाट्याने करण्याचा आग्रह अनेकांनी पूर्वीही धरला होता. जर्मन राष्ट्र बळकट करून जगावर प्रभुसत्ता मिळविण्यासाठी हिटलरने

औद्योगीकरणाचा आग्रह धरला. समाजवादी उद्योगधंद्यांच्या विकासासाठी स्टॅलिनने शेतकऱ्यांवर रणगाडे घातले. पंडितजींनी राष्ट्र आणि समाजवाद यांच्या जोडीला शास्त्र-विज्ञानाची नवी सबब काढली. नेहरूप्रणीत समाजवाद आणि नियोजन यांचा खरा मतितार्थ जसा नेहरूंच्या रसिक काव्यात्मकतेत होता तसाच शास्त्र-विज्ञानाचा आग्रहही काव्यात्मकच होता.

तिसऱ्या जगाचे नेते म्हणून राष्ट्रभर फिरावे. इतर देशांतील नेत्यांनाही भारतात आणावे. त्यांच्या देशातील प्रेक्षणीय स्थळांना आपण इतमामाने भेटी द्याव्या आणि परदेशी पाहुणे हिंदुस्थानात आले म्हणजे त्यांना दिपवण्यासारखी काही आधुनिक स्थाने आपल्याकडेही असावीत ही त्यांची खरी उर्मी होती. चैत्रगौरीच्या हळदीकुंकवाच्या वेळी येणाऱ्या सुवासिनींवर छाप पाडण्यासाठी गृहिणी जशा इकडून तिकडून उधार उसनवारीने खेळणी, चित्रे आणून गौर सजवतात तसा प्रकार नेहरू-नियोजनाचा होता, समाजवादाचा होता आणि विज्ञानप्रेमाचाही होता.

पन्नास वर्षांच्या औद्योगीकरणाच्या खटाटोपानंतर भारतासारख्या देशांची शास्त्रविज्ञानात अशी काही प्रगती झाली नाही. उलट, पन्नास वर्षांपूर्वी शास्त्रविज्ञानात सुधारित जगाच्या तुलनेने ते जितके मागासलेले होते त्यापेक्षा आज अधिक मागास पडले आहेत.

**'नीरो'ची प्रतिभा**

नेहरूंच्या रसिकतेपोटी देशाची फाळणी झाली आणि या रसिकतेपोटीच देश दिवाळखोर झाला. एवढेच नव्हे तर कोट्यवधी संसार बेचिराख झाले. रोम साम्राज्याचा बादशाह नीरो याने आपल्या प्रतिभाविलासाकरिता साऱ्या शहराला आग लावली व ते भव्य भयाण दृश्य पाहत तो आपले तंतुवाद्य वाजवीत होता असे म्हणतात. इतिहासाची साक्ष आहे की नेहरू हे भारताचे नीरो होते.

समाजवादाचा आता वैश्विक पराभव झाला आहे. नियोजन ही संकल्पनाच अव्यवहार्य आहे असे या व्यवस्थेचे गंभीरपणे प्रयोग केलेले देशही मानू लागले आहेत. खुली बाजारपेठ ही काही आदर्श व्यवस्था आहे असे नाही, पण खुल्या बाजारपेठेपेक्षा जास्त सोयीस्कर असा दुसरा पर्याय नाही हे जगन्मान्य होऊ लागले आहे. तिसऱ्या जगातील नियोजनाचा बडेजाव मिरविणारे सगळे देश दिवाळे काढून हाती भिक्षापात्रे घेऊन उभे आहेत.

**नवे 'नीरो'**

खुल्या बाजारपेठेचा उद्घोष आता, ज्यांची सगळी हयात नेहरू-नियोजनाचा पुरस्कार करण्यात गेली असे श्रेष्ठही करू लागले आहेत. लायसेन्स-परमिट

राज्य संपविण्याच्या आरोळ्या चौफेर उठत आहेत म्हणजे नेहरूवाद संपला आहे असे नाही. समाजवाद हटला, नियोजनाची भांडेफोड झाली आणि शास्त्रविज्ञानाच्या घोषणांतील उथळ भंपकपणा सिद्ध झाला. नेहरूवादाचे तीनही पाय तुटले तरी नेहरूवाद जिवंतच आहे. खरा नेहरूवाद म्हणजे येन केन प्रकारेण शहरी, आंग्लविद्याविभूषित भद्र लोकांचे कल्याण साधणे. नेहरूंनी हे कल्याण समाजवाद नियोजन, विज्ञान या त्रयीने करण्याचा उघद्व्याप केला. आता ही नाणी चालत नाहीत म्हणून ''स्वातंत्र्य'', ''खुली बाजारपेठ'' असल्या फसव्या घोषणा करत नवे शासन पुढे सरसावले आहे. नेहरूवादावर उघडपणे हल्ला करण्याची हिंमत नरसिंहराव दाखवत नाहीत, मनमोहन सिंगही दाखवत नाही. यात राजकीय सोय असेलही; पण नेहरूंचे अवडंबर संपविण्याची व्यापक मोहीम नव्या अर्थव्यवस्थेचे प्रणेते घेत नाहीत. कारण अखेरीस त्यांचे आणि नेहरू व्यवस्थेचे आंतरिक हेतू समानच आहेत. सगळे नवे स्वातंत्र्य आणि स्वच्छ हवा शहरांपुरतीच मर्यादित राहावी, कारखानदारांना तिचा लाभ व्हावा पण शेतकऱ्यांना मात्र या नवीन युगाचा संपर्क होऊ नये असे भरकस प्रयत्न चालू आहेत. हे प्रयत्न शासनाला फारसे परवडणारे नाहीत तरीही, जित्याची खोड मेल्याशिवाय जात नाही, शासन प्रयत्न करीत राहाणार आहे.

**दुटप्पी तत्त्वज्ञान**

पण नव्या अर्थव्यवस्थेचा उद्घोष करणाऱ्यांच्या मार्गांत एक मोठी अडचण आहे. खुल्या व्यवस्थेच्या नावाने कारखानदारांना सर्व सोयीसवलती द्यायच्या पण परदेशांतल्या महागड्या गव्हाची मात्र भरपेट आयात करायची, कापूस, कांद्यांवर निर्यातबंदी घालायची, शेतीमालाच्या प्रक्रियेवर आणि विक्रीवर बंधने लादायची अशा दुटप्पी वागणुकीचे समर्थन कसे करायचे? थोडक्यात, नेहरू - नियोजनांत इंडिया-भारत सावत्रपणा खपून गेला. खुल्या स्वतंत्र व्यवस्थेत अशा भेदाभेदांचे काय तत्त्वज्ञान सांगायचे? खुल्या बाजारपेठेच्या मुक्त व्यवस्थेत शेतकऱ्यांवर तेवढी गुलामी लादूनच ठेवायची हे दिसायलाहीतरी विचित्र दिसेल; असल्या पक्षपातीपणाचे आणि शेतकरी दुष्टाव्याचे समर्थन तरी कसे करावे, त्याचे तत्त्वज्ञान कोणते मांडावे याची मोठी चिंता दुनियाभरच्या 'इंडिया'वाद्यांना पडली आहे!

शेतकऱ्यांवरच्या या जुलुमाचे समर्थन आणि तत्त्वज्ञान उभे करण्याचे काम एक नवाच कंपू करू पाहातो आहे. वेगवेगळ्या मिषाने आणि निमित्ताने शेतकऱ्यांविरुद्ध ही मंडळी गनिमी काव्याने लढण्यास सज्ज झाली आहे. या

लेखाच्या सुरुवातीला दिलेली अवतरणे ही या मंडळींच्या लिखाणांतून आणि वक्तव्यांतूनच आलेली आहेत. आपल्याला शेतकऱ्यांचा मोठा कळवळा आला आहे आणि शेतकऱ्यांचे आर्थिक भले करणे हाच आपला हेतू आहे, यासाठी शेतकऱ्यांचे पाश्चिमात्य देशांपासून संरक्षण केले पाहिजे, विशेषतः बहुराष्ट्रीय कंपन्यांपासून केले पाहिजे असा कांगावा त्यांनी चालविला आहे. बहुराष्ट्रीय कंपन्या आणि पाश्चिमात्य राष्ट्र यांच्यापासून शेतकरीबाळाचे संरक्षण करण्याचा एकमेव आणि उघड उपाय म्हणजे आंतरराष्ट्रीय आयात-निर्यात बंद करून या बागुलबुवास दरवाजाबाहेर ठेवावे, असा त्यांचा प्रचार चालू आहे.

**जेत्यांचे नवे 'अ'पुरुषावतार**

या नव्या कंपूतील बहुतेक मंडळी पाच दहा वर्षांआधी उघडउघड कम्युनिस्ट, डावी, प्रागतिक इत्यादी बिरुदावलींखाली मिरवत होती. एका बाजूस ग्रहक आणि दुसऱ्या बाजूस भूमिहीन अशा अडकित्त्यात शेतकऱ्याला कातरण्याचे काम यांनी जिंदगीभर केले. शेतीमालाच्या लुटीचा जुना कार्यक्रम ते आता नव्या झेंड्याखाली मांडू लागले आहेत. शहरांतील आंग्लविद्याविभूषित भद्र समाजातील हे राजबिंडे नेहरूवादाचे वारसदार आहेत. खुली अर्थव्यवस्था आली तर शासन आणि शासकीय संस्थांना काही महत्त्व राहणार नाही; पर्यायाने, नोकरशाहीचे महत्त्व संपुष्टात येईल. गेल्या काही वर्षांत गब्रू झालेली कामगार मंडळींची आता गबाळ गळधट कामे करून टोलेजंग पगार, बोनस संघटित ताकदीवर मिळविण्याची सद्दी संपली तर, आणि धवलवसनी उच्च नोकरीदारांच्या हातातली सत्ता गेली तर काय होईल या चिंतेने हा कंपू व्याकूळ झाला आहे. भद्र लोकांच्या मिरासदारीचे समर्थन आतापर्यंत समाजवाद, नियोजन आणि शास्त्रविज्ञान अशा गोंडस, मोहक आणि भारावून टाकणाऱ्या शब्दांनी झाले. आता या तिन्ही संकल्पनांची भांडेफोड झाल्यानंतर नोकरशहांच्या हाती सत्ता चालू ठेवण्यासाठी आणि शेतकऱ्यांची लूट पुढे नेण्यासाठी सबब काय सांगावी? या नव्या कंपूने पर्यावरणाचा बागुलबुवा उभा करून नेहरूधर्तीची व्यवस्था चालू ठेवण्याचा घाट घातला आहे.

भांडवलशाही व्यवस्थेपेक्षा समाजवादी व्यवस्था ही अधिक झपाट्याने आर्थिक प्रगतीकडे नेणारी आहे हे आता साफ खोटे ठरले आहे. भांडवलशाही व्यवस्थेत पुन्हापुन्हा अरिष्टे येतात, बेकारी माजते; समाजवादी व्यवस्थेत अशा काही आपत्ती येत नाही असल्या वल्गना आता कुणी ऐकून घ्यायलासुद्धा तयार नाही. खुल्या बाजारपेठेपेक्षा 'ज्याच्या त्याच्याकडून त्यांच्या सामर्थ्याप्रमाणे आणि ज्याला त्यांला त्याच्या गरजेप्रमाणे' ही प्रणाली तर आता निव्वळ हास्यास्पद ठरली

आहे. मग कोणातरी मध्यवर्ती दुढ्ढाचार्याचा हस्तक्षेप असला पाहिजे हा आग्रह कोणत्या मिषाने धरावा? खुल्या बाजारपेठेतील सर्व त्रुटी लक्षात घेऊनसुद्धा ही सर्वांत कार्यक्षम व्यवस्था आहे हे आर्थिक पातळीवर तरी नाकारणे शक्य नाही. म्हणून आता खुल्या बाजारपेठेवरचा एक जुनाच आक्षेप नव्या उत्साहाने ही पर्यावरणवादी मंडळी मांडीत आहेत. आर्थिक नियोजनाचे जे दूरगामी परिणाम होतात त्याकडे बाजारपेठ लक्ष देऊ शकत नाही. पर्यावरणाचा प्रश्न गंभीर आहे. बाजारपेठ पर्यावरणाच्या मोडतोडीची दाद घेऊ शकत नाही. तस्मात, पर्यावरणासाठी नियोजन आवश्यक आहे. निर्यात, आयात व्यापार यांवर बंधने आवश्यक आहेत. येन केन प्रकारेण भद्र लोकांच्या हस्तक्षेपाची आवश्यकता सिद्ध करण्याचा पूर्वाश्रमीच्या प्रागतिकांचा हा नवा डाव आहे.

**'डंकेल' प्रस्ताव**

मध्यंतरीच्या काळात एका आंतरराष्ट्रीय संघटनेच्या डंकेल नावाच्या अधिकाऱ्याने आंतरराष्ट्रीय विचारविमर्शासाठी काही प्रस्ताव मांडले. त्यांतील शेतकऱ्यांसंबंधीचे प्रस्ताव थोडक्यात असे होते – अनेक देशांत (यात अमेरिका, युरोप, जपान, कोरिया, इस्रायल इत्यादींची प्रामुख्याने गणना होते.) शेतीमालाची निर्यात वाढविण्यासाठी आणि बाहेरून होणारी शेतीमालाची आयात रोखण्यासाठी वेगवेगळे उपाय योजले जातात. त्यांत शेतकऱ्यांना वेगवेगळ्या मिषाने सूट-सबसिडी देणे किंवा बाहेरून येणाऱ्या मालांवर करांची आकारणी करणे इत्यादी मार्ग येतात. तिसऱ्या जगातील अविकसित देशांत शेतकऱ्यांचे असे कौतुक फारसे दिसत नाही; या उलट भारतातल्याप्रमाणे शेतकरीविरोधी अशी धोरणेच राबविण्यात येतात. डंकेलसाहेबांच्या प्रस्तावात एक वेळापत्रक सुचविण्यात आले आहे आणि त्या वेळापत्रकाप्रमाणे सूट-सबसिड्यांचे हे साम्राज्य आणि खुल्या बाजारपेठेतील शासकीय हस्तक्षेप संपवून टाकण्याकरिता एक वेळापत्रक दिले आहे. यात आक्षेपार्ह ते काय आहे? ही तर गेली दहा वर्षे शेतकरी संघटनेची मागणी राहिली आहे. भारतातील शेतकऱ्यांना सूट-सबसिडी मिळतच नाही, काही भाग्यवंतांना जी मिळते ती नगण्य आहे. तेव्हा, डंकेलसाहेबांच्या प्रस्तावामुळे भारतीय शेतकऱ्यास काहीच तोशीस पडणार नाही. उलट, हे प्रस्ताव प्रत्यक्षात अंमलात आले तर भारतीय शेतकऱ्यांचे भले होईल, त्यांना निर्यात करणे सुलभ होईल आणि भारतात शेतीमालाची आयात करणे अधिकच महागडे होईल. अशी परिस्थिती असतानाही पर्यावरणवादी डंकेल प्रस्तावावर तुटून पडले आहेत; शेतकऱ्यांना आता सूट-सबसिडी मिळणार नाही याबद्दल दु:खाचे

उमाळे फुटल्याचे ते दाखवीत आहेत. भारतीय शेतकऱ्यांना आजपर्यंत अशी काही शासनाची मदत झाली नाही याचे त्यांना भान नव्हते ते आजच एकदम त्यांना आले आहे.

आंतराष्ट्रीय खुली बाजारपेठ झाली तर बहुराष्ट्रीय कंपन्या हिंदुस्थानात शेतीमाल आणून ओततील अशी आवई पर्यावरणवादी ऊठवीत आहेत. अस्मानीचे आणि सुलतानीचे सर्व प्रहार सोसूनही भारतीय शेतकरी आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत स्पर्धा करण्यास आज सशक्त उभा आहे याची या शहरी पर्यावरणवाद्यांना काही जाणकारी नसावी. नेहरूव्यवस्थेखाली अफाट किंमती देऊन आयात केलेला शेतीमाल देशातील बाजारपेठेत ओतून देशातील शेतीमालाचे भाव पाडण्यात आले याचे या पर्यावरणवाद्यांना काही दुःख झाल्याचे माहीत नव्हते. आता खुल्या बाजारपेठेला विरोध करण्याकरिता शेतकऱ्यांना संरक्षणाची आणि संगोपनाची आवश्यकता असल्याचा त्यांना साक्षात्कार झाला आहे!

डंकेलसाहेबांच्या प्रस्तावात आणखी एक सूचना आहे. शेतीवरील लोकसंख्येचा भार कमी करून शेतीतील ज्यादा श्रमशक्ती बिगरशेती व्यवसायांत जाण्यासाठी ठोस पावले उचलावीत, अशी ती सूचना आहे. हा प्रस्तावही शेतकरी संघटनेच्या आजपर्यंतच्या मागण्यांशी सुसंगत आहे. किंबहुना, शेतीवर जगणाऱ्या लोकसंख्येचे प्रमाण जितके कमी तितका देशाचा विकास अधिक असे सूत्रही संघटनेने आग्रहाने मांडलेले आहे. नेहरूव्यवस्थेच्या गेल्या अर्धशतकात राष्ट्रीय उत्पन्नातील शेतीचा वाटा ६६ टक्क्यांवरून २८ टक्क्यांवर आला, पण शेतीवर जगणाऱ्या लोकसंख्येची टक्केवारी मात्र ७० च्या आसपास कायम राहिली. ही हकीकत नेहरूवादाच्या अपयशाचा निर्णायक पुरावा आहे असे मत संघटनेने मांडलेले आहे. शेतीवरील हा ७० टक्के लोकसंख्येचा बोजा कमी करण्याची काही निश्चित योजना असली पाहिजे असे डंकेलसाहेबांनी सुचविल्यावर पर्यावरणवाद्यांचा मोठा चडफडाट चालला आहे.

शेती आधुनिक बनली पाहिजे आणि ती विज्ञाननिष्ठ राहिली पाहिजे हा शेतकऱ्यांचा आग्रह आहे. हरितक्रांतीचे तंत्रज्ञान एकाकाळी मोठे उपयुक्त ठरले. त्यामुळे अत्यंत कठीण काळात उत्पादन वाढविता आले, लक्षावधींचे जीव त्यामुळे वाचले. हे सगळे खरे असले तरी हरित क्रांती हितकारक नाही. त्यासाठी खऱ्याखुऱ्या विज्ञानाची कास धरून शेतीचे नवीन तंत्रज्ञान तयार करावे लागेल ही शेतकऱ्यांची खरीखुरी भूमिका आहे. जुन्या बियाण्यांचे वाण तर नष्ट होऊ द्यायचे नाहीत, पण आधुनिक शास्त्रांचा पुरेपूर वापर करून नवनवीन वाणे,

बियाणे तसेच सुधारित पोषणतत्त्वे आणि औषधे तयार व्हायला पाहिजेत हेही तितकेच खरे. बहुराष्ट्रीय कंपन्या इत्यादींच्या बागुलबुवाच्या धाकाने शेतकऱ्यांना सदासर्वकाळ मागासलेल्या शेतीत ठेवता येईल हे शक्य नाही. शास्त्रविज्ञानाची डिमडिम वाजवणारी मंडळीच आता नवीन विज्ञानाच्या आधाराने बहुराष्ट्रीय कंपन्या तिसऱ्या जगावर स्वामित्व गाजवतील अशी हाकाटी करीत आहेत.

थोडक्यात, शेतकरी संघटनेची भूमिका आज डंकेल साहेबाने मांडली आहे आणि त्याला सर्व 'इंडिया'वादी आणि पर्यावरणवादी विरोध करीत आहेत.

**विचित्र जमात**

इंडियातील पर्यावरणवादी ही तशी मोठी विचित्र जमात आहे. भारतातील दारिद्र्याचे परिणाम म्हणून जे प्रदूषण होते याची त्यांना जाण नाही. पृथ्वीच्या पातळीवर औद्योगीकरणाच्या असमतोलामुळे पर्यावरणावर होणाऱ्या विपरित परिणामांमुळे त्यांना दुःख होते, पण इंडिया-भारतातील औद्योगीकरणाच्या असमतोलामुळे तोच प्रकार त्यांच्या पायाखाली त्यांच्या देशातही घडतो आहे याचे त्यांना फारसे भान नाही. आंतरराष्ट्रीय परिसंवादांत, सभा,परिषदांत सगळ्या अविकसित देशांतील सगळ्या जनांचे हितसंबंध एकच आहेत, त्यांत काही 'इंडिया-भारत' असा फरक नाही असे सोंग ते आणतात आणि एका बाजूला विकसित व दुसऱ्या बाजूला एकसंघ अविकसित देशांतील प्रजा पर्यावरणाच्या समरांगणावर समोरासमोर संघर्षाकरिता उभे ठाकले आहेत असे भासवतात. भारतातील पर्यावरणवाद्यांचे बहुतेक कंपू आता 'बेरोजगार' झालेल्या डाव्या कार्यकर्त्यांच्या छावण्या झाल्या आहेत.

**खरा पर्यावरणवाद**

पर्यावरणाचा प्रश्न गंभीर आहे, त्याकडे त्यांनी अवश्य लक्ष द्यावे. पर्यावरणाचे खरे संरक्षक आणि शेतकरी यांच्यात संघर्ष उभा राहूच शकत नाही. आज तो संघर्ष उभा राहिल्यासारखा दिसतो आहे याचे कारण या पर्यावरणवाद्यांमध्ये पर्यावरणनिष्ठा कमी आणि भद्र लोकांना पुन्हा एकदा सत्ता व प्रतिष्ठा प्राप्त करून देण्याची जिद्द जास्त प्रबळ हे आहे.

पर्यावरणाचा प्रश्न वेगवेगळ्या कारणांनी जास्त विक्राळ बनत चालला आहे. त्यांना तोड काढणे हे महत्त्वाचे आणि तांतडीचेही आहे. या विषयावर चिंता आणि चिंतन करणाऱ्या सर्वांना एका गोष्टीची खात्री आहे. केन्द्रीकरणाने पर्यावरण नाही तर, विकेन्द्रीकरणाने सुधारते. न्यूयॉर्क, दिल्ली, मुंबई येथे यंत्रणा उभारून पर्यावरणाचा विनाशच करतील संरक्षण नाही.

औद्योगीकरणाचा अपरिहार्य परिणाम म्हणून काही प्रदूषणाच्या समस्या निर्माण होतात, त्यातल्या काही टाळता येण्यासारख्या असतात, काही नसतात. यासाठी स्थानिक पातळीवर बंधने परिणामकारक ठरू शकतील. त्यासाठी बोजड शासकीय इन्स्पेक्टरगिरीची गरज नाही. पृथ्वीवरील काही देशांत औद्योगीकरण जास्त झाले. तिसऱ्या जगातील देशांत औद्योगीकरणाची काही बेटेच उभी राहिली अणि तेथेच पाश्चिमात्य तोंडवळ्याचा प्रदूषणाचा प्रश्न उभा राहिला. शेतीतून तयार होणाऱ्या बचतीतून औद्योगिक भांडवल तयार होणे, त्यातून छोट्या उद्योगधंद्यांपासून मोठ्या कारखान्यापर्यंतची वाढ हे सर्व शेतकऱ्यांच्या हातात राहिले असते, थोडक्यात, भांडवलनिर्मितीची प्रक्रिया शेतकऱ्यांच्या शोषणावर आधारलेली नसती तर मुंबईसारखे कारखान्यांचे उकिरडे तयार झाले नसते आणि प्रदूषणाचा प्रश्न आटोक्यात राहिला असता. साम्राज्यवादाने प्रदूषण अधिक फोफावले आणि नेहरूवादाने तिसऱ्या जगातील औद्योगिक प्रदूषणाची मुहूर्तमेढ रोवली.

पर्यावरणाचा प्रश्न हा शेतीमालाच्या भावाच्या समस्येतून तयार झालेल्या आपत्तींपैकी एक आहे. काही प्रमाणात तंत्रज्ञानातील त्रुटी आणि दोष यांमुळेही पर्यावरण आणि प्रदूषणाच्या समस्या उभ्या राहिल्या आहेत; पण या बाबतीत कोणालाही निर्दोष तंत्रज्ञान आपण उभे करू शकू अशी शेखी मिरवता येणार नाही. नवीन शोध लावता लावता चुका करत आणि त्या सुधारतच माणसाची प्रगती होऊ शकेल. अशीच परिस्थिती वेगवेगळ्या प्रकल्पांबद्दलही आहे. उदाहरणार्थ, नर्मदा प्रकल्पाचा पर्यावरणावर काही विपरित परिणाम होईल हे उघड आहे; पण, नर्मदामातेचा जलौघ समुद्रात जाऊन पडत राहिला तर त्याचेही काही पर्यावरणी दुष्परिणाम आहेत हे डोळ्याआड करून चालणार नाही. राजस्थानच्या वाळवंटात पाणी न्यावे, तेथे हिरवळ करावी या योजनेला सर्व पर्यावरणवादी साहजिकच पाठिंबा देतील, पण वायव्येतील वाळवंटे संपली तर सर्व मान्सून व्यवस्था ढासळून जाईल अशी शास्त्रज्ञांना गंभीर चिंता आहे. खरीखुरी परिस्थिती काय आहे याविषयी कुणीच फार अहंकाराने बोलू शकणार नाही.

**नीरोची पिलावळ**

पर्यावरणवादी आणि पर्यावरणवाद यांची ही एकूण अशी नाजूक अवस्था आहे तरीही त्यांची मोठी चलती दिसते आहे. याचे कारण पर्यावरणाच्या नावाखाली शेतकरीविरोधी व्यवस्था आणि नोकरशाही चालू ठेवणे व भरभराट करणे या शहरी भद्र लोकांच्या जिव्हाळ्याच्या कार्यक्रमाकरिता ही मंडळी तत्त्वज्ञानाचा एक डोलारा तयार करताहेत. अर्थशास्त्रात नियोजन निरर्थक ठरले असेल; पण

पर्यावरणासाठी नियोजन पाहिजे या लबाडीने ते शेतकरीविरोधी आणि नोकरशाहीस सुकर अशी व्यवस्था बळकट करू पहात आहेत. पन्नास वर्षांपूर्वी समाजवाद, नियोजन, शास्त्रविज्ञान यांच्या जल्लोशात शेतकऱ्याला गाडण्यात आले. आता पर्यावरणाचा नवीन जल्लोश त्याच हेतूने उठवण्यात येत आहे.

नेहरूवादाची ही नवीन पिलावळ उठते आहे. कदाचित् दुसऱ्याही अशा पिलावळी उठतील. या सर्वांचा बंदोबस्त कायमचा करायचा तर 'नीरो'वाद अखेरचा आणि कायमचा गाडला पाहिजे.''

*(६ जुलै १९९२)*

◆◆

# अयोध्या प्रश्न सोडवण्याची कुणाला इच्छा आहे का हो?

**अयोध्या पुन्हा पेटत आहे :**

अयोध्येत मंदिर-मशीद वाद पुन्हा एकदा कडेलोटाच्या अवस्थेत पोहोचला आहे. ३१ ऑक्टोबर १९९० रोजी अडवाणींच्या रथयात्रेच्या शेवटी हे प्रकरण गरमागरम झाले होते आणि त्याच्या आचेत विश्वनाथ प्रताप सिंग यांचे सरकार पायात वितळून कोलमडले. यावेळच्या उद्रेकात आजचे मध्यवर्ती शासन लगेच कासळेल अशी काही फारशी शक्यता नाही; पण केंद्र शासनाने उत्तर प्रदेशातील भा.ज.पा. चे शासन बरखास्त केले आणि त्या राज्यात पुढच्या निवडणुका राममंदिराच्या प्रश्नावरच झाल्या तर मंदिरवादी आजच्यापेक्षाही मोठ्या बहुसंख्येने निवडून येतील. एवढेच नव्हे तर मंदिर बांधणीच्या मार्गात व्यत्यय न आणणारे शासन दिल्लीत पाहिजे अशा मुद्द्यावर पुढील सार्वत्रिक निवडणुका झाल्या तर केंद्रातही मंदिरवाद्यांची सत्ता येणे सहज संभाव्य आहे.

**जबाबदारी शासनाचीच :**

शिळा बनलेली अहिल्या प्रभुरामचंद्रांच्या स्पर्शाने उद्धरली आणि सजीव झाली तसेच राममंदिराच्या स्पर्शाने नापीक आणि निरर्थक जातीयवादी मंच तरारून वाढत आहेत. हा प्रश्न उठवल्याबद्दल विश्व हिंदू परिषद किंवा भारतीय जनता पार्टी यांना दोष देण्यात फारसा अर्थ नाही. सत्ता टिकावी म्हणून इंदिरा गांधी समाजवादाची, गरिबी हटविण्याची घोषणा करू शकतात तर भा. ज. पा.च्या मंडळींनी रामाविषयी देशभर असलेल्या प्रेमादर भावनेचा उपयोग का करू नये? अयोध्येचा प्रश्न चिघळला आणि त्याचा धोका राष्ट्रीय एकात्मतेलाच वाटू लागला याची जबाबदारी मंदिरवाद्यांकडे नसून वेगवेगळया शासनांनी याविषयी घेतलेली निष्क्रियतेची भूमिकाच या परिस्थितीस जबाबदार आहे. रामजन्मभूमी-बाबरी मशीद प्रकरणाचा अलीकडचा इतिहास थोडक्यात असा आहे.

**वादाचा इतिहास**

२३ डिसेंबर १९४९ रोजी काही मंडळी बाबरीमस्जिदीत घुसली आणि त्यांनी मस्जिदीच्या मध्यभागात राममूर्तीची स्थापना केली.

१६ जानेवारी १९५० रोजी फैजाबादच्या कोर्टाने बाबरी मशीदीतील मूर्ती हलवू नयेत, ४९ सालापासून तेथे चालू झालेली पूजा-अर्चा चालूच राहावी असा निर्णय दिला.

१ फेब्रुवारी १९८६ रोजी फैजाबादच्याच कोर्टाने मशीदीच्या आतील दरवाजास लावलेले कुलूप काढण्याचा आदेश दिला. यासंबंधी चार खटले वेगवेगळया कोर्टांत चालू होते. ते सगळे खटले आता अलाहाबाद हायकोर्टापुढे चालूच आहेत.

३१ ऑक्टोबर १९९१ रोजी उत्तर प्रदेशातील भा. ज. पा. शासनाने २.७७ एकर जमीन ताब्यात घेतली व आसपासची काही जमीन मिळून ४२ एकर जमीन आसमंताच्या विकासाकरिता एका न्यासाकडे सोपवली. सुप्रीम कोर्टाने या जमिनीच्या संपादनास मान्यता दिली; पण संपादित जागेवर कायम स्वरूपाचे बांधकाम करू नये असा निर्णय दिला.

प्रस्तावित मंदिराच्या प्रांगणात आता जमीन सपाट केली जात आहे व मोठमोठे चबुतरे बांधले जात आहेत. ही सगळी कारवाई कायदेशीर आहे, कोर्टाच्या नियमास अनुसरून आहे असे उत्तर प्रदेश शासनाचे मत आहे. याउलट, उत्तर प्रदेश शासनाची कारवाई बेकायदेशीर आहे अशी राष्ट्रीय मोर्चा, डावे पक्षे आणि इंदिरा काँग्रेस यांची भूमिका आहे.

भारतीय जनता पार्टीस मंदिर बांधण्याचा जनादेश आहे आणि त्यापुढे कोणतीही तांत्रिक कायदेशीर अडचण कुचकामी आहे असे मंदिरवादी मानतात. या उलट, मध्यवर्ती शासनालाही अधिक व्यापक जनादेश आहे आणि तो जनादेश निर्धार्मिक एकात्म भारताचे संरक्षण करण्याचा आहे असे इतर पक्ष मानतात.

**राममंदिराचे महाभारत**

हा सगळा इतिहास थोड्याफार तपशिलात मांडला तो काही सगळा इतिहास समजावून सांगण्याकरिता नाही. या तपशिलावरून एवढेच स्पष्ट व्हावे की गेल्या ४३ वर्षांत हे जे सगळे महाभारत घडले त्यात एक बाजू सत्याची आणि दुसरी बाजू खलांची, असे काही नाही. महाभारतात जसे कौरव-पांडव दोघांतही दोषांचे वाटप करावे लागते तसेच अयोध्या प्रकरणाचे आहे. प्रश्न न्यायनिवाड्याचा नाही, प्रश्न अटीतटीला जाऊन महाभारत युद्धाप्रमाणे सर्वनाश ओढवून घेण्याचा

नाही; प्रश्न व्यावहारिक सोडवणुकीचा आहे, एवढी बाब स्पष्ट व्हावी. अयोध्येचा प्रश्न बिकट झाला, चिघळला याचे कारण केंद्रातील वेगवेगळ्या पक्षांच्या शासनांनी अयोध्येच्या प्रश्नावर आडमुठी आणि निष्क्रियपणाची भूमिका घेतली.

**'सनानि' धोरण**

राजीव गांधी, विश्वनाथ प्रताप सिंग, चन्द्रशेखर, पी. व्ही. नरसिंहराव या चारही पंतप्रधानांच्या शासनाचे धोरण एकच राहिले आहे. या धोरणाचे स्वरूप काय? अयोध्या प्रश्नाची सोडवणूक करण्याचा सगळ्यात उत्तम उपाय हा की, हिंदू आणि मुसलमान या दोन्ही जमातींच्या मान्यवर नेत्यांनी एकत्र बसून उभय पक्षांना मान्य होईल असा काही तडजोडीचा ठराव करावा. असा समझोता नच जमला तर या विषयावर न्यायालय जो काही निर्णय देईल तो सर्व संबंधितांनी मान्य करावा असे थोडक्यात हे धोरण आहे. 'समझोता नाहीतर निवाडा' थोडक्यात 'सनानि' असे हे धोरण आहे.

इतर अनेक बाबतींत परस्परविरोधी भूमिका असलेल्या चार शासनांचे 'सनानि' धोरणाबाबत मात्र एकमत असावे ही मोठी गमतीदार गोष्ट आहे. चार वेगळ्या शासनांनी सनानि धोरण स्वीकारले याचे रहस्य काय? सनानि धोरण नोकरशाहीच्या प्रकृतीस झेपणारे आहे. हे त्याचे खरे इंगित आहे. नाहीतर, सनानि धोरण कोणत्याच कसोटीस उतरत नाही; तर्कशास्त्राच्याही नाही आणि व्यावहारिकतेच्या तर नाहीच नाही.

**समझोता अकल्पनीय**

दोन जमातींच्या मान्यवर नेत्यांच्या समझोत्यातून काही तोडगा निघेल ही कल्पना तर मुळात विचारात घेण्यालायकसुद्धा नाही.

या दोन जमातींचे मान्यवर नेते कोण? हिंदू समाजाचे नेतृत्व भा. ज. पा., बंजरंग दल, शिवसेना त्यांच्याकडे आहे असे कुणी मानेल काय? आणि मुल्लामौलवींकडे मुसलमान समाजाचे नेतृत्व आहे असे मानणे अयोग्यच नाही तर मुसलमान समाजातील प्रागतिकांचा घोर अपमान आहे. शहाबानो प्रकरणी मुल्लामौलंबीचे नेतृत्व मान्य करण्याची घोडचूक राजीव गांधी यांनी केली, त्याची पुन्हा पुनरावृत्ती करणे नको.

**नेते वाघावर स्वार**

समजा, काही चमत्कार घडला आणि दोनही जमातींचे सर्वमान्य नेते कोण हे एकमताने ठरले आणि अशी नेतेमंडळी एकत्र बसली तरी त्यांच्यात समझोता होण्याची शक्यता शून्यसुद्धा नाही. समझोता करायचा म्हणजे एका पक्षाची

शरणागती हे फारसे संभवत नाही. उभयपक्षी थोडातरी समजूतदारपणा, तडजोड, देवाणघेवाण करण्याचे सामर्थ्य असले पाहिजे. दुर्दैवाने, जगात नेतृत्वात हे सामर्थ्य असू शकत नाही. या नेत्यांची स्थिती वाघाच्या पाठीवर बसलेल्यासारखी झाली आहे. पाठीवर फार काळ बसून राहणे शक्य नाही आणि खाली उतरावे तर वाघच चट्टामट्टा करण्याची निश्चिती. जो कुणी हिंदू किंवा मुसलमान नेता काही तडजोड करण्याची तयारी दाखवेल त्याची लगेच हुर्रेवडी उडवली जाईल आणि देशद्रोही, धर्मद्रोही अशी त्याची संभावना होईल. एवढी हिंमत कोणत्याच जमातीच्या नेतृत्वात नाही.

**एक तिसरी जमात**

पण याहीपेक्षा, एका महत्त्वाचा प्रश्न उभा ठाकतो. मशीद राहावी की मंदिर राहावे की दोघांच्या मधला काही 'मध्यम मार्ग' राहावा? या प्रश्नाचा निर्णय काय फक्त मंदिरवादी आणि मशीदवादी या दोघांच्याच स्वारस्याचा आहे? मला स्वत:ला मंदिरातही स्वारस्य नाही आणि मशीदीतही नाही; पण माझा आग्रह आहे की पुराणकालीन किंवा इतिहासकालीन वास्तू आहेत तशा जतन कराव्यात, त्यात असे फेरफार करूच नयेत. इतिहासातील धामधुमीच्या काळात देऊळ उद्ध्वस्त करून त्या जागी मशीद बांधलेली असेल तर त्यावेळी झालेल्या राष्ट्रीय मानहानीची भरपाई आता या काळात मशीदीच्या जागी पुन्हा मंदिर बांधल्याने कशी काय होईल? इतिहासात घडलेल्या मानभंगाचा जुनाट पद्धतीने बदला घेण्याचा प्रयत्न करणे म्हणजे 'डॉन क्विक्झोटगरी' आहे. जुन्या काळातल्याप्रमाणे शिलेदाराचा पोशाख करून, घोड्यावर स्वार होऊन, हाती तलवार, बर्ची घेऊन आज कोणी निघेल तर त्याची रवानगी येरवड्याच्या इस्पितळातच होईल. इतिहासातील मानभंगाची भरपाई कशी करावी याचे उदाहरण आपल्या डोळयांदेखत नुकतेच जर्मनीत घडले आहे. पश्चिम जर्मनीने कठोर परिश्रमाने आणि कल्पकतेने राष्ट्राचे आर्थिक सामर्थ्य इतके वाढवले की पूर्व जर्मनीतील जनसामान्यास पश्चिम जर्मनीचा नागरिक होण्याचे भाग्य मिळावे अशी तहान लागली. इतिहासाचा विचार करत राहिलो तर वर्तमानही हातातून निसटून जाईल. भारताने जर पश्चिम जर्मनीसारखा आर्थिक चमत्कार घडवून दाखवला तर अफगाणिस्तान, पाकिस्तान, सिलोन, ब्रह्मदेश, नेपाळ, इंडोनेशिया, मलेशिया, कंबोडिया, थायलंड यांसारखे भारतापासून दूर झालेले प्रदेश पुन्हा भारताजवळ येण्याची पराकाष्टा करू लागतील. इतिहासात पराभूत झालेले आम्ही, वर्तमानात जागतिक दारिद्र्य रेषेखालचे आम्ही निरर्थक राष्ट्रीय मानापमानाच्या

गप्पाच करत राहिलो तर भविष्यातही या दुर्दैवी देशाचा माथा उजळ होण्याची काहीही शक्यता नाही.

माझ्यासारख्यांना असे वाटते की या ऐतिहासिक वासू 'जैसे थे' राहाव्यात. त्यांच्याकडे पाहून मनाला खंत वाटत असेल तर त्याचा उपयोग देशाची आर्थिक ताकद वाढवण्याकरिता करावा. देशाची आर्थिक ताकद वाढू लागली म्हणजे थोड्याच दिवसांत असा काळ येणार आहे, की पडलेल्या देवळांचे अवशेष पाहून आक्रमकांच्या वारसदारांनाच आपल्या पूर्वजांच्या संस्कृतिहीनतेबद्दल शरम वाटू लागेल आणि त्यांच्या बर्बरतेचे हे सज्जड पुरावे झाकून टाकावे असे त्या वारसदारांनाच वाटेल.

अयोध्या प्रश्नाचा निकाल लावताना माझ्यासारख्यांच्या या जमातीला काही स्थान मिळणार आहे किंवा नाही? आमचे कुणी ऐकणार आहे का नाही? का सारा मामला उभय पक्षांच्या कठमुल्लांवरच सोपवला जाणार आहे? उभय पक्षांच्या समझोत्याने हा वाद मिटावा ही कल्पना किती तर्कहीन आहे हे आणखी सिद्ध करण्याची जरूरी नाही.

समझोत्यावर आता कुणी फारशी आशा ठेवून बसलेलेही नाही. काही शंकराचार्यांची आणि मान्यवर मुसलमान बुजुर्गांची नावे काही काळ पुढे आली; पण हा सगळा मामला आता थंडावला आहे.

**भरवसा कोर्टावर**

परिणामतः या विवादाचा निकाल कोर्ट काय लावील तोच, अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. समझोत्याने वाद सुटणार नाही, कोर्टाच्या निर्णयाने वाद सुटणे त्याहीपेक्षा अशक्य.

**कोर्टाचा विषयच नाही**

कोर्टापुढे निर्णय व्हायला मामला काही जमिनीच्या मालकीपत्राच्या किंवा सातबाराच्या उताऱ्याचा नाही. हिंदुत्ववाद्यांचा या विषयावरील युक्तिवाद समर्थनीय आहे. कोणत्याही समाजाची श्रद्धा हा विषय कोर्टाच्या अधिकारातला असूच शकत नाही. सर्वोच्च न्यायालयाने १९८९ साली दिलेल्या एका निर्णयातील शेवटचे वाक्य असे आहे-

"या वादात कोर्टापुढे आलेल्या प्रश्नांपैकी काही न्यायव्यवस्थेने सुटू शकतील किंवा नाही याबद्दल जबरदस्त शंका आहे."

**कज्जेदिरंगाई**

तसे हे सगळेच प्रकरण अगदी आधुनिक काळातसुद्धा न्यायालयांपुढे १९४९

सालापासून पडलेलेच आहेत. ४३ वर्षांत न्यायालयापुढील वाद अधिकाधिक किचकट होत चालला, एवढाच काय तो फरक. पूर्वी वाद मशीदीच्या आणि आसपासच्या जागेपुरताच होता. ऑक्टोबर ९१ पासून उत्तर प्रदेश सरकारने संपादन केलेल्या जमिनीबद्दलचा आणि तिच्या वापराबद्दलचा एक नवाच वाद उपस्थित झाला आहे.

**खटल्यांना अंत नाही**

बरे, कोर्टाचा निर्णय तरी कोठे अंतीम असतो? बॅ. अंतुले यांनी दाखवून दिले आहे की साधने मुबलक असली, सज्जड वकील मंडळी उभी करता आली तर अपिलावर अपील अशा कोर्टाकोर्टातून येरझरा करीत अनंत काळपर्यंत खटला चालू ठेवता येतो; उच्च न्यायालयाच्या एका पीठाने दिलेला निर्णय दुसऱ्या पीठाकडून बदलून घेता येतो. एका व्यक्तीसंबंधीच्या खटल्यात असे होते तर दोन जमातींची प्रतिष्ठा ज्या प्रश्नात गुंतली आहे त्या प्रश्नाचा निकाल अखेरचा असा कोठे लागेल हे काही फारसे शक्य नाही.

**अंमलबजावणी करणार कोण?**

आणि समजा, कोर्टाने निकाल दिला, पण ते निकाल अंमलात आणण्यासारखा नसेल तर? निकाल अमलात आणण्यासाठी भारताची सारी सशस्त्र फौज तैनात करावी लागत असेल तर? अयोध्येच्या प्रश्नात असे होऊ शकते. मशीदीत १९४९ साली प्राणप्रतिष्ठा केलेली रामाची मूर्ती तेथून काढून टाकावी, कारण ती उघड उघड अलीकडे अलीकडे अगडी उदंड आक्रमणाने बसवण्यात आलेली आहे असे कोर्टाने ठरवले तरी त्या निर्णयाची अंमलबजावणी करणार कोण? आणि मशीद हलवण्यात यावी, तिची पुनर्बांधणी अगदी सन्मानाने इतरत्र करण्यात यावी असे महासर्वोच्च न्यायालयाने सांगितले तरी त्या अंमलबजावणीची किमत मोजणार कोण?

या पलीकडेही एक गोष्ट नजरेआड करून चालणार नाही. भारतीय घटनेत न्यायव्यवस्था ही काही इतर व्यवस्थांपेक्षा वरचढ ठेवलेली नाही. संसद, प्रशासन यांच्यासारखीच ती एक व्यवस्था आहे. एखाद्या कायद्याच्या कलमाप्रमाणे कोर्टाने निर्णय दिला तर त्या कायद्याचे कलम विधानसभा किंवा लोकसभा बदलू शकते. निवडणुकीमध्ये असे कलम बदलण्याचा विशेष जनादेश मिळू शकतो किंवा विशेष अधिकार वापरून न्यायालयाचे निर्णय बाजूला ठेवणे कायदेमंडळास सहज शक्य आहे. संसदेने असे केले आहे, अगदी पूर्वानुलक्षी कार्यवाहीसह.

**‘सनानि’ भाकड**

थोडक्यात गेल्या चार पंतप्रधानांच्या नेतृत्वाखालील शासनांनी पाठपुरावा केलेले ‘समझोता नाही तर निवाडा’ हे धोरण अगदी निरर्थक आणि भाकड आहे. सरकार निष्क्रीयपणे ‘सनानि’ धोरणाचा पुन:पुन्हा रटाळपणे पुनरूच्चार करत आहे आणि या सगळया काळात परिस्थिती अधिकाधिक बिघडते आहे.

**मंदिरवाद्यांची चलाख चाल**

आम्ही न्यायालयाची सत्ता मानणार नाही, असे कुणीच म्हणत नाही; अगदी उत्तर प्रदेशाचे मुख्यमंत्रीसुद्धा म्हणत नाहीत. अगदी उलटे, तेही जाहिररीत्या सनानि धोरणाचाच पुरस्कार करतात. ‘‘अयोध्या विवादावर सर्वमान्य तोडगा शोधण्याची पराकाष्ठा केली पाहिजे. तोडगा सापडेपर्यंत मंदिर आणि मशीदीच्या वास्तूंचे पूर्ण संरक्षण केले पाहिजे. कोर्टाच्या आज्ञांचे उल्लंघन होणार नाही.’’ असेच ते निक्षून सांगत आहेत. कारण उघड आहे. जाहीररित्या असे बोलण्याखेरीज त्यांना गत्यंतरच नाही. कोर्टाचा निवाडा न जुमानता आम्ही मशीद पाडू, मंदिर बांधू असे ते बोलले तर त्यांचे सरकार ताबडतोब बरखास्त होईल. असा धोका घेण्याचे त्यांना काय कारण? त्यांचा डावपेच मोठ्या बुद्धिकुशलतेने ठरला आहे. जे जे कायदेशीरपणे होईल ते ते कायदेशीरपणेच करण्याचा त्यांचा विचार आहे. ४२ एकर जमिनीचे संपादन झाले, त्याला न्यायालयाची मान्यता मिळाली. अमूक वास्तू पाडणे योग्य होते किंवा नाही, नवीन बांधलेली एखादी खोली, एखादी कोठी, एखादी भिंत, एखादा चबुतरा कोणा एका न्यायालयाच्या एखाद्या निर्णयाशी विसंगत आहे काय? असल्या प्रश्नांचा गुंता थोड्याच काळात इतका वाढेल ही न्यायसत्तेचे आदेश आपोआपच परिणामशून्य व निष्प्रभ होतील. अशी सगळी तयारी झाली म्हणजे शिवसेना, बजरंग दल असा एखादा टोळभैरव गट एखाद्या रात्रीत जे बेकायदेशीर कर्म उरकायचे ते उरकून टाकेल. ३१ ऑक्टोबर १९९१ ला मशीदीच्या छतावर काही ‘वीर’ चढलेच ना? दिवसाढवळया खुलेआम मुंबईतील क्रिकेटची खेळपट्टी उद्ध्वस्त करण्यात आलीच ना?

**कल्याणसिंग नामानिराळेच**

हे काम असे एका रात्री उरकले जाईल. उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री कल्याणसिंग यांचे पोलिस काम उरकल्यानंतर तत्परतेने हजर होतील. पाचपन्नास लोकांना अटकही करतील. त्यांच्यावर खटलाही चालेल. कदाचित, त्यांना शिक्षाही होतील. मुंबईची खेळपट्टी उखडल्याबद्दल जसे झाले तसे सगळे पोलिसांच्या साक्षीने आणि सहकार्याने होईल. असे झाले तर त्यात शासनाचा काय दोष?

मुंबईची खेळपट्टी उखडल्यावर कायदा आणि सुव्यवस्था ढासळली म्हणून सुधाकरराव नाईकांचे मंत्रिमंडळ जर बरखास्त झाले नाही तर कोणी गावगुंडांनी एक मशीद पाडली म्हणून कल्याणसिंगांचे मंत्रिमंडळ कसे बरखास्त करता येईल? विशेषतः कागदोपत्री, सरकारने त्या गावगुंडांविरुद्ध यथायोग्य कारवाई केलेली दिसत असेल तर मग हताशपणे झालेले पाहात राहण्यापलीकडे काही गत्यंतर राहणार नाही. बलात्कार होऊन गेला, मग नंतर करायचे काय? आणि जे करायचे त्याचा फायदा काय?

अयोध्येच्या नाटकातला शेवटचा अंक चालू आहे. बलात्काराचा प्रवेश शेवटचा आहे. त्याच्या आधीचा प्रवेश चालू आहे आणि सर्व संबंधित मंडळी आणि शासन 'सनानि' धोरणाच्या गुंतावळ्यात स्वतःला अधिकाधिक जखडून घेत आहे.

**अयोध्येची सोडवणूक**

अयोध्येचा प्रश्न सोडवायला काही कठीण नाही. नोकरशाहीला सोयीस्कर असे निष्क्रियतेचे धोरण सोडून नवी झेप घेण्याची तयारी फक्त पाहिजे.

हा प्रश्न सोडवण्यात कठीण ते काय आहे? चार प्रश्नांवर एकमत सहज दिसून येते.

१) रामजन्मभूमी मंदिर बांधले गेले पाहिजे आणि ते मंदिर रामाच्या जनमानसातील स्थानाशी मिळतेजुळते असे भव्यदिव्य असले पाहिजे.

२) सध्या अस्तित्वात असलेल्या कोणत्याही पूजास्थानाला धक्का लागता कामा नये.

३) रामाचे जन्मस्थान त्रिमितीत नेमके कोणते हे कोणालाच ठाऊक नाही. परंपरेने आणि श्रद्धेने जे जन्मस्थान मानले जाते त्याच्या जवळात जवळ मंदिराचे गर्भगृह असावे.

४) मंदिराची बांधणी एका कालबद्ध कार्यक्रमाप्रमाणे पार पाडली पाहिजे.

याखेरीज पाचव्या एका मुद्द्यावर राष्ट्रीय सहमती होण्यास काही अडचण पडू नये. इतके ऐतिहासिक महत्त्वाचे स्थापत्यकार्य कोणा येरागबाळया पक्षाकडे, संस्थेकडे किंवा न्यासाकडे सोपवणे उचित होणार नाही. ही जबाबदरी केंद्र शासनानेच घेतली पाहिजे. लालकृष्ण अडवाणी यांनीही सोमनाथ मंदिराच्या पुनर्बांधणीकरिता सरदार वल्लभभाई पटेल यांनी अमलबजावणी केलेल्या कार्यक्रमाची अनेक वेळा प्रशंसा केली आहे. तेव्हा अयोध्येचे राममंदिर सोमनाथ मंदिराच्या पद्धतीनेच बांधले जावे हे योग्यच होईल.

ही जबाबदारी केंद्र शासनाने घेतली म्हणजे वर दिलेल्या सहमतीचे चार मुद्दे लक्षात ठेवून बांधकामाचा नकाशा तयार करणे हे स्थापत्यशास्त्रज्ञांचे काम होईल आणि ते खरे त्यांचेच काम आहे. स्थापत्यशास्त्रातील प्रश्न म्हणून अयोध्या वादाकडे पाहिले गेले असते तर वाद इतका चिघळलाच नसता. आजपर्यंत हा वाद महसुली आहे, न्यायिक आहे, राजकीय आहे, धार्मिक आहे असा गहजब करून एक लहान जखम नासवण्यात आली. केंद्र शासनाने मुत्सद्देगिरी दाखवली, हिंमत दाखवली तर स्थापत्यशास्त्रज्ञ अजूनही काळ्याकुट्ट अंधारात प्रकाशाची एक शलाका दाखवू शकतील.

*(२१ जुलै १९९२)*

◆◆

# काळया इंग्रजाची भगवी 'स्वदेशी'

'मूर्खाच्या नाकाला तीनदा घाण' अशा अर्थाची वारंवार वापरली जाणारी एक म्हण कोकणात प्रचलित आहे. आपल्याला समजत नसलेल्या विषयात नाक खुपसायला गेलेल्या एका अर्धवट बुद्धीच्या माणसाच्या मोठ्या मनोरंजक कथेवर ही म्हण आधारली आहे. कोकणात फिरताना अनेक वेळा अनेक गावी अनेक जणांनी ही कथा पुरेपूर कोकणी हावभाव आणि अभिनय यांच्यासकट मला ऐकविली आहे.

या म्हणीची आठवण होण्याचं कारण घडलं ते असं. राष्ट्रीय एकात्मता परिषदेच्या बैठकीकरिता मी सभागृहापाशी पोहोचलो तेव्हा एक तरुण पत्रकार माझी सभागृहापाशी वाट पाहात होते. त्यांनी आपला परिचय करून दिला. प्रत्यक्ष श्रीकृष्णाच्या महाशंखाचे नाव मिरविणाऱ्या एका साप्ताहिकातर्फे हे पत्रकार माझी भेट घेण्याकरिता आले होते. सभास्थानीच्या वातावरणात सगळीकडे अयोध्या, मंदिर आणि मशीद यांची हवा होती. या विषयावर मी बरीचशी वेगळी भूमिका सातत्याने मांडत आलो आहे आणि या साप्ताहिकाच्या कर्त्याकरवित्यांचा मंदिरप्रकरणी जगजाहीर हात असल्यामुळे माझी मंदिरप्रश्नी मुलाखत घेण्याची त्यांची इच्छा असावी असे मी गृहित धरले. अयोध्या प्रश्नाविषयीच्या माझ्या लेखाची एक प्रत देऊन मोकळे व्हावे असा माझा विचार चालला होता, तेवढ्यात पत्रकार महाशयांनी स्पष्ट केले की, त्यांना माझी मुलाखत हवी होती; स्वस्थपणे, सविस्तरपणे मुलाखत हवी होती; पण ती अयोध्येच्या प्रश्नावर नव्हे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि इतर संबंधित संघटना यांनी चालू केलेल्या स्वदेशी आंदोलनाबद्दल माझ्याशी बोलावे अशी त्यांची इच्छा होती.

**गांधीजींच्या स्वेदेशीला अपशकून**

अगदी लहानपणची आठवण झाली. बेचाळीसची चळवळ ओसरत आलेली.

मधूनमधून कोणत्यातरी राष्ट्रीय दिनानिमित्त हरताळ पडायचा आणि शाळा बंद व्हायची हे सोडल्यास वरवर तरी स्वातंत्र्य आंदोलन शमल्यासारखेच दिसत होते. उघडपणे काही करून तुरुंगात जाण्याची किंवा 'शिरीशकुमार' होण्याची कुणाची इच्छाही नव्हती आणि छातीही नव्हती. उघडउघडपणे खादी वापरणे म्हणजेसुद्धा गांधींचा माणूस असल्याचा संशय ओढवून घ्यायला पुरेसे होते. आम्ही शाळकरी विद्यार्थी. खादी वापरणारा बहुधा आमच्यात कोणी नव्हताच; पण निदान खादी वापरण्याची बहादुरी तरी आपल्या हातून व्हावी अशी मोठी ऊर्मी वाटत असे. याला अपवाद म्हणजे संघ आणि हिंदू महासभा अशा हिंदुत्वनिष्ठ घरच्यांचे विद्यार्थी. त्यांची गांधींबद्दलची विरोधभक्ती मोठी जाज्वल्य होती. गांधींनी अहिंसा मांडली म्हणजे डॉ. मुंज्यांची मांसाशनातून स्वातंत्र्य अशी प्रतिक्रिया येई. तसे पाहिले तर त्या काळात हिंदुत्वनिष्ठा आणि स्वदेशी यांच्यात वितुष्ट येण्याचे काही कारण नव्हते. स्वदेशीची चळवळ तशी काही गांधीजींनी सुरू केली नाही. विलायती कापडाच्या पहिल्या होळ्या सावरकर, लोकमान्य टिळक यांनी पेटविलेल्या; पण, आता हा गांधी स्वदेशी म्हणतो काय? मग, आम्ही आग्रहाने, विलायतेतून आलेल्या कापडाची टोपी आणि जमल्यास एखादा दुसरा कपडा वापरणार अशी भूमिका हिंदुत्वनिष्ठ घ्यायचे. खादी पेहरली म्हणजे सनातन वर्णाश्रम धर्माला डाग लागतो असे नव्हते किंवा विलायती मलमलीने धर्मनिष्ठेला काही झळाळी चढत होती असे नव्हते; पण, इंग्रजांच्या आमदनीच्या घटिका भरत आलेल्या असतानासुद्धा स्वदेशीला अपशकून करण्याचा कार्यक्रम या अहंमन्यांनी हाती घेतला आणि हसे करून घेतले.

**'स्वदेशी' राजीवस्त्रांचे पुरस्कर्ते**

दुसरी एक आठवण झाली. १९८६ साली राजीव गांधींचे नवे वस्त्रधोरण जाहीर झाले. अंबानी आणि इतर तत्सम कारखानदारांच्या राजीवस्त्र-उद्योगांना खुलेआम प्रोत्साहन देणारे ते धोरण. कापूस शेतकऱ्यांची मोठी दैना झाली. यवतमाळ जिल्ह्यातील शेतकरी साहेबराव करपे पाटील याने निराशेपोटी आपल्या बायकोपोरांसह विष पिऊन जीव दिला. आंध्र प्रदेशात तर डझनावारी शेतकरी स्त्री-पुरुषांना जीव देण्यावाचून गत्यंतर उरले नाही. महाराष्ट्रात शेतकरी संघटनेने राजीवस्त्रविरोधी आंदोलन चालू केले. आंदोलनाचा विरोध कृत्रिम धाग्याला नव्हता. शहरातील मृदुकंचनकायिकांना राजीवस्त्रच आवडत असेल तर त्यांना हे सौख्य नाकारायचा शेतकऱ्यांना काय अधिकार? पण ही राजीवस्त्रे तयार करण्याकरिता, यंत्रसामुग्रीपासून कच्च्या मालपर्यंत सगळ्याची आयात होणार

असेल तर शेतकऱ्याला त्याचं पांढरं सोनं निदान निर्यात करून पोट भरता येईल एवढीतरी मुभा ठेवावी, एवढीच मागणी. राहुरीला परिषद भरली. प्रमुख पाहुणे चौधरी चरणसिंग. मंचावर उपस्थित, त्यावेळचे विरोधी पक्षाचे अग्रणी शरद पवार, प्रमोद महाजन इत्यादी इत्यादी. कोसळत्या पावसाला दाद न देता लोकांनी भाषणे ऐकली. सभेच्या शढवटी राजीवस्त्रांची होळी झाली. त्या ज्वालेच्या साक्षीने राजीवस्त्र न वापरण्याची जाहीर शपथ घेण्यात आली. सभेनंतर दोनच दिवसांनी सभेत तडाखेबाज भाषण केलेले प्रमोद महाजन नाशिकला बोलते झाले, 'आमचा स्वदेशी राजीवस्त्राला विरोध नाही, विदेशी राजीवस्त्राला आहे.' राजकारणी माणसं भूमिका बदलतात, इकडून उडून तिकडे जाऊन बसतात अशी माझी अपेक्षाच असते. राहुरीच्या याच सभेत भाषण करताना शरद पवारदेखील म्हणाले होते, 'आमच्या पंतप्रधानांना (राजीव गांधींना) तर घरापासून सगळीकडे विलायती गोष्टीच लागतात.' समोरच्या बहुसंख्य अशिक्षित निरक्षर स्त्री-पुरुष शेतकरी समाजातसुद्धा या, सदभिरुचीशी फारकत घेणाऱ्या वाक्याबद्दल नापसंतीची आठी कपाळावर उठली होती. शरद पवार बोलले आणि वर्षाभरात मनोमिलन करून खाविंदचरणारविंदी मिलिंदायमान होण्यासाठी निघून गेले; पण, प्रमोद महाजनांची कोलांटी उडी काही अजबच. राहुरीला प्रतिज्ञा घेण्याची कुणी त्यांच्यावर बळजबरी केली नव्हती! त्यांनी स्वत:हून हात वर उठवून, मूठ आवळून प्रतिज्ञा घेतली. त्याची ध्वनिचित्रफीत उपलब्ध आहे. अठ्ठेचाळीस तासांत कोणा बोलवित्या धन्याने त्यांचा कान धरला की त्यांना एकदम स्वदेशीच्या प्रेमाचे भरते यावे? ते प्रमोदरावांना माहीत आहे, मलाही माहीत आहे आणि महाराष्ट्रातील प्रत्येक शेतकऱ्यालाही ठाऊक आहे.

स्वातंत्र्यलढ्यातील ऐन मोक्याच्या वेळी विलायतीची ऐट मिरविणारे आता एकदम 'स्वदेशी'प्रेमी झाले. मूर्खाच्या नाकाला दुसऱ्यांदा घाण लागली.

**बदलाच्या चाहुलीने व्याकुळलेले**

मूर्खाच्या नाकाला तिसऱ्यांदा घाण लागली ती या वर्षा-दोन वर्षांत. इतिहासाने संपवलेले नेहरू-अर्थशास्त्र बाजूला सारून बाजारपेठेला मानणारे नवीन अर्थशास्त्र पुढे येऊ लागले आहे. परकीय चलन वाचविण्याच्या मिषाने नेहरू-व्यवस्थेत उभ्या झालेल्या लायसेन्स-परमिट व्यवस्थेत बदल होतील अशी चिन्हे दिसू लागली. या बदलांमुळे अनेक जीव व्याकूळ झाले.

**अ) नोकरदार**

खुल्या बाजारपेठेच्या हवेने सरकारी आणि निम-सरकारी नोकऱ्यांत भरगच्च

पगार, गडगंज भत्ते, जबाबदारी शून्य, काम म्हणजे टेबलाखाली हात अशा छोट्यामोठ्या नोकरदार-नोकरशहांच्या तोंडचे पाणीच पळाले. देश बुडाला तरी चालेल, आमच्या नोकऱ्यांना धक्का लागता कामा नये, जुन्या महाराजांची संस्थाने गेली, पण आमची संस्थाने जाता कामा नयेत, अशा घोषणांचा गदारोळ त्यांनी चालू केला.

**ब ) देशी कारखानदार**

जकात करांच्या तटबंदीमागे गचाळ माल महागड्या किंमतीत बनवून सर्वसामान्य ग्रहकांच्या जिवावर मजा लुटणारे कारखानदारही चिंतीत झाले. बाहेरून माल सहजपणे येऊ लागला, स्वस्त किंमतीत सुबक माल लोकांच्या हाती पडू लागला म्हणजे मग आपले काय? हे समजण्याइतके चातुर्य या वर्गाकडे हमखास होते. त्यांनी बोलणारी तोंडे मिळवायचा प्रयत्न चालू केला.

**आर्थिक बदलाला अपशकून**

काही अजागळ बावळे त्यांच्या हाती लागले. स्वदेशीच्या नावाखाली महात्माजींचा आणखी एकदा वध होतो आहे याची जाणीव नसणारेही भेटले; पण, नेहरूवादाच्या या पिलावळीला खरा आधार भेटला तो हिंदुत्ववाद्यांचा. त्यांचे प्रवर्तित चक्र उलट्या टोकाला आले. ऐन स्वातंत्र्याच्या आंदोलनात विलायती मिरविणारे आता एका रात्रीत स्वदेशीभक्त बनले, भाषणे देऊ लागले, स्वदेशीच्या घोषणांनी भिंती रंगवू लागले. म्हणून मला सुरुवातीस सांगितलेल्या कोकणी म्हणीची आठवण झाली.

**'स्वदेशी'चे औचित्य**

काही काही शब्दांभोवती स्वत:चे असे वलय असते. त्याच्या, शब्दकोशातल्या मूळ अर्थाच्या पलीकडे अशा शब्दांची व्याप्ती असते. शब्द उच्चारल्यावर काही अलौकिक, अद्वितीय करून दाखविण्याची चेतना तरुणांच्या मनात आणि शरीरात सळसळावी अशी त्यांची शक्ती असते. 'स्वदेशी' हा अशा भारलेल्या आणि भारावणाऱ्या शब्दांपैकी एक.

इंग्रज देशात आला त्याआधी सतत चालणाऱ्या लढायांनी आणि आक्रमणांनी गावगाडा मोडकळीस आला होता; पण, गावाची व्यवस्था अजून काही प्रमाणात तगून होती. जुन्या आक्रमकांप्रमाणे इंग्रज तलवारींनी आणि बंदुकांनी गावावर तुटून पडला नाही. बळजोरी केली नाही, जुलूम जबरस्ती केली नाही. तो साम्राज्य स्थापायला आलेला, पण चंगीजखानाच्या परंपरेतला नव्हे. त्याचे डावपेच व्यापारी. इंग्लंडमध्ये औद्योगिक क्रांती स्थिरावलेली होती. हिंदुस्थानातून कच्चा माल

मायदेशी नेणे आणि तयार वस्तूंसाठी भारतासारखी प्रचंड हुकमी बाजारपेठ मिळविणे ही त्याची रणनीती होती. एकोणिसाव्या शतकाच्या मध्यापर्यंत त्याच्या रणनीतीचा परिणाम स्पष्ट झाला. गोखले, रानड्यांनी त्याबद्दल लिहिले. जोतिबा फुल्यांनी शेतकऱ्यांच्या जिभेने सांगितले. गावातली हुन्नर, बलुतेदारी मोडकळीस आली आणि लक्ष्मीचा ओघ मँचेस्टरकडे जाऊ लागला. परसत्ता बनियाची तर त्यावर तोडगाही बनियाचाच पाहिजे! नव्या काळात घोड्यावर मांड ठोकून दांडपट्टा फिरवून नाना कसरती करून इंग्रजाला पळवू पाहाणारे कालबाह्य झाले. आणि 'स्वदेशी'चा उगम झाला. इंग्रज जुलूमजबरदस्ती तर करत नाही? त्याचा माल आपल्याला घ्यायला भाग तर पाडत नाही? मग दीनातल्या दीन प्रजेला निदान त्याचा विकत न घेण्याचे व्रत तर पाळता येईल? स्वदेशी चळवळीची थोडक्यात भूमिका अशी होती.

**स्वदेशी-विदेशी स्पष्ट भेद**

स्वदेशी आंदोलनाच्या अंमलबजावणीतही काही फारशा व्यावहारिक अडचणी आल्या नाहीत. स्वदेशी माल कोणता आणि विदेशी कोणता असा फरक करणे स्वदेशी चळवळीच्या काळात तरी फारसे कठीण नव्हते. जसजसा काळ गेला तसतसे ते अधिकाधिक कठीण होत गेले. आणि दुसऱ्या महायुद्धानंतर स्वदेशी-विदेशीतील सरहद्द रेषा खूपच अस्पष्ट, धूसर होत गेली.

पण स्वदेशी आंदोलनाच्या ऐन भरात ही अडचण फारशी जाणवत नव्हती. उभ्या देशात कारखाने तुरळक. जमसामान्यांच्या दैनंदिन जीवनातल्या बहुतेक गरजा कारखान्याच्या मालाला स्पर्श केल्याखेरीज पुर्ण होऊ शकत असत. गिरणी मुंबईला पण गिरणीतली यंत्रं परदेशात तयार झालेली. कापूस इथल्या काळ्या आईनं दिलेला पण वस्त्राची वीण विलायती. मग गिरणीचे कापड स्वदेशी का विदेशी असा सरहद्दीचा प्रश्न फारसा काही जाचक ठरला नाही. देशात साखरेचे कारखाने सुरू झाले तरी स्वदेशीवाले निष्ठेने गुळावरच भक्ती ठेवून राहिले. त्यानेही 'स्वेदशी'ला फारशी काही बाधा पोहोचली नाही.

**आता स्वदेशी काय उरले?**

१९९० दशकाच्या परिस्थितीत स्वदेशी विदेशी असा पंक्तिप्रपंच करणे अत्यंत जिकिरीचे होईल. किंबहुना, असा फरक करण्याचा प्रयत्न कोणी फारसा करीतही नाही. परदेशातून परत येताना बरोबर आणलेला किंवा येन केन प्रकारेण हस्तगत केलेला 'इम्पोर्टेड' माल एका बाजूला आणि बाकी सगळा 'देशी'. स्वदेशी-विदेशी हा संदर्भ संपला आणि 'इंम्पोर्टेड'-देशी असा नवा संदर्भ सुरू झाला.

'देशी' शब्दात स्वदेशीचे वलय नाही, अभिमान नाही. उलट, देशी म्हणजे गचाळ, कमी प्रतीचा, बेभरवशाचा माल अशी जुगुत्सा.

बलुतेदारी आणि गावातली कारागिरी आता संपुष्टात आली आहे. जे काय बनते ते छोट्या कारखान्यात नाहीतर मोठ्या कारखान्यात. सर्व कारखान्यांतील यंत्रांची रचना विलायती प्रतिभेतून निघालेली. तंत्रज्ञान विलायती, मग यंत्रांची बांधणी भली देशी भूपृष्ठावर झालेली असो. नित्यनियमाच्या वापरातील अनेक वस्तू तयार करण्याकरिता लागणारा कच्चा मालही विलायती, तयार करणारी माणसे विलायती वेश-भाषा-संस्कृतीच्या जवळात जवळ जाण्याची धडपड करणारी. शक्य असते तर एखादे मलम लावून त्यांनी स्वतःला शुभ्रकायदेखील बनवून घेतले असते! काळ्या इंग्रजाची कारखानदारी म्हणजे आता स्वदेशी ठरली.

**इंग्लंडची 'स्वदेशी'**

आजच्या परिस्थितीत विदेशी-स्वदेशी असा फरक करणे शक्यही नाही आणि म्हटले तर, आवश्यकताही नाही. इंग्रजाला काटशह म्हणून स्वदेशी आंदोलन उभे राहिले. हे हिंदुस्थानातच घडले असे नाही तर जगभर अनेक देशांत हेच घडले आहे. इंग्लंड देश औद्योगिक क्रांतीच्या आधी 'स्वदेशी'चा मोठा पुरस्कर्ता होता. जर्मनीसारख्या पुढारलेल्या देशांनी इंग्लंडच्या बाजारपेठा व्यापून टाकल्या तर इंग्रज व्यापारी आणि कामगार यांच्यावर कठीण अवस्था गुदरेल म्हणून परदेशी माल येऊ देऊच नये अशी मागणी इंग्लंडमधील, मुख्यतः व्यापाऱ्यांनी केली. इंग्लंडमधील स्वदेशी चळवळीचे नावच मुळी 'व्यापारीवाद' (Mercantilism) असे होते. हळूहळू परिस्थिती बदलली. जेम्स् वॅटने वाफेचे इंजिन काढले आणि इंग्लंड झपाट्याने जर्मनी, फ्रान्स इत्यादी देशांना मागे टाकून दळणवळण आणि उद्योगक्षेत्रात पुढे सरसावला. आता परिस्थिती बदलली. परदेशी माल इंग्लंडच्या बाजारपेठेत उतरेल आणि देशी मालाला हटवेल ही शक्यता आणि भीती उरलीच नाही. उलट, इंग्लिश कारखान्यांत तयार होणारा माल इतर देशांत कसा पाठविता येईल याची चिंता व्यापाऱ्यांना पडली. जो तो देश व्यापारवादी बनला होता; आपल्याला देशाचे दरवाजे बंद करून परदेशी माल रोखून ठेवू पाहत होता. अनेक तटबंद्यांनी तुकडे तुकडे झालेल्या या जगात औद्योगिक क्रांतीतून निर्माण झालेल्या मालाचे ओघ अनिर्बंधपणे वाहायचे कसे? व्यापारवाद फेकून देऊन खुल्या बाजारपेठेचे तत्त्वज्ञान या काळात इंग्लंडमध्ये ॲडम स्मिथने मांडले आणि एका नव्या युगाला सुरुवात झाली.

**आर्थिक हितसंबंधांनी तत्त्वज्ञान ठरते**

'स्वदेशी' का वैश्विकता? यांच्यातील निवड ही काही तात्त्विक, नैतिक आधारांनी होत नाही. प्रत्येक समाजाच्या कालपरिस्थितीनुरूप हितसंबंधांच्या जोपासनेकरता ही निवड होते. व्यापारवादाचा पुरस्कार करणाऱ्या इंग्लंडने खुल्या बाजारपेठेचे तत्त्वज्ञान स्वीकारले कारण इंग्लंडचा स्वार्थ बदलला. गांधीयुगात स्वदेशी हा भारतीयांच्या हितसंबंधाचा कार्यक्रम. कारण, इंग्रजी कारखानदारी मालापुढे टिकाव धरेल अशी काही उत्पादक यंत्रणाच आमच्याकडे उरली नव्हती. थोडक्यात, बाजारपेठेत स्पर्धा करण्याची ज्यांची ताकद ते हिरीरीने खुल्या बाजारपेठेचा उद्‌घोष करतात आणि ज्यांचा माल महागडा आणि गचाळ ते कृत्रिम संरक्षणाच्या भिंतीआड दडू पाहतात.

**कालामागून फरफटणारे शिलेदार**

स्वदेशीची चळवळ होऊन गेली. काही जणांच्या बुद्धीत प्रकाश पडायला वेळ लागतो. अशांची बुद्धी कायम गतकालातच वावरत असते. शिवाजी महाराज गेले, गडकिल्ल्यांचे राजकारण संपले, रणदुल्लाखान इतिहासजमा झाले. तरीही इतिहासात रममाण होणारी माणसे अबलख घोड्यावर स्वार होऊन, जिरेटोप-चिलखत घालून, तलवारीच्या धारेवर पंचप्राण लावून दिग्विजय करण्याची स्वप्ने पाहत राहातात. अशा शिलेदारांचे मानसपितर जेव्हा लढायांच्या धुमश्चक्रया चालू होत्या तेव्हा घरोघर कुणगीआड लपले होते अथवा सुलतानांपुढे कुर्निसात घालत होते. स्वदेशीच्या कालखंडात विलायतीचा टेंभा मिरविणाऱ्यांचे ध्वज आता एकदम स्वदेशीकरिता फडफडू लागले ही काय गंमत आहे?

**शेतकऱ्याचा गळा घोटणारी 'स्वदेशी'**

आजच्या स्वदेशी चळवळीत शेतकऱ्यांना काहीही स्वारस्य नाही. स्वदेशीची घोषणा म्हणजे परदेशी माल आपल्या देशात येण्यापासून रोखणे एवढेच नाही. इतर देशांतील लोकांचे हात काही केळी खायला जाणार नाहीत. तुम्ही त्यांचा माल येऊ देत नाही तर ते तुमचा माल येऊ देणार नाहीत. अशा छिन्नभिन्न झालेल्या अर्थव्यवस्थेत आज शेतकऱ्यांना काहीही स्वारस्य नाही. पिढ्यान्‌पिढ्या जमीन वाटत गेली. शेतीवर भांडवली साधने फारशी उभी राहिलीच नाहीत. तरी देखील भारतीय शेतकरी आज परदेशी बाजारपेठेत उतरून स्वतःच्या ताकदीवर उभा राहू शकतो. आंतराष्ट्रीय खुल्या बाजारपेठेत आडवा घातलेला कोणताही अडसर शेतकरीहिताविरोधी आहे. नवीन स्वदेशी आंदोलनाचा उद्‌गाता शेतकरी नाही हे नक्की.

### या ‘स्वदेशी’चे बोलविते धनी

या आंदोलनाचा बोलविता धनी कोण आहे हेही उघड आहे. स्वातंत्र्यापासूनच्या अर्धशतकात लायसन्स-परमिटचे डावपेच खेळून मक्तेदारी मिळविलेले कारखानदार हे या आंदोलनाचे सूत्रधार आहेत. यांनी तंत्रज्ञान आयात केले ते त्यावेळीही कालबाह्य झालेले. यंत्रसामुग्री आणली आडगिऱ्हाईकी. मालाचे नकाशे परदेशी, जुनाट. कारखान्यात काम करणारे अधिकारी काळ्या इंग्रजाच्या पिंडाचे, परभृत बुद्धीचे. त्यांचे कामगार इतके गदळ की त्यांच्या माफक रोजगारीतही महाग पडावेत. यांचा माल घेणार कोण? एतद्देशीय गिऱ्हाईकांना बिचाऱ्यांना काही पर्यायच नाही म्हणून त्यांचा माल खरीदावा लागतो. या काळ्या इंग्रजाला स्वदेशीच्या संरक्षणाची पहिल्यापासूनच गरज होती. नेहरू कालखंडात लायसन्स-परमिट पद्धतीमुळे त्यांना संरक्षण मिळाले. ती व्यवस्था कोसळल्यानंतर आता त्यांना काही नव्या सोंगाची गरज आहे. म्हणून शास्त्रविज्ञानाचा उद्घोष करणारे हे कारखानदार आता स्वदेशीची चाल खेळू लागले आहेत.

हा सगळा प्रकार भयानक नसता तर चेष्टेचा विषय झाला असता. स्वदेशीचा कालखंड संपला. इम्पोर्टेड आणि देशीच्या जमान्यात स्वदेशी चळवळीत अर्थ असता तरी व्यवहार्यता नाही. आणि प्रत्यक्षात देशातील बहुसंख्य कष्टकरी-शेतकऱ्यांच्या व्यापारावरील सर्व निर्बंध उठविण्यात पहाट आहे आणि तरीही नाकाला तिसऱ्यांदा घाण लावून घेण्याकरिता हिंदुत्ववादी सरसावले आहेत.

त्यांच्या आंदोलनात अर्थ नाही, स्वार्थ नाही आणि स्वाभिमान किंवा निष्ठाही नाही. आर्थिक, औद्योगिक, व्यापारी, शैक्षणिक, सांस्कृतिक सर्व क्षेत्रांतील शतकाशतकांची परभृतता एकदाची संपवून टाकून स्वयंभू समाज उभा राहावा अशी यांची दृष्टी नाही. परकियांच्या विज्ञानावर, प्रतिभेवर देशी बाजारपेठेत अंमल बसविण्याची यांची क्षुद्र महत्त्वाकांक्षा आहे. यांना परदेशी माल नको, पण परदेशी तंत्रज्ञान आणि विज्ञान मात्र आयते, वाढून समोर येणे आपला हक्क आहे असे ते मानतात. बौद्धिक मालमत्तेच्या हक्कासंबंधी या ‘स्वदेशी’ मंडळींची जी भूमिका आहे ती पाहिली म्हणजे त्यांचे ढोंग स्पष्ट होते.

(अपूर्ण)

*(६ ऑगस्ट १९९२)*

◆◆

# दुसरे गणराज्य की यादवी?

बाबर हिंदुस्थानात आला आणि पहिल्या लढाईत दहा बारा तोफांचे आवाज काढून त्याने विजय मिळवला, तेथपासून इतिहासाचा एक नवा कालखंड सुरू झाला. योगायोग असा की, त्याच बाबराच्या नावाने उभी असलेली मशीद पडली आणि त्याबरोबरच आणखी एक कालखंड संपला आणि दुसरा नवा सुरू झाला.

हा जो कालखंड संपला तो बाबराचा नव्हता. बाबराने सुरू केलेला कालखंड मुसलमानी बादशहीबरोबर केव्हाच संपला. त्यानंतर एक अंदाधुंदीचा कालखंड येऊन गेला. त्यानंतर इंग्रजी साम्राज्याचा आला. या साम्राज्याला विरोध करण्याठी महात्मा गांधींच्या नेतृत्वाखाली एक आंदोलन उभे राहिले, तो एक वेगळा गांधी कालखंड आणि स्वातंत्र्यानंतर गेली ४६ वर्षे चालू होता नेहरू कालखंड.

बाबरी मशिदीबरोबर संपला तो नेहरू कालखंड. सुरू होतो तो कालखंड कुणाचा? देशातील जनतेचे दुर्भाग्य संपले असेल तर 'बळीचे राज्य' येईल आणि बळीराजाचा कालखंड चालू होईल; दुर्भाग्याचा फेरा संपला नसेल तर उभ्या देशात यादवी युद्ध माजेल आणि काही वर्षांपूर्वी पंजाबमध्ये जशी स्थिती होती तशीच साऱ्या देशभर होण्याचा धोका आहे.

बाबरी मशिदीच्या पतनाचा एक मोठा व्यापक अर्थ आहे. तो अर्थ बहुतेकांना अजून स्पष्ट झालेला नाही. बाबरी मशिदीचा वाद म्हणजे शासन करीत असलेल्या मुसलमानांच्या अनुनयाविरुद्धची सर्वसामान्य हिंदू प्रतिक्रिया आहे असे म्हणणे अर्ध्यापेक्षाही कमी सत्य आहे. हिंदू-मुसलमानांमधील तेढ महात्मा गांधीचे रक्त वाहिले त्यामुळे थोडी शमल्यासारखी दिसली. आता हा वणवा पुन्हा एकदा पेटला आहे असा सध्याच्या घटनांचा अर्थ लावणे हे तर चतकोरसुद्धा सत्य नाही.

बाबरी मशीद पडणे, त्यानंतर देशभर दंगली उसळणे, पाच जातीय संघटनांवर

बंदी येणे, चार राज्यांतील भारतीय जनता पार्टीची सरकारे बरखास्त होणे, मशीद-मंदिर यासंबंधी कोर्टात वाद होणे, दर्शन का नमाज असा वाद चिघळणे एवढ्यापुरते बाबरी मशीद प्रकरण मर्यादित नाही.

बाकी सगळे काही ठीक आहे, एवढे अयोध्या प्रकरण घडले नसते तर सर्व काही 'अलबेल' आहे असे समजणे घातक होईल. अशा कोणत्या समजुतीने सध्याच्या परिस्थितीतून मार्ग काढण्याचा प्रयत्न केला गेला तर त्यातून हाती काहीच यायचे नाही.

आणि तरीदेखील देशातील वेगवेगळया पक्षांचे वरिष्ठ नेते या प्रश्नावर थातूरमातूर जुजबी मलमपट्टी करून वेळ निभावून नेऊ पाहताहेत.

काँग्रेस सरकारने अयोध्या प्रश्नावर वर्षानुवर्षे चालढकल केली. नेहरू पंतप्रधान असताना आणि गोविंद वल्लभ पंत उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री असताना या प्रश्नाचा काटा अलगद काढता आला असता. त्यांना काटा काढणे जमले नाही, आता त्याचा नायटा झाला आणि सगळया शरीरातील रक्त नासण्याचा धोका उद्‌भवला. केवळ मते मिळण्याच्या लोभाने राजीव गांधींनी शहाबानो प्रकरणी मुल्लामौलवींच्या दाढीला हात लावला आणि ती चूक निस्तरण्यासाठी रामलल्लाच्या दर्शनाकरिता बाबरी मशीद खुली केली. आग्यावेताळ एकदा जागा झाला, मग त्याला आटोक्यात आणि कोणालाच जमले नाही. विश्वनाथ प्रताप सिंग, चंद्रशेखर, नरसिंहराव यांची सरकारे म्हणजे तुलनेने काड्यामोड्याची घोडीच. नेहरू व राजीव गांधी यांच्या बलवान आणि सामर्थ्यशाली सरकारांना जे जमले नाही ते या काडी पहेलवानांना काय जमणार? दोन्ही जमातींनी समझोत्याने प्रश्न सोडवावा, ते नच जमल्यास न्यायालयाचा निर्णय मानावा असा भोंगळ पवित्रा घेत त्यांनी वर्षानुवर्षे फुकट घालवली आणि या सगळया काळात आग्यावेताळ विक्राळ बनत गेला. भारतीय जनता पार्टी, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, विश्व हिंदू परिषद, बजरंग दल, शिवसेना असे चढत्या भाजणीने जातीयवादी आणि गुणाकार श्रेणीने पुंड मोर्चे बांधले गेले. मुसलमान समाजाच्या नेत्यांनाही जातीय तेढ वाढू देण्यातच स्वारस्य असल्यामुळे त्यांनीही पुंडपणात आपण 'कुछ कम नहीं' असे दाखवायला सुरुवात केली.

या अशा परिस्थितीत मशीद पडली. मशीदीला धक्का लागू देणार नाही अशा गर्जना प्रधानमंत्र्यांनी केल्या, गृहमंत्र्यांनी केल्या, उत्तर प्रदेशच्या मुख्यमंत्र्यांनी मशीदीच्या संरक्षणाची हमी घेतली; तरीही मशीद पडली. सगळी न्यायव्यवस्था म्हणजे निव्वळ बजबजपुरीचा इमला आहे हे आणखी एकदा स्पष्ट झाले.

देशातील सर्वोच्च न्यायालय अयोध्येच्या प्रांगणात एक निरीक्षक नेमून स्वस्थ बसले. मूळ जमिनीचा वाद तर सोडाच; पण सरकारी भूमीसंपादनाबद्दलही निर्णय चटकन देणे न्यायालयांना जमले नाही आणि मशीद पडली. अयोध्येत पोलिसांच्या, राखीव दलांच्या, सरहद्द शिपायांच्या आणि अगदी सैन्याच्या तुकड्याही सज्ज होत्या, त्यांनी मशीद पाडली जात असताना डोळे भरून पाहिली. दरोडेखोर लूटमार करून निघून गेले म्हणजे पोलिस हजर होतात तसे केंद्र शासनाचे दल मशीद जमीनदोस्त होऊन त्याजागी तात्पुरते मंदिर उभे राहित्यानंतर 'लेफ्ट राइट' करत आले.

अयोध्येचा मामला हा काही धार्मिक वाद नाही. अयोध्येत ६ डिसेंबरला जे घडले त्याने एका क्षणात भारतीय संघराज्याची दिवाळखोरी स्पष्ट केली. रावणाचे अनेक अपराध असतील; पण त्याने सीतेचे अपहरण केले आणि महाबलाढ्य रावणाचे राज्य संपले. दुर्योधनाच्या पापांचा घडा त्याने द्रौपदीच्या वस्त्रांना हात घालताच भरला. तशीच कथा अयोध्येची आहे. नेहरू जमान्यातल्या भारतीय संघराज्याच्या डोलाऱ्याला जागोजाग चिरा पडतच होत्या; अयोध्येतील एक घटनेने ही इमारत आता उभी राहणे शक्य नाही हे स्पष्ट झाले. बाबरी मशीद पडण्याचा खरा अर्थ, देशातील एकही संस्था मजबूत नाही, कार्यक्षम नाही असा आहे. पुढारी सत्तेच्या लोभाने पिसाट झाले आहेत, सरकारच्या हाती जास्तीत जास्त सत्ता असावी आणि ते सरकार आपल्या हाती असावे, त्यासाठी कोट्यवधी रुपयांचे निधी उभे करावेत, सरकारी खरेदीवर कमिशन खावे जाती-जातीत, धर्मा-धर्मात भांडणे लावावीत, विरोधकांची सरकारे टिकू देऊ नयेत, जरूर तर न्यायसत्ता धुडकावून लावावी, आणीबाणी लादावी, हजारोंना तुरुंगात डांबावे, भूखंड खावे, गुंड-माफियांशी दोस्ती करावी; पण सत्तेचा शोध घ्यावा असल्या 'बोफोर्स' राजकारणाने भारतीय संघराज्य तुटून पडले आहे.

वर्षानुवर्षे खटले रेंगाळत पडले आहेत. गरिबांबर अन्याय होतो म्हणून ते धाय मोकलून रडत आहेत. पैसेवाले भारी वकील देऊन एका कोर्टातून दुसऱ्या कोर्टात जात जात त्यांच्या बाजूचा निर्णय होईपर्यंत न्यायव्यवस्था थकवून टाकत आहेत. न्यायाधिशांच्या भ्रष्टाचारांविरुद्ध वकीलच आरडाओरडा करू लागतात. सर्वोच्च न्यायालयाचे न्यायामूर्तीही खुलेआम भ्रष्टाचार करतात. असल्या या 'राममूर्ती' न्यायव्यवस्थेवरचा लोकांचा विश्वास उडाला आहे.

नोकरशाही तर पहिल्यापासूनच जनतेला लुटायला वखवखलेली. इंग्रजांनी घालून दिलेल्या सनदी नोकरशाहीची शिस्त संपली. नेहरूव्यवस्थेत सरकारी

लायसेन्स, परमिट खेरीज कुणाचे पान हलेनासे झाले; त्यामुळे तर नोकरशाही म्हणजे भ्रष्टाचार असे समीकरण बनून गेले.

ताठ मानेने, अभिमानाने, आपापले काम चोख करणाऱ्या संस्था नेहरू जमान्यात सगळ्या संपून गेल्या. राज्यांचे मुख्यमंत्री पंतप्रधानांना कुर्निसाताचा रतीब घालू लागले. विश्वविद्यालयातील विद्वान, प्रयोगशाळेतील संशोधक, कलावंत, साहित्यिक सगळ्यांच्या तोंडात सरकारी लगाम बसले. या सगळ्या संस्थांचा नादानपणा अयोध्येत स्पष्ट झाला आणि त्याच दिवशी भारताचे पहिले गणराज्य संपले.

आता कितीही प्रयत्न केले तरी हे गणराज्य सावरणे शक्य नाही.

नरसिंहराव सरकार अजूनही अयोध्या म्हणजे न्यायालयाने सोडवायचा प्रश्न आहे अशाच समजुतीत वागत आहे. सगळ्या प्रश्नावर त्यांनी काय तोडगा काढला ते पाहिले म्हणजे हसावे की रडावे समजत नाही. त्यांचा तोडगा काय, तर सर्वोच्च न्यायालयाने बाबरी मशीदीच्या जागी पूर्वी एक देवालय होते की नाही या प्रश्नाचा निर्णय द्यावा; देवालय होते असे ठरले तर त्याजागी राममंदिर बांधले जाईल आणि मशीद दूर थोड्या अंतरावर पुन्हा बांधली जाईल. बाबरी मशीद मुळात देवालय नष्ट करून बांधलेली नाही असे सिद्ध झाले तर मशीद तिच्या मूळ जागीच पुन्हा बांधली जाईल आणि राममंदिर शेजारीच म्हणजे शीलान्यासाच्या जागी बांधले जाईल.

हा तोडगा शोधून काढणाऱ्याा यंदाचे विदूषक पारितोषिक द्यायला हवे! मशीदीच्या जागी देऊळ होते किंवा नाही हे ठरवणे काय कोर्टाचा विषय आहे? हा विषय आहे इतिहासकारांचा, पुराणशास्त्रविद्येचा, शिल्पविद्येचा. हा सगळ्या क्षेत्रांतील विद्वानांना गेल्या ४० वर्षांत काहीही निष्कर्ष काढता आला नाही, तर सर्वोच्च न्यायालय आता न्यायदान जमेना तेव्हा या क्षेत्रात घुसून काही पराक्रम गाजवणार आहे का काय?

समजा, सर्वोच्च न्यायालयाने ही जबाबदारी स्वीकारलीच आणि निर्णय दिला, तर त्यातून निष्पन्न काय होणार? मूळ जागी देवालय होते असे ठरले तरी कठमुल्ला मुसलमान निमूटपणे बाजूला होतील हे काही फारसे शक्य नाही. ते निवाड्याविरुद्ध आरडाओडा करतील आणि निदान राजकीय पातळीवर फेरविचार व्हावा म्हणून आग्रह धरतीलच धरतील. मशीदीच्या जागी राममंदिर होते असे ठरले आणि मशीदीच्या जागी नव्याने देऊळ बांधले म्हणजे महंतांचे आखाडे संतोष पावणार आहेत असेही नाही. अयोध्येनंतर मथुरा, काशी, द्वारका इतकेच काय दिल्लीच्या जामा मशीदीचा प्रश्न लढवण्यासाठी अनेक भगवे महंत

मंचाच्या 'विंगेत' वाट पाहत उभे आहेत. याउलट, मशीदीच्या जागी देऊळ कधी नव्हतेच असा निर्णय सर्वोच्च न्यायालयाने दिला तर निष्पन्न काय होणार आहे? महिन्यापूर्वी तेथे बांधलेले रामलल्लाचे जुजबी देऊळ तेथून दूर करण्यास कोण धजावणार आहे? आणि त्या जागी पुन्हा मशीद बांधायची म्हटली तर ते कितपत शक्य आहे?

न्यायालयाकडे प्रश्न सोपवण्याची सरकारी योजना म्हणजे ओली पडो की सुकी पडो देशात यादवी निश्चित घडवून आणणारे आहे. न्यायालयाने आपल्या नेहमीच्या पद्धतीने वर्षानुवर्षे प्रकरण दप्तरदाखल ठेवले तरीही प्रश्न सुटणार नाही. जातीय तेढीची आणि वणव्याची आग धुमसतच राहील. कोठेही, कधीही ती भडकत राहील.

सध्याच्या परिस्थितीवर भारतीय जनता पार्टीचा तोडगा असा की, तातडीने सार्वत्रिक निवडणुका घ्याव्यात. ही योजना पक्षाच्या दृष्टीने धूर्तपणाची आणि हुशारीची असेल; पण देशाला धोक्यात टाकणारी आहे. निवडणूकीत भारतीय जनता पार्टी हरली तर अयोध्या आणि अयोध्येसारखे प्रश्न पुन्हा हाती घेणार नाही अशी काही त्यांची तयारी नाही. निवडणुका हरल्या तरी अयोध्या प्रश्न ते पेटवत राहणारच. त्यांनी नाही पेटवला तर दुसरे आगलावे काही कमी नाहीत. भारतीय जनता पार्टी निवडणूक जिंकून आली तर कित्येक वर्षे मशीदींच्या जागी मंदिरे बांधणे हा एककलमी कार्यक्रम त्यांना राबवावा लागेल. अयोध्येत राममंदिर झाले आता आम्ही थांबतो, असे म्हटल्याने फरक पडणार नाही. इतर धर्मनिष्ठ पुढे होतील आणि पांच दहा वर्षांत सत्तेवर भारतीय जनता पार्टी आणि विरोधी पक्षात बजरंग दल आणि शिवसेना असे चित्र उभे राहील.

सुदैव म्हणा दुर्दैव म्हणा, यादवी युद्धाची ही सगळी चित्रे प्रत्यक्षात अवतरणार नाहीत. कारण, त्याआधीच आर्थिक संकटाने देशाचा घास घेतलेला असेल. यादवी युद्ध चालू राहिले आणि मुसलमान देशांपैकी फक्त निम्मे देश शत्रू बनले तर आर्थिक संकट आजच्यापेक्षांही कठीण होईल. जागोजाग वारंवार दंगे उसळू लागले तर उद्योगधंद्यांचे नुकसान होईल. शेतकरी अडचणीत सापडेल, व्यापारउदीम थंडावेल, आयातनिर्यात संपून जाईल आणि परदेशी भांडवल नव्याने देशात उतरणार नाही, असलेले भांडवलसुद्धा देश सोडून निघून जाऊ लागेल.

नेहरूजमान्यात पुढारी, नोकरदार, न्यायाधीश, संरक्षक दले या सगळयांचे अध:पतन झाले; पण या सगळया अध:पतनाचे मुख्य कारण म्हणजे नेहरू अर्थव्यवस्था आहे. सगळे राजकारण सत्तापिपासू बनले याचे कारण काय?

सत्ता हाती टिकवण्यासाठी काय वाटेल ते वेडाचार आणि क्रूरकृत्ये काँग्रेसवाल्यांनी का केली? सत्ता टिकवण्यासाठी चक्क घराणेशाहीला उत्तेजन काँग्रेसवाल्यांनी का दिले? आणि नेहरू घराणेशाहीला उत्तर म्हणून रघुवंशाचा उपयोग करण्याचा अभद्र आणि देशघातक मोह स्वतःला राष्ट्रवादी म्हणवणाऱ्या भारतीय जनता पार्टीला का झाला?

या प्रश्नांचे उत्तर सरळ आहे. नेहरूव्यवस्थेचा शेवटी परिणाम काय झाला? जो जो म्हणून कष्ट करतो, उत्पादन करतो, त्याला आयुष्यात वर चढण्याची आशा नाही; पण ज्याच्या हाती सत्तेचा जादूचा दिवा लागतो त्याच्यापुढे सर्व सुखसाधने हात जोडून उभी राहतात. ही नेहरू व्यवस्थेची निष्पत्ती आहे. सत्ता असली तर पैसा आहे. भोवती सलाम घालणारे लोक आहेत. सत्तेच्या मंत्राने सर्व दरवाजे उघडतात. जमिनी बळकावता येतात, बांधकामे करता येतात. साधे रेल्वेचे तिकीटसुद्धा सत्तेशिवाय मिळत नाही अशी परिस्थिती उद्भवली आहे.

जोपर्यंत सत्ता इतकी मादक आणि मोहक आहे तोपर्यंत तिला लालचावलेले मतिभ्रष्ट काय पाहिजे तो आणि नको तो पागलपणा करणार आहेत. त्यांनी केलेल्या पागलपणाचा एक एक विषय सोडवू म्हटल्याने सुटणार नाही. एक निरगाठ सुटली तर दुसरी महागाठ पुढे येईल. कारण सत्ता मिळवण्यासाठी जातीचे, भाषेचे, धर्माचे, प्रदेशांचे राक्षस उभे करणे हा किफायतशीर धंदा होतो.

याला उपाय एकच आहे. सत्ता ही अनाकर्षक बनली पाहिजे. सत्ता हाती आली सगळे काही मिळते आणि इतिहासात नावही होते ही कल्पना संपली ही अयोध्येसारखे प्रश्न उभे करणे थांबेल.

नेहरूंनी सर्वभक्ष्यी सरकार उभे केले. या खादाड महाराक्षसाच्या पोटातून त्याच्या बळींची सुटका केली पाहिजे.

सरकार कशाला लागते? सज्जन, सुसंस्कृत समाजातही थोडेफार दुष्ट प्रवृत्तीचे लोक असतात आणि शेजारच्या शत्रूंची देशावर वाईट नजर असतेच; तेव्हा कायदा आणि सुव्यवस्था तसेच शत्रूपासून संरक्षण अशा संकटकालीन कामाकरिता सरकारची गरज आहेच. सरकार अजिबात संपणार नाही; पण सरकारची जागा शौचकूपासारखी आहे. त्या कामांना दिवाणखान्यात जागा असता कामा नये.

अर्थव्यवस्था तर सरकारी राक्षसाच्या जबड्यातून सोडवलीच पाहिजे. अर्थव्यवस्था खुली झाली; कष्टकरी, उत्पादक हे जर माणूस म्हणून सन्मानाने जगू शकले तर पुढाऱ्यांना कोण धूप घालणार आहे?

न्यायमूर्ती, साहित्यिक, कलाकार, विद्वान यांनायुद्धा सरकारी मगरमिठीतून सोडवून मोकळे केले पाहिजे. त्यांनी आपापल्या स्वायत्त संस्था उभारल्या पाहिजेत. पदवी परीक्षेत कॉपी करताना पकडले गेलेले पोरगे मंत्री झाले म्हणून त्यांच्यापुढे महामहोपाध्याय कंबरेत वाकून नतस्तक होत आहेत अशी व्यवस्था संपली पाहिजे.

गरिबांचे कल्याण करण्याचा सरकारचा खटाटोप गेली ५० वर्षे चालला आहे. गरीब गरीबच राहिले, पुढारी मात्र गब्बर झाले. गरिबांच्या कल्याणाच्या नावाखाली अर्थव्यवस्थेचा ताबा ठेवण्याचा डाव संपला पाहिजे. गरिबांचे काही भले करणारी एक झाली, तिचे नांव अहिल्याबाई होळकर, दीनदुबळ्या अपंगांचे पालन, संगोपन करणे, दुखणाईतांवर औषधोपचार करणे हे काम पुढाऱ्यांचे नाही, हे काम करुणेने करायचे आहे. खऱ्याखुऱ्या धर्मभावनेने प्रेरलेल्या लोकांचे हे काम आहे. ते धर्मसंस्थांकडेच राहिले पाहिजे.

भारताचे पहिले गणराज्य कोसळले आहे. दुसरे गणराज्य उभे करणे आवश्यक आहे. त्याकरिता सध्याची घटना आणि राज्यपद्धती टाकून द्यावी लागेल. सर्वंकष सत्ता केंद्रित करण्याची कल्पना सोडून मानवी जीवनातील वेगवेगळ्या पैलूंकरिता स्वतंत्र स्वायत्त संस्था आपोआप उभ्या राहू लागतील. सत्तेचा जादूचा दिवा अशी गोष्टच राहणार नाही आणि त्या जादूच्या दिव्याच्या प्राप्तीकरिता चाललेले राक्षस, हडळ, खवीस आणि ब्रह्मसमंध यांचे अमानुष खेळ बंद पडतील.

*(२१ जानेवारी १९९३)*

◆◆

# आता लोकांनीच सरकारला शिस्त लावावी

५ एप्रिल १९९३ च्या राष्ट्रीय विकास परिषदेच्या बैठकीत बोलताना पंतप्रधानांनी नोकरशाहीची राष्ट्रावरील मगरमिठी किती भयानक झाली आहे याचा कबुलीजबाब दिला.

''सार्वजनिक क्षेत्रासाठीच्या योजना-आराखड्याचा दहा टक्के हिस्सा नोकरदारांच्या महागाई भत्त्यासाठी खर्च होतो, ही कल्पनाही मला पटत नाही. हे सगळे गांगरून जाण्यासारखेच आहे. हे चालूच राहिले तर योजनाकाळात भरभराटीची काही शक्यता आहे असे मला वाटत नाही.''

''आपला योजनाबाह्य खर्च ज्या रीतीने वाढतो आहे ते पाहता, उपलब्ध साधनसामग्रीचा वापर फक्त सरकारी कर्मचाऱ्यांना पगार देण्यासाठीच करावा लागेल; लोक ते मान्य करणार नाहीत.''

''काही राज्यांपुढे सरकारी कर्मचाऱ्यांचे पगार देण्यासाठी पैसा कोठून आणायचा हा प्रश्न आहे. आपल्यापुढे अशी भयानक स्थिती असताना ही राज्ये आणि हा देश प्रगती कसा करणार, भरभराट कशी होणार हे खरेच मला कळत नाही.''

ही अवतरणे कोणा विरोधी पक्ष नेत्याची नाहीत. खुद्द पंतप्रधानांच्या भाषणातील आहेत. व्यापारमंत्री प्रणव मुखर्जी यांनीही नोकरदारांवरील अवास्तव खर्चामुळे उद्‌भवलेली परिस्थिती परखडपणे मांडली.

''आठव्या पंचवार्षिक योजनाकाळात केंद्र व राज्य सरकारांच्या कर्मचाऱ्यांच्या संख्येत किमान दहा टक्क्यांनी कपात करावी.''

''सरकारी कर्मचाऱ्यांना पगार देण्यासाठीच फक्त आपल्याकडे पैसा आहे; पण त्यांना काम करता यावे यासाठी पैसा नाही अशी स्थिती उद्‌भवेल.''

''महागाई भत्तात वाढीची पद्धत यापुढेही चालू ठेवली तर आठव्या पंचवार्षिक योजनेदरम्यान अतिरिक्त ४० हजार कोटी रुपयांचा बोजा पडेल.''

अगदी गळ्याशी आल्यानंतर का होईना पंतप्रधानांनी या प्रश्नावर इतक्या स्पष्टपणे बोलण्याची हिम्मत दाखवली याबद्दल त्यांचे कौतुक केले पाहिजे. योजनाबाह्य खर्चात कपात करण्यासाठी ओरिसाचे मुख्यमंत्री बिजू पटनाईक यांच्या नेतृत्वाखालील काटकसर समितीच्या अहवालाबाबत चर्चा चालू असताना पंतप्रधानांनी हे धाडस केले. खरे म्हटले तर या अहवालावर चर्चा करण्यासाठी राष्ट्रीय विकास परिषदेची बैठक सात महिन्यांपूर्वीच व्हायची होती; पण ती बैठक झालीच नाही. ती बैठक झाली असती आणि सरकारी नोकरदारांचा महागाई भत्ता रोखण्याचा निर्णय त्याचवेळी झाला असता तर महागाई भत्त्याचा एक हप्ता लगेचच थांबावावा लागला असता. महागाई भत्ता थांबवला गेला तर नोकरदारांत असंतोष वाढेल आणि सरकारी कामकाज चालविणे अशक्य होईल अशी स्पष्ट सूचना वरिष्ठ अधिकाऱ्यांनीच पंतप्रधानांना दिली होती. सरकारने कच खाल्ली आणि राष्ट्रीय विकास परिषदेची बैठकच रद्द केली.

सात महिन्यांनी सरकारने एक लहानसे पाऊल पुढे टाकले आहे. एवढा महत्त्वाचा निर्णय संबंधित लोकांना थोडा ओंजारून गोंजारून घ्यावा म्हणजे संघर्षाचा धोका कमी होईल अशी पंतप्रधानांची आखणी असावी. शरद पवार किंवा पश्चिम बंगालमधील कम्युनिस्ट पक्षाचे प्रतिनिधी यांनी महागाई भत्त्याच्या पद्धतीत कोणताही बदल करण्यास विरोध केला; पण, या दोघांच्या विरोधामुळे महागाई भत्ता रोखण्याचा प्रस्ताव स्थगित झाला हे फारसे संभाव्य वाटत नाही. संबंधितांशी विचारविनिमय, सल्लामसलत करून मगच निर्णय घ्यावा असे ठरले. सल्लामसलतीचा हा कार्यक्रम साधारणपणे तीन महिन्यांत आटोपेल असे व्यापारमंत्री प्रणव मुखर्जी यांनी जाहीर केले. म्हणजे, नजीकच्या भविष्यकाळात या प्रश्नाचा सोक्षमोक्ष लागणार असे दिसते.

शेतकरी संघटनेने नोकरदारांच्या डोईजड ओझ्याचा प्रश्न १९८९ साली नांदेडच्या अधिवेशनात उठवला. या विषयावर एक अधिकृत ठराव करून प्रशासकीय खर्च एकूण अंदाजपत्रकाच्या रकमेच्या २८ टक्क्यांपेक्षा जास्त नसावा अशी मागणी केली होती. सरकारी नोकरदारांनी पगारवाढ, भत्ते इत्यादीसाठी संप केला तर शेतकरी संघटना संपकरी नोकरदारांच्या जागी काम करण्यास पाहिजे तेवढे लायक उमेदवार पुरवील असेही संघटनेने जाहीर केले होते. पगार, भत्ते इत्यादींवरील खर्च नोकरदारांच्या एकूण बोजाचा एक लहान भाग आहे. भ्रष्टाचार इतका बोकाळला आहे की नोकरदारांचे वास्तविक उत्पन्न त्यांच्या अधिकृत मिळकतीपेक्षा कितीतरी पट जास्त असते. नोकरदारांचा हा खर्च शेतकरी, उद्योजक

इत्यादींच्या डोक्यावर पडतो आणि त्यामुळे भारतीय उद्योजकांना बाजारपेठेतील स्पर्धेत टिकणे अशक्य होते.

एवढा खर्च करून नोकरदारांमुळे आणि नोकरशाहीमुळे देशाचा काही फायदा होत असता, उत्पादनात काही वाढ होत असती तरी समजण्यासारखे आहे. राष्ट्रीय उत्पन्नातील नोकरदारांचा हातभार नगण्यच नव्हे तर ऋणात्मक आहे. उत्पादनाला हातभार लावण्याऐवजी नोकरदार मंडळी उत्पादकांच्या वाटेत अनंत अडचणी निर्माण करतात. आर्थिक अरिष्टात सापडलेल्या देशातील उत्पादनाला अडचणी निर्माण करण्याचे देशद्रोही कृत्य करणाऱ्यांवर सरकार आनंदाने अंदाजपत्रकाच्या रकमेपैकी ६५ ते ८० टक्के रक्कम खर्च करते ही परिस्थितीच महाभयानक आहे.

शेतकरी संघटनेने नोकरदारांच्या भ्रष्टाचाराविरुद्ध आवाज उठवला, आंदोलन चालवले. ३० जानेवारी १९९३ च्या सेवाग्रमच्या मेळाव्यात नोकरदारांवरील खर्च कमी करण्यासाठी एक कार्यक्रम सुचविला. हा कार्यक्रम ३१ मार्च १९९३ च्या दिल्ली येथील महामेळाव्यात पुन्हा एकदा देशातील सर्व शेतकऱ्यांच्या वतीने मान्य करण्यात आला. दिल्लीच्या मेळाव्यात आर्थिक मुक्तीसंबंधी एक व्यापक ठराव संमत करण्यात आला. त्यात व्यापार, निर्यात आणि उत्पादन यांवरील सर्व सरकारी निर्बंध हटवावे आणि नोकरशाहीवरील खर्चाची छाटणी करावी असे मत आग्रहाने मांडले.

महामेळाव्यानंतर पाचच दिवसांत खुद्द पंतप्रधानांच्या तोंडूनच नोकरदारांच्या प्रश्नाचे विक्राळ स्वरूप स्पष्ट झाले. पंतप्रधानांनी हा प्रश्न जितक्या परखडपणाने मांडला त्यापेक्षा अधिक कोणी मांडू शकेल असे वाटत नाही. नेहरूव्यवस्थेत नोकरदारांचे प्रस्थ वाढणे अपरिहार्यच होते. नेहरू काळात अधिकाऱ्यांच्या हाती सत्ता आली. इंदिरा गांधींच्या काळापासून नोकरदारांचे पगार, भत्ते, सवलती, डामडौल यांच्यावरील खर्च वाढत गेला आणि आज अशी परिस्थिती निर्माण झाली आहे की सरकारी नोकरदारांची यंत्रणा काहीही काम न करता फक्त एकमेकांचे पगार-भत्ते 'काढण्या'चेच काम सर्वकाळ करते.

परिस्थिती इतकी पराकोटीची गंभीर झाली तरीही नोकरदारांच्या विरुद्ध जाऊन बोलण्याचे धाडस फारसे कोणी करणार नाही. महागाई भत्ता थांबविण्याच्या प्रस्तावास कम्युनिस्टांनी विरोध करावा हे समजण्यासारखे आहे. येत्या निवडणुकीत जिंकण्याची स्वप्ने पाहणाऱ्या भारतीय जनता पार्टीने प्रस्तावास विरोध करावा हेही समजण्यासारखे आहे. काही काळापूर्वी नोकरदारांचा कल प्रामुख्याने काँग्रेस

पक्षाकडे असे. पात्रता नसताना यश मिळालेली माणसे साहजिकच देवधर्मी बनतात या नियमाप्रमाणे नोकरदारात पूजापाठ करणाऱ्यांचे प्रमाण अतोनात वाढले आहे. ही नोकरदार मंडळी भाजपा, शिवसेना यांसारख्या पक्षांकडे झुकू लागली आहेत. तेव्हा, एरवी राष्ट्रवादाचा ढिंढोरा पिटणाऱ्या भाजपाने राष्ट्र बुडण्याची वेळ आली तरी नोकरदारांच्या भत्त्यांत कपात करण्याच्या प्रस्तावाला विरोध करावा हे समजण्यासारखं आहे.

कपातीचा प्रस्ताव शरद पवार यांनाही अनैतिक वाटतो. हल्ली शरदचंद्रावजी पवार नैतिकतेविषयी जरा जास्तच बोलतात. त्यांचे आणि पप्पू कलानी, हितेंद्र ठाकूर यांचे संबंध उजेडात आल्यापासून, त्यांच्या संबंधांतील गुंडांचा मुंबईच्या दंग्यात आणि बॉम्बस्फोटातही किती हात होता याची चर्चा सुरू झाल्यापासून आणि औरंगाबाद कोर्टाने निवडणुकीतील गैरप्रकाराबद्दल त्यांच्यावर ठपका ठेवल्यापासून भूखंडमहर्षी शरद पवार खूपच नीतिमान बनले आहेत. "अत्यावश्यक वस्तूंची भाववाढ थांबल्याखेरीज महागाई भत्त्याची पद्धत रद्द करणे अनैतिक आहे." असा त्यांना साक्षात्कार झाला आहे. ८८ कोटी लोकांच्या देशात फक्त दोन टक्के म्हणजे पावणेदोन कोटी नोकरदारांनाच वाढत्या महागाईपासून संरक्षण होण्यासाठी कवचकुंडले असण्यात काय नैतिकता आहे? वाढत्या महागाईच्या प्रमाणात शेतकऱ्यांनी भाववाढ मागितली तर त्याला विरोध करणारे शरद पवार नोकरदारांच्या संरक्षणासाठी इतक्या तत्परतेने का धावून आले?

इंदिरा गांधी, शरद पवार यांच्यासारख्या नेत्यांची नोकरदारांना खूष ठेवण्यामागची बुद्धी स्पष्ट आहे. वसंतदादा पाटील यांनी महाराष्ट्रातील नोकरदारांची काही पर्वा न करता ५२ दिवस संपाला तोंड दिले. मोडकळीस आलेल्या संपाच्या मागण्या शरद पवारांनी झटक्यात मान्य केल्या. सरकारी यंत्रणेचा उपयोग आपल्या पक्षाच्या आणि गोतावळ्याच्या सोयीकरिता करावयाचा असेल तर त्यासाठी नोकरदारांना खूष ठेवणे फार महत्त्वाचे असते. एखादासुद्धा नाखूष नोकर सगळे बिंग फोडण्याची शक्यता असते. त्यामुळे शरद पवारांसारखे कुशल प्रशासक नोकरदारांना सांभाळून घेणारच! त्यांच्या भूमिकेतील नैतिकता ही एवढीच आहे.

नोकरदारांमुळे देश बुडतो आहे. यावेळी जो नोकरदारांचे कौतुक चालवील त्याला देशबुडव्याच मानले पाहिजे. १ एप्रिल ९३ रोजी सरकारने नवीन आयात-निर्यात धोरण जाहीर केले आहे. शेतीमालाच्या निर्यातीवरील बंधने पुष्कळशी कमी केली आहेत. देशात तुटवडा असला तरी शेतीमालाच्या निर्यातीवर बंधने आणली जाणार नाहीत अशी ग्वाही या धोरणात दिलेली आहे. उदार निर्यात

धोरणाचा फायदा देशाला व्हायचा असेल तर उत्पादकांच्या डोक्यावरील नोकरदारांचा हा असह्य बोजा कमी होणे आवश्यक आहे.

नोकरदारांविरुद्ध जाण्याची हिंमत कोणा पुढाऱ्याची होणार नाही. पंतप्रधानांचे पाय नोकरदारांविरुद्ध बोलताना कापतात आणि सत्तापिपासू खुलेआम नोकरदारांच्या बाजूने उभे राहतात. देश वाचविण्यासाठी आता लोकांनीच पुढे झाले पाहिजे. सरकारला बजावून सांगितले पाहिजे की नोकरदारांचा बोजा कोणतेही राष्ट्र सहन करू शकणार नाही. सरकारला कराच्या रूपाने साधने उपलब्ध करता येण्यासारखी स्थिती असती तरीही नोकरदारांवरचा हा खर्च अयोग्य ठरला असता. लोकांनी त्यांना जाच करणाऱ्या नोकरदारांच्या पगाराकरिता काय म्हणून कर द्यावेत? देशभराच्या सर्व करदात्यांनी एकत्र येऊन निश्चय केला पाहिजे की सरकार आपले कामकाज व्यवस्थितपणे चालवत नाही, नोकरदारांवर आणि डामडौलावर सगळे अंदाजपत्रक उधळते तोपर्यंत अशा सरकारला कर देणे अनैतिक आहे. एखाद्या दारूड्याला दिलेले पैसे तो व्यसनातच उडविणार आहे हे माहित असतानाही मदत केली तर ती जशी अनैतिक ठरेल तसेच सरकारला कोणत्याही तऱ्हेची रक्कम चुकविणे हे या परिस्थितीत अनैतिक आहे.

दिल्लीच्या महामेळाव्यात सरकारला कोणत्याही तऱ्हेची रक्कम न देण्याचा निर्धार शेतकऱ्यांनी जाहीर केला आहे. इतर उद्योजकांनीही देश वाचविण्याच्या या कार्यक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन केले आहे. देश वाचविण्याची ही एवढी एकच शक्यता उरलेली दिसते. आता लोकांनीच पुढे होऊन सरकारला शिस्त लावली पाहिजे.

*(६-२१ एप्रिल १९९३)*

◆◆

# डॉ. कुरियन हज चले

खाद्यतेलाच्या बाबतीत म्हटले तर महत्त्वाची, म्हटले तर गंभीर आणि म्हटले तर गमतीची अशी एक घटना घडली.

केंद्र शासनाने अमेरिकेकडून PL 480 कलमाखाली ४४ हजार टन सोयाबीन तेल दान म्हणून स्वीकारले. नेहरूंच्या काळात याच PL 480 कार्यक्रमाखाली गव्हाच्या देणग्या स्वीकारून देशातील शेती उत्पादनाचा कणा मोडण्यात आला होता, हे सर्वांना माहीतच आहे. यंदाच्या तेलाच्या देणगीची किंमत ७२ कोटी रुपये आहे. गेल्या वर्षीही याच योजनेखाली सरकारने ४० हजार टन तेलाची भेट स्वीकारली होती.

गेल्या वर्षी सोयाबीन तेलाची देणगी स्वीकारण्यात कदाचित काही थोडाफार अर्थ होता. तेलाच्या किमती झपाट्याने वाढत होत्या आणि या किमती भडकण्यामागे उत्पादन आणि पुरवठा यांच्या तुटवड्यापेक्षा व्यापाऱ्यांची सट्टेबाजी असल्याचे दिसत होती. अशाही परिस्थितीत आयात करण्याचा किंवा भेट स्वीकारण्याचा पर्याय चुकीचाच, म्हणजे आत्मघातकीच आहे यात शंका नाही. कोणत्याही मालाची किमत स्थानिक कारणांमुळे चढू लागली तर बाजारपेठेत ढवळाढवळ न करता चढत्या किमतीच्या आकर्षणाने शेतकऱ्यांना उत्पादन वाढवू देणे हा खराखुरा उपाय आहे. ४० हजार टन तेल देशात आणले नसते तर कोणी उपाशी मरणार होते अशी काही स्थिती नाही. एकूण खाद्यतेलाच्या उत्पादनांपैकी ९०टक्के उत्पादन देशातील फक्त ६टक्के लोक वापरतात. तेव्हा खाद्यतेल ही काही आम जनतेच्या दृष्टीने जीवनावश्यक वस्तू नाही. गेल्या वर्षी घेतलेले ४० हजार टनाचे दान हे नेहरू धोरणानुसार, म्हणजे चुकीचेच होते.

पण यंदा पुन्हा एकदा ४४ हजार टन तेलाची भीक स्वीकारणे हे अगदीच निरर्थक आहे. देशातील तेलबियांच्या उत्पादनाची स्थिती यंदा चांगलीच सुधारली

आहे. सरकारने हाती घेतलेल्या खाद्यतेल उत्पादन वाढवण्याच्या धडक कार्यक्रमांमुळे परिस्थितीत थोडाफार फरक पडला आहे. ही सुधारणा टिकवून ठेवायची असेल तर त्याकरिता उत्पादकांना दोन पैसे मिळण्याची हमी असणे महत्त्वाचे आहे. थोडक्यात, बाजारपेठेचा अंदाज घेऊन शेतकऱ्यांना उत्पादनासंबंधी निर्णय घेता आले पाहिजेत. एक दिवस सकाळी उठून सरकारने हजारो टन तेल आयत केल्याची बातमी त्याच्या डोक्यावर कोसळू लागली तर उत्पादनासंबंधी निर्णय घेणे दुरापास्त होते.

परदेशातून केलेली महागडी आयात, गेल्या वर्षीची ३० लाख टन गव्हाची आयात असो किंवा शेतीमालाची फुकट देणगी स्वीकारणे असो, हीच शेतकरी संघटनेची त्याबाबतची भूमिका राहिलेली आहे.

नागरी पुरवठा खात्याचे मंत्री ए. के. अँटनी मोठा प्रामाणिक माणूस असावा. तेलाची देणगी स्वीकारण्याचे समर्थन त्यांनी अगदी खास नेहरूवादी शब्दांत केले. नरसिंह राव शासनाच्या किमती रोखण्याच्या, स्थिर ठेवण्याच्या आणि त्याचबरोबर नागरी अन्नधान्याच्या पुरवठ्याची खात्री ठेवण्याच्या जगजाहीर धोरणाचा हा भाग आहे.

पण ह्या देणगी-आयातीला विरोध कोणी करावा? खाद्यतेलाचे उत्पादन आणि व्यापारात असलेल्या खाजगी क्षेत्रातील मंडळींनी काही फारशी तयारी केली नाही. आरडाओरडा केला आहे तो सहकारी मंडळींनी.

अशा तऱ्हेने देणग्या स्वीकारल्या गेल्या तर तेलबियांच्या देशी उत्पादनास रास्त भाव मिळणार नाही. त्यामुळे शेतकऱ्यांचे नुकसान होईल आणि परिणामतः तेलबियांच्या बाबतीत देश स्वावलंबी बनण्यात अडचणी तयार होतील अशी सहकारी क्षेत्रातील मंडळींनी तक्रार केली आहे. त्यांचे नेते अर्थात 'धारा' उत्पादनाचे आणि सरकारी 'बाजारपेठ हस्तक्षेप योजने'चे कर्णधार, सूत्रधार, चालक, मालक, पालक डॉ. व्ही. कुरियन.

१९६१ सालापासून डॉ. कुरियन साहेबांनी युरोपातील दुधाची भुकटी आणि चरबी यांची प्रचंड प्रमाणावर देणगी आयात केली. या मालाची देशी बाजारात विक्री केली. ही विक्री चालू बाजारभावापेक्षा कमी भावाने केली. देशातील दुधाचे भाव पाडले आणि त्यातून 'दूध महापूर योजना' उभी केली. त्या योजनेचे मोठे डिमडिम वाजवले. या योजनेमुळे आपण दूध उत्पादक शेतकऱ्यांचे पालनकर्ते आहोत असा आव आणला. या कामगिरीकरिता सरकारकडून आणि आंतरराष्ट्रीय संस्थांकडून अनेक मानमरातब मिळवले. त्याच कूरियन साहेबांना तेलाची

देणगी आयात मात्र खपत नाही. हा मोठा विनोदाचा भाग आहे.

पण सहकारी क्षेत्रातील सगळीच मंडळी गडबडून गेली आहेत. दुधावरील प्रक्रिया खाजगी उद्योजकांना खुली करून द्यायची ठरवल्याबरोबर त्यांनी हाकाटी चालू केली. शेतकऱ्यांच्या मालाला अधिक मागणी मिळण्याला विरोध केला आणि आता हीच सहकारी मंडळी तेलाच्या देणगी आयातीला विरोध करायला उतरली आहेत. अँटनी साहेबांनी कुरियनना साधा सरळ प्रश्न विचारायला पाहिजे, ''राधासुता, तेव्हा कोठे गेला होता तुझा धर्म?''

*(६ जुलै १९९३)*

◆◆

# नकली आणि करंटा राष्ट्रभिमान

डंकेल प्रस्ताव भारत सरकारने मान्य करण्याचे जाहीर केले आहे. जाहीर करण्याचे काम खरे म्हटले तर खुद्द पंतप्रधानांनी, निदान व्यापारमंत्र्यांनी लोकसभेत करावयास पाहिजे होते; पण हे काम सोपवण्यात आले व्यापारमंत्र्यांच्या सचिवाकडे. तो सचिवही असा की, डंकेल प्रस्तावाची मान्यता जाहीर केल्यानंतर महिन्याभरात सेवानिवृत्त होणारा. एवढा महत्त्वाचा निर्णय पण त्याची घोषणा झाली पत्रकारांच्या मुलाखतीत!

या प्रस्तावाला मान्यता देण्याखेरीज काही गत्यंतर नव्हतेच, फक्त खुलेआमपणे 'नेहरूव्यवस्था' मोडली आहे आणि खुल्या व्यवस्थेकडे जाणे अपरिहार्य आहे हे सांगण्याची शासनाची हिंमत होत नव्हती. कृषिमंत्री बलराम जाखर कर्नाटकात गरजले, ''डंकेल प्रस्तावामुळे आम्ही शेतकऱ्याला कोणतीही तोशिस पोहोचू देणार नाही.'' परवा नाशिक जिल्ह्यात हेच बलराम जाखर आले आणि खाजगी बैठकीत म्हणाले, ''जाहीरपणे आम्हाला असे बोलावेच लागते; एरव्ही डंकेल प्रस्तावाला मान्यता देण्याखेरीज काही पर्याय नाही.''

पण मान्यता देतानासुद्धा सरकार 'अगं अगं म्हशी' म्हणत खुल्या व्यवस्थेकडे जात आहे. मूळ प्रस्तावात काही किरकाळ बदल घडवून आणण्याचा आम्ही प्रयत्न करणार आहोत. निदानपक्षी हिंदुस्थानला काही सोयीसवलती मिळाव्यात असा प्रयत्न करणार आहोत अशी गयावया करत सरकारने डंकेल प्रस्तावाला मान्यता जाहीर केली आहे.

या घोषणेने डंकेल प्रस्तावाला विरोध करणाऱ्या सगळ्यांनी मोठा हंबरडा फोडला आहे. लायसेंस-परमिट राज्यामध्ये गब्बर झालेले, खुल्या बाजारपेठेत उभे राहण्याची हिंमत नसलेले आणि नेहरू काळात कायदेशीर किंवा बेकायदेशीर चोऱ्यामाऱ्या करणारे सगळेच आक्रोश करीत आहेत.

आंतरराष्ट्रीय समाजवादाच्या घोषणा कालपरवापर्यंत करणारेही गळा काढून सुरात सूर मिसळत आहेत. नेहरूकाळापासून राष्ट्रीय स्वावलंबनाचे धोरण संपले. आता परदेशी बहुराष्ट्रीय कंपन्यांचे वर्चस्व सगळ्या देशात प्रस्थापित होणार असा विलाप ही मंडळी ऊर बडवीत करत आहेत.

नेहरू काळात देश स्वावलंबी झाला नाहीच. याउलट, १९४७ सालच्या तुलनेनेदेखील तो बाहेरील जगाच्या तुलनेने अधिक मागासलेला झाला. तंत्रज्ञानात मागे पडला, व्यापारात मागे पडला आणि कर्जात नाकात पाणी जायची वेळ येईपर्यंत बुडाला.

बहुराष्ट्रीय कंपन्या हे जर संकट असेल तर आजही सगळा देश शहरी भद्र लोकांना सकाळच्या दंतमंजनापासून ते झोपेअगोदर आवश्यक असलेल्या बोर्नव्हिटापर्यंत, कपड्यांच्या साबणापासून धुण्याच्या पावडरपर्यंत बहुराष्ट्रीय कंपन्यांवरच अवलंबून आहे. शेतीचेही सारे तंत्रज्ञान विलायतीच आहे. कारखानदारी तर विलायती, जुन्यापुराण्या तंत्रज्ञानावरच चालली आहे. फरक एवढाच की सध्या सरकारी लायसेंस-परमिटच्या आधाराने पुढाऱ्यांच्या मेहरनजरेतील एकदोन बहुराष्ट्रीय कंपन्या देशातील एखाद्या सरकारी कृपादृष्टीतील भांडवलदाराशी हातमिळवणी करून आपली मक्तेदारी पक्की करून बसले आहेत. 'डंकेल प्रस्ताव' कधीकाळी अंमलात आला तर प्रत्येक क्षेत्रात पाचपंचवीस बहुराष्ट्रीय कंपन्या स्पर्धा करायला उतरतील. अधिकाधिक गुणवत्तेचा आणि कमीतकमी किमतीचा माल ग्राहकराजासमोर ठेवून त्याला खुश करण्यासाठी एकच दंगल उडून जाईल.

ज्यांना स्वत:चा स्वार्थ साधायचा असतो ते धर्माचे आणि राष्ट्राचे नाव घेऊन स्वत:च्या पदरात लाभ पाडतात. या नियमाप्रमाणेच अनेकांना आता राष्ट्रीयत्वाचा पुळका आला आहे आणि परकीय उत्पादक हिंदुस्थानी बाजारपेठेत उतरले तर भारतीय तंत्रज्ञानाचे काय होणार अशी त्यांना चिंता पडली आहे.

तंत्रज्ञानात भारत मागासलेला आहे याची कारणे अनेक आहेत; सामाजिक, आर्थिक आणि धार्मिकसुद्धा. १९९२ साली ज्या देशात त्रेतायुगातील मंदिराबद्दल वाद माजू शकतात तो देश तंत्रज्ञानात मागासलेला असणारच. वर्षानुवर्षांचे हे मागासलेपण दूर करण्याचा एक प्रयोग 'नेहरूकाळा'त झाला. इंडियातील कारखानदारांना संरक्षण द्यायचे, उत्तेजन द्यायचे, त्यासाठी भारतातील शेतकरी भरडला गेला तरी चालेल हे नेहरू व्यवस्थेचे धोरण; पण त्याचा फायदा इंडियातील मूठभर लोकांना झाला. देशाचे मागासलेपण तसेच राहिले. मग

असले धोरण राष्ट्रीय म्हणण्यात काय अर्थ आहे? आणि भारतातील शेतकऱ्यांनी, कष्टकऱ्यांनी इंडियाच्या स्वार्थाच्या नेहरू धोरणांबद्दल प्रेम का बाळगावे? परकीय तंत्रज्ञान आमच्याकडे सरळ येऊ द्या, वाटेत कोणी मध्यस्थ दलाल नकोत. शेतकऱ्यांचा बलुतेदारांचा संबंध तंत्रज्ञानाच्या मूळ उगमाशी येऊ द्या, शहरी विद्यापीठांच्या प्राध्यापकांच्या आणि कारखानदारांच्या ओंजळीतून नको. म्हणजे शेतकरी कष्टकरी त्यांच्या बुद्धीचे वैभव दाखवतील. जगालाही स्तिमित करणारे संशोधन करून दाखवतील. भारताचे तांत्रिक मागासलेपण दूर करण्याची शक्यता डंकेलने उपलब्ध करून दिली आहे. कोणी कितीही हंबरडा फोडो खुल्या व्यवस्थेचा सूर्य उगवणार आहे. खुल्या व्यवस्थेचे आव्हान पेलण्यास आम्ही लायक ठरलो तर धन्य होऊ आणि नालायक ठरलो तर वाईटात वाईट काय होईल? आम्ही ज्यांचे गुलाम, ते ज्यांचे गुलाम त्यांचे आम्ही परस्पर गुलाम होऊ, एवढेच ना? आज गुलामांचे गुलाम आहोत. उद्या सीधेसाधे गुलाम होऊ. एवढी बढती तर शेतकऱ्यांना नक्कीच मिळणार आहे.

डंकेलविरोधी आघाडीने एक नवा बेत जाहीर केला आहे. सध्याच्या शासनाने डंकेल प्रस्ताव मान्य केला असला तरी इतर पक्षांचा त्याला विरोध आहे. हे सध्याचे सरकार बदलून त्या जागी विरोधी पक्षांपैकी कोणीही सत्तेवर आले तर डंकेल प्रस्तावाबद्दल फेरविचार करण्यात येईल अशी घोषणा सर्व विरोधी पक्षांतर्फे करवण्याचा प्रयत्न चालू आहे. विरोधी पक्षांचा करंटेपणा या थरापर्यंत जाणार नाही एवढी आशा करू या.

नेहरू 'इंडियाचे' तर डंकेल 'भारता'चा आहे. नेहरूंपेक्षा डंकेल जास्त राष्ट्रीय आहे. सार्वभौमत्वाचा उदो उदो करायचा आणि परकियांसमोर भिकेची कटोरी पसरायची, त्यांच्या औदार्यावर जगायचे आणि त्यांच्याशीच उर्मटपणे वागायचे हे कसले नकली राष्ट्रीयत्व?

*(६ जुलै १९९३)*

◆◆

# अतिदक्षता विभाग–रोगी भारत

**संकटांची धाड येते**

"तारुण्य, वैभव, सत्ता आणि सौंदर्य या चार गोष्टींपैकी एक गोष्ट लाभली तरी त्यामुळे अनर्थ होऊ शकतो. चारही जिथे एकत्र येतील तेथे काय अनर्थ घडेल?" असे जुने संस्कृत सुभाषित आहे.

चार चांगले दुर्गुण एकत्र आले तरी विनाश ओढवतो, मग चार दुर्गुण एकत्र आहे तर? आधीच माकड, त्यात दारू प्याला, त्या अवस्थेत त्याला विंचू चावला आणि सर्वात कडी म्हणजे त्याला भूत लागले तर त्या माकडाची स्थिती काय वर्णावी? असा विनोदी श्लोकही आहे.

एक एक व्याधी मृत्यू ओढवण्याला पुरेशी असते. दोनचार रोगांनी मिळून हल्ला केला तर निष्णात वैद्यांनाही हात टेकावे लागतात. त्यात, ओढवलेला प्रत्येक आजार असाध्य असेल तर? एके काळी असाध्य समजले जाणारे हिवताप, देवी, विषमज्वर, प्लेग यांसारख्या रोगांवर वैद्यकशास्त्राने मात केली आहे; पण आजही कॅन्सर आणि एडस् हे दोन असाध्य रोग मानले जातात. त्यावर औषधोपचाराची नक्की उपाय योजना सापडलेली नाही.

**कॅन्सर आणि एडस्**

कोणा एकाला कॅन्सर झाला म्हटले की त्याला इस्पितळात नेऊन दाखल करायचे, केल्याशिवाय राहवत नाही म्हणून औषधोपचार करायचा, पण मनामध्ये ही निश्चिती की आपले माणूस पुन्हा ठीकठाक होऊन हिंडू फिरू लागेल हे अशक्य आहे.

एडस् या रोगाची त्याहून भयानक अवस्था. या रोगाचा संसर्ग झाला की माणसाचा मृत्यू अटळ. या रोगामुळे माणूस मरत नाही, पण रोग्याला साध्या सर्दीपडशाची बाधा झाली तर त्या जंतूंनासुद्धा तोंड देऊन प्रतिकार करण्याची

शक्ती रोग्यात राहत नाही. एडस्‌चा रोगी सर्दी पडशानेसुद्धा मरू शकतो.

कॅन्सरचे अनेक प्रकार आहेत. सर्वात जास्त आढळणाऱ्या प्रकारात शरीरात काही पेशींच्या गाठी तयार होतात. या पेशी शरीरावर पोसतात, पण शरीराच्या उपयोगी काम कोणतेच करत नाहीत. झाडावरच्या बांडगुळाप्रमाणे हा पेशींचा गठ्ठा वाढत जातो. पसरत जातो. त्याच्या वाढीमुळे शरीराचे चलनवलन बंद होते आणि माणूस मरतो.

एडस् रोगाची बाधा शरीराच्या कोणा एका भागापुरती मर्यादित होत नाही. सर्व रक्तप्रवाहच दूषित होतो. शरीरावर बाहेरून आक्रमण झाले तर त्यांच्याशी निकराने झुंजणाऱ्या आणि शरीराचे रक्षण करणाऱ्या पेशी नाहीशा होतात आणि प्रतिकार शक्तीच संपते.

**रोगाचे निदान**

दोन्ही रोग महाभयानक, एकेक मृत्यूला पुरेसा आहे, हे दोन्ही रोग कोणा एकाच माणसाला झाले तर काय सांगावे? अशा परिस्थितीची कल्पनाही करणे कठीण आहे. कॅन्सर किंवा एडस्‌चा रोगी परीक्षेसाठी आला, त्याच्या रोगाचे निदान झाले म्हणजे डॉक्टर रोग्याला आणि त्याच्या नातेवाईकांना शांतपणे हळूहळू परिस्थिती समजावून सांगतो. रोगाचे स्वरूप सांगतो, रोगी आणि नातेवाईक धक्क्याने कोसळून जाणार नाहीत अशा पद्धतीने त्यांना सगळी परिस्थिती समजावून सांगतो; पण त्याबरोबर त्यांच्या मनात खोटी आशा फुलेल असेही करत नाही.

मीही अशाच प्रयत्नात आहे. आपल्या देशाचे भले इच्छिणाऱ्या मित्रमंडळीचे धैर्य कोसळता कामा नये, त्यांची हिंमत हादरता कामा नये, समोर असलेल्या शर्थीच्या झुंजीकरिता त्यांनी तयार झाले पाहिजे अशा पद्धतीने मी सांगण्याचा प्रयत्न करतो आहे. देश आजारी आहे; आजार तसा गंभीर आहे. कॅन्सरचा संशय आहे, किंबहुना कॅन्सर आहेच. कॅन्सरला काही उपाययोजना करून पाहता येईल, कॅन्सरच्या वाढत्या गाठी शस्त्रक्रिया करून काढून टाकणे कदाचित शक्य होईल, पण पराकोटीचे प्रयत्न लागतील. कारण कॅन्सरबरोबरच सगळा देश HIV +ve आहे. सारांश, देशाला कॅन्सरबरोबरच एडस्‌चीही बाधा झाली आहे.

घाबरून जाऊन धीर सोडण्यासारखे काही नाही; देश अजून वाचू शकेल; पण आजाराचे स्वरूप गंभीर आहे, प्राणघातक आहे, हे समजून प्रयत्न करावे लागतील.

**शरीर कोणते, कॅन्सर कोणता?**

कॅन्सरची बाधा फार जुनी आहे. तिच्याकडे दुर्लक्ष झाले, उपाययोजना झाली नाही. एवढेच नाही तर ज्या ज्या गोष्टींमुळे कॅन्सर बळावतो त्या सगळ्या गोष्टी रोगी फार काळ करत राहिला आहे. त्यामुळे कॅन्सरच्या गाठी शरीरात पसरल्या आहेत. देशाच्या पोषणाकरिता ज्यांची काहीही मदत नाही; उलट, पोषणाच्या कामात अडथळा आणणाऱ्या या गाठी वेगाने फोफावत आहेत. या गाठी नोकरदार कॅन्सरच्या आहेत. यात सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगधंदे आहेत, गचाळ, अकार्यक्षम काम करणारे खाजगी उद्योगधंदेही आहेत. देशाच्या शरीरावर ताव मारून या सगळ्या भयानक गाठी पोसल्या गेल्या आहेत, आणखी फोफावत आहेत.

**प्रतिकार सोडाच, स्वागतच**

माणसाच्या शरीरातील कॅन्सरच्या गाठींपेक्षा देशाच्या कॅन्सरच्या गाठी अधिक भयानक आहेत. शरीरातील निरोगी पेशींना कॅन्सर आपला शत्रू आहे हे समजते; पण त्यांचा काही इलाज चालत नाही. देश-शरीरातील कॅन्सरच्या गाठींनी सगळ्या शरीरातील पेशींची खात्री पटवून दिली आहे की त्या गाठी म्हणजेच देश आहे. देशाचे भले त्यांनाच समजते. कॅन्सरची जितकी वाढ होईल तितके त्या शरीराचे भले होईल अशी देशाच्या घटकांची खात्री पटली आहे. गाठी पसरत आणि बळावत आहेत आणि शरीरातील निरोगी पेशी त्यांची वाहवा करत आहेत, टाळ्या पिटून आनंदोत्सव करीत आहेत.

**एडस्‌ची बाधा**

एडस्‌च्या रोग्याच्या शरीराप्रमाणेच देशाचीही स्थिती झाली आहे. कोणत्याही रोगाचा प्रतिकार करण्याची शक्ती तर सोडाच, इच्छाही राहिली नाही. सातबाराच्या उताऱ्यासाठी गेलेला शेतकरी तलाठी सांगेल ती रक्कम निमूटपणे त्याच्यासमोर ठेवतो. गावचा पाटील तालेवार माणूस, पण गावांत आलेल्या पोलिस शिपुर्ड्याचीसुद्धा कोंबडी, बाटली आणि दक्षिणा ठेवून आळवणी करतो. दुकानदार, व्यापारी मंडळी घिरट्या घालणाऱ्या इन्स्पेक्टरच्या झुंडींना बिनतक्रार हप्ता देतात. आसपासचे गुंडागर्दी करणारेसुद्धा बिनदिक्कत येतात, हप्ते मागून घेऊन जातात. कारखानदार म्हणजे बडी प्रस्थे, पण अधिकारी आणि पुढारी दोघेही त्यांच्याकडून सुटकेसा भरभरून वसुली करून जातात. ही सगळी लूट आपण देशाच्या भल्याकरिता करीत आहोत, आपण म्हणजेच देश, 'कॅन्सर' म्हणजेच शरीर असे म्हणत लूट करतात आणि त्याबद्दल कुणीही रागवत नाही, चिडत नाही. लाच मागणाऱ्याला पोलिसात नेण्याचा प्रश्नच नाही. एका कॅन्सरच्या गाठीविरुद्ध दुसऱ्या गाठीकडे तक्रार गुदरण्यात काय अर्थ आहे? असे स्वतःचे समाधान करून आपल्या

नपुंसकतेचे, प्रतिकारहीनतेचे समर्थन करीत स्वस्थ बसून राहतात. कॅन्सरसारखा रोग आणि प्रतिकारशक्ती संपलेली !

**काही निरोगी पेशी अजून शिल्लक**

देश अजून थोडीफार हालचाल करतो आहे. धुगधुगी दाखवतो आहे. कारण कॅन्सरच्या गाठींसकट सगळ्या देशाला पोसण्याचे काम अजून काही पेशी करत आहेत. सगळ्या सरकारी कारभाराचा जाच सोसूनही शेतकरी शेते पिकवीत आहेत. कोठे सरकारशी, इन्स्पेक्टरांशी लढता? आपल्याला जमेल तसे व्यापारउदीम चालवावा अशा विचाराने व्यापारी, स्वयंरोजगारी काम करत आहेत म्हणून देश चालत आहे.

रोग बळावतो आहे. कॅन्सरच्या गाठी सगळ्या नाड्यांना आवळून अधिक कठोरपणे सर्व जीवनरस शोषून घेण्याच्या प्रयत्नाला लागल्या आहेत. कॅन्सरचा प्रभाव जितका वाढेल तितकी त्याची प्रतिकार करण्याची शक्ती एडस्च्या प्रभावाने कमी होते आहे.

**वैदूंचा विषोपचार**

रोगी इस्पितळात आहे; पण आशा फार नाही. जुनीपानी माणसे पंचाक्षऱ्याकडून अंगारे धुपारे करवत आहेत. गंडे, दोरे बांधणाऱ्या वैदूंचीही गर्दी उसळली आहे. राहिल्यासाहिल्या निरोगी पेशींत एकमेकांत लढाई लावून देण्याची त्यांची उपाययोजना आहे. त्यासाठी जातिद्वेषाचे, धर्मद्वेषाचे विष ते शरीरात सोडत आहेत.

हजारो वर्षांच्या दुरवस्थेने खंगलेला देश, त्यात कॅन्सरसारखा असाध्य रोग, त्यात एडस्मुळे प्रतिकारशक्ती संपलेली आणि औषध म्हणून विषाची इंजेक्शने ! अतिदक्षता विभाग, रोग्याचे नाव भारत; त्याच्या परिस्थितीसंबंधीची ही कागदपत्रे !

*(६ ऑक्टोबर १९९३)*

◆◆

# किल्लारीचे पाप राजाचे

**आसमानी सुलतानी**

स्वित्झर्लंडमध्ये राहत असताना एका गोष्टीची सतत टोचणी असे. १९७० सालचे पूर्व बंगालमधील महापूरग्रस्त, मग १९७१ मधील बांगलादेशचे निर्वासित, त्यानंतर हिंदुस्थानातील १९७२ चे दुष्काळग्रस्त. एक ना एक नैसर्गिक आपत्ती, तिचे लक्षावधी बळी आणि त्यांची हीनदीन अवस्था यांच्या बातम्या वर्तमानपत्रांत, रेडिओवर, टेलिव्हिजनवर सतत येत. अस्मानी संकटाच्या बातम्या नसल्या तर याह्याखान, इदी अमीन इत्यादी सुलतानांच्या क्रूर कहाण्या! अगदी स्वित्झर्लंडसारख्या देशात, संयुक्त राष्ट्रसंघाच्या कार्यालयातही, कोणीही कितीही समानतेचे नाटक केले तरी आम्हा गरीब देशातल्या अधिकाऱ्यांकडे बाकीचे सगळे काहीशा दयेच्या आणि करुणेच्या भावनेने पाहत.

कोणी आपल्यावर करुणा दाखवावी ही मोठी दाहक संवेदना आहे. अशावेळी मनात काही काळ का होईना विचार येऊन जाई, या श्रीमंत देशावर महापूर, भूकंप, ज्यालामुखी असे एक तरी संकट कोसळावे, हजारो माणसे निराधार व्हावीत म्हणजे त्यांना करुणा दाखवण्याची एखादी तरी संधी आपल्याला मिळेल; पण असे कधीच झाले नाही.

**संकटांची गरिबी**

एकदा स्वित्झर्लंडमध्ये भर उन्हाळ्यात तीन आठवडे पाऊस पडला नाही. सगळ्या माध्यमांतून धोक्याच्या सूचना खणखणू लागल्या, “जंगलाजंगलातील गवत सुकेसुके, कोरडे झाले आहे; आगीचा धोका आहे. सिगारेटचे थोटूक प्रवासात इकडे-तिकडे टाकू नका.”

आणखी एकदा आल्पसमधील एक शिखर सर करण्यासाठी आठ लोकांची टोळी गेली होती. बर्फाच्या वर्षावामुळे ती अडकून पडली. त्यांना सोडविण्याकरिता

तासाभरात हेलिकॉप्टरे अपघातस्थळी जाऊन पोहोचली. अडकलेल्या निर्यारोहकांच्या सुटकेचा सारा प्रचंड खटाटोप घरोघर लोकांनी टेलिव्हिजनवर प्रत्यक्ष पाहिला.

लष्करी सुरुंग पेरण्याच्या प्रदेशात एक छोटेसे कुत्र्याचे पिल्लू चुकून शिरले तर त्याच्या सुटकेच्या प्रयत्नांवर सगळया देशाचे लक्ष वेधले गेले. माझ्या दशकभरच्या निवासात स्वित्झर्लंडवर कोसळलेली संकटे ही एवढीच. श्रीमंत देशात संकटांचा महाभयंकर दुष्काळ!

निसर्ग त्या देशांवर बहाल आहे म्हणावे तर तेही खरे नाही. स्वित्झर्लंडमध्ये बहुतेक भागात दरवर्षी निम्मा वेळतरी बर्फ पडतच असतो. त्याच्या तुलनेने हिमपात पुष्कळ कमी असला तरी उत्तरकाशी प्रदेशात बद्रीनाथची देवळे बंद होऊन पुजाऱ्यासकट सगळे जोशीमठपर्यंत परत येतात; पण स्वित्झर्लंडसारखे देश असल्या वर्षावांना न जुमानता काम करीत राहतात. एवढेच नव्हे तर बर्फ पडू लागल्यानंतर डोंगर डोंगर बर्फाच्छादित घसरणीवरून वेगवेगळे खेळ खेळणाऱ्या खेळाडूंच्या जत्रांनी भरून जातात.

**न येणाऱ्या संकटांचा सामना**

योगायोगाने बर्न शहरातील एका नागरी सुरक्षेच्या केंद्रास भेट देण्याची संधी मिळाली. बर्नची लोकसंख्या त्यावेळी लाखाच्या आसपास होती. आजही तेवढीच असेल. स्वित्झर्लंड हा संपूर्ण शांततेचा आणि तटस्थतेचा देश. दोन्ही महायुद्धांतसुद्धा ही तटस्थता अबाधित राहिली. या तटस्थ, शांतताप्रिय देशातील प्रत्येक पुरुष लष्करातील सैनिक आहे हे मला ठाऊक होते. कधीकाळी कोणा शत्रूचे आक्रमण झालेच तर त्याला रोखण्यासाठी महामार्गांचे पट्टेच्या पट्टे बाजूला काढण्याची व्यवस्था आहे असे मी ऐकले होते. महामार्गाचा वापर लष्करी विमानांसाठी धावपट्टीसारखा करण्याची योजना आहे; अशी कुजबूज होती. शांतिदूत स्वित्झर्लंडच्या लष्करी तयारीच्या सगळया कथा ऐकूनदेखील डोळयांनी जे प्रत्यक्ष पाहिले त्यावर विश्वास बसेना. बर्नच्या एक लाख लोकवस्तीसाठी ३०,००० लोकांना पुरेल असा सुरक्षा निवारा जमिनीखाली १०० मीटर इतक्या खोलीवर एका प्रचंड बोगद्यात केला होता. एखादा अणुबॉंब या बोगद्याच्या डोक्यावरच पडला तर गोष्ट वेगळी; अन्यथा आश्रयस्थान अगदी पक्के सुरक्षित. सगळया जागेत, जमिनीच्या इतक्या खोलीवरही हवा खेळती राहण्याची व्यवस्था. ३०,००० लोकांकरिता झोपण्याची व्यवस्था थ्री टियर शयनयानातल्यासारखी केलेली, त्यातील हजारएक बिछाने स्वच्छ पलंगपोस, ब्लँकेट घालून सदा तयार ठेवलेले. कोणत्याही संकटकाळी एक सेकंदाचासुद्धा विलंब न लागता ही यंत्रणा मदत

देण्याकरिता सज्ज होती. ३०,००० लोकांच्या सात दिवसांच्या जेवणखाणासाठी लागणारा माल तेथील शीतगृहात कायमचा साठवलेला असतो. दर आठ दिवसांनी साठा बदलण्यात येतो. एका वेळी २० लोकांवर शस्त्रक्रिया करता येतील इतके मोठे सुसज्ज हॉस्पिटल कायम चकचकीत अवस्थेत तयार असते. कोठे संकट आले तर सगळी तयारी सुसज्जपणे वाट पाहते आहे. त्याचा उपयोग करण्याची वेळ कधी येत नाही. तरीही यंत्रणेच्या सुसज्जतेत तसूमात्र ढिलाई होत नाही. माणसाच्या एवढ्या जय्यत तयारीपुढे निसर्गही मान तुकवतो. या उलट, आमच्याकडे आसमानी संकटाच्या एका फटक्यात हजारो माणसे गारद होतात, लक्षावधी जखमी होतात आणि कोट्यवधी निराधार होतात. सारांश, आपत्ती निसर्गाच्या अतिरेकाची नसते; ती असते माणसाच्या दुर्बलतेची.

**संकटी सदा बेसावध**

किल्लारी-सास्तूर भूकंपाला मुख्यमंत्री शरद पवार यांनी भूमातेचा कोप म्हटले; पंतप्रधान पी. व्ही. नरसिंह राव यांनी 'अस्मानी संकट' असा शब्द वापरला. त्यांच्या युक्तीवादाचा मतितार्थ, "आले देवाजीच्या मना तेथे कोणाचे चालेना." हजारो लोक आपल्याच घराच्या भिंतींच्या, दगडमातीच्या ढिगाखाली चेंगरून मेले ही सगळी देवाजीची इच्छा! यात शासनाचा दोष काही नाही. आम्ही आता मदत म्हणून जे काही काम करण्यासारखे आहे ते करतोच आहोत. निवडणुकीच्यावेळी राग नसावा!

बिहारमध्ये भूकंप झाला; हजारो माणसे मेली. गांधीजींनी म्हटले होते, "देशातल्या अस्पृश्यतेच्या चालीच्या पापाबद्दल मिळालेले हे प्रायश्चित्त आहे." पंतप्रधान लातूरच्या भेटीला आले, त्यांना एका पत्रकाराने प्रश्न विचारला, "मग, किल्लारीच्या भूकंपाचे पाप कोणाचे?" पंतप्रधानांचे उत्तर, "याचा विचार ज्याने त्याने आपल्या मनात करावा." म्हणजे दस्तूरखुद्द पंतप्रधानांना आत्मनिरीक्षणाची गरज नाही.

**बळीराजाचाच बळी**

एखाद्या वर्षी चांगला पाऊस पडला तर सारी दुनिया खुश होते; पण पाऊस पडला नाही तर त्यामुळे बिगर शेतकरी समाजाच्या आयुष्याला थोडासुद्धा धक्का लागत नाही. धान्याचा एक दाणाही न पिकवणाऱ्यांचा गुजारा व्यवस्थित होतो आणि धान्य पिकवणारे शेतकरी मात्र पोटाला भाकरी मिळावी म्हणून बेघर होऊन खडी फोडायच्या केंद्रावर हात फोडून घ्यायला जातात.

दुष्काळाची कथा, तीच भूकंपाची. किल्लारी-सास्तूरच्या भूकंपात बळी कोण

पडले? गावाच्या बाहेरील पालांत आणि झोपड्यांत राहणारे लमाण्यांचे तांडे सुरक्षित राहिले. बळी पडले ते 'शेतकरी आर्किटेक्चर'च्या घरात राहाणारे, म्हणजे दगडगोटे काळ्या-पांढऱ्या मातीच्या गारांत घालून ज्यांनी आपले घर उभे केले तेच गाडले गेले. दुष्काळाचे बळी जसे निवडून शेतकरी समाजाचे तसेच धरणीकंपाचे बळीही.

इंद्रदेव काय आणि धरणीमाता काय, त्यांच्या कोपाचा त्रास फक्त एका विवक्षित समाजालाच होत असेल तर त्याला अस्मानी संकट म्हणणे खोटेपणाचे आहे. या संकटाची तोशीस आपल्याला फारशी लागू नये याकरिता बाकीच्या साऱ्या समाजांनी काहीना काही तरतूद केली आहे. घसरणीला लागलेला शेतीचा धंदा सावरता सावरता नाकीनऊ आलेल्या शेतकऱ्यांना अशी काही तरतूद करता येत नाही. अगदी सुबत्तेच्या वर्षातही धान्याधुन्याची कणगी भरता येत नाही. मग घरशेतीची डागडुजी दूरच राहिली. प्रत्येक संकटांचे बळी तेच होतात ते याच कारणाने.

सगळ्या समाजाचा जत्था जंगलातून चालला आहे. जत्थ्याच्या मध्यभागी पुढारी, नोकरदार, कारखानदार इत्यादी भाग्यवान वर्ग आणि जत्थ्याच्या चारी बाजूस जाड थर शेतकरी माणसांचा. जंगलात लांडग्या-कोल्ह्यांची धाड आली तर लचके तोडले जाणार ते शेतकरी समाजाचेच. मध्यभागीचे भाग्यवान सुरक्षित! अशी ही व्यवस्था आहे. अमरावती जिल्ह्यातील कुपोषणाचे बळी काय आणि लातूर-उस्मानाबादचे भूकंप बळी काय दोन्हीही अर्थव्यवस्थेने केलेल्या कत्तलीच आहेत.

**गरिबीचे मोजमाप**

गरिबी हटवायची घोषणा 'फॅशनेबल' झाल्यापासून गरीब म्हणजे नेमके कोण, त्यांची व्याख्या करण्याकरिता कोट्यवधी रुपये, कागद-शाई आणि अर्थशास्त्रांचे श्रम खर्ची  पडले आहेत. गरीब कोण तर ज्यांचे उत्पन्न अमुक अमुक रुपयांपेक्षा कमी आहे ते. किंवा ज्यांच्या आहारात उष्मांक किंवा प्रथिने यांचे प्रमाण एका मयादेपेक्षा कमी असते ते. अशा धर्तीच्या व्याख्या विद्वान शास्त्रज्ञांनी दिल्या. आपापल्या व्याख्येच्या समर्थनासाठी ते अभिनिवेशाने झुंजले आणि विद्वान म्हणून मान्यता पावले.

**खरी कसोटी अपघाताची**

खाण्यापिण्याच्या आधाराने जीवनस्तर ठरवणे कोंबड्यांच्याच बाबतीत किंवा दुभत्या जनावरांच्या बाबतीत कदाचित योग्य असेल; मला त्याबद्दलही शंका

आहे; पण ही असली मोजमापाची पद्धत मनुष्यप्राण्याला लागू करणे अगदीच हास्यास्पद आहे. माणसाचे शरीर हा एक मोठा चमत्कार आहे. वेगवेगळ्या परिस्थितींना सामोरे जाऊन आपल्या दैनंदिन जीवनातील नित्यनियमाच्या गरजा भागवण्याचे त्यांचे सामर्थ्य विलक्षण आहे. शरीराच्या दैनंदिन गरजा भागवण्यासाठी पंचपक्वान्नांचा आहार काय आणि झुणकाभाकरीचा आहार काय, फारसा फरक पडत नाही; पण काही अनपेक्षित घडले तर मेवामिठाई खाणारा तगून जाताना दिसतो ते त्याच्या श्रेष्ठ खाद्यामुळे नव्हे, तर खाद्याच्या अनुषंगाने येणाऱ्या इतर कवचकुंडलांमुळे. गरिबीचे मोजमाप उष्मांकांत करून चालणार नाही. अनपेक्षित, अगदी असंभाव्य अपघातांना सामोरे जाण्याचे माणसाचे सामर्थ्य किती या फूटपट्टीने गरीबी, श्रीमंती मोजणे योग्य होईल.

एका श्रीमंतीच्या टोकाला, प्रत्यक्ष अणुबाँब पडला तरी निर्धास्तपणे जगून राहतील असे बर्नचे लोक, तर दुसऱ्या टोकाला किरकोळ भूकंपाच्या धक्क्यामुळे आपल्याच घराच्या दगडमातीच्या ढिगाऱ्याखाली गाडले जाणारे किल्लारी-सास्तूरचे शेतकरी आणि त्यांचे देशभरच्या गावागावात पसरलेले भाईबंद. भाईबंद शेतकऱ्यांचा भूकंप अजून यायचा आहे म्हणून ते सारे जिवंत आहेत. ते जिवंत असल्याचे श्रेय कोणी घेऊ शकत नाही, त्यांच्या अपमृत्यूचे पाप मात्र व्यवस्थेचे म्हणजे राजाचे आहे.

*(२१ ऑक्टोबर १९९३)*

◆◆

# बेचाळीसचे गौडबंगाल

**पन्नास वर्षांनी पितृत्व मान्य**

ऑगस्ट १९४२ च्या आंदोलनाचा सुवर्णजयंती महोत्सव आता पार पडला आहे. ८ ऑगस्ट १९४२ रोजी अखिल भारतीय काँग्रेस समितीचे अधिवेशन जेथे भरले होते त्याच गोवालिया टँक मैदानावर मोठा वैभवशाली समारंभ झाला. त्याच दिवशी दिल्लीच्या इंडिया गेटजवळची एक मोठी जागा ऑगस्ट क्रांती मैदान या नावाने जाहीर करण्यात आली. नंतरच्या वर्षभरात देशातील प्रत्येक राज्यात १९४२ साली जेथे जेथे काही उठाव झाले होते तेथे तेथे खुद्द पंतप्रधान जाऊन आले. जागोजाग उत्सव साजरे झाले.

महाराष्ट्रात दोन उत्सवांना पंतप्रधान स्वतः हजर राहिले. १९४२ च्या आंदोलनात सातारा जिल्ह्यात (त्यावेळच्या सातारा जिल्ह्यात आजच्या सांगलीचाही समावेश होता.) ग्रामराज्य स्थापन झाले होते. १९४२ च्या सगळया आंदोलनात नाना पाटलांच्या प्रति (कां पत्री?) सरकारचे स्थान फार मोठे आहे. सातारा जिल्ह्यातील क्रांतिकारकांच्या स्मृतीला अभिवादन करण्याच्या समारंभात खुद्द पंतप्रधान उपस्थित राहिले.

वर्धा जिल्ह्यातील आष्टीचिमूर प्रकरण हादेखील आंदोलनातील एक मोठा ज्वलंत अध्याय. आष्टीतील गावकऱ्यांनी मिरवणूक काढली; तेथील फौजदाराने मिरवणुकीवर गोळीबार केला; प्रकरण इतके तापले की त्या फौजदाराला गुपचूप आष्टीवरून हलवून चिमूरला पाठवण्यात आले. हे समजताच संत तुकडोजी महाराजांच्या प्रेरणेचे चिमूर येथील पोलिस चौकीवर हल्ला झाला; चौकी जाळली गेली; या प्रकरणी १०-१२ लोकांना फाशीची शिक्षा ठोठावण्यात आली होती. सुदैवाने, अंमलबजावणीच्या आधी स्वातंत्र्य आले, फाशीच्या शिक्षा रद्द झाल्या. या सगळया रोमहर्षक इतिहासाला वंदन करण्यासाठी स्वतः पंतप्रधान

चिमूरकांडाच्या ५० व्या वर्षदिनी आवर्जून हजर राहिले होते. बेचाळीसच्या क्रांतिकारकांना अधिकृत मान्यता ५० वर्षांच्या अवधीनंतर का होईना, मिळाली. त्यांना हुतात्मे म्हणून मान्यता होती, स्वातंत्र्यसैनिक म्हणून पेन्शन होती; पण त्यांच्या क्रांती कार्यक्रमाला पहिल्यांदा मान्यता मिळाली.

**४२ साली घडले काय?**

गोवालिया टँकच्या घोषणेनंतर पहिल्याच दिवशी जवळजवळ सगळयाच पुढाऱ्यांना अटक झाली. सरकार असे काही करेल ही कोणाचीच अपेक्षा नव्हती. गांधीजी व्हाइसरायशी बोलणी करतील आणि चर्चा फिस्कटली तर नेमके काय करायचे ते सांगतील. मग त्यांच्या आदेशाप्रमाणे काय करायचे ते करू अशा विचारात सर्व स्वातंत्र्यसैनिक होते. महात्माजींना अटक झाली म्हणजे आता वाटाघाटी होत नाहीत. म्हणजे आंदोलन पुढे येऊनच ठाकले; पण आंदोलन म्हणजे काय करायचे हे कुणालाच माहिती नव्हते. मग लोक उत्स्फूर्तपणे रस्त्यावर आले; घोषणा देऊ लागले. तुरुंगात जाऊ लागले, लाठ्या खाऊ लागले, बंदुकांनाही सामोरे जाऊ लागले; पण १९४२ च्या आंदोलनाचा एक दुसरा महत्त्वाचा भाग होता. उघड उघड हिंसाचाराचा, घातपाताचा; युद्धकार्यास ज्या ज्या प्रकारे अडथळा करता येईल आणि सरकार चालणे ज्या ज्या तऱ्हेने अशक्य होईल ते सर्व मार्ग वापरले गेले. टपाल कचेऱ्या जाळणे, विजेच्या व संदेश वाहतुकीच्या तारा तोडणे, रेल्वेचे रूळ उखडणे, जागोजाग सरकारच्या साऱ्या नाड्याच आखडल्या जातील असे संप, हरताळ घडवून आणणे असे कार्यक्रम जागोजागी तरुणांनी राबवले.

इ. स. १९४२ च्या चळवळीतील काँग्रेसची जबाबदारी या विषयावर लंडन येथे एक श्वेतपत्रिका प्रसिद्ध करण्यात आली होती. श्वेतपत्रिकेत म्हटले होते; ९ ऑगस्ट रोजी नेत्यांची धरपकड झाली; पण अटक झालेल्या नेत्यांची संख्या शेकड्यात मोजण्याएवढीच होती. नंतर घडलेला उद्रेक नेत्यांच्या, विशेषतः महात्मा गांधींच्या अटकेने संतापलेल्या लोकांनी स्वयंस्फूर्त केला. या युक्तिवादात काही तथ्य नाही.

दंगली जवळजवळ एकाच वेळी मद्रास, मुंबई, बिहार, मध्य आणि संयुक्त प्रांत अशा दूरदूरच्या प्रदेशात सुरू झाल्या. दंगलीत झालेले नुकसान इतके मोठे होते की असे नुकसान ऐनवेळी काही विशेष औजारे, हत्यारे न वापरता, पूर्वतयारीशिवाय घडले असेल यावर विश्वास ठेवणे कठीण आहे. घातपाताचे अनेक प्रकार अशा तऱ्हेने घडवण्यात आले की त्यामागे तंत्रकुशल हात असावेत

हे स्पष्ट होते. रेल्वेची मर्मस्थाने निवडून नष्ट करण्यात आली. आणखी हे सारे प्रकार लष्करीदृष्ट्या प्रदेशात आणि केंद्रात घडले. यात कोळशाचे उत्पादन आणि पुरवठा करणाऱ्या प्रदेशांचा अंतर्भाव आहे. कोळशाचा पुरवठा थांबला तर त्यामुळे सारी वाहतूक, कारखानदारी आणि व्यापार थंडावला असता. शिवाय हा प्रदेश जपानी हल्ला होण्याची शक्यता असलेल्या प्रदेशाच्या लगत होता. देशांचे संरक्षण करणाऱ्या लष्कराची संचारव्यवस्था उद्ध्वस्त करण्यासाठी यापेक्षा जास्त प्रभावी मर्मस्थाने शोधणे कठीण होते. याउलट आसाम, ओरिसा, पंजाब आणि वायव्य सरहद्द प्रांत येथे कोणतीही गडबड झाली नाही हे लक्षात ठेवण्यासारखे आहे. घातपाताचे सर्व प्रकार मोठ्या धोरणाने आणि हिशेबीपणाने निवडक मर्मकेंद्रावर झालेले हल्ले होते, संतप्त जमावांची विस्कळीत प्रतिक्रिया नव्हती.

**'करू वा मरू'चा आदेश कोणाचा?**

इ. स. १९४२ च्या चळवळीतील सगळया ज्वलंत अशा या प्रकरणाला इंग्रज सरकारने घातपाताचे प्रकार म्हटले. भारतीय जनतेच्या दृष्टीने हीच ऑगस्ट क्रांती होती. हे क्रांतिकारी उठाव घडवून आणले कोणी? इंग्रज सरकारचे म्हणणे की, जबाबदारी खुद्द गांधींची आणि काँग्रेसची आहे; पण या क्रांतिकारी घटनांचे पितृत्व 'विश्वामित्रा'च्या थाटात काँग्रेसने आजपर्यंत नाकारले होते. क्रांतिनंतर ५० वर्षांनी का होईना पण सगळया घातपाताच्या क्रांतीकारी घटनांना काँग्रेस पक्षाने अधिकृतरीत्या जवळ केले.

१९४२ साली जे काही घडले त्याचा इतिहास रोमहर्षकही आहे आणि मनोरंजकही.

**दुसऱ्या महायुद्धाचे वादळ**

१९४१ च्या शेवटापर्यंत दुसऱ्या महायुद्धाची परिस्थिती दोस्त राष्ट्रांच्या दृष्टीने मोठी कठीण झाली होती. नाझी फौजा मॉस्कोच्या दरवाजावर धडका देत होत्या तर जपानी फौजा चीन, मलाया, ब्रह्मदेश एकामागोमाग एक झपाट्याने पादाक्रांत करीत चालल्या होत्या. ६ एप्रिल १९४२ रोजी हिंदुस्थानातील विशाखापट्टणम आणि जवळपासच्या बंदरावर जपानी बाँबहल्ले झाले आणि हिंदुस्थानच्या सरहद्दीवर जपानी फौजा कधी येऊन धडकतील ते सांगता येत नाही अशी परिस्थिती दिसू लागली. जपानच्या मुसंडीसमोर ब्रिटिश फौजा मलाया, अंदमान, ब्रह्मदेश अशा एक एक देशांतून माघार घेत होत्या आणि थोड्याच दिवसांत इंग्रज हिंदुस्थानातूनही पाय काढता घेतील आणि सगळा देश जपानी टाचेखाली जाईल याची काँग्रेस

नेतृत्वाला मोठी चिंता लागली होती. जपानी फौजांच्या अग्रभागी सुभाषचंद्र बोसांची आझाद हिंद फौज असेल आणि त्यामुळे परिस्थिती अजूनच नाजूक आणि कठीण होईल अशी त्यांची भीती. सुभाषचंद्रांविरुद्ध लढाईला उभे ठाकण्याची भाषा पंडित नेहरूंनी केलेली होती.

'क्रिप्स मिशन' हिंदुस्थानात आले. युद्ध संपताच हिंदुस्थानच्या राजकीय महत्त्वाकांक्षांचा आदर राखला जाईल असे आश्वासन साम्राज्यातर्फे देण्यात आले. गांधीजींनी या आश्वासनाचा 'बुडत्या बँकेवरील चेक' म्हणूनच उपहास केला. ब्रिटिश साम्राज्याची बँक बुडणार. इंग्रज काढता पाय घेणार आणि मग जपान्यांविरुद्ध लढा चालवायला देशात कोणी उरणारच नाही आणि आझाद हिंद फौजेचा वापर करून जपानी सगळ्या देशावर आपली सत्ता बसवतील किंवा सुभाषचंद्र बोसांच्या हाती हिंदुस्थानची सत्ता जाईल अशा चिंतेने ग्रस्त झालेल्या काँग्रेसने एक विशेष रणनीती आखली.

**भयभीतांची रणनीती**

१४ जुलै १९४२ रोजी वर्धा येथे काँग्रेस कार्यकारिणीची बैठक भरली आणि हिंदुस्थानी लोकांच्या आकांक्षा आणि दोस्त राष्ट्रांचे युद्धाचे हेतू या दोघांच्याही पूर्तीसाठी इंग्रजांनी देश सोडून जावे आणि स्वतंत्र भारताची एक दोस्त राष्ट्र म्हणून जपान (सुभाषचंद्रांसहित) विरुद्ध मदत घ्यावी असा प्रस्ताव होता. इंग्रजांनी माघार घेतली नाही तर? काँग्रेस "नाईलाजाने १९२० सालापासून तयार केलेली सर्व अहिंसात्मक ताकद राजकीय हक्कांसाठी आणि स्वतंत्र्य मिळवण्यासाठी वापरेल. हे व्यापक आंदोलन गांधींच्या नेतृत्वाखाली असेल."

कार्यकारिणीचा हा ठराव मुंबईतील गोवालिया टँकवर भरलेल्या अखिल भारतीय काँग्रेस समितीच्या अधिवेशनासमोर आला. भारतातील इंग्रजी साम्राज्य समाप्त होणे हे भारताच्या, एवढेच नव्हे तर दोस्त राष्ट्रांच्या हिताच्या दृष्टीने तातडीचे आहे असे काँग्रेस समितीने जाहीर केले. समितीने लोकांना सर्व प्रकारच्या धोक्यांसाठी आणि कष्टांसाठी धैर्याने आणि सहनशीलतेने गांधींच्या नेतृत्वाखाली एकत्र होऊन तयार राहण्याचा आदेश दिला.

अहिंसा हा चळवळीचा पाया असेल हे ठरावात स्पष्ट करण्यात आले. जर लोकांना आदेश देणे शक्य राहिले नाही आणि काँग्रेस समितीचे कामकाजच ठप्प झाले तर प्रत्येक स्त्री-पुरुषाने आंदोलनाच्या सुनिश्चित चौकटीत (म्हणजे अहिंसात्मक) आपणास जे योग्य वाटेल ते करावे. स्वातंत्र्य येऊन हिंदुस्थानची मुक्तता होईपर्यंत आता थांबणे नाही, असेही ठरावात म्हटले.

पंडित नेहरूंनी ठराव मांडला; सरदार वल्लभभाई पटेल यांनी त्याला अनुमोदन दिले. त्यांच्या भाषणात व्यापक आंदोलनाचा उल्लेखही नव्हता. ठराव मंजूर झाला आणि मग गांधीजी बोलण्यास उठले. दोस्त राष्ट्रांना काँग्रेसने दिलेली ही अपूर्व संधी आहे. यापुढे प्रत्येक भारतीयाने आपणास स्वतंत्र मानावे आणि स्वतंत्र माणूस म्हणून जगावे. हा गांधीजीचा संदेश. लोकांना करा किंवा मरा असा आदेश गांधीजींनी दिल्याचे दिसत नाही. त्यांनी वापरलेले वाक्य असे, "मी काँग्रेसला शपथ दिली आहे आणि काँग्रेस करेल किंवा मरेल."

**आदेश आणि अंमलबजावणी**

"हे एक जनआंदोलन असेल; आमच्या योजनांत गुप्त असे काही नाही; ही खुली लढाई आहे. आम्ही एका साम्राज्याशी टक्कर घेत आहोत आणि हा खुला सामना आहे. या विषयावर काही गैरसमज नको; गोंधळ नको. आंदोलनात कोणताही गुप्त कार्यक्रम नसेल. जे भूमिगत कार्यक्रम करतील ते पस्तावतील."

काँग्रेसच्या अधिकृत इतिहासावरून असे स्पष्ट दिसते की लगेच दुसऱ्या दिवसापासून म्हणजे ९ ऑगस्ट १९४२ पासून देशात आंदोलन सुरू व्हावे अशी कोणतीच तयारी नव्हती, कल्पनाही नव्हती आणि खरे खटले म्हटले तर, इच्छाही नव्हती. गोवालिया टँक ठरावाचे हत्यार घेऊन गांधीजींनी व्हाईसरॉयशी संपर्क साधावा आणि देशाच्या स्वातंत्र्याच्या दृष्टीने काही पदरात पाडून घ्यावे आणि मग जपान (सुभाषचंद्रांसहित) विरुद्ध भारतीय जनतेस उभे करण्याचा निर्णय काँग्रेसला उजळ माथ्याने घेता यावा अशी काहीशी आखणी होती.

**भीती जपानची का सुभाषचंद्रांची?**

पण काँग्रेस नेतृत्वाचा आंतराष्ट्रीय परिस्थितीचा अभ्यास अपुरा आणि बालीश होता. अमेरिका आणि इंग्लंड एकत्र असताना आणि युरोपमधील सर्व पादाक्रांत देशांत भूमिगत विरोध चालू असताना दुसऱ्या महायुद्धात अंतिम विजय दोस्त राष्ट्रांचा होणार याबद्दल इंग्रजांच्या मनात कधीच शंका नव्हती. लंडनवर बाँबगोळयांचा संततधार वर्षाव होत असतानाही त्यांचा विश्वास ढळला नव्हता. जर्मनीवरचा प्रतिहल्ला सुरू करण्याआधी हिटलरच्या हातून समाजवादी रशिया नेस्तनाबूत करता आला तर ते इंग्लंड-अमेरिकेस हवे होते. प्रतिहल्ला सुरू करण्यात या कारणाने त्यांनी चालढकल चालवली होती. रशियाने अपेक्षा नसताना चिवटपणे झुंज दिली आणि नाझी फौजांना तेथून काढता पाय घ्यावा लागला. जर्मनीच्या पराभवाचे श्रेय सगळे रशियाला मिळेल अशी लक्षणे दिसू लागताच नॉर्मंडी फौजा उतरवण्याची तारीख ठरली, एवढेच. अंतिम विजयाची

अशी खात्री असताना काँग्रेसच्या घाबरगुंडीच्या भूमिकेने किंवा सुभाषचंद्र बोसांच्या धास्तीने विचलित होण्याचे त्यांना काहीच कारण नव्हते. काँग्रेसचे आंदोलनही हाताबाहेर जाण्याइतके प्रभावी होणार नाही याची त्यांना पुरेपूर कल्पना होती. मुसलमान, दलित आणि नोकरदार यांच्या पाठिंब्याची त्यांना खात्री होती त्यामुळे गोवालिया टँकचा ठराव होताच त्यांनी अटकसत्र सुरू केले. मग सगळा इतिहास घडला आणि त्यांनतर साधारणपणे वर्षभरात सारे काही शांत शांत झाले होते.

**जबाबदारी कोणाची?**

बेचाळीसच्या आंदोलनातील घातपाती कृत्यांची नैतिक जबाबदारी महात्मा गांधी आणि काँग्रेस यांच्यावर आहे, अशी भूमिका इंग्रज सरकारने घेतली. याउलट, ''नाही हो! आम्ही असे काही म्हटलेच नव्हते.'' असा विश्वामित्री पवित्रा काँग्रेस आणि गांधींनी घेतला. ठराव अहिंसात्मक आंदोलनाचा असला तरी काँग्रेसी नेत्यांची एकूण चालचलणूक अशी होती, की ज्यामुळे लोकांना टोकापर्यंत जाऊन वाटेल ते करण्याचा आदेश मिळाला, असा सरकारी युक्तिवाद होता.

इंग्रज सरकारच्या या आरोपाच्या काँग्रेसने स्पष्टपणे इन्कार केला. आमचे आंदोलन शांततामय झाले असते. सरकारने धरपकडीस सुरुवात केली ही मोठी दुर्दैवाची गोष्ट आहे. खरे म्हणजे सरकार आणि काँग्रेस यांच्या भूमिकेत फार मोठी तफावत होती अशी भूमिका काँग्रेसने घेतली आणि त्यात सत्याचा मोठा भाग असावा.

**घातपातात आक्षेपार्ह काय?**

एक मोठी गमतीदार गोष्ट घडली. आंध्र प्रदेश काँग्रेसने काढलेले एक परिपत्रक सरकारने प्रसिद्ध केले. त्यात सविनय कायदेभंगाच्या आंदोलनाचा भाग म्हणून करायच्या कार्यक्रमांची यादी दिली होती. टेलिफोन आणि तारा तोडणे, रेल्वेचे रुळ उखडणे, पूल तोडणे, आगगाडीत धोक्याच्या साखळ्या ओढणे, पोलिस व इतर सरकारी नोकरांस राजीनामे देण्यास भाग पाडणे, हरताळ, दारू दुकानबंदी, युद्धकार्यास अडथळे इ. इ. पत्रकावरून घातपात-प्रकारांत काँग्रेसचा अधिकृत भाग होता हे स्पष्ट होते असा सरकारचा आरोप. गांधीजींनी या आरोपाला दिलेले उत्तर मोठे मासलेवाईक आहे. ते म्हणाले,

''या विषयावर मी काहीच बोलू नये, कारण मला अटक होण्यापूर्वी या परिपत्रकाची काही माहिती नव्हती. म्हणून या विषयावर मी हातचे राखून बोलत आहे. एवढी प्रस्तावना केल्यानंतर मला असे वाटते, की एकूण पाहता

त्यात आक्षेपार्ह काही नाही. कारण या पत्रकात चळवळ अहिंसावादी आहे आणि गांधींनी आदेश दिल्याखेरीज कोणत्याही कार्यक्रमाला सुरुवात करायची नाही असे स्पष्ट म्हटले आहे."

इ. स. १९४२ च्या क्रांतीचे नेते आता जीवित नाहीत किंवा कार्यशाली नाहीत, ४४-४५ सालच्या सुमारास भारतातील तरुणांवर जयप्रकाश नारायण, अच्युतराव पटवर्धन यांचा मोठा प्रभाव होता. युद्ध संपले, स्वातंत्र्यदानाची प्रक्रिया सुरू झाली. स्वातंत्र्य लवकर आले नाही तर अहिंसावादी स्वराज्य आंदोलन संपले आणि ४२च्या जहालांच्या हाती तिचे नेतृत्व जाईल अशी धास्ती नेहरू-पटेलांनासुद्धा पडली होती. घाईत त्यांनी फाळणीदेखील कबूल करून टाकली. त्याचे एक कारण ४२ च्या क्रांतिकारकांबद्दलची काँग्रेस नेतृत्वाची धास्ती, हे उघड आहे.

काळाचा महिमा असा की, काँग्रेसच्याच पंतप्रधानांना एका काळी काँग्रेसनेच नाकारलेले पितृत्व स्वीकारावे लागले.

*(२१ नोव्हेंबर १९९३)*

◆◆

# हे 'अग्निदिव्य' आवश्यक आहे

महाराष्ट्राचे विद्यमान आणि शेवटच्या मोजणीपर्यंत पूर्वी तीन वेळचे मुख्यमंत्री, देशाचे माजी रक्षामंत्री आणि पंतप्रधानपदाचे प्रथम इच्छुक माननीय शरदचंद्ररावजी पवार यांचं अभिनंदन करण्याचा प्रसंग तसा दुर्मिळ असतो. आज असा प्रसंग उभा राहिला आहे. पवारसाहेबांचं मोकळ्या मनानं अभिनंदन केलं पाहिजे.

पवारसाहेब कुशल राजकारणी आहेत. जन्मदू बुद्धीची तल्लखता, निसर्गसुलभ बहुश्रुतता त्याबरोबर प्रतिभावान, व्यासंगी मंडळींना पदरी बाळगण्याची हातोटी या गुणांनी त्यांचं नेतृत्व असाधारण मानलं जातं. महाराष्ट्राच्या प्रत्येक मतदारसंघातील काँग्रेसचे कार्यकर्ते आणि त्याहीपेक्षा विरोधी पक्षातील कार्यकर्ते यांची त्यांना खडान्‌खडा बित्तंबातमी. सरकारी नोकरवर्गापैकी बहुतेकांशी चांगली बैठकीच्या घसटीतली जानपहचान. साहेबांनी एखादी इच्छा व्यक्त केली की ती पुरेपूर पाळण्याकरता तनमनाची नसली तरी धनाची बाजी लावायला अनेक कार्यकर्त्यांचे ताफेच्या ताफे सज्ज असतात. पवारसाहेब निसर्गसिद्ध नेते आहेत, हे त्यांच्या शत्रूलाही कबूल करावं लागेल.

पण या नेतृत्वावर एक सावट पडलेलं आहे. सार्वजनिक कामामध्ये साहेबांनी पैसा भरपूर जमा केला आहे अशी लोकांत वर्षानुवर्षे वदंता आहे. खरं खोटं काय याचा तपास, निवाडा करणं सर्वसामान्यांना शक्य नसतं; पण संशयाचा फायदा साहेबांना मिळत नाही. हजार वेळा हजार लोकांनी आरोपांची चिखलफेक केली की, साहजिकच थोडातरी चिखल चिकटतोच. सगळ्या गप्पांत काहीतरी तथ्य असलंच पाहिजे असं लोकांना वाटू लागतं. काँग्रेस पक्षातील साहेबांच्या सहकाऱ्यांकडे हा विषय काढला तर ही मंडळी झटकून निषेध करत नाहीत. आपल्या नेत्याच्या सच्छिल चारित्र्यावर अशी चिखलफेक केल्याबद्दल नैतिक संतापानं कधी पेटतही नाहीत. त्यामुळे लोकांचा संशय बळावतो. साहेबांच्या

अंगावर चिकटलेला चिखल फेकलेल्या चिखलापेक्षा जास्त आहे.

राजीव गांधींच्या पंतप्रधानकीच्या उत्तर काळात शरद पवारांच्या स्वामीनिष्ठेविषयी शंकेचं वादळ उठलं होते. दिल्लीमध्ये आणि महाराष्ट्रातही साहेबांनी जमा केलेल्या रकमेचा हिशेब आणि वाटा यावरून हे वादळ उठलं होतं असं उघडउघड म्हटलं जाई. अरबी भाषेतील सुरस कथांत संपत्तीची अफाट वर्णनं असतात. तसंच साहेबांच्या संपत्तीविषयी लोकांत वारेमाप अफलातून आकडे सांगितले जातात. १५००–१६०० कोटी इथपर्यंत आकडे बोलले जातात.

साहेबांचा भूखंड प्रकरणाबद्दलही मोठा गवगवा आहे. त्यांची शहानिशा जनता दल शासनाच्या काळात होण्याची वेळ आली होती; पण त्या शासनात साहेबांचे दोस्त इतके, की चौकशीचा प्रस्तावच फेटाळला गेला.

सापांच्या आणि भुतांच्या कथा सांगितल्या जाऊ लागल्या की, एकेक श्रोता आपल्या किंचित अनुभवांचेसुद्धा रसभरीत वर्णन करतो. तसंच चारचौघांत, चावडीत हा विषय निघाला की होतं. कोणी आपल्या चुलतभावाच्या मामाच्या मित्राच्या मालकांचा संदर्भ देऊन बदलीकरता पैसे कसे द्यावे लागले याची ऐकीव किंवा कपोलकल्पित कथा आग्रहानं सांगतो. कोणी इस्त्रायलच्या शस्त्रांच्या खरेदीबद्दल कमिशन मागितल्याची खास आतल्या गोटातील माहिती मोठ्या गंभीर स्वरात सांगतो. सुरेश कलमाडी, माधव आपटे अशी भारदस्त नावंही मध्ये फेकली जातात. त्यामुळे गप्पाटप्पांना वजन येतं.

मुंबईतील बॉम्बस्फोटानंतर साहेब दिल्लीहून मुंबईला परत आले तेव्हापासून कंड्या पिकवण्याला ऊत आला आहे. ठाकूर, कलानी यांना साहेबांनीच आमदारकी दिली, जे. जे. इस्पितळातील प्रकरणातले मारेकरी खुद्द साहेबांच्याच विमानातून लखनौहून मुंबईला आले; पप्पू कलानीच्या विश्वस्त निधीकडून चांगली सज्जड रक्कम साहेबांच्या एका संस्थेने घेतली. ती कर्जाऊ घेतल्याचं नंतर सांगण्यात आलं. या असल्या घटनांमुळे महाराष्ट्राचे राजकीय वातावरण संशय, अफवा यांनी बरबटून गेले आहे. साहेब दिल्लीहून मुंबईला आले तेच मुळी मुंबईतील बॉम्बस्फोटांची चौकशी त्यांचे आणि त्यांच्या दोस्तांचे दाऊद इब्राहिम टोळीशी असलेले लागेबांधे जगजाहीर न होता व्हावी या उद्देशानं, येथपर्यंत अफवा पिकवणाऱ्यांची मजल गेली. साहेब इस्त्रायल भेटीत खुद्द दाऊद इब्राहिमशी गाठभेट घेऊन आले अशी बातमी एका पाकिस्तानी सूत्राकडून प्रसिद्ध झाली तेव्हा तर महाराष्ट्राच्या राजकारणाचे खरे सूत्रधार दाऊद आणि अरुण गवळी हेच आहेत, असं बोललं जाऊ लागलं.

साहेबांनी हजारो कोटी रुपये जमा केले आहेत, माफिया गुंडांशी त्यांचे घनिष्ठ संबंध आहेत, भूखंड इत्यादी प्रकरणांत त्यांनी भरपूर कमाई केली आहे, अशा बहुतांशी निराधार वावड्यांनी साहेबांवर मोठा अन्याय केला. कोर्टात गुन्हेगार म्हणून उभे राहावं लागलं तर काही साक्षीपुरावा होतो; स्वतःचा पक्ष मांडण्याची, बचाव करण्याची संधी आरोपीला मिळते. साहेबांना अशी संधीही मिळाली नाही. त्यांच्यावर जनापवादाने खटला चालला आणि ते संशयित असल्याचा सगळीकडे समज झाला. देशभरात त्यांची प्रतिमा कर्तबगार पण बेभरवशाचा आणि भालगड्या अशी झाली आहे. मराठी माणूस पंतप्रधान होण्याची शक्यता त्यामुळे दुरावली आहे.

दैनिक 'लोकसत्ता'चे माजी संपादक माधव गडकरी यांनी या विषयावर एक लेख १५ मे च्या 'लोकसत्ता'त लिहिला. त्याला उत्तर देताना साहेबांनीही या विषयावर मोठी खंत व्यक्त केली. अफवांच्या या वावटळीनं महाराष्ट्राचा विकास करण्याचं त्याचं स्वप्न मागे पडत आहे याबद्दल दुःख व्यक्त केलं.

हे सगळं संपवण्याची संधी साहेबांपुढे चालून आली आहे आणि ती त्यांनी लगेच पकडली. साहेबांचं अभिनंदन याकरता केलं पाहिजे. मुंबई महानगरपालिकेचे उपायुक्त गो. रा. खैरनार 'जनतेचे हिरो' झाले आहेत. मुंबईतील बॉम्बस्फोटासंबंधी श्रीकृष्ण आयोगासमोर बोलताना त्यांनी मुख्यमंत्र्यांवर काही आरोप केले. त्यानंतर अण्णासाहेब हजारे यांच्यातर्फे पुण्यात ३० मे रोजी भरवलेल्या भ्रष्टाचार-विरोधी बैठकीत साहेबांवर कमालीच्या निर्भीडपणे जाहीररित्या आरोप केले आहेत. साहेबांनी किमान १००० कोटी रुपयांची माया जमवली आहे. त्यांचे आणि त्यांच्या मित्रांचे गुंड टोळयांशी संबंध आहेत. साहेबांचे गतजीवन वाल्याकोळयाप्रमाणे असल्यानं त्यांनी आता वाल्मिकी बनावं, असा सल्लाही त्यांनी साहेबांना दिला. भ्रष्टाचाराचा लढा कारकून, सब-इन्स्पेक्टर यांच्याविरुद्ध न लढवता शिखरस्थानाविरुद्धच लढवला गेला पाहिजे, असंही सुचवलं.

या आव्हानाला मुख्यमंत्र्यांनी मोठ्या तडफेने आणि तिरीमिरीनं उत्तर दिलं. खैरनार साहेबांबर फौजदारी आणि दिवाणी खटले लावण्याचा आपला मनोदय जाहीर केला. खैरनारांनीही हे आव्हान स्वीकारलं आणि आपल्याजवळ असलेली सर्व माहिती आपण न्यायालयात सादर करू, प्रत्यक्ष नसला तरी परिस्थितीजन्य पुरावा सज्जड आहे, असं जाहीर केलं.

महाराष्ट्राच्या अलीकडील राजकीय इतिहासात घडलेली ही मोठी शुभ घटना आहे. या एकाच खटल्यामुळे पवारसाहेबांना आपल्या चारित्र्याची शुद्धता

पटवण्यासाठी ‘अग्निदिव्य’ करून दाखवण्याची संधी मिळणार आहे. प्रार्थना एवढीच की, आता यानंतर पवारसाहेबांनी मागे हटू नये. मोठ्या तडाखेबाज घोषणा करायच्या आणि प्रत्यक्षात काहीच करायचं नाही ही त्यांची खास शैली आहे. औरंगाबादच्या प्रकरणानंतर बाळासाहेब ठाकरे यांना अटक करणार, असं त्यांनी जाहीर केलं. एवढंच नव्हे तर आठ दिवसांच्या आत अटक होणार अशी घोषणा केली. आजतागायत अशी अटक झालेली नाही. खैरनारांच्या घोषणांनी विकल्पच राहिला नाही म्हणून साहेबांनी खटल्याची भाषा वापरली; प्रत्यक्षात हळूहळू एकएक पाऊल मागे टाकत साहेब पदर सोडवून घेतील. अशी कुजबुज आहे. ती खरी ठरली तर साहेबांच्या आणि महाराष्ट्राच्या इतिहासात मोठी दुर्दैवी घटना ठरेल. साहेबांचा निर्णय योग्य आहे. त्यांनी शक्य तितक्या तत्परतेनं खटला लावला पाहिजे. एवढंच नव्हे तर दिलदारपणे मध्यंतरीच्या काळात खैरनारांविरुद्ध शिस्तभंगाची कारवाई महानगरपालिका आयुक्त यांच्यामार्फत करण्याचा मर्दाला न शोभणारा डाव सोडून द्यावा.

खैरनार साहेबांनाही एक विनम्र सूचना करावीशी वाटते. ते प्रत्यक्षात काय बोलले याबद्दल चर्चा यापुढे होऊ नये. “मी असं म्हटलंच नव्हतं,” “पत्रकारांचा गैरसमज झाला,” “त्यांनी दिलेली बातमी चुकीची आहे.” असली मखलाशी यापुढे नको. त्यांना जे काही म्हणायचं आहे ते त्यांनी स्पष्टपणे लेखी लिहून प्रसिद्ध करावं आणि लिखाणाचे परिणाम भोगण्याची आपली तयारी आहे, असं जाहीर करावं. खैरनार यांनी महाराष्ट्राचा ‘एमिल झोला’ बनावं.

फ्रेंच आरमारातील एक उच्चाधिकारी ॲडमिरल ड्रेफस याच्यावर शत्रूशी संगनमत केल्याचा आरोप ठेवण्यात आला; त्याच्यावर खटला चालला, त्याला शिक्षाही झाली; पण या सगळ्या प्रकरणात काही गोलमाल आहे, वरिष्ठ राजकीय नेत्यांनी आपली चामडी वाचवण्याकरता ड्रेफसचा बकरा बनवला आहे, अशी पक्की धारणा आम जनतेची झाली. ड्रेफसवरील मुकदमा पुन्हा एकदा चालावा, अशी सार्वत्रिक मागणी होऊ लागली; पण कोणी दाद देईना. एमिल झोला हा त्या काळात दिगंत कीर्ती पावलेला फ्रेंच लेखक. त्याने या विषयावर एक लेख लिहिला आणि त्या लेखाचे शीर्षक होते ‘मी आरोप करतो की,’ (J'accuse.) लेखातील प्रत्येक परिच्छेदाची सुरुवात याच वाक्यानं होईल, “मी आरोप करतो की,” प्रत्येक परिच्छेदात त्यांनी राजकीय पुढाऱ्यांवर इतके खणखणीत आरोप ठेवले की त्याच्याविरुद्ध बदनामीचा खटला भरण्याऐवजी गत्यंतर राहिलं नाही. आपण कोणाच्याही अब्रूची नुकसानी केलेली नाही. आपण जे लिहिलं त्याला

सबळ आणि सज्जड कारणं आहेत, पुरावा आहे असा युक्तीवाद एमिल झोलानं कोर्टापुढे केला. कोर्टात साक्षीपुरावे मांडले जाऊ लागले. अनेकजण भीती, संकोच बाजूला ठेवून कोर्टासमोर येऊन बोलू लागले. परिणाम असा झाला की, खटला कागदोपत्री एमिल झोलावर; पण प्रत्यक्षात ड्रेफसचं सारं प्रकरण पुन्हा एकदा उघडलं गेलं. एमिल झोला निर्दोष ठरले एवढंच नाही तर ड्रेफसलाही निर्दोष म्हणून तुरुंगातून सोडावं लागलं.

महाराष्ट्रात आजच्या बिकट काळी आलेल्या काळयाकुट्ट ढगांचं सावट दूर करण्याची चांगली संधी आली आहे. खरं म्हटलं तर मुख्यमंत्र्यांनी हा खटला सरकारी वकिलांची आणि यंत्रणेची मदत न घेता लढवायला हवा. त्यांनी सरकारी म्हणून हा खटला चालवला तर काही प्रतिष्ठित व्यक्तींनी पुढे होऊन आम मराठी जनतेला पवारसाहेबांविरुद्ध काय साक्षीपुरावे असतील ते घेऊन पुढे येण्याचं आवाहन करावं. म्हणजे खैरनारांवरील अब्रुनुकसानीच्या खटल्यात काय ती सगळी घाण एकदाच वाहून जाईल आणि सारा महाराष्ट्र निर्मळ स्वच्छ वातावरणात साहेबांना प्रिय असलेल्या विकासाकडे पावलं टाकू लागेल. साहेबांची हीच इच्छा असावी आणि खैरनारांनी आजपर्यंत अनेक प्रकरणी मोठं धैर्य आणि निश्चय दाखवला आहे. ते साहित्यिक नाहीत, साधे नोकरदार आहेत तरीही महाराष्ट्राचे 'एमिल झोला' बनणं त्यांना शक्य आहे.

*(७ जून १९९४)*

◆◆

# आता कुटुंबकल्याणाचे कल्याण

## बुखारेस्ट ते कैरो

सगळ्या क्षेत्रात कुचकामी ठरलेली शासन व्यवस्था स्वत:कडे भलतीच मोठी जबाबदारी घेऊ पाहात आहे. आरोग्य आणि शिक्षण या विषयांत सरकारची काही विशेष जबाबदारी आहे, असे पंतप्रधानांनी जाहीर केलेच आहे. बरोबरीने कुटुंबकल्याणातही मोठ्या प्रमाणावर हात घुसवण्याचे घाटते आहे, त्यासाठी मोठे आंतरराष्ट्रीय कारस्थान शिजते आहे.

सप्टेंबर १९९४ मध्ये कैरो शहरी संयुक्त राष्ट्र संघातर्फे लोकसंख्याविषयक दुसरी जागतिक परिषद भरणार आहे. वीस वर्षांपूर्वी बुखारेस्ट येथे या विषयावरील पहिली जागतिक परिषद भरली त्यावेळी, म्हणजे १९७४ साली जगाची लोकसंख्या ४०० कोटी होती. दरवर्षी ती ८ कोटीने वाढत हाती. लोकसंख्येच्या या महापुरावर तोडगा काढणे हा आणिबाणीचा प्रश्न समजून बुखारेस्ट येथे त्यावर चर्चा झाली. लोकसंख्यावाढीला आळा घालण्यासाठी केवळ कुटुंबनियोजन करून भागणार नाही; व्यापक आर्थिक-सामाजिक कार्यक्रम राबवावा लागले, स्त्रियांचा सामाजिक दर्जा उंचावला पाहिजे, आरोग्यसेवा सहजपणे उपलब्ध झाल्या पाहिजेत आणि गरिबी हटवली पाहिजे असे दूरदर्शी ठराव करण्यात आले. या ठरावांचा लोकसंख्या प्रश्नावरील जगभरच्या विचारधारेवर मोठा प्रभाव पडला होता.

### लेकुरे उदंड जाहली

बुखारेस्ट परिषदेनंतरच्या दोन दशकांत आफ्रिकेतील काही देश सोडल्यास एकूण जगातील दारिद्र्यरेषेखालील लोकांची टक्केवारी कमी झाली आहे. तंत्रज्ञानाच्या प्रगतीने अन्नधान्याचे उत्पादन वाढले आहे. सर्वसाधारण माणसाच्या जेवणाची प्रत सुधारली आहे. स्त्रियांच्या दर्जाचा प्रश्न आता महत्त्वाचा मानला जातो. महिलाविषयक आदिसअबाबा जागतिक परिषेदनंतर स्त्रियांच्या प्रश्नाबद्दलची

जाणीव वाढली आहे. कुटुंबनियोजन आणि गर्भनिरोध, गर्भपात या विषयांची चर्चा करताना कोणाचा जीव घाबरा होत नाही. उलट, निरोधाच्या साधनांच्या सार्वजनिक जागी लावलेल्या प्रचंड जाहिराती थोड्या कमी स्पष्ट असतील तर बरे अशी परिस्थिती झाली आहे.

बुखारेस्ट येथे सुचवलेल्या उपाययोजनांची अंमलबजावणी बऱ्यापैकी झाली आणि तरीही लोकसंख्येचा प्रश्न अधिकच भेडसावणारा झाला आहे. जगाची लोकसंख्या आज ५६० कोटी आहे आणि दरवर्षी नऊ कोटीने ती वाढते आहे. येत्या ५० वर्षांत जगाची लोकसंख्या दुप्पट झाली तर एवढ्या तोंडांना खाऊ घालण्यास पुरेसे अन्न, पिण्यास पुरेसे पाणी, एवढेच काय, श्वास घेण्यासाठी पुरेशी स्वच्छ हवा यांचा पुरवठा पडेल किंवा नाही याबद्दल जबरदस्त शंका आहे.

या काळात कुटुंबनियोजनाचे कार्यक्रमही मोठ्या प्रमाणात ताकदीने राबवले गेले. कुटुंबनियोजनाची साधने सहज उपलब्ध झाली, कुटुंबनियोजन करणाऱ्यांना प्रोत्साहन मिळाले, कुटुंब वारेमाप वाढू देणाऱ्यांना काही शिक्षा-दंड बसला, कुटुंबनियोजनाच्या आवश्यकतेचा जोरदार प्रचार झाला, तरीही लोकसंख्या वाढीची गती फारशी कमी झालेली नाही. दारिद्र्य कमी झाले; कुटुंबनियोजनाचे कार्यक्रम राबवले गेले; पण लोकसंख्येची समस्या काही आटोक्यात आली नाही. याच्या कारणांचा शोध कैरो परिषदेत घेतला जावा अशी अपेक्षा होती.

'एक या दो बस्', 'आम्ही दोन आमचे दोन' इत्यादी घोषणा प्रचाराच्या हरएक माध्यमातून कानावर, डोळ्यांवर आदळत आहेत. मुलीच्या विवाहाचे किमान वय १८ वर्षे करण्यात आले आहे. संजय गांधींच्या काळात नसबंदी करणाऱ्याला मर्फी रेडिओ, रोख बक्षीस आणि न करणाऱ्याची सक्तीने नसबंदी असाही कार्यक्रम राबवला गेला; पण फारसा यशस्वी झाला नाही. उलट, लोकांची प्रतिक्रिया इतकी कठोर की लेकाच्या कर्तबगारीची किंमत आईला द्यावी लागली आणि सारे सरकार कोसळून पडले. कुटुंबनियोजनाच्या कार्यक्रमाची सक्तीची अमलबजावणी करणाऱ्या चीनसारख्या देशातही तो फारसा यशस्वी झाला नाही. तरीही प्रत्यक्षात संजय गांधी पद्धतीच्या नियोजनाची तरफदारी या परिषदेकडून करून घेण्याचे प्रयत्न चालू आहेत.

**गरिबांना पोरे जड वाटत नाहीत**

बुखारेस्टनंतर, कुटुंबनियोजनाचे सगळ्यात चांगले साधन म्हणजे आर्थिक सुबत्ता अशा विचाराकडे जग झुकू लागले होते. आजपर्यंत कोणत्याही गरीब

देशात लोकसंख्येची वाढ आटोक्यात आलेली नाही. गरीब आईबापांना एक मूल नवीन जन्मास घालण्यात खर्चापेक्षा लाभ जास्त आहे असे वाटते, तोपर्यंत कुटुंबनियोजनाचा कार्यक्रम लोक कसोशीने राबवण्याची शक्यता नाही. जन्मलेले मूल रोगाने, आजाराने दगावणार नाही याची काही शाश्वती नसली की निदान दोन मुलगे आणि एखादी तरी मुलगी असावी अशी आईबापांची धारणा राहते. याउलट, संपन्नता आली, चांगले जीवन जगण्याची गोडी लागली की, मुलांच्या संख्येपेक्षा त्यांची गुणवत्ता अधिक महत्वाची वाटू लागते आणि आईबापे कसोशीने नियोजन करतात. युरोप खंडातील आजच्या सुधारलेल्या देशांत एका काळी लोकसंख्या वाढीची गती अतिप्रचंड होती, इतकी की, तेथील संततीने अमेरिका, आफ्रिका, ऑस्ट्रेलिया असे प्रचंड खंड व्यापून टाकले. औद्योगिक क्रांतीनंतर संपन्नता आली आणि लोकसंख्या वाढण्याचे तर सोडाच. प्रत्यक्षात घटू लागली; लोकसंख्या वाढावी यासाठी सरकारे प्रयत्न करू लागली.

**नोकरशहांचे दुःख**

हा अनुभव लक्षात घेता, सुबत्ता हे सगळ्यात प्रभावी निरोधाचे साधन आहे, या विचाराला अधिकाधिक मान्यता मिळत आहे. या मान्यतेमुळे साहजिकच सरकारवाद्यांना मोठे दुःख झाले. लोकसंख्यावाढ हे दारिद्र्याचे कारण नाही, परिणाम आहे, असे म्हटले की तिसऱ्या जगातील सरकारांच्या अब्रूची लक्तरे वेशीवर टांगली जातात. लोकसंख्या हा विकासाप्रमाणेच आपोआप सुटणारा प्रश्न आहे, सरकारी लुडबुडीचे त्यांत काही प्रयोजन नाही, असे म्हटले तर सरकारशाहीवर व नोकरशाहीवर आघातच होतो. लोकसंख्या हा मोठा भयानक प्रश्न; ते हातळण्यासाठी एक वेगळे मंत्रालय पाहिजे; एक वेगळा आयोग पाहिजे, देशभर नोकरशाही संस्थांचे जाळे पाहिजे, मर्फी रेडिओ वाटण्याची व्यवस्था पाहिजे, नसबंदी किंवा टाकेबंदी केल्याबद्दल पैसे वाटण्याचा अधिकार नोकरदारांकडे पाहिजे, खोटे आकडे दाखवून पैसे गडप करता आले पाहिजे, अशी साहजिकच सरकारवाद्यांची इच्छा आहे.

कैरो येथे पुढील महिन्यात होणारी परिषद त्यांच्या दृष्टीने फार महत्त्वाची आहे. पर्यावरण, स्त्रीमुक्ती याप्रमाणे लोकसंख्येवर नियंत्रण ही सबब सरकारशाही अखंडितपणे पुढे चालवण्यासाठी सोयीस्कर आहे, हे बरोबर हेरून पावले टाकली गेली आहेत.

**भातशेती काय, लोकसंख्या काय?**

कैरोची परिषद जवळ आली तसे भारताचे लोकसंख्याविषयक धोरण तयार

करण्याची दिल्लीच्या सरकारी सदनात मोठी घाई उडाली. या विषयाचा अभ्यास करण्याकरिता एक समिती तातडीने नेमण्याचे ठरले. दिल्लीच्या सचिवालयात काही व्यावसायिक तज्ज्ञ मंडळी ठिय्या मारून बसलेलीच असतात. विषय कोणताही असो, तज्ज्ञांची समिती नेमायची आहे काय? आम्ही तयार बसलो आहोत असे म्हणणारी व्यावसायिक तज्ज्ञ मंडळी टपून बसलेलीच असतात. हनुमंतराव, स्वामीनाथन अशी मंडळी कोणत्याही एका वेळी दोनतीन समित्यांवर नेमली गेलेली असतातच. लोकसंख्याविषयक समिती नेमायचे ठरले आणि त्याचे प्रमुख म्हणून नेमणूक झाली एम्. एस्. स्वामीनाथन यांची. भाताच्या नवीन जाती शोधण्याच्या क्षेत्रात काही संशोधन केलेले डॉक्टर स्वामीनाथन लोकसंख्या समितीचे अध्यक्ष बनले.

समितीने एक अहवालही देऊन टाकला. एका हातात गाजर, दुसऱ्या हातात छडी, एका हातात मर्फी रेडिओ, दुसऱ्या हातात नसबंदीची सुरी असल्या संजय गांधी तोंडवळ्याच्या धोरणाचा नवा अवतार स्वामीनाथन समितीने सुचवला आहे. कुटुंबकल्याणाचा कार्यक्रम निवृत्त लष्करी जवानांकडे असावा. दोनपेक्षा जास्त मुले असलेल्यांना सरकारी नोकरीत प्रवेश नसावा, निवडणुका लढविण्याचा अधिकार नसावा. दिल्ली येथे लोकसंख्या प्रश्न हाताळण्यासाठी एक स्वायत्त महाआयोग असावा, अशा येनकेन प्रकारेण सरकार या संस्थेची बांडगुळे मजबूत करणाऱ्या शिफारशी स्वामीनाथन समितीने दिल्या आहेत.

नोकरशहांखेरीज दुसरा एक गटही बुखारेस्ट परिषदेवर नाराज होता, नियोजनाची साधने तयार करणाऱ्या कारखानदारांचा. कुटुंबनियोजनाचे सर्वात प्रभावी साधन सुबत्ता आहे असे म्हटले की या कारखानदाऱ्यांच्या खजिन्यालाच हात घातल्यासारखे होईल. नोकरशहा आणि कारखानदारांचा एक गट कैरो येथील परिषदेत लोकसंख्येचे नियोजन सुबत्तासिद्ध नाही, त्यासाठी मोठी यंत्रणा उभारली पाहिजे असे दाखवण्याचा मोठा आटोकाट प्रयत्न करणार आहे.

**बादरायणी संबंध**

संयुक्त राष्ट्रसंघाच्या प्रमुख सचिवालयातील लोकसंख्येच्या प्रश्नावरील विभागाच्या प्रमुख श्रीमतीजींनी स्वत:च याबाबतीत पुढाकार घेतला आहे. सचिवालयातर्फे कैरो परिषदेस सादर होणाऱ्या अहवालात सुबत्ता हेच सर्वात प्रभावी नियोजन या कल्पनेवर हल्ला करण्यात आला आहे असे कळते. त्यासाठी एक संख्याशास्त्रीय अभ्यासाचा आधार घेतला असल्याचेही समजते. मेक्सिकोतून अमेरिकेत येऊन लॉस एंजलिस येथे स्थायिक झालेल्या कुटुंबाच्या पाहणीत

त्यांची लोकसंख्यावाढीची गती मेक्सिकोत राहिलेल्या गरीब शेतकऱ्यांपेक्षा जास्त आहे असे दिसून आले. यावरून संपन्नतेमुळे लोकसंख्या वाढीची गती अधिक होते असे प्रतिपादन करण्याचा प्रयत्न तुटपुंज्या मोडक्यातोडक्या आकडेवारीच्या आधाराने करण्यात आला आहे.

एकट्यादुकट्या पाहणीवर एवढा मोठा निष्कर्ष काढणे संख्याशास्त्रास धरून नाही. एका देशातून दुसऱ्या देशात जाऊन सुबत्ता मिळवणाऱ्या लोकांची वागणूक देशातल्या देशातच विकास साधणाऱ्या लोकांसारखीच असेल असे गृहीत धरणेही चुकीचे आहे. संपन्नता मिळालेल्या कुटुंबात पहिल्या पिढीची वर्तणूक नव्या अनुभवाने थोडी थोडी अस्ताव्यस्त होण्याची शक्यता असते, तसेच विदेशी स्थायिक झालेल्या पहिल्या पिढीचे असते. नवी संपन्नता टिकून राहणार आहे असा आत्मविश्वास आलेल्या नंतरच्या पिढीत मात्र मुलांची संख्या कमी करण्याचा प्रयत्न जाणीवपूर्वक होतो. मेक्सिको ते लॉस एंजिलिस हे अंतर तसे लहान आहे. अमेरिकेत स्थायिक झालेले मेक्सिकन वारंवार आपल्या मायदेशी भेटीसाठी परततात. त्यांच्या पाहणीवरून काढलेला निष्कर्ष हिंदुस्थानी लोकांसारख्या लांबवरून येऊन स्थायिक झालेल्या आणि पाच दहा वर्षांनी क्वचितच मायदेशी भेट देणाऱ्या कुटुंबांना लागू पडणार नाही. या साऱ्या गोष्टी अगदी स्पष्ट आहेत. तरीही मेक्सिकन लोकांच्या एका किरकोळ पाहणी अभ्यासाचा उपयोग बुखारेस्ट परिषदेचे सारे निर्णय उलथवण्यासाठी कैरो येथे होणार आहे.

**हा खेळ आगीशी**

या बंडामागे कुटुंबनियोजन क्षेत्रातील उद्योजक आहेत, संयुक्त राष्ट्रसंघाचे सचिवालय त्यांनी ताब्यात घेतलेले दिसते. देशोदेशाचे स्वामीनाथन आणि सरकारशाहीवादी त्यांच्यामागे उभे आहेत. कैरो परिषदेत गाजर-दंडा पद्धतीच्या उपायावर भर दिला जाईल. मध्यममार्गी तृतीयपंथी हिंदुस्थान सरकारला तो सोयीचा वाटेल. लोकसंख्या नियंत्रणाचा प्रश्न सरकारी यंत्रणेकडे राहिला तर येत्या ५० वर्षांत लोकसंख्या दुप्पट होईल आणि अन्न, पाणी, हवा यांच्या पुरवठ्याचा गंभीर प्रश्न तयार होईल हे नक्की.

*(६ सप्टेंबर १९९४)*

◆◆

# महात्माजींचा पराभव

माझं सुदैव म्हणा की दुर्दैव, आयुष्यात मला कोण्या महात्म्याचं दर्शन झालं नाही. गांधीजी गेले तेव्हा मी लहान होतो, विद्यार्थी होतो त्यामुळे त्यांच्या दर्शनाचा योग आला नाही. मोठा झाल्यानंतर मी माझ्या कामाला लागलो. दरम्यान, काही महात्मे समोर येऊन गेलेही असतील पण त्यांचं महात्म्य मला जाणवलं नसावं म्हणून मला दुर्दैवी म्हणा. नंतर कदाचित लक्षात येईल की, अमुक एक व्यक्ती भेटली होती आणि ती महात्मा होती; पण आजपर्यंत असं जाणवलं नाही.

याला एक अपवाद आहे. त्यांची भेट झाली होती म्हणणं कठीण आहे; पण रविशंकर महाराजांचं जेव्हा दर्शन झालं तेव्हा ते त्यांच्या अखेरच्या आजारपणात होते. बिपीनभाई मला त्यांच्यासमोर घेऊन गेले. रविशंकर महाराजांना बोलताना कष्ट होत होते, ऐकू येण्यातही अडचण होती, पण त्यांची बुद्धी स्वच्छपणे काम करीत होती. बिपीनभाईंनी जेव्हा माझं नाव सांगितलं तेव्हा माझं नाव शेतकरी आंदोलनाशी जोडलेलं आहे याची त्यांना माहिती असल्याचे जाणवले. हे एक उदाहरण सोडलं तर महात्म्यांचं दर्शन होण्याचे भाग्य – सौभाग्य किंवा दुर्भाग्य मला लाभलेलं नाही.

सौभाग्य शब्द मी यासाठी वापरतो की सर्वसाधारण माणसाच्या जीवनावर महात्म्यांच्या संपर्काचा परिणाम काय होत असावा हे सांगणं कठीण आहे; पण अनेक महात्म्यांच्या परिवारांची मती व गती कुंठित झालेलीच पाहायला मिळते.

महाकवि कालिदासांनी रघुवंशाच्या 'इंदुमति स्वयंवर' या अध्यायात उपमालंकाराचा अत्यंत सुरेख आविष्कार दाखविला आहे. राजकन्या इंदुमतीच्या स्वयंवरासाठी बरेच राजपुत्र मंडपात बसले होते. इंदुमतीला घेऊन सुनंदा एका एका राजकुमाराचा परिचय करून देत पुढे पुढे जात होती. जसजशी इंदुमती

एखाद्या राजकुमारासमीप येऊ लागे तसतशी त्या राजकुमाराच्या मनात आशा जागी होत असे की ही मलाच माळ घालील आणि त्याचा चेहरा उजळून जात असे; पण त्याला वगळून ती पुढे जाऊ लागताच त्याचा चेहरा काळवंडून जात असे.

आपल्याही समोर आपल्या आयुष्यभरात काही 'महात्मे' येऊन जात असतील, आपण त्यांचे महात्म्य ओळखू म्हणून त्यांचे चेहरे उजळत असतील आणि आपल्याला त्यांच्यात महात्म्य जाणवले नाही म्हणून ते चेहरा पाडून जात असतील. आपली निराशा होते, त्यांचीही निराशा होत असेल!

महात्मा म्हणजे अंधारामध्ये प्रकाश देणारा दिवा किंवा उन्हामध्ये छाया देणारा वृक्ष होय असे धरले तरी तो जो काही प्रकाश किंवा ती जी काही छाया असेल त्याचा फायदा घेणे, न घेणे सर्वस्वी आपल्यावरच अवलंबून असते.

सूर्य आपला प्रकाश सर्व ठिकाणी सारखाच देतो. सूर्याचे प्रकाशकिरण मातीवर पडले तर ते परावर्तित होत नाहीत; पण तेच किरण जर एखाद्या रत्नावर किंवा हिऱ्यावर पडले तर त्यावरून त्यांचे परावर्तन होते आणि रत्न किंवा हिरा मोठा विलोभनीय दिसतो.

घनदाट सावलीचा वृक्ष रणरणत्या उन्हात चालणाऱ्या वाटसरूसाठी काही काळासाठी विश्रांतिस्थान होऊ शकतो. विश्रांती घेतल्यानंतर पुन्हा नव्या जोमाने आपली वाटचाल तो वाटसरू पुढे चालू करणार असेल तर विश्रांतीचा काही उपयोग झाला असे म्हणता येईल; पण जर का वाटसरू त्या सावलीच्या मोहात पडून तिथेच थांबून राहिला तर तो वृक्ष त्या वाटसरूच्या उपयोगी पडला असं म्हणणं कठीण आहे.

अंधारात एक प्रकाशकिरण चमकला, पुढे पाऊल कसे टाकायचे याचे दर्शन झाले की, त्या प्रकाशकिरणाच्या टप्प्याबाहेरील अंधारातही एखादं पाऊल टाकण्याची हिम्मत आली तर त्या प्रकाशकिरणाच्या जनक दीपाने काही काम केले असे म्हणता येईल; पण त्या दिव्यावरच जीव जडून तेथेच बसून राहिले तर दिव्याचा आपल्याला काही उपयोग झाला असं म्हणणं कठीण आहे.

मला असं वाटतं की, बऱ्याच महात्म्यांच्या बाबतीत दुर्दैवाची गोष्ट ही घडली आहे की, त्यांच्या सावलीमध्ये ज्यांचं लालनपालन व्हायला हवं होतं, त्यामध्ये जे मोठे व्हायला हवे होते आणि मोठे होऊन त्या सावलीतून बाहेर पडून पुढच्या पिढीसाठी ज्यांनी सावल्यांच्या जागा तयार करण्याची हिम्मत करायला हवी होती ते बहुतांशी त्या महात्म्यांच्याच सावलीत विश्रांती घेत बसले. सावलीतून

बाहेर पडण्याची त्यांनी हिम्मत दाखविली नाही.

मी आजवर अनेक वेळा म्हटले आहे की, महात्म्याचं खरं दुर्भाग्य हे की त्यांचा पराभव जगाने नाही केला, त्यांचा पराभव त्यांच्याच शिष्यांनी केला. त्यांचे शिष्य त्यांना पूर्णांशाने समजू शकले नाहीत आणि त्यांच्या समजुतीमध्ये ज्या गोष्टी बसल्या त्याच ते कर्मकांडाप्रमाणे करत बसले. जयंत्या-पुण्यतिथ्या करणे ठीक आहे, त्यांनाही काही महत्त्व असते; पण त्यातच अडकून राहणे आणि महात्म्याला सापडलेला सत्यकण डावलून फक्त त्या महात्म्याची व्यक्तिपूजा करत राहणे यातच महात्म्यांच्या पराभवाची सुरुवात होते.

माझं हे विवेचन बऱ्याच जणांना मान्य होणं अवघड आहे. मी स्वतःला, गांधीजींना सापडलेला सत्यकण जोपासणारा मानतो; पण त्याचबरोबर मी सातत्याने मांडत आलो आहे की कोणा एका व्यक्तीला प्रमाण मानणे आणि असे म्हणणे की कोणत्याही समस्येची उकल कोण्या एका व्यक्तीच्या विचारधारेमध्ये किंवा कोण्या एका ग्रंथामध्ये मिळू शकते हे चूक आहे. असं जर कुणी मनापासून मानत असेल तर त्याचा अर्थ इतकाच की त्या व्यक्तीसमोर खरे प्रश्न अजून आलेच नाहीत. भगवान कृष्ण असो, पुरुषोत्तम राम असो की महात्मा गांधी असोत. कितीही मोठा महात्मा असला तरी तो सांत (Finite) रूप घेऊनच जन्मला होता, कोणीही अनंतर (Infinite) रूपाने जन्मला नव्हता ही बाब जोवर खरी आहे तोपर्यंत सांत महात्म्यांचे दर्शन-विचारप्रणाली अनंत काळपर्यंत चालणारी आहे असं जर कुणी म्हणायला लागलं तर त्याचा अर्थ इतकाच की असं म्हणणारानं अजून विचार करायला सुरुवातच केलेली नाही.

याचप्रमाणे, जे लोक धर्माच्या अभिमानाच्या गोष्टी बोलतात त्यांच्या बाबतीतही हेच आहे. मी त्या धर्माभिमान्यांना मानायला, त्यांच्याबद्दल आदर बाळगायला तयार आहे की ज्या धर्माचा ते सन्मान करतात, अभिमान बाळगतात, गर्व करतात तो धर्म त्यांना जन्माच्या अपघाताने मिळालेला नाही. ज्या धर्मात जन्मला त्याचा अभिमान बाळगताना त्या धर्माचा विचारपूर्वक अभ्यास केला असण्याची शक्यता नसेल असे नाही; पण असा अभ्यास केल्याचे सिद्ध करून दाखवावे लागेल. जो धर्म जन्माच्या अपघाताने मिळालेला नाही त्याबद्दल एखादी व्यक्ती अभिमान बाळगत असेल तर तिने त्या धर्माचा विचारपूर्वक अभ्यास केला आहे असं समजायला हरकत नाही.

गांधीजींच्या एका परमभक्ताबरोबर चर्चा चालली होती. ते म्हणाले की, "आम्ही गांधीजींना एक प्रकारे 'संपूर्ण महात्मा' मानतो." मी जेव्हा म्हटले की,

"मला हे सैद्धांतिकदृष्ट्या अशक्य वाटते." तेव्हा ते म्हणाले, "आम्ही सर्व तऱ्हेने विचारविमर्श करून या निर्णयाप्रत आलो आहोत की गांधीजी 'संपूर्ण महात्मा' होते." मला वाटतं अशी माणसं 'ऊेशीप'ीं ज्ञपेु ींहरीं हश वेशीप'ीं ज्ञपेु' (म्हणजे त्याला समजत नाही की, त्याला समजत नाही.) या प्रकारात बसतात.

मी आग्रहपूर्वक मानतो की गांधीजींना सापडलेला सत्यकण जोपासून पुढे नेणारा मी आहे आणि यातच गांधीजींबद्दलचा माझ्या मनातला परम आदर मी व्यक्त केला आहे. परमेश्वराची कल्पना पिता म्हणून केली तर कोणाही पित्याला आपला मुलगा सकाळ दुपार संध्याकाळ, सर्व काळ आपल्या पायाला हात लावून सतत आपली पूजा करीत राहावा असं वाटणार नाही. अशा पूजेने चांगला पिता खुश होईल असं मला वाटत नाही. त्याचप्रमाणे, महात्म्यांच्या बाबतीतही त्यांची सकाळ, संध्याकाळ पूजा करणे, त्यांनी सांगितलेला शब्द न् शब्द बरोबरच आहे, त्यात चुकीचं काही नाही, असं मानणं म्हणजे त्या महात्म्यांशी केलेला द्रोहच आहे.

महात्म्यांसंबंधी या विवेचनात विशेषकरून मी महात्मा गांधीजींच्या संदर्भात भर देणार आहे. कारण महात्माजींचा अभ्यास गांधीभक्तांप्रमाणे मीही केला आहे. गांधीजींचं जे काही साहित्य माझ्या वाचनात आलं आहे त्यावरून मी ठामपणे म्हणू इच्छितो की 'गांधीजींइतका गतिमान (Dynamec) दर्शन देणारा महात्मा सापडणे विरळाच.'

सेवाग्रामला मी बऱ्याचदा येतो, येत राहणार आहे; यावंसं वाटतं; पण इथे आल्यानंतर एका गोष्टीचे दुःख होतं. खरं तर सेवाग्राम हे एक स्फूर्तिस्थान आहे. इथे माझ्यासारखे, जे गांधीपरिवारातील म्हटले जात नाहीत, आले म्हणजे त्यांच्याही मनामध्ये काही ना काही प्रेरणा उचंबळून येतात; पण एक प्रश्नही उभा राहतो. गेल्या सत्तेचाळीस वर्षांमध्ये, गांधीजींच्या निर्वाणानंतर गांधीपरिवाराने आपली जबाबदारी पार पाडली आहे काय? मला वाटतं कोणीतरी या प्रश्नाचं उत्तर शोधून काढलं पाहिजे.

गेले दोन महिने महाराष्ट्र व गुजरात या दोन राज्यांत मी निवडणुकीच्या प्रचारसभांतून भाषणे करीत फिरतो आहे. प्रत्येक भाषणात काही प्रश्न पुढे ठेवले. त्या प्रश्नांवर विचारविमर्श होणे आवश्यक आहे.

पहिला प्रश्न. गांधीजींची इच्छा सव्वाशे वर्षे जगण्याची होती. आज गांधीजी असते तर ते सव्वाशे वर्षे वयाचे असते. आज जर ते असते तर त्यांनी फक्त पंचा वापरण्याऐवजी अंगभर कपडे वापरायला सुरुवात केली असती का? ते

म्हणाले असते का की, आता देशातील सर्व लोकांना पुरेसे कपडे वापरायला मिळू लागले आहेत, आता मला इतके कमी कपडे वापरण्याची जरूरी नाही?

दुसरा प्रश्न. आज गांधीजी असते तर सेवाग्राममध्येच असते का साबरमतीला परत गेले असते? ते म्हणाले असते का की साबरमती आश्रमातून दांडी यात्रेला निघताना मी प्रतिज्ञा केली होती की देशाला संपूर्ण स्वराज्य मिळेपर्यंत मी या आश्रमात परत येणार नाही; आता देशाला पूर्ण स्वराज्य मिळाले आहे तेव्हा मला साबरमतीला परतायला हरकत नाही?

तिसरा प्रश्न. ज्या स्वातंत्र्यसैनिकांनी देशाच्या स्वातंत्र्यासाठी आत्मबलिदान केले, हौतात्म्य पत्करले त्यांच्या आत्म्याला देशाची आजची परिस्थिती पाहून सुख लाभत असेल का?

महाराष्ट्र आणि गुजरातमधील प्रचारसभांत हे तीन प्रश्न विचारून लोकांकडून त्यांची उत्तरे मागत आलो.

भले, मनमोहनसिंग म्हणोत की आम्ही प्रगती केली आहे किंवा पी. व्ही. नरसिंह राव म्हणोत की आम्ही देशाचा विकास केला आहे; पण मला कोणत्याही सभेत लोकांच्या चेहऱ्यावर या प्रश्नांची होकारार्थी उत्तरे दिसली नाहीत.

अजून एक प्रश्न मी विशेषतः गुजरातमध्ये विचारला.

आज निवडणुकीमध्ये आपल्यासमोर तीन प्रमुख पक्ष आहेत. एक पक्ष आहे, भाजप जो विश्व हिंदू परिषदेशी संबंधित आहे, राष्ट्रीय सेवक संघाशी संबंधित आहे. गांधीजींच्या देहाच्या हत्येची जबाबदारी ज्यांच्यावर टाकली जाते अशा लोकांशी हा पक्ष संबंधित आहे. त्यांच्यातील काही वक्ते आजसुद्धा गांधीजीना शिव्या देतात.

दुसरा पक्ष आहे काँग्रेस. मी गेली १५ वर्षे सातत्याने मांडत आलो आहे की, गांधीजींच्या हत्येनंतर नेहरूंनी देशाचा कारभार एखाद्या सिनेमातील श्रीमंताच्या दिवाणजीने मालकाच्या मृत्यूनंतर केलेल्या कारभाराप्रमाणेच केला. मरणाच्या घटका मोजणाऱ्या श्रीमंताने दिवाणजीच्या हाती विश्वासाने तिजोरीच्या किल्ल्या सोपवून म्हणावे की माझी मुलं लहान आहेत, अजाण आहेत, त्यांची काळजी घे; पण दिवाणजीने मात्र सर्व मालमत्तेवर डल्ला मारून मालकाच्या मुलांना देशोधडीला लावावे. गांधीजींच्या आर्थिक विचारसरणीची हत्या पंडित नेहरूंनी केली. त्या नेहरूंचा काँग्रेस पक्ष सत्तेचाळीस वर्षे या देशावर राज्य करीत आहे. 'समाजवाद' शब्दाची भूल पडल्यामुळे कदाचित, सर्वसामान्यांच्या ही गोष्ट लक्षात आली नसेल; पण जेव्हा नेहरू-गांधीजींचा विचार फेकून देऊन देशाला

चुकीच्या दिशेने घेऊन जात होते – ज्यामुळे देशाचे फार मोठे नुकसान झाले. देश बुडाला आणि आज साऱ्या देशाला कळून चुकलं आहे की ती चुकीची दिशा होती. तेव्हा ती दिशा चुकीची आहे हे देशाला सांगण्याची जबाबदारी स्वत:ला गांधी परिवारातील म्हणविणारांची होती. गांधी परिवाराने गेल्या सत्तेचाळीस वर्षांत आपली ही जबाबदारी पार पाडली आहे का? का तेसुद्धा शासनाकडून मिळणाऱ्या सोयीसवलतीतच गुंतून पडले? नेहरू राजवटीने देशाची, देशातील सर्वसामान्य जनतेची जी लूट केली त्यात अन्यार्थाने गांधी परिवाराचाही काही हात नव्हता ना?

तिसरा पक्ष आहे कांशीरामजींचा बहुजन समाज पार्टी. ते लोक तर आजही गांधीजींना खुलेआम शिव्या देत आहेत. त्यांना म्हटलं की, यात सभ्यपणा नाही, शिष्टाचार नाही तर तेही ते मानायला तयार नाहीत. गांधीजींच्या 'हरिजन' शब्दाचीही ते कुचेष्टा करतात. या पक्षाच्या लोकांनी गांधीजींच्या समाजशास्त्राची हत्या केली आहे.

देश स्वतंत्र झाल्यानंतर सत्तेचाळीस वर्षांनी आज लोकांसमोर तीन पक्ष आहेत – एक गांधीजींच्या देहाच्या हत्येशी संबंधित, दुसरा त्यांच्या अर्थविचाराच्या हत्येशी संबंधित आणि तिसरा त्यांच्या समाजशास्त्राच्या हत्येशी संबंधित. गांधीजींच्या या सेवाग्रामच्या आश्रमामध्ये वृक्ष वाढत आहेत, रोपे वाढत आहेत; इथे सावलीही भरपूर आहे; इथे आल्यानंतर इतिहासाच्या आठवणींना उजाळा मिळतो; पण गांधी विचारांचा जो आत्मा आहे तो पुढे नेणारं आंदोलन काही या आश्रमातून पुढे आले नाही. मग गेल्या सत्तेचाळीस वर्षांत गांधी या महात्म्याच्या या तिहेरी हत्येला या महात्म्याच्या सावलीत विश्रांती घेणारा गांधीपरिवारही जबाबदार नाही काय?

गांधी परिवाराने सेवाग्राममधून गांधीजींचा कार्यक्रम पुढे आणण्याचे आंदोलन उभे केले नाही कारण ते गांधीजींच्या सावलीत अडकून पडले, त्यांची केवळ पूजाअर्चा करीत राहिले. गांधीजींनी निर्माण केलेल्या सावलीत काही काळ विसावून पुढच्या मार्गक्रमणेस सुरुवात करण्याऐवजी ते या मठात तळ ठोकून बसले आणि माझं स्पष्ट मत आहे की, एका मठातून दोन महात्मे कधीच निर्माण होऊ शकत नाहीत. एका मठातून एकच महात्मा बनतो, त्यातील बाकी सर्वजण त्या मठाच्या सावलीतच अडकून बसतात, त्यांच्याकडून दुसरी क्रांती घडल्याचे ऐकिवात नाही.

मला असं वाटतं आहे की मोठा बदल, केवळ देशातच नव्हे तर साऱ्या

जगात घडू लागला आहे. आजपर्यंत एखाद्या व्यक्तीचे किंवा समाजव्यवस्थेचे मोठेपण ती व्यक्ती किंवा व्यवस्था दुसऱ्यांसाठी किती काम करते आहे, 'दु:खतप्तानाम् प्राणिनाम् आर्तिनाशनम्'साठी ती किती काम करते आहे यावर ठरत असे; पण दुसऱ्यांसाठी जगणाऱ्यांनी शेवटी काय साध्य केले हे तपासायला गेलो तर लक्षात येते की, जाहीररित्या स्वार्थ साधणाऱ्या लोकांनी जगाचं फारच कमी नुकसान केलं आहे; उलट, परमार्थाच्या गोष्टी करणारांनी जगाचं फार मोठं नुकसान केलं आहे. एकूण परिस्थितीवर प्रामाणिकपणे चिंतन करावयाचे असेल तर या प्रश्नाचं उत्तर शोधलं पाहिजे की स्वार्थ आणि परमार्थ यापैकी कोणत्या प्रवृत्तीने जगाचे जास्त नुकसान केले.

जेथे जेथे संपत्ती गोळा होते, जेथे जेथे सत्ता असते तेथे भ्रष्टाचार येतो आणि समाजात सत्ताकेंद्र असल्याशिवाय चालत नाही. समाजवादाने मांडणी केली की, समाजातील प्रत्येक व्यक्ती आपापल्या क्षमतेनुसार समाजाला काही देत राहाते आणि आपापल्या आवश्यकतेइतकंच समाजाकडून घेत राहाते असं झालं तरच माणूस 'समाजवादी व्यक्ती' बनेल आणि त्यातून भ्रष्टाचाराचा प्रश्न मिटून जाईल. कितीतरी वर्षे निघून गेली. मार्क्सचाही पाडाव झाला; पण अशी 'समाजवादी व्यक्ती' काही तयार झाली नाही. मोठमोठ्या संस्थांमध्ये महात्मा गांधींच्या कल्पनेनुसार 'विश्वस्त' भावनेने काम करणारी माणसेही सापडणे दुर्मिळ, असतीलच तर ती नियम सिद्ध करायला लागणाऱ्या अपवादाइतकीच सापडतील. समाजवादाची मांडणी होऊन शंभर वर्षे होऊन गेली; पण अशी उन्नत 'समाजवादी व्यक्ती' तयार होऊ शकली नाही. तेव्हा आता समाजाला समजून चुकले आहे की असा कुणी उन्नत महात्मा वरून येणार नाही जो आपल्याला आर्थिक उन्नतीचा मार्ग दाखवील. आर्थिक उन्नतीसाठी आजवर अनेक महात्म्यांनी परमार्थाचा, समाजकल्याणाचा मार्ग सांगितला; पण त्या मार्गाने सर्वसामान्यांची काही आर्थिक उन्नती झालेली दिसत नाही; उलट, समाज आर्थिकदृष्ट्या अधिकाधिक खोल गर्तेत चाललेला दिसत आहे.

आता हे सिद्ध झाले आहे की कुठे मॉस्कोमध्ये बसून किंवा दिल्लीमध्ये बसून कोणी किती धान्य पिकवावे, कोणी किती उत्पादन करावे हे ठरवून समाजाची प्रगती होऊ शकत नाही. लोकांना हेही समजते आहे की याला चांगली पर्यायी व्यवस्था समोर दिसत नाही. आज नाही. उद्यापरवाही असेल किंवा कसे सांगता येत नाही; पण त्यांना एक गोष्ट निश्चित समजते की, माणसाला आपापल्या कुवतीनुसार एका विशिष्ट व्याप्तीच्या क्षेत्राची जाण होण्याची नैसर्गिक

देणगी मिळालेली आहे. ज्यांनी आपल्याला त्या पलीकडचेही दिसते असे आजवर म्हटले. त्यांचा दांभिकपणा समाजाच्या खालावत जाणाऱ्या परिस्थितीने उघड केला आहे.

आपापल्या दृष्टीने आकलन करून आपले सुखसमाधान, आपल्या परिवाराचे सुखसमाधान वृद्धिंगत करण्याचे प्रयत्न करणारे लोक, दूरदृष्टी ठेवून निश्चित स्वार्थाचा विचार करणारे लोक तो स्वार्थ साधताना एकमेकांबरोबर स्पर्धा करणारे, एकमेकांशी झगडणारे, प्रयत्न करीत असताना चुका करणारे, धडपडणारे लोकच पुढे उभे राहू लागले आहेत. जगामध्ये जर काही विकास झाला असेल तर तो केवळ, स्वार्थाने प्रेरित होऊन एकमेकांशी स्पर्धा करीत पुढे चालण्याचा प्रयत्न करणाऱ्या सर्वसामान्यांमुळे झालेला आहे; महात्म्यांच्या आधाराशिवाय झाला आहे. हे दर्शन पुढे येणार असेल तर आपल्या सर्वांवर जबाबदारी येऊन पडते की, या विषयावर प्रकाश पाडला पाहिजे. समाजात मोठा बदल घडत आहे. दुसऱ्यांसाठी जगणारांचा नाही, तर स्वत:वर निष्ठा ठेवणाऱ्या व्यक्तींचा जमाना येत आहे. व्यक्तींचा विकास म्हणजेच समाजाचा विकास हा सिद्धांत पुढे येत आहे आणि या सिद्धांताच्या सिद्धतेसाठी कोण्या महात्म्याच्या दलालांची आवश्यकता नाही.

*(२१ मार्च १९९५)*

◆◆

# कोसळत्या व्यवस्थेतील पडझड

प्रख्यात हिंदी व्यंगकार दिवंगत शरद जोशी यांचे 'पोस्ट ऑफिस' हे मोठे गाजलेले प्रहसन आहे. इंग्रजांनी हिंदुस्थानात टपालाची व्यवस्था चालू केली ही मोठी भाग्याची गोष्ट. त्यामुळे स्वातंत्र्यानंतर काही काळतरी जनतेला सहजरित्या पत्रे टाकता आली आणि मिळाली. स्वातंत्र्योत्तर काळात 'पोस्ट ऑफिस'ची सुरुवात झाली असती तर काय झाले असते? आम्हाला, पोस्ट ऑफिस चालू करू अशा नुसत्या घोषणाबाजीवरच एखादी निवडणूक सहज जिंकून नेता आली असती. दुसऱ्या टप्प्यात मुंबई, दिल्ली अशा मोठ्या शहरांपुरतीच टपालाची व्यवस्था सुरू करण्यात आली असती पण ती व्यवस्था परदेशी पद्धतीची नाही. खास 'स्वदेशी' असती. म्हणजे, टपालपेटी रस्त्यावर कोठेही अनाथ, बेघर दिसली नसती, टपाल कचेरीच्या मध्यभागी चार बंदुकधारी संत्र्यांच्या पहाऱ्यात उभी राहिली असती; पत्र टाकण्यासाठी लायसेंस-परमिट काढण्याची यातायात करावी लागली असती; त्यासाठी अर्ज, त्यांच्या अनेक प्रती, त्याला जोडायची प्रमाणपत्रे, द्यावी लागणारी चिरीमिरी सगळे काही करून पत्र टाकायची परवानगी मिळाली म्हणजे मोठी बाजी मारल्याचा उत्साह वाटला असता; टपालामार्फत सरकारविरोधी लोक त्यांचा प्रचार करतात असे दिसले की आणिबाणी जाहीर करून मनाला येईल तेव्हा टपालव्यवस्था बंद केली गेली असती.

व्यंगकार शरद जोशींचे स्वातंत्र्योत्तर पोस्ट ऑफिसविषयीचे चित्रण हे असे आहे. स्वातंत्र्योत्तर काळात, इंग्रजांनी चालू केलेल्या व्यवस्थेचाही भरपूर बट्ट्याबोळ करून 'स्वदेशी' पद्धतीचे पोस्ट ऑफिस तयार करण्यात आम्ही मोठे यशस्वी झालो आहोत. टपाल इतक्या तासात सोडा, दिवसात मिळाले पाहिजे असा वाह्यात 'परदेशी' आग्रह संपला. टाकले आहे ना, मग यथावकाश ते पोहोचण्याची शक्यता नाकारता येणार नाही. पत्राची पत्रिका बरी असली आणि ग्रहमान ठीक

असले, अशुभ ग्रहांची शांती केली तर पत्र पोहोचलही!

डॉक्टर मनमोहन सिंगांच्या जमान्यात टपालची मक्तेदारी संपली, खाजगी कंपन्यांना सरकारी टपाल हशीलाच्या वीसपंचवीस पट पैसे देऊन महत्त्वाची पत्रे लोक सोपवू लागले. टपाल खात्यानेही महत्त्वाच्या पत्रांकरिता 'स्पीड पोस्ट' काढले आणि इंग्रजी राज्याचा झेंडा मिरवणारी टपालाची पेटी आणि कचरापेटी यांत फारसा फरक राहिला नाही.

टपाल व्यवस्था विस्कळीत असली, पत्रे मिळण्याची शाश्वती नसली तर मोठी गैरसोय होते. व्यापार, उद्योगधंदे मंदावतात, नोकरीसाठी मुलाखतीचे निमंत्रण यायला विलंब झाला की उमेदवारांच्या जिवाची केवढी घालमेल होते? प्रियजनांचे कुशल कळवणारे कार्ड आले नाही तर चिंता व्याकुळ करते. प्रेमीजनांचा पत्रव्यवहार टपाल कचेरीतून व्हायचा म्हणजे, सुखांतिका दोघांच्या म्हातारपणीच यायची! या सगळ्या गैरसोयी जीवघेण्या आहेत; पण त्यामुळे प्रत्यक्ष जीव जातो असे फारसे घडत नाही. टपालाच्या दिरंगाईमुळे प्राण गेला अशा बातम्या वाचनात येत नाही. टपाल खात्याचा गबाळपणा प्राणावर बेतत नाही.

इंग्रजांनी सुरू केलेल्या दुसऱ्या एका व्यवस्थेबाबत मात्र असे नाही. आगगाडीतील गोंधळ प्राण घेतो. एवढेच नव्हे तर, तैमूरलंगाला लाजवील अशा कत्तली घडवून आणतो. फिरोजाबादजवळ झालेला अपघात हे त्याचे एक उदाहरण. फिरोजाबादच्या केबिनवाल्याने कालिंदी एक्स्प्रेस जाऊ दिली, त्यापुढील सिग्नलच्या आधी पहाटे तीनच्या अंधारात कालिंदीच्या वाटेत एक म्हैस आली. ती वाटेत रुळात थांबली. केबिनवाला घोरेलाल वर्मा पहाटेच्या सुमारास काय अवस्थेत असेल याची सहज कल्पना कोणालाही करता येईल. त्याच्या डोळ्यावरची, विचारावरची झापड केवळ झोपेचीच असली, त्याला कोणत्या रसायनाचे साहाय्य झाले नसेल तर मोठे आश्चर्यच म्हणायचे. "कालिंदी एव्हाना गेलीच असणार, ती सिग्नलपलीकडे गेल्याची निशाणी मिळाली नाही म्हणून काय झाले? काहीवेळा होते असे. गाडी निघून जाते, इकडे काही कळत नाही, मग फुकट स्टेशन मास्तरकडून मेमो मिळतो." असा विचारही कदाचित घोरेलालने केला असेल. मागून येणारी पुरुषोत्तम सुपर फास्ट एक्स्प्रेस ११० किलोमीटर वेगाने येणारी. तिचा खोळंबा करावे म्हटले तरी पंचाईत! निर्घोर झोपेतून उठलेल्या घोरेलालने मागच्या तुफान गाडीला मार्ग मोकळा करून दिला आणि अघोर ते घडले. पुरुषोत्तम कालिंदीस भिडला, डबे इकडे तिकडे फेकले गेले, तीस फूट उंचीवरून खाली पडले. काही डबे सरळ उभे राहिले, काही प्रचंड विद्युतदाबाच्या तारांवर

पडले. हातपाय, डोकी इकडे तिकडे उडाली. कितीएक चेंगरले. कित्येक विजेच्या झटक्याने मेले. मग नंतर नेहमीप्रमाणे सगळे झाले. आसपासच्या रहिवाशांनी, ज्यांना सहज सोडवण्यासारखे त्यांना सोडवले. मग, पोलिस आले, त्यांनी प्रेतांच्या अंगावरचे दागिने, घड्याळे आणि इतस्ततः विखुरलेल्या किंमती वस्तू उचलण्याचा धडाका लावला.

रेल्वेमंत्री जाफर शरीफ इंग्लंडमध्ये सुटीवर गेले होते. ते हजर असताना झालेल्या अपघाताची नैतिक जबाबदारी स्वीकारून पदाचा राजीनामा देण्याचा खुळचट लालबहादुरी विचार त्यांच्या मनाला कधीही शिवला नव्हता. या अपघाताबद्दल साधे दुःख व्यक्त करण्याचेही त्यांना काहीच प्रयोजन नव्हते. दोनचार दिवसांनी अपघातस्थळातील रौद्र भीषणता थोडी ठाकठीक झाल्यावर पंतप्रधान अपघातस्थळाचे निरीक्षण करायला गेले. अशा प्रसंगीही लोकांनी काळे झेंडे दाखवून निषेधाच्या घोषणा केल्या. पंतप्रधानांकडे रेल्वे खात्याचा कारभार शरीफ साहेबांच्या सुटीच्या अवधीपुरता आलेला. त्यांना अपघाताची कारणे, उपाययोजना असल्या बाबींवर तोंड उघडण्याचे काहीच कारण नव्हते. तोंड बंद ठेवण्याकरिता मशहूर असलेल्या राव साहेबांनी तोंड उघडले आणि दोन मुद्दे मांडले.

पहिला – भारतातील लोहमार्गांवर अत्याधुनिक इलेक्ट्रॉनिक संदेश व्यवस्था बसवली पाहिजे. तंत्रज्ञान कोठून यायचे? आमच्या येथे तर इलेक्ट्रॉनिकचे कोणते साधन बिघडले तर दुरुस्त करणारा भेटत नाही. साध्या यांत्रिकी व्यवस्थेत एखादा घोरेलाल कत्तल घडवू शकेल; पण यंत्रणेत बिघाड असला तर स्थानिक मिस्त्री तो नीट करू शकेल. इलेक्ट्रॉनिक व्यवस्था भारतातील लोहमार्गांवर बसवली तर गाड्या धावतात त्यापेक्षा अधिक वेळ उभ्या राहण्याचीच शक्यता आणि अपघात होण्याच्या शक्यतांची तर महाद्वारेच उघडतील.

पंतप्रधानांनी आणखी एक महाभयानक विधान केले. बिनराखीव डब्यातील गर्दीत बसलेल्या प्रवाशांची शरीरे इतकी छिन्नविछिन्न झाली की, त्यांची ओळख पटण्याची काहीसुद्धा शक्यता राहिली नाही. पंतप्रधानांची प्रतिभा पाजळली – "दुसऱ्या दर्जाच्या बिनराखीव डब्यातील प्रवाशांच्या कलेवरांची ओळख पटवता येईल अशी व्यवस्था केली पाहिजे." इति करवादले पंतप्रधान पी. व्ही. नरसिंह राव. म्हणजे, थोड्याच दिवसात दुसऱ्या वर्गाच्या साध्या प्रवाशांना त्यांच्या पायात एक, दंडात एक आणि गळयात एक अशा नंबरच्या पट्ट्या बांधून प्रवासाला निघावे लागेल. फिरोजाबादच्या भयानक अपघातावर पंतप्रधानांची ही

विनोदी फोडणी!

चारपाचशे माणसे मरणे म्हणजे आजकाल किरकोळ गोष्ट झाली आहे. दोन दिवस वर्तमानपत्री ठळक मथळयाच्या बातम्या झळकल्या आणि नंतर अपघातातल्या दुर्दैवी जीवांच्या आप्तजनांचा अपवाद सोडल्यास सारा देश फिरोजाबादचे कांड विसरून गेला. गेल्या वर्षात भारतीय रेल्वेवर पाचेकशे अपघात झाले, त्यातला हा एक. गाड्या अजून धावत आहेत. वेळापत्रक नावाची गोष्ट राहिलेली नाही. गाड्या आता मिनिटांनी उशीरा धावत नाहीत, पाचसहा तास ही साधारण दिरंगाई. आजची गाडी उद्या येणे हेही काही नवलाईचे समजत नाहीत. अशा व्यवस्थेतही प्रवाशाला जेथे जेथे म्हणून शक्य आहे तेथे तेथे लुंगवण्यासाठी रेल्वे कर्मचाऱ्यांच्या फौजाच्या फौजा उभ्या आहेत.

इंग्रजांच्या काळात चाळीस हजार किलोमिटर लोहमार्ग बांधले गेले, त्याच्या निम्म्यानेसुद्धा नवे मार्ग स्वातंत्र्यानंतर बांधले गेले नाहीत. सगळी रेल्वे व्यवस्था सडली आहे, लोहमार्ग जुने झाले आहेत. निकामी झाले आहेत. डबे आणि इंजिन त्यांची आयुष्यमर्यादा संपली तरी धावत आहेत, काहीवेळा गाड्यांशिवाय इंजिने धावतात, कधी इंजिनाशिवाय गाड्या; इंजिनच बंद पडले म्हणजे इंजिन आणि गाड्या दोन्ही खोळंबून पडतात.

आयन रँडच्या एका कादंबरीत, समग्र व्यवस्था कोसळू लागली म्हणजे काय काय होते याचे तपशीलवार वर्णन आहे. आगगाड्या उशिराने धावू लागतात आणि त्यांचे भयानक अपघात चढत्या श्रेणीने होऊ लागतात असे तिचे वर्णन आहे. आपल्याकडे नेमके हेच घडत असावे.

जुने तंत्रज्ञान, जुने रूळ, जुन्या गाड्या, सरकारीकरणामुळे बेशिस्त, भ्रष्टाचार, कर्मचारी वर्ग जबाबदारीची जाणीव नसलेला, जनतेला लुटण्यास बद्धपरिकर झालेला.

फिरोजाबादची वारंवार पुनरावृत्ती टाळायची असेल तर भारतीय रेल्वे सरकारच्या जबड्यातून सोडवणे यापरता दुसरा मार्ग नाही. लोहमार्ग, त्यांची निगराणी हे बघणारी एक स्वतंत्र खाजगी व्यवस्था पाहिजे. त्या लोहमार्गावर आगगाड्या धाववण्याचा अधिकारी योग्य ते भाडे दिल्यास कोणालाही मिळू शकेल. एकेका मार्गावर अधिकाधिक सुखसोयी देऊन ग्राहकाचे मन जिंकू पाहणाऱ्या खाजगी उद्योगांची चढाओढ लागली पाहिजे.

इंग्रजांनी भारताला टपाल व्यवस्था दिली, रेल्वे व्यवस्था दिली. त्या दोघांचेही आम्ही वाटोळे करून दाखवले; दोघांच्याही खाजगीकरणास आता काहीही पर्याय राहिलेला नाही.

*(६ ऑक्टोबर १९९५)*

◆◆

# वीजदरवाढ – धोक्याची घंटा

'नेमेचि येतो मग पावसाळा' अशी जुनी शोलय कविता. आजकाल पावसाळा फारसा नेमाने येत नाही; त्यापेक्षा जास्त नियमितपणे पावसाच्या आधी एक वर्षाआड विजेचे दर वाढतात. मे ९० मध्ये वाढले २२ टक्क्यांनी. मे ९२ मध्ये १८ टक्क्यांनी, मे ९४ मध्ये १० टक्क्यांनी, ९४ साली निवडणुकांची हवा असल्याने दरवाढ तशी नेमस्त होती. लोकसभेच्या निवडणुका झाल्यानंतर यंदा विजेचे दर वाढणार, दणक्यात वाढणार अशी अपेक्षा होतीच. वीसपंचवीस टक्क्यांनी दर वाढवणार अशी हवा होती. दरवाढीची घोषणा झाली त्यांत वाढीचे प्रमाण साडेसतरा टक्के असल्याचे म्हटले होते. दरवाढीविरुद्ध कोणी फारशी तक्रार केली नाही. काही ग्राहकसंघांनी निषेधाच्या तारा दिल्या पीठगिरणीवाले १८ जुलैपासून पिठाच्या गिरण्या बंद ठेवणार होते, त्यांना मंडळाच्या अधिकाऱ्यांनी चर्चेने प्रश्न सोडविण्याचे आश्वासन दिले म्हणून ते थांबले; पण एकूण फारसा विरोध काही झाला नाही.

शेतकरी संघटनेचे अध्यक्ष शंकर धोंडगे आणि त्यांच्या काही सहकाऱ्यांनी मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबादच्या खंडपीठापुढे याचिका दाखल केली, सुनावणी कधी होईल ती होवो. विजेच्या दराच्या प्रश्नासंबंधी सर्वसाधारण लोकांत जाणकारी फारच कमी.

वीज आणि शेतकरी

डिझेल इंजिनाची यातायात फार, त्यापेक्षा विजेची मोटार जास्त सोयीची आणि कमी खर्चाची अशी शेतकऱ्यांची भावना. बहुतेक ठिकाणी वीज पहिल्यांदा शेतात येते आणि मग घरात. वीज मिळवायची म्हणजे अर्ज करायचा. मग यथावकाश अनामत रक्कम आणि खर्चापोटी काही रक्कम भरण्याची नोटीस येते. महाराष्ट्र राज्य विद्युत महामंडळ (म. रा. वि. मं.)मध्ये ओळख असेल

तर लवकर येते. ओळख नसेल तर सावचितपणे येते. शेतकरी झपाट्याने जाऊन पैशाचा भरणा करतो आणि आज, उद्या आता वीज येईलच अशा आशेने दिवस मोजत राहातो; म. रा. वि. मं. च्या कार्यालयात खेटे घालत राहतो. दोनपाच वर्षांच्या खालीतरी वीज येण्याचे नावचे काढायला नको. अधिकाऱ्यांचा होत ओला केला तरच विजेचे दर्शन होण्याची शक्यता. गेलाबाजार ५००० रुपयांचा अधिकाऱ्यांच्या मलिद्याचा दर होता.

वीज आली म्हणजे प्रश्न सुटला नाही; खरा प्रश्न येथेच चालू होतो. जुन्या इंजिनाला आडगिऱ्हाईकी बाजारात विकून टाकून नव्या छानछोकी घरोब्याचे कौतुक दोन दिवसही चालत नाही, तोच या नवीन वयेच्या लहरीपणाचा फटका बसू लागतो. दिवसातून केव्हा येईल, केव्हा जाईल सांगता येत नाही. मोटर चालवायला लागणाऱ्या तीनही फेजेस एकत्र नांदू इच्छीत नाहीत. एखादी तरी चुकारपणा करत राहते. विजेचा दाब कधी एकदमच कमी, कधी एकदमच भडकणारा. पेरणीसाठी पाणी देण्यासाठी माणसे मिनतवारी करून गोळा केली की त्या दिवशी हमखास ही बया बेपत्ता होणार! आलीच तर अशा ठसक्यात की, मोरच जळून जावी. मोटर दुरूस्त करण्याचा खर्च पेलण्यासारखी असामी असली तरी मोटर पुन्हा चालू होईपर्यंत पाणी बंद. पिकाचे जे काही नुकसान होईल त्याला कुणी जबाबदार नाही. दिवसाउजेडी विजेची हजेरी कारखान्यात; शेताला पाणी द्यायला वीज मिळाली तरी ती रात्री. कडाक्याच्या थंडीत रात्री पाणी धरायला उभे राहाणे हा शेतकऱ्यांच्या आयुष्यातील मोठा रोमांचक भाग! उत्तरेत हरियाणा पंजाबमध्ये कडाक्याच्या थंडीत पाणी देताना पाणी देणारे गारठून मेल्याची उदाहरणे वारंवार घडतात. सर्वसाधारण शेतकऱ्यांचा विजेचा अनुभव हा असा आहे.

सुधारलेल्या देशात वर्षानुवर्षे वीज एकदाही बंद पडत नाही; दाबामध्ये फरक जवळजवळ नाही. वीज ही हवी तेव्हा सेवेला हजर असते असे इथल्या कोणा लोकांना सांगितले तर कुणाचा त्यावर विश्वास बसणार नाही.

महाग वीज

बिनभरवशाची वीज अधिकाधिक महाग होत चालली आहे. गेल्या तीन महिन्यात आंध्र प्रदेशातील विजेचे दर ५० टक्क्यांनी वाढले; कर्नाटकात ३३ टक्क्यांनी महाराष्ट्रात जाहिरात झाली सरासरी साडेसतरा टक्के वाढीची. बहुतेक शेतकऱ्यांच्या शेतीतील पंपासाठी मिळणाऱ्या विजेचा दर ६६ टक्क्यांनी वाढवण्यात आला आहे. ही गोष्ट साधीसुधी नाही. यामागे फक्त महाभयानक अरिष्टाची

घनदाट छाया आहे.

डोक्यावरही पांढरे केस हे मृत्यूचे पहिले लक्षण तसे बेभरवशाची महागडी वीज हे अर्थव्यवस्था कोसळण्याचे सुरुवातीचे लक्षण आहे.

बहूपयोगी वीज

माणसाला जे जे काही लागते ते तो श्रम वापरून निसर्गातून घेतो. त्यासाठी कल्पकता वापरतो. तंत्रज्ञान जोपासतो. आपल्या श्रमाला दुसऱ्या ऊर्जाची भर देतो. बैलांची ऊर्जा वापरतो, गुलामांची ऊर्जा वापरतो. सुसंस्कृत माणसाची सगळयात जास्त मदार वीज या ऊर्जेवर असते. जमीन, माणूस, पाणी आणि वीज हे माणसाच्या संस्कृतीचे आधार आहेत. वीज आणि मानवी जीवन याचा तर काही विशेष जवळचा संबंध आहे. विजेने प्रकाश मिळतो, उष्णता मिळते, चक्राकार गती मिळते, चुंबकीय गुण मिळतात. वीज हाती आली की, काय वाटेल त्या करामती करून दाखवता येतात. धबधब्यापासून वीज करणे सगळयात सोपे आणि स्वस्त; पण पाण्याचा हवा तसा प्रवाह तसा दुर्मिळ. त्यामुळे कोळसा, गॅस इत्यादि इंधने जाळून विजेची निर्मिती करता येते. सूर्याची उष्णता, समुद्राच्या लाटा, वाहता वारा आणि अणुशक्ती या ऊर्जास्त्रोतांचा उपयोग त्यांचे विजेमध्ये परिवर्तन करूनच प्रामुख्याने होतो. वीज हा मनुष्याच्या वेगवान प्रगतीचा सर्वात प्रमुख आधार आहे.

विकासासाठी इतरही अनेक गोष्टी लागतात. रस्ते, लोहमार्ग, संचार, वाहतूक, वायुमार्ग, जलमार्ग इत्यादि; पण या बाकीच्या व्यवस्थांसाठीसुद्धा सगळयात जास्त गरज कशाची असेल तर ती विजेची.

नियोजनजन्य बट्ट्याबोळ

समाजवादी नियोजनाच्या काळात या सगळया संरचना आणि व्यवस्था तयार करणची, चालवण्याची व त्यांची देखभाल करण्याची कामगिरी शासनाकडे आली. ही कामे करण्याचा एकाधिकार शासनाने मिळवला, दुसऱ्या कोणाचा त्यात शिरकाव होऊ दिला नाही आणि परिणाम असा झाला की; या सगळयाच व्यवस्था आता ढासळून गेल्या आहेत. आगगाड्यांची वेळापत्रके पूर्वी वर्षांनुवर्षे बदलत नसत. जाणाऱ्या, येणाऱ्या गाड्यांकडे बघून लोक आपली घड्याळे लावून घेत. आता कोणत्या तारखेची गाडी कोणत्या दिवशी निघेल हेसुद्धा खात्रीपुर्वक सांगता येत नाही. गाडीने निघालेला मनुष्य दुसऱ्या टोकाला पोचेल का नाही, पोचला तर कधी पोचेल आणि हाती पायी धड सुखरूप पोचेल की नाही याची काहीच शाश्वती नाही. वीजपुरवठ्याच्या बाबतीत परिस्थिती याहीपेक्षा

अधिक गंभीर झाली आहे. बारा वर्षापूर्वी एलदरी धरणाच्या विश्रामगृहात म.रा.वि.मं.चे एक अत्युच्च अधिकारी भेटले होते. परिस्थितीच्या गांभीर्याची भीडभाड संकोच न ठेवता त्यांनी माझ्याशी चर्चा केली, "वीजनिर्मितीचे आज माहीत असलेले सर्व प्रकल्प आजच्या आज मंजूर झाले आणि उद्यापासून त्यावर तातडीने काम चालू झाले तरीदेखील २००० सालापर्यंत सर्वांना सुरळीत वीजपुरवठा करणे अशक्य होईल." असे त्यांनी स्पष्टच सांगितले होते.

तोट्यातील मंडळे

त्यानंतर कोणताही मोठा प्रकल्प अंमलात आलाच नाही. त्यामुळे विजेचे उत्पादन मागणीच्या मानाने अगदीच अपुरे झाले. ते तातडीने वाढण्यासाठी परकीय भांडवल आणि तंत्रज्ञान देशात उतरावे म्हणून आकांताने प्रयत्न सुरू झाले. त्या धडपडीतून एन्रॉनसारखी प्रकरणे निघाली. वीज उत्पादन वाढवण्याठी खाजगी भांडवलदार गुंतवणूक करण्यास नाराज आहेत; देशी विदेशी गुंतवणूकदारही या क्षेत्रात पैसे गुंतवण्यास कांकू करतात. या अनिच्छेचे महत्त्वाचे कारण एक सांगण्यात येते – म.रा.वि.मं.च नव्हे तर सर्वच राज्य विद्युत मंडळे हजारो कोटी रुपयांच्या तोट्यात चालतात. विद्युत मंडळे मंडळाचा उत्पादनखर्च भरून येत नाही. घरगुती विजेचे ग्राहक आणि शेतकरी यांना तर फारच लाडावून ठेवले आहे. विजेच्या निर्मितीकरता आणि वाटपाकरिता जो खर्च येतो तो भरून येण्याइतकेसुद्धा विजेचे दर स्वीकारायला हे शेफारलेले ग्राहक आणि शेतकरी तयार नसतात.

जागतिक बँकेने तर जाहिररीत्याच सांगून टाकले आहे की, वीज मंडळांनी दरवर्षी किमान साडेचार टक्के नफा दाखवल्याखेरीज वीजनिर्मितीसठी कर्जदेखी दिले जाणार नाही. विजेसंबंधीच्या भारतीय कायद्यानुसार राज्य विद्युत मंडळांनी एकूण गुंतवणूकीवर तीन टक्के तरी नफा कमावला पाहिजे असे बंधन आहे. ही तीन टक्क्यांची अटही कोणा विद्युत मंडळाला अद्याप पाळता आली नाही, साडेचार टक्के फायदा मिळवण्याचा प्रश्नच दूर राहिला!

विजेची नवी निर्मितीक्षता तातडीने झाली पाहिजे, त्यासाठी पैसा आणि तंत्रज्ञान पाहिजे आणि या गुंतवणुकीसाठी वीज मंडळांनी फायदा दाखवला पाहिजे. असे हे काहीसे त्रांगडे होऊन बसेल आहे. यातून सुटका होण्याचा मार्ग एकच, तो म्हणजे वीज ग्राहकांनी आणि विशेषतः विजेचा घरगुती वापर करणाऱ्यांनी त्यांना लागणाऱ्या विजेचा संपूर्ण उत्पादनखर्च भरून निघेल इतकी किमत विजेसाठी दिली पाहिजे.

महाराष्ट्र राज्य विद्युत महामंडळाला विजेच्या निर्मितीसाठी आणि पुरवठ्यासाठी येणारा सगळा खर्च भरून निघेल असा मोबदला देण्यास कोणाही विचारी माणसाची काहीही हरकत असण्याचेही कारण नाही. किंबहुना कायद्याने सांगितलेली तीन टक्के नफ्याची अट अगदीच अपुरी आहे. जागतिक बँकेने ठावलेली साडेचार टक्के नफ्याची अटही अपुरी आहे. व्याजाचा दर आणि नफ्याचे इतर व्यवसायातील प्रमाण लक्षात घेतले तर महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळास निदान अठरा टक्के नफा मिळाला पाहिजे, तरच विजेची निर्मिती वाढवण्याकरिता आणि वीजपुरवठा सुधारण्याकरिता लगणारा निधी, कोणाच्या मेहेरबानीनने नाही, तर खुल्या बाजारात उतरून उभा करता येईल.

फायदा कसा मिळवायचा?

ही कायद्याची पातळी गाठायची कशी हा मुद्दा महत्त्वाचा आहे की, ग्राहकांचे लाड थांबले पाहिजेत; विशेषतः शेतकऱ्यांचे लाड थांबले पाहिजेत. त्यांना पुरेसा मोबदला देण्यास भाग पाडले म्हणजे सगळेच प्रश्न आपोआप सुटतील. वीज पुरवठ्याची गुणवत्ता फारशी वाखाण्यासारखी नाही; दाब कमीजास्त होतो; वीज केव्हाही बंद पडते हे खरे; पण म.रा.वि.मं. च्या व्यवहारात काटकसर करण्यास अजिबात जागा नाही असे म्हणता येणार नाही. महाराष्ट्र शासनाने सध्याच्या दरवाढीच्या बरोबर म.रा.वि.मं. ला आपल गुणवत्ता आणि कार्यक्षमता सुधारण्याविषयी सूचना केल्या आहेत आणि त्यांच्या प्रशासकीय खर्चातही काटकसर तब्बल शंभर कोटी रुपयांची करायला सांगितले आहे आणि मग ग्राहकांवर ९०० कोटी रु. नवा भार टाकण्यास सरकार सज्ज झाले. वीजमंडळावरच्या कारभारात १०० कोटी रुपयांची बचत आणि ग्राहकांच्या डोक्यावर मात्र ९०० कोटी रुपयांचा नवा भार हे प्रमाण कितपत योग्य आहे?

उत्पादनखर्च – घरचा आहेर

वीज उत्पादनाचा आणि वाटपाचा योग्यसा उत्पादनखर्च किती? उत्तर फार कठीण आहे. राज्य वीज मंडळाचे हिशोब बारकाईने तपासले तर हिशेबातील अजागळ खाते. नासधूस खाते, चैनचंगळ खाते आणि चोरीमारी खाते अंधुकअंधुक दिसू लागेल. विद्युत मंडळांना त्यांचया क्षेत्रात एकाधिकार आहे, स्पर्धा असती तर निदान दोन मंडळांच्या हिशेबांची परस्पर तुलना करता आली असती. खरीखुरी स्पर्धा असती तर वीज मंडळाने ग्राहक मिळवण्यासाठी आणि टिकवण्यासाठी कसोशीने काटकसर केलीच असती. मग त्यांच्या हिशेबातील आकडे रास्त आहेत असे समजता आले असते. एकाधिकार गाजवणाऱ्या

मंडळाच्या हिशेबावर विश्वास ठेवावा तरी कसा?

१९९३ साली भारत सरकारच्या ऊर्जा मंत्रालयाने जागतिक बँकेच्या सहयोगाने एक अभ्यास केला. त्याच्या अहवालातील काही अवतरणेच मोठी बोलकी आहेत.

"भारतातील वीजक्षेत्र वीज पुरवठा आणि वित्त व्यवस्था दोन्ही बाबतीत अगदीच मागास आहेत."

"पाहणी केलेल्या सर्व देशात इंडोनेशियाच्या खालोखाल भारतातील विजेचा उत्पादनखर्च सर्वात अधिक आहे."

"भारतातील रोजगाराची पातळी कमी आहे आणि तरीही एकूण उत्पादनखर्चातील पगारदारांवरील खर्चाचे प्रमाण अमेरिका, इंग्लंड, नॉर्वे आणि पाहणीत आलेल्या इतर आशियाची देशापेक्षा जास्त आहे."

"...असेही दिसते की, हिंदुस्थानातील कोळसा वारून होणारी विजेची निर्मिती किमान पातळीपेक्षाही कमी आहे किंवा वीज वाहून नेण्याची क्षमता तरी अपुरी आहे."

"...वीज वाहून नेण्याची आणि वाटप करण्याची व्यवस्था अशी आहे की किलोमिटर वाहकामागे ग्राहकांची संख्या हिंदुस्थानात सर्वाधिक आहे... ग्रामीण भागातील बहुतेक वाटप कमी दाबातील तारांतून होते म्हणून कार्यक्षता आणखीनच घसरते. गंमत अशी की वाटप तारांच्या किलोमिटरमागे ग्राहकांचे प्रमाण येथे सर्वाधिक आहे, काही गंभीर समस्या आहे हे उघड आहे. ग्राहकांची आणि त्यांच्या वीजवापराची योग्य नोंद होत नसावी."

"...वीज निर्मितीच्या केंद्रात १ ते ७ टक्के वीज वारली जाते. कोळशाचे इंधन वापरून वीज निर्मिती करणाऱ्या इंग्लंड, चीन, इत्यादी देशापेक्षाही हे प्रमाण जास्त आहे. निर्मितीकेंद्राची अकार्यक्षमता यावरून दिसते."

"...विजेच्या वाटपात इतरत्र सर्वसाधरपणे १०टक्के उर्जेची गळती होते. हिंदुस्थान हे प्रमाण १५टक्के ते ३०टक्के इतके जास्त आहे."

"...जनित्रांच्या वापराचे प्रमाण इतर देशांच्या तुलनेने सर्वात कमी आहे."

"...एकूण आकड्यांवरून असे दिसते की, आवश्यकतेपेक्षा विजेचा पुरवठा सरासरीने ८टक्के कमी पडतो आणि पुरवठ्यापेक्षा मागणी १२% ते १५% ने कमी पडते."

"...वीज क्षेत्रात आवश्यकतेपेक्षा निदान दुप्पट नोकरदार नेमले गेले आहेत."

"...हिंदुस्थानातील औष्णिक जनित्रांची कार्यक्षमता पाहणीत समावेश केलेल्या

देशात सर्वात कमी आहे.''

''...हिंदुस्थानातील वीज क्षेत्रात नोकरदारांवरचा खर्च आशियायी विकसनशील देशापेक्षा अधिक आहे. अवाजवी नोकरभरतीचा हा परिणाम आहे. नोकरदरांवरील खर्च एकूण उत्पादनखर्चाच्या ११% ते २०% विकसित देशात असतो. विकसनशील देशात पगारांची पातळी कमी असते हे लक्षात घेता तेथे हे प्रमाण ४% ते १३% असावे. उदा. पाकिस्तान ३.९%, चीन ४.४% भारतात मात्र हे प्रमाण २०.१% आहे.''

''...हिंदुस्थानात बहुतांशी देशात उत्पादन होणारा कोळसाच वापरला जातो हे लक्षात घेता उत्पादनखर्चातील इंधनावरल खर्चाचे प्रमाण अवास्तव आहे. (५२.३%)''

''...कार्यवाही आणि देखभाल या बाबतीत मात्र येथील खर्च सर्वात कमी आहे. (५.१%) अमेरिका, इंग्लंड, यासारख्या देशात हा खर्च २७% ते ४५% इतका जास्त असतो.''

राज्य विद्युत मंडळांचा कारभार किती गलथानपणे चालला आहे याचा कबुलीजबाब दरवर्षीच्या अंदाजपत्रकापूर्वी लोकसभेत सादर केल्या जाणाऱ्या आर्थिक सर्वेक्षणात सापडते. उदा. १९९५-९६ सालच्या सर्वेक्षणात म्हटले आहे -

''...औष्णिक जनित्रांच्या कार्यक्षमतेचे महत्त्वाचे परिमाण 'वापराचे प्रमाण' हे आहे. हे प्रमाण राज्य वीज मंडळाच्या जनित्रात कमी आहे ते व्यवस्थापन व कार्यवाही यातील दोषांमुळे, तसेच योग्य देखभालीच्या अभावामुळे.''

''...ऊर्जेच्या क्षेत्रात सर्वात गंभीर समस्या म्हणजे राज्य वीज मंडळांची विजेची निर्मिती, वाटप, दर ठरवणे आणि वसुली करणे या क्षेत्रातील गचाळ कामगिरी.''

''...राज्यवीज मंडळांच्या विद्युत वहन आणि वाटपात होणारी गळती ही अतीव जास्त आहे.''

म.रा.वि.मं.ची नजरभूल

अनेक ऊर्जामंत्री आणि जाणकार तज्ज्ञांनी राज्य वीज मंडळांच्या गचाळ कारभारावर वेळोवेळी जागोजागी ताशेरे मारलेले आहेत. तुलनेने इतर राज्य वीज मंडळांपेक्षा म.रा.वि.मं.ची परिस्थिती थोडी अधिक चांगली दिसते; पण यात काही नजरभूल आहे किंवा हातचलाखी.

''महाराष्ट्रातील नागरिक मुकी बिचारी कुणी हाका.'' राज्य वीज मंडळ

ठरवील त्या दराने फारशी काचकुच न करता बिल भरत राहतात. त्यामुळे म.रा.वि.मं.ची परिस्थिती थोडी बरी दिसते. वहन आणि वाटप यातील गळती महाराष्ट्रात कमी दिसते. वहन आणि वाटप यातील गळती महाराष्ट्रात कमी दिसते. त्याचे कारण मात्र म.रा.वि.मं.ची कार्यक्षमता जसून म.रा.वि.मं.ने चलाखीने कागदोपत्री केलेल्या खेळीचा तो परिणाम आहे. यासंबंधी पुढे विस्ताराने खुलासा येईलच.

इंधनावर खर्च जास्त होतो. या परिस्थितीस प्रामुख्याने पुढारी मंडळी जबाबदार आहेत. सत्तेत असलेलया किंवा विरोधात असलेल्या पुढाऱ्यांना आप्तेष्टांचे, गणगोतांचे भले करण्याचा एक ठोक उपाय माहित असतो. त्यांच्या पोरांना सरकारी किंवा सार्वजनिक क्षेत्रातील नोकरीत चिकटून देणे. कोणत्याही सरकारी यंत्रणेवर याचा दाब अहोरात्र पडत असतो. त्यामुळेच एकाच्या जागी दोन माणसं घेतली जातात. इंधनाचा खर्चही सरकारी हस्तक्षेपाने वाढतो. याचे एक चांगले उदाहरण... गुजरातचा वीज उत्पादनाचा खर्च देशात सर्वात वरचढ आहे. तेथील औष्णिक वीज केंद्रात बिहारहून लोहमार्गाने आणलेला कोळसा वापरला जातो. बिहार, गुजरात वाटचालीतच १०% कोळसा सांडून लवंडून जातो. गुजरातमध्ये मुबलक मिळणारा गॅस हाजिरा पाईपलाईनने उत्तर प्रदेशात जातो, तो पंतप्रधानांच्या मतदारसंघात युरियाचे उत्पादन करण्यासाठी...

– सूज्ञास अधिक सांगणे न लगे!

म.रा.वि.मं. आणि इतर राज्य वीज मंडळे यांच्या गलथान कारभाराबद्दल वर्षानुवर्षे चर्चेचे गुऱ्हाळ चालू आहे. आता अगदीच गळयाशी आले, आता विजेचा दर वाढवून द्या मग आम्ही आमचा कारभार सुधारतो अशी आश्वासने दरवेळी दिली जातात आणि हे गुऱ्हाळ चालूच राहते.

दारूड्या नवऱ्याने घरचे पैसे, बायकोचे दागिने, अगदी मंगळसूत्रसुद्धा काढून न्यावे, वेळा भागवून नेण्यापुरते आता मी दारू सोडून चांगला वागू लागतो असे आश्वासन द्यावे आणि शेवटी सगळे घरदार दारूतच बुडून जावे असा हा प्रकार म.रा.वि.मं.च्या बाबतीही वर्षानुर्षे अखंडितपणे चालू आहे.

किमतीचे गौडबंगाल

हिंदुस्थानात वीज स्वस्त आहे. ग्राहक खर्च भरून येईल इतकीसुद्धा किमत देत नाही, हे खरे आहे काय? राज्य वीज मंडळातील नासधूस उधळमाळ इत्यादी सर्व संपवले तर जो उत्पादनखर्च निघेल तेवढा तरी भाव गिऱ्हाईक देतात काय? हिंदुस्थानातील ग्राहकाला त्याने वापरलेल्या विजेबद्दल काय किमत

मोजावी लागते? हे सारे मोजमाप करताना ग्राहकाने अप्रत्यक्षपणे सोसलेल्या अनेक बोजांचीही मोजदाद झाली पाहिजे. विजेचा पुरवठा मिळवण्याकरिता करावी लागणारी मिनतवारी, यातायात, लाचलुचपत विसरून कसे चालेल. पुरवठा बंद पडला, नादुरुस्ती झाली म्हणजे ग्राहकालाच धावपळी करून दुरुस्ती करून घ्यावी लागते. काही खर्चही करावा लागतो, काही छोट्या मोठ्या ऑफिसरांनाही खुश करावे लगते. हा खर्चही कोठेतरी धरला गेला पाहिजे. मिळणाऱ्या वीजपुरवठ्याच्या सतत चढता, उतरता दाब त्यामुळे होणारे उपकरणाचे नुकसान आणि उत्पादनावरचा परिणाम यांचा रुपये पैशातील आकडा जबरदस्त मोठा आहे.

हिंदुस्थानात आज जी वीज मिळते त्या गुणवत्तेच्या विजेकरिता ग्राहक प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे जी किमत अदा करतो ती लक्षात घेतली तर हिंदुस्थानातील वीजपुरवठा अत्यंत महागडा आहे, असेच सिद्ध होईल.

विजेच्या काही ग्राहकांचे फार कोडकौतुक होते असा मोठा बोलबाला आहे. विशेषतः घरगुती ग्राहक आणि शेतकरी यांना वीजपुरवठा फारच स्वस्त भेटतो अशी हाकाटी सरकारी गोटातून सतत होत असते. यात काही मतलबी धूर्तपणाही आहे. राज्य विद्युतमंडळे व्यावसायिक पायावर चालली पाहिजेत हे मान्य केले तरी त्यांच्या व्यवसायाचे स्वरूप सार्वजनिक सुविधा उपलब्ध करून देण्याचे आहे. अशा व्यवसायात दरांची आकारणी सरासरी उत्पादनखर्चावर आधारित नसते. ग्राहकांचे वेगवेगळे गट मानावे लागतात. कारखान्यांना त्यांच्या सोयीच्या वेळी वीज पुरवावी लागते. पुरवठ्याची गणवत्ता चांगली असावी लागते. पुरवठ्यात खंड येऊन चालत नाही. याउलट, शेतीपंपांना पुरवली जाणारी वीज इतर ग्राहकांना वीज नको असते अशावेळी दिली जाते आणि तिची गुणवत्ता दुय्यम दर्जाची असते. शेती आणि उद्योगधंद्यांना एकसारखाच दर लावावा असा वाद घालणे अज्ञानमूलक आहे.

विजेचा वापर मोठ्या प्रमाणावर करणाऱ्या ग्राहकांना विशेष सवलतीचे दर द्यावे हेही सार्वजनिक सुविधा व्यवसायात अक्कल हुशारीचेच मानले जाते. घरगुती वापराचा दर कारखानदारी दरांपेक्षा सर्वत्र अधिक असतो. त्यामुळे उत्पादनास प्रोत्साहन मिळून सर्वसाधारण जनतेचे भले होते. रोजगार वाढतो. मिळकत वाढते आणि म्हणून घरगुती ग्राहक उद्योगधंद्यांना दिलेल्या सवलतीचे स्वागत करतात. आपला देशमात्र याला अपवाद आहे.

सार्वजनिक सुविधाव्यावसायांना दरांची आकारणी ठरवताना काही व्यापक

परिस्थितींचा आणि गरजांचाही विचार करावा लागतो. साऱ्या देशात महाराष्ट्र राज्यातील सिंचित शेतीचे प्रमाण सर्वात कमी आहे (१४%). त्यातही सर्वाधिक कामगिरी विहिरी खणून पंप लावून उपसा व्यवस्थेने शेतीला पाणी पुरवठा स्वत:च्या हिमतीवर आणि स्वतच्या खर्चाने करणाऱ्या शेतकऱ्यांची. त्यांचे श्रेय मोठे आहे. या सिंचन खेत्रासाठी सरकारला खर्च काहीच येत नाही. याउलट नदीवर धरणे बांधून, कालवे खोदून, शेतीती पाणी पुरवठा करण्याचा खर्च अवाढव्य आहे. कोणत्याही धरणायोजनेने आजपर्यंत शासनाला तीन टक्के नफा मिळवून दिलेला नाही. शेतीपंपावर विजेच्या दराची आकारणी करताना या परिस्थितीकडे डोळेझाक केली तर त्याचे परिणाम घातक झाल्याखेरीज राहणार नाहीत.

शेतीउत्पादनास उत्तेजन देण्यासाठीसुद्धा वीज दरात सवलतीची आकारणी करायची नाही, असे ठरले तर उत्पादन घटेल आणि त्याची भरपाई दुसऱ्या राज्यातून किंवा परदेशी महागड्या आयातीने करावी लागेल. त्या तुलनेने वीज दरातील सवलतीची रक्कम अगदीच किरकोळ असेल तर याचाही विषय सामाजिक सुधारणा व्यवस्थेच्या धुरिणांनी केला नाही तर ते त्यांच्या पदास अपात्र आहेत असाच निष्कर्ष काढावा लागेल.

विजेच्या दराची आकारणी राज्य पातळीवर होते; ही योजना योग्यच आहे. कारण प्रत्येक राज्यातील उद्योगधंदे तसेच शेतीची परिस्थिती अगदी वेगवेगळी असू शकते. या व्यवस्थेमुळे शेतीच्या बाबत मात्र एक अडचण तयार होते. शेतीपंपाच्या विजेचे दर महाराष्ट्र राज्याने ठरवायचे आणि त्या पंपांनी उपसलेल्या पाण्यावर पोसलेल्या पिकांची किमत ठरवायची कैंद्र शासनाने. यामुळे काही विशेष सावधानता बाळगण्याची आवश्यकता आहे. ऊस, कापूस, भुईमूग यांच्या उत्पादनासाठी विजेचा दर ठरायचा राज्य पातळीवर आणि या वस्तूंच्या आधारभूत किमती मात्र ठरायच्या दिल्लीला! इतर राज्यांच्या तुलनेने महाराष्ट्रातील शेतकऱ्यांवर अन्याय होणार नाही याची काळजी घेणे ही जबाबदारी महाराष्ट्र शासनाकडे येते.

उरलीसुरली शेतीला

पुरवठा (कनेक्शन) देणे, वीज पुरवणे, दुरुस्ती करणे, पुरवठ्याची गुणवत्ता या सगळयाच्या बाबतीत शेतीचा पुरवठा हा दुय्यम दर्जाचा आहे. त्यामुळे शेतकरी ग्राहकांनी इतर ग्राहकांच्या बरोबरीने वीज उत्पादनाच्या खर्चाचा भार घ्यावा हे म्हणणे न्यायाला धरून होणार नाही. तर्काला धरून होणार नाही. कारखानदार शेतीतील वीज वापराचा बोजा स्वत:च्या डोक्यावर घेतात ही

मांडणीच मतलबी आणि अवास्तव आहे.

विहिरी कम, पंप जास्त

शेतीला होणाऱ्या वीजपुरवठ्यामध्ये मोठी सवलत आहे असे युक्तिवादाकरिता गृहीत धरू; दुय्यम दर्जाच्या पुरवठ्याकरिता जो उत्पादनखर्च होत असेल त्या तुलनेनेही शेतीला ज्या सवलती द्यायला पाहिजे त्याहीपेक्षा जास्त सवलती आज शेतीला मिळत आहेत हेही थोडावेळ खरे धरू. तरी एक प्रश्न उरतो. यश खाती शेतीला मिळणाऱ्या लाभाचा आकडा काय असेल? म.रा.वि.मं. याबाबतीत मोठी हातचलाखी करत आहे. ते शेतीला होणारा वीजपुरवठा फुगवून दाखवत आहे. शेतीपंपाकरिता वापरल्या जाणाऱ्या विजेचा आकडा फुगवत आहेत आणि या सगळ्या बेहिशेबी गोंधळात मंडळाचा गैरकारभार आणि अधिकाऱ्याचा भ्रष्टाचार लपवत आहेत.

महामंडळाच्या म्हणण्याप्रमाणे महाराष्ट्रात २० लाख शेतीपंप कामात आहेत. महाराष्ट्रातील विहिरींची संख्या ९ लाखाच्या आसपास आहे. नदी, तळी, कालवे या वरील उपसा, सिंचन योजनेतील पंपांची संख्या विहिरीवर बसवलेल्या पंपापेक्षा २ लाखाने जास्त असेल हे मान्य कसे करावे? सगळ्या देशात मिळून शेती पंपाची संख्या १ कोटी आहे. म्हणजे देशातील एकूण शेतीपंपापैकी २०% या कोरडवाहू महाराष्ट्रातच आहे! पंजाब, उत्तर प्रदेश, हरियाना, गुजरात, कर्नाटक, तामिळनाडू या राज्यांत विजेचे पंप सर्वत्र मोठ्या संख्येने वापरले जातात. याउलट महाराष्ट्रात पंपांचे प्रमाणे चार जिल्ह्यातच विशेषत्वाने आहे. ही सर्वत्र आकडेवारी मोठी संशयस्पद आहे.

१९७४ ते ९४ या काळात शेती पंपांची संख्या ८.६% या गतीने वाढली आणि हॉर्सपॉवरवर आकारणी असलेल्या पंपांचा वापर ५.५% नी वाढत जाऊन सध्या शेती पंपांचा सरासरी वापर दरवर्षी १३८० तास आहे. असे महामंडळाचे म्हणणे आहे. महाराष्ट्रातील कोरडवाहू शेतीत पावसाळ्याच्या चार महिन्यांत पंप अपवादानेच चालतात. उन्हाळ्याच्या चार महिन्यातील दोन महिने तरी बहुतेक पंप पाण्याअभावी बंदच राहतात. रब्बीच्या पिकात चार महिने पंप चालतात; पण २४ तास पंप चालतील अशा विहिरी महाराष्ट्रात दुर्मिळ आहेत. आठवड्यातून तीनही फेजेस चालू आहेत. अशा काळातच मोटारी चालणार. मग हा १३८० चा अवाढव्य आकडा आला कोठून? म.रा.वि.मं. ची हातचलाखी बारकाईने समजून घेतली पाहिजे.

म.रा.वि.मं. शेती पंपाचा आकडा फुगवीत राहते. नवीन पंपांची नोंद होते;

पण पुरवठा (कनेक्शन) काढून टाकला तरी त्यांची नोंद कागदोपत्री कायम राहते. हा पंपांचा आकडा अशा तऱ्हेने फुगवल्याने म.रा.वि.मं. चा एक डाव साधतो. ७५% शेतीपंप हॉर्सपॉवर आकारणीचे आहेत, तेव्हा तिथे नेमकी किती वीज जळत याचा काहीच हिशोब नाही. याचा फायदा घेऊन एकूण उत्पादनापैकी ज्याला नक्की हिशोब नाही असा सगळा वापर महामंडळ शेतीच्या बोडक्यावर लादते. एकूण उत्पादन उणे कारखानदारी, व्यापार, घरगुती वापरासाठी कागदोपत्री झालेला वापर उणे वाहक व वाटप गळती यातून जे उरेल तो सगळा वापर शेतीतच झाला असला पाहिजे. असा मंडळाचा वापर शेतीतच झाला असला पाहिजे असा मंडळाचा कांगावा आहे. विजेच्या चोऱ्या महामंडळाच्या नोकरदारांच्या संभवत नाही. वापराच्या आकडेवारीत अशी गडबड केल्याने अधिकाऱ्यांना खजगीत वीजपुरवठा करणे शक्य होते. साऱ्या देशात वाळक आणि वाटप गळती २०% ते २५% आहे. महाराष्ट्रातील वाहक वाटप व्यवस्था तांत्रिक दृष्ट्या इतर प्रदेशांप्रमाणेच आहे; पण म.रा.वि.मं. मात्र आपली वाहक वाटप गळती फक्त १४% असल्याचे दाखवते. शेतीच्या डोक्यावर जास्त वापर दाखवायचे ठरवले तर महामंडळ वाहक आणि वाटप गळतीत आपण अमेरिकेच्या बरोबर असल्याचेही (अमेरिका १०%) सांगू शकेल!

म.रा.वि.मं.चा हा बेहिशेबीपणा आणि त्यातील गोलमाल सर्व जाणकारांना चांगली माहीत आहे.

एका काळचे केंद्रीय वीज प्राधिकरणाचे अध्यक्ष एस.एन. रॉय लिहितात...

"शेतीतील वीज वापराची व्यापक चौकशी आणि विश्लेषण झाले पाहिजे. शेतीवर सगळा दोष टाकून चालणार नाही. कारखानदारी आणि घरगुती वापरातही चोरीचं प्रमाण प्रचंड आहे. वाहक, वाटप गळतीचा निश्चित अंदाज घेणे तांत्रिकदृष्ट्या म.रा.वि.मं. ला सहज शक्य आहे.

"...राज्य विद्युत मंडळे शेतीतील विजेचा वापर फुगवून सांगतात आणि आपली वाहक वाटप गळती कमी असल्याचे दाखवतात. शेतीतील वापर तिपटीने वाढलेला दाखवला आहे. विजेचा पुरवठा अपुरा असला तरी. राज्य विद्युत मंडळ नवे पंप दाखवतात, जुने वजा करत नाहीत. निदान १० लाख शेतीपंप विद्युत मंडळ चालू नसल्याचे धरत नाहीत."

शेतीतील विजेच्या वापराचा असा अभ्यास करणे म.रा.वि.मं. कधीच मान्य करणार नाही. मग आता शेतकऱ्यांनी आपला हक्क बाजवून मीटरची मागणी केली तर महामंडळाला ती मान्य करावी लागेल!

शेतीपंपावरील विजेच्या दरात वाढ करताना मीटरवर आकारणी असलेल्या पंपांना सूट देऊन सरकारनेच ह्या प्रश्नाला तोंड फोडले आहे. सगळी दरवाढ सरासरीने साडेसतरा टक्के आणि शेतीकरिताची वाढ ६६% आणि छोट्या शेतकऱ्यांच्या बाबतीही ती ३३% याचा अर्थ काय लावायचा? कापूस मेला, ऊस जळाला तरी शेतकरी संतापाने उठत नाहीत हे गेल्या वर्षांच्या अनुभवाने लक्षात आल्यानंतर शासनाने शेतकऱ्यांना अधिक चेपून बघावे यात आश्चर्य तो काय?

शेतीसाठीचा विजेच्या दराबाबत काही सवलती मिळतात किंवा नाही हे ठरवताना खालील घटकांचा विचार करावयास पाहिजे.

१) विजेचा खराखुरा उत्पादन खर्च – म्हणजे गबाळपणा, अकार्यक्षमता इत्यादि वगळून.

२) शेतकऱ्यांना प्रत्यक्ष – अप्रत्यक्षपणे द्यावी लागणारी किमत – लाच, दरंगाई. उपकरणांचे, पिकांचे नुकसान इत्यादि धरून.

३) शेतीला मिळणाऱ्या दुय्यम दर्जाच्या फावल्या वेळातल्या पुरवठ्याचा उत्पादनखर्च.

४) शेतीसंबंधीच्या व्यापक धोरणानुसार सुयोग असे फेरफार.

महाराष्ट्रात कालवा – बागायती कापूस जवळजवळ नाही. याउलट, हरियाना, पंजाब येथील सगळे कापूस पीक कालवा–बागायती आणि या कापसाची किमत ठरवणार केंद्र शासन. महाराष्ट्रातील विजेचे दर वाढवले तर येथील पिकांना वरचढ भाव मिळतील अशी कोणती व्यवस्था राज्य शासन करू शकते?

चालू दरवाढीची घोषणा आली त्याआधी दरवाढ अजिबात होणार नाही, त्याउलट कारखानदारी वीज वापरायच्या दरात ४०% वाढ होईल अशी वदंता होती. कारखानदारांनी शासनावर दबाव आणण्यासाठी प्रयत्न केल्याच्याही बातम्या होत्या. त्यांच्या प्रयत्नांना यश आले असावे हे उघड आहे; कारण कारखानदारांच्या दरात ४०% ऐवजी फक्त १५% वाढ झाली, इतकेच नाही तर भरभरक्कम ३३ ते ६६% ची वाढ झाली याचा मतितार्थ ओळखणे कठीण नाही.

मीटरधारक शेतकऱ्यांना दरवाढीतून सुटका. पंपवाल्या छोट्या शेतकऱ्यांना भरभक्कम ३३% वाढ आणि इतर शेतकऱ्यांना तर जीवघेणी ६६% वाढ ही एक मोठी रहस्यकथाच आहे. महाराष्ट्र राज्य विद्युत महामंडळाच्या कारभारातील ही हातचलाखी नीट समजून घेणे महत्त्वाचे आहे.

आवळा देऊन भोपळा काढला

महाराष्ट्रातच नव्हे तर साऱ्या हिंदुस्थानात शेतीपंपांना होणाऱ्या वीजपुरावठ्यास

सवलतीच्या दराचा फायदा मिळतो किंवा नाही याचा निवाडा करण्याआधी शेतीविषयक सरकारी धोरणाचा अधिक साकल्याने विचार करणे आवश्यक आहे. स्वातंत्र्यानंतर अनेक वर्षे, ''शेतकऱ्यांची देशात मजा आहे; त्यांना वीज, पाणी, खते, बी-बियाणे अशा अनेक गोष्टीबाबत सवलती आहेत. वर या लोकांना आयकरही भरावा लागत नाही.'' अशी भाषा सगळेच डवे आणि अर्थशास्त्री मांडत असत. शेतकरी संघटनेने या सिद्धांताचा मुकाबला केला आणि डंकेल प्रस्तावातील चर्चेच्या प्रसंगाने, शेतकऱ्यांना -७२% (उणे बहात्तर) सबसिडी आहे हे सरकारी दस्तावेजाच्या साहाय्याने सिद्ध करून दाखवले. १९८६-८७ ते १९८८-८९ या काळात शेतकऱ्यांना वीज, खते, पाणी व बी-बियाणे इ. शेतीला लागणाऱ्या मालाच्या किमतीत दरसाल सरासरीने ४५८१ कोटी रुपयांची सबसिडी शासनातर्फे दिली जात होती आणि त्याच काळात १७ शेती उत्पादनांवरच २४,४४२ कोटी रुपयांची उलटी सबसिडी अमलात होती. शेतीवर स्वातंत्र्योत्तर झालेल्या जुलमी अन्यायाचा कबुलीजबाब १९९५-९६च्या आर्थिक सर्वेक्षणातही सापडतो.

...गेली चार देशके कारखानदारीला प्रचंड संरक्षण देण्यात आले आणि शेतीचा देशी कारखानदारीसाठी स्वस्त कच्च्या मालाच्या पुरवठ्याचे साधन म्हणून उपयोग करण्यात आला...परिशिष्ठ ७७

शेतीतील निविष्ठावर देण्यात येणारी सूटसबसिडी ही अगदी थोड्या अंशेने का होईना, किमतीतील उलट्या पट्टीची भरपाई करत होती. १९९१ सालापासून खुल्या व्यवस्थेच्या गर्जना आणि वल्गना चालू झाल्याबरोबर शेती निविष्ठांना जेथे जेथे काही सबसिडी मिळत होती ती कमी करण्याची किंवा अजिबात काढून टाकण्याची कोशीश सुरू झाली; पण शेतीच्या देशी किंवा विदेशी व्यापारातील सरकारी हस्तक्षेप थांबवून किंवा कमी करून शेतीमालावरील उलटी पट्टी कमी करण्यास सुरुवात झालेली नाही.

तांदूळ, साखर यावरील लेव्ही चालूच आहे. सर्व ठळक शेतीमालावर निर्यातबंदी आहेच. परदेशी महागडा शेतीमाल देशात आणून येथील किमती पाडण्याचे जुने तंत्र सुरूच आहे. शेतीसंबंधी सर्व कारखानदारीवर जुनी बंधने चालूच आहेत. परिणामतः १९९२-९३ साली शेती निविष्ठावरील सूटसबसिडी ८६४५ कोटी रुपयांची होती तर शेतीमालाच्या किमतीवरील उलटी पट्टी ४२७८९ कोटी रुपयांइतकी वाढली. १९९६ सालापर्यंत हा आकडा ५५००० कोटी रुपयांपर्यंत पोचलेला असावा.

भीक नको,

शेतकऱ्यांना फुकटचे काही नको, धर्मादाय काही नको. म.रा.वि.मं. ला रास्त खर्च ग्राहकांकडून भरून घेण्याचा अधिकार आहे हे खरे. सबसिडी कमी करण्याला विरोध नाही पण त्याचबरोबर किमतीबरील उलटयापट्टीचा पर्वतप्राय बोजा कणाने तरी कमी करण्याचा प्रयत्न व्हायला पाहिजे. निविष्ठांवरील सबसिडी आणि किंमतीवरील उलटी सबसिडी हे दोन्हीही दूर करण्याचे प्रयत्न एकाचवेळी झाले पाहिजे. खुल्या व्यवस्थेचे नाव घ्यायचे आणि सबसिडी कापायची आणि उलटी सबसिडी मात्र चालू ठेवायची असा हा भामटेपणा चालू आहे.

विजेच्या दराच्या वाढीविरुद्ध देशभर वेळोवेळी आंदोलने झाली आहेत. तामिळनाडूतील व्यवसायगल संघमचे आंदोलन विजेच्या प्रश्नावरच उभे राहिले. पंजाब, हरियाना, गुजरात या राज्यांत विजेच्या दरवाढीविरुद्धचे आंदोलन जवळजवळ सतत चालूच असते.

लढा अटळ आहे

शेतकरी संघटनेच्या अध्यक्षांनी महाराष्ट्र शासनाच्या दरवाढीविरुद्ध मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठापुढे याचिका दाखल केली आहे. तेथे न्याय मिळू शकला नाही तर काय करावे? त्याचा निर्णय ९ ऑगस्टच्या औरंगाबादच्या व्यापक कार्यकारिणीच्या बैठकीत घेतला जाईलच; पण त्याखेरीज सरकारी क्षेत्रातील महामंडाळांच्या अजागळ कारभाराची भांडेफोड करण्याची ही एक उत्तम संधी आहे. सरकारी क्षेत्रातील महामंडाळांची मक्तेदारी संपत नाही तोपर्यंत त्यांच्या कारभाराचे सार्वजनिक विच्छेदन झाल्याखेरीज कोणतीही भाववाढ मान्य केली जाणार नाही. अशी भूमिका शेतकऱ्यांनी घेतली पाहिजे आणि त्याबरोबरच बिगर शेतकरी समाजालाही या आंदोलनात सामील करून घेतले पाहिजे. म.रा.वि.मं.च्या कारभाराची खुली चौकशी घडवून आणता आली तर सध्याच्या परिस्थितीत ती मोठी आशादायी गोष्ट ठरेल.

(२१ जुलै १९९६)

◆◆

# बळिराज्य – मराठवाडा

'बळिराज्य मराठवाडा' म्हणून स्वतंत्र मराठवाडा राज्य मागणे म्हणजे काही स्वतंत्र खलिस्तान माणसे नाही, ही काही देशद्रोहाची मागणी नाही. ही मागणी केल्याने देशद्रोह होत नाही आणि मराठी भाषेशी द्रोहही होत नाही. एका मराठी राज्याची दोन तीन मराठी राज्ये झाली तर मराठी भाषा बुडेल, असे होण्याची सुतराम शक्यता नाही.

आपण ज्योत पेटवली आता यातून एक चर्चेचा नंदादीप उभा राहिल. निर्णय काय व्हायचाय तो योग्यतेनुसार इतिहास करेल. वर्तमानपत्रात मराठवाड्याविषयी चर्चा होते, स्वतंत्र विदर्भाविषयी चर्चा होते तेव्हा त्या चर्चेमध्ये एक वाक्य हमखस असते की, ''या पश्चिम महाराष्ट्राच्या लोकांनी आमची लूट केली आहे. यांच्यापासून आम्हाला वेगळं व्हायला पाहिजे!'' अशी मांडणी बहुतांशी होत असताना आपण पश्चिम महाराष्ट्रात, अपघाताने का होईना जन्मलेल्या एका माणसाला या परिषदेचे उद्‌घाटन करण्यासाठी तुम्ही बोलावलेत त्याबद्दल मी तुमचे अभिनंदन करतो.

इथं काही हिंदू, मुस्लिम, ब्राह्मण, मराठे असा जातीयवाद होणार नाही. पश्चिम महाराष्ट्राच्या लोकांनी जरी शहाणपण सांगितलं तर ते शिरोधार्य मानण्याची परंपरा मराठवाड्यात आहे ती यापुढेही चालू राहणार आहे. माझं काम तसं सोपं आहे. चर्चा आज व यापुढेही चांगली व्हावी यासाठी थोडासा मंच तयार करून देण्याची जबाबदारी माझी आहे. यासाठी मी इथे उभा आहे.

१९६० साली सर्व राज्यांची एकदा आखणी आणि त्यानंतर हा प्रश्न सुटला असे आपण धरून चाचलो होतो. काही काही लोक म्हणायचे देशामध्ये कोणताही प्रश्न निर्माण झाला म्हणजे राष्ट्रीय भावनेचा अभाव आहे. संपादकांना पत्र लिहिणारे काही लोक म्हणत असत की, ''देशामध्ये काही गोंधळ चाललाय ना,

तो सगळा भाषावर प्रांत रचना झाल्यामुळे झाला. यामुळे देशात वेगवेगळया भाषा बोलण्याऱ्याचं भांडण सुरू झालं." असं लिहिणारे काही अपवादात्मक लेखक सोडले तर विषय जवळजवळ संपला आहे असं आपण गृहीत धरून चाललो होतो. बेळगाववाल्यांची मध्येच काहीतरी तक्रार चालू व्हायची किंवा झारखंडवाले आपल्याला वेगळं राज्य पाहिजे असं मागत होते. झारखंडवाल्यानी त्यांची किमत काय हे रुपये आणि पैशात मांडल्यानंतर त्याचं महत्त्व आपोआप कमी झालं होतं आणि एकदम पंतप्रधांनानी लालकिल्ल्यावरून बोलताना उत्तराखंडाचं राज्य आम्ही द्यायचं ठरवलं आहे असं जाहीर होईल असंही सांगितलं आणि त्यामुळे पुन्हा एकदा राज्याच्या सरहद्दी कोणत्या व त्या कशा असाव्यात यासंबंधी सगळीकडे चर्चा सुरू झाली. महाराष्ट्राविषयी बोलायचं झालं तर विदर्भामध्येही चर्चा अधिक प्रकर्षाने सुरू झाली आणि राजकीय पक्षाच्या हद्दी ओलांडून लोक विदर्भाच्या बाजूने बोलू लागले. अर्थात, राज्यकर्त्या पक्षांनी म्हणजे शिवसेनेच्या बाळासाहेब ठाकरे यांनी आपला विरोध आहे असं जाहीर केलं. तसं त्याच्या पलीकडे जाऊन त्यांनी दमदाटी केली असं काही नाही. ते दमदाटीची भाषा इतरत्र बोलतात; पण तरीसुद्धा बाळासाहेब जे बोलले त्यांच्या विरुद्ध कोणी बोलायचं अशी शंका लोकांच्या मनात येऊन जाते अन् त्यामुळे त्यांच्याविरुद्ध बोलावे की नाही अशी मनात थोडी धाकधूक राहते. बाळासाहेब ठाकरे आणि त्यांच्या लोकांनी स्वतंत्र विदर्भ राज्यास विरोध केला तेव्हा लोक त्यांना भेटायला गेले तेव्हा ते म्हणाले, "थांबा! १९९८ सालापर्यंत मी विदर्भाची काय भरभराट करून टाकतो ते बघा व मग तुमची मागणी मांडा." विदर्भामध्ये काँग्रेसचे नेते परिषदा भरवून चुकले, आंदोलनाला सुरुवात झाली. शरद पवारांचे अत्यंत जवळचे व विरुद्ध असलेले असे दोन्ही नेते त्यांच्यात सामील झाले आणि शरद पवार आणि शंकरराव चव्हाण असे दोन्ही नेते कधी नव्हे ते एकत्र येऊन ते विदर्भाला विरोध करण्यासाठी उभे आहेत. याचा अर्थ काय की, स्वतंत्र विदर्भाला त्यांचा विरोध म्हणजे स्वतंत्र मराठवाड्याला त्यांचा विरोध असणारच आहे.

आजपर्यंत कोकणच्या लोकांनी स्वतंत्र राज्य हवे, अशी मागणी केलेली नाही. कारण कोकणला मुंबईच्या जवळ राहणं आवश्यकच आहे; पण उत्तर महाराष्ट्रात म्हणजे नाशिक, धुळे, जळगाव, अहमदनगर या जिल्ह्यांना मुंबईपासून वेगळं करता आलं तर वेगळं करावं असे वाअणारा एक गट आहे; पण अजून तो काही बोलत नाही. या परिस्थितीमध्ये ही चर्चा इथे सुरू होते आहे.

मला काही मुद्दे तुमच्यासमोर मांडायचे आहेत ते अशाकरिता ही, चर्चा करताना आपण त्या गोष्टीचं भान ठेवावं. पहिली गोष्ट मी स्पष्ट करू इच्छितो. मला इथं येताना पुण्याच्या माणसांनी बजावलं की, "लक्षात ठेवा तुम्ही जर का मराठवाड्याच्या बाजूनं बोलायला लागलात तर पश्चिम महाराष्ट्रात तुमची काही धडगत राहणार नाही, इथं काय होईल हे काही सांगता येणार नाही!" पण अशा धमक्या आपण पुष्कळदा ऐकतो. धमक्या मिळाल्या म्हणून काही आपण मत बदलत नाही. पहिली गोष्ट स्पष्ट अशी असली पाहिजे की, स्वतंत्र मराठवाडा मागणे म्हणजे काही स्वतंत्र खलिस्तान मागणे नाही. ही काही देशद्रोहाची मागणी नाही. दोन भावांना असं वाटत असलं की, आपला संसार चुली वेगवेगळ्या केल्या तर जास्त चांगला चालण्याची शक्यता आहे; खरं असेल, खरं नसेल, कदाचित चुली वेगळ्या झाल्याने दोघांचेही नुकसान होईल; पण दोघांना आज असं वाटतंय ना जर आपण वेगळे झालो तर आपलं बरं होईल! मग आपण समजुतीने चुली वेगळ्या केल्या तर त्यात काही देशद्रोह आहे असं नाही.

मी आज वर्तमानपत्रात वाचलं; मला काही लोकांनी कवी सुरेश भट यांनी साहित्य परिषदेला लिहिलेलं पत्र दाखविलं की, स्वतंत्र विदर्भ मागणे म्हणजे तो मराठी भाषेचा द्रोह आहे आणि राज्याचा द्रोह आहे मराठी टिकेल कशी? अन् राज्य टिकेल कसे? ही ी सुरेश भट यांची चिंता आहे मला वाटते की ती अभिनिवेशी चिंता आहे. ज्यांना प्रामाणिकपणे, वस्तुनिष्ठपणे विचार करायचा आहे त्यांनी हे समजून चाललं पाहिजे की, ही मागणी करण्यात देशद्रोह नाही आणि राज्यद्रोहही नाही. 'मराठी भाषेचा द्रोह आहे!' असे सुरेश भट यांचे म्हणणे आहे. मराठी भाषा फार काळ जगणार नाही अशी खंत मी एका वेगळ्या भाषणात (जवळाबाजार येथील मराठवाडा साहित्य संमेलनात) व्यक्त केली आहे. ते भाषण आता छापून प्रसिद्धही झालं आहे. एका मराठी राज्याची तीन मराठी राज्य झाली तर त्यामुळे मराठी भाषा बुडेल असं होण्याची सुतराम शक्यता नाही हे आपण चर्चेमध्ये लक्षात ठेवलं पाहिजे. कारण भाषावार प्रांत रचनेची प्रेरणा कोणती? म. फुल्यांनी 'शेतकऱ्यांचा असूड'मध्ये ही प्रेरणा फार चांगली मांडलीय कोणत्याही एका राज्याची सरकारी भाषा ही तिथल्या बहुसंख्य लोकांची मातृभाषा असावी. इथं लोक मराठी बोलतात ना! मग इथला कारभार मराठीत चालला पाहिजे का? त्यांनी उदाहरण दिले की, एक शेतकरी कोर्टात जातो, एक वकील त्याला न समजणाऱ्या भाषेत म्हणजे इंग्रजीत बोलतो. दुसरा वकील त्याला न समजणाऱ्या भाषेत उत्तर देतो. न्यायाधीश निवाडा देतो तो

इंग्रजीत देतो अन् एक कारकून येऊन त्याला सांगतो 'पाटील तुमची जमीन गेली!' काय युक्तीवाद झाला हे त्या शेतकऱ्याला शेवटपर्यंत समजायची शक्यता नाही. याला काही राज्य कारभार म्हणत नाहीत. म्हणून कोणत्याही राज्याचा राज्यकारभार लोकांच्या भाषेत चालला पाहिजे असे ज्योतिबा फुले म्हणतात.

एका राज्याची एकच भाषा असली पाहिजे हे तत्त्व भाषावर प्रांतरचनेत आहे. त्यासाठी एक भाषेचं एकच राज्य असंल पाहिजे अशी बिलकुल आवश्यकता नाही उदा. समजा उद्या कर्नाटकच्या लोकांनी असं म्हटलं की आमच्या कानडी भाषेपेक्षा मराठी भाषा शिकायची आहे. त्यांनी सगळयांनी मराठी भाषा शिकली तर मग काय तुम्ही महाराष्ट्र अधिक कर्नाटक असं मोठं राज्य करणार काय? किंवा आंध्रातील लोकांनीही असंच केलं तर महाराष्ट्र अधिक कर्नाटक अधिक आंध्र असं मोठं राज्य थोडंच कुणी करणारय?

जे महाराष्ट्र हे राज्य तयार झालं तेव्हा लोकसंख्या तीन कोटी होती आज सात कोटी झाली आणि प्रशासनाच्या सोयीकरता या राज्याची दोन तीन राज्य करावी असं म्हटलं तर त्यामुळे मराठी भाषेचा मोठा द्रोह होतो असं नाही; महाराष्ट्र राज्याचा द्रोह होतो असं नाही; देशद्रोह होतो असं तर मुळीच नाही. जी चर्चा करायची आहे ती शिवराह चिखलफेक होऊन होऊ नये. त्यासाठी मुख्य मुद्दे हे असावेत.

लहान आणि मोठी राज्ये या विषयावरही खूप चर्चा चालू आहे. माझं सर्वसाधारण मत असं आहे की, मोठ्या राज्यापेक्षा लहान राज्य असणंच अधिक चांगलं का? मला जर का माझं काही काम सोडवून घ्याचं असेल तर हायकोर्टात मुंबइला जावं लागतं. मुंबईला गेल्यावर राहायची माझीसुद्धा सोय नाही; पण जितकं जवळ केंद्र असेल, तितकं चागलं एवढंच मी म्हणेन; पण याचकरिता लहान राज्य केली पाहिजे व ते आवश्यकच आहे असं काही मला वाटत नाही; पण सध्याच्या युगात मला वाटतं राधनी असणं अनावश्यक ठरवलं जर मराठवाडा राज्य अस्तित्वात आले तर राजधानी कोणती? असा प्रश्न होईलच. एकदा पश्चिम महाराष्ट्राशी भांडण संपलं की, तुमची आपआपसात मारामारी होणारच आहे. राजधानी कोणती यावर! औरंगाबादचे समर्थन केले जाईल, मंत्री येतील जातील; पण ख.अ.ड. अधिकारी इतर जिल्ह्यात, तालुक्यात जायला तयार होणार नाहीत. त्यांना औरंगाबादच राजधानीचे योग्य ठिकाण वाटेल. तेव्हा तुमच्या परिषदेला न येणारांनी आजच औरंगाबादेत मोठ्या प्रमाणात जमिनी खेरदी करायला आताच सुरुवात केली आहे. जर का आपण असं

तपासलं. (भूगोलाप्रमाणे) की येणाऱ्याजाणाऱ्या दृष्टींनी अधिक सोयीचं केंद्र कोणतं? मला वाटतं अंबेजागाई हे आहे. अंबेजोगाईला एक मुख्यमंत्र्याचं घर ठेवावं आणि प्रत्येक जिल्ह्यामध्ये एकेक दोन-दोन मंत्रालये ठेवली आणि त्या सगळ मंत्र्यांचा संबंध संगणाकांनी ठेवला तर मंत्र्यांची चित्र एकमेकांना दिसताहेत, एकमेकांना समोरा समोर बोलता येत आहे, कन्फरन्सिंग करता येतं, असं जर चित्र धरलं तर एक राजधानी असण्याची काही गरज पडणार नाही आणि आपली कामं करून घेण्याकरिता लांब जावंही लागणार नाही. येण्या-जाण्याची यातायात टाळण्याकरिता लहान राज्यं चांगली असं माझं मत आहे. लोकांच्या जवळ आलेली राज्यं चांगली; पण त्याकरिता फार तुकडे तुकडे पाडण्याची आजच्या तंत्रज्ञानात काही आवश्यकता आहे असं नाही.

परवा मी बघितलं की, पंतप्रधानाच्या खोलीमध्ये संयुक्त राष्ट्र संधामध्ये जेव्हा निवडणूक चालू होती तेव्हा आणि जपानने आपला पार पराभव केला तेव्हा जपानला १४२ मते मिळाली अन् आपल्याला केवळ ४० मते मिळाली. त्यावेळी संयुक्त राष्ट्रसंघाच्या बैठकीत जे काही मतदान चाललं होतं त्याचं चित्रण पंतप्रधानांच्या खोलीत (केबिनमध्ये) दिसत होतं. हे जर असेल तर आपल्या राज्याच्या जुन्या कल्पनेप्रमाणे लहान मोठा असा काही भाग असू नये; पण एकूण लहान राज्ये ही चांगली, जितकं विकेंद्रीकरण असेल तितके चांगलं हा प्रशानाचा नियम आहे. याच्यामध्ये जे मराठवाड्याच्या बाजूने आहेत त्यांनी लहान राज्य म्हणावे, असा वाद घालण्याचे कारण नाही. प्रशासनाचे घटक हे जितके सुटसुटीत असतील तितकं ते चांगलं.

त्याच्या नंतरचा महत्त्वाचा मुद्दा. १९६० साली जेव्हा राज्याच्या सरहद्दी रिपोर्ट आला त्यानंतर इतक्या वर्षांनी आज पुन्हा आपण सगळं प्रकरण उघडायचा प्रयत्न करतो आहोत. या दोन परिस्थितीमध्ये मराठवाड्याच्या बाबतीत विचार करायचा झाला तर दोन महत्त्वाचे फरक आहेत. १९६० साली मराठवाड्याच्या लोकांची सर्वसाधारण बुद्धी अशी होती की, एखादं वासरू गाईपासून दूर गेलेले असावं आणि त्याला सोडल्याबरोबर धावत जाऊन आईच्या आचळाला आपण कधी लागतो असं वाटावं. अशी परिस्थिती तेव्हा मराठवाड्याच्या समाजाची होती. त्यांना वाटायचं, निजामाच्या कचाट्यातून आपण सुटलो; पण सांगता येत नाही काय होतंय? पंडित नेहरूंची इच्छा अशी दिसतेय की पोर्तुगीजांचा गोवा हा संस्कृतीचा ठेवा म्हणून तसाच ठेवावा आणि तसेच निजामाच्या राज्याच्या सरहद्दी न तोडता तो जसाच्या तसा ऐतिहासिक ठेवा म्हणून जपून ठेवावा.

तेव्हा मराठवाड्याच्या लोकांची मोठी हवालदिल अवस्था झाली होती. इकडे आंध्र तिकडे कर्नाटक या राज्यासोबत राहण्यापेक्षा मराठी भाषिक महाराष्ट्रात जाण्याचा निर्णय थोडासा 'शारदा' नाटकातील 'शारदे'प्रमाणे झाला. तिचं जर का बुढ्याशी (जरठाशी) लग्न लागणार असेल. तर त्याच्यापेक्षा इकडं लागलेलं जास्त बरं असं महाराष्ट्राशी संपर्क आलेल्या लोकांना वाटलं असलं पाहिजे. अशा एका वातावरणात आणि गंभीरपणे हा निर्णय झाला असावा. गंभीरपणे हा निर्णय झाला असावा. निदान मराठवाड्याच्या लोकांमध्ये तरी अशी शंका आली नाही की, महाराष्ट्रात गेल्यामुळे आमच्यावर अन्याय होईल किंवा आपल्याला काही त्रास होईल! विदर्भाचे थोडे जास्त शहाणे, त्यांनी थोडा जास्त चांगला विचार करून लिहून घेतलं आणि त्या बावळ्यांना असं वाटलं की याच्याकडून लिहून घेतलं की आता आपल्यावरती काही होत नाही, तसं झालं असतं तर रामाचं युग चालू झालं असतं, एक वचनी राम गेले आज फक्त रामाच्या नावाने भांडणारे राहिले. त्याची काही परिपूर्ती होण्याची आवश्यकता नाही. अशा अवस्थेत मराठवाड्याने महाराष्ट्रात जायचं ठरवलं असावं.

आणखी एक विशिष्ट परिस्थिती तेव्हा होती १९५७ साली जेव्हा एक समिती नेमली गेली तेव्हा अजून समाजवादी रचनेची घोषणा झालेली नव्हती; पण समाजवादी रचनेची घोषणा झालेली नव्हती; पण समाजवाद येतो आहे आणि भारत हा समाजवादाच्या दिशेने जातो आहे. याचा अर्थ असा की, शासन हे विकासाचं साधन राहणार आहे ही कल्पना त्यावेळी सर्वमान्य झालेली होती. आज आम्ही नेहरूंना नावे ठेवतो; पण त्यावेळेला आम्हीही म्हणत होतो की, समाजवाद हाच विकासाचा मार्ग आहे. आता राज्याच्या पुनर्रचनेचा विचार जो होतो आहे. समाजवादाकडे आज आपण येणारी पहाट म्हणून पाहात नाहीत तर एक बुडालेला सूर्य म्हणून पाहातो आहोत. आता विकासाचं साधन शासन नाही तर उद्योजकता आहे. अशा एका क्षितिजाकडे आपण वाटचाल करत असताना राज्याची पुनर्रबांधणी होते आहे. ही बदललेली परिस्थिती आपल्या चर्चेत लक्षात ठेवणे फार महत्त्वाचे आहे. एके काळी समाजवादी अर्थव्यवस्थमध्ये राज्याच्या सरहद्दी यांना काही अर्थ नव्हता. कारण शेवटी तुम्हाला काय द्यायचं हे सरकार ठरवणार होतं, म्हणून काही विद्वान असे होते की, त्यांनी म्हटलं, हे बेळगावचं भांडण, हे सरहद्दीचं भांडण. ही भांडण काढून टाका आणि हिंदुस्थानच्या नकाशावरती अशा उभ्या आडव्या चौकोनी रेषा. आखा. अमेरिकन संयुक्त राज्याची रचना अशीच झालीय हे नकाशात दिसतं. कारण तिथं भाषा आणि

संस्कृतीचा फारसा प्रश्नच नव्हता. सगळेच लोक गेल्या २००-३०० वर्षांत तिथे जाऊन राहिलेले, तर अशाच तऱ्हेने राज्यांची बांधणी हिंदुस्थानातसुद्धा करावी कारण तुम्हाला किती मिळणार आहे. हे कुणी ठरवायचं? सरकारने ठरायचंय. विदर्भाचा विकास, मराठवाड्याचा विकास कशावर अवलंबून आहे? राज्याच्या अंदाजपत्रकामध्ये जी रक्कम येते त्याची वाटणी करण्यावर अवलंबून आहे आणि ती जर का वाटणी सरकारने योग्य तऱ्हेने केली तर नकाशे कसे आखावेत याला काही फारसे महत्त्व नाही. याच कल्पनेने विदर्भातील लोकांनी अकोला करार केला नागपूर करार केला आणि लिहून घेतलं की जी काही साधन संपत्ती येईल त्या साधन संपत्तीचं वाटप एक किंवा दोन मार्गांनी होईल. क्षेत्रफळाच्या आधारांनी अगर लोकसंख्येच्या आधारानी साधनाचं वाटप झालं म्हणजे मग वादांना काही कारण नाही राहिलं.

त्याच्या पलीकडे जाऊन आणखी एक मागणी होती की, मराठवाडा आणि विदर्भ हे मागासलेले प्रदेश आहेत. त्यांच्यावरती विशेष खर्च झाला पाहिजे. ही कलम घातल्यावर आता काही अडचण राहणार नाही. मराठवाड्याचा, विदर्भाचा विकास व्यवस्थितपणे होऊ लागेल. कारण महाराष्ट्राची साधन संपत्ती नीट वाटली जाणर आहे असं गृहीत धरलेलं. यातूनच अनुशेष म्हणजेच 'बॅकलॉग' हा शब्द आलाय. म्हणजे पश्चिम महाराष्ट्राच्या तुलनेत आम्हाला (विदर्भ मराठवाड्याला) जितकं मिळायला पाहिजे तितकं मिळालेलं नाही हा पश्चिम महाराष्ट्राच्या लोकांनी दुष्टपणे आमच्याकडून हे काढून घेतलं. याच्यातला रावण कोण असेल तर आख्खा पश्चिम महाराष्ट्र आणि सज्जन कोण तर तुमच्या कमलकिशोर कदमांसह सर्व धरून मराठवाड्यात जेवढे असतील ते सर्व सज्जन आणि पश्चिन महाराष्ट्रात जितके आहेत तितके सारे दुर्योधन अशी मांडणी करण्यात आली. मला प्रामुख्याने या विषयावर बोलायचंय, कारण माझा अभ्यासाचा विषय प्रामुख्याने हा आहे.

एकूण करांपैकी किती कराची रक्कम मराठवाड्यावर खर्च व्हायला पाहिजे होती अन् प्रत्यक्षात किती झाली? हा हिशोब सर्वसाधारण जनतेच्या दृष्टीने निरर्थक आहे. पश्चिम महाराष्ट्रामध्ये साखर कारखाने काढले; पण विदर्भात काढले नाहीत. मराठवाड्यात काढले नाहीत ही भाषा सर्वसामान्य लोकांची, नाही पश्चिम महाराष्ट्रात जसे साखर सम्राट बनले तसे विदर्भात बनले नाहीत, किमान तसे सूत सम्राट किंवा कपास सम्राट बनावेत, अशी ज्यांची मनीषा आहे त्या लोकांनी ही भाषा सुरू केली आहे. याच्यामध्ये आकडे आहेत हे खरे

आहेत; पण हे आकडे निरर्थक आहेत आणि त्या आकड्यामुळे मराठवाड्याला 'बॅकलॉग' मिळाला ही गोष्ट तद्दन खोटी!

या लोकांना मराठवाड्याचे भलं नको आहे, मराठवाड्याचं भलं नको आहे, मराठवाड्याच्या जनतेची गरीबी दूर हटावी अशी त्यांची इच्छा नाहीये. तशी इच्छा असतीच तर इतर मंचावरून गरीबी हटण्याचे जे कार्यक्रम मी सांगतो तसं त्यांनी सांगितलं असतं. सरकारच्या अंदाजपत्रकातून कुण्या प्रदेशाचं भले झालेय हे खरे नाही. तेव्हा त्याच्याती दोनशे कोटी, ५०० कोटी, २००० कोटी कमी पडल्याने मराठवाडा मागासलेला आहे ही जी भाषा आहे ती खोटी, अर्थशास्त्राच्या दृष्टीने निरर्थक आहे. याचा खरा अर्थ आपण पुढे बघू. अनुशेषाची जी भाषा वापरली जाते ती पुढाऱ्यांची भाषा आहे ती अर्थशास्त्रांची भाषा नाही.

वेगळं छोटं राज्य बनलं तर वाटा म्हणून त्याला जी साधनं मिळतील त्यांच्या साहाय्याने ते राज्य स्वावलंबी होऊ शकणार नाही असा आक्षेप काही विद्वान घेतात; पण तो खरा नाही.

एखादी रक्कम उणे आहे. कर्जाची रक्कम, तुमचे कर्ज मी म्हटलं की तिप्पट झालं म्हणजे काही 'घेण्याचं' काही 'देणं' होतं नाही अन् 'देण्याचं' काही 'घेणं' होत नाही. महाराष्ट्र राजय हेच मुळी घाट्यातलं राज्य आहे. पुढच्या महिन्याच्या नोकरदारांचा पगार कसा द्यायचा याची चिंता मुळी मुख्यमंत्र्यांना पडलीय तेव्हा त्यांच्यामध्ये लोकसंख्येच्या आधाराने काढली तर शेवटी उणे रक्कम क्षेत्रफळाच्या आधाराने काढली तर शेवटी उणे रक्कम गुणिले काहीही उणेच येणार. तेव्हा एखादं राज्य हे आर्थिक दृष्ट्या स्वावलंबी होऊ शकन नाही. हे म्हणणे वस्तुस्थितीला धरून नाही. दुसरी गोष्ट अशी की जगात फार थोडी अशी राज्य आहेत की जी संपूर्णपणे स्वावलंबी आहेत.

१९४७ साली हिंदुस्थान स्वतंत्र झाला तेव्हा हिंदुस्थान स्वावलंबी नव्हता. १९६० साली संयुक्त महाराष्ट्र स्वावलंबी नव्हता; पण स्वावलंबीपणाची व्याख्या ही अंदाजपत्रकातील जमा आणि खर्च यांच्यामधून काढायची नाही. राज्य स्वावलंबी आहे की नाही हे बघण्यासाठी त्या देशातील-प्रदेशातील लोकांची उत्पादकता आणि उत्पादनक्षमता तपासावी लागते. सारांश, अनुषेषाची भाषा ही पुढाऱ्यांची भाषा आहे ती चूक आहे. तसेच ही राज्य घाट्याची होतील म्हणून ती करू नयेत हे म्हणणेसुद्धा चूक.

पश्चिम महाराष्ट्राच्या काही पुढाऱ्यांनी लुच्चेपणाने मराठवाडा विदर्भाच्या हाती विकासाची फळं जाऊ दिली नाहीत हे खरं आहे असं आपण गृहीत धरू या; पण

तरीसुद्धा त्याच्या अर्थ असा की, पश्चिम महाराष्ट्रातले पुढारी जितके भामटे निघाले तितके भामटे आमचे नेते होऊ शकले नाहीत. दोन चोरांच्या वाटणीचा हा प्रश्न आहे. त्याचं काही फारसं तत्त्वज्ञान करण्याची गरज नाही. तुम्ही जसे दुष्काळ पडल्यावर खडी फोडायला जाता तसेच पश्चिम महाराष्ट्रातले शेतकरीही जातात. तेव्हा जो अनुशेष आहे किंवा देण्याघेण्याचा भाग आहे तो पश्चिम पहाराष्ट्र आणि मराठवाड्यातला नाही. तर पश्चिम महाराष्ट्रातला 'इंडिया' आणि मराठवाड्यातला 'भारत' यांच्यातला देण्याघेण्याचा भाग आहे. राज्याराज्यातल्या लोकांना प्रदेशाप्रदेशाशी द्वेष करण्यासाठी जर कुणी अनुशेषांची भाषा वापरायला लागलं तर काय जो अन्याय झाला असेल त्याचे हिशेब मांडू, ते दुरुस्त करून घेऊ. एका प्रदेशातील माणसाने दुसऱ्या प्रदेशातील माणसांचा द्वेष करायचा नाही ही या चर्चेमध्ये कायम शिस्त बांधून घेऊ.

मी जेव्हा १९८० साली विदर्भात गेलो तेव्हा विदर्भामध्ये माझ्या जवळचे सहकारी सुद्धा म्हणत होते की वेगळया विदर्भाचे आंदोलन झालं पाहिजे आणि मी असं म्हणत असे की मी जो सार्वजनिक आयुष्यात आलोय तो अर्थवादी चर्चा करण्याकरता आलोय. कोण कोणत्या जातीत, धर्मात, प्रदेशात जन्मला आणि कोण कोणती भाषा बोलतो या विषयावर लोकांचे तुकडे पाडण्यात मला स्वारस्य नाही. विदर्भाने माझे काही नुकसान होणार आहे का? नाही होणार; पण मी आज जर का विदर्भाचं आंदोलन चालू केलं तर कापसाच्या शोषणावरचे लोकांचे लक्ष दुसरीकडे जाईल, चुकीच्या जागी जाईल. त्यामुळे तसं लक्ष जाऊ नये म्हणून असं आंदोलन आम्ही हाती घेत नाही अशी भूमिका आम्ही त्यावेळी मांडली.

हा मुद्दा आणखी स्पष्ट करतो, असं कुणाला वाटू नये की, मी आज काही वेगळी भाषा बोलतोय म्हणून पूर्वीचे संदर्भ देतोय. १९८४ साली आम्ही पंजाबात गेलो तेव्हा राज्यपाल भवनास घेराव घालायला ८० हजार शीख शेतकरी आणि पंजाबचे मुख्यमंत्री दरबारसिंग यांच्या खुनाचा प्रयत्न झाला. पंजाबमध्ये आम खून पडत होते. बसमध्ये खून पडायचे. खलिस्तानची मागणी जोर धरत होती, चंडीगढला ८० हजार शीख सरदार बसलेले असताना मी अशी मांडणी केली की तुम्हाला खलिस्तान पाहिजे? तुमच्या खलिस्तानमध्ये शेतीमालाला भाव मिळेल याची काही खात्री आहे का? जर तुमच्या खलिस्तानमध्ये शेतीमालाला भाव मिळणार असेल तर अशी मागणी करतो की नांदेडमध्ये गुरुद्वारा आहे. खलिस्तान नांदेडपर्यंत आले पाहिजे. जर का जातीचे, भाषेचे प्रश्न आपण पुढे

नेले नाहीत तर आर्थिक प्रश्नावरती लक्ष केंद्रीत करता येतं याचा पुरावा तिथे मिळाला आणि डॉ. दाभोळकर, अर्थशास्त्रातल्या एका संशोधकाने असे लिहिले की, ज्यावेळी मोठे मोठे पुढारी पंजाबमध्ये एके-४७ घेतल्याशिवाय कुठे जाऊ शकत नव्हते त्यावेळी आम्ही गावागावात पंजाबमध्ये काठीचा तुकडासुद्धा न घेता हिंडत होतो.

जातीयवाद, धर्मवाद न घेता अर्थवादावरच लोकांचं लक्ष रहावं म्हणून आम्ही विदर्भामराठवाड्याचे प्रश्न घेतले नव्हते.

आज समाजवाद कुंठित झाला, समाजवादी नियोजनाने पुढे जाता येत नाही असे म्हटल्यावर नीचातल्या नीच फुटीरवाद्यांनी संपूर्ण देशाला गिळून टाकायला सुरुवात केली आहे. माझा शेजारी माझ्या जातीचा नाही, दुसऱ्या धर्माचा आहे म्हणून त्याचा द्वेष करावा असे सांगणारी मंडळीही मान्यवर हृदयसम्राट होऊन राहिलीत.

यावेळी मला असं वाटते की, काट्यानं काटा काढायचा असेल तर विदर्भवाद आणि मराठवाडावाद हा जातीवाद आणि धर्मवादाच्या तुलनेने जास्त उदारवादी आहे असं सिद्ध करून दाखवायला हवे.

मुंबईहून जातीवाद या रोगाची सुरुवात झाली आणि महाराष्ट्रात या रोगाच्या विरुद्ध बोलण्यास कुणीही धजत नव्हते तेव्हा मी एकटा बोलत होतो. मुंबई महानगरपालिका हातात आल्यानंतर त्याचे पैसे गावागावात गेले, गावागावात वाघाची तोंड दिसायला लागली आणि सगळ्या महाराष्ट्रभर हा रोग पसरला. ज्या भागामध्ये आणि विदर्भ आणि मराठवाडा ही दोन नाव मी मुद्दाम घेतो, की जिथं अशा तऱ्हेचा जातीवाद आणि धर्मवाद अजून फार बोकाळला नाही. या प्रदेशांना जर का मुंबईहून निघालेल्या या कॅन्सरमधून वाचवायचं असेल तर एक तऱ्हेची शस्त्रक्रिया (ऑपरेशन) करणं उपयुक्त आणि आवश्यक ठरेल, असं माझं स्पष्ट मत आहे. हे केवळ माझंच मत नाही. फाजल अली कमिशनने असं म्हटलंय की विदर्भाने महाराष्ट्रात गेला तर विदर्भातही जातीवाद येईल ही भीती फाजल अली कमिशनने व्यक्त केली होती हाही मुद्दा आपण चर्चा करताना लक्षात ठेवावा.

मराठवाड्याला अनुशेष आहे, पश्चिम महाराष्ट्रापेक्षा तो अनुशेष जास्त आहे, विदर्भालाही पश्चिम महाराष्ट्रापेक्षा जास्त अनुशेष आहे, हा अनुशेष सिद्ध करण्याची आकडेवारी म्हणजे सरकारी बजेटातून किती रक्कम येथे आली. साखर कारखाने किती निघाले? सूत गिरण्या किती निघाल्या ही खरी आकडेवारी नाही. मला

दुसरी आकडेवारी सांगायचीय ही आकडेवारी मी गेली तीन वर्षे देशभर सांगतो आहे. मराठवाडा आणि विदर्भ हे प्रामुख्याने कच्च्या मालाचे उत्पादन आहेत. इथे जो माल तयार होतो ते कापूस हा सगळ्यात जास्त उणे किमत मिळणारा पदार्थ आहे. तुमचा जो अनुशेष आहे तो सरकारी बजेटातला नाही तर सबसिडी मिळायची होती ती मिळाली नाही म्हणून तुम्हाला अनुशेष आहे. तिथं मेजवानी चाललीय अन् टेबलाखालचं उष्ट आम्हाला खायला मिळालं नाही अशा प्रकारचा हा भिकार अनुशेष नाही. तर आमच्या कापसाला तुम्ही १०० रुपये भाव दिलात तर बाहेरच्या बाजारपेठेत किमान ३०० रुपये म्हणजे २०० रु. जास्त मिळाले असते. हा खरा आमच्या अनुशेषाचा आकडा आहे आणि अनुशेषाचा असा जर आकडा काढला तर किती आकडा येईल? सगळ्या देशात एका वर्षाचा शेतकऱ्यांचा अनुशेष ४२ हजार कोटी रुपयांचा आहे. मराठवाडा व विदर्भाचा असा आकडा काढला तर हा आकडा तर हा आकडा पाच ते सहा हजार कोटीचा येतो आणि मग महाराष्ट्राच्या स्थापनेपासून ३६ वर्षांचा अनुशेष काढायचा झाला तर ३६ गुणिले ५ म्हणजे १८० हजार कोटींचा हा अनुशेष आहे. हा कोण भरून देणार? हा अनुशेषाचा आकडा आहे आणि हा अनुशेष मराठवाड्यात आला याचं कारण हे पश्चिम महाराष्ट्राचे लोक दुष्ट आहेत नव्हे तर पश्चिम महाराष्ट्रात इंडियाचं प्रावल्य आहे. विदर्भात मराठवाड्यात भारत आहे आणि इंडिया आणि भारताची मैत्री ही अशी सापमुंगसाची आहे आणि त्यामुळे मराठवाडा आणि विदर्भाचा खरा अनुशेष हा शेतीमालाच्या शोषणाचा आहे. हा मुद्दा जर लक्षात घेतला तर मग पुढाऱ्यांच्या डावाला काटशह बसतो. पुढारी तुमचे जर सांगायला लागले की, मराठावाड्याचा शेतकऱ्यांचा अनुशेष हा अंदाजपत्रकातला आहे तर ते तुम्हाला बनवताहेत. नवीन जर का मराठवाडा झाला तर त्यांचा अनुशेष भरून निघेल; पण तुमचा शेतकऱ्यांचा अनुशेष निघेल किंवा नाही हा सर्वात महत्त्वाचा मुद्दा आहे. खलिस्तान निर्माण झाल्याने गव्हाला भाव मिळणार आहे का? तसे मराठवाडा राज्य निर्माण झाले तर तुमच्या कापसाला, ज्वारीला, तुरीला निदान खाली दाबून टाकलं जाणार नाही याची शाश्वती आहे का? या विषयावर चर्चा झाली पाहिजे.

आणि जर का या प्रश्नाकडे आपण लक्ष दिलं नाही आणि उद्या समजा बाळासाहेबांनी एकदा बटण दाबलं की मराठवाडा राज्य होईल, मग काय सुरुवात होईल? पश्चिम महाराष्ट्राचे मनोहर जोशी एका बाजूला अन् मराठवाड्याचे गोपीनाथ मुंडे दुसऱ्या बाजूला. म्हणजे आजचे दोस्त दोस्त आहेत ते हे एकत्र

वसतीला आणि म्हणतील आता मराठवाड्याला आम्हाला काय काय पाहिजे? मराठवाड्याला इतक्या इमारती हव्यात, इतका नोकरवर्ग हवाय, इतकी रक्कम हवी आणि मग नवीन सरकार तयार होईल. हे हाल चालूच राहतील. हे दोघे सरकारध्ये असून उसाचे व कापसाचे हाल थांबलेले नाहीत तिथे मराठवाडा राज्य झाल्यावर एकटे मुंडे हे हाल थांबवू शकणार नाहीत.

मराठवाडा कशा प्रकारे तयार व्हावा? माझं एक स्वप्न आहे ते तुम्हाला सांगतो ते पूर्ण करायचं की नाही हे तुमच्या हातात आहे. मराठवाडा व्हायचं ठरलं न तर नव्या मराठवाड्याच्या नेत्यांत किंवा जुन्या मराठवाड्याच्या नेत्यांत हे वेगळं आगळं राज्य करायची ताकद आहे असं मला फारसं दिसत नाही. म्हणून सर्व माणसांनी हे महाराष्ट्र शासनाला सांगावं की, तुमचा नोकरवर्ग आम्हाला नको. तुमचा तुम्हीच ठेवून घ्या, त्यांचा खर्चही तुम्ही भरा, त्यांचा पगारही तुम्ही भरा, आम्हाला जो मराठवाडा हवा आहे त्याला तुमच्या इमारती नकोत. आम्हाला 'बळीराज्य मराठवाडा' हवा आहे. जिथे लोकांवर निर्बंध राहणार नाहीत. म्हणजे सरकारी कायदेकानूनच आपण कमी करून टाकले तर नोकरदार जे आहेत ते तुमचे तुम्ही सांभाळा.

त्यांचे नोकरदार का नको? जर साखर कारखाना तुमच्या हाती आला. काय होतं? आमचे एक मित्र आहेत नरेंद्र अहिरे म्हणून. त्यांनी एक मोठी निवडणूक लढविली. एक साखर कारखाना हाती घेतला आणि त्यांच्या लक्षात असं आलं की, हा कारखाना व्यवसिर्तिं चालवणं केवळ अशक्य आहे म्हणून त्यांना निडूक जिंकता आली. त्या कारखान्यात जिथे १०० माणसे पाहिजे होती तिथे ३०० माणसे कामाला लावलेली होती. ती २०० माणसे जोपर्यंत घरी पाठवता येत नाहीत तोपर्यंत कारखाना व्यवस्थित चालणं शक्य नव्हतं. तसंच, तुमचे राज्य सुरळीत चालणे शक्य नाही.

तेव्हा लोकांचे भेल करण्यामध्ये कायदेकानून निर्बंध घालणार नाहीत असे जे राज्य त्याला मी बळीराज्य म्हणतो. बसं बहीराज्य जर का तुम्ही तयार करणार असाल तर मग तुमच्या बरोबर मी सांगाल ती किमत मोजायला मी तयार आहे; पण तसं नाही, तिकडं महाराष्ट्र आहे तसाच एक आमचा मराठवाडा तसा एक मुख्यमंत्री आणि तसंच शोषण आमच्या शेतकऱ्यांच करायचं असेल तर मी तुम्हाला शुभच्छा देईन! एक मराठवाडा कशाला? जिल्ह्यातिल्ह्यात मराठवाडे तयार करा. तुमच्या परिस्थितीमध्ये काहीही फरक पडणार नाही हे मात्र विसरू नका. म्हणजे जिथे एके ठिकाणी सरकार संपतं अन् शेकडो हजारो

कारकून शिल्लक उरतात असं करू नका. किमान माणसं घ्या नाही तर मराल! आणि वेगवेगळ्या जिल्ह्यामध्ये एकेक जागा देऊन टाका. कलेक्टरच्या खोलीतल्या दोन-चार खोल्या द्या. एकेका मंत्रालयाला याच्यावर खर्च करायचा नाही याच्या खर्च केला तर तो तुमच्या खिशातून जातो लक्षात ठेवा! पश्चिम महाराष्ट्र काय एकदा देऊन टाकेल; पण पुढे जन्मभर तुम्हाला तो खर्च करावा लागेल. संगणक वापरून, विद्युत उपकरणं वापरून अत्यंत कार्यक्षम व्यवस्था तयार करता येईल.

पंतप्रधानांनी उत्तराखंडाची घोषणा करण्याचे आश्वासन दिले. त्यात कदाचित त्यांचा हेतू वेगळा असेल. काय देशाचं होतंय पत्ता नाही. एप्रिल आणि ऑगस्ट महिन्याचे आकडे रिझर्व्ह बँकेने प्रसिद्ध केले आहेत आणि पहिला हा तिमाहीचा काळ की ज्यामध्ये हिंदुस्थानने परदेशामध्ये कर्जफेडीकरता घ्यायचं व्याज आणि कर्जाचा हप्ता हा या तिकाहीत आत आलेल्या परदेशी चलानाच्या रक्कमेपेक्षा १२०० कोटी रुपयांनी जास्त आहे. म्हणजे आपण नादार व्हायला निघालोच आहोत. देश नादार व्हायला निघालाय. मी जे निवडणुकीच्या वेळी सांगत होतो डिसेंबर १८ पर्यंत ६० रुपयांना डॉलर होणार आहे आणि हे काय करतात बिचारे तिथे बसून त्यांच्या हाती धड बहुमत सुद्धा नाही? संप चालू आहे. ज्यांना घरी पाठवायला हवं त्यांना पगार आणि बोनस देण्याच्या गोष्टी चालू आहेत. देश वाचू शकत नाही. अशा परिस्थितीत पंतप्रधानांनी उत्तराखंडाचं एक पिल्लू सोडून दिलंय आणि मला असं वाटतं यामध्ये २-४ वर्षे निघून जातील असा पंतप्रधानांचा हिशेब असावा. याही परिस्थितीत की सगळीकडे काळोखी दाटलेली वादळ सुटलेले असताना पटकन एक आशेचा किरण मला दिसतो आहे. पंतप्रधानांच्या चुकीच्या नियोजनातून जर स्वतंत्र मराठवाडा म्हून एक आदर्श बळीराज्याचा नमुना जर तयार करता आला तर कदाचित याही संकटातून देश वाचवायचं काम तुमचा स्वतंत्र मराठवाडा करू शकेल असे मला वाटते.

मी आजच एक लेख वाचला त्यात म्हटलंय की, मनोहर जोशी परदेशात गेले आणि त्यांनी अकरा हजार कोटी एवढी गुंतवणूक महाराष्ट्रात आणायचं ठरवलंय असं ऐकलंय. शरद पवारांनी १ लाख २५ हजार ३५ कोटी आणली होती; पण ती सर्व गुंतवणूक मुंबईत जाईल. मराठवाड्यात कोण गुंतवणूक करणार! मी एक अर्थशास्त्राचा विद्यार्थी या नात्याने तुम्हाला सांगतो, जर का तुम्ही निर्बंध म्हणजे अर्थकारणावर काही विनाकरारण बंधनं आहेत ती काढून टाकली, कमीत कमी प्रशासकीय खर्च ठेवला, आणखी माणसाचं जीवन सुरक्षित

राहील, अशी व्यवस्था केली आणि मराठवाड्यातल्या कोर्टात जास्तीत जास्त तीन महिन्यात निकाल लागतो अशी परिस्थिती केली. सर्व जगातले गुंतवणूकदार दिल्ली, मुंबई सोडून मराठवाड्यात उतरतील. मला बाहेरच्या माणसाला स्वतंत्र मराठवाड्याच्या चर्चेची सुरुवात करायला आपण बोलावलं, मी चर्चेत धोक्याची स्थान दाखवायचं काम केलं.

भावनेचा विषय निघाला की मला मोठं कठीण होतं म्हणून मी अर्थशास्त्रातल्या आकडेवाऱ्या मांडत असतो. आम्ही गद्य मांडतो म्हणजे आम्हाला भावना नाहीत असं नाही.

संयुक्त महाराष्ट्राचं आंदोलन झालं तेव्हा मी मुंबईमध्ये होतो, कॉलेजचा विद्यार्थी होतो. फ्लोरा फाऊंटनवर जेव्हा १२ माणसे ठार झाली त्यावेळीही मी तिथं होतो. दिल्लीला मोर्चा नेला तेव्हा 'जागा मराठा आम जमाना बदलेगा' हे शाहीर अमरशेखचं काव्य मी स्वतः ऐकलंय. महाराष्ट्राच्या अभिमानाबाबत मला नाही वाटत मी कुणापेक्षा कमी असेन! पण फरक असा पडला प्रत्येक वेळी आम्ही मृगजळाच्या मागे धावत गेलो अन् निराशा आमच्या पदरी आली. गांधीजींनी सांगिलं गोरा इंग्रज काढून लावा. गोरा इंग्रज गेला त्याच्या जागी काळा इंग्रज आला. निझाम गेला; पण निझाम परवडला हे नकोत असे म्हणण्याची वेळ यावी असे राज्यकर्ते आले. आज मराठवाड्याची भाषा बोलताना मनोहर जोशी असो की, शरद पवार असो, यांच्या जागी तुमचा एक मराठवाडी सुलतान नेमू नका. त्यावेळी तुमच्या स्वातंत्र्याची व्याख्या चोख मांडून घ्या. एवढंच सांगण्यासाठी उभा आहे.

अण्णाभाऊ साठे यांच्या पोवाड्यात म्हटले आहे.

''कोकणच्या दुःखाची तरल स्पंदने नागपूरी जनतेची हलविती मने.''

असं संयुक्त महाराष्ट्राचं स्वप्न होतं. कोकणची सुखवस्तू जनता कोकणच्या दारिद्र्याने दुःखी होईल असं तेव्हा मानलं गेलं. आज नागपूरच्या दुःखाने कोकणच्या मनात काही स्पंदने होऊ नयेत अशी परिस्थिती तयार झाली आहे.

एकावेळी पं. नेहरूंना मी परमेश्वर मानलेलं आहे; पण २२-२५ मध्ये त्यांच्या कारकीर्दीत देशाचं नुकसान झालं हे पाहिल्यानंतर अन् ज्या देशभक्तीपोटी मी पंडित नेहरूंना देव मानलं त्याच देशभक्तीपोटी त्यांचे पुतळे उखडून टाका हे सांगणं कर्तव्य वाटलं म्हणून मी ते बोललो. ''इतिहास कवटाळून बसलो तर भविष्य घडायचे कसे?''

१९६० पासून मी कापसाच्या प्रश्नावर लढतो आहे. एकाधिकार कापूस

खरेदी हा अन्याय आहे. एकाधिकारात फायदा कुणाचा झाला? कापूस खरेदीसाठी सहा महिन्याचा नोकरवर्ग आवश्यक तिथे १२ महिन्याचा नोकरवर्ग भरती केला. प्रशासकीय खर्च प्रचंड, कापसाची रुई करायचा खर्च जास्त, हा कापूस विकताना व्यापारी जेवढा भाव देतो तेवढा भावही एकाधिकारात मिळत नाही. हे सर्व मुंबईतल्या गिरणी मालकाच्या फायद्यासाठी चाललंय. एकाधिकार चालू व्हायच्या आधी मुंबईचा प्रत्येक गिरणीवाला ३ ते ६ महिन्यांचा कापूससाठा ठेवत होता. एकाधिकारात आठवड्याला लिलाव होतोय म्हटल्यावर १ महिना पुरेल एवढा साठा ठेवला जातो. यात व्यापाऱ्यांचा कोट्यवधीचा फायदा झाला आणि ही व्यवस्था विदर्भ मराठवाडा जोपर्यंत मुंबईशी जोडलेले असतील तोपर्यंत राहणार आहे. मुंबईत शरद पवारांचं राज्य असो की, मनोहर जोशींचं आणि दिल्लीला इंदिरा गांधीचं राज्य असो, की देवेगौडांचं राज्य असो जोपर्यंत कापूस खरेदीत सरकारचा एकाधिकार चालू राहणार आहे तोपर्यंत कापसाला स्वातंत्र्य मिळण्याची शक्यता नाही. ते जर मिळवायचे असेल तर तुमचा तुम्ही निर्णय करण्याची शक्यता तयार झाली पाहिजे.

यापुढे तुम्हाला भिंती रंगवायच्या तर जरूर रंगवा. त्यावर स्वतंत्र मराठवाडा न लिहिता 'बळीराज्य मराठवाडा' असं लिहा.

येत्या २१ नोव्हेंबरला अकोल्यात कापूस प्रश्नावर कापूस उत्पादकांचा मेळावा घेण्यात येणार आहे. या वेळेचे कापूस आंदोलनाचे प्रभावी हत्यार म्हणून 'बळीराज्य मराठवाडा' हे हत्यार वापरावे, यापेक्षा उत्तम हत्यार दुसरे होणार नाही.

आपल्या साऱ्या इतिहासात मराठवाड्याचे अभिमानबिंदु शोधून काढले पाहिजेत. आमचे विद्वत्तेच्या क्षेत्रातले कोणते, कलेच्या क्षेत्रातले कोणते, राजकीय क्षेत्रातले कोणते या अभिमानस्थळांची इथल्या लोकांना एकदा जाणीव करून द्या. वर्तमानपत्रातून कार्य व्हावे, पुस्तिका काढाव्या. ही मागणी जर खऱ्या अर्थाने यशस्वी व्हायची असेल तर परभणीला या मागणीसाठी येत्या सुरेगाव हुतात्मा स्मृतीदिनी १० डिसेंबरला भरणाऱ्या बळीराज्य मराठवाडा परिषदेत या भागातल्या ज्या व्यक्तीविषयी आदराची भावना आहे डॉक्टर, वकील, खेळाडू, नट, नट्या ज्यांनी राजकीय आधार न घेता आपापल्या क्षेत्रात स्वत:चे स्थान निर्माण केले आहे ती मंडळी तुमच्या मंचावर आली तर स्वतंत्र मराठवाड्या तुमची मागणी कोणीही नाकारू शकत नाही.

(६ नोव्हेंबर १९९६)

◆◆

# ‘नियतीशी गाठ’ हुकल्याचा महोत्सव?

तीन आठवड्यांपूर्वी १९९६ चे वर्षे मावळून १९९७ उगवले. १९४७ साली येथून इंग्रज गेले, लाल किल्ल्यावर तिरंगा फडकला या घटनांना लवकरच ५० वर्षे पुरी होतील. साहजिकच, स्वातंत्र्याची ५० वर्षे पुरी झाल्यानिमित्ताने आनंदोत्सव साजरा करण्याच्या तयाऱ्यांना आतापासूनच सुरुवात झाली आहे.

केंद्र शासनाने हा महोत्सव धुमधडक्यात साजरा करण्यासाठी वेगवेगळया समित्या नेमल्या आहेत. एक मंत्रीपातळीवर, एक अधिकाऱ्यांच्या पातळीवर आणि एक देशातील मान्यताप्राप्त व्यक्तींच्या पातळीवर. वेगवेगळया राज्यसरकारांनीही त्यांच्या त्यांच्या प्रदेशासाठी अशीच तयारी चालू केली आहे.

स्वातंत्र्य मिळाले त्यावेळी लोकांच्या उत्साहाला उधाण आले होते. १४ ऑगस्ट १९४७ च्या रात्री पंडित जवाहरलाल नेहरू यांनी पंतप्रधान म्हणून शपथ घेतली आणि दिल्लीच्या दरबारगृहात आपले प्रख्यात ‘नियतीशी गाठ’ भाषण केले. दुसऱ्या दिवशी सकाळी लाल किल्ल्यावर पहिल्यांदा, अशोकचक्र चिन्हांकित तिरंगा झेंडा फडकला. सर्व देशभव लोकांनी प्रभातफेऱ्या, मिरवणुका, कवायती, रोषणाई स्वयंस्फूर्तीने केले; वरून धो धो पडणाऱ्या पावसाला न जुमानता बेहोश होऊन देशाचा पहिला स्वातंत्र्यदिन साजरा केला.

पहिल्या पंतप्रधानांनी पंतप्रधान म्हणून केलेल्या त्यांच्या पहिल्या भाषणात ‘राष्ट्रपिता’ म्हणून ज्यांना गौरव केला ते महात्माजी स्वातंत्र्यदिनाच्या कोणत्याच जल्लोशात सामील नव्हते; बंगालमध्ये जातीय दंग्यात उद्ध्वस्त झालेल्यांच्या डोळयांतील अश्रू पुसण्याचे काम ते करीत राहिले.

स्वातंत्र्यदिनाचा सोहळा काही वर्षे लोक साजरा करीत राहिले. १९५० साली गणराज्याची घोषणा झाली. राजपथावर राष्ट्रपतींनी सर्व लष्करी तुकड्यांची सलामी शाही थाटात घेतली. देशभर पुन्हा एकदा सगळीकडे दीपोत्सव झाला.

गणराज्याच्या वर्धापनदिनी फडकविलेला राष्ट्रध्वज उतरविण्याचा कार्यक्रम पाच दिवसांनी मावळत्या सूर्याच्या साक्षीने आणि स्कॉटलंडमधील बॅगपाईप वाद्यांच्या सुरांवर होऊ लागला.

भारतीय तसे उत्सवप्रिय; पंडितजी त्यातल्या त्यात रसिकराज. त्यांची सगळी जीवनशैलीच पाश्चिमात्य. राष्ट्रीय महोत्सव कसे साजरे करायचे याचा सगळा तपशील बारकाव्यांसह ते स्वतः लक्ष घालून ठरवीत. १५ ऑगस्टच्या पहाटे ऐतिहासिक लाल कित्याच्या बुरुजावरील झेंडावंदन; २६ जानेवारीला राजपथावरील परेड, झेंडा उतरविण्याचा कार्यक्रम हे सगळे त्यांच्या प्रतिभेचे आविष्कार. महात्माजींची हत्या झाली ती पहिल्या स्वातंत्र्यदिनानंतर साडेचार महिन्यात. महात्माजींचा अंत्यविधी कसा व्हावा, त्यांचे समाधीस्थान कसे असावे हेही पंडितजींनी स्वतःच ठरविले. त्यानंतर दिल्लीत अंत्यविधी झालेले सारे पंतप्रधान विश्रांती घेत पहुडले आहेत. ते पंडितजींनी ठरविलेल्या ठशाच्या समाधीस्थानांत.

भारताचे हे राष्ट्रीय महोत्सव जगभर प्रसिद्ध आहेत. झेंडा उतरविण्याच्या कार्यक्रमाच्या वेळी स्कॉटलंडमधील संगिताचा जो जलसा होतो तसा खुद्द स्कॉटलंडमध्येही पहावयास किंवा ऐकावयास मिळत नाही अशी कुत्सित कबुली खुद्द स्कॉटलंडमधील लोकही देतात आणि त्याबद्दल आनंद वाटण्याऐवजी खऱ्याखुऱ्या भारतीयांच्या माना शरमेने खाली होतील.

वर्षांमागून वर्षे गेली. स्वातंत्र्यदिन आले आणि गेले. स्वातंत्र्यदिन सरकारी बनला. राज्याच्या पातळीवर राज्यपाल, जिल्ह्याच्या पातळीवर जिल्हाधिकारी, तालुक्याच्या पातळीवर मामलेदार खात्याच्या खाक्याप्रमाणे स्वातंत्र्यदिनाचा समारंभ पार पाडू लागले. प्रमुख अधिकाऱ्याने या दिवशी राष्ट्रीय वेष परिधान करावा, झेंडा फडकवावा आणि आपण प्रतिनेहरूनच आहोत अशा थाटात समोरच्या कनिष्ठ नोकरदारांना भाषण सुनवावे अशी प्रथा पडून गेली. देशाने प्रगती किती केली, अजून बाकी राहिलेल्या समस्या किती मोठ्या आहेत, त्या सोडविण्यासाठी सर्वांनी देशभक्तीने प्रेरित होऊन त्याग-प्रसंगी बलिदान करण्यासही कसे सज्ज राहिले पाहिजे असे भाषण झेंडा फडकविणारे हे लोक करू लागले. वेगवेगळया खात्यांत याच्याच आवृत्या होऊ लागल्या.

स्वातंत्र्यदिनाच्या महोत्सवाचा खरा जाच होतो तो शाळेतील विद्यार्थ्यांना. त्यांचा बिचाऱ्यांचा काहीच अपराध नसताना त्यांना भल्या पहाटे उठून शाळेत जावे लागले; झेंडावंनदचा कार्यक्रम पार पाडावा लागतो, रटाळा कंटाळवाणे भाषण ऐकावे लागते, मैल मैल मिरवणुकीत चालावे लागते, ज्यांचा अर्थ समजत

नाहीत अशा घोषणा द्याव्या लागतात.

पहिल्या स्वातंत्र्यदिनानंतर ५० वर्षे उलटली; स्वातंत्र्यदिन उत्साहाने कोणी साजरा केला आहे असे ऐकिवात नाही. राज्य सरकारी झाले, तसाच स्वातंत्र्यदिनही सरकारी झाला. स्वातंत्र्यदिनी हक्काची सुट्टी मिळते एवढाच काय तो सार्वजनिक आनंदाचा भाग!

स्वातंत्र्यदिन साजरा करण्यातला उल्हास का मावळला? नवेपणाचा उत्साह टिकून राहाणे कठीण असते हे खरे; पण वर्षानुवर्षे साजऱ्या होणाऱ्या दिवाळीचा उत्साह दिवाळीचा उत्साह वाढतच चालला आहे. गणपती, नवरात्र, दांडिया असे नवेजुने उत्सव दरवर्षी वाढत्या जल्लोशात साजरे होत आहेत. मग, स्वातंत्र्यदिनावरच अशी अवकळा का आली?

कारणे अनेक असतील; पण त्यातील एक आणि अत्यंत महत्त्वाचे कारण स्वातंत्र्याने जनसामान्यांची केलेली महत्त्वाचे कारण स्वातंत्र्याने जनसामान्यांची केलेली निराशा हे आहे. स्वातंत्र्य आले; पण देश अधिक बलवान झाला नाही. स्वातंत्र्य आले; पण देशाची इभ्रत, वाढणे सोडाच, पार धुळीस मिळाली. इंग्रज गेले, वसाहतीवादी लूट गेली पण देशाची अर्थकारणातील घसरगुंडी थांबली नाही. महागाई, बेकारी, गरीबी भ्रष्टाचार गुंडगिरी थैमान घालीत आहेत. थोडक्यात, स्वातंत्र्यानंतर गांधीजींचे स्वप्न साकारले नाही. इंग्रजांनी भारताला स्वातंत्र्य देण्याचे ठरविले तेव्हा चर्चिल साहेबांनी एक अभद्र भाकित केले होते. 'हिंदुस्थानचे सारे राजकीय नेतृत्व कचखाऊ, कमअस्सल आहे. हिंदुस्थानातील दरिद्री जनतेला त्यांच्या हाती सोपविणे क्रूरपणाचे होईल.' असे चर्चिलने सांगितले होते. ५० वर्षांच्या स्वातंत्र्यात काय झाले याचा एका वाक्यात सारांश द्यायचा झाला तर 'चर्चिलचे भाकित खरे ठरले' हे वाक्य पुरेसे आहे असे कोणतीही प्रामाणिक माणूस कबूल करील.

गाधीजींनी स्वराज्याचे आंदोलन केले ते अशा स्वराज्यासाठी की जेथे माणूस महत्त्वाचा असेल, सरकारी नाही; जेथे गाव स्वयंपूर्ण असेल आणि सर्व व्यवस्थेच्या मध्यभागी असेल; जेथे महत्त्व शेतीचे आणि ग्रामोद्योगाचे असेल, कारखानदारीचे नाही.

स्वातंत्र्य मिळाले आणि शहरांचे व कारखान्यांचे महत्त्व मानणारी समाजवादी व्यवस्था देशात आली. सर्व सत्ता शासनाच्या हाती एकवटीला. स्वातंत्र्यानंतरची सुरुवातच राष्ट्रपित्याच्या द्रोहाने झाली. समाजवादाचा कैफ आज उतरला आहे; पण समाजवादाची लत अजून सुटलेली नाही. नजिकच्या भविष्यकाळात कोठे

आशेचा किरण दिसत नाही. एका काळचे दिग्गज नेते तुरुंगाकडे खेचून गेले जात आहेत यातच लोकांना काही उत्साह वाटतो आहे. त्यांच्या जागी नवीन येणारेही तुरुंगात जाण्याचाच पात्रतेचे आहे याचा लोकांना, तात्पुरता का होईना, विसर पडत आहे.

स्वातंत्र्यदिनाचा सुवर्णमहोत्सव हा काही निर्भेळ आनंदाचा आणि अभिमानाचा असणार नाही हे उघड आहे. खुद्द चालू पंतप्रधानांनी समारोहाची कल्पना स्पष्ट केली आहे. १५ ऑगस्ट १९९७ ते १५ ऑगस्ट १९९८ हा कार्यक्रम चालेल. समारंभ राष्ट्रीय पातळीवर होतील तसेच आंतरराष्ट्रीय पातळीवर होतील; सरकारी प्रेरणेने होतील तसेच खाजगी प्रेरणेने होतील आणि सगळ्या कार्यक्रमांत उत्सवाचा भाग असेल त्याचप्रमाणे आत्मनिरीक्षणाचाही भाग असेल असे खुद्द पंतप्रधानांनी म्हटले आहे.

पण उत्सवाची टक्केवारी किती आणि गांभीर्याने आत्मनिरीक्षण करण्याची टक्केवारी किती असा प्रश्न कोणी विचारला तर उत्सावाचे फारसे प्रयोजन दिसतच नाही.

पण, आम्ही उत्सवप्रिय लोक आहोत. १५ ऑगस्ट १९४७ पासून वर्षभर उत्सव होणार, समारंभ होणार, भाषणे होणार; वर्षभरतरी सरकारी दूरदर्शनचे तोंड पाहू नये अशी परिस्थिती होणार.

आत्मनिरीक्षण सार्वजनिक समारंभात होऊच शकत नाही. काही भाबडी मंडळी स्वातंत्र्यदिनाच्या सुवर्णमहोत्सवाच्या निर्मित्ताने काही विकासाचे कार्यक्रम पार पाडावेत अशा सूचना करतील. आग्रह धरतील. डोक्यावरून मैला वाहून नेण्याची पद्धत सध्या आपल्याच देशात चालू आहे ती बंद करावी, किमान प्राथमिक शिक्षण सक्तीचे करावे, पूर्ण साक्षरता आणावी, लोकसंख्येच्या नियंत्रणासाठी काही धडक कार्यक्रम घ्यावा अशासारख्या सूचना मोठ्या निरागसपणे केल्या जातील. ५० वर्षांच्या काळात जे घडले नाही ते या वर्षांत पुरे जोऊ शकेल अशी आशा बाळगणे म्हणजे ५० वर्षांच्या पराभवाची कारणमीमांसा माहीत नसल्याचे निदर्शक आहे.

स्वातंत्र्यदिनाचा हा सुवर्णमहोत्सव सुरू होईल. त्या १५ ऑगस्ट १९४७ पर्यंत, कदाचित, दोनचार पंतप्रधान रंगमंचावर येतील आणि निघून जातील! महोत्सवाच्या काळात सत्ता स्थिर राहाण्याची शक्यता फारशी नाही तरीही महोत्सवाची तयारी सुरू झालेली आहे. अशा उत्सवांनी, दररोज भेडसावणाऱ्या समस्या, टोचणारी दु:खे थोडी विसरायला होतात हे खरे, पण तरीही एक प्रश्न

भेडसावत राहातो. हा महोत्सव चालू असतानाच देशात अशी परिस्थिती निर्माण झाली की वीजपुरवठा अधूनमधूनच होतो, रेल्वेगाड्या नवासा-सायासानेच येतात, पेट्रोलच्या दुर्भिक्ष्यामुळे गाड्या बंद पडल्या आहेत, सर्वत्र मंदीची व बेकारीची लाट आहे आणि रुपयाची किमत सकाळपासूनच संध्याकाळपर्यंत घसरत आहे अशी परिस्थिती निर्माण झाली तर? आज लक्षणे दिसतात की, ही संकटांची माला सुरू झाली आहे आणि महोत्सवाच्या काळातच आणिबाणिची परिस्थिती तयार होण्याची शक्यता जवळजवळ निश्चित.

५० वर्षांपूर्वी स्वातंत्र्य मिळाले त्यावेळी राष्ट्रपिता गांधीजी कोणत्याच उत्सवात नव्हते, ते बंगालमधील दुःखितांचे अश्रू पुसत होते. स्वातंत्र्याचा सुवर्णमहोत्सवाच्या वर्षी उत्सव होतील, अश्रू पुसणारा कोणीच असणार नाही.

सुवर्णमहोत्सवाच्या वेगवेगळया कार्यक्रमांत निदान एक दिवसाचा एक कार्यक्रम ठेवला जावा असे मला फार वाटते. संपूर्ण देशातील सर्व नागरिकांनी एक दिवस उपवास करावा आणि ज्याला ज्याला जे काही पवित्र वाटत असेल त्याला साक्षी ठेवून स्वतःलाच प्रश्न विचारावा, ''गांधीजींचे स्वप्न का भंगले आणि नेहरूंची 'नियतीशी गाठ' हुकली कोठे?''

(२१ जानेवारी १९९७)

◆◆

# तेव्हा कोठे जातो तुमचा धर्म?

भ्रष्टाचाराबद्दल सगळीकडे मोठा गहजब चालला आहे. देशापुढील सर्वात मोठी समस्या भ्रष्टाचार आहे. भ्रष्ट मंत्र्यांना पदावरून हटवले आणि तुरुंगात पाठवले म्हणजे निम्मे काम झाले. उरलेल्या सर्वसाधारण जनांची नैतिकतेची पातळी वाढवली म्हणजे सारे कसे स्वच्छ स्वच्छ होईल! आणि लायसेंस-परमीट राज्यसुद्धा बिनभ्रष्टाचाराचे कसे सुरळीत चालू लागेल; देशात सगळीकडे आवादी आवाद होईल! अशी मांडणी जो तो करत आहे. शेषन यांनी कोणता एक नवा पक्ष काढला त्याचा प्रमुख कार्यक्रमच भ्रष्टाचार निर्मूलन. लष्कराच्या कोठावळे खात्यात आण्णासाहेब हजारे नोकरी करत होते. इतके भ्रष्ट खाते दुसरे कोणतेच नसेले; पण त्यासंबंधी अवाक्षरही न काढलेले अण्णासाहेब हजारे भ्रष्टाचार दूर व्हावा यासाठी उपोषणाचा रतीब घालत आहेत.

कोण्या लालूच्या प्रसादाने जन्मलेले यादव नामधारी गायीगुराचा चारा आणि वैरण खाऊन गेले. रक्कम हजारावर कोटी! राजीव गांधीचा बोफोर्समधील ६४ कोटीचा मामला अगदी फिका पडला. हवाला प्रकरण गाजले, कोण्या जैनच्या रोजनिशीमध्ये केलेल्या नोंदीवरून मोठ्यामोठ्यांची नावे पुढे आली. जम्मू काश्मीरमधील आतंकवाद्यांपासून अडवानींपर्यंत ते शरद यादवपासून सीताराम केसरींपर्यंत सर्व मान्यताप्राप्त पुढाऱ्यांच्या 'मास्टर' जैनसाहेबांच्या डायरीत सापडला. वर्षाभराने हायकोर्टाने ठरवले की रोजनिशीचा पुरावा पुरेसा नाही, त्यामुळे सगळे श्वास मोकळे झाले. जैनकडून पैसे घेल्याचे कबूल केलेले शरद यादवही मोकळे झाले. राजीव गांधी हयात असतानाच हेलिकॉप्टर प्रकरणी, पाणबुडीप्रकरणी, बोफोर्स प्रकरणी त्यांनी भरपूर पैसा कमावल्याच्या बातम्या होत्याच. आता त्याचे सज्जड पुरावे पुढे येऊ लागले; पण मयतावर खटला कसा चालवणार? क्वात्रोची या इटालियन गृहस्थाला बोफोर्स कंपनीने वीसपंचवीस

कोटी रुपये दिले. यात कुणाला स्वारस्य असणार हे उघड आहे; पण मयतावर खटला कसा चालवता? म्हणून राजीव गांधीवर काही कारवाई नाही. त्यामुळे त्यांची विधवा पंतप्रधानकीवर हक्क सांगण्याचा प्रयत्न करू लागली. असा हा सगळा भ्रष्टाचाराचा भ्रष्टाचार आहे.

भ्रष्टाचार कोणी पुरावे ठेवून करत नाही. एका अंतुल्याने केली आणि तो पस्तावला. सगळयात निष्णात भ्रष्ट तर असे वस्ताद की अद्याप त्यांचे नावदेखील कोणत्या प्रकरणात येत नाही. भ्रष्टांचे दादा उजळ माथ्याने फिरताहेत आणि किरकोळ चिरीमिरीवाले वर्तमानपत्रात प्रसिद्धी मिळवत आहेत.

काही विशिष्ट प्रकारची भ्रष्टाचाराची प्रकरणेच लोकांना रुचतात आणि म्हणून वर्तमानपत्रात गाजतात. दहा वर्षापूर्वी बोफोर्स प्रकरणातील लाचलुचपतीची रक्कम चौसष्ट कोटी रुपये फार अवाढव्य वाटत होती. आमच्या साहेबांनी सात आठशे कौटी रुपयांची माया जमा केली आहे असे कानावर पडले तर विश्वास बसत नसे. रुपयाची किमत घसरली आणि पुढाऱ्यांची तहानभूक वाढली. पंडित नेहरूंच्या काळी गाजलेल्या मुंदडा प्रकरणात पासष्ट लाखाच्या रकमेसाठी वित्तमंत्र्यांना राजीनामा द्यावा लागला. आता एका खासदाराचे एक विश्वासमत चालू बाजारभावात दोन कोटीला पडते; पण रक्कम मोठी म्हणजे गाजावाजा अधिक हे काही खरे नाही. काही लोकांनी कितीही भ्रष्टाचार केला तरी तो चालून जातो. भ्रष्टाचारी उच्चपदस्थ असला तर अधिक चांगले. मुगुट मिरवणारी शिरे धडापासून वेगळी होऊन पडताना पाहण्यात एक तमासगिरी आनंद असतो.

भ्रष्टाचाराच्या प्रकरणामुळे नुकसान कुणाचे झाले हाही मुद्दा अत्यंत महत्त्वाचा. शेतकऱ्यांचे नुकसान झाले तर त्याकडे कोणी फारसे लक्ष देत नाही; पण शहरातील भद्र लोकांनी आपल्याजवळची शिलकी रक्कम एकदम दुप्पट, चौपट करण्याच्या लोभाने कोणा भामट्याच्या हाती सोपवली आणि त्याने ती गिळंकृत करून पलायन केले तर वर्तमानपत्रात ती पहिल्या पानावर गाजतात.

सरकारी नोकरांना मिळणारे पगारभत्ते, सोयीसवलती हा मुळातच एक भ्रष्टाचार आहे. केवळ लोकांची अडवणूक करून वरकमाई करण्याबद्दल पगार तो कसला द्यायचा? असल्या जागांकरता टेंडरे मागवली तर पैसे सरकारात भरण्याचेसुद्धा प्रस्ताव येतील; पण याबद्दल कोणी बोलणार नाही. कारण हा सारा व्यवहार कायदेशीर आहे; पण सरकारी नोकरांनी सरकारला पगाराच्या हिशेबात हालचलाखी करून चाळीसबेचाळीस हजार कोटीचा धपला केला आहे. १९७१ साली सरकारी नोकरवर्गाचा दरडोई तनखा फक्त ५९२० रुपये

सालीना होता. त्यावर्षी या भामट्यांनी महागाई निर्देशांकानुसार महागाई भत्ता वाढवून मिळण्याची तरतूद करून घेतली. १९९०-९१ साली म्हणजे आर्थिक सुधारणांच्या आरंभी वीस वर्षांच्या काळात सरासरी तनखा झाला ४९१७९ रुपये; म्हणजे तनखा वाढला ७३०.७ टक्यांनी; पण महागाईभत्त्याचा निर्देशांक याच काळात वाढला फक्त ३९५.३ टक्क्यांनी. थोडक्यात, महागाईची भरपाई करण्याच्या मिषाने सरकारी नोकरांनी आपले पगार महागाईच्या दुपटीने वाढवून घेतले.

आर्थिक सुधारणांच्या काळात वित्तीय आणि अंदाजपत्रकी तूट कमी करण्याची भाषा सर्व अधिकारपदस्थ एकसारखी घोकत आहेत. तेव्हा या काळात तरी महागाई भत्त्याच्या नावाने होणारी लूट थांबली असावी. निदान कमी झाली असावी अशी अपेक्षा कोणीही सहज करील. प्रत्यक्षात घडले उलटे, १९९५ साली सरकारी नोकरदांचा सरासरी तनखा सालीना ८४४२९ रु. झाला, म्हणजे २५ वर्षांच्या काळात १३२६ टक्क्यांनी वाढला. याउलट, महागाईचा निर्देशांक फक्त ६३० टक्क्यांनीच वाढला. आर्थिक सुधारणांच्या पूर्वी नोकरांनी महागाई भत्याची भरपाई करून वर ११२ टक्क्याची वाढ घेतली. आर्थिक सुधारणांच्या पाच वर्षांत त्यांनी महागाई भत्त्याची १६८ टक्क्यांनी फुगवून घेतली. महागाई भत्त्याच्या भरपाईचा नियम प्रामाणिकपणे अंमलात आला असता तर सरकारी नोकरांचा तनखा दरसाल दरडोई किमान ४५ हजार रुपयांनी कमी झाला असता. एकूण सरकारी नोकरांची संख्या १ कोटी ८४ लाख आहे. आता करा हिशोब सरकारी नोकरांच्या महागाई भत्यातील गोलामालाने झालेल्या धपल्याचा.

पण याबद्दल कोण बोलणार; कोण चौकशी करणा, कोणत्या कोर्टापुढे जाणार? कारण, या धपल्याचा ज्यांना फायदा मिळाला त्यात पोलीस अधिकारी आहेत, CBI चे सारे आहेत. एवढेच नाही तर त्यात न्यायाधीशही आहेत.

भ्रष्टाचाराविरुद्ध छात्या बडवीत उभे राहणारे कोणी गव्हाच्या आयातीत झालेल्या भ्रष्टाचाराबद्दल एक अवाक्षर काढत नाहीत, ही काय गंमत आहे? देशातील बाजारपेठेत गव्हाचा भाव शासनाने ठरवलेला ४७५ रुपये प्रति क्विंटल, कोणीही व्यापारी ५० ते १०० रु. प्रति क्विंटल एवढ्या खर्चात गहू रेशनिंगच्या तालुका गोदामापर्यंत पोचवून द्यायचे कंत्राट आनंदाने घेईल. भारतीय अन्न महामंडळ यासाठी ३०५ रु. प्रतिक्विंटल असा खर्च करते. पुरवठा खात्यात काम केलेल्या कोणालाही हा भ्रष्टाचार पटकन समजावा!

देशात गव्हाचे आणि अन्नधान्याचे उत्पादन भरपूर आहे; पण बाजारात

५००-५५० रु. क्विंटलचा भाव चालू असताना सरकारी ४७५ च्या भावाने गहू कोण विकेल? मग, सरकारने शेतकऱ्यांना अद्दल घडवायचे ठरवले. परदेशात गहू खरेदी करून देशी बाजारपेठेत सोडला म्हणजे किमती आपोआप पडतील आणि शेतकऱ्यांची बरी खोड जिरेल अशा हिशेबाने सरकारने ऑस्ट्रेलिया, कॅनडा आणि अर्जेंटिना येथून थोडथोडका नाही ३० लाख टन गळू मागवला. सरासरी किमत ६८० रुपये प्रति क्विंटल. देशी गव्हाची सरकारी किमत ४७५ रुपये. परदेशी गव्हाची किमत २०५ रुपये वरचढ आणि वर बोटीतून वाहून आणण्याचा इत्यादी खर्च १२५ रुपये. म्हणजे क्विंटलमागे सरकारी जादा खर्च झाला. ९९० कोटी रुपये.

शेतीमंत्र्यांनी मोठी विचित्र विचित्र समर्थने दिली. पंजाबातील लुधियानाचा गहू चेन्नईला येईपर्यंत खर्च ८०५ रु. प्रतिक्विंटल होतो आणि ऑस्ट्रेलियातून आलेला गहू चेन्नईच्या बंदरात तेवढ्याच खर्चात भेटतो अशी शेतीमंत्र्यांनी जाहिरात देऊन फुशारकी मारली आहे. ऑस्ट्रेलियाच्या शेतकऱ्याला भारतीय किमतीइतकीच रक्कम मिळते आणि भारतीय शेतकऱ्याला 'सबसिड्यांची लयलूट' असताना तक्रारीला काही जागाच नाही. असल्या गोलमालाने सगळे प्रकरण झाकून टाकले. गहू आला; अर्जेंटिनातून आलेला १० लाख टन गहू अत्यंत निकृष्ट प्रतीचा निघाला. 'TRADY GRAIN' नावाच्या खाजगी कंपनीने हिंदुस्थानातील त्यांचे एजंट 'गील आणि कंपनी' यांच्यामार्फत हा व्यवहार केला. मुंबईच्या जवाहरलाल नेहरू बंदरात उतरेपर्यंत गहू खाण्याच्या लायकिचा नाही हे कोणी पाहिलेच नाही. अन्न महामंडळात मोठा गोंधळ उडाला. हा गहू रेशन दुकानातदेखील नाही खपणार, त्यामुळे महामंडळाने जाहीर केले. म्हणजे ८०० कोटी रुपये निव्वळ पाण्यात गेले. खाजगी कंपनीशी करार करताना पुरेशी सावधानी न बाळगल्याने हा गहू परतही पाठवता येणार नाही आणि नुकसान भरपाईही मिळणार नाही. कोणी आहे 'माईचा लाल' या भ्रष्टाचाराविरुद्ध प्राण पणाला लावायला तयार?

अर्जेंटिनाच्या गव्हाची आयात परवडली असा प्रश्न ऑस्ट्रेलियातील गव्हाने तयार केला. शेतीमंत्रालयानेच अन्न महामंडळाला धोक्याची सूचना दिली आहे की ऑस्ट्रेलियातील गहू दूषित आहे, त्यातून मोठा धोका संभवतो. या गव्हाबरोबर मोठ्या प्रमाणावर एका विषारी तणाचे बी मिसळलेले आहे. गव्हाच्या पिकाच्या प्रदेशात हे बी पसरले तर गव्हाच्या रोपांनाच ते मारून टाकेल आणि 'काँग्रेस गवता'ने घातलेला धुमाकूळ फिका पडावा असा कल्लोळ माजेल. ऑस्ट्रेलियातून

१२ लाख टन गहू येऊन पोचला आहे. अजून १० लाख टनाचे करारमदार झालेले आहेत. आता काय करावे? अन्न महामंडळाने एवढाच निर्णय घेतला की, ऑस्ट्रेलियाचा गहू गहू पिकवणाऱ्या प्रदेशात विक्रीसाठी पाठवू नये. दक्षिणेत आणि पूर्वेत गव्हाचे उत्पन्न कमी असल्याने हे विषरी बियाणे तेथे पाठवून देण्यात हरकत नाही. या विषारी तणाचा प्रभाव दहा एक वर्षांनी दिसेल तो कदाचित राष्ट्रीय आपत्तीच्या स्वरूपात.

शेतकऱ्यांना बुडवण्याच्या हव्यासापोटी सरकारने ९९० कोटी रु. खर्च केले. त्यातील तिसरा भाग निकृष्ट गव्हाबरोबर फुकटच गेला आणि उरलेल्या खर्चाने गव्हातून विषारी तणांच्या बियाण्यांचे देशाच्या शेतीवर आक्रमण होणार. हा व्यवहापर काय भ्रष्टाचाराखेरीज झाला? या प्रकरणात अन्न महामंडळ, शेतीमंत्री एवढेच काय माजी पंतप्रधान देवेगौडा यांचाही हात असल्याचे बोलले जाते. नुकसानीची रक्कम १००० कोटीच्या वर, जबाबदार इसमात एक माजी पंतप्रधान; पण, लक्षात कोण घेतो? शेतकऱ्यांचाच मामला आहे ना? भ्रष्टाचाराविरुद्ध कमर कसून तयार झालेल्यांना त्यात काय स्वारस्य वाटायचे?

*(६ जून १९९७)*

◆◆

# पुतळ्यांचे माणसांवर राज्य

मुंबईच्या एका उपनगरातील बहुसंख्य दलित वस्तीत उभारलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याच्या गळ्यात चपलांचा हार घातला गेलेला जुलैच्या अकरा तारखेस पहाटे काही इलित कार्यकर्त्यांच्या नजरेस आला या कृत्यास जाबदार कोण हे शोधण्याचा त्यांनी प्रयत्नही केला नाही; सरळ जवळच्या पोलीस चौकीवर हल्ला केला. येणाऱ्या जाणाऱ्या बाहनांवर तुफान दगडफेक केली, आगी लावल्या. पोलिसांनी केलेल्या गाळीबारात दहाजण ठार झाले. मृतांपैकी काही निव्वळ बघे होते, किंवा केवळ योगायोगाने त्या गर्दीत सापडले होते. मग मुंबई बंद करण्यात आली. महाराष्ट्रातील मोठी शहरे बंद झाली. मग 'महाराष्ट्र बंद' ही झाला. आता हे लोण गुजराथमध्येही पोहोचले आहे. जागोजागी शिवाजी महाराजांच्या पुतळ्यांवर डांब्र, शेण आतणे असे प्रकार घडत आहेत. अनेक ठिकाणी दंगली उसळल्या आहेत.

अशा दंगली ही काही नवी गोष्ट नाही. महाराष्ट्राला त्यांची. सवय आहे आणि देशातही हे भीषण नाटक अनेकवेळा घडलेले आहे. १४ ऑगस्ट १९९५ रोजी मराठवाड्यात बाबासाहेबांच्या पुतळ्याच्या विटंबनेचा एक प्रकार घडला आणि दंगलही भडकली. तेव्हापासून महाराष्ट्रात पुतळ्यांनी घडवलेल्या दंगलीचा हा दहावा प्रकार आहे. रस्त्यात कोणी गाय कापून टाकलेली सापडली, मशिदीजवळ डुक्कर टाकलेले आढळले किंवा एका धर्मियांची मिरवणूक वाजत गाजत दुसऱ्या धर्मियांच्या मोहल्ल्यातून जाऊ लागली की, लोक लाठ्या घेऊन सरसावतात, सुरामारी होते. बंदुकाही वापरल्या जातात; टोळयाटोळयांनी लोक फिरतात, घरांवर हल्ले करतात, माणसे बाहेर ओढून मारली जातात, बायकांवर अत्याचार होतात, असे हजारो वेळा घडते.

या वेळच्या दंगलीत वेगळेपणा दोन प्रकारचा. दंगलीचे निमित्त गायीसारखा

पवित्र किंवा डुकरासारखा निषिद्ध प्राणी हे नाही; कारण यावेळी ती हिंदु-मुसलमानातील नाही. दलित समाजातील एका मोठ्या वर्गाला परमेश्वरासमान असलेल्या बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळयाचा अवमान झाल्यामुळे दंगल सुरू झाली, हा एक फरक, दुसरा फरक म्हणजे, दंगलीचे स्वरूप दोन जमातीतील युद्धाचे नाही; दलित कार्यकर्ते पोलिस आणि शासन यांच्याविरुद्ध उठले आहेत. संताप व्यक्त करण्यासाठी रस्ता बंद, रेल्वे बंद, शहर बंद असले उपद्व्याप करीत आहेत.

पुतळयांची विटंबना कोणी केली? महाराष्ट्राचे गृहमंत्री गोपीनाथ मुंडे म्हणतात, "आमच्या हाती निश्चित पुरावा आला आहे; लवकरच अपराध्यांना अटक होईल." हारातील चपलांवर असलेली धूळ आणि घाम यांची प्रयोगशाळांत तपासणी होत आहे व त्या आधारे गुन्हेगारांचा ठावठिकाणा लावण्याचे प्रयत्न होत असल्याचीही बातमी आहे. दलित असला पाहिजे; बाहेरून कोणी येईल आणि उंच पुतळयाच्या बाजूला चढून पुतळयाच्या गळयात चपलांचा हार घालण्याचा प्रयत्न करेल आणि ते कोणाच्याच लक्षात येणार नाही असा संभाव फार कमी आहे.

हे कृत्य कोणी केले याला तसे फारसे महत्त्व नाही. राजा ढाले म्हणतात तसे हे कृत्य दलिताचे असण्याची शक्यता नाकारता येत नाही. तो दलित समजबूज राखणारा असेल, कोणी अर्धवट पागलही असू शकेल, कोणी हे कृत्य दारूच्या कैफातही केले असेल. कदाचित तो दलित नसेल, सवर्ण नसेल, हिंदूही नसेल.

आपण आंबेडकरांच्या पुतळयाची विटंबना करताना पकडले गेलो तर आपले हाल कुत्रा खाणार नाही. एवढीही समज ज्याला नाही असा पागल पुतळयावर चढेल आणि त्याला चपलांचा हार घालेल ही शक्यता जवळपास शून्य आहे. एखाद्या अर्धवट वेड्याला हाताशी धरून काही शहाण्यासुरत्या, धोरणी, मतलबी, जाणकार माणसांनी हे घडवून आणले असणे शक्य आहे. मराठवाड्यात झालेल्या दंगलीत शिवाजीच्या पुतळयाला विटंबणारा, एका ठिकाणीतरी ठार राजकारणी पुढारी असण्याची शक्यता जबरदस्त मोठी आहे.

हिंदु मुसलमानांच्या दंग्याबाबत झालेल्या चौकशीत असा निष्कर्ष अनेक वेळा निघाला आहे. हिंदु आणि मुसलमानांत संघर्ष निर्माण करण्यात दोन्ही जमातीतील जातीवादी पुढाऱ्यांना स्वारस्य असते. बाबरी मशीदीच्या कांडानंतर मुंबईल दंगे उसळले, बॉंबस्फोट झाले, वातावरण असुरक्षिततेचे झाले. दंगलीच्या काळात आपले आईबाप केवळ कोण्या एका धर्माचे होते म्हणून आपल्या पोटात सुरा भोसकला जाऊ शकतो किंवा रॉकेल टाकून आपल्याला जाळले

जाऊ शकते ही जाणीव झाली की, माणुसकी संपते. मी हिंदु, हा मुसलमान; हे आपले, ते त्यांचे अशी भाषा चालू होते. मुडदे हिंदुचे किती, मुसलमानांचे किती अशी शिरगणती चालू होते. लहान बालकांवर अत्याचार झाले किंवा स्त्रियांवर बलात्कार झाले म्हणजे शहाणेसुरते लोकसुद्धा हळहळण्याऐवजी ही मुले आणि महिला आपल्या होत्या का त्यांच्या होत्या असा प्रश्न विचारतात. इच्छा असो नसो, अपरिहार्यपणे सारे मुसलमान मुल्लांच्या भोवती जमतात आणि सारे हिंदु शिवाजीच्या आणि भवानीच्या जयजयकाराचे नारे देऊ लागतात. महाराष्ट्रात युतीचे शासन आले याचे सर्वात प्रमुख कारण बाबरी कांडानंतर उसळलेल्या दंगली आणि त्यामुळे पोसलेल्या जमाती अस्मिता, हे आहे.

जमातीजमातीतील धर्मलंडांना आणि जातीचे राजकारण करणाऱ्या पुढाऱ्यांना जातीय दंगली झाल्या म्हणजे मोठा आनंद वाटतो. आपल्या जमातीतील किती का मरेनात, किती का बेघर होईनात, किती का मायबहिणींची अब्रू लुटली जाईना, आता काही काही तरी दंगलीतील घटनांनी डोक्यात रक्त चढलेले जमातीतील लोक आपल्याला बिलगणार याचा त्यांना हर्षोल्हास वाटत असतो. असे काही भयानक घडली म्हणजे धर्मवीरांना मोठा आनंद होतो. त्यासाठी, वेळीवेळी दंगली घडवून आणणे त्यांच्या दृष्टीने आवश्यक बनते. मुलसमान मुल्ला आणि हिंदुवीर यांच्यात हा समान हितसंबंध आहे. त्यामुळे, मधूनमधून गाय कापले जाते, डुकरे फेकली जातात. जमशेदपूरच्या दंगलीत तर असे दिसून आले की दोन जमातीच्या नेत्यांनी एकत्र बसून दंगलीची आग कशी भडकवायची याची तपशीलवार योजना बनवली होती!

दलित चळवळीची सध्याची परिस्थिती मोठी दयनीय आहे. बाबासाहेब निघून गेल्यानंतर ज्यांच्या हाती या चळवळीचे नेतृत्व आले त्यांच्या पोटात दलितांविषयी करुणा नाही, आपल्या बांधवाच्या परिस्थितीचा अभ्यास नाही, त्यांना माणसासारखे जगता यावे यासाठी काही योजना नाही. बाबासाहेबांचे नाव घ्यावे, वर्षातून एकदा नागपूरला आणि एकदा मुंबईला अथांग भक्तीपोटी जमणाऱ्या दलित बांधवांसमोर मिरवावे, बाकी सर्व वेळ दलितांवर होणाऱ्या अन्यायाच्या भांडवलाने आपल्या पदरी काही पाडून घेता येते काय हे बघावे असा या दलित नेतृत्वाचा खाक्या. अभ्यास नाही, कष्ट करण्याची तयारी नाही, चारित्र्य नाही, सवर्णांना शिव्या घालाव्यात, बेबंद वागावे आणि टक्केवारीच्या हिशेबाने आधिकाराची आणि लाभाची पदे भोगावीत असे दलित चळवळीचे विचित्र रूप झाले आहे.

महाराष्ट्रात तर जितके नेते तितके रिपब्लिकन पक्ष! अखिल भारतीय पातळीवर जबगजीवनरामांचा वारसा सांगणारे पास्वान आणि मिळेल त्या पक्षाशी चुंबाचुंबी करणारे काशीराम यांचे नेतृत्व. या परिस्थितीचा आता दलितांनाही मोठा संताप येऊ लागला आहे. अशाही परिस्थितीत दलित आणि दलितेतर याच्यात संघर्ष माजला तर दलित समाज, गत्यंतर नसल्याने आपल्यामागे येईल अशा हिशेबाने राजकारणी आराखेडे बांधून हेतुपुरस्सर बाबासाहेबांच्या पुतळ्याची विटंबना घडवून आणून प्रक्षोभ तयार केला गेला असण्याची शक्यता मोठी आहे. पुतळ्याच्या विटंबनेचा प्रकार घडला त्याच्या आधी तीनच दिवस एका दलित कार्यकर्त्याने दलित नेत्यांना एकत्र येण्याचा निर्वाणीचा इशारा दिला होता. अन्यथा गंभीर परिणाम भोगण्याची तयारी ठेवावी अशी धमकीही दिली होती. आणखीही एक शक्यता आहे. काँग्रेसच्या झेंड्याखाली खानदानी क्षत्रिय व दलित एकत्र होताहेत आणि युतीच्या झेंड्याखाली सवर्ण व इतर मागासवर्गीय (OBC) यांचा एकोपा घडत आहे. या मोर्चेबांधणीतून पुतळ्याच्या विटंबनेचा प्रकार उद्‌भवला असण्याचीही शक्यता आहे. पुतळ्याच्या अवमानाने क्षुब्ध झालेले दलित पोलिस चौकीककडे वळले, शासनाविरुद्ध उठले आणि युतीचे शासन बरखास्त झाले पाहिजे अशा मागण्या करू लागले आणि त्यानंतर काँग्रेस नेत्यांच्या राहत्या घरांवर शिवसेनेच्या मान्यवर नेत्यांच्या नेतृत्वाखाली हल्ले झाले या घटना मोठ्या बोलक्या आहेत.

दलित समाज युती शासनाच्या विरुद्ध खवळून उठला तर हिंदुत्वाच्या 'तुम्ही आम्ही सकल हिंदु, बंधु बंधु' या आकृतिबंधालाच तडा जातो. रामाचा अश्वमेधाचा घोडा जातो. रामाचा अश्वमेधाचा घोडा अडवण्याचे सामर्थ्य शंबुकाच्या हौतात्म्यात आहे हे सूत्र ओळखून जाणीवपूर्वक ही दंगल घडवून आणली गेली असू शकते. महाराष्ट्रातील मान्यवर दलित नेत्यांना या सगळया काळात दलित समाजाने धुत्कारले आणि एकदोन पुढाऱ्यांना तर लोकांच्या हातापायांचा दणका खावा लागला. याचा अर्थ, दलित समाजाच्या भावनांना हात घालून त्यांना युती शासनाच्या विरुद्ध उभे करायचे खरे; पण नेतृत्व रिपब्लिकन पठडीतील मुखंडांकडे जाऊ नये याचीही काळजी घेतली जात असावी.

बाबासाहेबांच्या निर्वाणानंतर सारा दलित समाज पोरका झाला आहे. दलित समाजातील एका समाजापुरती बाबासाहेबांचे नेतृत्व राहिले. त्या समाजातही पोटजातीच्या आधाराने चळवहीचे तुकडे तुकडे झाले. इतर दलित जाती आंदोलनात स्वत:चे हक्काचे स्थान मिळविण्याकरिता धडपडू लागल्या. आंबेडकरी चळळीच्या

वारसदारांनी चळवळ त्यांना बराच काळ तगवून गेली. मराठवाडा विद्यापीठाचे नाव बदलल्यावर पुण्याच्या विद्यापीठाला असेच कोणा बहुजन समाजातील राजर्षीचे नाव देण्याची टूम निघाली. त्याबरोबरच, गावागावातील दलित वस्तीत आणि शहरातील हरेक दलित मोहल्ल्यात बाबासाहेबांचे पुतळे उभे करण्याचा कार्यक्रम दलित नेत्यांनी जाणीवपूर्वक आणि योजनापूर्वक राबवला.

मोठ्या शहरात बाबासाहेबांचे सुबक, भारदस्त पुतळे उभे राहू शकले; गावागावात इतके खर्चीले पुतळे थोडेच उभे राहू शकणार? कोणा स्थानिक कारागीराने सिमेंटच्या मुशीत ओतून तयार केलेले निळया रंगातले पुतळे जागोजाग उभे राहिले. दगडावर शेंदूर ओतून स्थापलेल्या मारुतीचे भीमकाय महारुद्र हनुमंताशी काय साम्य? तितकेच साम्य या निळया मूर्तीत आणि युगपुरुष बाबासाहेबात रामदासांनी गावोगाव दगडांचे मारुती स्थापले कारण, त्यापरत्या सुबक मूर्ति मसुलमानी अंमलात एकसंध टिकून राहण्याची शक्यताच नव्हती. गावोगाव स्थापन झालेल्या पुतळयांनी एक असेच मोठे काम केले.

मुसलमान या देशात आल्यापासून दलितांनी वेळोवेळी वेगवेगळया कारणांनी जागोजागी इस्लामचा स्वीकार केला. त्यामुळे दलितांची दु:खे संपली असे झाले नाही. उलट, मुसलमान समाजाच्या पोटात पूर्वदलित मुसलमानांची एक अवमानित जमातच तयार झाली; पण इतर समाजाशी टक्कर घेण्याचा प्रसंग आला की धर्मांतर स्वीकारलेले मुसलमान अगदी तुर्कस्थानातून आलेल्या शुद्ध बीजाच्या मुसलमानाइतकेच ताठ्याने वागू शकतात. पाटलाच्या वाड्याच्या दारासमोरील पायरीखाली उघड्या पायांनीसुद्धा येऊ न शकणारा कालचा दलित मुसलमान झाल्यावर बूट खडाखडा वाजवीत तिथे थाटाने प्रवेश करू लागला. इस्लाम स्वीकारल्याने दलिंदर संपले नाही; पण निदान ताठ मान ठेवण्याची शक्यता मिळाली.

बौद्ध धर्म स्वीकारल्याने दलितांच दैन्यही संपले नाही आणि अस्मिताही मिळाली नाही. ब्राह्मणी पूजाअर्चाऐवजी पीतवस्त्रधारी भीक्खूंनी केलेल्या पूजाअर्चाचे स्तोम माजले. गावोगावी उभ्या झालेल्या बाबासाहेबांच्या पुतळयांनी दलित समाजाला एक मोठी विचित्र अस्मिता बहाल केली आहे. पुतळा उभा करायचा म्हणजे जागा ठरावी लागते. गावातील सार्वजनिक सभासमारंभांच्या स्थळी पुतळा उभारला गेला तर काही अर्थ आहे या भावनेने अनेक गावात पुतळयांवरून आणि पुतळयांच्या जागांवरून तेढ माजते आहे. गावठाणातील लोकांना कोणाचा पुतळा उभारण्याची फारशी इच्छा नाही आणि ऐपतही नाही. उलट, अनेक

गावांत बाबासाहेबांचेच नव्हे तर त्याबरोबर जोतिबा फुले आणि गौतम बुद्ध यांचे निळे, तांबडे-निळे आणि पिवळे पुतळे उभे आहेत. शहरातील अशा मूर्तींनी तर झोपडपट्टीच्या वस्तीतही जमिनीचे वाद उभे केलेले आहेत. रामाच्या मंदिराच्या निमित्ताने सारा देश उभा चिरण्याचे काम हिंदुत्वावाद्यांनी केले, त्याच प्रकाराने सत्ता हस्तगत करण्याचा काही हिशेब आणि मोर्चेबांधणी दलित नेत्यांनी केलेली दिसते.

राम काय, बाबासाहेब आंबेडकर काय, त्यांचे चारित्र्य काय, ऐतिहासिक कार्य काय याच्याशी त्यांच्या अनुयायांचे काही देणेघेणे नाही. या उदारचरितांचा व्यापार राजकारणाची दुकाने थाटून बसलेल्या मंडळीनी मांडला आहे. महापुरुषांच्या नावाने आणि प्रतिकांच्या आधाराने आपापल्या समाजाला बांधून घेण्याच्या हव्यासापोटी देश फुटतो आहे याचे त्यांना सोयरसुतक नाही. या प्रकारच्या राजकारणातून देशाची एक फाळणी झाली. देशाच्या दुसऱ्या फाळणीची सुरुवात मुंबईच्या पंतनगरमधील रमाबाई वस्तीतील बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळयाच्या विटंबनेने आपल्या डोळयादेखत झाली असेल!

आपल्या देशात जातीवादी व्यवस्था हजारो वर्षे चालली. कमी समजल्या जाणाऱ्या जमातींना जनावरांपेक्षा अधिक वाईट वागणूक मिळाली. साधे माणूस म्हणूनसुद्धा त्यांच्याकडे बघितले गेले नाही. पोटाला खायला नाही, नेसायला वस्त्र नाही, आसऱ्याला छप्पर नाही, भोवताली नुसता गलिच्छ नकर, विद्या नाही, भोवताली नुसता गलिच्छ नरक, विद्या नाही, माणूस म्हणून वर येण्याची काही आशा स्थितीत बहुसंख्य जमातींना जगावे लागले. या अमानुष व्यवस्थेचे समर्थन एखादा शंकराचार्य सोडल्यास आज कोणीही करू पाहत नाही; हा अन्याय संपवण्याचा मार्ग कोणता एवढाच काय तो प्रश्न आहे.

घटनेने जाती संपवल्या, सर्वांना समान हक्क दिले. अगदी अॅट्रासिटी अॅक्टसुद्धा झाला; पण कागदाच्या कपट्यांनी जातीवाद संपला नाही आणि दलितांच्या दु:खाचे कड शांत झाले नाहीत.

जातीच्या आधारे जातीजातीत संघर्ष तयार करून दलितातील म्होरक्यांना अधिकारपदे देऊन हा प्रश्न सुटणार आहे. असा मंडलवाद मांडणाऱ्यांची आज चलती आहे. ब्राह्मणी नीतिमत्ता, तत्त्वज्ञान आणि पांडित्य नाकारण्याऐवजी नैतिकता, अभ्यास आणि परिश्रम यांचीच हेटाळणी करणारे दलितांचे म्होरके बनले आहेत. बाबासाहेबांचा अभ्यास, तपस्या, व्यासंग, सुसंस्कृतता, नीतिमत्ता यांचा लवलेशही ज्यांच्यापाशी नाही अशी मंडळी बाबासाहेबांचे नाव घेत देश फोडायला निघाली

आहेत.

जातीयतेचा रोग जातीजातीमधील भिंती अधिक उंच करून हटणारा नाही. सर्वच समाजाला पुरुषार्थाचे मूल्य जडले तर त्या प्रयत्नात जातीजातींचा कचरा कुठेच्या कुठे वाहून जाईल; पण असा पुरुषार्थ सांगणारे पुढे कोणी येईल तरच काही आशेला जागा दिसते.

यापुढे दलित चळवळीचे नेतृत्व करणाऱ्यांनी स्वतःच्या मनाला एक परखड प्रश्न विचारून बघावा, ''मला स्वतंत्र सार्वभौम दलितस्थान हवे आहे काय?'' आणि आपल्या अंतःकरणातील बाबासाहेबांच्या मूर्तीला स्मरून जे उत्तर मिळेल त्या निष्ठेने मोर्चेबांधणी करावी.

*(२१ जुलै १९९७)*

◆◆

# ना ! नानी ना !

पाच वर्षांपूर्वी समाजवादाच्या दुष्परिणामांच्या भयानकतेकडे आता दुर्लक्ष करणे शक्य नाही याची कल्पना येताच देश खडबडून जागा झाला. देशामध्ये 'नरो वा कुंजरो वा'च्या सुरात आर्थिक सुधार, खुलीकरण आणि जागतिकीकरण यांविषयी बोलले जाऊ लागले. परवान्यांचे धोरण थोडे सैल सोडण्यात आले; पण लगेच, परकीय चलनाच्या साठ्यात जरा सुधारणा दिसताच सुधार कार्यक्रमांचा आवेग ओसरला. लायसन्स-परमिट व्यवस्थेत गब्बर झालेले काही काळ थबकले होते, त्यांनी अर्थव्यवस्थेवरील आपली पकड पुन्हा घट्ट करण्यासाठी खुल्या व्यवस्थेवर नव्याने हल्ले चढवायला सुरुवात केली. डावी मंडळी सुधार कार्यक्रम हाणून पाडण्यासाठी आणि नोकरदारांचे चोचले पुरवणे अखंड राहावे यासाठी, मागच्या निवडणुकीनंतर तयार झालेल्या राजकीय अस्थिरतेचा मोठ्या खुबीने वापर करीत आहेत. समाजवादी व्यवस्था आता जुन्यापुराण्या काळात जमा झाल्या आहेत. हास्यास्पद असले तरी नियोजन मंडळाचे योजनांच्या दस्तावेजांचे रवंथ करणे अजून सुरूच आहे. आणि, सुधार कार्यक्रमांना धाब्यावर बसवून, प्रशासकीय खर्च कधी नव्हे इतक्या गतीने फुगत चालला आहे. आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतील स्पर्धेत लाभ मिळविण्याची क्षमता असलेल्या क्षेत्रांपैकी कृषिक्षेत्राला तर सुधार कार्यक्रमांची झुळुकही लागलेली नाही. उलटपक्षी, सुधार कार्यक्रमांच्या विरोधकांनी सुधारपूर्व व सुधारोत्तर काळातील काही तुलनात्मक आकडेवारी समोर ठेवून सुधार कार्यक्रमांमुळे अर्थव्यवस्थेचा गाडा उलट, हळू चालू लागला आहे असे सिद्ध करण्याचा खटाटोप सुरू केला आहे. १९९१ नंतर जे काही अर्थशास्त्रज्ञ आर्थिक खुलीकरणाच्या बाजूने बोलू लागले होते तेही पावलांची चाळवाचाळव करून 'तळ्यात, मळ्यात' खेळू लागले आहेत; न जाणो, आर्थिक धोरणात 'घूम जाव' झाले तर चुकीच्या बाजूला पकडले जाऊ नये अशा धूर्तपणे!

वैफल्यग्रस्त मानसिकतेतून एखाद्या दांडग्या हुकूमशहाचा उदय होऊ शकतो; पण, एखादा अवतार होऊन त्याने या देशाची सूत्रे हाती घ्यावी अशी इच्छा व्यक्त करून सर्वसामान्य माणूस आपल्या अगतिकतेला वाट मोकळी करून देतो. केसरींनी सोनियाजींचा धावा केलाच आहे, आणखी काहीजण कडेपाटात (विंगामध्ये) रांगा लावून उभे आहेत.

लालुछाप राजकीय गुंडागर्दी, टोळीनायकांचे राजकारणात खुलेआम पदार्पण आणि खिळखिळी झालेली कायदा व सुव्यवस्था यंत्रणा अशी परिस्थिती चालूच राहिली तर स्वतःला हिटलर म्हणवणाऱ्या विदूषकांना ती पर्वणीच ठरणार आहे.

ज्याने आपल्या देशाचे आणि देशातील लोकांचे काही कायमचे भले केले आहे असा हुकुमशहा जगाच्या इतिहासात शोधूनही सापडत नाही. बहुतेक सर्व हुकुमशहा राष्ट्रीयता, सार्वजनिक जीवनातील स्वच्छतेची गरज, शिस्तीचे महत्त्व इत्यादि संकल्पना लोकांच्या माथी मारण्यात यशस्वी झाले आणि चिल्लर गुन्हेगारांना निष्ठूरपणे अमानूष शिक्षा करून त्यांनी लोकांच्या मनात भयगंड तयार केला. आपली सद्दी संपताच या हुकुमशहांनी आपल्यासह आपल्या लोकांना आणि देशाला दुर्दशेच्या गर्तेत ढकलून दिले. हिंदू मानसिकता 'यदा यदा हि धर्मस्य ग्लानिर्भवति भारत अभ्युत्थानं अधर्मस्य तदात्मानं सृजाम्यहं ।' मधील परमेश्वरी अवताराच्या संकल्पनेच्या आधारानेच घडलेली आहे. आज, आगामी अवताराच्या भरोशावर आणि प्रतीक्षेत जणू सारा देश निष्क्रीय बनून निपचित पडला आहे.

हे सर्व समजण्यासारखे आहे. सुधार कार्यक्रमातील आपली धरसोड पाहता देशापुढे लवकरच भयानक आर्थिक संकट उभे राहणार आहे हे उघड आहे. तरीसुद्धा, गंभीरपणे आत्मपरीक्षण करून, संकटाचा मुकाबला करण्यासाठी आपल्या कार्यपद्धतीमध्ये योग्य ते बदल करण्याऐवजी हा देश आपले स्वातंत्र्य व सत्ता एखाद्या टिनपाट हुकुमशहाच्या चरणी अर्पण करण्याची शक्यताच अधिक दिसते.

स्वातंत्र्य आणि लोकशाही यांचे पुरस्कर्ते म्हणून प्रसिद्ध असलेल्या नानी पालखीवालांसारख्यांनी या सर्व सुधारकार्यक्रमविरोधी कावकावमध्ये सामील व्हावे ही गोष्ट मोठी प्रक्षुब्ध करणारी आहे. असोसिएटेड सिमेंट कंपनी लि. त्राब्ब्क्षृ च्या ६१ व्या सर्वसाधारण सभेसाठी अध्यक्षपदावरून त्यांनी केलेल्या निवेदनाला विस्तृत प्रसिद्धी मिळाली आहे. आपल्या या निवेदनात श्री. पालखीवालांनी, पन्नास वर्षात देशाला आजच्या दुःखद अवस्थेत आणण्यास कारणीभूत असलेल्या सहा चुकांची यादी दिली आहे. या यादीत समाजवाद, नियोजन, वर्धमान नोकरशाही, स्वयंपूर्णतेचा वेडगळ धोशा, किंवा शेतीची

जाणीवपूर्वक केलेली गळचेपी यापैकी एकही नाही. नानींच्या मते प्रौढ मतदानाचा सरसकट हक्क, लोकसंख्यावाढीला आळा घालण्यात आलेले अपयश, शिक्षणप्रसारातील अपयश, सांस्कृतिक परंपरांशी लोकांची फारकत, लोकांमध्ये एकता व शिस्त यांची जाणीव निर्माण करण्यातील अपयश हेच महत्त्वाचे दोष आहेत. थोडक्यात, त्यांच्या मते दोषी सर्वसामान्य जनता आहे, नेतृत्व नाही. जर का मतदानाचा हक्क शिक्षित आणि धनवान अल्पसंख्यांपुरते मर्यादित केले असते तर मतदार अधिक जबाबदारीने वागले असते, असा त्यांचा दावा दिसतो. मतदानाचा हक्क असा मर्यादित केल्याने काही गुणात्मक सुधारणा घडेल असे मानायला काही आधार दिसत नाही. वस्तुस्थिती अगदी उलटी आहे. शिक्षित आणि धनवान लोकच आपला मतदानाचा हक्क बजावण्याबाबतीत उदासीन असतात. मात्र, अशिक्षित आणि गरीब जनतेनेच आपला मतदानाचा हक्क बजावताना अचंबा वाटावा अशा तऱ्हेने अनुभवसिद्ध सूज्ञपणाची प्रचिती दिली आहे.

संपूर्ण राज्यव्यवस्था, सर्वसामान्यांचा विश्वास, आत्मविश्वास व श्रद्धा यांचा बळी देऊन कारखानदारी आणि शहरी उच्चभ्रू यांना धार्जिणी बनविण्यात आली ही स्वातंत्र्योत्तर ५० वर्षातील घोडचूक आहे. याचा अर्थ सरळ आहे. मतदानाचा हक्क जर मर्यादित करायचाच असेल तर अशिक्षित व गरीब मतदारांचे हक्क काढून घेण्यापेक्षा शहरी शिक्षित आणि धनिक मतदारांमध्येच काटछाट करणे आवश्यक आहे. देशात जर का 'कमी आणि नामी' लोक असते तर आपला देश जरा बऱ्या स्थितीत असता असा अळणी युक्तिवाद बुद्धिमंत करतात; पण, लोकसंख्यावाढीचा वेग नियंत्रणात ठेवला आहे आणि परिणामी गरीबी हटविण्यात यशस्वी झाला आहे असा एकही देश जगाच्या पाठीवर नाही. लोकसंख्येचा स्फोट हा गरीबीचा परिणाम आहे, कारण नव्हे; हे तर आता सर्वदूर सर्वमान्य झाले आहे.

मनुष्यबळाच्या सर्व अंगांच्या विकासासाठी सर्वव्यापी शिक्षणाची गरज आहे यावर कोणाचे दुमत होण्याचे काहीच कारण नाही; पण, एखाद्या 'मूल्याधारित' शिक्षणाच्या कार्यक्रमाने लोकांमध्ये उदात्त तत्त्वे आणि उच्च नीतिमूल्ये अंगी बाणतील असे कुणी म्हणत असेल तर त्याबद्दल जबरदस्त शंका निर्माण होणारच! स्वातंत्र्यानंतर आपल्या देशातील निरक्षरांची संख्या कित्येक पटींनी वाढली आहे ही लज्जास्पद बाब आहे; आमच्या देशातील द्विपदवीधर धड वाचू शकत नाही, लिहू शकत नाही का आकडेमोड करू शकत नाही ही तर त्याहूनही शरमेची आणि दु:खाची बाब आहे. श्री. पालखीवाला आपल्या परिपक्व वार्धक्यात आता

अधिक धार्मिक आणि परंपरानिष्ठ बनू लागले असे दिसते. का हा जातीयवादी पक्षांच्या वाढत्या प्रभावाचा परिणाम आहे?

आमच्या देशाच्या भूतकाळातील समृद्धीच्या गुणगानात जर आम्हाला कमी अडकवले असते तर आज आम्ही जरा बऱ्या अवस्थेत असतो असा युक्तिवादही तितक्याच तिडीकीने करता येईल. खरं म्हणजे, ज्यांच्याजवळ जगासमोर ठेवण्यासारखं काहीच नाही त्यांनाच भूतकाळ उकरून काढून भूतकाळातील खाणाखुणांना समृद्धी चिटकवून बडेजाव मिरविण्याची गरज भासते. राष्ट्रीयतेची भावना लोप पावत आहे, परदेशांचे आकर्षण देशाभिमानावर मात करीत आहे हे खरे आहे. आपल्या देशाबद्दल अभिमान बाळगणे ही तोंडची वाफ दवडण्याइतकी सोपी गोष्ट नाही. आज देशातील बहुसंख्य लोकांना हा देश आपलाच आहे का असा प्रश्न पडतो. हे तेच लोक आहेत ज्यांच्या मतदानाचा हक्क काढून घेण्यात यावा असे नानी पालखीवालांना हवे आहे. आणि याच लोकांनी स्वतःला धन्य धन्य समजून नानींच्या देशाला अधिक समृद्ध बनविण्यासाठी डोळे झाकून आपली आहुती द्यावी अशीही त्यांची अपेक्षा आहे.

स्वातंत्र्याबरोबर जबाबदाऱ्याही येतात हे मान्य आहे. इंदिरा गांधींनी नानी पालखीवालांशी सहमत होऊन त्यांच्या म्हणण्याप्रमाणे घटनेत दुरुस्ती केली, पण त्यामुळे काही सुधारणा झाल्याचे दिसत नाही. स्वातंत्र्याचा अतिरेक हे खरंच आपल्या देशाच्या अधोगतीचं कारण आहे का? माझ्या मते नियमांचा अतिरेक, परवाना पद्धतीचा अतिरेक, नियंत्रणांचा अतिरेक ही या सगळ्या अवनतीला कारणीभूत असलेली समस्या आहे. थोडक्यात, नानींनी हृदयात जपलेली मानसिक व नैतिक गुणवत्ता जनसामान्यांमध्ये तयार झालेली नाही हे देशाच्या अधःपतनाचे कारण नसून त्याचा परिणाम आहे. हे थोर घटनातज्ज्ञ घोड्यासमोर गाडी बांधण्याचा प्रयत्न करीत आहेत! नानींसारखे बरेचजण, विशेषतः महानगरातले, नानींसारखाच विचार करतात ही मोठी केविलवाणी गोष्ट आहे. चुकांच्या उच्चभ्रू यादीमध्ये सातव्या क्रमांकावर कुणीतरी राज्यांच्या भाषावार फेररचनेचा उल्लेख केला आहे. नानींनी तो केला नाही, ही आनंदाची बाब आहे. का ती त्यांची नजरचूक होती?

तात्पर्य : शिक्षित आणि धनिकांपासून सावध रहा; अशिक्षित आणि गरीबांकडून काही धोका नाही.

*(२१ ऑगस्ट १९९७)*

◆◆

# विद्यार्थ्यांनो ! विद्यार्थी बना

शेतकरी संघटनेचे काम मी पंधरा वर्षांपूर्वी चालू केलं. मी काही शेतकऱ्याचा मुलगा नाही. माझ्या गेल्या पाच पिढ्यांत कुणी शेती केली नाही. परदेशातून आल्यानंतर शेतजमीन घेऊन मी शेतकरी बनलो आणि शेतकरी संघटनेच्या कामाला लागली. याचं कारण शेतकरी संघटनेच्या सुरुवातीच्या सभांमधून मी सांगितलं आहे. त्यावेळी मी म्हणायचो, "स्वातंत्र्य मिळालं, इंग्रज या देशातने गेला की दारिद्र दूर होईल, दुःख दूर होईल, देश संपन्न होईल. आज जसं आपण अमेरिका, स्वित्झर्लंड या देशांची संपन्नता ऐकतो, तसा हिंदुस्थान बनेल असं स्वप्न आम्हाला गांधीजींनी दाखवलं होतं. तेहेतीस वर्षानंतर आम्ही प्रत्यक्षात असं पाहतो आहो की, गरीबी दूर झाली नाही, गरीबी वाढली, भ्रष्टाचार वाढला. जेवळजवळ सगळं वाईटच झालं. उदाहरणार्थ, आता आपल्याला खायला लागणारं पुरेसं अन्न शेतकरी स्वतः पिकवतो, अमेरिकेतून जहाजातून ते यावं लागत नाही. तसंच, आजपर्यंत देशाच्या सरहद्दी जवळजवळ शाबूत आहेत, जवानांना धन्यवाद द्यायला पाहिजेत; पण अशा काही अपवादात्मक प्रकाशशलाका सोडल्या तर बाकी सारा अंधारच आहे, तो का? असा प्रश्न मला पडला आहे."

आणि स्वातंत्र्य मिळालं पण त्यानंतर देश भरकटला आहे त्याची चिंता वाटली म्हणून मी शेतकरी संघटना काढली, आंदोलनं केली, तुरुंगात गेलो. आयुष्य वाऱ्यावर उधळून दिले. जे काही झालं तो सगळा इतिहास सर्वांना माहीत आहे.

यंदाच्या वर्षी स्वातंत्र्याची पन्नास वर्षे पुरी झाली, खरं म्हणजे, १५ ऑगस्ट १९४७ रोजी लाल किल्ल्यावर तिरंगी झेंडा लागला त्याला पन्नास वर्षे पुरी झाली. स्वातंत्र्य मिळालं का नाही मिळालं हा मुद्दा वेगळा; पण पन्नास वर्ष पुरी झाल्याच्या निमित्तानं चांगला मोठा उत्सव चालू आहे. जिकडं पहावं तिकडं ५० आकडा

आणि तिरंगी झेंड्याच्या पताका लावलेलं चिन्ह दिसत आहे, गावोगाव सभा होताहेत.

स्वातंत्र्य मिळाल्यानंतर गांधी गेले, त्यांच्याबरोबर त्यांचं नेतृत्व गेलं, विचारही गेला, सगळंच गेलं. स्वातंत्र्यानंतर देशानं पंडित नेहरूंचं नेतृत्व स्वीकारलं आणि नेहरू रशियाला जाऊन आले होते, त्यांनी सांगितलं की, ''समाजवादानं देशाचं भलं होईल.'' म्हणजे, उद्योगधंदा करणारे खोटे, फायद्याकरिता काम करतात ते खोटे! देशाचं भलं व्हायचं असेल तर दिल्लीमध्ये बसून नियोजकांनी देशाचे नियोजन केलं पाहिजे आणि तुम्हा आम्हा जनसामान्यांनी सरकार सांगेल त्याप्रमाणे जी काही नोकरी असेल ती सकाळी दहा ते पाच करायची. हा विचार आपण सगळ्यांनी स्वीकारला. समाजवाद ही फार मोठी गोष्ट आहे. असं अजूनही बहुतेकांच्या मनात आहे. नेहरू रशियाला जाऊन आले असा नमुना हिंदुस्थानात तयार व्हावा म्हणून आपण प्रयत्न केला; पण आता त्या रशियाचंच दिवाळं वाजलं. म्हणजे, आमच्या स्वप्नातला आदर्शच मुळी फुटून गेला. ज्या रस्त्यानं आपण चाललो होतो तो रस्ताच मुळी चुकीचा आहे असं कळलं आणि आज स्वातंत्र्य मिळाल्याला पन्नास वर्षे झाल्यानंतर, पुढारी सोडून द्या, पक्ष सोडून द्या, पण माझ्यासारख्या विद्यार्थ्यांच्या मनामध्ये, तुमच्याारख्या विद्यार्थ्यांच्या मनामध्ये निदान हा प्रश्न आला पाहिजे की, ''हे काय झालं आहे? आपण जायला निघालो देवाच्या आळंदीला आणि येऊन पोहोचलो चोरांच्या आळंदीला हे झालं कसं काय? रस्ता चुकला कुठे?''

गंमत म्हणजे हे असं होणार हे सांगणारे निदान दोन लोक होऊन गेले.

पहिले, इंग्लंडचे त्यावेळचे पंतप्रधान चर्चिल. त्यांनी स्वातंत्र्य देण्याच्या वेळी सांगितलं होतं की, ''हिंदुस्थानच्या लोकांना स्वातंत्र्य देऊ नका. यांचे पुढारी बसतात. काडीची तोशीस सोसायची यांची ताकद नाही, हे सगळे पेंढा भरलेले पुढारी आहेत; यांची नैतिक ताकद कमी, देशातल्या गोरगरिबांविषयी कळवळा कमी, देशातल्या गोरगरिबांविषयी कळवळा कमी; इंग्रज गेले म्हणजे त्यांच्या जागी बसावं आणि देशाचा सगळा फायदा आपण घ्यावा एवढीच त्यांची लालसा आहे. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर इथे पन्नास वर्षांच्या आत जातीच्या आणि धर्माच्या नावानं भांडणं लागतील; हे माझं, हे माझं म्हणून लोक भांडतील; नोकरी मला पाहिजे, मला पाहिजे असं म्हणून भांडतील आणि देशामध्ये पुन्हा एकदा ठगांचं राज्य तयार होईल, रक्ताचे पाट वाहतील.'' असं ज्यानं सांगितलं त्यांचं नाव चर्चिल, इंग्लंडचे प्रतप्रधान.

आपल्या देशात तर एक महात्मा असा होऊन गेला की ज्यानं सव्वाशे वर्षांपूर्वीच आजच्या परिस्थितीच भाकित केलं होतं. त्यावेळी नुकतेच म्हणजे १८८३ साली राष्ट्रीय काँग्रेसची स्थापना झाली होती. महात्मा जोतिबा फुले यांनी म्हटलं, अरे, तुम्ही राष्ट्रीय काँग्रेस म्हणता; पण तुमच्याकडे 'एकमय लोक' या अर्थी राष्ट्र आहे काय? ब्राह्मणांना वाटतं आपण ब्राह्मण, मराठ्यांना वाटतं आपण मराठे, प्रत्येक जातिधर्माच्या लोकांना वाटतं की आपण या जातीचे किंवा त्या धर्माचे. कुणाला विचारलं की तू कोण आहेस, तर मी 'हिंदी' आहे असं सांगणारी माणसं आहेत किती? असं सांगणारी बहुसंख्य माणसं असली तरर 'राष्ट्र' आहे आणि मग राष्ट्रीय काँग्रेस करण्यात काही अर्थ आहे आणि मग राष्ट्रीय स्वातंत्र्याचं बघता येईल. आमचा देश असा की बहुसंख्य लोकांना शाळेत जायचा अधिकार नाही, पुस्तक वाचायला अधिकार नाही, देवळात जाण्याचासुद्धा अधिकार नाही; आम्ही एकमेकांना भाऊसुद्धा समजत नाही. आज इंग्रज आहेत म्हणून त्यांच्या धाकाने दिनाद गुण्यागोविंदाने नांदतो आहोत. जर का इंग्रज निघून गेला तर इथे पुन्हा पेशावाईचं राज्य तयार होईल आणि सर्वसामान्य माणसाचा इथे काहीही विकास होणार नाही.

हे भाकीत जोतिबा फुल्यांनी सव्वाशे वर्षापूर्वी वर्तवलं होतं.

तेव्हा, आज स्वातंत्र्याच्या पन्नासाव्या वर्षी जो गोंधळ आपल्याला दिसतो आहे तो होणार हे पहिल्यापासून स्पष्ट होतं. तरीदेखील आंधळ्यासारखे आपण चालत गेलो. माझी एकच इच्छा आहे की, आज 'स्वातंत्र नासलं' म्हणून आपण डोळ्यातून पाणी काढतो आहोत, पण निदान २०४७ साली स्वातंत्र्याचा शंभरावा वाढदिवस येईल तेव्हातरी आपली परिस्थिती थोडी सुधारलेली असावी, आणखी खालावलेली असू नये.

आज जगातल्या सगळ्यात दरिद्री, सगळ्यात भिकार देशांत हिंदुस्थानची गणना आहे. शंभर वर्षांनंतर निदान आपण दोनपाच नंबर तरी वर येऊ का? विद्यार्थी जसं परीक्षेतल्या आपल्या नंबरचा विचार करतात तसं. जगाच्या परीक्षेत हिंदुस्थान हा नापास झालेल्या देशांत आहे. शंभराव्या वर्षी तरी आपण निदान पास तरी होऊ का ही चिंता मला आहे; कारण, लोकसभेमध्ये चर्चा झाली, जी आपण टेलिव्हिजनवर पाहिली, त्यात मोठमोठी खासदार मंडळी जे बोली ते बोलणं ऐकून माझी मोठी निराशा झाली. या लोकांना, "आपाली वाट चुकली, नवी वाट शोधायला पाहिजे." हेसुद्धा माहीत नाही, आपण चाललो आहोत तीच वाट बरोबर आहे असं ही मंडळी लोकसभेमध्ये बोलली. हे अगदी चिंताजनक

आहे, यात देशाला मोठा धोका आहे.

शेतकरी संघटनेने सेवाग्राम येथे २८ ते ३० जानेवारी १९९८ या दिवसात देशातल्या सगळ्या, फक्त शेतकऱ्यांची नाही, नागरिकांची एक जनसंसद आमंत्रित केली आहे. दिल्लीतल्या संसदेमध्ये जी चर्चा होऊ शकली नाही, ती लोकांनी करावी; एक दिवस लागो, दोन दविस का कितीही दिवस लागोत. सेवाग्रामला गांधीजींचा आश्रम आहे तिथं बसावं आणि 'स्वातंत्र्य का नासले?' आणि 'आता त्यातून मार्ग कसा काढायचा' यावर चर्चा करावी अशी ही 'जनसंसद' बोलावण्यामागची अपेक्षा आहे.

या जनसंसदेची तयारी करताना मी जिल्हा महिला अधिवेशने आणि विद्यार्थी मेळावे घेत फिरत आहे. '५० वर्षांत स्वातंत्र्य का नासले?' या पुश्नाबद्दल तुमचं मत काय आहे, सर्वसामान्य नागरिकाचं मत काय आहे? हे ऐकणं हा यामागचा उद्देश आहे. मला पुढाऱ्यांचं मत नको आहे. मला तज्ज्ञांचं मत नको आहे, अर्थशास्त्रज्ञानीच गेल्या पन्नास वर्षात सारा देश बुडवला. म्हणून मला सर्वमासान्य माणसांचं मत हवं आहे.

या विद्यार्थी मेळाव्यात प्रामुख्याने ज्यांचा शेतीशी संबंध आहे. ज्यांचे आईवडील शेतीवर आहेत असेच विद्यार्थी आहेत; शिक्षणाच्या निमित्ताने आर्णी, यवतमाळ सारख्या शहरात आलेली ही शेतकऱ्याघरची मुलं आहेत. त्यांना जे सांगायचं आहे ते मी १९८५ साली एका पत्रात–महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना पत्र–सांगून टाकलं आहे.

प्रत्येक पक्षाची संघटना असते. ते विद्यार्थी निवडणुका लढवतात. कोणी विद्यार्थी निवडणूक लढवीत असेल तर पक्ष त्याला पैसे पुरवतो कारण यातूनच पक्षाचे नवे नेते तयार व्हावेत. मग, पक्षाने काही आंदोलन काढलं की ते विद्यार्थ्यांनाही त्यात घेऊन जातात; विद्यार्थी म्हणजे तरुण रक्ताचे, झटकन तापणाऱ्या रक्ताचे, दगडफेक करायला बरे असतात. म्हणजे फटाफट आंदोलन यशस्वी होईल आणि पक्षाचं नाव होऊन जाईल असं गणित.

शेतकरी विद्यार्थी संघटना ही विद्यार्थ्यांना आंदोलनात यायला सांगत नाही; दगड फेकायला सांगत नाही. धोंडे फेकायला सांगत नाही. विद्यार्थ्यांचा असा वापर करणं म्हणजे पुढच्या वर्षीच्या पिकाचं बियाणं यंदाच खाऊन टाकण्यासारखं आहे असं शेतकरी संघटना मानते. मग विद्यार्थ्यांनी काय करावं असं मी त्या १९८५ च्या पत्रात सांगितलं? "विद्यार्थ्यांनी विद्या कमवावी. अभ्यास करणं हा विद्यार्थ्यांचा धर्म आहे. तो अभ्यास त्यांनी कसा करावा? शेतकऱ्याघरची मुलं

विद्यार्थी म्हणून शहरात आलात, अडचणी खूप, रहायला जागा नाही. अगदी छोट्या शहरामध्येही माणसं आपल्यापेक्षा चांगली राहातात आणि पुष्कळांच्या बाबतीत एस टीने डब आल तर जेवायची सोय आहे, नाहीतर जेवणाचीही गैरसोय; आपल्याला इंग्रजी म्हटलं की, भीती वाटते आणि त्या मानाने इथे राहणाऱ्या नोकदारांची मुलं इंग्रजी पटकन शिकतात, कसा काय आपला नंबर यायचा. कसं काय आपण पास होणार अशी सतत चिंता."

त्या पत्रात मी असंही म्हटलं की, "तुम्हाला आणखीही एक अडचण येणार आहे. विशेषतः अर्थशास्त्राचा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या असं लक्षात येईल की तुमच्या पाठ्यपुस्कामध्ये जे लिहिलं आहे ते खोटं आहे. उदाहरणार्थ, अर्थशास्त्राच्या पुस्तकात तुम्हाला असं लिहिलेलं सापडेल की हिंदुस्थानातील शेतकऱ्यांची परिस्थिती खूप सुधारली आहे. सरकार त्याला भरपूर मदत करतं, सूट सबसिडी देतं, खतावर सूट आहे, औषधावर सूट आहे, कर्जावर सूट आहे; वर त्याला इन्कमटॅक्स भरावा लागत नाही त्यामुळे शेतकरी मोठा मालामाल झाला आहे. असं अर्थशास्त्राच्या पाठ्यपुस्तकात लिहिलेलं आहे आणि ही पुस्तकं चागल्या जाणकारांनी, तंज्ज्ञांनी लिहिलेली आहेत; पण तुम्हाला माहिती आहे की, हे खोटं आहे; पण तुम्ही जर का पेपरात लिहिलं की हिंदुस्थानातल्या शेतकऱ्याला सबसिडी नाही, त्याची शेती तोट्यात चालली आहे तर तुम्हाल परिक्षेत नापास करतील." मग त्या पत्रात शेतकरी विद्यार्थ्यांना मी पहिला सल्ला दिला की, "पेपरात लिहिण्याकरिता पुस्तकात जे जे काही खोटं लिहिलं आहे तेसुद्धा शिकून घ्या आणि परीक्षा पास व्हा. सर्कशीमध्ये वाघ असतो; वाघाचं काम काही रिंगातून उड्या मारणं आणि खुर्चीवर जाऊन बसणं हे नाही; पण सर्कशीत पोट भरायचं म्हणजे त्याला बिचाऱ्याला रिंगातून उड्या माराव्या लागतात, खुर्चीवर जाऊन बसावं लागतं. तेव्हा, वेळ येईपर्यंत तेही खोटं शिकून घ्या; पण, माझी एक विनंती आहे, आठवड्यातून एक दिवस कुठे तरी एकत्र जमा. आठवड्यातून नाही जमलं तर पंधरा दिवसातून नाही जमलं तर पंधरा दिवसातून एकदा किंवा महिन्यातून एकदा, कधीतरी जमा आणि एक काम करा. शाळा, कॉलेज असलेल्या छोट्याशा शहरातीलसुद्धा रस्त्यातून चालताना काही घरांमध्ये, काही बंगल्यांमध्ये विजेचे दिवे आहेत, दाराखिडक्यांना व्यवस्थित पडदे लावलेले आहेत आणि त्या घराबंगल्यांतले आईवडील एकमेकांशी आनंदाने बोलतात, हसतात, मुलांशी खेळतात, मुलांना खेळणी आणून देतात मुलांचं कौतुक करतात, आपलं बाळ आज किती छान दिसतंय. म्हणून एकमेकांचं

कौतुक करतात असं चित्र दिसतं. हे चित्र पाहिल्यानंतर तुमच्या मनात प्रश्न उभा राहिला पाहिजे की, अरे, असं हे सुख माझ्या आईबापांना आयुष्यामध्ये एक दिवससुद्धा भोगायला का मिळालं नाही? हा प्रश्न तुम्ही स्वत:ला विचारा, या प्रश्नाचं उत्तर जो अभ्यास देईल तीच खरी विद्या; या प्रश्नाचं उत्तर देणार नाही तो सारा अभ्यास म्हणजे अविद्याच असं समजा.''

या पत्रात विद्यार्थ्यांना मी आणखी एक उदाहरण दिलं, तुमची परिस्थिती कशी आहे? तुम्ही शेतावरून शहरात आलात, म्हणजेच भारतातून इंडियात आलात. रामानं हनुमंताला जसं लंकेत पाठवलं तसं. तुमच्या आईबापांनी तुम्हाला इकडे पाठवलं आहे. यासाठी की, आपली श्रमसिद्ध संपदा भूमिकन्या सीता पळवून नेली आहे तिचा शोध तुम्ही काढावा; पण रामाने हनुमानाला पाठवल्यानंतर लंकेत आल्यावर, त्यानं सगळं काही पाहिल्यावर ''वा! रावणाची लंका म्हणजे सोन्याची लंका, प्रचंड वैभवशाली रत्नहिरेमाणकेजडित महाल.'' असं म्हणून जर हनुमानाने विचार केला असता की, ''अरे, कशाला जायचं रामाकडे परत, आहे काय त्याच्याकडे? कल्कलं नेसतो, कंदुळे खातो आणि झाडाखाली झोपतो. त्यापेक्षा रावणाकडे अर्जविनंती करून जर का त्याच्याकडे नोकरी शोधली तर मालामाल होऊन जाऊ.'' तर पुढचं रामायण घडलं नसतं.

एवढ्या एका प्रश्नाचं उत्तर तुम्ही शोध असं सांगितल्याला आता तेरा वर्षे झाली. उघड दिसतं आहे की, माझ्या भाच्यापुतण्यांनी हे काम काही केलं नाही. का केलं नसावं? माझ्या लहानपणी तिसरीचौथीच्या वर्गात अत्र्यांची एक कविता होती.

*शाळेत रोज जाताना*
*मज विघ्ने येती नाना*

अशी तिची सुरुवात होती. मग तो विद्यार्थी एकएक अडचण सांगतो. वाटेत फुलपाखरे दिसतात, ती मला म्हणतात, ये आपण खेळू पण मी मोठ टाळतो.

*आणि मी निघे*
*तडक शाळेला*

असा प्रत्येक वेळी त्या कडव्याचा शेवट होतो. कुठे टोळ दिसतात, ते म्हणतात ये खेळायला; कुठे गारुडी पुंगी वाजवत असतो, तर कुठे जादुगार खेळ मांडून बसलेला असतो. प्रत्येक वेळी मोहात अडकून घोटाळतो आणि शाळा चुकेल म्हणून मोह टाळून तो 'निघे तडक शाळेला.'

मी विद्यार्थ्यांना सांगितलं की, या अभ्यासाच्या मागे लागा; पण झालं काय?

वाटेमध्ये त्यांना कुणी पुंगी वाजवणार गारुडी दिसला, कुणी जादूगार दिसला! कुणी पुंगी वाजवून म्हणाला अरे या या, पहा तर मी हा प्रभु रामचंद्राचा खेळ कसा मांडला आहे आणि माझे सारे शेतकरी भाचेपुतणे मी सांगितलेला अभ्यासाचा. विचाराचा मार्ग सोडून रामाच्या मंदिराकडे वळले. कुणी म्हणाला बाकी काही करण्याची गरज नाही. फक्त छत्रपती शिवाजी महाराजांचं नाव घ्या म्हणजे तुमचे सगळे प्रश्न सुटून जातील; विचार करायला नको, अभ्यास करायला नको, तुमचे काय प्रश्न आहेत ते मी सोडवून देतो म्हटले की गेले त्यांच्या मागे. अशा तऱ्हेने आपल्या अभ्यासाच्या मार्गामध्ये हे अडथळे येतात.

आता मी विद्यार्थ्यांसमोर उभा आहे. मी जर म्हटलं की, माझी अशी इच्छा आहे की, कोणी विद्यार्थी नापास होऊच नये, माझी मागणी अशी आहे की परीक्षेत कॉपी करायला सर्वांना मुक्तद्वार असले पाहिजे. त्यात अडचण येताच कामा नये आणि जो कोणी विद्यार्थी परीक्षा, कशा तऱ्हेने का होईना, पास झाला असेल त्याला चांगली दोनतीन हजाराची नोकरी मिळाली नाही तर बेकारीचा भत्ता म्हणून काहीतरी मिळालं पाहिजे तर मी तुमच्यात मोठा लोकप्रिय होऊन जाईन आणि तुम्ही 'शरद जोशी झिंदाबाद' म्हणून मोठ्याने घोषणा द्यायला लागाल. अशा तऱ्हेच्या गाजराच्या पुंग्या वाजवणारे आणि तरुणांकडून 'घोषणा' घेणारे गारूडी पुष्कळ आहेत. तुम्हाला घर पाहिजे? मी देतो; तुम्हाला कपडे पाहिजे. मी देतो; तुम्हाला नोकरी पाहिजे मी देतो; तुम्हाला काय पाहिजे ते मी देतो, तुम्ही फक्त एकदा मला मत द्या असं म्हणणाऱ्या गारुड्यांकडे आपण वळलो आणि आज ५० वर्षांनंतर आपण पाहातो आहोत की, अनेक गारुडी आले, अनेक जादुगार आले आणि आम्ही जमिनीमध्ये प्रत्येक वेळी आणखी खचतो आहोत.

गेल्या पन्नास वर्षांत विद्यार्थ्यांच्या दृष्टीने शिक्षणाच्या बाबतीत काय घडलं? इंग्रज जेव्हा गेले तेव्हा देशामध्ये शाळा फार थोड्या होत्या. होत्या त्या शहरात होत्या. खेडेगावामध्ये एखादा गुरुजी असायचा तो शिकावायचा, विशेषतः काही ठराविक जातीतल्या मुलांनाच शिकवायचा. थोड्या शाळा होत्या त्या शाळेमधील शिक्षकांना त्या काळी पगार असायचा दरमहा आठदहा रुपये. प्राथमिक शिक्षक म्हणजे अत्यंत गरीबीमध्ये राहणारा. विद्यार्थ्यांना ज्ञानदान करणारा असा पवित्र माणूस समजला जाई. प्राथमिक शिक्षकांच्या विरुद्ध अगदी १९७१ सालापर्यंत, कोणी बोलत नसे. आता सगळीकडे जीवन शिक्षण मंदिरं गावोगाव निघाली; गावातील गुरुजी गेले. खाजगी शाळा जवळजवळ

संपुष्टात आल्या, जिल्हा परिषदेने मास्तर नेमायचे, पगार साडेतीनचार हजार रुपये, काही कमी नाही. ती नोकरी मिळवायची झाली तर गेल्यावर्षी ऐंशी हजार रुपये कुणाला तरी द्यावे लागायचे असे ऐकू येते, यंदा हा दर किती वाढलाय कुणास ठाऊक? हे शिक्षक कधी शाळेमध्ये आले तर येतात, नाही तर येत नाहीत; शिकवलं तर शिकवतात, नाहीतर शिकवत नाही. माझ्या शेजारच्या गावात एक शिक्षक फक्त पगार घ्यायला येतो आणि महिनाभर आपल्या बदली शाळेत यायला त्याने पाचशे रुपयांमध्ये दुसरा एक पोटशिक्षक ठेवून दिला आहे.

आज शिक्षणाचा दर्जा काय आहे? सातवी पास होवो, दहावी पास होवो किंवा अगदी एम.ए. झालेला असो; मुलाला मराठीतलं एक वाक्य लिहून दाखव म्हटलं तर तेसुद्धा धड लिहिता येत नाही अशी आज परिस्थिती आहे; इंग्रजी, विज्ञान हे विषय तर सोडूनच द्या. जेव्हा स्वातंत्र्य मिळालं तेव्हा आमची लोकसंख्या होती ३४ कोटी लोक निरक्षर होते, लिहितावाचता न येणारे होते. आज हिंदुस्थानची लोकसंख्या ९४ कोटी आहे आणि त्यातले ४२ कोटी निरक्षर आहेत. स्वातंत्र्याच्या आधी डॉ. सी. व्ही. रामन किंवा जगदीशचंद्र बोस यांच्यासारखे शास्त्रज्ञ या देशात तयार होत होते, ज्यांना नोबेल पारितोषिक मिळत होतं, एवढंच नव्हे तर ज्यांच्या विद्वत्तेला मोठी मान्यता होती असे विद्वान तयार होत होते. आज हिंदुस्थनातल्या शास्त्रज्ञांना नोबेल पारितोषिकांच्या यादीतसुद्धा त्यांचं नाव येऊ शकत नाही. विद्यार्थ्यांपैकी बरेच जण आता कॉंप्युटरचं शिक्षण घेत असतील. कॉंप्युटरमध्ये दर आठ दिवसांनी काही नवीन शोध लागताहेत आणि काय नवीन शोध लावायची धडपड चालली आहे याचा अंदाजसुद्धा आमच्यातील तज्ज्ञांना नसतो, इतके आम्ही जगाच्या मागे गेलो आहोत. शाळा वाढल्या, कॉलेजं वाढली, पुढाऱ्यांची मोठी मोठी कॉलेजं झाली, शिक्षणक्षेत्रात पैसे खूप खेळू लागले; पण तिथं शिक्षण म्हणून काही राहिलं नाही. जशी दारूची दुकानं निघाली आणि हातभट्ट्यासुद्धा निघाल्या.

हे का झालं? या प्रश्नाचं उत्तर, मला वाटतं, तुम्हा विद्यार्थ्यांना द्यावं लागणार आहे. मी माझ्या पिढीच्या वतीने माझे कान पकडून तुम्हा तरुण मंडळीची क्षमा मागतो की, आमच्या पिढीनं या देशाचं वाटोळं केलं; पण तुम्ही जर का आमच्या पिढीचा रस्ता सोडला नाही आणि गप्प बसून राहायचं ठरवलं तर हा देश आता वाचत नाही हीही खूणगाइ बांधून घ्या.

मी गेल्या महिन्यांमध्ये बर्लिन्यामध्ये बर्लिनला एका परिषदेकरिता गेलो

होतो. तिथून अमेरिकेला गेलो. जरा बरं वाटत नव्हतं. तर डॉक्टरांना दाखवावं म्हणून गेलो, तिथं कळलं की, अमेरिकेत अनेक नाणावलेले डॉक्टर हे हिंदुस्थानरी आहेत. आपल्या देशात डॉक्टर झालेले विद्यार्थी सगळे भेटायला मिळतात ते अमेरिकेत मिळतात किंवा इंग्लंडमध्ये मिळतात आणि माझ्या गावामध्ये जर का बाळंतीण अडली तर तिला पाहायला एकसुद्धा भारतीय डॉक्टर उपलब्ध नसतो. ही शिक्षण पद्धतीची चूक झाली. ही चूक का झाली? जर आपण स्वातंत्र्य मिळालं म्हणतो, आपल्या देशाचं सरकार आलं असं म्हणतो तर इथे शिक्षणाची पद्धत अशी झाली कशी की ज्यामुळे डॉक्टर आणि इंजिनिअर या गरीब देशामधल्या गरीबांच्या पैशांनी शिकले आणि नंतर पैसे कमवण्याकरिता परदेशात निघून गेले आणि आमच्या देशातल्या मायबापड्या जर बाळंतपणात अडल्या तर त्यांना उपचार द्यायला एक हिंदी डॉक्टर येथे नाही?

मी काय म्हणतो ते अधिक स्पष्ट व्हावे म्हणून एक उदाहरण सांगतो, समजा, आपण मुंबई, पुणे, नागपूर, वर्धा यासारख्या शहरांमध्ये वैद्यकीय महाविद्यालये काढतीच नसती किंवा घाई न करता सावकाशीने काढली असती आणि सुरुवातीला जर हिदुस्थानचा पंतप्रधान हा हिंदुस्थानातल्या गोरगरीबांचे, मायबापड्यांचं दुःख जाणणारा असता तर तो म्हणाला असता, ''सध्या कॅन्सरवर ट्रीटमेंट नाही मिळाली तरी चालेल, सध्या हार्ट पेशंट मेले तरी चालतील–मी हार्ट पेशंट आहे तरी मी हे म्हणतो आहे; पण पहिल्यांदा औषधोपचाराची अशी योजना करू या की ९० टक्के लोकांच्या आजारांवर उपचार करता यावेत. ९० टक्के लोकांचे काय आजार आहेत? प्यायला शुद्ध पाणी नाही म्हणून पोटाचे आजार, खरूज, नारू आणि ग्रामिण भागातला अभ्यास असं सांगतो की, एकही स्त्रीरोग झालेला नाही अशी एकही स्त्री ग्रामिण भागात जवळजवळ नाही. या आजारांचे उपचार करायला कोणी नाही म्हणून मी असं म्हटलं असतं की बारावीमध्ये ९० टक्के आणि १०३ टक्के मार्क कोणाला मिळाले ते बाजूला राहू द्या, गावातली दाई, गावातली जी म्हातारी बाई एखाद्या बाईचं बाळंतपण जवळ आलं म्हटल्यावर धावत जाते तिला मी वैद्यकीय शिक्षण देणार आहे; तिला मी फक्त तीन महिन्यांचा कोर्स देतो, जास्त खर्चसुद्धा नको. गावामध्ये एखादी बाळंतीण अडली तर तिचं बाळंतपण त्यातल्या त्यात सुखरूप कसं होईल याचं शिक्षण जर तिला दिलं असतं तर हिंदुस्थानातल्या लोकांचं दुःख, वेदना कितीतरी कमी झाल्या असत्या. तुम्ही शहरांमध्ये कॉलेज का काढली? जोतिबा फुल्यांनी सांगितल्याप्रमाणे, याचा अर्थ असा की तुमच्या नावाचा, तुमच्या देशाचा म्हणून

झेंडा लाल किल्ल्यावर लागला, तुमच्या रंगाची माणसं पंतप्रधान झाली, तुमच्या रंगाची माणसं मंत्री झाली म्हणून असं वाटायला लागलं की आपल्याला स्वातंत्र मिळालं तरी पण प्रत्यक्षात सत्तेवर बसलेल्या माणसांना इंग्रजांनासुद्धा गोरगरीबांविषयी जितका कळवळा होता तितकाही नाही. इंग्रजांनी गावोगाव दवाखाने काढले, कॉलरा निर्मूलनासाठी काम केलं, प्लेग निर्मूलनासाठी काम केलं; पण तेवढीसुद्धा सहानुभूती नसलेली आमची माणसं सत्तेवर आली. तसं नसेल तर मग, धरलेल्या मार्गाची काही चूक आहे हे कबूल करून दुसऱ्या मार्गाचा शोध घेऊन त्या मार्गाने चालायला सुरुवात केली पाहिजे.''

शिक्षणासंबंधी ही अशी अवस्था आहे. तरुणांच्या मनामध्ये आजकाल नोकरीचा विषय असतो म्हणून मी एक धोक्याची सूचना देऊन ठेवतो. एक गोष्ट खरी आहे की तुमच्या आईबापांनी तुम्हाला कॉलेजमध्ये शिकायला पाठवलं ते या विचाराने की, ''बाळांनो, काही करा; चांगलं शिका पण शेतीत नका येऊ. शेतकी कॉलेजचं जरी शिक्षण घेतलं तरी बँकेमध्ये जा, शेतकरी अधिकारी व्हा आणि शेतकरी अधिकारी व्हा आणि शेतकऱ्यांना शहाणपण शिकवा शेती कशी करावी याचं; पण, शेती करायला नका येऊ; याल तर मराल.'' आपण सगळेजण शहरात विद्यार्थी म्हणून आलो ते खरं नाही; विद्येच्या शोधार्थ आलोच नाही. आपण आलो आहोत एका कागदाच्या कपट्याच्या शोधार्थ, ज्याला म्हणतात 'डिग्री सर्टिफिकेट' किंवा 'डिप्लोमा सर्टिफिकेट' हे सर्टिफिकेट कशासाठी हवं आहे? विद्या काहीही न मिळे, पण हे सर्टिफिकेट म्हणजे, तरुणांना रोजगार देऊन बेरोजगारी दूर कशी करावी यासाठी आम्ही एक समिती स्थापन करीत आहोत, तुम्ही आम्हाला मदत करा. मी त्यांना एकच सल्ला दिला, ''बेरोजगारी दूर करायची आहे? काही समिती नको, काही बजेट नको आणि काही सरकार नको. मी कोणाला हवी त्यालाएका दिवसात नोकरी देतो; फक्त एक अट आहे. तुम्ही जर का माझ्याकडे नोकरीत लागून शंभर रुपयांचे उत्पादन केलं तर त्यातले नव्व्याण्णव रुपये तुमचे, माझ फक्त एकच रुपया. ही नोकरीची अट ज्याला मान्य असेल त्याला नोकरी द्यायला मी तयार आहे.'' आपण त्या नोकरीमध्ये भाकरी काही टाकणार आहोत का? सर्वसाधारणपणे नोकरदार, मग तो दिल्लीचा असो, मुंबईचा असो, यवतमाळचा असो का आर्णीचा असो. एकदा नोकरी लागली की काम करायचा काही संबंधच नाही, दोन ओळी लिहिताच येत नाहीत, आधीच्या कारकुनाने फाईलीमध्ये जे काही मसुदे लिहिले असतील तसाच मसुदा लिहून साहेबाच्या पुढे ठेवायचा, साहेबानं म्हटलं,

''काय गाढवा, काय लिहितोस?'' की म्हणायचं, ''बरं साहेब, दुसरा लिहून आणतो.'' आणि दुसरा लिहून लिहून द्यायचा आणि मग पे-कमिशन कधी हातं आणि आपला महागाईभत्ता कधी किती वाढणार याचा विचार करत करत ५० वर्षे काढायची आणि रिटायर झालं की मोकळे.

मध्ये सहकारी साखर कारखान्याच्या संबंधात एका तज्ज्ञांनी हिशोब केला की साखर कारखान्यामध्ये जर का एक मनुष्य नेमला तर त्याला नेमल्यापासून तो रिटायर होईपर्यंत कारखान्याला खर्च येतो ४० लाख रुपये. हे काहीच नाही. केंद्रशासनातल्या एका नोकरदाराचा एका वर्षाचा सरासरी खर्च खर्च ८० हजार रुपये आहे. आता जर का या नोकरदारांनी ऐंशी हजार एक रुपयांचं काम सरकारकरता केलं आणि ऐंशी हजार रुपये घेतले तर चालेल, काही चिंता नाही; पण एक पैशाचंही काम करायचं नाही, उलट जे काम करीत असतील त्यांना अडथळा आणायचा; कोणी रिपोर्ट मागायला गेला, कॉपी मागायला गेला. लायसन्स मागायाला गेला. परमिट मागायला गेला की, त्याला टिंगवून ठेवायचं. पुन्हा हात पसरायचा, लाच खायची आणि मगच जमलं तर काम करायचं असा नोकरदार असला तर बेरोजगारी संपायची कशी? एक नोकर नवीन घेणं हे मालकाला जेव्हा अधिक फायद्याचं तेव्हा नोकऱ्या वाढतील. तेव्हाच बेरोजगारी संपेल.

कोणी जर म्हणू लागलं की, ''नोकऱ्या नाही मिळाल्या तर मी तुम्हाला आठशे रुपये भत्ता देतो.'' तर विचार करा, सगळ्या बेरोजगारांना आठशे रुपये भत्ता दिला तर काय होईल? एक कप चहाची किंमत चारशे रुपये होईल. अर्थशास्त्रामध्ये न बसणाऱ्या या गोष्टी आहेत. बेरोजगारी संपायची असेल तर आपल्याला उत्पादक व्हायला लागेल.

तुम्ही विद्यार्थी आहात, शिक्षण संपल्यावर आपल्याला नोकरी मिळायला पाहिजे असं तुम्हाला वाटतं म्हणून मी तुम्हाला धोक्याची सूचना देऊन ठेवतो. तुम्हाला नोकरी मिळाली ना एखादी की मग देशाचं काय होतं. आहे याचा विचारसुद्धा तुमच्या मनात येणार नाही. देश जाईना का खड्ड्यात, आपल्याला मिळाली ना नोकरी, आपण मोकळे झालो ना देशाच्या टोपलीत भाकर टाकणार नाहीच; पण दुसऱ्या कुणीतरी कष्टानं तयार केलेल्या भाकऱ्या वाढत्या भुकेने खात राहाणार. असा विचार तुम्ही करणार; पण तुमच्यापैकी फार थोड्यांना नोकरीचं भाग्य मिळणार आहे. समाजवाद संपला आहे. आपल्या शाळाकॉलेजांमध्ये ज्याला एक इंग्रजातलं वाक्य लिहिता येत नाही. एक मराठीतलं वाक्य लिहिता

येत नाही तो एम.ए. होतो कसा? आणि त्याला नोकरी मिळते कशी? या समाजवादाच्या जमान्यामध्ये नोकरदारांनी काही केलं पाहिजे अशी अपेक्षाचं काही केलं पाहिजे अशी अपेक्षाच नाही. एकदा नोकरी मिळाली म्हणजे जहागीरीच मिळाली; पुढे काळजी करण्याचं कारणच नाही, कारण त्याला काढणारं कुणीच नाही. परवा प्रामाणिक सरकारी नोकर भेटला. तो म्हणाला, "गेल्या महिन्यापर्यंत माझा महिन्याचा पगार बारा हजार रुपये होता. पाचवा वेतन आयोग झाला आणि माझा पगार एका महिन्यात साडेएकोणीस हजार झाला. मला इतकं वाईट वाटून राहिलं आहे की, मी बारा हजारांचं ही काम करत नव्हतो." तुम्हाला जर का काही काम न करता साडेएकोणीस हजार मिळत असतील तर त्याचा अर्थ असा की शेतामध्ये घाम गाळणाऱ्या शेतकऱ्याला, शेतमजुराला, शेतमाऊलीला त्यांनी गाळलेल्या घामाचंसुद्धा दाम मिळणार नाही; कारण ते तुम्ही खाल्लेलं असेल. जर का कष्ट न करता, घाम न गाळता कुणाला काही फळ मिळत असेल तर त्याचा अर्थ असा की, घाम गाळणाऱ्या कुणातरी दुसऱ्याचं फळ त्याच्या हातातून काढून घेऊन तो खातो आहे.

ही सगळी परिस्थिती मी तुम्हा विद्यार्थ्यांसमोर ठेवली. उद्देश असा की, या विषयावर तुम्ही विचार करावा, अभ्यास करावा. कोणी तरी येऊन फूस लावून देतं त्याला बळी पडून विचार करून नका, आमच्या पिढीनं जी चूक केली ती तुम्ही करू नका हे सांगण्याकरिता हे तुमच्यापुढं मांडलं. म्हणजे १९८५ साली जो दिला तोच संदेश– अभ्यास करा आणि उत्तर शोधा की, "आमच्या आईवडिलांना एक दिवससुद्धा सुखाचा का मिळाला नाही." हे करताना ज्या काही अडचणी येतात, गारूडी जादूगार दिसतात, आपलं लक्ष वेधून घेतात त्यांच्यापासून सावध राहायण्याकरिता दोन गोष्टी सल्ला म्हणून सांगतो.

तुम्ही अभ्यासातून अमूकच एक निष्कर्ष काढा हे मी सांगत नाही. माझंच म्हणणं ऐका असंही सांगत नाही. फक्त सावधानतेचा इशारा देतो.

विचार करण्याच्या मार्गामध्ये दोन मोठ्या अडचणी असतात. एक म्हणजे, आपण लहान असतो तेव्हा आपले आईबाप काय शिकवतात? वडीलधाऱ्यांचा प्रेमादर करावा! योग्यच आहे. आई आपल्याला वाढवते त्यामुळे आईविषयी प्रेम असतंच, वडिलांविषयीही असतं; पण लहान मुलांना पहिल्यापासून सांगतात की, मोठ्या लोकांना जितकी अक्कल असते तितकी लहान मुलांना येण्याची शक्यता नाही. मला हे घरामध्ये मानतात याचं फारसं वाईट वाटत नाही; पण बाहेरसुद्धा तसंच सरधोपटपणे मानतात याचं वाईट वाटतं. एक अनुभव सांगतो.

लातूर जिल्ह्यातली बरीच मुलं हल्ली परीक्षेत पहिली येतात, लातूर पॅटर्नमुळे. लातूरच्या मुख्याध्यापकांनी एकदा मेरीट लिस्टमध्ये आलेल्या विद्यार्थ्यांचा माझ्या हस्ते सत्कार ठेवला. मी स्टेजवर उभा राहिलो. एकेका मुलाचं नाव घेतलं जाऊ लागलं. पहिली दुसरी आलेली मुलं. कुणी संस्कृतमध्ये पहिला आलेला, कुणी गणितात पहिला आलेला. अशी ती बिचारी मुलं येत होती आणि माझ्या पाया पडत होती. मला शरमल्यासारखं वाटलं. कारण, मी मोठा आहे म्हणजे काय, त्यांच्या दृष्टीनं त्याच्यापेक्षा फक्त वयानं मोठा आहे. ही मुलं इतकी बुद्धिमान, ही उद्या काय कर्तबगारी दाखवतील, काय विद्वत्तेची भरारी मारतील! अशा या उद्याच्या शिल्पकारांना मी त्यांच्यापेक्षा केवळ वयानं मोठा आहे म्हणून माझ्या पाया पडायला लावणं ही किती वाईट गोष्ट आहे? वडीलधाऱ्यांचा आदर राखावा हे घरामध्ये ठीक आहे; पण एकदा घराच्या बाहेर पडलं की लोक सांगतात, "गुरुचा आदर राखावा." काही मर्यादेपर्यंत राखवा हे ठीक आहे. पुढे म्हणतात, "मोठी माणसं असतात त्यांचं ऐकावं" मग ही मोठ्या माणसांची यादी दिवसेंदिवस वाढत जाते. कोणी म्हणतं, मार्क्सने असं म्हटलं, कोणी म्हणतं गांधींनी असं म्हटलं, कोणी म्हटलं शिवाजीनं असं केलं, कोणी म्हणतं विवेकानंदांनी असं केलं, कोणी म्हणतं महंमद पैगंबराने तसं केलं; कोणी म्हटलं भगवद्‌गीतेमध्ये कृष्णानं असं सांगितलं आणि कोणी म्हटलं येशू ख्रिस्तानं तसं सांगितलं की, आम्ही बिचारे घाबरून जातो आणि समजतो एवढी थोर माणसं आहेत ना त्यांचच आपण ऐकलं पाहिजे.

तुम्हा विद्यार्थ्यांना, एक अत्यंत कठोर वाटणार, सत्य सांगतो. कोणत्याही एका पिढीतला माणूस, एका पिढीतला अडाणी हा याच्या मागच्या पिढीतल्या विद्वानापेक्षा विद्वान असतो. कारण प्रत्येक पिढी मागच्या पिढीच्या खांद्यावर उभी असते. तेव्हा कोणीही मनुष्य मोठा असेल तर आदर बाळगायला हरकत नाही; पण पूर्वी कोणीतरी काही मोठं तत्त्व सांगितलं आहे म्हणजे त्याच्यापुढे आपण जायचंच नाही हा रामदासांचा धोपटमार्ग चोखाळलाच पाहिजे असं नाही. विद्यार्थी मित्रांनो, कृपा करून, यापुढे धोपटमार्गाने चालू नका. आम्ही तर कबूल करतो आहोत की, "मागच्या पिढीने चुका केल्या, तुम्ही मागच्या पिढीचा मार्ग धरला आणि त्यांच्या पावलांवर पाऊल टाकून चाललात तर तुम्ही खड्ड्यात पडणार हे निश्चित आहे." तर तो मार्ग धरू नका. कोणाही माणसाचं मोठपण गृहीत धरू नका. कोणाही माणसानं दुसऱ्या एखाद्या माणसाला सदाकाळचा पुरुषोत्तम मानावं हा विचारांचा अंत आहे, हा बुद्धीचा शेवट आहे. कोणाही

व्यक्तीचा सदाकाळ आदर्श बाळगू नका.

अजून एक लहानसा सल्ला. जगामध्ये असं एकही पुस्तक नाही की ज्यामध्ये जगाच्या सुरुवातीपासून ते जगाच्या अंतापर्यंत सगळं शहाणपण लिहिलेलं आहे. गजनीचा महंमद आला तो वायव्येच्या एका बौद्धांच्या विद्यापीठात गेला; प्रचंड ग्रंथालय होतं. त्यानं विचारलं, "हे काय आहे?" लोक म्हणाले, "ग्रंथ आहेत." त्यानं विचारलं, "त्यात काय आहे?" लोक म्हणाले, "त्यांत पुष्कळ ज्ञान आहे." तो म्हणे, "कुराणामध्ये जे लिहिलं आहे, त्याच्यापेक्षा वेगळं आहे का? तसं असेल तर ते खोटं आहे. सगळे ग्रंथ जाळून टाका आणि कुराणात जे लिहिलंय तेच जर यांच्यात लिहिलं असेल तर या ग्रंथाची गरज काय?" असं ग्रंथालयं जाळणारे 'महंमद गजनी' आजही आपल्यामध्ये आहेत. मी जोतिबा फुल्यांचा मोठा भक्त आहे. मी स्वत:ला जोतिबांचा शिष्य म्हणवतो; पण, तुम्हाला कुणाला जोतिबा फुल्यांचं मत पटत नसेल तर तुमचं मत स्पष्टपणे मांडण्याचा तुम्हाला अधिकार आहे. त्या अधिकाराकरितासुद्धा मी लढायला तयार होईन. मी गांधींना मानतो, पण गांधींवर कुणी टीका केली म्हणजे त्यांचं घर जाळून टाका असं मी म्हणून कसं चालेल. मी बाबासाहेब आंबेडकरांना फार थोर माणूस मानतो; पण कोणी जर म्हणायला लागलं की, आंबेडकरांविरुद्ध कोणी लिहिलं म्हणून जाळा त्याची पुस्तकं तर समजा हा महंमद गजनीचा नवा अवतार आहे; त्याला थारा देऊ नका. कोणतंही पुस्तक मोठं नसतं. कायमचं मोठं नसतं. कुराण मोठं नाही, बायबल मोठं नाही आणि भगवद्‌गीतासुद्धा मोठी नाही हे लक्षात ठेवा. कारण, हे सगळे एका काळचे थोर ग्रंथ आहेत. नव्या काळाचा थोर ग्रंथ लिहिण्याचं काम तुमच्याकडे आलं आहे म्हणून तुम्हाला विद्यार्थी म्हणायचं, म्हणून तुम्हाला तरुण म्हणायचं.

विद्यार्थ्यांचं मंडळ असतं, विद्यार्थ्यांची संघटना असते. तसं युवा संघटनांची, तरुणांची भूमिका काय असं फारजण बोलतात. असं बोलणारांविषयी मला शंका आहे. मला परवा दिल्लीला काँग्रेसच्या युवा संघटनेचे प्रमुख युवा संघअनेचा अध्यक्ष कसा काय झाला? चालतं, म्हणे! पहिल्यांदा वयोमर्यादा पस्तीस होती, हळूहळू चाळीस झाली... मी म्हटलं थोड्या दिवसांनी मीसुद्धा युवा संघटनेत येऊ शकेन! तरीही तरुण कोण आहे? मी जर १८ किंवा २१ वर्षाच्या तरुणाला म्हटलं की, "चल, समोर छान डोंगर दिसतो आहे, जाऊ या आज आपण चढायला, कठीण असला म्हणून काय झालं?" आणि तो जर म्हणाला, "नको बाबा, मी आतापर्यंत कधी डोंगरावर चढलोच नाही, चढणं जमेल का नाही

कुणास ठाऊक? आईवडिलांची परवानगी घेतली पाहिजे..." या अठराविसाच्या माणसाला तरुण म्हणणार काय? तारुण्य कोणामध्ये आहे असं म्हणायचं? याची एक व्याख्या आहे. माणसाला तारुण्यात एक गोष्ट जमते. जी आयुष्यात पुढे कधी जमत नाही. देशाला स्वातंत्र्य हवं आहे असं वाटल्यानंतर समुद्रामध्ये उडी फेकणारे सावरकर हे फक्त तारुण्यातच सवरकर असतात; हसत हसत फाशी स्वीकारणारे भगतसिंग-सुखदेव-राजगुरु हे फक्त तारुण्यातच म्हणजे जी गोष्ट तारुण्यातच तसं करू शकतात. कारण, तारुण्य म्हणजे जी गोष्ट आपल्याला पटते आणि प्रिय वाटते त्याकरिता संबंध जीव फेकून देण्याची तयारी असण्याची अवस्था. जन्माचं सर्टिफिकेट बघून कोणाला तरुण म्हणता येणार नाही. तरुणपणी माणसं प्रेम का करतात? कारण आपल्याला जी व्यक्ती प्रिय वाटते तिच्या प्राप्तीकरिता आयुष्य फेकून देण्याची त्यावेळी तयारी असते.

ही तारुण्याची ताकद जर तुमच्याकडे असेल तर एक गोष्ट करा. देशाची गेली पन्नास वर्षे आम्ही फुकट घालवली. आम्हाला भलं काही करता आलं नाही, माझ्यासारखी काही माणसं धडपड करत राहिली; पण आमच्या डोळ्यांदेखत इंग्रजांच्या तावडीतून स्वतंत्र झालेली भारतमाता या सगळ्या नतद्रष्ट लोकांनी ओढत ओढत द्रौपदीसारखी भर दरबारात काढली आहे. तिला वाचवण्याचं काम करायची हिम्मत आणि बुद्धी निदान तुमच्या पिढीत येवो अशी फक्त इच्छा आणि अशा व्यक्त करतो.

*(२१ नोव्हेंबर १९९७)*

◆◆

# स्वातंत्र्य म्हणजेच प्रगती

डॉक्टर ज्युलियन सायमन ८ फेब्रुवारी १९९८ रोजी वयाच्या ६५ व्या वर्षी निधन पावले. गेल्या वर्षी ते हिंदुस्थानात आले होते. शेतकरी संघटनेच्या सहकार्याने देवळाली येथे भरलेल्या एका परिसंवादात त्यांनी भाग घेतला होता. त्याही वेळी त्यांचे नाव अर्थशास्त्रातील नोबल पारितोषकाचे उमेदवार म्हणून घेतले जात होते.

डॉ सायमन आशावादी अर्थशास्त्री म्हणून ओळखले जात. या पृथ्वीवरील सर्वात निर्णायक साधनसंपत्ती माणूस ही आहे. माणूस प्रगतीच्या मार्गात येणारे सारे अडथळे दूर करतो, जमिनीची सुपिकता तसेच धातू, तेल इत्यादी खनिजे देण्याची क्षमता मर्यादित असेल पण, त्यामुळे माणसाची प्रगती थांबणार नाही; 'जगाचा अंत मनुष्यप्राण्याच्या लालसेपोटी येत आहे' असे शतकानुशकते धर्मवादी, पर्यावरणवादी कंठशोष करीत असले तरी प्रत्यक्षात माणसाची प्रगती प्रचंड वेगाने आणि वाढत्या गतीने होतच आहे. अशी डॉक्टरसाहेबांची मांडणी.

ख्रिस्तपूर्व ८००० वर्षापासून ते इसवी सन १७५० सालापर्यंत माणसाचे जीवनमान २० वर्षांपासून फक्त २४ वर्षांपर्यंत वाढले. आणि, १७५० सालापासून जीवनाचा आलेख सरळच झेप घेतो आहे. या अडीचशे वर्षांत ते ७० वर्षांपर्यत वाढले.

कच्चा मालाचा निसर्गातील साठा संपत जाईल आणि त्यामुळे खनिजेही माहगतील ही भीतीही खोटी ठरली आहे. बहुतेक सर्व धातूंच्या किंमती सतत उतरत आहेत. १८०१ सालच्या किंमतीच्या तुलनेने आज तांब्याची किंमत एक दशांशदेखील राहिलेली नाही. २०० वर्षापूर्वी एक टन तांबे विकत घेण्यासाठी साधारण माणसाला किती दिवस काम करावे लागे याची तुलना आजच्या परिस्थितीशी केली तर हे स्पष्ट होते.

अन्नधान्याच्या बाबतीतही तसेच दिसते. भूकबळींची संख्या झपाट्याने कमी होत आहे. अन्नधान्याचा दरडोई उपभोग गेल्या ३० वर्षात झपाट्याने वाढत आहे. 'जमीन मर्यादित आहे, लोकसंख्या वाढत आहे, तेव्हा रोगराई आणि भूकबळी अपरिहार्य आहेत' हा सिद्धांत मांडला गेला होता. लोकसंख्यावाढीमुळे जीवनमान खाली तर येत नाही, उलट, लोकसंख्येबरोबरच आर्थिक प्रगतीचाही वेग वाढतो आहे.

१७५० सालापर्यंत मनुष्यप्राण्याने जेवढी प्रगती केली तेवढी प्रगती त्याने त्यानंतरच्या शंभर वर्षांतच केली. तितकीच प्रगती करयला त्यानंतर त्याला पन्नास वर्ष पुरली. त्यानंतर, तेवढीच प्रगती करण्यास वीस वर्षे, दहा वर्षे, पाच वर्षे असा कमी कमी कालावधी लागतो आहे. आजकाल तर तेवढी प्रगती मनुष्यप्राणी वर्षाभरातच करतो आहे.

हाँगकाँग आणि हिंदुस्थान हे डॉ. सायमन यांच्या विशेष कौतुकाचे विषय होते. १९५५ साली सायमन हाँगकाँगला गेले तेव्हा ते एक पसरलेले खेडे होते; हजारो लोक फूटपाथवर व छोट्या बोटींत रात्र काढीत. ही परिस्थिती पाहून सायमनना मोठे वाईट वाटले होते. लोकसंख्या कमी झाल्याखेरीज या लोकांना सुखाने जगता येणार नाही अशी त्यांची खात्री पटली होती. १९८३ साली ते हाँगकाँगला परत गेले त्यावेळी एक चमत्कारच घडलेला होता. लोकसंख्या कमी झालेली नव्हतीच, कित्येक पटींनी वाढली होती; आणि तरीही, व्यापार, उद्योगधंदे यांच्या वैभवाने हाँगकाँगची वसाहत दिमाखात उभी होती.

हिंदुस्थानबद्दलही डॉ. सायमन कौतुकाने बोलतात. १९५४-५५ साली आंतरराष्ट्रीय संस्थांनी निष्कर्ष काढला. 'हिंदुस्थानातील धान्याचा तुटवडा आणि तेथील प्रचंड लोकसंख्या लक्षात घेता तेथील भूकबळी थांबविणे अशक्य आहे. हिंदुस्थनवर वृथाश्रम आणि साधने घालविण्यापेक्षा त्याचा नादच सोडून द्यावा व तेवढ्याच प्रयासांनी बाकीचे सारे देश व्यवस्थित खाऊपिऊ शकतील त्या कामाकडे वळावे.' एका काळी हाताबाहेर गेलेली हिंदुस्थानची ही 'केस' आता अगदीच वेगळी दिसते. हिंदुस्थान अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण बनला आहे.

१९८१ साली डॉ. सायमन यांनी 'निर्णायक साधनसंपत्ती (The Ultimate Resources) हे पुस्तक प्रसिद्ध केले आणि १९८६ साली मानवजातीची सद्यःस्थिती (The state of Humanity) हा अहवाल प्रसिद्ध केला. मोठे वादळ उठले.

'लोकसंख्या गुणाकाराने वाढते, अन्नधान्याचा पुरवठा पावलापावलाने वाढतो,

भूकबळी, रोगराई ही मानवाची नियतीच आहे' अशा अर्थाची माल्थसची भाकिते खोटी ठरली. त्याच्या काळी जमीन हीच सर्वांत मोठी साधनसंपत्ती होती. आता जमिनीपेक्षा भांडवल, भांडवलापेक्षा तंत्रज्ञान आणि तंत्रज्ञानापेक्षा माणूस हे जास्त महत्वाचे उत्पादनाचे घटक ठरले; त्यामुळे माल्थसचे अरिष्ट टळले हा विचार अनेक शास्त्रज्ञांनी पूर्वी मांडला आहे; पण डॉ. सायमन यांना हे स्पष्टीकरण मान्य नव्हते. भांडवल आणि तंत्रज्ञान यांच्या वाढत्या वापरामुळे हे घडले असते तर प्रदूषण वाढत गेले असते. ते वाढते आहे अशीच बहुतेकांची समजूत आहे. १९६० ते १९९० या काळातील आकडेवारीने डॉ. सायमन यांनी असे दाखवून दिले आहे की, औद्योगिक प्रदूषणाची पातळी अमेरिकेत प्रत्यक्षात कमी कमी होते आहे. १९८० साली प्रख्यात जीवशास्त्री पॉल एअर्लिक आणि सायमन यांची गाठ पडली. एअर्लिकसाहेब लोकसंख्येच्या वाढीस आळा घालण्याचे मोठे पुरस्कर्ते. "लोकसंख्या कमी झाली नाही तर साधनसंपत्ती अपुरी पडेल, त्यांच्या किमती वाढतील." हे मत ते आग्रहाने प्रतिपादीत. दोघांची पैज लागली, हजार डॉलर्सची. १९९० सालापर्यंत क्रोमियम, तांबे, निकेल, टिन, टंग्स्टन या पाच धातूंच्या किमती पडताना दिसल्या तर एअर्लिक हरले म्हणायचे आणि किमती चढताना दिसल्या तर एअर्लिक जिंकले म्हणायचे. प्रत्यक्षात या दहा वर्षांत लोकसंख्या वाढली, तांब्याची मागणी वाढली; पण तांब्याचे उत्पादन अधिक कार्यक्षम झाले, अधिक स्वस्त पर्याय सापडले. एअर्लिक यांनी पैजेपोटी ५७६ डॉलर्स ७ सेंट दिले-चलनवृद्धी लक्षात घेऊन! पण त्या सोहबांचा अजूनही विश्वास आहे की, दीर्घ काळाचा अनुभव घेतला तर त्यांचेच म्हणणे खरे ठरेल.

माणसाची सतत प्रगतीच होते, याला सायमन फक्त एक अपवाद करतात, "सर्वांत निर्णायक साधनसंपत्ती माणूस ही आहे. तो आपले मन, विचारशक्ती, प्रज्ञा, प्रतिभा वापरून परिस्थितीवर सतत मात करीत असतो. त्याला खरी गरज फक्त एकाच गोष्टीची प्रगती त्यांतील नागरिकांच्या स्वतंत्र्याशी सरळ जोडलेली आहे." साऱ्या पृथ्वीतलावर प्रगती झाली. फक्त राष्ट्र, धर्म, समाजवाद असल्या झेंड्याखाली जेथे जेथे हुकूमशाही लादली गेली, नागरिकांच्या स्वातंत्र्यावर बंधने आली तेथे मात्र प्रगतीचे चक्र मंदावले, थांबले आणि उलटही फिरू लागले, ख्रिस्तानंतरच्या १७५० वर्षांत प्रगती झाली नाही याचे कारणही हच. धर्मगुरू आणि सुलतानांनी सामान्य जनांना निव्वळ गुलाम बनवून टाकले होते त्यामुळे प्रगती थांबली. धर्माचा आणि राजसत्तेचा पगडा जसजसा कमी होत गेला तसतशी माणसाची प्रगती झाली, जीवनमान सुधारले. स्वातंत्र्य आणि प्रगती या एकाच

नाण्याच्या दोन बाजू आहेत.

यंदाचे नोबल पारितोषक डॉ. सायमन यांना मिळो किंवा न मिळो, खुलीकरणाच्या नवीन युगाच्या पहाटेच अनेक वर्षे स्थिरावलेल्या अनेक बाष्कळ समजुती त्यांनी त्यांच्या दोनच पुस्तकांनी कचरापेटीत टाकल्या यात काही शंका नाही.

*(२१ मार्च १९९८)*

◆◆

# पौरुषहीनांचे इतिहासप्रेम

कावेरी नदीच्या पाण्याच्या वाटपाबद्दल पंतप्रधानांनी बैठक बोलावली. तामिळनाडूचे मुख्यमंत्री करुणानिधी, कर्नाटकचे पटेल – दोघेही मुख्य विवादी हजर होते. तामिळनाडू आणि कर्नाटक यांच्यातील हा विवाद वर्षांनुवर्षे चालला होता. १९२४ साली मद्रास प्रांताचे गव्हर्नर आणि म्हैसूरचे महाराजा यांच्यात उभयपपक्षी करार झाला. एका बाजूला इंग्रज शासन आणि दुसऱ्या बाजूला, महाराजा असला तरी, देशी – दोघांमधील तडजोडीत झुकते माप इंग्रजांच्या बाजूनेच पडले असणार हे उघड आहे. कराराची मुदत पन्नास वर्षांची होती. १९७४ साली ती संपली. आता दोघेही विवादी भरतीय संघराज्यातील समान दर्जाची दोन घटक राज्ये – दोनही राज्यांतील सर्व पक्षांनी आणि पुढाऱ्यांनी आपापली बाजू कडेलोटाच्या अभिनिवेशाने मांडली. दोन शेजारी राज्यांत वर्षानुवर्षे शत्रुराष्ट्रांत असावी तशी वैमनस्याची भावना पेटत होती. त्यातच जयललिता अम्मांनी त्यांचे राजकारण पुढे ढकलण्याचे हत्यार म्हणून कावेरीवाद हाती घेतला; या प्रश्नावर दिल्लीचे सरकार कोसळते काय अशी भीती निर्माण झाली.

अशा मोठ्या कडेलांटाच्या परिस्थितीत संबंधित पक्षांची बैठक झाली आणि सर्वसंमत तडजोड निघाली. वाटपाची जुनीच पद्धत चालू राहवी; पण प्रत्यक्ष अंमलबजावणीत काही अडचणी आल्या तर त्यांचे निराकारण दस्तरखुद्द पंतप्रधानांच्या अध्यतेखालील एका समितीने करावे; या समितीला सल्ला देण्यासाठी तंत्रविशारदांचा एक गट असावा असेही ठरले. राज्यशासनाच्या पातळीवर प्रश्न निकालात निघाला. करुणानिधी आणि पटेल या दोघांचेही मनःपूर्वक अभिनंदन केले पाहिजे.

दोनही राज्यांतील विरोधी पक्षांनी गहजब सुरू केला. मुख्यमंत्र्यांनी राज्याच्या हितांचा बळी दिला; अशी तडजोड करायची होती तर इतकी वर्षे हा वाद पेटत

ठेवलाच कशासाठी? अशा टीकांच्या फैरी झाल्या; पण त्या सगळयांना दोन्ही मुख्यमंत्र्यांनी शांतपणे, धीरगंभीरपणे आणि मुत्सद्दीपणाने तोड दिले. यापेक्षा चांगली तडजोड निघणे शक्य नव्हते. तेव्हा, सद्यःपरिस्थितीत राज्याचे जास्तीत जास्त हित सांभाळणारी ही व्यवस्था आहे, असं त्यांनी स्पष्ट मांडले. केंद्रशासनानेही दिरंगाई न करता तत्परतेने निर्णयासंबंधी अधिसूचना जारी केली. सुदैवाने, यंदा पाऊसमान व्यवस्थित आहे. दोनही राज्यांत सध्यातरी पाण्याचा तुटवडा नाही. त्यामुळे, विरोधकही संघर्ष, आंदोलन अशी भाषा न करता शांत बसलेले दिसत आहेत. करुणानिधी आणि पटेल यांचा मुत्सद्दीपणा असलेले नेतृत्व राज्याराज्यात आणि केंद्रशासनात उभे राहिले तर अनेक प्रश्न सोडवणे सहज शक्य व्हावे.

गेल्या पन्नास पर्षांत प्रश्न सुटले असे कोणतेच नाहीत; नवे नवे प्रश्न तयार होत गेल्यामुळे जुन्या प्रश्नांचा काहीसा विसर पडला, त्या प्रश्नांवरील भावनांची तीव्रता थोडी कमी झाली आणि त्यामुळे, ते प्रश्न मिटल्यासारखे वाटते, एवढेच; पण काही निमित्ताने सुप्त विवादांचा उल्लेख झाला तरी दोन्ही बाजूची मंडळी भीमदेवी गर्जना करून जिवाच्या आकांताने, लढण्याचे संकल्प बोलू लागतात.

महाराष्ट्र आणि कर्नाटक यांतील बेळगाव हिल्ह्यासंबंधी सीमाप्रश्नाचे उदाहरण घ्या. राज्यपुनर्रचना झाल्यानंतरचीच वर्षे मोजली तरी, चाळीस वर्षे हा वाद धुसमसत राहिला आहे. राज्यपुनर्रचनासमितीने काही निर्णय दिला, महाजन समितीने शिफारशी केल्या; पण प्रश्न काही सुटला नाही. सुरुवातीसुरुवातीस सीमा प्रश्नावर मोठी जनआंदोलने झाली. महाराष्ट्रातील सर्वपक्षीय नेत्यांनी आघाडी बांधून सीमाप्रश्नी लढ्यात उडी घेतली. दोन्ही राज्यांतील सर्व पक्षांचे पुढारी सीमाप्रश्नावर मोठ्या तावातावाने बोलतात आणि मोठ्या पोटतिडकीने आपली बाजू मांडतात; पण सीमावाद सुटण्याची काही लक्षणे नाहीत. मनोहर जोशी आणि पटेल एकत्र येतील आणि काही समझोता काढून सीमावाद एकदाचा संपवून टाकतील अशी काही शक्यता दिसत नाही. मराठी काय आणि कानडी काय – दोघेही एकाच देशाचे नागरिक, दोन थोर संस्कृतीचे वारसदार; पण सीमाप्रश्नावर आले की, विरुद्ध बाजूचे लोक म्हणजे निव्वळ रानटी, दुष्ट, दुसऱ्याच्या प्रदेशावर बळजबरीने हक्क सांगणारे राक्षस असल्या भाषेत ते बोलू लागतात. जणू काही, सीमावादाचा प्रश्न हा चीन आणि भारत यांमधील ईशान्य सरहद्दीवरील वाद किंवा भारत–पाकिस्तान यांमधील जम्मू–काश्मिरचा वाद या बरोबरीचा वाद असावा.

ईशान्य सरहद्दीच्या प्रश्नाबद्दल हिंदुस्थान आणि चीन असेच तुटून बसले

आहेत. हिंदुस्थानचे म्हणणे इंग्रजांच्या ताब्यातील प्रदेश स्वातंत्र्यानंतर हस्तांतरणाने आमच्याकडे आला आहे; चीनचे म्हणणे – इंग्रजांच्या साम्राज्यवादी आक्रमणामुळे त्यांनी अनेकाचे प्रदेश बळकावले, त्याचा फायदा घेण्याचा हिंदुस्थानने प्रयत्न करू नये. त्यावर प्रतिवाद असा की, मुळात तिवेट हाच चीनचा भाग आहे का नाही? चीनमधील तिबेटच्या प्रदेशाच्या धार्मिक सत्ताधाऱ्याशी इंग्रजांनी करारमदार केले होते. पार राजधानी ल्हासापर्यंत भारतीय टपालसेवा चालत असे. मग, चीन त्या आधीचा इतिहास सांगू लागला. सारा चीन कम्युनिस्टांनी मुक्त केला त्याबरोबर धर्मवाद्यांच्या आधिपत्याखाली गुलामीचे जीवन जगणाऱ्या तिबेटी लोकांनाही त्यांनी मुक्त केले. हिंदुस्थानने पोर्तुगीजांच्या तावडीतून गोवा सोडविले. त्यासारखाच हा इतिहास. थोडक्यात, युक्तिवादाने हा प्रश्न सुटण्यासारखा नाही, सीमाप्रश्न उभा राहिला, इंच इंच जमीन लढविण्याच्या भाषा सुरू झाल्या, एक तसूभर जमीन गेली तरी भारतमातेची विटंबना होईल अशा काव्यपंक्ती लोकांच्या लोकांच्या तोंडी आल्या; युद्ध झाले, हिंदुस्थानच्या लष्कराला माघार घ्यावी लागली, मग चिनी सैन्य मागे परतले. आजही जगातील सर्वात उंच, दुर्गम अशा प्रदेशात मरणाच्या थंडीत दोन्ही बाजूचे जवान गस्त देत असतात. वाद मिटण्याची काही लक्षणे नाहीत. तडजोड करणे म्हणजे अपमान स्वीकारणे, आपली पौरुषहीनता कबूल करणे असा एक मोठा गंड सर्व नागरिकांच्या आणि नेत्यांच्या मनात घर करून समझोता करावा आणि प्रश्न मिटवून टाकावा, तेथे ठेवाच्या लागणाऱ्या प्रचंड लष्कराचा खर्च आणि तकलीफ कमी करावी अशी हिम्मत कोणी नेता करणार नाही. त्याच्या विरुद्ध लगेच, भारतमातेचे विच्छेदन केल्याचा गिल्ला होईल. मध्येतरी, काही नेत्यांनी थोडा समजुतीचा सूर काढण्याचा प्रयत्न केला; पण लोकांची प्रतिक्रिया पाहिल्यावर त्यांनी तातडीने काढता पाय घेतला.

जम्मू आणि काश्मिरचा प्रश्न तर त्याहूनही निकराचा. हिंदु आणि मुसलमान या दोन जमातीत उभे हाडवैर. अखंड भारताची फाळणी होऊन पाकिस्तानची निर्मिती झली तेव्हापासून दोन्ही देशांमध्ये कमेकांविषयी कमालीचा विद्वेष आणि शत्रुभावना धगधग राहिली आहे. भलेभले सज्जन हिंदुस्थानी आणि पाकिस्तानीसुद्धा हिंदुस्थान–पाकिस्तानच्या वादात न्याय, सत्य, शांती या मूल्यांचा काही संबंध नाही असे मानतात. पाकिस्तानी तेवढा सारा नीच. दिसेल तेव्हा ठोकून काढावा अशी हिंदुस्थानात भावना आणि तीच परिस्थिती पाकिस्तानातही. फाळणीच्या वेळी पाकिस्तानला तोडून दिलेले सिंध, पंजाब, बलुचिस्तान, पूर्व बंगाल हे प्रांत

सोडल्यास पाकिस्तानने कोणत्याच संस्थानी प्रदेशावर हक्क सांगणे गैर आहे अशी हिंदुस्थानी लोकांची ठाम समजूत आहे. जुनागढ संस्थान बहुसंख्य हिंदु प्रजेचे संस्थानिक मुलसमान नवाब. भारताच्या स्वातंत्र्य कायद्यानुसार संस्थान हिंदुस्थानात विलीन करावयाचे का पाकिस्तानात हे ठरविण्याचा अधिकार व्यक्तिश: संस्थानिकांकडे सोपविण्यात आला होता. जुनागढच्या नवाबाने पाकिस्तानात सामील व्हायचं ठरविले. संविधानाच्या दृष्टीने तसे करण्याचा त्याला हक्क होता; पण बहुसंख्य हिंदु प्रजेला पाकिस्तानात घालण्याचा या नवाबाला काय अधिकार असे. साहजिकच, हिंदुस्थानात मत. लष्कराच्या मदतीने जुनागढ संस्थान ताब्यात घेण्यात आले; हिंदुस्थानात सर्वत्र 'आनंदी आनंद जाहला.'

दक्षिणेतील हैदराबाद हे भारतातील सर्वांत मोठे संस्थान. बहुसंख्य प्रजा हिंदु, आधिपत्य मुसलमान निजामाचे. येथेही वाद जुनागढसारखाच. जुनागढ निदान एका कोपऱ्यात समुद्रतटाकी बसलेले. हैदराबाद उपखंडाच्या मध्यभागी – ते पाकिस्तानात जाणे म्हणजे हिंदुस्नानी भूप्रदेशाला मध्यभागीच भगदाड पडण्यासारखे पोटात असा कॅन्सरचा गोळा राहिला तर हिंदुस्थान जगूच शकत नाही हे स्पष्ट होते. लष्कर पाठवून निजामाचे सारे संस्थान हिंदुस्थानने ताब्यात घेतले.

जम्मू आणि काश्मिरची परिस्थिती नेमकी याउलट, राजा हिंदु, प्रजा बहुसंख्येने मुसलमान; पण काश्मिरची स्वत:ची अशी प्राचीन संस्कृती आहे. ती अर्वाचीन हिंदुस्थानच्या कडव्या मुसलमानी समाजधारणेशी तर नाहीच नाही. काश्मिरचा राजा निर्णय करण्यास असमर्थ ठरला. पाकिस्तानने टोळीवाल्यांच्या नवाखाली लष्कर पाठवून आक्रमण केले. काश्मिरी प्रजा आणि हिंदुस्थानी लष्कर त्याला परतवून लावले; निम्मा प्रदेश मोकळा झाला. निम्मा पाकिस्तानच्या अंमलाखाली राहिला. शस्त्रसंधीची रेषा आखली गेली, ती रेषा ओलांडून पाकिस्तानव्याप्त प्रदेश मुक्त करणे हिंदुस्थानी लष्कराला झेपणारे नाही म्हणून ते शस्त्रसंधी रेषेवर पहारा देत बसले आहेत. शेख अब्दुलांच्या नेतृत्वाखाली सुरुवातीच्या काळात असलेली निर्धामिक राष्ट्रभावना संपुष्टात आली. हिंदुस्थानी प्रशासक, लष्कर आणि कामिश्मिरी नेते यांच्या भ्रष्टाचाराला काश्मिरी वैतागले. हिंदुस्थानच्या तावडीतून सुटण्याकरिता मदत करण्यासारखा शेजारी देश म्हणजे पाकिस्तानच. स्वयंनिर्णयाच्या तत्त्वाच्या उद्घोषाखाली पाकिस्तानने प्रशिक्षित आतंकवादी काश्मिरात पाठवून घातपात घडवून आणण्याचा तडाखा लावला आहे.

पंजाबातील आतंकवाद संपुष्टात आणणे हिंदुस्थानी सुरक्षा दलांना मोठ्या

कष्टाने का होईना, जमले. कारण, तेथील हिंदु व शीख समाजांमध्ये खोल खाई आहे. हिंदुस्थानी लष्कराची स्थिती व्हिएटनाममधील अमेरिकन फौजेसारखी थेट झाली नाही. कारण, एकच की, पाकिस्तानविषयी काश्मिरी लोकांच्या मनात मोठी धास्ती आहे. हा वाद मिटण्याची काही चिन्हे दिसत नाहीत. काश्मिर प्रश्नावर हिंदुस्थान आणि पाकिस्तान – दोन्ही देशांत कडेलोटाच्या तीव्र भावना आहेत. सार्वमत घ्यावे आणि उभय पक्षांनी निर्णय खिलाडूपणे मान्य करावा या अटीवर समझोता होण्याची शक्यता नाही. शस्त्रसंधी रेषा आता पन्नास वर्षे कायम आहे, देशाची फाळणी झाली तशी काश्मिरचीही झाली आहे. त्या फाळणीला फक्त अधिकृत मान्यता मिळण्याचेच बाकी राहिले आहे, ती देऊन हा प्रश्न सोडवावा असे धीटपणे सांगण्याची हिम्मत कोणत्याही पक्षाचे पाकिस्तानी सरकार करू शकणार नाही. हिंदुस्थानातही तीच स्थिती. दोनचार वेळा लपतछपत असा प्रस्ताव पुढे आला; अगदी सरकारी पातळीवरही या शक्यतेवर चर्चा झाली; पण, काश्मिरची फाळणी झाली तर लोकक्षोभाचा डोंब उठेल आणि अशा योजनेला पाठिंबा देणारांची त्यात आहुती पडेल हे इतके स्पष्ट होते की हा प्रस्ताव पुढे नेण्याचे धैर्य कोणाला झाले नाही.

हिंदुस्थान–पाकिस्तानातील काश्मिर वादासारखीच परिस्थिती इस्त्रायल आणि अरब देशांतील संघर्षात आहे. इस्त्रायलचे पंतप्रधान रबीन यांनी तडजोडीसाठी पाऊल पुढे टाकले आणि त्यांची हत्या झाली. काश्मिर प्रश्नावर समझोता करू धजावणाऱ्या हिंदुस्थानी आणि पाकिस्तानी पंतप्रधानांची स्थिती तीच होणार आहे. शांततेचा मंत्र सांगणाऱ्या महात्मयाची हत्या करणाऱ्या या उपखंडात राजकीय समझोता करू पाहाणाऱ्या पुढाऱ्यांचा काय टिकाव लागणार आहे? शस्त्रसंधी रेषेवर उभयतांची लष्करे सज्ज आहेत. दररोज घातपाताचे प्रकार घडत आहेत; पण तडजोड काढली तर आपली देशद्रोह्यांत गणना होईल या भीतीने कोणी समझोत्याचे पाऊल उचलण्यास धजावत नाही. गेल्या दोन महिन्यापासून तर दोन्ही देश हातात अणुबाँब घेऊन सज्ज झाले आहेत. अण्वस्त्रांचा वापर झाला तर साऱ्या आशिया खंडाचाच काय पृथ्वीचाही विद्ध्वंस होईल हा धोका असताना 'काश्मिर प्रश्नाचा समाधानकारक निर्णय झाल्याखेरीज आम्ही अणुबाँबचा पहिला वापर न करण्याचा करार करू शकणार नाही.' असे पाकिस्तानी पंतप्रधान म्हणतात. हिंदुस्थानचे पंतप्रधानही म्हणतात, "आक्रमणासाठी त्याचा वापर करणार नाही." एवढेच म्हणतात; पण आक्रमण म्हणजे नेमके काय याची व्याख्या जो तो आपल्या सोयीने करीत असतो. आपल्यावरच आक्रमण

झाले आहे असा कांगावा खुद्द हिटलरनेही केला होता. आजही आक्रमक असाच युक्तिवाद करतात. तात्पर्य, दोन्ही देश जगाचा विद्ध्वंस झाला तरी चालेल पण काश्मिर प्रश्नी तसूभर मागे हटणार नाही. अशा जिद्दीने एकमेकांसमोर ठाकले आहेत.

जगभर सर्वत्र राष्ट्रराष्ट्रातील विद्वेषाचा विखार पिढ्यान्‌पिढ्या जळत ठेवला जातो असे दिसत नाही. इंग्लंडपासून रशियापर्यंत सर्व युरोपीय देश एकमेकांशी शतकानुशतके महावैराची युद्धे झुंजत आले आहेत. या युद्धात प्रदेशच्या प्रदेश ओसाड झाले, लखावधी ठार झाले, जखमी अपंगांची मोजदादजच नाही. चालू शतकातही दोस्त राष्ट्रे विरुद्ध जर्मनी अशी दोन महायुद्धे घडली. युद्धाच्या काळात एकमेकांवर आगीचा वर्षाव करणारे देश आज युरोपीय संघटनेत सामील झाले आहेत. एकराष्ट्राच्या भावनेने सतत प्रगती करीत आहेत. जपान अमेरिकेची तीच परिस्थिती. दुसऱ्या महायुद्धात दोन्ही राष्ट्रे कमालीच्या कडवटपणे झुंजली. मनुष्यजातीच्या इतिहासातील सर्वात राक्षसी आणुबाँबचा हल्ला हिरोशिमा आणि नागासाकी या दोन शहरांवर झाला. क्षणार्धात लक्षावधी माणसे मृत्यूमुखी पडली. जपानला शरणागती स्वीकारावी लागली. पंतप्रधान तोजो यांना फाशी देण्यात आली; पण युद्ध संपताच चित्र झटकन बदलले. दोघांत काही संस्कृतीची समानता नाही. दोन देशांतील भाषांचे एकमेकांशी काही नाते नाही आणि तरीही, अमेरिका आणि जपान परममित्र असल्यासारखे सारे जुने विसरून नांदत आहेत. साम्यवादी रशिया आणि भांडवलवादी अमेरिका यांच्यापेक्षा अधिक कडवे वैर जगाच्या इतिहासात कधी झालेच नाही; पण लोखंडी पडदा फिटला आणि ही दोन्ही राष्ट्रे कमालीच्या सलोख्याने, गुण्यागोविंदाने संबंध ठेवीत आहेत. आयर्लंडमधील वाद संपत आहेत. दक्षिण अमेरिकेतील वंशविद्वेषाची व्यवस्था फाळणी झाली पूर्व जर्मनी समाजवादी रशियन आधिपत्याखाली समाजवादी बनला, तर पश्चिम जर्मनी भांडवलशाही व्यवस्थेचा आदर्श नमुना मानला गेला. हिंदुस्थान-पाकिस्तानचे जसे उभे वैर तशीच स्थिती पूर्व-पश्चिम जर्मनीची ही दोन शकले पुन्हा एकत्र झाली. आज एकसंध राष्ट्र म्हणून भूतकाळातील सर्व कडवटपणा विसरून सलोख्याने राहत आहेत. वर्षांनुवर्षे सापमुंगसाप्रमाणे झुंजलेले देश आपापल्या भूमिकांविषयीचा अट्टाहास सोडून नव्या मार्गाने आंगकूच करीत आहेत.

विकसित संपन्न राष्ट्रातील लोक जुन्या चिघळणाऱ्या वादांवर वेळ आणि शक्ती व्यर्थ घालवीत नाहीत. काही व्यावहारिक तोडगा शोधून काढतात. समझोता

स्वीकारण्याकरिता आवश्ये ती दूरदृष्टी दाखवतात. समझोत्यामुळे समाधान कोणाचेच होत नसते. दोन्ही पक्षांतील असमाधानाची पातळी जवळपास सारखी करणे एवढाच समझोत्याचा उद्देश असतो. ते असमाधान स्वीकारण्यात काही मुत्सद्दीपणा असतो आणि पुष्कळसा व्यवहारी हिशेबही असतो. जुन्या वादांवर अभिमानापोटी झुंजत राहिल्याने नवी प्रगती खुंटते. प्रतिस्पर्ध्याकडून अधिक हिस्सा वळकावण्यापेक्षा तोच वेह आणि ताकद वापरून दुसऱ्या क्षेत्रात अधिक लाभ पदरी पाडून घेता येईल. अशा हिशोबाने जुन्या वादावर पांघरूण घालण्याची तयारी अशा देशातील नागरिक आणि नेते दाखवितात.

गरीब देशातील लोक असा समजूतदारपणा म्हणा, मुत्सद्दीपणा म्हणा का हिशोबीपणा म्हणा क्वचितच दाखवितात. भावाभावांची जमिनीवरून वादंगे होतात, प्रकरणे कोर्टात जातात, वर्षांनुवर्षे तारखा पडत राहतात, वकीलांच्या तिजोऱ्या भरत जातात आणि मूळचे मालदार भाऊ खचत खचत जातात. तरीही, "आपला भाऊच आहे, घेऊ दे त्याला थोडे जास्त." फसा समजूतदारपणा, दिलदारपणा, उदारपणा फारसे कोणी दाखवत नाही. आपण भांडण मिटवले आणि भावाचे मन जिंकून घेतलं तर दोघांच्या एकोप्याने गावात, तालुक्यात दोघांचाही दबदबा वाढेल असा दूरदर्शी मुत्सद्दीपणा त्याहूनही दुर्मिळ भाची खोडकी जिरविण्यासाठी पैसे, बुद्धी, ताकद घालविण्यापेक्षा दुसरा काही उद्यागधंदा सुरू केला तर वादातील मालमत्तेपेक्षा कित्येकपट अधिक मोठे घबाड पदरात पडून घेता येईल असा शुद्ध स्वार्थी हिशेबीपणासुद्धा क्वचितच सुचतो.

जशा व्यक्ती तसेच राष्ट्र. स्वातंत्र्याच्या पन्नास वर्षांत देशाची प्रगती झाली नाही. साधनसंपत्ती भरपूर असलेला हा देश अजूनही जगातील भिकारी देशांच्या पंगतीतच आहे; याची कारणे अनेक आहेत; पण काश्मिर, पंजाब, ईशान्य प्रदेश येथील फुटीवर चळवळीचा पाडाव करण्यात अपरंपार शक्तिपात झाला आणि त्यामुळे विकासाची गती खुंटली हे त्यातील महत्त्वाचे कारण आहे. देश म्हणजे कोणी आपली आई आहे आणि भूप्रदेशाचा एवढासा तुकडा काढून देणे आहे अशा काही प्रतिमा इतक्या रुजल्या आहेत की, "देशाच्या रक्षणात आम्ही प्रयत्नांची प्रत्येक भाषणात म्हणताना चौऱ्याहत्तर वर्षांच्या अटलविहारी वाजपेयींचा गळा भरून येत आहे आणि डोळयांतून स्फुल्लिंग बाहेर पडत आहेत. असा भास होतो आणि श्रोत्यांच्याही मनात राष्ट्रभक्तीची एक प्रचंड लाट उसळून जाते, "देशाकरिता मरण्यासाठी कोण तयार आहे त्याने पुढे यावे." असे आवाहन केले तर लक्षावधी लोक त्याक्षणी तरी सहर्ष पुढे येतील. अशी ही राष्ट्रभक्तीची

प्रभावी भावना गरीब देशांत सापडते.

सगळया देशाची फाळणी झाली. फाळणी झाली तो देशही इंग्रजांच्या साम्राज्यवादामुळे एका राजकीय छत्राखाली आलेला. इतिहासात इंग्रजी अंमलाखालील हिंदुस्थानसारखा देश एक अंमलाखाली कधीच नव्हता. पूर्वापारचा इतिहास पाहू गेले तर वायव्येस अफगाणिस्तानापासून तो अग्नेयेस बळीच्या बेटापर्यंत हिंदुस्थानच्या संस्कृतीची सलगता सापडते हे खरे; पण हिंदुस्थानचा राजकीय नकाशा म्हणतात तो इंग्रजांनी तयार केला. अनेकांच्या मनात भारतमातेचे असे एक मोठे सुंदर चित्र असते. काश्मिरात विपुल केशसंभार मंडित मुख. गंगायमुनेचे असे एक मोठे सुंदर चित्र असते. काश्मिरात विपुल केशसंभार मंडित मुख, गंगायमुनेच्या प्रदेशाचे बक्षस्थल, कच्छ आणि बंगालचे उजवेडावे बाहू आणि रामेश्वरी पदकमले असे चित्र अनेक कॅलेंडरवाल्यांनी काढले आहे.

"जिचे पदकपीठ हे जन म्हणोत लंकारिते
सुवर्णकलशापरी पदतले अलंकारिते।।"

असले वर्णन अनेक कवीनी रंगविले आहे.

हिंदुस्थानच्या प्रतिमेशी काही आकृतिबंधात उभ्या माणसाच्या प्रतिमेशी काही सादृश्य आहे. बाकी बहुतेक देशांचे आकार लोळागोळाच असतात. तेथील कवी राष्ट्रमातेचे चित्र कसे रंगवितात कोणास ठाऊक! ऑस्ट्रेलिया तर मला उलटा टांगलेल्या डुकराच्या आकाराचा वाटतो. इंग्लिश लोक.

"ब्रिटानिया राज्यकरी समुद्रलाटांवरी,
तुझे पुत्र न मानतिल कधी गुलामगिरी"

असे अभिमानाने म्हणतात, ब्रिटानियाचे चित्रही कधी कधी पहायला मिळते; पण तिला ब्रिटिश बेटांच्या भौगोलिक आकाराच्या गोणपाटात बळजबरीने बसविण्याचा प्रयत्नही कोणी करत नाही. भारतमातेची चित्र खोल रुजण्यात नकाशाच्या आकृतिबंध इंग्रजांनी जमविला आहे; इतिहासाने नाही. त्याचीही फाळणी, लक्षावधी लोक निर्वासित झाले, दोनचार जिल्हे इकडचे तिकडे झाल्याने इतिहासाला किंवा संस्कृतीला काही तडा जाणार आहे असे नाही. विशेषत: त्या प्रदेशातील नागरिकांची एकत्र राहण्याची इच्छा नसेल तर त्यांना बळजबरीने कोंडून ठेवण्यात शहाणपणा नाही, देशभक्ती नाही आणि व्यवहारीपणा तर त्याहून नाही.

स्वयंनिर्णयाचे तत्त्व एकदा मान्य केले असते तर बेळगावपासून काश्मिरपर्यंत सगळे प्रश्न सुटण्याला काहीच अडचण आली नसती. अशी उदारमतवादी भूमिका घेतली असती तर कोणत्याही सार्वमताचा निर्णय आपल्याविरुद्ध गेला

नसता. ज्याला बाहेर जायचे असेल त्याला दार उघडे आहे अशी स्पष्ट भूमिका असली की, बाहेर जाण्याची खळखळ फारशी कोणी करीत नाही. दरवाजा बंद आहे असे दिसले की, बंदीच्या मुठी दरवाजावर आदळू लागतात.

समजा, सार्वमताचा निर्णय आपल्या विरुद्ध गेला असता, काश्मिर वेगळे झाले असते किंवा पाकिस्तानात गेले असते; काय झाले असते? असल्या समस्यांचा बोजा राहिला नसता तर जागतिक राजकारणात हिंदुस्थानची प्रतिमा उज्ज्वल तर झाली असतीच; पण त्यापलीकडे आपण संपन्नेतेच्या दिशेने झपाट्याने आगेकूच करीत राहिलो असतो. महायुद्धात उद्ध्वस्त झालेला पश्चिम जर्मनी तीन दशकांत वैभवाच्या शिखराला पोहोचला. तेथील राहणीमान, रोजगाराच्या संधी आणि स्वातंत्र्याच्या कक्षा लक्षात आल्यावर पूर्व जर्मनीच्या नागरिकांच्या मनातील विभक्त राहण्याचा हट्ट वितळून गेला. सारा राग, द्वेष सोडून पूर्व जर्मनी पश्चिमेतील भावांबरोबर नांदायला तयार झाला.

संपन्न घरातून वेगळे कोणीच पडू इच्छित नाही. हिंदुस्थानात देशापासून किंवा राज्यापासून वेगळे होऊन स्वतंत्र चूल घालण्याचा खटाटोप चळवळी, आंदोलनाने सर्व दूर होत आहेत. अमेरिकेत अशी एकही चळवळ नाही. उलट, अमेरिकेतील नवे राष्ट्रे आनंदाने तयार होती. दरिद्री भारतात भावंडांना मारूनमुटकून बळजबरीने कोंडून घरात ठेवण्याऐवजी त्यांना मोकळे केले असते, गृहकलह संपविला असता आणि उरलेला हिंदुस्थान बलसागर झाला असता तर, फुटून गेलेले भाऊसुद्धा पुन्हा एकदा हिंदुस्थानात सामील होण्याकरिता आनंदाने तयार झाले असते.

ही समजसपणाची बुद्धी श्रीमंतांना सुचते, गरीबांना क्वचित! हा काय प्रकार आहे? हे असे का होते? याचे एक कारण सहज समजण्यासारखे आहे. विकसित देशांत माणसांचे, समाजाचे आणि राष्ट्राचे हिशेब शुद्ध आकड्यांचे असतात. अधिकाधिक सुखाने जगावे, अनुभवाचे विश्व व्यापक करावे असा त्यांचा शुद्ध स्वार्थी विचार असतो. व्यापारी मंडळी देवघेव करायला तयार असतात; एखाद्या व्यवहारात घाटा आला तरी चालेल, पुढे कसर भरून काढू असा विचार करतात. कारकून असलो म्हणून काय झाले. साहेबाला फाडकन सांगितले आणि राजीनामा टाकून मोकळा झालो. असली बाणेदार तडफ हिशोबी माणसे दाखवीत नाहीत. आपला स्वार्थ साधायचा तर त्यात इतरांच्याही स्वार्थाची सोय झाली पाहिजे याची व्यवहारी जाणीव त्यांना असते, आपला फायदातोटा, इतरांचा कायदातोटा याचे, पैशाच्या रूपात का होईना, मोजमाप करण्याची

फूटपट्टी असली म्हणजे आक्रस्ताळीपणाचे निर्णय नाहीत.

पारमार्थिकांचे, धर्मवाद्यांचे, समाजवाद्यांचे किंवा इतर साऱ्या 'निःस्वार्थ' जीवन आदर्शांच्या लोकांची परिस्थिती वेगळी असते. कोणाला साक्षात जगन्नियंत्या परमेश्वराकडूनच 'कुणी कसे चालावे, कुणी कसे बोलावे.' यासंबंधी आदेश मिळालेले असतात. कोणाला एखाद्या सारग्रंथाने, कुराणाने, बायबलने झपाटलेले असते. आपलं जीवन हा काही वैश्विक सत्तेच्या किंवा इतिहासाच्या हेतूपूर्ततेकरिता आहे; आपली म्हणून काही तत्त्वे आहे आणि त्या तत्त्वांबाबत तरडजोड पैशाच्या राशी ओतल्या तरी होणार नाही असा काहीसा त्यांचा विचार असतो. ईश्वरी आदेशाचे मोल काय? मार्क्सच्या उकतीची किमत काय? आकडेवारी जमत नसली की, अशा तत्त्वांसाठी लोक बेहिशेबी लढाया करण्यास तयार होतात. 'शिर कटेल, पण वाकणार नाही.' अशी 'सरफरोशी की तमन्ना' अंगअंगातून सळसळू लागते. अल्लाचे नाव घ्यावे आणि खुशाल खंड खंड लूटमार, जाळपोळ, कत्तली, बलात्कार करावे आणि यामागे अल्लाचाच आदेश आहे असे मानावे हे इतिहासात वारंवार घडले आहे. बौद्धांनी केले आहे, ख्रिश्चन, मुसलमान, समाजवादी या साऱ्यांनीच एका हातात आपापले 'कुराण' आणि दुसऱ्या हातात तलवार घेऊन राक्षसी विद्ध्वंस केले आहेत. स्वार्थभावनेचा कोणी कितीही उपहास करो. निदा करो; कोणाही स्वार्थी माणसाने आपल्या स्थार्थासाठी धार्मिक आणि समाजवादी यांच्या तुलनेने सहस्त्रांशही विद्ध्वंस केलेला नाही.

संपन्न देश आणि संपन्न लोक आकाशाला गवसणी घालणाऱ्या वावदूक तत्त्वज्ञानाला आटोक्यात ठेवतात, चर्चमध्ये जातात, अनुभवाची ती छटा महत्त्वाचीही मानतात; पण 'देवाचे नाणे देवाला, राजाचे राजाला' असा विवेकही करतात. निर्णय घेण्यासाठी काही निश्चित फूटपट्टी ठरली की, निर्णय घेणे सोपे होते. हिशेबाने होते; प्रलयंकारी होत नाही, प्रत्यक्ष परिणाम पाहू गेले तर ईश्वर, परमार्थ आणि करुणा यांचा जप करणारांनीच महापातके केली आणि आपल्या संसारासाठी धडपड करण्याऱ्यांनी परमोच्च नैतिकता दाखवीली असे म्हणावे लागेल. मग, ही सांसारिक नैतिकता गरीब समाजात अभावानेच का आढळावी? खरे म्हटले तर, गरीबांनाच जीवनमान उंचावण्याची, शिकण्याची, औषधपाण्याची गरज असते. व्यवहारी हिशेबांपणा त्यांना अधिक सहजपणे सुचला पाहिजे; पण असे होत नाही.

बेहिशेबी परमार्थ हे प्रगतीचे लक्षण नाही. माकडातून नुकत्याच उत्क्रांत झालेल्या मानवप्राण्याच्या अवस्थेशी सुसंगत असलेली ती मनोधारणा आहे.

आपल्या उत्क्रांत इंद्रियांच्या आणि बुद्धीच्या साहाय्यानेमाणूस जितकी प्रगती करतो तितका तो अमूर्त कल्पना आणि आदर्श यांच्या कचाट्यातून सुटत जातो. चांगले रहावे, अधिक शिकावे इंद्रियांची व्यापकता वाढवावी या इच्छा आणि भुका त्यांची पूर्तता केल्याने वाढत जातात; त्यांची गाडी लागावी लागते. आहार, निद्रा भय आणि मैथुन यांची आवड पुरवावी तशी वाढते. तसेच, स्वातंत्र्याच्या कक्षांची तहानही जितकी भागवावी तितकी वाढते. गरीब विकसित देश वाढत्या स्वातंत्र्याच्या चक्रात स्वतःला लोटून देतात.

मुंबईला गिरण्या सुरू झाल्या त्याकाळी बहुसंख्य मजूर कोकणातून, देशावरून आलेले असते; शेतीवर जगता न आल्यामुळे मुंबईला निर्वासित होऊन आलेले; गिरणीत नोकरी करून दोन पैसे जमले की, आपण आपल्या शेतीवर परत जायचे आहे असा ध्यास मनाशी बाळगणारे; निदानपक्षी, आपण नोकरी करीत राहवे आणि शेतीवरल्या माणसांकडे मनी ऑर्डर पाठवून शेती चालत ठेवावी आणि गौरी, गणपती, दिवाळी, आंब्यांचा मोसम – जितके दिवस गावाकडे काढता येतील तितके काढावे अशा बुद्धीचे; मुंबईत कोणत्यातरी पत्र्याच्या किंवा सिमेंटच्या चाळीत पाठीला पाठ लावून झोपण्यापुरती जागा असती की, पुरे झाले. तेथे बऱ्यापैकी बस्तान बसावावे, कुटुंबाला आणावे, सुखाने जगावे असा स्वार्थी विचार त्यांच्या मनाला शिवतही नसे. बोनस किंवा इतर वरकड कमाई झाली तर त्याचा उपयोग मुंबईतील जगणे सुधारण्यासाठी कधी व्हायचा नाही. बिडीचे एखादे किंवा क्वचितप्रसंगी थोडी बाटली यापलीकडे चैनशौक म्हणून नाही. ज्यादा पैसे हाती आले की 'वाल्या' मंडळी बोट भरून कोकणात रवाना. कामगारी अभावी गिरण्या बंद ठेवायची वेळ येई. काळ गेला. नवनवीन पिढ्या मुंबईत काम करू लागल्या. त्यांची गावाशी आतड्याची गुंतवणूक कमी कमी होत गेली. कुटुंबे मुंबईत स्थायिक होऊ लागले तेव्हा कोठे मुंबईकर कामगारांची जीवनमान सुधारण्याची धडपड सुरू झाली. जुन्या गावातील रहिवाशांच्या वसाहती सलगपणे मुंबईत उभ्या राहिल्या आहेत. अमुक झोपडपट्टीतला अमुक कोपरा म्हणजे रत्नांग्रीच्या खानवली जवळील आडिवरे ग्रामस्थांचा! तेवढ्या कोपऱ्यात गावचा गणपती वेगळा होणार, भजनीमंडळ वेगळे होणार, अजूनही गाव हे महत्त्वाचे एकक आहे; पण सगहेच गाचकरी समोर असल्यामुळे जरा चांगले रहावे याची गोडीही वाढत आहे. अर्थकारण हे त्यांच्या जीवनाचे सूत्र अजून झालेले नाही. रोजगार मिळेनासा झाला की विकासाच्या आर्थिक वाटा समजून घेण्याचे त्यांच्या मनातही येत नाही. जगण्याची शैली

सामूहिक, टीळीची; त्यामुळे, कोणत्याही अडचणीच्या दोषाचे खापर दुसऱ्या एखाद्या जनसमूहावर फोडण्याची प्रवृती, त्यांचा राग कधी मद्राशांवर, कधी गुजराथ्यांवर, कधी मुसलमानावर फिरवणारे नेते मिळाले की प्राणपणाने झुंजायला ही मंडळी तयार.

याउलट, अमेरिकेसारख्या संपन्न देशात अगदी श्रीमंत बापाची लाडकी लेक हातखर्चासाठी भरपूर पैसे मिळत असले तरीदेखील फावल्या वेळात अगदी हॉटेलात कपबशा धुण्याचेदेखील काम करून चार पैसे वर मिळविण्यात कमीपणा मानीत नाही. चांगले जगणे आणि स्वातंत्र्य उपभोगणे यांची गोडी लागत नाही ते जगतात. 'आहारनिद्राभयमैथुना'च्या क्रात, उच्च उच्च परमार्थाच्या कल्पना बाळगीत आणि झुंजीसाठी सोडलेल्या कोंबड्या आणि टकरीसाठी सोडलेल्या रेड्याबैलांप्रमाणे मरण येईपर्यंत झुंजत. निरर्थक झुंजत राहणे हा जनावरांचा गुण आहे. आपण कशाकरता लढतो आहोत असा विवेक करून झुंजीतील प्राणी झगडायचे थांबून झुंज पहायला जमलेल्या गर्दीकडे कुतुहलाने पाहत बसले आहेत असे झाल्याचे काही कधी ऐकिवात नाही.

संपन्न आणि विपन्न देशातील लोकांच्या मनोधारणांत फरक असण्याचे एक कारण त्यांच्या खाण्यापिण्यातील फरक, हेही असू शकते. युरोप खंडात सर्वत्र कडव्या कॅथॉलिक पोपची अधिसत्ता शतकानुशतके चालत होती. मार्टिन ल्यूथरने प्रोटेस्टंट धर्माची स्थापना केली. परमेश्वर मानणाऱ्या पण पोपची मध्यस्थी नाकारण्याच्या अधिक खुल्या दृष्टीकोनाच्या प्रोटेस्टंट बंडाचा प्रसार झपाट्याने युरोपभर झाला. अतिथंडीचे स्वीडन, नॉर्वे, डेन्मार्क, जर्मनी, बेल्जियम - सारे प्रोटेस्टंट बनले. इंग्लंडध्ये राजालाच श्रेष्ठ धर्मगुरु मानणारा पंथ निघाला. गंमत अशी की, स्पेन, आयर्लंड, दक्षिण फ्रान्स, इटली या देशात मात्र पोपच्या अधिसत्तेला धक्का लागला नाही. हे दक्षिणेकडील सारे प्रदेश अधिक उष्ण हवामानाचे. मुख्य व्यवसाय शेतीचा, राहणीमान निकृष्ट. वर्षातील अनेक महिने मुख्य अन्न बटाटे म्हणजेच पिष्टमय पदार्थ, आहारात प्रथिनांचे प्राधान्य असलेल्या उत्तर युरोपात ज्ञानकर्ममार्ग फोफावला आणि दक्षिणेत मात्र पोपवार श्रद्धा बाळगणाऱ्यांची चलती राहिली. निकृष्ट असंतुलित आहारामुळे माणसाची जिद्द कमी होते, तो अधिकाधिक श्रद्धाळू बनतो याचा अनुभ्व आपल्याकडेही आहे. उपासतापास केल्याने सात्विकता वाढते. धर्मप्रवृत्ती वाढते असे आपण मानतोच. बालविधवांचे पाऊल वाकडे पडू नये यासाठी त्यांनादेखील निकृष्ट, निकस आहारावर जगविण्याची ब्राह्मण कुटुंबात पद्धत होतीच. जीवनाविषयी सकारात्मक

बुद्धी असली म्हणजे अतिरेकीपणाला आळा बसतो. बुद्धी सकारात्मक बनण्याच्या मार्गात गरीबी हा मोठा अडथळा होऊ शकतो.

जगातील बहुतेक संपन्न देश हे थंड हवामानाचे आहेत. याउलट, बहुतेक गरीब देश उष्ण कटिबंधात आहेत. उष्ण प्रदेशात माणसाच्या गरजा तशा थोड्या असतात. शरीराला उष्मांक फारसे पुरवावे लागत नाहीत. कपडालता, अंथरूणपांघरून जुजबी असते तरी चालते. आकाशाखाली झोपावे, भाकरीवर संतुष्ट व्हावे हे उष्ण प्रदेशात शक्य असते, एवढेच नव्हे तर सुखकारकही असते. थंड प्रदेशात असे जगताच येत नाही. थंडीच्या कडाक्यात पुरेसे उष्मांक मिळाले नाही. जीव वाचविण्यासाठी का होईना, राहणीमान सुधारण्याची आणि जीवनाविषयी सकारात्मक, व्यवहारी हिशोबी भूमिका घेणे भाग पडते.

आणि शेवटी, सर्वांत महत्त्वाचा मुद्दा. संपन्न समाज आणि लोक वर्तमान काळात जगतात, भविष्याकडे डोळे लावून जगतात. दरिद्री समाज आणि माणसे भूतकाळाकडे मागे पहात दिवस काढतात आणि जुन्या काळात कधी तरी संपन्न असलेल्या आपल्या पूर्वजांच्या पराक्रमाचे, थोरवीचे आणि वैभवाचे वर्णन आठवतात; अशा थोर पूर्वजांचे आपण वंशज, तेव्हा 'पूर्व दिव्य ज्यांचे त्यांना, भावी रम्य काल' अशा श्रद्धेने इतिहास 'चक्रनेमिक्रमाने' आपल्यावर फिरून एकदा बहाल होण्याची वाट पाहत राहातात.

कर्णाला पौरुषाचा अभिमान होता. म्हणून सारथी कुळात जन्मल्याच्या आरोपाचा त्याला फारसा विषाद वाटत नव्हता; पण वर्तमानळात ज्यांची बुद्धी, शक्ती, धाडस कमी पडते त्यांनी जागवे कसे? आपण सर्वच तऱ्हांनी नादान ठरलो आहोत आशा नाही, वर्तमानातही काही स्थान नाही. अशांना भूतकाळाकडे नजर फिरविण्यापलीकडे काही विकल्पच रहात नाही. आम्ही असेही असू पण आमचे पूर्वज थोर, आमचे बीज श्रेष्ठ आहे, आम्ही थोर जातीचे, थोर धर्माचे, आमच्या मातृभाषेसारखी भाषा नाही, आमच्या साहिल्यासारखे साहित्य नाही, खरेखरं थोर संत झाले ते येथेच, आमच्या राजासारखे राजे कोठे झाले नाहीत. असे स्वप्न रंजन हा एकच आशेचा तंतू रहातो. या तंतूला प्राणपलीकडे जपावे लागते. हा धागाही तुटला तर मग सगळा अंध:कारच. पौरुषहीनांचे इतिहासप्रेम ही त्यांच्या ठेचल्या गेलेल्या अहंकाराची मलमपट्टी असते.

गावागावातील शेतकरी एकमेकांशी भांडणे तंडत तंडत विनाशाकडे घसरत जातात. एमेकांतील किरकोळ वाद लढत लढत समाज आणि राष्ट्रे घसरत अध:पाताकडे जातात. सकारात्मक बुद्धी नाही म्हणून समंजसपणा दाखविता

येत नाही आणि सामंजस्य नाही म्हणून सकारात्मक बुद्धी येत नाही, अशा मोठ्या दुष्ट चक्रात गरीब देश आणि लोक सापडतात आणि शतमुखांनी विवेकभ्रष्टांचा अधःपात चालू रहातो. अनादि काळापासून शतमुखांनी वाहणाऱ्या काबेरी, गोदावरी, गंगा, यमुना हे सारे विषण्ण मनाने हताशपणे युगानुयुगे पहात राहतात.

*(२१ ऑगस्ट १९९८)*

◆◆

# स्वदेशीची तिसरी लढाई

## प्रास्ताविक

'स्वदेशीची तिसरी लढाई' असा आजचा विषय आहे. 'लढाई' हा शब्द मी जाणीवपूर्वक वापरला आहे. 'स्वदेशी' या विषयावर बोलताना दोन्ही पक्षाची माणसं अटीतटीवर येऊन तंडतात. आपल्याशी ज्याचं एकमत होत नसेल तो मनुष्य एकतर देशद्रोही आहे किंवा आणखी काही आहे असं समजून मोठी कठोर भाषा वापरतात, शिवीगाळ करतात. आपल्या मताशी याचं जुळत नाही म्हणजे हा धर्मवादी असेल, राष्ट्रवादी असेल, डाव्या विचाराचा असेल असे अरोप होतात किंवा दुसऱ्या बाजूने हा 'मल्टिनॅशनल्स्‌चा भाडोत्री कुत्रा' अशा डाव्या लोकांच्या जुन्या परंपरेतल्या शिव्या पारल्या जातात. फार कडक तऱ्हेने एकमेकांवर आरापप्रत्यारोपांच्या फैरी झाडल्या जातात. खरोखरची जीवघेणी, हमरीतुमरीची लढाईच चाचली आहे. देश धोक्यात आहे. फंद फितुरी माजली आहे; पण या लढाईत एक मोठी गमतीची गोष्ट होऊन राहिली आहे.

'स्वदेशी' म्हणजे लोकांनी परदेशी वस्तूंचा उपयोग आपणहून टाळणे. जी माणसं आज स्वदेशाचा आग्रह धरतात त्यांच्या दृष्टीने स्वदेशीचा अर्थ वेगळा असतो; एवढा मर्यादित नसतो. गाधीजींच्या वेळी स्वदेशी वस्तू वापराव्या, खादी वारावी, स्वदेशी वस्तू वापरावी. वर्तमानकाळातील 'स्वदेशी'ची व्याख्या अशी नाही. गांधींच्याही आधी लोकमान्य टिळक आणि स्वातंत्र्यवीर सावरकर इत्यादी लोकांनी विलायती कापडाच्या होळया केल्या, स्वतःच्या अंगावरचे कपडे काढून होळयांत टाकले. आधुनिक स्वदेशीवाल्यांचा स्वदेशीचा अर्थ सावरकर-टिळकांसारखाही नाही. सरकारने परदेशातून येणारा माल कायद्याने थांबवावा किंवा त्यावर आयात कर लादावे, बंदी घालावी असा कायद्याच्या आधाराने लोकांवर स्वदेशी थोपण्याचा हा आजचा विचार आहे. त्याला मी

'स्वदेशीवाद' म्हणतो.

लोकांनी आपणहून ठरवलं की, परदेशी माल वापरायचा म्हणून नाही, तर त्याबद्दल वाद होण्याचे काही कारणच नाही. ती उत्तमच गोष्ट आहे, अनेक देशातील लोक तसं वागतातही. इंग्लंडमध्ये मोटार गाड्यांच्या बंपर्सवर लिहिलेलं आढळतं 'Be British, Buy British' तसं, भारतातील लोकांनी 'भारतीयत्वाचा अभिमान ठेवा आणि भारतीय वस्तूच खरीदा.' अशी शिक्षणाची आणि प्रचाराची आघाडी उघडली तर त्याबद्दल वाद घालण्याचा प्रश्न येणार नाही. कायद्याने, सक्तीने किंवा आर्थिक हत्यारे वापरून जेव्हा परदेशी आयात थोपविण्याची कार्यवाही मागितली जाते तेव्हा स्वदेशीच्या एका नवीन लढाईला सुरुवात होते.

दुसरा गमतीचा भाग असा – जी पंडळी स्वदेशी पाहिजे किंवा खुलेपणा नको, जागतिकीकरण नको, खुली बाजारपेठे नको असं म्हणतात तीच मंडळी सत्तेवर आली की चोवीस तासांच्या आत म्हणजे एकाच रात्रीनंतर त्यांचे विचार पालटतात. ही काय गंमत आहे? पहिला अनुभव आला देवेगौडांचा. त्यांच्याशी मी बोललो होतो. त्यांनी फार कडक शब्दात माझ्या, खुल्या बाजारपेठेच्या विचारांवर टीका केली होती; खुल्या व्यवस्थेत शेतकऱ्यांचं फार प्रचंड नुकसान होणार आहे असं ते त्यावेळी म्हणाले होते. आमच्या वादाचा काही निकाल नाही लागला; पण नंतर, देवेगौडा कर्नाटकाचे मुख्यमंत्री झाले आणि दुसरे दिवशी पहाटे त्यांनी लगेच खुल्या व्यवस्थेच्या फायद्यांबद्दल बोलायला सुरुवात केली. सगळे डावे पक्ष स्वदेशीच्या पुरस्कार करतात. स्वदेशीच्या मंचावर कधी न घडलेली एकी घडून येते. या मंचावर भारतीय जनता पार्टीच्या 'स्वदेशी जागरण मंच'चे लोक सापडतात, डाव्या चळवळीचेही लोक सापडतात, डाव्या चळवळीचेही लोक सापडतात आणि गांधीवादी सर्व सेवा संघाचेही लोक सापडतात; त्याचबरोबर ज्यांना दुसरं काही काम नाही असे 'हौसे नवशे गवशे' लोकही तिथं सापडतात; पण डाव्यांचा जागतिकीकरणाला किंवा खुलीकरणाला विरोध तसा नवीन आहे. जेव्हा समाजवादी रशिया जिवंत होता तेव्हा ही सर्व मंडळी 'राष्ट्र' या कल्पनेची चेष्टा करीत असत; एवढंच नव्हे तर कामगारांची आंतरराष्ट्रीय सत्ता तयार व्हावी अशी मुख्यत: त्यांची मांडणी असे. समाजवादी रशियाचा डोलारा कोसळला आणि आपल्याकडील डाव्यांच्या मनात लगेच परिवर्तन झाले आणि त्यांनी '(समाजवादी) आंतरराष्ट्रीय वाद' तात्काळ सोडून दिला; ते एकदम निष्ठावान राष्ट्रवादी बनले; 'आंतरराष्ट्रीयवाद किंवा खुलेपणा म्हणजे भांडवलदारी कारस्थान' असे घोकू लागले.

"खुल्या बाजारपेठेच्या व्यवस्थेचा स्वीकार न करता आपल्या देशामध्ये स्वदेशीच्या भिंती बांधून रहाणं आवश्यक आहे." असं ते म्हणू लागले. 'गोदरेज'चं संरक्षण व्हावं असं जॉर्ज फर्नांडिस म्हणू लागले. ज्या कारखानदारांविरुद्ध ही मंडळी संप करत, शिव्यागाळ करीत असत त्या कारखानदारांची मक्तेदारी संपणार, त्यांना स्पर्धेला तोंड दणे अशक्य होणार, खुलीकरणामुळे त्यांचा तोटा होणार हे दिसू लागताच ती मंडळी 'गोदरेजचा तोटा म्हणजे देशाचा तोटा' अशा तऱ्हेने बोलू लागली; पण ज्योति बसूंसारखे जे सत्तेवर आहेत ते मात्र परदेशी वाऱ्या करून आपल्या राज्यामध्ये परदेशातून जास्तीत जास्त प्रयत्न करतात. देवेगौडा नंतर पंतप्रधान झाले. केंद्रातसुद्धा त्यांनी त्यांचा जुना स्वदेशीवाद टाकून, समाजवाद, नियोजनव्यवस्था या कल्पना टाकून खुलेपणाचा आग्रह सुरू केला. दोन वर्षांपूर्वी 'स्वदेशी' विषयावर टेलिविजनवर एक मोठा परिसंवाद झाला. एका बाजूला 'स्वदेशी जागरण मंच'चे लोक होते, दुसऱ्या बाजूला मी आणि माझे काही मित्र होतो. 'स्वदेशी जागरण मंचा'मध्ये प्रामुख्याने भारतीय जनता पार्टीचे लोक आहेत; काही त्यांच्या जवळपासचे आहेत. त्यांनी फारच कडवेपणाने आपली भूमिका मांडली. पूर्वी ते जितक्या कडवेपणाने मुसलमानांविषयी बोलत तसेच ते 'मल्टिनॅशनल्स्' विषयी बोलत असतात. तशी ही मंडळी मोठी निष्ठावान असतात! कोणतं का तत्त्व असेना, त्या तत्त्वावर श्रद्धा असेल आणि त्याप्रमाणे कोणी वागू लागलं तर त्याला कोण कशाला हरकत घेईल? जर का त्यांच्या स्वदेशीच्या तत्त्वाप्रमाणे त्यांनी आचरण केलं आणि त्याने देशाचा फायदा झाला तर त्यांचे म्हणणं सारा देश मानेल. "अटलबिहारी वाजपेयी, लालकृष्ण अडवानी ही तत्त्वाला धरून राहणारी माणसे आहेत." अशी त्यांचेच शिष्य वाहवा करीत असतात. ते सत्तेवर आले आणि पहिले तीस दिवस त्यांनी आपलं 'स्वदेशी' विषयीचं मत बदलल्याचं दिसू दिलं नाही. याबद्दल त्यांना मानलं पाहिजे; पण त्यानंतर वित्तमंत्री यशवंत सिन्हा, प्रधानमंत्री यांनी आपली भाषा झपाट्याने बदलायला सुरुवात केली.

आज परिस्थिती अशी की पूर्वी मनमोहनसिंग जे बोलत असत ते आता यशवंत सिन्हा बोलतात आणि ते आता सत्तेत राहिले नाही ते मनमोहनसिंग मात्र उलटं बोलू लागले आहेत, पंचमढीच्या शिबिरात पहिलं उद्दिष्ट जाहिरच करून टाकले की, आमचं पहिलं उद्दिष्ट 'समाजवादी व्यवस्था' पुन्हा आणणे हे राहिल आणि इकडे यशवंत सिन्हा म्हणत आहेत की, खुलीकरण जास्तीत जास्त वेगाने पुढे नेणे यासाठी आम्ही प्रतिज्ञाबद्ध आहोत.

तेव्हा, स्वदेशीच्या या तिसऱ्या लढाईतला महत्त्वाचा आणि गंमतीचा भाग म्हणजे या लढाईत या पक्षातील कोण आणि त्या पक्षातील कोण हे सांगणं कठीण आहे. शेतकरी संघटना ही एकटीच तत्त्वाला धरून राहणारी ठरली. ज्यावेळी रशियाचा समाजवाद आणि नेहरूंचा समाजवाद याला पर्याय नाही असं म्हटलं जायचं त्या वेळेपासून समाजवादाचा विनाश अटळ आहे हे ठामपणे संघटना मांडत आलेली आहे आणि अजूनही या मांडणीवर अटळ आहे.

या लढाईत एक तिसरी मोठी विचित्र गोष्ट आहे. आजचे स्वदेशवाले गांधीजींच्या स्वदेशी आंदोलनाच्या काळात स्वदेशीची आणि खादीच्या कार्यक्रमाची कुचेष्टा करीत असत. स्वदेशीच्या तीन लढायांबद्दल बोलण्याआधी आणखी एक मुद्दा मांडणे आवश्यक आहे. हा मुद्दा प्रथम जोतिबा फुल्यांनी मांडला. जेव्हा राष्ट्रीय काँग्रेसची स्थापना झाली तेव्हा जोतिबांनी एक प्रश्न विचारला, ''तुम्ही 'राष्ट्रीय काँग्रेस' स्थापन करता आहात; पण हे 'राष्ट्र' कुठे आहे? 'राष्ट्र' याचा अर्थ 'एकमय लोक' हिंदुस्थान तर जातीजातींमध्ये विभागला आहे. सवर्ण बहुजन समाजाला तुच्छ मानतात. ज्ञानाची सर्व मक्तेदारी सवर्णांच्या हाती आहे आणि आत्ताच आपण अश पेशावाईतून बाहेर निघालो आहोत की, जेथे एखादा 'महारा'चा मुलगा थुंकी टाकण्यासाठी गळयात मडकं न बांधता पुण्यात गेला किंवा आपल्या सावलीने शहर अपवित्र होऊ नये म्हणून मागे केरसुणी बांधल्याविना गेला तर त्याचं मुंडकं गुलटेकडीच्या मैदानावर उडवलं जात असे. मग, कोणत्या 'राष्ट्रा'करिता स्वातंत्र्य मागता आहोत?'' आपण आता जेव्हा स्वदेशी म्हणजे आपल्या स्वतःच्या देशात तयार झालेली वस्तू असे म्हणतो तेव्हा त्याची व्याख्या थोडी व्यवस्थित करणं आवश्यक आहे.

स्वदेशीचा वाद ज्या ज्या देशात झाला तिथे तिथे देशातल्या दोन प्रकारच्या समाजांमध्ये आणि आर्थिक हितसंबंधाच्या लोकांमध्ये वाद झाला. इंग्लंडमध्ये जेव्हा कारखानदारीची वाढ झालेली नव्हती तेव्हा इंग्लंडमधल्या मालाला संरक्षण द्यावं, परदेशी मालाची आयात होऊ देऊ नये अशा तऱ्हेचा व्यापारी सिद्धांत (Mercantilism) तिथं मांडला जात असे. पुढे इंग्लंडची जसजशी प्रगती होत गेली आणि औद्योगिक क्रांती झाली आणि जर्मनी, फ्रान्स किंवा यूरोपमधील देशांच्या तुलनेने कारखानदारी मालामध्ये आपण वरचढ झालो असं त्यांच्या लक्षात आलं तेव्हा ॲडम स्मिथचं खुलेपणाचं तत्त्व मान्यता पावलं. त्यावेळी नेमकं उलटं जर्मनी आणि फ्रान्समध्ये घडलं. तेथील लोक खुलेपणाला विरोध

करू लागले. याचा अर्थ असा की, ज्यांना खुलपण सोयीस्कर वाटतो ते खुलेपणाचा पुरस्कार करतात. ज्यांना खुलेपण आणि स्पर्धा गैरसोयीची वाटते ते विरोध करतात.

हे साहजिकच आहे. माणसं काही तत्त्वांनी चालत नाहीत. 'स्वातंत्र्य' या कल्पनेला माझी निष्ठा वाहिलेली आहे. म्हणून, मी जरी भुकेने मेलो तरी चालेल; पण खुल्या व्यवस्थेला पाठिंबा देईन. असं म्हणणारा माझ्यासारखा पागल एखादाच असतो. बहुतेक माणसं विचार असा करतात की, "या खुलेपणातून आपल्याला काही मिळणार आहे का, कामगाराचं काही भलं होणार आहे का? शेतकऱ्याला काही फायदा मिळणार आहे का, कामगाराचं काही भलं होणार आहे का? देशाला काही फायदा होणार आहे का?" जो तो असा विचार करतो आणि जिथं ज्याचा फायदा असेल त्याप्रमाणे तो आपापली भूमिका घेतो.

हे त्यावेळी खरं होतं, आजही खरं आहे, जागतिक व्यापार संघटनेच्या (WTO)च्या किंवा इतर आंतरराष्ट्रीय संघटनांच्या ज्या काही बैठका भरतात त्या बैठकांमध्ये वेगवेगळया राष्ट्रांचे मान्यवर प्रतिनिधी भाषण करायला उठून उभे राहिले की, पटकन समजतं की, "हा असं का बोलतो?" कारण, त्यात त्याच्या देशाचं हित आहे.

हिंदुस्थानसारख्या देशांमध्ये एक वेगळी परिस्थिती तयार होते. इंग्लंडमध्ये औद्योगिक क्रांती झाली त्याचे फायदे थोड्यावर फरकाने सर्वदूर समाजाच्या सर्व थरांपर्यंत पसरले. याउलट, फ्रान्समध्ये जेव्हा औद्योगिक क्रांती झाली नव्हती तेव्हा पॅरिस शहर सोडलं तर सर्वत्र मागासलेपण होतं. हिंदुस्थान हा एक विशेष देश आहे. येथे खुली व्यवस्था म्हटली तर एका गटाा फायदा होतो आणि बंदिस्त किंवा स्वदेशी व्यवस्था म्हटली तर दुसऱ्या गटाचा फायदा होतो. दोन गट वेगवेगळे आहेत आणि त्यांच्यातील वाद हे फार जुन्या काळापासून चालू आहेत.

स्वदेशीच्या पहिल्या, दुसऱ्या आणि तिसऱ्या लढाईच्या विश्लेषणाआधी, त्यासारखी एक लहानशी चकमक झाली होती. त्याची आधी आठवण करून देतो. इथं इंग्रज असतानासुद्धा रुपयाचा विनिमय दर एक शिलिंग चार पेन्स असावा का एक शिलिंग सहा पेन्स असावा याबद्दल मोठा वाद चालत असे. त्याहीवेळी कारखानदार मंडळी रुपया जास्त महाग असावा म्हणजे परदेशातून यंत्रसामुग्री आणायला त्यातल्या त्यात स्वस्त पडेल असं मांडत असत. याउलट मांडणी कापसाची निर्यात करणारे शेतकरी विदर्भाले, हरियाणा पंजाबमधले

आणि कच्चा मालाची निर्यात करणारे करीत, ''रुपयाचे मूल्य योग्य ठेवा, अवास्तव वाढवू नका, कारण, ते कमी असलं तर निर्यात करणाराला फायदा होईल. देशाचाही लाभ होईल.'' रुपयाच्या विनिमयादराच्या चर्चेत असे दोन पक्ष होते - एक आयात करणारांचा आणि दुसरा निर्यात करणारांचा. या दोघांमध्ये त्याही वेळी वाद होता. सारांश, सगळया देशाला बंदिस्त व्यवस्था किंवा स्वदेशी लागू करायची म्हटली तर त्यामुळे फायदा होणारा एक गट आहे आणि खुली व्यवस्था चालू करायची म्हटली तर त्यामुळे फायदा होणारा एक गट आहे आणि खुली व्यवस्था चालू करायची म्हटली तर त्यातून फायदा होणारे लोक वेगळे आहेत.

म्हणजे, जोतिबा फुल्यांच्या शब्दांमध्ये, येथे 'एकमय लोक' नाही; येथे देशच विभागलेला आहे; गेली वीस वर्षे मी सांगतो आहे त्याप्रमाणे येथे 'इंडिया' आणि 'भारत' अशी फाळणी झालेली आहे. खुली व्यवस्था ही 'भारता'ला फायद्याची आहे आणि बंदिस्त व्यवस्था, नव्या स्वदेशीची व्यवस्था ही 'इंडिया'च्या सोयीची आहे. 'इंडिया'ला एक धोरण सोयीचं आणि 'भारता'ला दुसरं एक धोरण सोयीचं आहे असं असलं तर काय निर्णय करायचा असा प्रश्न उभा राहतो आणि मग संघर्षाला सुरुवात होते.

हिंदुस्थानात या विषयावर तीन वेळा संघर्ष झाले. डंकेल प्रस्ताव आला, जागतिक व्यापार संघटना तयार झाली म्हणूनच केवळ हा स्वदेशीचा वाद निघाला असं कोणी समजू नये म्हणून मी या तीन संघर्षांची मांडणी करतो आहे.

हिंदुस्थानच्या अर्थकारणातच नव्हे तर सगळया राजकारणामध्ये खुलेपणा हवा असणारे आणि बंदिस्तपणा हवा असणारे यांचा संघर्ष सतत होत राहिला आहे. इंग्रज येण्याआधीचा काळ आपण सोडून देऊ. त्यावेळीही जो काही संघर्ष होता त्या संघर्षाची साधने, हत्यारे ही केवळ आर्थिक नव्हती अधिक व्यापक होती. बहुजन समाजातील लोकांना शिक्षण घेण्याचं स्वातंत्र्य नाही; शेतकऱ्याला आपल्या घरात पैसासुद्धा ठेवायचा अधिकार नाही, त्याच्या घरात पैसा सापडला तर त्याचे हात कलम करावे अशी व्यवस्था! विद्या करणारे वेगळे, शस्त्रधारी वेगळे, व्यापार करणारे वेगळे, इतरांना या क्षेत्रात उतरायलाही मनाई. थोडक्यात, इंग्रज येण्याआधीच्या काळातही एक बंदिस्त व्यवस्था सवर्णांनी चालविली होती. सध्या मी त्या लढाईविषयी बोलत नाही; इंग्रज आले त्या काळापासून सुरुवात करणार आहे.

### पहिली लढाई

इंग्रज आल्यावर वेगवेगळ्या समाजात वेगवेगळ्या प्रतिक्रिया उमटल्या. पहिली प्रतिक्रिया जुन्या सत्ताधारी समाजाची. इंग्रज आले हे फार वाईट झालं, देशाला पारतन्त्र्य आलं, देशावर परकीयांचं राजय आलं, आमच्या हातातली सत्ता गेली; पण कंपनी सरकारला कितीही नावं ठेवली तरी १८५७च्या बंडाच्या आधी कंपनीच्या अधिकाऱ्यांनी माणुसकीच्या दृष्टिकोनातून हिंदुस्थानातील असवर्ण जाती आणि स्त्रिया यांची दयनीय स्थिती पाहून त्यांच्याकरिता शिक्षण, आरोग्य यासंबंधी व्यवस्था व्हावी, सतिबंदी अशा प्राथमिक सुधारणा करण्यास सुरुवात केली. याला इतिहास साक्षी आहे; पण, ज्या मंडळींच्या हातून सत्ता गेली त्यांना त्याचं दु:ख होतं. महाराष्ट्रापुरतं बोलायचं तर, पुण्यातली पेशवाई बुडली म्हणून ब्राह्मणांना मोठं दु:ख होतं आणि सबंध हिंदुस्थानातलं आपलं राज्य गेलं म्हणून मुसलमानांना मोठं दु:ख होतं. या दोन राज्यकर्त्यांना मोठा खेद वाटे की इंग्रज आले आणि त्यांनी आपली सत्ता काढून घेतली, एवढंच नव्हे तर आपल्या 'खालच्या' लोकांना आपल्या बरोबरीला आणण्याचे प्रयत्न ते करीत आहेत. तेव्हा हिंदुत्वाची, राष्ट्रीयत्वाची भावना जागी करून हिंदुस्थानातून इंग्रजांना तातडीने हाकून लावलं पाहिजे असं म्हणणारांचा पहिला 'राष्ट्रीय' गट या जुन्या सत्ताधाऱ्यांतून तयार झाला.

आपल्या लक्षात येईल की, इंग्रज आल्यामुळे शेती बुडाली, बलुतेदारी बुडाली, जे काही शोषण झालं ते जास्तीत जास्त ग्रामीण भागातील समाजाचं झालं कारण कच्च्या मालाच्या शोषणाकरिताच इंग्रज इथे आले होते; पण इंग्रज राज्याविरुद्ध हातामध्ये बंदुका घेऊन कोण उठलं हे जर आपण पाहिलं तर त्यात सगळी नावं वासुदेव बळवंत फडके, चाफेकर अशी – म्हणजे जुन्या काळी ज्यांच्या हाती सत्ता होती आणि इंग्रजांमुळे आपली सत्ता गेल्याचं दु:ख होतं त्याच मंडळींची नावे पुढे येतात. तीच मंडळी 'पहिल्यांदा इंग्रजांना काढून लावा आणि स्वातंत्र्य मिळवा' असं म्हणू लागली. उदाहरणादाखल, संमतीवयाचा कायदा घ्या. पहिल्यांदा जेवहा बिल आलं तेव्हा त्यात म्हटलं होतं की, मुलीचं लग्न बयाच्या दहाबारा वर्षाआधी करू नये, प्रस्ताव इंग्रजांचा होता आगरकरांसारख्या समाजसुधारकांचा त्याला पाठिंबा होता. त्यात वाईट वाटायचं काय कारण होतं? मात्र, 'राष्ट्रीय' पक्षाच्या लोकमान्य टिळकांनी त्यावर टीकाटिप्पणी केली की, ''हे बिल काही वाईट नाही; पण मावशी मेल्याचं दु:ख नाही, काळ सोकावतो. इंग्रजांना आमच्या सामाजिक व्यवस्थेमध्ये ढवळाढवळ

करण्याइतकासुद्धा वाव द्यायला आम्ही तयार नाही. ते आधी निघून जाऊ द्या आणि ते निघून गेल्यानंतर आमच्यात जे काही दोष आहेत असं म्हटलं जातं – सतिप्रथा, विधवांचे केशवपन, अस्पृश्यांना मंदिरप्रवेशास बंदी, दलितांना शिक्षणाचा अधिकार नाही वगैरे – ते दूर करण्यासंबंधी आमचं आम्ही बघून घेऊ.'' अशी ही 'राष्ट्रीय' गटाची प्रतिक्रिया होती.

हिंदुस्थानावर जेव्हा मुसलमानांची स्वारी झाली तेव्हा हिंदुस्थानातल्या रयतेने, बहुजन समाजाने, शूद्रातिशूद्रांनी 'महंमदाच्या जवाँमर्द' शिष्याचं स्वागत केलं; बहुजन समाजाला, शूंद्रांना लुटणाऱ्या स्थानिक सत्ताधाऱ्यांच्या किल्ल्यावर अल्लाउद्दिनच्या स्वाऱ्या झाल्या, देवगिरीचा किल्ला पाच वेळा पडला. इतिहासकार बेमालूमपणे सांगतात की, देवगिरीचे सैनिक मोठ्या शूरपणे लढले; पण शत्रूसेन्याचं संख्याबळ फार मोठं होतं. म्हणून देवगिरीचा पराभव झाला. असंच चितोडबद्दलही लिहितात. काय आश्चर्य? आपला राजा, स्थानिक, आपल्या धर्माचा आणि दिल्लीहून येणाऱ्या परधर्मी दुष्टकर्मा सुलतानांच्या सैन्याचे संख्याबळ 'आमच्या'पेक्षा जास्त कसं काय होते? इतिहासामध्ये काही कोडी असतात तसं हे हिंदुस्थानच्या इतिहासातील एक कोडं आहे. त्या कोड्याचं उत्तर सरळ आहे – बहुजन समाजाला बाहेरून येणारे परके वाटत नव्हते. आपल्याला बरोबर घेऊन मशिदीमध्ये प्रार्थनेला बसणारी, रेटीबेटी व्यवहार करायचे म्हटले तर चालणारी अशी माणसं एका बाजूला आणि इथं राज्य करणारे राजे आणि वतनदार, देशमुख किंवा तत्सम दुसऱ्या बाजूला जुने देशी राज्यकर्ते दरवर्षी फक्त रयतेला लुटायेचे काम करायचे; बरोबरीला कधी घेतच नव्हते – ना सामाजिक संबंधात ना धार्मीक. त्यामुळे बहुजन समाजाची सहानुभूती देशी राजांना कधीच नव्हती. हे म्हणण्याची हिम्मत साऱ्या हिंदुस्थानात फक्त जोतिबा फुल्यांनी दाखविली; आजही असं म्हणण्याची कोणाची हिम्मत होत नाही. पानिपतची तिसरी लढाई झाली. त्याबद्दल अब्दालीच्या दफ्तरात वर्णन आहे की, लढाईच्या वेळी बाजूच्या शेतांमध्ये शेतकरी उभे राहिले आणि त्यांनी असा विचार केला की, अब्दाली जिंकला तर बरे होईल, तो लुटालुट करतो हे खरे, पण मराठे अंगावरचे कपडेही काढून नेतात. तेव्हा अशा लढाईच्या वेळी आसपासच्या बहुजन समाजाची काय भूमिका होती हे लक्षात ठेवणं महत्त्वाचे आहे. कारण, मी जो काही 'इंडिया' विरुद्ध 'भारत' किंवा स्वदेशी आणि 'स्वतंत्र' यांच्यातील भेद स्पष्ट करणार आहे तो समजण्यासाठी ही जाण आवश्यक आहे.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे लोक, भारतीय जनता पार्टीचे लोक आपल्याला

एक नवीन इतिहास बनवून शिकवू पाहतात. हिंदुस्थानचा इतिहास म्हणजे मुसलमान विरुद्ध  हिंदु अशा लढायांचा इतिहास आहे. अशी जी ते मांडणी करतात ती तद्दन खोटी आहे.

जोतिबा फुले म्हणत की, ''इंग्रज असला तरी तो या देशामध्ये काही कायमचा रहाणार नाही, एक दिवस त्याला जायचंच आहे; पण जोपर्यंत तो इथं आहे तोपर्यंत हिंदुस्थानातील मंडळींनी जातिव्यवस्था संपवावी; कोणला शूद्र मानू नये, अस्पृश्य मानू नये. सगळ्यांना शिक्षणाचा अधिकार मिळावा; इंग्रजांनी तंत्रज्ञानामध्ये खूप मोठी प्रगती केली आहे ती आपण शिकून घ्यावी. अशा तऱ्हेने त्यांचे सगळे न्याय, हुन्नर, विद्या शिकून घेतले की आपण 'एकसंघ राष्ट्र' म्हणून स्वातंत्र्य मिळविण्यास पात्र होऊ. त्यानंतर आपण इंग्रजांना 'इथून जा' म्हटलं तरी चालेल. त्याहीपुढे जाऊन जोतिबा फुले म्हणतात की, आज जर का आपण हिंदुस्थानातील सामाजिक तेढी संपवल्या नाहीत आणि स्वातंत्र्य आलं तर पुन्हा एकदा गुलटेकडीवर शूद्रांची मुंडकी आभाळात उडवली जातील. पुन्हा एकदा इथं नवी पेशवाई तयार होईल.''

पण, इंग्रज आल्यानंतर एक 'राष्ट्रवादी' गट 'परदेशातलं आम्हाला काही नको, आम्हाला शिकण्यासारखं त्यांच्याकडे काही नाही' असं म्हणत होता. चिपळूणकरांचं म्हणणं प्रसिद्ध आहे – 'इंग्रजांनी आमचा पराभव केला, म्हणजे आम्ही काही हीन सस्कृतीचे ठरलो असे नाही.' इतिहासामध्ये, रहाटगाडगं जसं 'चक्रनेमिक्रमाने'वर जातं, खाली जातं तसं आमचं गाडगं सध्या खाली गेलं आहे, एवढंच. आमची वेळ आली की, ते पुन्हा वर जाणार आहे, आम्हाला काहीही सुधारणा करायची गरज नाही. आमचा वर्णाश्रम धर्म, आमचं चातुर्वर्ण्य, आमची जातिव्यवस्था, आमचे वेद, आमची उपनिषदे यांच्या पलीकडे काहीही श्रेष्ठ नाही असं म्हणणाऱ्यांचा हा 'राष्ट्रीय' गट त्या काळात उभा राहिला. जोतिबा फुल्यांचा गट संख्येनं लहान होता; पण तो स्पष्टपणे म्हणत होता की, ''स्वातंत्र्य मिळवायचं आहे, स्वराज्य मिळवायचे आहे, इंग्रजांना घालवायचं आहे; पण जर का 'एकमय लोक' म्हणून राष्ट्र तयार झालं नाही, जातिव्यवस्था संपली नाही, ब्राह्मणांनी केलेला जुलूम संपला नाही, शूद्रातिशूद्र जर का अज्ञानातच खितपत राहिले तर स्वातंत्र्य मिळूनसुद्धा त्याचा काही उपयोग नाही.''

असा, तथाकथित 'जहाल' विरुद्ध 'मवाळ', 'राजकीय' विरुद्ध 'सामाजिक' वादविवाद झाला त्याला मी 'स्वदेशीची पहिली लढाई' म्हणतो. स्वदेशीची मागणी करणारे 'राष्ट्रवादी' राजकीय स्वातंत्र्य ताबडतोब हवे म्हणणारे, आम्हाला

बोहरून काही नको म्हणणारे; याउलट, जोतिबा फुले, रानडे यांच्यासारखे बाहेरून आपण ज्ञान घ्यावं आणि 'एकमय लोक' या अर्थी राष्ट्र बनवावं आणि मग स्वातंत्र्याच्या मागे लागावं. असं म्हणणारे, दुर्दैवाने स्वदेशीच्या या पहिल्या लढाईमध्ये 'स्वदेशी'वाल्यांचा जय झाला आणि पहिल्यांदा सामाजिक प्रश्न सोडविण्यावर भर देणारांचा पराभव झाला.

**दुसरी लढाई**

स्वातंत्र्य आलं आणि जोतिबा फुल्यांचं भाकित खरं ठरलं, दिल्लीत पुन्हा एकदा 'पेशवाई' स्थापन झाली. सुरुवातीला म्हणजे १९४७ सालापासून ते जवळजवळ १९८० सालापर्यंत दिल्लीची ही 'पेशवाई' जातीनंसुद्धा सवर्णांचे वर्चस्व असलेलीच 'पेशवाई' होती. नंतर हळूहळू इतर जातीचे लोक येऊ लागले; पण जर का 'पेशवाई' किंवा 'भटशाही' याचा अर्थ, ''समाजातील एका गटानं त्याच समाजातील दुसऱ्या गटाचं शोषण करण्याची व्यवस्था जन्माच्या अपघाताने ठरलेल्या जातीच्या आधाराने चालवणे.'' असा घेतला तर दिल्लीमध्ये १९८० नंतर आलेली व्यवस्थासुद्धा समग्र राष्ट्राची राहिली नाही. ती समाजाच्या एका गटाचीच राहिली. जोतिबा फुल्यांनी 'भटशाही' हा शब्द वापरला. मी जोतिबांवर लिहिलेल्या पुस्तकाच्या शेवटी लिहिलं आहे की, ''जोतिबांचं भाकित खरं ठरलं. 'भटशाही' पुन्हा एकदा प्रस्थापित झाली. फरक एवढाच की त्या 'भटशाही'चं स्वरूप आता ब्राह्मण विरुद्ध शूद्र असं न राहाता 'इंडिया' विरुद्ध 'भारत' असं झालं आहे.'' वेगवेगळया जातिपातींच्या काही लोकांना 'भटशाही'ने फितूर करून घेतले.

स्वातंत्र्य मिळाल्यानंतर 'स्वदेशीची दुसरी लढाई' सुरू झाली. या लढाईची पार्श्वभूमी समजून घेतली पाहिजे. पहिल्या लढाईच्या काळात हिंदुस्थानातील, बूट घालणाऱ्या, सूट घालणाऱ्या. टाय बांधणाऱ्या गटाचे काँग्रेस स्थापन केली आणि त्या काँग्रेसला असं स्थान प्राप्त झालं की लोकमान्य टिळकांनाही वाटलं की, आपल्याला जर का 'राष्ट्रीय चळवळ' चालवायची असेल तर ती काँग्रेसच्या झेंड्याखालीच चालवायला लागेल. इतरही काही लोकांनी पक्ष काढले होते; पण ते सर्व कोपऱ्यात दबून राहिले. गांधीजींनीसुद्धा आफ्रिकेतून आल्यानंतर महत्त्वाचा निर्णय घेतला तो म्हणजे 'स्वातंत्र्याच्या लढ्याचं साधन काँग्रेसच राहणार आहे, ती ताब्यात घेतली पाजि, काँग्रेसमधून बाहेर पडायचं नाही. बाहेर पडतील ते संपतील.' सुभाषचंद्र बोस असोत किंवा आणखी कोणी असो–काँग्रेस सोडून जे जे गेले किंवा मध्यप्रवाहापासून जे जे दूर गेले तेते सर्व निष्प्रभ झाले; जे

चापलुशी करत, कधी महात्मा गांधी काँग्रेसमध्ये चिपकून राहातात तेच यशवंतराव चव्हाणांसारखे 'महद्पदला पोहोचतात असा काँग्रेसचा इतिहास आहे.

महात्मा गांधी काँग्रेसमध्ये आल्यानंतर ती ताब्यात घेण्यासाठी त्यांनी काही गोष्टी केल्या. त्यातील महत्त्वाची गोष्ट – काँगेस ही जर का स्वातंत्र्याचं महत्त्वाचं साधन बनायचं असेल तर तिचं 'सूट-बूट-टाय' हे स्वरूप गेलं पाहिजे. महात्माजींनी मोठ्या विचारपूर्वक 'पंचा' स्वीकारला, केवळ शहरी लोकांच्या आर्थिक मागण्या मांडायची परंपरा मोडून ग्रामव्यवस्थेविषयी बोलायला सुरुवात केली; विधायक कार्यक्रम दिले, त्याबरोबरच सामाजिक सुधारणांचे कार्यक्रम दिले, अस्पृश्येतेला खंबीरपणे विरोध केला.

या वेळेपर्यंत स्वदेशीच्या पहिल्या लढाईतील 'राष्ट्रीय' गटाकडून 'स्वातंत्र्य' गट पूर्ण पराभूत होऊन कोपऱ्यात जाऊन पडला होता. उदाहरणार्थ, महाराष्ट्रात 'सत्यशोधक समाज' कुठेतरी खेड्यापाड्यात समाजाच्या विधीनुसार विवाह लाव किंवा किरकोळ सभामेळावे भरव यापलीकडे काही करू शकत नव्हते. 'फुले' गट संपलेला होता, 'राष्ट्रीय' गटाने आघाडी मारली होती.

गांधीजींचे विचार आणि कार्यक्रम पाहता कोपऱ्यात जाऊन पडलेल्या या बहुजन समाजाच्या लोकांना पहिल्यांदा वाटू लागलं की, टिळक इत्यांदीचा राष्ट्रीय गट आणि गांधीजींच्या नेतृत्वाखालील काँग्रेस यांच्यात मोठा फरक आहे. गाधींजी जे बोलताहेत ते समाजसुधारणेबाबत बोलत आहेत. पंचा नेसून रहात आहेत. (सर्वसामान्यांसारखे रहात आहेत.) त्यांना गरीबाविषयी कळवळा आहे, गावाचं अर्थकारण यांना समजत आहे; शुद्र आणि ब्राह्मण यांच्यातील अन्याय आहे त्यांना असजतो आहे. त्यांचा परिणाम म्हणून एक मोठी घटना घडली–महाराष्ट्रात घडली. १९३६ साली जळगाव जिल्ह्यात फैजपूर येथे भरलेल्या काँग्रेस अधिवेशाच्या वेळी बहुजन समाजाच्या नेतृत्वाने मोठ्या संख्येने काँग्रेसमध्ये प्रवेश केला. त्यांची भूमिका अशी होती की, राष्ट्रीय चळवळ गांधीच्या नेतृत्वाखाली उभारी घेत आहे. पुढेही फोफावणार आहे. सामाजिक विरुद्ध राजकीय वाद निरर्थक झाला आहे. पहिल्यांदा समाजसुधारणा, परदेशातील ज्ञानविज्ञान–तंत्रज्ञानाशी संपर्क साधणे आणि नंतर स्वराज्य हे काही आता शक्य नाही; पण काँग्रेसमध्ये सध्या गांधीजींच्या विचाराचा प्रभाव आहे. आपण त्यांच्या बरोबर जावे. अन्यथा, 'इंग्रजधार्जिणे', 'देशद्रोही' असल्याचा डाग लागले. महाराष्ट्रातील सारी सत्यशोधक चळवळ ही भूमिका घेऊन काँग्रेसमध्ये मिसळून गेली.

१९४७ साली स्वतंत्र्य मिळालं, शेतीवर आधारलेली व्यवस्था आणि त्यांची

अ-राजकीय व्यवस्था - गांधीजींचा शासनव्यवस्थेवर विश्वास नव्हता. किंबहूना, हिंदुस्थानची स्वातंत्र्य चळवळ ही शासनव्यवस्था संपविण्याकरिता उचललेलं पहिलं पाऊल आहे असं ते आग्रहाने म्हणत असत - सगळेच मागे पडले, त्यांचे शिष्योत्तम पंडित जवाहरलाल नेहरू - कधीमधी ते सूट-टाय वापरीत असत, पण एरवी अगदी देशी, नखशिखन्त शुभ्र वेश परिधान करून आणि छातीला गुलाब लावून वावरत. गांधींनी 'सूटबूटा'ऐवजी पंचा दिला. नेहरूंची 'पंचा' संपवला. नखशिखान्त 'देशी' पण थाटदार पेहेरावाची संस्कृती आली. पंडीतजींनी गांधीपूर्व 'सूटबूटी' काँग्रेस पुनरुत्थान केले. शेतीला नाही, कारखानदारीला महत्त्व आहे; खेड्याना महत्त्व नाही, शहरांना महत्त्व आहे आणि ग्रामपंचायतीला महत्त्व नाही, केंद्रशासनाकडे सर्वांत जास्त अधिकार असले पाहिजेत अशा तऱ्हेचा विचार त्यांनी मांडला आणि त्याला समाजवादाचा नवीन झेंडा दिला, पूर्वी देश गुलाम होता तेव्हा 'स्वदेशी'ची चळवळ ठीक होती; पण आता स्वातंत्र्य आले आहे; विकासासाठी, तंत्रज्ञानासाठी परदेशांशी संबंध साधणे आवश्यक आहे; पण उद्योगधंदे, ज्ञान, तंत्रज्ञान यांना साऱ्या देशाचे दरवाजे खुले करून देता नये. अन्यथा ज्यांच्या हाती सत्ता आली त्यांच्या हाती काहीच पडणार नाही. नव्या सत्ताधाऱ्यांचा विरोध परदेशी विज्ञानाला नव्हता, तंत्रज्ञानालाही नव्हता. नेहरू तर सतत विज्ञान आणि तंत्रज्ञानाविषयी बोलत असत.

विज्ञान आणि तंत्रज्ञान देशांत यायला हवे; पण विज्ञान व तंत्रज्ञानाची ही गंगा आमच्या ओंजळीतूनच फक्त लोकांपर्यंत गेली पाहिजे, एरवी जाता कामा नये. समाजवादाच्या नावाखाली, देशाला संपन्न आणि स्वावलंबी बनवायचं आहे अशा घोषणा करत त्यांनी आपल्या देशाभोवती पुन्हा एकदा भिंती घातल्या आणि सरकारने लादलेल्या 'स्वदेशी'चा अवतार झाला. परदेशातून काही आणताच येत नाही, आणायचं असलं तर त्यासाठी परकीय चलन सहज मिळू शकत नाही, रिझर्व बँकेकडे अर्ज केल्याशिवाय तीन पौंडसुद्धा मिळणार नाहीत अशी व्यवस्था तयार केली गेली.

इथे पुन्हा एकदा बहुजनसमाजाची फसगत झाली. बहुजन समाजातली जी मंडळी काँग्रेसमध्ये गेली होती, ज्यांना अजूनही गावांमध्ये काही स्थान होती, त्यांनाही वाटू लागलं की, "समाजवादात आपलं बहुजन समाजाचे कल्याण आहे; रशियाने समाजवादाच्या सहाय्याने किती प्रगती केली, तेव्हा नेहरू जे मांडताहेत ते खरं असलं पाहिजे." त्यामुळे, त्यांनी देशामध्ये समाजवादाच्या नावाखाली जी भिंत बांधणारी व्यवस्था उभी राहिली तिला पाठिंबा द्यायला

सुरुवात केली. ही 'स्वदेशीची दुसरी लढाई' आणि या दुसऱ्या लढाईतही 'स्वदेशी'वाले, राष्ट्रवादी संकुचित वृत्तीचे लोक जिंकले. 'स्वतंत्रतावादी' हरले.

परिणाम असा झाला की, विज्ञान, तंत्रज्ञानच नव्हे तर सगळ्याच बाबतीमध्ये – स्वातंत्र्याचया काळामध्ये प्रगती होण्याऐवजी देशाची अधोगती होत गेली. भिंती बांधल्या, जगाशी संपर्क तोडला म्हणजे प्रगती होते हे 'ब्राह्मणी' तत्त्वज्ञान आहे. 'परदेशगमनाला बंदी आहे तेवढंच काय ते सत्य आहे.' हा संकुचित 'ब्राह्मणीपणा' समाजवादाच्या नावाखाली पुन्हा एकदा देशामध्ये प्रभावी झाला. समाजवाद आणि ब्राह्मणीपणा यात काही फरक नाही. स्वातंत्र्योत्तर काळातही आपले वर्चस्व टिकवण्यासाठी सवर्णांनी समाजवादाचा मुखवटा वापरला. कर्नाटकातल्या एका दलित नेत्यानं त्याचं सुंदर वर्णन केलं आहे. त्याने एक 'देवरस ब्राह्मण' आणि एक 'नेहरू ब्राह्मण' अशा दोघांचा संवाद उभा केला आहे. देवरस ब्राह्मण दुसऱ्याला म्हणतो, ''अरे, तू ब्राह्मण ना? देवरस पहा, आपणा ब्राह्मणाचं, सवर्णांचं भलं करायला पाहताहेत आणि त्यांना सोडून तू नेहरूंच्या मागे कुठे लागला?'' त्यावर 'नेहरू ब्राह्मण' त्याला उत्तर देतो, ''तुझ्या देवरसांनी काय केलं ब्राह्मणांकरिता? आमचे नेहरू पहा; त्यांनी ब्राह्मणाचं नाव घेततलं नाही, संध्या केली नाही; वेगळीच आचमने केली; पण समाजवादाचं नाव घेतलं आणि राष्ट्रीयीकरण केलं आणि कारखाने आपल्याच लोकांच्या हातात दिले की नाही? तुझ्या देवरसांना हे कुठं समजत आहे?''

समाजवादाचं आणि राष्ट्रीयकरणाचं नाव घेऊन पुन्हा, वेगळ्या तऱ्हेने, सवर्णांचं राज्य चालू ठेवण्याची त्यांची कुशलता वाखाणण्यासारखीच आहे. स्वदेशीच्या दुसऱ्या लढाईतही संकुचित वृत्तीचे, खुलेपणाला विरोध करणारे जिंकले आणि पुन्हा एकदा, 'स्वतंत्रतावादी' बहुजनसमाजाचा पराभव झाला.

समाजवादाच्या बंदिस्त पद्धतीची चाळीस वर्षे गेली. बंदिस्त पद्धत जगात कधी टिकूच शकत नाही. जुलियन सायमन नावाच्या एका मोठ्या अर्थशास्त्रज्ञाने एक अभ्यासपूर्ण प्रबंध लिहिला आहे, त्यात त्याने दोन निष्कर्ष काढले आहेत. मनुष्याजातीची ख्रिस्तानंतर १८०० वर्षेपर्यंत जवळजवळ काहीच प्रगती झाली नाही. किरकोळ झाली. राहणीमान पहा, खाणंपिणं पहा, आयुष्यमान पहा – १८०० सालापर्यंत त्यांत काही प्रगती झाली नाही. त्यानंतर जी काही प्रगती झालेली दिसते आहे ती अगदी 'प्रचंड झेपेची' झालेली आहे. आयुष्यमान, राहणीमान – सगळ्या दृष्टीने. आज आपण एक बटण दाबून इंग्लंडमध्ये चाललेली मॅच पाहू शकतो. हे असं काही घडेल असं १८०० सालच्या मानवाला

सांगितलं असतं तर खरं वाटलं नसतं; पण शास्त्रीय ज्ञानाच्या प्रगतीमुळे ते साधलं आहे. सायमनने आणखी एक निष्कर्ष काढला आहे की, १८०० सालानंतर जी काही प्रगती झाली आहे ती फक्त ज्या देशांत स्वातंत्र्य आहे तिथंच झाली. जिथं कोणी एक हुकुमशहा किंवा पक्ष पुढं आला आणि म्हणू लागला की, ''अरे, सामान्य लोकांना काय समजतं? आपल्याच स्वार्थाकरिता आणि फायद्याकरिताच ते धडपडतात. त्यांच्या हाती समाजाचा कारभार सोपवून कसे चालेल? साऱ्या समाजाच्या, राष्ट्राच्या दृष्टीने 'सम्यक्' नियोजन कसं होईल? त्यात समाजाचं अकल्याण आहे. तेव्हा, सर्व सत्ता आमच्या हाती द्या. आम्ही ठरवू गहू किती पिकवायचा, आम्ही ठरवू रेल्वेची किती इंजिनं बनवायची. बघता बघता सारा देश सुखी करून टाकू.'' असे हुकुशाही, फॅसिस्ट किंवा समाजवादी पद्धत स्वीकारलेले देश सोडून बाकी सगळ्या देशात प्रगती झाली. ब्राह्मणी समजवादी हिंदुस्थानात प्रगती होण्याची काहीच शक्यता नव्हती.

**–आणि तिसरी लढाई**

चाळीस वर्षांत देश कोसळला आणि काँग्रेस पक्षाच्याच डॉ. मनमोहन सिंगांना कबुलीजवाब द्यावा लागला की, ''खुलेपणाकडे जाण्याची आवश्यकता आहे.'' अलीकडे सोनिया गांधी आल्यानंतर त्यांची मते बदलली असती, तरी त्यांनी हे लोकसभेत जाहिरपणे म्हटले आहे. ज्या पक्षाने या देशात समाजवाद आणला त्याच पक्षाला आता खुलेपणाची आवश्यकता कबूल करावी लागली आणि इथे 'स्वदेशीची तिसरी लढाई' सुरू झाली.

इंग्रज आल्यानंतर विलायतेशी संपर्क वाढू द्या, त्यामुळे आपल्या देशातील अज्ञानाचाउ अंध:कार दूर होईल, जातिभेद दूर होतील असं म्हणणाऱ्या 'स्वतंत्रतावाद्यांचा' पहिला पराभव झाला. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर समाजवादाच्या नावाखाली आम देश फसला आणि त्यांचा दुसऱ्यांदा पराभव झाला आणि या तिसऱ्या लढाईच्या सुरुवातीला ब्राह्मणवाद व समाजवाद यांच्या जोडीला तिसरा वाद-राष्ट्र-धर्मवाद उभा केला जात आहे.

स्वतंत्रतेला विरोध करणाऱ्यांनी आता स्वदेशीचा झेंडा उचलला आहे. समाजवादाच्या नावाखाली मक्तेदारी मिळालेला कारखानदार समान संधी (Level Playing Field) मिळण्याची भाषा करीत आहे. जुने पराभूत समाजवादी, गांधीवादी आणि संघवादी स्वदेशीचा कुकारा देऊन लोकांसमोर भडक भाषणे करायचा धडाका लावत आहेत. डंकेल प्रस्ताव प्रसिद्ध झाला त्यावेळी मी एक लेख लिहिला. मला वाटलं काम झालं, आता आणखी विचार करण्यासारखा

मुद्दा काय राहिला? मी पंजाबमध्ये गेलो आणि तिथं पाहिलं की खेड्यापाड्यामध्ये, या आधी कधीही खेड्यात तोंडसुद्धा न दाखवलेली माणसं जाऊन सांगत होती, "तुमच्या लक्षात कसं येत नाही? तुम्हाला घरचं बी वापरायची परवानगी राहणार नाही. तो 'डंकेल' राक्षस घ्रेऊन जाईल." अशा तऱ्हेची विक्षिप्त आणि विचित्र मांडणी करणारी मंडळी साऱ्या हिंदुस्थानभर फिरत होती. आजही 'स्वदेशी'चा विचार करणारी मंडळी आपल्या धर्माचं नाव घेतात. संस्कृतीचं नाव घेतात आणि "आपल्या देशाच्या संस्कृतीचे जर रक्षण करायचं असेल तर आपण 'स्वदेशी' वापरली पाहिजे, परदेशातला माल विकत घेता कामा नये, त्यावर बंदी घातली पाहिजे." अशी मांडणी करतात.

यात कोणाचा स्वार्थ आहे? व्यक्तीचं स्वातंत्र्य हे प्रगतीची किल्ली आहे. प्रत्येक व्यक्ती ही अनन्यसाधारण असते आणि प्रत्येकाला स्वातंत्र्य मिळाल्यानेच त्याचं भलं होतं आणि देशाचं भलं होतं. संपूर्ण मानवजातीचं भलं होतं अशी माझी श्रद्धा आहे. हे सर्वांनी मानलंच पाहिजे असं मी म्हणणार नाही. तुमच्या मार्गाने जर का देशाचं भलं होणार आहे असं तुम्हाला वाटत असेल तर तो मार्ग आवश्य धरा. खुल्या व्यवस्थेला विरोध करणाऱ्या आणि 'स्वदेशी' आली पाहिजे असं म्हणणारांना आपले विचार मांडण्याचा अधिकार जरूर आहे.

मी शेतकऱ्यांची बाजू मांडतो; कारण या देशात ७० शेतकरी आहेत आणि शेतकऱ्यांच्या जे तोट्याचं आहे ते देशाच्या फायद्याचं असणं फार कठीण आहे, असे मी मानतो. १९८८-८८ साली जेव्हा पहिल्यांदा खुलीकरणाची चर्चा चालू झाली तेव्हा सरकारी दस्तावेज, जो जागतिक व्यापार संघटनेकडे कबुलीजबाब दिला आहे की आम्ही शेतीमालाच्या भावाचं धोरण असं चालवतो की ज्यामुळे हिंदुस्थानातील शेतकऱ्याला त्याच्या निवडक १७/१८ पिकांमागे दरवर्षी २४६०० कोटी रुपये आमच्या शेतकऱ्याला बाजारपेठेत मिळाला असता त्याच्यापेक्षा ९०% भाव जास्त मिळतो. यूरोपमधील लोकांनी सांगितलं की शेतकऱ्याला ६५% जास्त भाव मिळेल असं आमचं धोरण आहे. अमेरिकेने सांगितलं की आम्ही शेतकऱ्याला ३५% सबसिडी देतो. हिंदुस्थानयने सांगितले की आमच्या शेतकऱ्याला २४,६०० कोटी कमी मिळतील म्हणजेच एकूण उत्पन्नापोटी बाजारपेठेमध्ये त्याला ते मिळालं असतं त्याच्यापेक्षा ७२% कमी मिळावे असं आमचं धोरण आहे. "आम्ही देतकऱ्यांना उणे ७२% सबसिडी देतो." असा हा हिंदुस्थान सरकारचा कबुलीजबाब आहे.

परदेशातील माणसं म्हणजे काही मोठी दोस्त आहेत असं नाही. बहुराष्ट्रिक

येथे येऊन आमचं कल्याण करणारे आहेत अशी खुळी कल्पना कोणी मांडत नाही; पण कल्याण करते ती स्पर्धा. बहुराष्ट्रिक एकमेकांशी स्पर्धा करतात आणि स्पर्धा, करायची असल्यामुळे, आमचं सरकार ज्या तऱ्हेचा जुलूम करण्याचा विचारसुद्धा कोणत्याही बहुराष्ट्रिकांच्या हिशेबांत येणार नाही; त्यांना ते परवडणारच नाही. उदाहरणार्थ, गेल्या वर्षी हिंदुस्थानात – आपल्या देशातील बाजारपेठेमध्ये गव्हाचा भाव ५१५ रुपये प्रति क्विंटल असताना सरकारने परदेशातून ७१० रुपये प्रतिक्विंटल भावाने आणला आणि इथल्या मंडीमध्ये ५१५ च्या भावाने विकला. असला आचरटपणा कोणी बहुराष्ट्रिक करू शकत नाही; हे फक्त हिंदुस्थानचे समाजवादी सरकारच करू शकते.

पुन्हा एकदा गॅट आणि जागतिक व्यापारासंबंधी वाटाघाटीची नवी फेरी चालू होते आहे. ही नवी फेरी चालू करण्याआधी हिंदुस्थान सरकाने सल्लामसलतीसाठी चर्चा आयोजित केली होती; मलाही बोलावलं होतं. मी तिथं म्हटले, यावेळी आपण खुलेपणा, स्वातंत्र्य, राष्ट्रीयता असल्या गोष्टींविषयी बोलूया नको, कारण या गोष्टींची चर्चा होऊ शकत नाही. आपण आकडेवारीत बोलू. गेल्या वेळी (८६–८९) तुमची उणे सबसिडी ७२% होतो. आता किती आहे ते सांगा. त्यांनी दिलेल्या कागदपत्रावरून उजेडात आलेली माहिती सर्वांना मिळणे आवश्यक आहे.

१९८६–८७ ते १९८८–८९ या तीन वर्षांत शेतकऱ्यांवरील उणे सबसिडी दरसाल सरासरी २४,६०० कोटी रुपये होती. १९९६–९७ चे सरकारी कागदपत्र–वाणिज्य मंत्रालयाचे सहीशिक्क्याचे कागदपत्र–जे जिनेव्हाकडे गेले आहेत त्यातील उणे सबसिडीचा आकडा आहे १,१३,७४८ कोटी रुपये आणि टक्केवाी आहे उणे ८६.५.

समजा, आपल्याला ‘स्वदेशी’ मानायची आहे. कोणती ‘स्वदेशी’ मानणार? शोषक ‘इंडियाची’ का शोषित ‘भारताची?’ डंकेल प्रस्तावावर चर्चा चालू होती तेव्हा अमेरकेतील शेतकऱ्यांच्या संघटनेचे लोक माझ्याकडे आले होते. ते म्हणाले, ‘‘जगातल्या सर्व शेतकऱ्यांनी एक व्हायला पाहिजे आणि डंकेलचा पराभव केला पाहिजे. कारण, तो शेतकऱ्यांची सबसिडी कमी करा म्हणतो.’’ मी त्यांना म्हटलं, ‘‘तुम्हाला ३५% सबसिडी आहे म्हणून ती कमी करा असं तो म्हणतो; पण आम्हाला उणे ७२% सबसिडी कमी होण्याने आमचा फायदाच होणार आहे.’’ मी काय म्हटलं ते त्यांना लगचे समजलं; पण तरीही ते म्हणाले, ‘‘अमेरिकन शेतकऱ्याची सगळी चंगळच चंगळ आहे असं जे तुम्हाला वाटतं ते

काही खरं नाही. आमच्याकडे शेतीमालाच्या बाजारपेठेवर पाच मक्तेदारांचा इतका ताबा आहे की, ते आम्हाला पिळतात.'' मी म्हटलं, ''तुम्ही भाग्यवान आहात, तुम्हाला पिळणारे पाच आहेत. त्यांच्यामध्ये स्पर्धा आहे त्यामुळे शेतकऱ्यांना पिळताना त्यांना एकमेकांची भीती असते; पण आमच्याकडे शेतकऱ्यांना पिळणयाची मक्तेदारी एकाकडेच आहे- इंडिया सरकारकडे. हे सरकार परदेशोतून महाग गहू आणतं, महाग साखर आणतं आणि इथे स्वस्तात विकतं. या सरकारशी कसा सामना करायचा?''

कोणतीही बहुराष्ट्रीय कंपनी असा 'अव्यापारेषु व्यापार' करणार नाही. आर्थिक लाभासाठी धडपडणारे एका मर्यादेपर्यंतच अन्याय करू शकतात, क्रौर्य दाखवू शकतात. देश, धर्म, जाती अशा तत्त्वांकरिता भांडणाऱ्या लोकाच्या क्रौर्याला काही सीमाच नसते. ईस्ट इंडिया कंपनीच्या काळात किंवा इंग्रजी आमदानीत ग्रामीण भारताचे जेवढे शोषण झाले तेवढेच स्वातंत्र्योत्तर काळातही चालू राहिले. अधिकच क्रूर बनले. गोऱ्या इंग्रजांऐवजी काळा इंग्रज आला एवढेच! यांना शेतकऱ्यांनी आपले कसे म्हणावे? त्यांनी स्वदेशीचा नारा दिला म्हणून आपल्या पोराबाळाच्या तोंडातला घास काढून घेण्यास कसे तयार व्हावे?

'स्वदेशी' का 'स्वतंत्र' यातून निवड कशी करावी? देशातील सर्व आयातींवर बंदी घालावी किंवा बंधने घालावी, आपली निर्यात मात्र होईल तितकी वाढवण्याचा प्रयत्न करावा. अशी स्वदेशी एका बाजूला आणि दुसऱ्या बाजूला आयात आणि निर्यात या दोघांनाही खुली मुभा यातून निवड कोणाची करावी? यासाठी दोन पद्धतींनी विचार करता येईल.

पहिला मार्ग रोखठोक हिशोबाचा; रुपये-पैशांचा. स्वदेशीने आर्थिक लाभ होणार आहे का? तो कुणाचा होणार आहे? या प्रश्नाचे उत्तर देणे हा पहिला मार्ग. हिंदुस्थानच्या बाबतीत या प्रश्नाचे उत्तर सोपे आहे. स्वातंत्र्योत्तर काळात ५० वर्षे कारखानदारीचे कौतुक झाले, त्यांना भरपूर सवलती आणि सरंक्षण देण्यात आले. परदेशी तंत्रज्ञान, परदेशी यंत्रसामुग्री वापरून परदेशी तोंडवळ्याचाच माल तयार करणारी ही दिखाऊ कारखानदारी. उद्योजकही, त्यांची कर्तबगारी आणि धडाडी यापेक्षा सरकार दरबारातून लायसेन्स-परमिट मिळवण्याची त्यांची कुशलता, या गुणवत्तेवर पुढे आलेले, ५० वर्षांनंतरही जागतिक बाजारपेठेत स्पर्धेसाठी उतरणे त्यांना शक्य नाही. स्पर्धेची हवा दिसताच पांढरे निशाण फडकवून शरणागती स्वीकारण्यास ते तयार होतात.

याच्या नेमकी उलट परिस्थिती शेतीची आहे. इंग्रजांनी लूट केली, काळ्या

इंग्रजांनी ती पुढे चालवली आणि तरीदेखील भारतीय शेतकरी बांतरराष्ट्रीय हिम्मत ठेवतो. त्याच्याजवळ भांडवल नाही, साधनसामुग्री नाही; पण निसर्गासाठी एक कृपा आहे. महागडी भांडवली साधने वापरून इस्त्रायलचा शेतकरी ९०% माल उच्च गुणवत्तेचा काढू शकतो. बिनभांडवली भारतीय शेतीत ही टक्केवारी पंधरावीसच्या वर जात नाही; पण तेवढाच उच्च गुणत्तेचा माल परदेशी बाजारपेठेत नेता आला तरी साऱ्या भारतीय शेतीचे आणि ग्रामिण व्यवस्थेचे रूपच बदलून जाईल. आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत उतरणाऱ्या बहुतेक महत्त्वाच्या मालाच्या भारतीय बाजारपेठेतील किमती इतर देशांच्या तुलनेने खूपच कमी आहेत. कांद्याचा भाव गेल्या वर्षी ३० रु. किलो झाला. सरकार आयात करण्यासाठी धावपळ करू लागले आणि त्यांच्या लक्षात आले की बाहेरच्या देशात एका डॉलरच्या खाली किलोभर कांदा कुठेच मिळत नाही; पण त्याखेरीज, जैविक अन्नधान्ये, औषधी आणि सुगंधी वनस्पती, संकरित वाणाचे प्रगुणन अशा अनेक क्षेत्रांत गरीब आणि छोट्या शेतकऱ्यालाही आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत उतरता येण्याची शक्यता आहे.

थोडक्यात, जगाच्या स्पर्धेत उतरणे 'इंडिया'तील कारखानदारांना, जमणारे नाही; पण 'भारता'तील शेतकऱ्यांना ते सहज शक्य आहे. खुलेपणाला समाजवादी कारखानदार, त्यातील संघटीत कामगार विरोध करतील हे समजण्यासारखे आहे; पण जे स्वतःला शेतकरी नेते म्हणवतात ते व्यापारावरील निर्बंध उठवण्यास कोणत्या तर्काने आणि आधाराने विरोध करतात हे समजणे खरेच कठीण आहे. आपल्याच शासनाचा जाच सोसणारा शेतकरीसमाज खुलेपणाचीच इच्छा करणार; कारखानदारांच्या स्वदेशील पाठिंबा देण्यात त्याला काय स्वारस्य असावे?

शेतकऱ्यांनी पाठिंबा दिला काय, न दिला काय – सरकारी दंडशक्तीने लादलेली व्यवस्था टिकू शकणार नाही हे उघड आहे. आपण दुसऱ्या देशातून आयात होऊ दिली नाही, अगदी कायद्याने होऊ दिली नाही तर ते देश हिंदुस्थानशी एकतर्फी व्यापार थोडाच चालू देणार आहेत? आपण बंधने लादली तर तेही लादतील आणि थोड्याच काळात हिंदुस्थानचा आंतरराष्ट्रीय व्यापार संपुष्टात येईल. मग प्रश्न असा उभा राहतो की, जगाची गरज जास्त? हिंदुस्थानकडून एक पैचाही माल न घेतल्याने जगाचे काहीही बिघडणार नाही; पण परदेशाशी संबंध तोडल्यास तीन महिने देखील रेटणे हिंदुस्थान उद्योगधंद्यांना अशक्य होईल.

स्वतंत्रतेविषयी रुपये-पैशाचा विचार केला तर स्वदेशीही बहुजनांना घातक

आहे हे उघड आहे; पण यापलीकडे काही दुसरा विचार असू शकत नाही? मला स्वातंत्र्य प्रिय आहे, मी जगाशी टक्कर घेईन. गुणवत्तेची जोपासना करेन आणि जगावर मात करेन; ते जमले नाही तर माझ्या कर्तबगारीला साजेसे जे काही मिळेल त्यावर संतोष मानेन; स्वातंत्र्यात उपाशी मरेन; पण बंदिस्त व्यवस्थेत सरकारी झुणका भाकरीवर सूट-सबसिडीवर जगणार नाही असा साधा विचार केला तर?

पण, स्वातंत्र्याची अशी तळमळ आज तरी दिसत नाही. कोणी २ रुपये किलोने तांदूळ दिले, कुणी झुणका भाकर दिली, कुणी शाळेत तांदूळ फुकट वाटले, कुणी राखीव जागा दिल्या तर असली भीक नाकारण्याची तडफ दाखवणारे कुणीच नाही. एका काळी माणसे संपन्नतेचा आणि प्रतिष्ठेचा खोटा आव आणीत; आता आपण मागास आहोत, गरीब आहोत अशी खोटी प्रमाणपत्रे तयार करून लोक अनुदाने हडप करण्याच्या प्रयत्नात राहतात. ही भीकवादी माणसे भाषा करतात स्वदेशीची आणि काय वाटेल ते युक्तिवाद करतात. कोणी म्हणते, पूर्वी ईस्ट इंडिया कंपनी आली आणि देशावर अंमल बसवून गेली; नव्या बहुराष्ट्रीय कंपन्या तसेच करतील. डॉन क्विक्झोटप्रमाणे मनाने मध्यम युगाात वावरणारी ही माणसे. आपले स्वातंत्र्य नकली आहे, तकलादू आहे. विलायती सत्तांचे सामर्थ्य इतके मोठे आहे की, लष्करी सत्ता मिळवण्याचे त्यांनी मनात झेंडा फडकू शकतो. 'पाश्चिमात्यांना वसाहती नकाशा झाल्या म्हणून आपण केवळ स्वतंत्र आहोत.' ही दुःखद जाणीव स्वदेशीवाल्यांना नाही. ते आपले त्यांच्याच गुर्मीत राहतात. आजच्या अवस्थेतील हिंदुस्थान चालवण्यासाठी टेंडर काढले तर ते भरण्यासाठी साऱ्या जगात कोणीही पुढे येणार नाही; पैसा आणि रक्त खर्चून हिंदुस्थानावर सत्ता गाजवण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही.

**शेवट काय होणार?**

स्वदेशीच्या पहिल्या दोन लढाया भारतातील शेतकरी, कष्टकरी आणि बहुजन समाज हरले, ऐतखाऊ जिंकले. नेता, तस्कर, गुंड, अफसर या सगळ्यांविरुद्ध शेतकरी संघटना एकाकी लढत देत आहे. मी प्रामाणिकपणे सांगतो, मला भीती वाटते की, तिसऱ्या लढाईतही स्वदेशीच्या नव्या ब्राह्मणाचा विजय होण्याची दाट शक्यता दिसते. बहुजन समाज तिसऱ्यांदा हरण्याची सारी लक्षणे दिसतात. जागतिक प्रवाहामध्ये प्रवाहामध्ये प्रवेश करण्याची ही तिसरी संधी आपण हुकवली तर भारताला भविष्य म्हणून काही राहील असे दिसत नाही आणि तरीही, देशबुडच्या स्वदेशीचे समर्थन राष्ट्रप्रेमाच्या आणि धर्मनिष्ठेच्या गलबल्यात

चालूच आहे.

**अ‍ॅड. अनंत उमरीकर, परभणी यांच्या षष्ट्यब्दीपूर्तीनिमित्त त्यांच्या कुटुंबियांनी परभणीकरांसाठी एक व्याख्यान देण्याची मागणी केली होती. त्यांच्या आग्रहाला मान देऊन आणि अ‍ॅड. उमरीकरांवरील - शेतकरी संघटनेतील एक जुने सहकारी म्हणून असलेल्या स्नेहाने उमरीकरांच्या साठीनंतर तब्बल दीड वर्षाने परभणी येथे ६ ऑक्टोबर १९९८ रोजी 'स्वदेशीची तिसरी लढाई' हे भाषण केले. त्या भाषणाचे हे शब्दांन.**

(६ नोव्हेंबर १९९८)

◆◆

# गुजरातचा कायाकल्प गुजरातलाच करू द्या

गुजरातमधील भूकंपाने सारा देश हादरून गेला आहे. दीर्घकाळ चालणाऱ्या लढाईत किंवा दुष्काळात हजारोंनी माणसे मृत्यु पावतात, जखमी होतात पण एका दिवशी एका क्षणापर्यंत नित्यनेमाप्रमाणे जीवनव्यवहार चालवणारी माणसं एका क्षणातच मरून जातात ही कल्पनाच मोठी भयानक आहे. याप्रसंगी आपणही काही केले पाहिजे अशी भावना गुजरातेतील आणि गुजरातबाहेरील सर्व नागरिकांच्या मनात तेवत आहे. सरकार अधिकृत घोषणा करो ना करो ही राष्ट्रीय आपत्ती आहे, केवळ गुजरात, भूज आणि अहमदाबाद यांच्यावर कोसळलेले संकट नाही असे सर्वांनाच वाटते. चीनचे आक्रमण झाले त्यावेळी जसे उत्स्फूर्तपणे सर्व नागरिक मदतीला तयार झाले तसेच याहीवेळी मदतीसाठी लागणारी सर्व सामग्री, कपडे, पांघरुणे, खाद्यपदार्थ, पाणी, दूध, औषधे यांचा महापूर गुजरातकडे लोटत आहे. मृत्युचे असे अकांडतांडव भारतीयांनी पूर्वी कधी पाहिलेले नाही. नैसर्गिक आपत्तीत मदतीची व्यवस्था करण्याची जबाबदारी शेती मंत्रालयाची आहे. या मंत्रालयातील नियंत्रण कक्षाचे एक अधिकारी भूकंप उद्ध्वस्त प्रदेशाला भेट देऊन आले. 'मला जन्मात पुन्हा कधी शांत झोप येईल असे वाटत नाही' अशी त्यांची प्रतिक्रिया होती.

पंतप्रधान झाले तरी शेवटी माणूसच आहे. एक सारे राज्य असे उद्ध्वस्त झालेले डोळ्याने पाहिल्यावर हातचे काही राखून न ठेवता जे काही शक्य असेल ते झालेच पाहिजे असे कोणाही सहृदय माणसाप्रमाणे त्यांनाही वाटले. स्वतःच्या निधीतून ५०० कोटीची रक्कम त्यांनी मदत म्हणून जाहीर करून टाकली आणि वर मदत आणि पुनर्रचना यासाठी प्रचंड साधनसामुग्री उभी करावी लागेल त्याचा खर्चाचा बोजा सर्व नागरिकांना पेलावा लागेल. तस्मात् येत्या अंदाजपत्रकात यापोटी करवाढ करावी लागेल, त्यासाठी देशाने तयार रहावे असा इशाराही

त्यांनी देऊन टाकला. पंतप्रधानांच्या गुजरात भेटीच्या आदल्या दिवशीच वित्तमंत्री यशवंत सिन्हा यांनी काही दिवसातच सादर होणाऱ्या अंदाजपत्रकात गुजरातमधील खर्चासाठी करवाढ करण्याची आवश्यकता असणार नाही असा पत्रकारांना निर्वाळा दिला होता. पंतप्रधानांच्या घोषणेनंतर दुसऱ्याच दिवशी रेल्वेच्या अंदाजपत्रकातही भरकस दरवाढ होण्याची शक्यता असल्याचे भाकित काही पत्रकारांनी वर्तविले. ममता दीदींनी त्याचा लगेच इन्कार केला. पंतप्रधानांना अशी घोषणा करण्याचा अधिकार आहे, पण तरी काही मोठी दरवाढ होण्याची शक्यता नाही असे त्यांनी निक्षून सांगितले.

आज (२ फेब्रुवारी) सकाळच्या वर्तमानपत्रात ठळक मथळ्याची बातमी आहे सरकारी निर्णय झाला आहे. गुजरातवरील खर्चासाठी १३०० कोटी रु. आयकरावर नवी पट्टी लावून कर रूपाने गोळा करण्याचा निर्णय झाला आहे. २६ जानेवारीच्या भूकंपानंतर ही सगळ्यात मोठी दुर्दैवी घटना आहे.

पंतप्रधानांनी नव्या कर्जाच्या बोजासाठी देशाने कंबर कसण्याची आवश्यकता असल्याचे जाहीर केले आणि मुंबई शेअर बाजाराला हादरा बसला. दोन दिवस लागोपाठ शेअर बाजारातील किंमती उतरत गेल्या. एकूण खर्चाचा अंदाज रुपये २५००० कोटीच्यावर आहे. एवढे प्रचंड पुनर्बांधणीचे काम सरकारी यंत्रणेला पेलणारे नाही. सरकारने आपला पुनर्वसनाच्या कामातला हिस्सा १३०० ते १५०० कोटी इतकाच मर्यादित ठेवला तरीदेखील पुनर्वसनाच्या कामात सरकारी यंत्रणेचा हस्तक्षेप हीच मोठी एक राष्ट्रीय आपत्ती ठरेल. सौराष्ट्र, कच्छ हा सदा आपद्ग्रस्त राहिलेला भूप्रदेश आहे. पूर्वी कधीकाळी श्रीकृष्णाची द्वारका समुद्रात खचली आणि भूकंपाने सौराष्ट्राची भौगोलिक रचना उलट्या बशीप्रमाणे झाली. त्यामुळे सारा प्रदेश पाण्याच्या दुर्भिक्ष्याने ग्रसला गेला. वर्षानुवर्षे पावसाचा थेंबसुद्धा न दिसणाऱ्या या प्रदेशात नर्मदेचे पाणी आले तर भूगर्भातील पाणी वाढण्याची एक शक्यता होती. झारीतील शुक्राचार्यांनी तीही शक्यता संपवली. पिढ्यान्‌पिढ्या सौराष्ट्र कच्छमधील माणसे निर्वासित होऊन बाहेर पडत आहेत. निर्वासित समाज महामूर कर्तबगारी गाजवतात असा इतिहास आहे. पाण्याच्या अभावाने निर्वासित झालेली येथली मंडळी अहमदाबाद, सूरतसारख्या जवळच्या प्रदेशात, मुंबई कोलकत्तासारख्या शहरात एवढेच नव्हे तर जगभर पसरली. व्यापार उदीम करून धनाढ्य झाली. तरीही त्या सर्वांच्या मनात आपल्या मूळच्या प्रदेशाविषयी प्रचंड प्रेम आणि निष्ठा आहे. गेल्या वर्षी सौराष्ट्रावर दुष्काळाचे संकट आले. गावोगावी पाणलोट क्षेत्राचे तंत्र वापरून पाणी उपलब्ध करून

देण्यासाठी हजारो निर्वासित मायदेशी परतले आणि त्यांनी प्रचंड संख्येने योजना राबवल्या. इतक्या मोठ्या प्रमाणावर भूगर्भातील पाणी वाढवण्याच्या योजना राबविण्यात आल्या की त्यामुळेच हा भूकंप घडला असे कोणी शहाणा म्हणू न लागो म्हणजे झाले!

भूकंपाच्या धक्क्यानंतर ८-१५ दिवस दगडमातीच्या ढिगाऱ्यातून माणसं किंवा प्रेते काढणे आणि जगून वाचून राहिलेल्यांना अन्न, वस्त्र, औषधांचा पुरवठा करणे एवढेच महत्त्वाचे काम असते. ढिगारे उपसण्याचे काम मोठे जिकिरीचे आणि कौशल्याचे काम आहे त्यासाठी विशेष साधनसामुग्री लागते. हे काम अग्निशामक दल, पोलीस किंवा लष्कर आणि लष्करी संघटना यांच्याच आटोक्यातले आहे, ते त्यांनीच करायला पाहिजे. या पहिल्या काळात इतर ऐऱ्यागैऱ्यांनी आणि हौशा नवशा गवशा संघटनांनी आपद्ग्रस्त भागात फारशी लुडबुड करायला जाऊ नये हे योग्य. गुजरातमधून येणाऱ्या बातम्यांवरून मदतीचे काम खाजगी संघटनाच कसोशीने करत आहेत. सरकारी यंत्रणा वेंधळेपणाने काम करते आहे असे दिसते. यापुढील कामही प्रशासनामार्फत चांगले होईल अशी आशा व्यर्थ आहे. भूकंपाच्या धक्क्यातून सावरून जबाबदार नेत्यांनी आता शांतपणे विचार करून गुजरातच्या पुनर्बांधणीची व्यूहरचना करायला पाहिजे.

बांगलादेशच्या युद्धाच्या वेळी निर्वासितांच्या लोंढ्यांची व्यवस्था करण्यासाठी इंदिरा गांधींनी टपाल खात्याच्या हशीलापासून ते आयकर, मालमत्ताकरांपर्यंत करवाढ केली. तेव्हापासून चलनवाढीचे भूत अर्थव्यवस्थेच्या बोकांडी बसलेले आहे ते अजूनही उतरलेले नाही. करवसुली करून प्रशासनामार्फत पुनर्बांधणी होणे नाही. ५-१० टक्के करू गेले तरी त्यामुळे साऱ्या अर्थव्यवस्थेवर विपरीत परिणाम होईल.

गुजरात म्हणजे काही बिहार, बंगाल नाही. हा उद्योजकांचा प्रदेश आहे. काही आठवड्यातच सौराष्ट्र आणि कच्छमधील मंडळी नव्या उमेदीने आपापल्या पायावर उभे राहण्याच्या प्रयत्नाला लागली. हताशपणे सरकार काही मदत देते काय असे आशाळभूतपणे पाहणारी ही मंडळी नाही. निर्वासित झालेले त्यांचे गावबांधव एकेका गावाच्या, तालुक्याच्या पुनर्बांधणीसाठी धावून येणार आहेत. नवीन बांधणी करताना ती अगदी सर्वोत्कृष्ट असावी असा त्यांचा आग्रह असणार आहे. त्यांच्या या उपक्रमाने देशाची अर्थव्यवस्था बिघडणार नाही, उलट मजबूत होणार आहे. परकीय चलन देशात येणार आहे. एवढे नव्हे तर सिमेंट, लोखंड इ. जुन्या उद्योगधंद्यांची मागणी वाढल्याने त्यांचीही भरभराट होण्याची शक्यता

आहे.

थोड्याच वर्षात एक नवे आधुनिक सौराष्ट्र आणि कच्छ उभे राहणार आहे. देशातील सर्व राज्यांना गिरवण्याचा कित्ता वाटावा असा नवा सौराष्ट्र, कच्छ उदयास येणार आहे.

एका काळी लंडन शहर गल्ल्याबोळ आणि जुनाट इमारतींनी गजबजले होते. रोगराई वाढत होत्या. इतिहासप्रसिद्ध अग्निप्रलयाने लंडन जळून खाक झाले आणि त्या राखेतून आजच्या वास्तुशास्त्रात आदर्श मानल्या जाणाऱ्या लंडनचा उदय झाला.

सारा गुजरातही अशी झेप घेण्याची कुवत राखून आहे. कदाचित काही वर्षांत भूकंप ही इष्टापत्ती वाटू लागेल आणि भूकंपापूर्वी सारे कसे गचाळ होते आणि आता नवे कसे सुंदर उभे राहिले आहे अशी भाषा सुरू होईल. गुजराती समाजाच्या कर्तबगारीवर पुनर्बांधणीचा प्रश्न सोपवण्यात आला तर काम झपाट्याने होईल, चांगले होईल; देशावर बोजा न पडता होईल. अर्थव्यवस्थेची भरभराटही साधेल. याउलट, प्रशासनाने सारे आपल्या हाती घ्यायचे म्हटले तर अर्थव्यवस्था कमजोर होईल, पुनर्बांधणीचे कामही होणार नाही.

फिनिक्स पक्षाप्रमाणे राखेतून उठून उड्डाण करण्याचे सामर्थ्य गुजरातमध्ये आहे. शासनाने दुराग्रह केला नाही तर गुजरात यापुढे दगडामातीच्या ढिगाऱ्यातून उठून नवे उड्डाण घेऊ शकतो. सरकारने मोकळीक दिली तर!

*(६ फेब्रुवारी २००१)*

◆◆

# ‘कोटा’ राज्य संपले, ‘कोटा’ राज्य चालूच आहे

१ एप्रिल, २००१ हा दिवस नेहमीप्रमाणे उगवला, नेहमीप्रमाणे मावळला; कोठे धरणीकंप झाला नाही, कोठे जगबूड आली नाही. सकाळ संपता संपता दिल्ली येथील विज्ञानभवनात व्यापार व उद्योगमंत्री श्री. मुरासोली मारन त्यांच्या दोन राज्यमंत्र्यांसह आले आणि आयातनिर्यातविषयक नवे धोरण जाहीर करण्यासाठी भाषण करायला उभे राहिले.

त्या दिवशी देशात उत्पात झाला, वावटळ उठली; पण, त्याचा संबंध व्यापारमंत्र्यांच्या निवेदनाशी नव्हता, जागतिक व्यापारसंस्थेशी तर नाहीच नाही. मुंबईच्या शेअर बाजारात केतन पारेखच्या रूपाने नवा हर्षद मेहता उभा राहिला की काय? शेअर बाजारातील किंमतीची घसरण कोणत्या पायरीपर्यंत गडगडणार? छोट्यामोठ्या गुंतवणूकदारांना किती हजार कोटी रुपयांचा फटका बसणार? या साऱ्या प्रश्नचिन्हांनी अनेकांच्या पोटात गोळा उभा राहिला होता. सकाळी सकाळी कस्टम खात्याच्या सर्वोच्च अधिकाऱ्याच्या घरावर आयकर अधिकाऱ्यांनी धाड घातली आणि वित्तमंत्र्यांनी महसुलासंबंधी सर्वात मातबर अधिकाऱ्याला लगेच निलंबित केले यामुळेही प्रचंड खळबळ माजली. भ्रष्टाचार आणि भानगडी यांचा सर्वसामान्य नागरिकांच्या मनावर आता फारसा परिणाम होत नाही; एक प्रकारची बधीरता आली आहे. इकडचा जॉर्ज गेला, तिकडचा जॉर्ज चालला. आता, दररोज कोण कोण जातो आणि कोण कोण राहतो ते, शक्य तो डोके शांत ठेवून, पहाणे व ऐकणे याखेरीज आपल्या हाती काय आहे अशी ‘दुःखेषु अनुद्विग्नमनाः’ स्थितप्रज्ञ वृत्ती भल्याभल्यांनीसुद्धा धारण केली आहे.

याउलट, १ एप्रिल २००१ रोजी समाजवादाच्या काळापासून चालत आलेल्या लायसेन्स-परमिट-कोटा राज्यातील लायसेन्स राज्य संपणार याचा आधी खूपच गाजावाजा झाला होता. आयातीवरील निर्बंध उठले म्हणजे सर्व प्रकारचा माल

परदेशांतून आपल्याकडे महापुरासारखा घोंगावत येईल आणि त्यात भारतातील उद्योगधंदे आणि शेतीसुद्धा वाहून जाईल, नष्ट होईल अशी सगळीकडे धाकधूक पसरली होती.

विज्ञानभवनात व्यापार उद्योगमंत्री उठले, त्यांनी आपल्या भाषणाला सुरुवात केली. अर्थमंत्री दरवर्षी लोकसभेत अंदाजपत्रक सादर करतात. दोन तासांच्या त्यांच्या भाषणाच्या कालावधीत हिंदुस्थानभरच्या साऱ्या प्रसिद्धिमाध्यमांचे डोळे त्यांच्यावर खिळलेले असतात. त्यांचे भाषण शब्दशः जनतेपर्यंत पाहोचवले जाते. भाषण चालू असतानाच दूरदर्शनच्या आणि इतर वाहिन्यांच्या केंद्राकेंद्रांत अर्थशास्त्रज्ञ, कारखानदार, व्यापारी अशी जाणकार मातबर मंडळी चर्चेकरिता जमवली जातात. वित्तमंत्र्यांच्या तोंडून एखादा प्रस्ताव बाहेर पडताच किंवा पडण्याच्याही आधी प्रश्नोत्तरांच्या, चर्चांच्या फैरी झडतात. उद्योगमंत्र्यांच्या भाषणाच्या वेळी असा काहीच झगमगाट विज्ञानभवनात नव्हता. मंत्रीमहाशयांच्या मनात याची जाणीव कुठेतरी सलत असावी. परंतु, अपेक्षेप्रमाणे सभेला गर्दी जमली नाही तरीदेखील आपले नियोजित भाषण पूर्ण करणाऱ्या पुढाऱ्याप्रमाणे त्यांनी आपले भाषण पुरे केले. वित्तमंत्र्यांच्या थाटानेच, आपली प्रत्येक घोषणा प्रचंड महत्त्वाची आहे याची लोकांनी नोंद घ्यावी असा त्यांचा मोठा प्रयत्न चालू होता.

तसे पाहिले तर व्यापारमंत्र्यांनी लोकसभेत आयात-निर्यात धोरण जाहीर करावे अशी प्रथा पाडणे योग्य ठरेल. अर्थव्यवस्थेचे दोन भाग आहेत - देशांतर्गत व्यापार आणि परदेशी व्यापार. वित्तमंत्र्यांच्या अंदाजपत्रकाचा प्रभाव दोन्ही भागांवर पडतो तसेच व्यापारमंत्रालयाचे आयात-निर्यात धोरणसुद्धा आंतरराष्ट्रीय व्यापाराखेरीज देशातील आर्थिक चलनवलनावर मोठा प्रभाव पाडते. आयात-निर्यात धोरण दरवर्षी जाहीर होत नाही; एक पंचवार्षिक धोरण ठरते आणि त्यात आवश्यक वाटणारे बदल दरवर्षी 'एप्रिल फूल'च्या दिवशी जाहीर करण्यात येतात.

चालू पंचवर्षीय आयात-निर्यात धोरणाचे शेवटचे वर्ष चालू झाले आहे, तेव्हा त्यात काही फार मोठा बदल घडेल अशी कोणाची अपेक्षा नव्हतीच. चालू वर्षाच्या पहिल्या सात महिन्यांत भारताच्या निर्यात व्यापारात, जगातील एकूण व्यापार ज्या गतीने वाढला त्याच्या दुप्पट गतीने वाढ झाली. तेव्हा काही ऱ्हस्वदीर्घाचे बदल आणि काही किरकोळ फेरफार सोडल्यास काही विशेष ऐकायला मिळेल किंवा घडेल ही शक्यताच नव्हती.

विज्ञानभवनात जमलेल्या साऱ्यांचे लक्ष लागले होते ते मंत्रीमहाशय आयातनिर्बंधासंबंधी काय घोषणा करतात याकडे. शेवटचे ७१५ आयातनिर्बंध

इतिहासजमा करण्याचे काम व्यापारमंत्री पार पाडतात का काही रडकीफुसकी कारणे सांगून काही चालढकल करतात की काय, 'राष्ट्रीय सुरक्षा', 'गरीबांना संरक्षण' असली काही रडगाणी गातात की काय यावरच सगळ्यांचे लक्ष होते. व्यापारमंत्र्यांनी आयातनिर्बंधांचा मुद्दा चतुर मुत्सद्द्याप्रमाणे भाषणाच्या शेवटापर्यंत टांगून ठेवला आणि शेवटी थोडक्यात सांगून टाकले की, 'कोटा'राज संपले आहे. अर्थशास्त्रात आपण अगदीच अनभिज्ञ नाहीत याची स्वतःलाच खात्री पटवून देण्याकरिता त्यांनी जगदीश भगवती आणि क्रूजेर इत्यादी अर्थशास्त्रज्ञांची अवतरणे देऊन, आयातीवरील निर्बंधांमुळे देशाचे कसे नुकसान होते, साऱ्या जगातील व्यवस्थेची कशी हानी होते हे पटवून दिले. 'कोटा'राज्य बुडाल्याची ऐतिहासिक जबाबदारी एकट्या आपल्यावरच पडू नये याकरिता, "१९९६ सालापासून १०२०२ निर्बंध टप्प्याटप्प्याने कमी करीत, गेल्या वर्षी ७१४ निर्बंध संपल्यानंतर आता फक्त ७१५ शिल्लक आहेत. माझे काम फक्त उंटाच्या पाठीवर शेवटची काडी टाकण्याचे आहे. उंटाचे काही बरेवाईट झाल्यास आपल्या कानी सात खडे" अशा आविर्भावात, "गेल्या वर्षी ७१४ निर्बंध उठले त्याचा कोणताही भयानक परिणाम दिसून आला नाही हे अहवालावरून स्पष्ट होते. तेव्हा, शेवटच्या ७१५ आयातनिर्बंधांचे विसर्जन करताना, खरे म्हटले तर, काही नवीन देखरेखीची, संरक्षणाची व्यवस्था उभी करण्याची काही आवश्यकता नव्हती. जगात आता बांगलादेश, पाकिस्तान, श्रीलंका आणि ट्युनिशिया हे देश सोडल्यास कोणत्याही देशात आयातीवरील निर्बंध शिल्लक नाहीत. भारताने आता असल्या राष्ट्रांची साथसंगत सोडून भद्र राष्ट्रांची सोबत धरावी" हेही त्यांनी ठासून सांगितले.

पण, त्याबरोबरच 'हात दाखवून अवलक्षण' कशाला? आपली तयारी असावी म्हणून त्यांनी काही विशेष आर्थिक संरक्षणाच्या नव्या व्यवस्था मांडल्या.

१. गहू, तांदूळ, मका, पेट्रोल, डिझेल, युरिया इत्यादी माल आयात करण्याचा अधिकार फक्त सरकारने नेमलेल्या संस्थांनाच राहील. अशा संस्थांनी आयातीचा कारभार पूर्णतः व्यापारी तत्त्वाने करावयाचा आहे, म्हणजे सरकारी आदेशाप्रमाणे नाही.

२. वनस्पतीजन्य आणि प्राणिजन्य पदार्थांच्या आयातीसाठी 'कोटा' नाही पण, परमिट लागेल. हे परमिट कृषीमंत्रालयातील संबंधित विभागाने द्यायचे आहे.

३. आडगिऱ्हायकी मोटारगाड्या आयात करण्यासाठी काही कडक अटी घालण्यात आल्या आहेत. आणि,

४. आयातनिर्बंध उठल्यानंतर काही संकट तर ओढवत नाही ना यावर डोळ्यात तेल घालून निगराणी ठेवण्यासाठी एक 'युद्धनियंत्रण कक्ष' तयार करण्यात आला आहे.

व्यापारमंत्र्यांनी, कागदोपत्री का होईना, 'कोटा' राज्य संपवले याबद्दल त्यांचे अभिनंदन करायला पाहिजे. 'कोटा' राज्य संपवताना, नवीन सुरक्षा व्यवस्था उभी करण्याची देशाच्या हिताच्या दृष्टीने काही आवश्यकता होती असे दिसत नाही; पण, 'अधिकस्य अधिकम् फलम्' या उक्तिप्रमाणे ज्यादा बंदोबस्त ठेवण्यात काही चूक नाही, जाणती राजकारणी माणसे हे करणारच!

अन्नधान्य आणि युरिया यांची आयात अधिकृत यंत्रणेमार्फतच करता येईल ही तरतूद मात्र न समजण्यासारखी आहे. गॅट करारातील १७ व्या कलमानुसार अशी तरतूद करता येते हे खरे, पण आपल्या देशात अशी तरतूद करावी लागली याची कारणे व्यापारसंबंधी काही 'संस्थांनां'ची जबरदस्त ताकद हे एक, आणि रासायनिक खतांसंबंधी शासनाला अजूनही खंबीरपणे धोरण ठरविता आले नाही हे दुसरे.

'कोटा' राज्य संपलेले नाही, आयातीतील 'कोटा' राज्य संपले आहे. शेतीमालाच्या निर्यातीवरील सर्व बंधने जशीच्या तशी कायम आहेत; निर्यात 'कोटा' आहे, निर्यात मालाच्या किमान किंमतीसंबंधी नियम आहेत, अधिकृत निर्यातयंत्रणांची मक्तेदारी आहे, सर्व काही तसेच आहे

थोडक्यात, जागतिक व्यापार संस्थेच्या कराराचे जोखड शासनाच्या मानेवर पडले म्हणून शेतकऱ्यांच्या गळ्यामधील फासाचा एक तिढा सुटला आहे. जागतिक व्यापार संस्थेचा करार निर्यातीवरील बंधने काढा असे सांगत नाही; उलट, निर्यातीला अनुदाने देऊ नका असे सांगतो. कारण, कोणत्याही देशाचे शासन आपल्या शेतीमालाची निर्यात अडवू पहाण्याइतके खुळे असेल याची त्यांना कल्पना नसावी!

आपल्याकडे, अतोनात पिकले म्हणजेच निर्यातीचा विचार करायचा असे शासनाचे धोरण राहिले आहे. आपण तुडुंब खाल्ले म्हणजे उरलेले अन्न जगाला द्यायला हरकत नाही अशी आमच्या विद्वानांची कल्पना; 'आम्हाला सरत नाही तेव्हा इतर देशांनी आमचा माल विकत घेतला पाहिजे' या तत्त्वावर सारे निर्यातधोरण वर्षानुवर्षे चालले आहे. असे केले नाही तर देशातील बाजारपेठेत किंमती भडकतील आणि ग्रहक कोपायमान होईल याची धास्ती नियोजकांना सतत पडलेली असते. साहजिकच, शेतकऱ्यांच्या गळ्याभोवतीचा निर्यातबंदीचा फास

१ एप्रिल २००१ नंतरही कायम राहिला आहे.

व्यापारमंत्र्यांनी 'राज्यशासनांनी निर्यातीला उत्तेजन देणारी विशेष सवलतींची क्षेत्रे जागोजाग उभी करावी' असे 'हलवायाच्या घरावर तुळशीपत्र' ठेवून दिले आहे. त्यासाठी राज्यशासनांनी पैसा आणावा कोठून? आणि, 'निर्यातबंदी आता आहे, आता नाही' असा छापापाणीचा खेळ चालू राहिला तर अशा योजना राबवूनही काय फायदा होणार?

'कोटा' राज्य संपले; 'मोले घातले रडाया' म्हणून संपले, खुल्या व्यवस्थेच्या निष्ठेने नाही. निर्यातीवरील निर्बंध हटायचे असतील तर शेतकऱ्यांनी रुमणे हाती घेऊन बाहेर पडल्याखेरीज गत्यंतर नाही.

*(६ एप्रिल २००१)*

◆◆

# तंत्रज्ञानाचे अग्निदिव्य

११ मे २००१ रोजी विज्ञान आणि तंत्रज्ञान मंत्रालयाच्या आदेशाप्रमाणे 'तंत्रज्ञान दिवस' साजरा व्हायचे ठरले होते. प्रत्यक्षात कोठे एखादा किरकोळ सभासमारंभ झाला असेल. माझ्या तो नजरेत आला नाही; इतर कोणाच्याही आला नसावा. त्या दिवशी सकाळच्या वर्तमानपत्रात भली पानभर जाहिरात मात्र नजरेत भरली. एक पानी जाहिरात म्हणजे कित्येक लाखांचा खर्च; पण कोणत्याही केंद्रीय मंत्रालयाला असल्या खर्चाची फारशी फिकीर वाटत नाही. नागरिकांत उत्साह असल्याखेरीज कोणतेही कार्यक्रम यशस्वी होत नाहीत; जाहिरात दिल्याने खुर्चीत बसल्या बसल्या प्रसिद्धीचे काम होऊन जाते.

जाहिरातीच्या अग्रभागी उपराष्ट्रपती व स्वतः पंतप्रधान यांचे फोटो आणि त्यांच्या बरोबरच मानवसंसाधन विकास, विज्ञान आणि तंत्रज्ञान व सागरी विकास मंत्री डॉ. मुरलीमनोहर जोशी आणि शेवटी विज्ञान आणि तंत्रज्ञान विभागाचे राज्यमंत्री बाची सिंग रावत यांचे फोटो आणि संदेश.

झपाट्याने एक होणाऱ्या जगात तंत्रज्ञानातील सामर्थ्य जोपासायचे असेल तर आपल्या नीतिमूल्यांची सातत्याने तपासणी करावी लागेल. – कृष्णकांत, उपराष्ट्रपती

नवीन शतकात विज्ञान, तंत्रज्ञान, उद्योग, व्यापार, समाज, शासन आणि पर्यावरण यांचा संगम महत्त्वाचा ठरणार आहे. – अटलबिहारी वाजपेयी, प्रधानमंत्री

भविष्यातील ज्ञान हे सामाजिक गरजांशी निगडित असले पाहिजे. त्यात माणुसकीची जोपासना पाहिजे आणि त्यातून टिकाऊ तंत्रज्ञान उपजले पाहिजे. – मुरली मनोहर जोशी, मानसंसाधन विकास, विज्ञान आणि तंत्रज्ञान व सागरी विकास मंत्री

आज सतत विकसनशील, प्रसरणशील आणि परिवर्तनशील अशा विविध व संयुक्तिक तंत्रज्ञानांची जोपासना ही आत्यंतिक गरज आहे. – बाची सिंग रावत,

विज्ञान आणि तंत्रज्ञान राज्यमंत्री

र्टींच्या खालोखाल संस्कृतातील एक वैदिक प्रार्थना. नुसते 'शांतिः शांतिः शांतिः' असे नेहमीप्रमाणे न म्हणता आकाश, अंतरिक्ष, पृथ्वी, पाणी, औषधी वनस्पती इत्यादी इत्यादी अशी मोठी यादी जोडली आहे आणि या सर्वांना 'शांती असो' अशी ही प्रार्थना.

'तंत्रज्ञान दिवस' साजरा करायचा तर त्यासाठी 'तमसो मा ज्योतिर्गमय,' अशी गतिशील प्रार्थना अधिक उचित झाली असती. शासकीय तंत्रज्ञानाच्या नेतृत्वाला प्रगतीपेक्षा शांतीची आस अधिक असावी. जाहिरातीतील वेगवेगळ्या मथळ्यांत तंत्रज्ञान कसे असले पाहिजे यासंबंधी काही घोषणावाक्ये आहेत. उदाहरणार्थ,

'तंत्रज्ञान शोषणविरहित असले पाहिजे'

'तंत्रज्ञान पर्यावरणसुष्ट असले पाहिजे'

'पर्यावरण नवनवोन्मेषशाली असले पाहिजे'

'पर्यावरण सर्वार्थाने उचित पाहिजे.'

सारी एकूण प्रसिद्धी पाहिली की, हा सारा खटाटोप तंत्रज्ञानाचे सामर्थ्य आणि माहात्म्य सांगण्याकरिता आहे की त्याला जेरबंद करण्याकरिता आहे यासंबंधी मनात संभ्रम तयार व्हावा.

सारे जग जैविक तंत्रज्ञानाच्या नव्या क्षेत्रात प्रवेश करते आहे. चीन, ब्राझीलसारख्या देशांतही काही पिकांखालील निम्म्यावर जमीन जैविक बियाण्यांखाली गेली आहे. या तंत्रज्ञानाच्या आधाराने तयार झालेल्या स्वस्त वरचढ मालाशी स्पर्धा करणे भारतीय शेतकऱ्यांना अशक्यप्राय झाले आहे याचा या प्रसिद्धीत कोठे उल्लेखही नाही.

अनेकांच्या मनांत 'तंत्रज्ञान' हा अभद्र शब्द झाला आहे. ठेंगू लोकांच्या देशात गलिव्हर खलाशी शिरल्यावर या अजस्र माणसाला शक्यतो निष्प्रभ कसे करता येईल याची चिंता साऱ्या ठेंगूंना पडली तद्वत, काय वेगवेगळ्या प्रकारांनी खटपट करावी म्हणजे आपल्या संकल्पनांची इस्त्री बिघडणार नाही याचीच प्रमुख चिंता तंत्रज्ञानविरोधी भारतीयांना वाटत आहे. जबाबदार नेत्यांची वर दिलेली अवतरणे हीच बुद्धी दाखवितात.

*तंत्रज्ञानाचा असा दुस्वास का?*

प्रतिभेच्या स्पर्शाला वंचित राहिलेल्या सामान्य जनांना आणि धडाडीविषयी दडस असलेल्या जनसामान्यांना प्रतिभेचा उन्मेष आणि पराक्रम यांच्याविषयी

नेहमीच छुपा दुस्वास वाटतो. संशोधक, यशस्वी कारखानदार, व्यापारी यांच्याविषयी काहीतरी खोडी शोधून त्यांना दूषणे देण्याची आपली परंपरा फार जुनी आहे.

'तंत्रज्ञान चांगले हो, पण गरीबांचे काय? निसर्गाचे काय' असे प्रश्न ते विचारतात आणि यच्चयावत् प्रतिभाशून्यांचे आवडते जीवनमूल्य 'विषमता निर्मूलन' याचा आधार घेऊन ते आघाडीवर जाणाऱ्यांचे पाय ओढू पाहतात.

तंत्रज्ञानाचे विरोधक सर्वत्र आढळतात. ते जेट विमानांतून प्रवास करतात; इंटरनेट, इ-मेलवर एकमेकांशी संपर्क साधतात; हातातील मोबाईल फोन एखाद्या निशाणाप्रमाणे फडकावतात; अत्याधुनिक सुसज्ज रुग्णालयात औषधोपचार घेतात आणि तेथील उपचाराने जीव वाचवत असताना आधुनिक उपचारव्यवस्था आणि तंत्रज्ञान यांच्यावर निःसंकोचपणे दुगाण्या झाडीत असतात. तंत्रज्ञानाचे विरोधक तंत्रज्ञानाच्या रसाळ फळांचा निग्रहाने त्याग करून विरक्त बुद्धीने जगणारे साधुसंन्यासी नाहीत; ज्या हाताने भरविले त्यालाच चावणारी ही जमात आहे.

'माल्थस'पासून ते 'रोम क्लब'च्या अर्थशास्त्रज्ञांपर्यंत अनेकांनी 'पृथ्वीला आता माणसांचा भार असह्य होतो आहे' अशी हाकाटी दिली आणि मोठ्या उत्पाताचे इशारे दिले. प्रत्यक्षात लोकसंख्या प्रचंड वाढली तरी इतिहासातील कोणत्याही कालखंडापेक्षा आज, अगदी सामान्य-जनसुद्धा अधिक चांगले खातात, पितात आणि जगतात. केवळ पस्तीस वर्षांपूर्वी हिंदुस्थान अन्नधान्याच्या भिकेवर जगत होता. पाचदहा वर्षांत तो अन्नधान्यात स्वयंपूर्ण झाला याला कारण कोणी सरकार नाही, तर हरित क्रांतीचे तंत्रज्ञान आहे. पूर्वी माणसे भर विशीतिशीत आजाराने, साथीच्या रोगाने मरून जायची; आज आयुष्यमान दुप्पट झाले याचा वरदाता वैद्यक तंत्रज्ञान आहे, कोणतीही सरकारी योजना नाही.

हिंदुस्थानातील बहुसंख्य स्त्रियांचे पुरे आयुष्य पाणी भरण्यात आणि सरपण जमा करण्यात जाते. स्वातंत्र्यानंतरच्या पन्नास वर्षांत या मायबहिणींच्या आयुष्यात काही थोडा दिलासा आला असेल तर तो तंत्रज्ञानाने बहाल केलेल्या शिवणयंत्राने, पिठाच्या गिरणीने आणि इंजिन किंवा मोटर यावर चालणाऱ्या पाण्याच्या पंपाने.

मग, अशा 'सर्वहितेषु' तंत्रज्ञानाचा इतका व्यापक रागराग का होतो?

पोपट गोड बोलतो, त्याच्या नशिबी पिंजरा येतो; स्त्रिया प्रजनन करतात, त्यांना दुय्यम स्थानी ठेवले जाते; शेतकरी एका दाण्याचे शंभर दाणे करतात, त्यांना वेठीस धरले जाते. या सर्वांप्रमाणेच तंत्रज्ञान गुणाकारी असते, कदाचित् याच कारणाने त्याचा द्वेष सारे अनुत्पादक वर्ग करीत असतात.

सूर्योदयाला विरोध करणारी ही जात काही नवीन नाही. आदिमानवाने चाकाचा

शोध लावला त्या वेळीही ‘या चाकाने प्रचंड गती येईल, मनुष्यजातीचा विनाश ओढवेल’ असा आरडाओरडा करणारे आजच्या पर्यावरणवाद्यांचे पूर्वज त्याही वेळी नक्की असतील. वाफेचे इंजिन झुक झुक करीत रुळांवर धावू लागले तेव्हातर पर्यावरणाच्या नावाखाली तंत्रज्ञानाच्या विरोधकांनी हैदोस घातला. जैविक तंत्रज्ञान उदयाला येत असताना त्याला विरोध करणारे हे प्रमुखतः गतिविरोधी परंपरेतील आहेत. इतिहासाने यांना प्रत्येक पायरीला खोटे ठरविले आणि माणसाच्या प्रगतीची दिशा नवनवोन्मेषशाली विज्ञानात आहे हे दाखवून दिले; पण, हे पठ्ठे काही नवे शिकायलाच तयार नाहीत.

सर्व मानवजातीच्या कल्याणाकरिता कामी आलेली एकमेव गोष्ट म्हणजे तंत्रज्ञान. जानकीच्या विशुद्धतेविषयी संशय घेऊन तिला अग्निदिव्य करायला लावणाऱ्यांची जमात आजही तंत्रज्ञांच्या भूमिकन्येस तिच्यावर भलतेसलते आळ घेऊन अग्निदिव्यास सामोरे जाण्यास भाग पाडीत आहेत. याला आघाडीवरील वैज्ञानिक काही प्रमाणावरतरी जबाबदार आहेतच. त्यांना ती जबाबदारी नाकारता येणार नाही.

संशोधनाच्या प्रचंड शर्यतीत एकजण जिंकतो, बाकी सारे अनामिक होऊन जातात, अयशस्वी प्रेमवीराप्रमाणे त्यांतील अनेकजण प्रियवस्तूंचा घात करायला तयार होतात. जैविक तंत्रज्ञानाला युरोपीय देशांत कडवा विरोध होतो. जर या तंत्रज्ञानातील महत्त्वाचे श्रेय अमेरिकेतील शास्त्रज्ञांऐवजी युरोपीयन शास्त्रज्ञांना मिळाले असते तर हा विरोध उपजलाच नसता, कदाचित्.

एका काळी तंत्रज्ञानाच्या आघाडीवर असलेले नवीन तंत्रज्ञान आले म्हणजे जीवाच्या आकांताने त्याला विरोध करतात. हरित क्रांतीच्या तंत्रज्ञानाच्या काळात ज्यांनी रासायनिक खते व औषधे या उद्योगधंद्यात अफाट पैसा कमावला, ते जैविक तंत्रज्ञानाने आपल्या पोटावर पाय येतो अशी भीती वाटताच सारा पैसा जैविक तंत्रज्ञानाच्या विरोधकांच्या पाठिंब्यासाठी खर्चू लागले.

मागे पडलेले आणि कालबाह्य झालेले शास्त्रज्ञ शास्त्रच उद्ध्वस्त करायला निघालेल्यांशी हातमिळवणी करायला निघतात हे दुर्दैव खरे; पण त्याही पलिकडे, यशस्वी शास्त्रज्ञांनीही विज्ञानयुगास आवश्यक अशी कामगिरी बजावण्यास कुचराई केली आहे. अगदी गेल्या शतकापर्यंतच्या मोठ्या शास्त्रज्ञांचे लिखाण वाचले तर त्यांनी, कामगिरीच्या संदर्भात का होईना, एक विश्वदर्शन उभे करण्यासाठी चिंतन केलेले दिसते. समाजव्यवस्थेविषयी काही निष्कर्ष काढलेले दिसतात. काही अपवाद सोडल्यास नवनवीन विज्ञान आणि तंत्रज्ञान यांच्या दार्शनिक

निष्कर्षाचा शोध बाजूस पडला आहे. नव्या शास्त्रज्ञांना, कदाचित् असल्या प्रश्नांकडे लक्ष देण्यासाठी सवड नसावी; पण विज्ञान आणि तंत्रज्ञान यांच्या प्रगतीसाठी स्वातंत्र्य आणि विज्ञानदृष्टी प्राणपणाने जपणे व त्यासाठी, आवश्यक तर, सामाजिक, राजकीय संघटन आणि संघर्ष अपरिहार्य आहे.

ही सामाजिक जबाबदारी वैज्ञानिकांनी पेलली नाही आणि ते केवळ नवनवे संशोधनच करीत राहिले तर त्यांची स्थिती उत्तमोत्तम बियाणे तयार करून जमिनीच्या मशागतीची काळजी न करणाऱ्या शेतकऱ्याप्रमाणे होईल. तंत्रज्ञानाविषयी समाजात दुस्वास आहेच; तो असाच वाढू दिला तर सध्या जैविक बियाण्यांच्या प्रायोगिक शेतीवर हल्ले होतात, उद्या प्रतिभाशून्यांच्या झुंडी साऱ्या विज्ञानशाळांना नष्ट करण्यासाठी घोंघावू लागतील. शेवटी सीतेप्रमाणेच तंत्रज्ञानालाही 'भूमिमाते, मला तुझ्या पोटात घे' म्हणण्याची वेळ न येवो!

*(२१ मे २००१)*

◆◆

# स्वातंत्र्य म्हणजे न्याय, न्याय म्हणजे स्वातंत्र्य

## लाल किल्ल्यावरून

भारतीय स्वातंत्र्याचा पंचावन्नावा वाढदिवस, जणू सर्व देशभर छुपी लढाईच चालू आहे अशा, कडक बंदोबस्तात, पण पार पडला. अगदी आणीबाणीसारख्या परिस्थितीतही शासन स्वातंत्र्यदिनाच्या ध्वजवंदनाचे औचित्य आणि राष्ट्रध्वजाचा सन्मान राखू शकते हे सिद्ध झाले.

खुद्द पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी, गृहमंत्री लालकृष्ण अडवानी आणि संरक्षणमंत्री यांच्यावर हल्ला करण्याचे मनसुबे काही दहशतवादी संघटनांनी खुलेआम जाहीर केले होते. कितीही कडेकोट बंदोबस्त असला तरी जीवावर उदार होऊन निघालेल्या आत्मघाती घातपात्यांना निश्चयपूर्वक थांबवणे कठीण असते. या स्वातंत्र्यदिनी देशापुढे काय ताट वाढून ठेवले आहे याची मोठी धाकधूक सर्वांनाच वाटत होती. प्रधानमंत्रीसुद्धा आपल्या निवासस्थानातून लाल किल्ल्याकडे निघाले ते, परत दर्शन होईल किंवा नाही अशा भावनेत कुलदैवताला प्रणाम करूनच निघाले असले पाहिजेत.

पण, सगळे काही व्यवस्थित पार पडले. घड्याळांच्या काट्यांबरहुकूम पंतप्रधानांचे आगमन झाले, मानवंदना झाली, झेंडा फडकावला गेला, पंतप्रधानांनी भाषण केले; दहशतीच्या वातावरणामुळे भाषण आटोपते घेतले असा अपवाद नको म्हणून काहीसे लांबटच भाषण केले. काश्मीरबद्दल पाकिस्तानला उद्देशून खंबीर भाषा वापरणे अपेक्षितच होते. पंतप्रधानांच्या भाषणाचा हा भाग भोवतालच्या दहशतवादाच्या वातावरणात अधिक प्रकर्षाने ओजस्वी वाटला. मग, आर्थिक, सामाजिक प्रश्नांकडे ते वळले. थोडेथोडके नाही, दहा नवीन कार्यक्रम त्यांनी जाहीर केले. त्यात अभिनव किंवा प्रतिभाशाली असे फारसे काही नव्हते. अभ्याससमित्या नेमल्याने आता कोणी फसत नाही म्हणून कार्यदले नेमून झाली;

सरकारी यंत्रणेच्या रामरगाड्यात तीही फिकी पडली; तेव्हा आता 'रॅपिड ॲक्शन फोर्स' म्हणजे 'त्वरित कार्यान्वय दलां'चा उल्लेख झाला; पण त्या घोषणेनेही कोण्या श्रोत्याच्या अंगावर रोमांच उभे राहिले नाहीत किंवा आता खरेच काही घडेल अशी अपेक्षाही तयार झाली नाही.

**रामाय स्वस्ति, रावणाय स्वस्ति**

१४ ऑगस्टच्या रात्री राष्ट्राला उद्देशून केलेल्या भाषणात राष्ट्रपतींनी जागतिकीकरणाचा उल्लेख 'भरतीची लाट' म्हणून केला होता आणि 'स्वातंत्र्य आणि न्याय यांचे संतुलन' साधण्याची आवश्यकता आग्रहाने प्रतिपादन केली होती. स्वातंत्र्यदिनाच्या दिवशीच्या सकाळच्या वर्तमानपत्रांत आणि टेलिव्हिजनरेडिओवरील बातम्यांत ठळक मथळे होते ते राष्ट्रपतींच्या 'स्वातंत्र्य आणि न्याय यांच्या संतुलनासंबंधीच्या उद्गारांचे.

पंतप्रधानांच्या भाषणात आंतरराष्ट्रीय व्यवस्थेच्या खुलेपणाचे आव्हान भारतीय उद्योजक सहज पेलत आहेत, संभाव्य दुष्परिणामांवर सरकार निगराणी ठेवून आहे, आवश्यकता भासेल तेथे संरक्षण दिले जाईल असे सांगून त्यांनी जागतिकीकरणाच्या महालाटेबद्दल राष्ट्रपतींनी जो बागुलबुवा आदल्या दिवशी उभा केला होता त्याला मोठ्या कुशलतेने बगल दिली.

भारतातील राष्ट्रपतींची परंपरा अभ्यास, चिंतन आणि तत्त्वज्ञान यांकरिता मोठी उज्ज्वल आहे. एवढे प्रकांडपंडित आणि दार्शनिक सहसा सरळ स्पष्ट एक बाजू घेऊन बोलत नाहीत, 'जरतारी' भाषेत बोलतात हे समजण्यासारखे आहे. भारतीय घटनेत राष्ट्रपतींना अगदी जेरबंद करून ठेवलेले असल्यामुळे कोणत्याही विषयावर स्पष्टपणे बोलण्यात राष्ट्रपतींना मोठा संकोच वाटत असतो.

डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जमान्यापासून ही प्रथा चालू आहे. डॉ. राधाकृष्णन यांनी आधुनिक तंत्रज्ञान आणि भारतातील आध्यात्मिक परंपरा यांची सांगड घालण्याची आवश्यकता मांडली होती. आता अगदी जिल्ह्यातालुक्याच्या पातळीवरील कोणीही 'खादी'धारी अशा समन्वयाची भाषा वापरतात.

समन्वयाची भाषा पौर्वात्य संस्कृतीस शोभून दिसणारी आहे. आमच्या परंपरेत वादंगातील कोणत्याही एका पक्षाची बाजू घेणे हे अपरिपक्वतेचे किंवा पोरकटपणाचे लक्षण समजले जाते. दोनही बाजूत काही खरे आहे, चांगले आहे; दोनही बाजूतील चांगले तेवढे 'नीरक्षीरविवेका'ने बाजूस करणे हे महानतेचे लक्षण आहे असे सामान्यजनांतच नव्हे तर व्युत्पन्न लोकांतही समजले जाते.

रामरावणाच्या युद्धातसुद्धा नेमकी बाजू कशाला घ्या? 'रामाय स्वस्ति, रावणाय स्वस्ति ।' अशी भूमिका घेणे प्रगल्भतेचेही लक्षण समजले जाते आणि व्यावहारिकदृष्ट्या ते सुरक्षितपणाचेही ठरते. शेवटी युद्धात राम जिंकतो का रावण जिंकतो याची खात्री असल्याखेरीज कोणतीही बाजू घेणे धोक्याचे. आपण एक बाजू घेतली आणि दुसऱ्या बाजूची सरशी झाली तर काय सांगावे? जेत्या पक्षाने मनात राग धरला तर कदाचित् जीवावर बेतायचे, देहदंड व्हायचा किंवा निदान, दरबारी मेहेरबानीच्या उच्छिष्टातील आपल्या वाट्याला येणारे काही शिते कमी व्हायची. त्यापेक्षा, सरशी कोठे होते ते पहावे आणि मगच काय ते आपले मत ठरवावे अशी भारतीय पांडित्यांची प्रदीर्घ परंपरा आहे!

राष्ट्रपती के. आर. नारायणन् दलित समाजात जन्मले, स्वतःच्या कर्तबगारीने भारताच्या परराष्ट्रसेवेत उज्ज्वल कारकीर्द गाजवून त्यांनी उदंड कीर्ती मिळवली आणि, अखेरीस एक जन्माने दलित व्यक्ती राष्ट्रातील सर्वोच्चपदी विराजमान झाली. 'गांधीजींचे स्वप्न साकार झाले,' असे सर्वांनी म्हटले. अशा पार्श्वभूमीचे राष्ट्रपती सर्वसाधारण समाजाची मान्यता मिळाल्यानंतर पंडिती संकेत आणि संस्कृती यांच्या जबड्यात गिळले जातात. दलितांच्या सक्षमीकरणामुळे 'ब्राह्मणी' परंपरेऐवजी उत्पादकवर्गाची काही नवीन संस्कृती आणि संकेत तयार होतील अशा आशा बाळगणाऱ्यांना हा मोठा धक्का आहे. सासूच्या खस्ता खाल्लेली सून कालक्रमाने सासू बनल्यानंतर पारंपरिक सासूच्या साच्यात चपखल बसून जाते, त्यातलाच हा प्रकार.

समन्वय, संतुलन, समभाव, सहभाग हे पौर्वात्य आणि विशेषतः, भारतीय परंपरेतील परवलीचे शब्द आहेत. कोणत्याही विषयावर निश्चित ठाम भूमिका घेऊन ती परखडपणे मांडण्याची वैचारिक स्पष्टता आणि बौद्धिक प्रामाणिकपणा नसला की तो अभाव लपविण्याकरिता या परवलीच्या शब्दांचा उपयोग शतकानुशतके झाला आहे.

## चेंडूंची करामत

'आत्मा देहरूप धारण करतो' का 'आत्मा असणे हा देहाचा धर्म आहे' हा भारतीय दार्शनिक परंपरेतील मोठा वादाचा विषय आहे. त्यात 'पिलवः, पिलवः, पिलवः' अशी विश्वाची अणुमय व्याख्या करणारा चार्वाक एकटाच. त्याला ठेचून मारण्यात आले. तेव्हापासून 'तदेकम् वद निश्चित्यम्, येन श्रेयोऽहं आप्नुयाम्' अशी काकुळतीची विनंती केल्यानंतरसुद्धा ज्ञान, भक्ती आणि कर्म हे

तीनही चेंडू जादूगाराच्या कसबाने फिरत ठेवण्याची परंपरा आहे. बौद्ध परंपरेत या वैचारिक ठिसूळपणाला आणखी वाव मिळाला. 'ब्रह्म सत्यम्, जगन्मिथ्या, जीवो ब्रह्मैव नापरा' असे गर्जून सांगणाऱ्या आद्य शंकराचार्यांचे बौद्धिक कडवेपण लोपून गेले.

**नबळता लपविण्याचा डाव**

समन्वय आणि संतुलन साधायचे म्हणजे नेमके काय करायचे? आधुनिक तंत्रज्ञान आणि अध्यात्म यांचा समन्वय साधायचा म्हणजे काय करायचे? सकाळी घरातून निघण्यापूर्वी यथासांग पूजाअभिषेक आटोपून, जपजाप्य करून मग राष्ट्रीय प्रयोगशाळेतील आपल्या संशोधनाच्या कामात 'सांजी' होईपर्यंत लक्ष घालावे आणि संध्याकाळी पुन्हा कोण्या महाराजांच्या प्रवचनाला आग्रहाने उपस्थिती लावावी या दिनक्रमाला अध्यात्म व विज्ञान यांचा संगम म्हणता येईल काय? या वागण्यात दुहेरीपणा आहे, एवढेच नव्हे तर दुटप्पीपणाही आहे. दोन वेगळ्या वेगळ्या प्रवृत्ती अनुभवीत असताना त्या दोघांचा एकमेकांशी संबंध काय हा प्रश्न प्रत्येक बुद्धिमान प्राण्याला पडला पाहिजे. या प्रश्नाचे उत्तर मन आणि बुद्धी यांचे समाधान होईपर्यंत त्याने शोधत राहिले पाहिजे; बुद्धी कौल देईल त्याप्रमाणे वागणूक बदलण्याचे धैर्यही दाखवायला पाहिजे. अन्यथा, या दुहेरीपणात कोणतीही उदात्तता, गुणवत्ता नाही; आपली नबळता लपविण्याकरिता घातलेला हा दुटप्पीपणाचा डाव आहे असे म्हणावे लागेल.

**स्वतंत्रतेच होतो तोच न्याय**

के. आर. नारायणन् यांनी स्वातंत्र्य आणि न्याय यांच्या समन्वयाची भाषा वापरली. स्वातंत्र्य आणि न्याय यांचा समन्वय कसा काय होणार? 'स्वातंत्र्य' ही मात्रावाचक कल्पना आहे, न्याय ही गुणवाचक. त्यांची बेरीज संभव नाही, त्यांची सरासरी काढणे शक्य नाही. 'स्वातंत्र्य आणि नियोजन यांचा सुवर्णमध्य साधायचा आहे' या वाक्यात तथ्य नसले तरी त्याचा अर्थ स्पष्ट आहे; पण, स्वातंत्र्य आणि न्याय या, एका आलेखात बसणाऱ्या गोष्टीच नव्हेत. मग, नवीन गणिताप्रमाणे संचपद्धती वापरावी लागेल आणि 'अन्यायी स्वातंत्र्य' व 'गुलामीतील न्याय' अशा फूटपट्टीवर सारे मोजमाप करावे लागेल.

समन्वय आणि संतुलन यांची भाषा वापरताना ज्यांचा समन्वय करायचा ते गुणविशेष दोन परस्परविरोधी टोकाचे आहेत असे गृहीत धरून बोलले जाते.

अन्यथा, समन्वयाचा किंवा संतुलनाचा प्रश्नच उद्‌भवत नाही. कोणी पंडित स्वातंत्र्य आणि न्याय यांच्या संतुलनाविषयी बोलला की निदान त्याच्या मनात स्वातंत्र्य आणि न्याय या दोन गोष्टी अगदी भिन्न आहेत असे धरलेले असते. स्वातंत्र्य दिले की अन्याय होणारच आणि न्याय हवा असेल तर कोण्या न्यायबुद्धी शासकाने हस्तक्षेप केला पाहिजे अशीही त्याच्या मनातली खूणगाठ असते. या समजुतीचा उगम माणसाच्या बुद्धिव्यवस्थेतच असावा. घर आहे त्याअर्थी घर बांधणारा कोणीतरी असला पाहिजे; मोटरगाडी आहे त्याअर्थी ती तयार करणारा कोणी कारागीर, कारखानदार असला पाहिजे ही सांत अनुभवातून उपजलेली कार्यकारणबुद्धी माणसाच्या मानगुटीवरून उतरत नाही. ज्याअर्थी सृष्टी आहे त्याअर्थी त्या सृष्टीचा कोणी कर्ता असला पाहिजे अशी त्याची सहज खात्री होते. भोवतालच्या साऱ्या निसर्गाचे उत्पत्ती, स्थिती, विकास आणि लय स्वयंभूपणे सातत्याने चालले आहेत हे दिसत असूनही तो कर्त्याच्या शोधात युगानुयुगे फिरत आहे. हा गोंधळ, कदाचित्, व्याकरण व्यवस्थेतूनही येत असेल. कर्ता, कर्म, क्रियापद ही वाक्यरचनेची व्यवस्था आमच्या मनात इतकी ठसली आहे की कर्मणी प्रयोगातही अध्याहृत कर्ता आम्ही गृहीत धरतो.

कोणत्याही कारणाने का होईना, स्वातंत्र्य दिले की बेतालपणा येणार, दुरवस्था माजणार हा पूर्वग्रह, कदाचित्, पदार्थविज्ञानशास्त्रातील (एन्ट्रॉपी) सिद्धांतास अनुसरून असेल. जड विश्वाला लागू असलेला हा सिद्धांत सजीव समाजांना लावण्याचे काहीही समर्थन होऊ शकत नाही आणि तरीही, मोकळीक मिळाली की त्याचा गैरफायदा घेतला जाणार आणि अन्याय, अनीती माजणार अशी कल्पना अनेकांच्या मनात घर करून बसलेली आहे.

साऱ्या सृष्टीचा विकास खुलेपणाच्या आणि स्वातंत्र्याच्या तत्त्वांनी चाललेला डोळ्यांना दिसत असतानाही ही धारणा कायम आहे.

केंद्रीभूत नियोजनाचा जागतिक पातळीवर फज्जा उडाला आणि स्वतंत्रतेवर आधारित खुल्या अर्थव्यवस्था भरभराटत गेल्या या अनुभवानेही ही विचित्र धारणा बदलली नाही. अनियंत्रित खुलेपणाच्या व्यवस्थेत शिस्त असणारा अदृश्य हात कोण याची चर्चा ॲडॅम स्मिथपासून ते हायेकपर्यंत अनेकांनी केली. नियोजन नाशाकडे नेते आणि खुलेपणाने समाज वैभवाकडे जातात. मानवजातीची प्रगती म्हणून जी झाली ती फक्त स्वतंत्र व्यवस्थेतच झाली. जेथे जेथे स्वातंत्र्याला बाधा आणून धार्मिकांनी वा समाजसत्तावाद्यांनी हस्तक्षेप केला तेथे तेथे त्याचा विपरीतच परिणाम झाला हे ऐतिहासिक सत्य समोर असूनही कृत्रिम हस्तक्षेपानेच न्याय

होऊ शकतो अशी एक विकृत बुद्धी तयार झाली.

खुलेपणाने उत्पादन वाढते, रोजगार वाढतो पण त्याची फळे कोणाच्या पदरी पडतात? उत्पादनाच्या प्रत्येक साधनाला त्या त्या साधनाच्या मागणी-पुरवठ्याच्या परिस्थितीप्रमाणे किंमत मिळते. मागणी पुरवठ्यावर आधारलेली किंमत योग्य नाही, त्यात आपल्या उत्पादनातील सहभागाचा यथायोग्य मोबदला मिळत नाही अशी काहीजणांची तक्रार असणारच. मागणीपुरवठ्यावर आधारलेल्या व्यवस्थेत दीनदुबळ्यांच्या संरक्षणाची काही व्यवस्था कागदोपत्रीतरी नसते. त्यामुळे, साऱ्या समाजाचा उत्कर्ष झाला तरी दीनदुबळ्यांना मनुष्यप्राणी म्हणून ज्या जीवनमानावर अधिकार सांगता आला पाहिजे ते मिळण्याची काहीच औपचारिक व्यवस्था नसते. या कारणाने, कदाचित्, स्वातंत्र्य आणि न्याय यांमध्ये काही संघर्ष आहे अशी कल्पना होऊ शकते.

प्रत्यक्षात, नियोजनव्यवस्थेत ज्यांचे शोषण झाले ते शेतकरी, बलुतेदार समाज खुल्या व्यवस्थेत आपल्यावर अन्याय होतो असे फार कडवेपणाने मांडत नाहीत. नियोजनाच्या व्यवस्थेत आपल्या संघटित शक्तीचा उपयोग करून घेऊन ज्यांनी आपले पगार, भत्ते, सोयीसवलती, नोकरीतील सुरक्षितता आणि निर्देशांकानुसार महागाई भत्ता मिळवून घेतला त्यांना आता आपल्याला आजन्म सुरक्षिततेची शाश्वती रहाणार नाही, आपल्याला काही काम करावे लागेल, ग्रहकाची मर्जी संपादन करावी लागेल, तो नाराज झाल्यास बेकारीची कुऱ्हाड आपल्यावर कोसळू शकते ही दहशत वाटते. वर्षानुवर्षे उपभोगलेले अपात्र भाग्य हातातून निसटून जाते आहे असे म्हटल्यावर हा वर्ग स्वातंत्र्यामुळे होणाऱ्या अन्यायाविषयी हाकाटी करताना दिसतो.

युक्तिवादासाठी, स्वतंत्र व्यवस्थेत दीनदुबळ्यांच्या संरक्षणाची काही व्यवस्था नाही असे मानले तरी पर्यायी नियोजनाच्या व्यवस्थेत गोरगरीबांची काय सोय झाली, त्यांची कोणती गरीबी दूर झाली आणि त्यांचे कोणते भाग्य फळफळले हे पाहू गेले तर निघणारा निष्कर्ष स्पष्ट आहे. अब्जावधी रुपये दारिद्र्यनिर्मूलन व सामाजिक न्याय यांसाठी खर्च झाले; त्यांतले गरीबांपर्यंत फार थोडे पोहोचले; त्याने पुष्ट झाली ती नोकरशाही यंत्रणा. खुल्या व्यवस्थेत दीनदुबळ्यांच्या सुरक्षिततेची व्यवस्था नाही याचा आक्रोश गरीबांपेक्षा नोकरमाने अधिक आकांताने का करतात याचे रहस्य यातून उघड होते.

स्वतंत्र व्यवस्थेत न्याय नाही ही कैफियत गोरगरीबांची नाही, त्यांच्या नावाने दांडगे झालेल्या नोकरशहा आणि भ्रष्टाचारी नेते यांची आहे हे विदारक सत्य

राष्ट्रपतींच्या लक्षात आलेले दिसत नाही.

खुल्या बाजारपेठेत न्याय मिळेल काय असा प्रश्न वारंवार उठवला जातो. हा न्याय म्हणजे कोणता? परमेश्वराच्या दरबारातील चित्रगुप्ताच्या कीर्दखतावणीच्या आधाराने होणारा अंतिम न्याय कोणत्याही मानवी व्यवस्थेत संभवत नाही; पण, खुल्या व्यवस्थेपेक्षा आधिक न्याय्य व्यवस्था मनुष्यप्राण्याने अद्याप शोधून काढलेली नाही. जेव्हा जेव्हा त्या व्यवस्थेत हस्तक्षेप झाला तेव्हा तेव्हा दुष्परिणामच झाले. खुलेपणा आणि न्याय या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. या पृथ्वीतलावर सर्व घटकांना मुक्त स्वातंत्र्य देऊन जो परिणाम निघतो त्यालाच न्याय म्हटले पाहिजे.

'स्वातंत्र्यात न्याय होतो का?' असा प्रश्न विचारण्यापेक्षा 'स्वतंत्रतेत होतो तोच न्याय' अशी न्यायाची व्याख्या केली म्हणजे स्वातंत्र्य आणि न्याय ही भिन्न, परस्पर विरोधी तत्त्वे आहेत आणि त्यांचे संतुलन करण्यासाठी कोणी ढुढ्ढाचार्य अवतरले पाहिजेत हा विचार बाष्कळ ठरतो.

खुलेपणात न्याय असणार नाही अशी धारणा भारताच्या पहिल्या, दलित समाजात जन्मलेल्या राष्ट्रपतींनी मांडावी हा एक दैवदुर्विलास आहे. जातिव्यवस्थेच्या आधाराने बहुजन समाजावर अगणित अन्याय झाले, अशी जुलमी व्यवस्था बंदिस्त समाजातच उद्‌भवू शकते. स्वतंत्र समाजात कदापिही नाही हे उघड आहे. समाजातील श्रमविभागणी आणि श्रमांचा मोबदला मागणीपुरवठ्यावर न ठेवता जन्म किंवा कर्म यांच्या आधाराने ठेवल्यामुळे कोट्यवधी दलितांच्या कपाळी नारकीय जीवन आले. के. आर. नारायणन् यांनी स्वतंत्रतेच्या मूलभूत न्यायप्रवृत्तीबद्दल मनात शंका ठेवावी हे मोठे दुर्दैवी आहे.

*(२१ ऑगस्ट २००१)*

◆◆

# पंतप्रधान 'इंडिया' विरुद्ध 'पोखरण' करणार?

नर्मदा परिक्रमा सुरू केल्याला आता तीन महिने उलटून गेले. दरम्यान, ठरलेल्या दिवसाच्या दहा दिवस आधीच अमरकंटक या उगमाच्या ठिकाणी पोहोचलो. नेमका तेथील उत्सवाचा दिवस आणि गारांसहित पाऊसही पडत होता. तेथे चार दिवस मुक्काम करून आता नदीच्या दक्षिण किनाऱ्याने परतीची मार्गक्रमणा सुरू झाली आहे. कष्टप्रद असली तरी परिक्रमा आनंददायकही आहे; वाटेत लागणाऱ्या गावावस्त्यांतील जनसामान्यांचे जीवन जवळून पाहता येते, त्यांच्या समस्यांची माहिती होते. सगळाच मार्ग निसर्गसौंदर्याने नटलेला असला तरी बाह्यजगाशी संपर्क अगदीच तुटपुंजा. रोज सकाळी संपर्काच्या या अभावाचा अनुभव येतो. रोजचे वर्तमानपत्र हाती न आल्यामुळे, नाही म्हटले तरी काही काळ चुकल्यासारखे वाटत राहते. मग कधीतरी कुठेतरी जुन्या वर्तमानपत्राचा कागद हाती लागतो तोच नजरेखालून घालून समाधान मानायचे.

अमरकंटकला असताना समोर पडलेल्या अशाच एका कागदावरील 'इंडिया', 'भारत' हे ठळक शब्द पाहिले आणि चमकलोच. चटकन कागद हाती घेतला आणि वाचू लागलो. मध्यप्रदेशातील एक लोकप्रिय वर्तमानपत्र 'दैनिक भास्कर'च्या २४ फेब्रुवारी २००३ च्या अंकाचे ते पहिले पान होते. त्यावरील ठळक मथळा होता – "'इंडिया' आणि 'भारत' यांच्यामधील दरी मिटविण्याचा सरकारने निश्चय केला आहे," पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांची घोषणा. गंमत वाटली. १९७८ मध्ये मी हा शब्दप्रयोग केल्यानंतर किती लोकांनी तो वापरला! मनात आले, 'इंडिया–भारत' संकल्पनेचा स्वामित्वअधिकार (उाूिळसहीं) १९७८ सालीच नोंदवून घेतला असता तर रॉयल्टी म्हणून भरपूर पैसे मिळाले असते आणि मग मानधन, पगार, निधी यासाठी धावपळ करण्याची वेळ आली नसती – इतक्या लोकांनी ही शब्दयोजना अनेकदा वापरली आहे. आता पंतप्रधानांनाही

ती वापरण्याचा मोह झाला म्हणजे तर कमालच झाली.

पुणे जिल्ह्यातील आंबेठाण येथे शेती सुरू केल्यानंतर काही वर्षांनंतर, १९७८ साली, 'इंडिया' आणि 'भारत' या सैद्धांतिक संज्ञांनी अभिप्रेत दोन समाजांमधील नववसाहती शोषणाच्या संदर्भात मी ही संकल्पना मांडली. 'इंडिया' आणि 'भारत' या सैद्धांतिक संज्ञा असून त्यांना भौगोलिक सीमा नाहीत हे स्पष्ट करून त्यांच्या सुस्पष्ट व्याख्या देण्याचा मी त्याचवेळी प्रयत्न केला. त्यानंतर अनेकांनी या शब्दप्रयोगांचा वापर केला पण अगदी चुकीच्या अर्थानी, मी केलेल्या व्याख्यांशी अजिबात ताळमेळ न राखणाऱ्या अर्थानी. कोणत्याही भौगोलिक सीमा नसणाऱ्या या दोन संज्ञांच्या स्पष्ट व्याख्या मी अशा केल्या : आंग्लाळलेल्या, तुलनेने सुस्थितीतील, ज्यांनी इंग्रजांनी जाताना मागे ठेवलेल्या शोषण यंत्रणेच्या साहाय्याने जनसामान्यांचे शोषण चालूच ठेवले त्यांचा समाज म्हणजे 'इंडिया' आणि इंग्रज राजवट संपली तरी ज्यांचे वसाहती स्वरूपाचे शोषण चालूच राहिले त्या बहुतांश ग्रमीण, शेतकरी, गरीब आणि मागासवर्गीयांचा समाज म्हणजे 'भारत'.

ज्या ज्या लोकांनी 'इंडिया-भारत' हा शब्दप्रयोग वापरला त्यातील जवळजवळ सर्वांनी त्याला 'शहरी विरुद्ध ग्रमीण' असा त्याला अर्थ दिला; मी केलेल्या व्याख्यांपेक्षा अगदीच भिन्न. वास्तविक या सैद्धांतिक संज्ञांच्या व्याख्यांमध्ये अधिक स्पष्टता व काटेकोरपणा यावा असा प्रयत्न न चुकता अगदी सुरुवातीलाच मी केला आहे. सरकारी संरक्षणाच्या छत्राखाली बिगरशेती उद्योग व्यवसाय किंवा राजकारण करून धनिक झालेले ग्रमीण भागातील लोक हे 'इंडिया'चे भाग आहेत, तर शहरांमध्ये झोपडपट्ट्यांमध्ये आणि फूटपाथवर राहणारे गरीब हे 'भारता'तून जगण्यासाठी 'इंडिया'त आलेले निर्वासित आहेत असे मी त्यावेळीच स्पष्टपणे मांडले आहे. आजकालचे अनिवासी भारतीय जसे हिंदुस्थानच्या तुलनेने कितीतरी अधिक पगार मिळतो म्हणून परदेशात स्थायिक झाले आहेत त्याचप्रमाणे खेड्यांमध्ये जगणे मुश्किल झाले म्हणून तेथील लोक पोट भरण्यासाठी शहरांमध्ये येऊन राहिले. माक्सर्ने आपल्या 'ढ्ढ्रि रवि र्ज्ञ्ञ्ञू' या ग्रंथात आणि जर्मन तत्त्वज्ञानातही सामाजिक-आर्थिक भेदाचा ठपका शहरवासियांवर ठेवला आहे. महात्मा गांधींनीही या भेदांचा ठपका शहरांवरच ठेवला. इंग्रजी आमदनीतील गरीब आणि श्रीमंत समाजांतील दरी ही शेती आणि कारखानदारी या क्षेत्रांतील दरी आहे असे म्हणून त्याचा कडक शब्दात समाचार घेताना महात्माजींनी इंग्रज अधिकारी आणि शहरात राहणारे नेटिव्ह यांना जबाबदार धरले आणि म्हटले की, 'त्यांना एक ना एक दिवशी परमेश्वराच्या दरबारात आपल्या पापांचा झाडा द्यावा लागेल'. गरीब

आणि श्रीमंत समाजातील दरीचे निदान करण्यातली ही चूक दुरुस्त करण्याचा प्रयत्न मायकेल लिप्टनने आपल्या 'थहू झििी झर्शिीश्रश डींरू झििी' या ग्रंथात केला आहे. 'इंडिया–भारत' संकल्पना पुढे मांडण्यामागे, गरीब–श्रीमंतांतील दरीचे निदान करण्यातील चूक दुरुस्त करण्याचा प्रयत्न करणे हाच माझा उद्देश होता; हिंदू जातिव्यवस्थेतील अन्यायावर, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी, गरीबांना कडव्या हिंदुत्वविरोधी इस्लामकडे न ढकलता, प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला तसाच प्रकाश टाकायचा होता.

चौधरी चरणसिंगांनीही 'असली भारत' ची संकल्पना मांडली होती; पण तिचा लक्षणार्थ अंदाजपत्रकाशी संबंधित होता. सचिवालयांतील बाबू लोकांनी बनविलेल्या आकडेवारीचा मोठ्या परिश्रमपूर्वक बारकाईने अभ्यास करून, वर्षानुवर्षे अंदाजपत्रकातील ग्रमीण भागासाठी तरतुदी कमालीच्या अपुऱ्या आणि अन्याय्य असतात असा ते दावा करीत. एका मागून एक अर्थमंत्र्यांनी ग्रमीण क्षेत्राला आर्थिक तरतुदी करताना सावत्रपणाची वागणूक दिली त्यामुळे, ग्रमीण भागाची उत्पन्नाची पातळी खालावत गेली आणि तेथील रस्ते, रेल्वे, दूरध्वनी, टपाल, आरोग्य, शिक्षण, वीज इत्यादी सोयींची संरचना ढासळत गेली अशी ते तक्रार करीत. चरणसिंगांचा 'असली भारत' ही प्रामुख्याने अंदाजपत्रकी संदर्भाची संकल्पना आहे, माझ्या 'इंडिया–भारत'मधील 'भारता'हून अगदी भिन्न. 'इंडिया–भारत' संकल्पना 'इंडिया' सरकारच्या निष्ठुर आर्थिक धोरणांमुळे विकृत बनलेल्या व्यापारिक संबंधांवर आधारित आहे.

मी 'इंडिया–भारत' संकल्पना मांडल्याला आता पंचवीस वर्षे होऊन गेली. या काळात हिंदुस्थानातील शेतकरी आंदोलनाची ती आधारशिला बनली. आता खुद्द पंतप्रधानच 'इंडिया–भारत' दरीचा संदर्भ घेऊ लागले आहेत म्हटल्यावर हिंदुस्थानच्या समाजातील या दुफळीला 'इंडिया–भारत' नाव देण्याचे माझ्या मनात कसे रूजले हे स्पष्ट करणे उचित आणि उपयुक्तही ठरेल.

शेती हा काही माझा पिढीजात व्यवसाय नाही; किंबहुना माझ्या मागील कित्येक पिढ्यांचा शेतीशी संबंध शोधूनही सापडत नाही. मी हा व्यवसाय माझ्या मर्जीने स्वीकारला. मला जाणवायला लागले की अपरंपार मेहनत, उच्च शिक्षण, प्रशासकीय कौशल्य आणि यूनोच्या नोकरीतून मिळालेला भविष्यनिर्वाहनिधी यांच्या साहाय्याने शेती करता करता १९७८ साली माझ्या लक्षात येऊ लागले की आपण एक हमखास हरणारी लढाई लढून राहिलो आहोत आणि हंगामागणिक तोट्यात आणि कदाचित् कर्जातही बुडत चाललो आहोत. हिंदुस्थान सरकारच्या

शेतकरीविरोधी किंमत धोरणांचा हेतुपुर:सर दुष्टावा तोवर मला यथार्थपणे जाणवला नव्हता. एकदा माझ्या शेतावर पूर्वी काम करणारा एक तरुण मला भेटायला आला. माझ्या शेतावर काम करीत असताना त्याला त्या वेळच्या किमान वेतन दराप्रमाणे दिवसाला ३ रुपये रोज मिळत असे; इतरत्र त्याहूनही कमी. काहीतरी लटपटी खटपटी करून त्याने जवळच्या पिंपरी-चिंचवड उद्योगनगरीमध्ये जपानी सहयोगाच्या दाई-ईची नावाच्या कारखान्यात नोकरी मिळविली. पहिल्या महिन्याचा पगार हाती पडताच तो मला भेटायला आला होता. डोळे आसवांनी डबडबलेले. म्हणाला, "मला इथं शेतावर सकाळपासून संध्याकाळपर्यंत सतत कष्ट करावे लागत, घोटभर पाणी पिण्यालाही फुरसत होत नसे. तेव्हा कुठे दिवसाकाठी ३ तुकडे मिळायचे. तिकडे कारखान्यावर आम्ही कामगार सारा वेळ मशीनच्या मागे उभे राहून आरामात विड्या फुंकत असतो आणि महिनाअखेरी आम्हाला इथे मिळत होते त्याच्या दसपट पगार मिळतो. हा काय चमत्कार आहे?"

त्याच सुमारास, माझ्या शेतावर काम करणारांसाठी मी रात्रीचा साक्षरता वर्ग चालवीत असे त्यात नव्याने आलेली एक छोटी मुलगी मांडीवर पाटी घेऊन अत्यंत गंभीरतेने, शांत मुद्रेने आणि तन्मयतेने, मी फळ्यावर काढलेली अक्षरे काढण्याचा प्रयत्न करीत असलेली पाहिली. त्याच्या दुसऱ्याच दिवशी पुण्याला माझ्या मुली शिकत असलेल्या शाळेच्या समारंभाला हजर रहावे लागले. तिथलं सारंच वातावरण मौजमजेचं होतं. फुगे, झिरमिळ्या, खेळ, स्टॉल्स, खाद्यपदार्थ, बँड, फटाके आणि काय काय होते! तेथील उत्साहाला सीमा नव्हती. लहान लहान मुलेमुली रुपयाच्या नोटा रद्दी कागदाच्या कपट्यांप्रमाणे उधळीत होते.

संभ्रमित अवस्थेत मी माझ्याच मनाला विचारू लागलो की, "स्वित्झर्लंडहून मी कोणत्या हिंदुस्थानात परत आलो आहे? जेथे एक लहानशी मुलगी अपुऱ्या प्रकाशात शेती सामानाने भरलेल्या अस्वच्छ खोलीमध्ये बसून आयुष्यात प्रथमच पाटीवर काही अक्षरे उमटवण्याचा प्रयत्न करते आहे त्या आंबेठाणसारख्या गावांच्या हिंदुस्थानात का इंग्रजी माध्यमाच्या कॉन्व्हेंट स्कूलने आयोजित केलेल्या समारंभाच्या हिंदुस्थानात?"

त्याच क्षणी माझ्या डोक्यात विचार चमकून गेला की एका बाजूला आंबेठाण आणि त्यासारखी खेडी आणि दुसऱ्या बाजूला पिंपरी-चिंचवड तसेच पुणे यांसारखे भाग ही दोन वेगळीच जगे आहेत. त्यांच्यात कुठेच साधर्म्य नाही. शहरातील शाळेच्या समारंभात पैशाची जी नाहक उधळपट्टी होते त्याच्या अल्पांशानेही रक्कम खेड्यातल्या शाळेमध्ये फळा बसवण्यासाठी उपलब्ध होत नाही. माझ्या मनाची

मोठी तगमग होऊ लागली.

माझ्या मनाची तगमग मी माझ्या पत्नीला समजावून सांगण्याचा अडखळता प्रयत्न केला. माझ्या त्या अडखळत्या अभिव्यक्तीनेही प्रभावित होऊन तिने मोठ्या अपूर्वाईने आणि अधीरतेने, सामाजिक कार्यकर्ती म्हणून नावाजलेल्या आपल्या बहिणीला ही गोष्ट सांगितली. तिच्या बहिणीचा प्रतिसाद सुन्न करणारा होता. ती माझ्या पत्नीला म्हणाली, ''तुला कल्पना नाही ताई, शेतकऱ्यांना अशा अवस्थेत रहाण्याचे काही वाईट नाही वाटत. तुला ठाऊक आहे? अगं, त्यांना असं जगण्याची सवय झाली आहे.'' तिच्या या प्रतिक्रियेने मला धक्काच बसला आणि मग मला साक्षात्कार झाला की 'इंडिया' आणि 'भारत' यांच्यामध्ये भयानक आर्थिक दरी आहे एवढेच नव्हे तर त्यांच्यामध्ये भावशून्यता, उदासीनता आणि संवेदनहीनता यांची भिंतही उभी आहे. भक्षक आपल्या भक्ष्याच्या दुर्दशेबाबत पाषाणहृदयी बनले आहेत! संवेदनशीलतेच्या या अभावामुळे मी या निष्कर्षाप्रत पोहोचलो की दोघांचा ध्वज एकच असला तरी आणि राष्ट्रगीतही एकच असले तरी 'इंडिया' आणि 'भारत' दोन वेगळे देश आहेत.

'इंडिया-भारत' संकल्पनेच्या उत्पत्तीचे विवेचन इतक्या विस्ताराने यासाठी केले की त्यांच्यातील दरीच्या सर्व मिती स्पष्ट व्हाव्या. १९७८ पेक्षा ही दरी आता, आणखी किमान दोन मितींमध्ये रुंदावली आहे. पहिली आहे 'डिजिटल' मिती. संचारच्या क्षेत्रात घडत असलेली माहिती-तंत्रज्ञानाची क्रांती ग्रमीण क्षेत्राच्या शिवेबाहेरच ठेवली गेली आहे. आणि दुसरी मिती आहे तंत्रज्ञानाची. तंत्रज्ञान, विशेषत: जैविक तंत्रज्ञान कृषिक्षेत्रापर्यंत पोहोचू नये यासाठी सरकार जाणूनबुजून प्रयत्न करीत आहे; शहरी क्षेत्राला मात्र तंत्रज्ञानाचा लाभ घेण्यासाठी पूर्ण मुभा आहे.

'इंडिया' आणि 'भारत' यांमधील दरी कमी करण्यासाठी नेमके काय करण्याचा इरादा आहे हे पंतप्रधानांनी स्पष्ट केलेले नाही. अंदाजपत्रकाचा दिवस वेगाने जवळ येत आहे आणि केळकर समितीच्या करविषयक सुधारणांच्या प्रस्तावांवरील चर्चेत, शेतीक्षेत्रावर आयकर बसविण्याची सूचना गंभीरपणे करण्यात येत आहे. शेतीक्षेत्राला आयकर लागू करून 'भारता'ला 'इंडिया'च्या बरोबरीला आणण्याचा विचार पंतप्रधान करीत असावेत असे सुचविण्याचा प्रयत्नसुद्धा मूर्खपणाचा आणि अनुचित ठरेल. तो हास्यास्पदही ठरेल. कारण, आयकर भरण्याची प्रतिष्ठा आणि संधी मिळण्याची आणि तो ज्यावर भरायचा अशा करपात्र उत्पन्नाची हिंदुस्थानचे स्वाभिमानी शेतकरी कित्येक वर्षे वाट पाहात आहेत.

ग्रमीण भागातील संरचना विकासासाठी किंवा ग्रमीण सडक विकास योजना, नद्यांचे राष्ट्रीय अनुबंधन यांसारख्या विकास कार्यासाठी अंदाजपत्रकात ग्रमीण क्षेत्रासाठीच्या तरतुदीत भरीव वाढ करण्याचा पंतप्रधानांचा विचार असेल तर केंद्र आणि राज्य सरकारांच्या खजिन्यांची वर्तमान स्थिती त्यांना त्या दिशेने पाऊलसुद्धा उचलू देणार नाही. अंदाजपत्रकातील तरतूद कितीही वाढवली तरी वर्षानुवर्षे उणे सबसिडीमुळे 'भारता'ला जो तोटा सहन करावा लागला त्याची बरोबरी होणे शक्य नाही. खरोखरीच 'इंडिया' आणि 'भारत' यांतील दरी मिटवायची असेल तर त्या दिशेने सुरुवात म्हणून, मी २५ वर्षांपूर्वीच सुचविलेली, पुढील पावले उचलणे आवश्यक आहे.

१) निविष्ठा आणि हंगामानंतरच्या शेतीमालावरील प्रक्रिया, व्यापार इत्यादी बाबींसह शेतीवरील सर्व सरकारी निर्बंध उठवणे आणि मक्तेदारी व्यवस्था बंद करणे.

२) जीवनावश्यक वस्तु कायदा, राष्ट्रीय अन्न महामंडळ (ऋउख), जेनेटिक इंजिनिअरिंग ॲप्रुव्हल कमिटी (ऋृएअउ) बरखास्त करणे.

३) केंद्रीय कृषि कार्यबलाच्या हिशोबानुसार, सरकारच्या शेतकरीविरोधी धोरणांमुळे, शेतकऱ्यांचे गेल्या २० वर्षात ३००,००० कोटी रुपयांचे नुकसान झाले आहे. त्यामुळे ओढवलेल्या दुरवस्थेतून शेतकऱ्यांची सुटका होईपर्यंत कर्जथकबाकी, वीजबिले इत्यादींची सक्तीची वसुली स्थगित ठेवणे.

४) 'इंडिया' आणि 'भारत' यांच्यात परस्पर दैनंदिन संपर्क ठेवण्यासाठी रस्ते, रेल्वे, जलमार्ग तसेच इलेक्ट्रॉनिक संचार यांसह सर्व संपर्कसाधनांसाठी अंदाजपत्रकी तरतुदींत भरीव वाढ करणे.

अशा प्रकारची पावले उचलायची तर पंतप्रधानांना 'पोखरण'च्या वेळेपेक्षाही जास्त हिम्मत बांधावी लागेल. १९४७ साली झालेली हिंदुस्थान-पाकिस्तान फाळणी हिंदुत्वाच्या सेनानींच्या मनाला लागून राहिली आहे; पण, नेमक्या त्याच वेळी झालेल्या 'इंडिया-भारत' फाळणीकडे त्यांनी ढुंकूनही पाहिले नाही. आता पंतप्रधानांनीच जातीने या फाळणीकडे लक्ष दिले आहे. तेव्हा, आवश्यक ती हिम्मत बांधून 'पोखरण'चा दुसरा प्रयोग ते करतील का ज्यायोगे, स्वातंत्र्यानंतर या देशाच्या पायात जखडून बसलेल्या बहुतेक सर्व सामाजिक-आर्थिक आणि राजकीय संस्था हादरून जमीनदोस्त होतील?

*(२१ फेब्रुवारी २००३)*

◆◆

# हिमतीचे झाड उगवते कसे?

'साधु लोकांचा छळ होऊ लागला की दुष्टांचे पारिपत्य करण्यासाठी प्रत्यक्ष मी अवतार घेतो' असे श्रीकृष्णाचे भगवद्‌गीतेतील वचन आहे.

**समूहाची शक्ती**

खल दैत्य माजले आणि सरळधोपट संसार–प्रपंच करणाऱ्यांना जगणे अशक्य झाले की सामान्यांच्या अश्रूंतून, आक्रोशातून आणि वेदनांतून एक सामूहिक शक्ती उभी राहते आणि तिचे तांडवनृत्य चालू झाले की, ते दुष्टांचे पारिपत्य करूनच थांबते. भगवद्‌गीतेच्या संदर्भाखेरीजही या सनातन सत्याचा अनुभव वारंवार येतो.

सामूहिक उद्रेकाची शक्ती उभी राहिली म्हणजे मोठे मोठे चमत्कार घडू लागतात. एकमेकांना पूर्वी कधीही न भेटलेले लाखालाखांचा जमाव जणू काही सगळा कार्यक्रम पूर्वनियोजित असावा किंवा त्या कार्यक्रमाच्या वारंवार रंगीत तालमीही झाल्या असाव्यात अशा तऱ्हेने एका सांघिक जाणीवेने  काम करू लागतो.

**संयुक्त महाराष्ट्र चळवळीचा दाखला**

संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत फ्लोरा फाऊंटनवर शंभरावर तरुण हुतात्मा झाले, त्या प्रसंगी मी हजर होतो. पोलिसांनी अश्रुधूर सोडला, आता लोक काय करणार असा मी अचंबा करत होतो. तेवढ्यातच, आश्चर्याने पहात राहिलो. अनेकांनी पाण्याने भरलेल्या बादल्या, तांबे, छोटी मोठी भांडी भराभरा आणायला सुरुवात केली. एवढ्या भाऊगर्दीत त्यांना ही सारी सामग्री मिळाली तरी कोठे आणि कशी? अश्रुधुराला तोंड देण्याकरिता पाण्याने चिंब भिजलेली फडकी, रुमाल तोंडावर धरले म्हणजे अश्रुधुराचा फारसा त्रास होत नाही हे यांना सांगितले तरी कुणी, कळले तरी कसे आणि त्यांनी इतक्या तातडीने अंमलात आणले

कसे?

मी विद्यार्थी. जगाच्या इतिहासात झालेल्या काही नामांकित लढाया, त्यातील सेनापतींच्या व्यूहरचना, वेगवेगळ्या चाली, पुष्कळशा चुका, सर्वसाधारण जवानांचे बेछूट हौतात्म्य यांविषयी बरेच पुस्तकी वाचले होते; पण, अश्रुधूर सुटल्याचे आवाज येऊ लागले की पटकन पाणी आणण्याची बुद्धी झालेले हे कोण महाभाग?

**समूहाची मर्दुमकी**

फ्लोरा फाऊंटनला जमलेल्या लाखांच्या गर्दीत सारेच काही पांढरपेशे - धोपटमार्गाने चालणारे पांढरपेशे नव्हते. असले भद्र लोक कितीही चिडले तरी हातात दगड प्रत्यक्ष उचलून घेत नाहीत; दगड उचलावा, फेकावा अशी मनात प्रबळ ऊर्मी होते, पण गरीबांच्या मनोरथाप्रमाणे थोड्याच वेळात त्या ऊर्मी शमून जातात. उत्पयन्ते विलियन्ते दरिद्राणाम् मनोरथाः ।

आम्ही सारे धोपटमार्गी. पोटात थोडी भीती घेऊन पुढे काय होते ते जाणण्याच्या औत्सुक्यापोटी जागीच उभे होतो. काही अधिक हुशार धोपटमार्गी पाय काढता घेऊन पसार झाले होते.

मग, पोलिसांच्या दिशेने हा दगडांचा वर्षाव कोण करत होते? पोलिसांच्या अश्रुधुराला तोंड देण्यासाठी चेहऱ्यावर ओली फडकी गुंडाळून घेऊन अश्रुधूराची नळकांडी उचलताना हात पोळत असताना पोलिसांकडे कोण भिरकावून देत होते? नंतर, गोळीबार सुरू झाल्यावरदेखील शंभरावर माणसे न हलता थांबली, हुतात्मा झाली, त्यांना हे धैर्य कोठून आले? हे कोण होते? यांची पार्श्वभूमी काय, यांचे बालपण कसे गेले, चरितार्थाचे साधन काय, कुटुंबाची परिस्थिती काय? आम्हा धोपटमार्ग्यांच्या विचारातही न येणाऱ्या गोष्टी यांच्या हातून कशा घडत होत्या?

मग दुकाने फुटू लागली, खुलेआम दिवसाढवळ्या दुकानातल्या चांगल्या चांगल्या मोठमोठ्या चैनीच्या आकर्षक वस्तू घेऊन तुमच्या माझ्यासारखेच - कदाचित थोडे जास्त फाटके आणि मळके कपडे घातलेले लोक भराभर दुकानातून सामान उचलून पटापट गल्लीबोळात नाहीसे होत होते.

धोपटमार्गी काही सारेच सच्छील असतात असे नाही; लपून छपून, पकडले जाण्याचा धोका फारसा नसेल तर लभ्यांश साधून घेण्याइतकी बहादुरी आम्हीही करतो. परंतु, लोक सैरावैरा धावताहेत, बंदुकीच्या गोळ्यांचे आवाज सर्वत्र भरून राहिले आहेत, मधूनच कोणाची किंकाळी ऐकू येत आहे अशा धांदलीत दगड उचलून दुकानाच्या काचेच्या तावदानावर नेमका कसा मारला जातो आणि

दुकानाचे दार फुटल्यानंतर लुटालूट करणारे हे कसले लोक? या प्रश्नांची उत्तरे फ्लोराफाऊंटनच्या आसपास असेपर्यंत मला मिळाली नव्हती.

मग एकदम कोठून विधानसभेतून भाई एस. एम. जोशी बाहेर आले. एवढासा किरकोळ शरीरयष्टीचा माणूस, पण सगळ्या जनसमूहाचे लक्ष त्याच्याकडे गेले. त्याने हात वर केला आणि जादूची कांडी फिरावी तसे सर्वत्र शांत शांत झाले. त्यांनी खूण केली पुढे चला आणि सारे लोक त्यांच्या मागे चालू लागले. मुरलीवाल्याने मुरली वाजवताच सारे उंदीर त्याच्या मागून चालू लागावे तसा हा प्रकार. काळे उंदीर, गोरे उंदीर, छोटे उंदीर, मोठे उंदीर, धोपटमार्गी उंदीर, लुटलेले सामान कोठेतरी तात्पुरते ठेवण्याची व्यवस्था करून आपण जणू त्या गावचेच नाही असा आव आणून चालणारे गुंड उंदीर. सारे एस. एम. जोशींच्या मागोमाग दोनतीन मैल चालत चौपाटीवर पोचले. तेथे एक जुजबी, पण मोठे व्यासपीठ आम्ही पोचेपर्यंत तयार झालेले होते.

अर्ध्याएक तासातच संयुक्त महाराष्ट्र आंदोलनाची सर्व नामांकित नेते मंडळी मंचावर जमू लागली. चौपाटीची सारी वाळू तुडूंब जनसमुदायाने भरली होती. फ्लोरा फाऊंटनच्या गोळीबारात प्रत्यक्ष हुतात्मे किती झाले याचा प्रत्यक्ष कोणालाच अंदाज नव्हता. कोणी म्हणे दहा तर गेलेच, दुसरा म्हणे दहावीस मुडदे तर मी प्रत्यक्ष डोळ्याने पाहिले. प्रत्यक्षातल्या आकड्याइतकी मजल कोणाच्या कल्पनेतील जात नव्हती; पण मृतांचा आणि जखमींचा नक्की आकडा माहीत नसताना काहीतरी लोकविलक्षण रौद्र घडून गेले आहे आणि त्याचे आपण साक्षीदार आहोत या सामूहिक जाणीवेनेच सर्वांच्या मनावर नकळत एक शिस्तीचे बंधन आले होते. धांगडधिंगा घातल्यावर वर्गात साळसूदपणे बसणाऱ्या उनाड पोरांचा नाटकीपणा त्यात काही असणार. आपल्या हातून जे काही झाले त्याच्या शोधात पोलिस आपल्यावर नजर ठेवून असणार असा धास्तीचा काही जणांच्या पोटात गोळा उठला असणार. आता घरी कसे सुखरूप पोचतो याचीही चिंता धोपटमार्ग्यांना तरी तोंड उघडू देत नसणार. लाखो माणसे, हजारो कारणे; पण, सगळी लष्कराच्या कवायतीत असल्यासारखी कडक शिस्तीत बसली होती. अंगावरचे कपडे पांढरपेशे अथवा गिरणी कामगारांचे मळके आणि फाटके. लष्करी खादीचे गणवेश असते तर शिस्तीत तरी लवमात्र न्यून कोठे दिसले नसते.

दोन तासांपूर्वी फ्लोरा फाऊंटनच्या रणमैदानावर सुसज्ज पोलिसांच्या तुकड्यांशी गनिमी काव्याने झुंज घेऊन मुरारजींच्या फौजांना हैराण करणारा हा जमाव आता कसा शहाण्या मुलासारखा शांत शिस्तीने बसला होता!

मंचावर अनेक वक्ते बोलले. संयुक्त महाराष्ट्राच्या मागणीची यथासांग मांडणी झाली. मराठी महाराष्ट्रद्रोही नेते आणि बिगरमराठी मराठ्यांचे शत्रू यांच्यावर भरपूर तोंडसुख घेतले गेले. आचार्य अत्र्यांनी अशा भयरुद्र मानसिकतेतल्या जमावालाही धो धो हसवले; शंकरराव देव, काकासाहेब गाडगीळ, यशवंतराव चव्हाण यांच्या नावाने साग्रसंगीत शिमगा झाला. लोकांच्या उत्साहाला उधाण फुटले होते.

हे काय घडते आहे हे बहुतेकांना उमजत नव्हते; मलाही नाही. अर्वाचीन इतिहासाचे उदंड व्यासंगी आणि कामगारांचे झुंजार नेते भाई श्रीपाद अमृत डांगे बोलायला उभे राहिले. त्यांना आमच्या मनातली प्रश्नचिन्हे जाणवली असावीत. भाषणाच्या ओघात त्यांनी एका वाक्यात उत्तर दिले. 'क्रांतीकाळात उभी राहणारी शक्ती सर्वक्षम असते, ती कधी रौद्र होऊ शकते, कधी शांत, कधी प्रचंड करुणामयी. मराठी माणसांच्या मनातील आकांताने फ्लोरा फाऊंटनच्या मैदानावर दाखवली ती क्रांतीकारी बेशिस्त. चौपाटीच्या या प्रचंड मैदानावर टाचणी पडली तरी ऐकू येईल अशा शांतपणे बसलेली ही माणसे ही क्रांतीच्या उद्रेकातील क्रांतीकारी शिस्त आहे.'

वाक्य मोठे जबरदस्त, त्यातली काव्यशक्ती, लय आणि ठेका असा की तो भेदून अर्थाच्या गाभ्याला हात घालण्याची इच्छासुद्धा होऊ नये.

अश्रुधुराची चाहूल लागताच पाणी जमा करणारे कोण, दगडफेक करणारे कोण, मरणाला सामोरे जाणारे कोण आणि दुकानांची तावदाने फोडून माल बिनधास्तपणे पळवणारे कोण? या प्रश्नांचा काही उलगडा झाला नाही.

या प्रश्नांची उत्तरे शोधण्याचा प्रयत्न सगळया नोकरमान्या आयुष्यात शीतपेटीतच थंड राहिला.

**नव्या पाटीवर तोच प्रश्न**

परदेशातून परत आलो, शेतकरी बनलो, क्षणाक्षणाने आणि कणाकणाने गरीबीत पाय खचू लागल्यावर शेतकऱ्यांच्या मनात तयार होणारी वेदना अनुभवली आणि नकळत मी धोपटमार्गी अनिश्चितकालीन उपोषणाच्या, त्यावेळी तरी निश्चित वाटणाऱ्या, मृत्यूला सामोरा गेलो.

चाकणच्या कांदा आंदोलनाच्या काळात एक गोष्ट शिकलो. 'परित्राणाय साधूनाम् विनाशायच दुष्कृताम्' उभी राहणारी विश्वशक्ती कणमात्राने का होईना एका हाडामांसाच्या प्राण्यात प्रगट झाली की आजूबाजूच्या जनसमुदायात एक मोठा मानसिक बदल घडून येतो. आपला संसार, दररोजच्या काळज्या, संध्याकाळच्या

भाकरीची चिंता, बायकापोरांचे आजारपाणी, डॉक्टर-वाण्यांची थकलेली बिले अशा, एरव्ही जखडून टाकणाऱ्या साऱ्या चिंता, क्षणार्धात निष्प्रभ होऊन जातात. उंच डोंगर चढून गेल्यावर पायथ्याशी असलेली घरे, जनावरे निरर्थक वाटू लागावी तसे काहीसे मनुष्यदेहात प्रकट झालेल्या विश्वतेजाच्या कणाच्या आसमंतात होऊन जाते.

साधीसुधी माणसे सारा प्रपंच निरर्थक मानून सोडायला तयार होतात, तुरुंगात जायला तयार होतात, लाठ्यांसमोरही अगदीच भागूबाई बनत नाहीत. आसपास प्रत्यक्ष मृत्यु दिसला तरी त्यामुळे घाबरून जात नाहीत; उलट, अधिक निश्चयाने वाटचाल करत राहण्याच्या गोष्टी बोलतात. हा एक चमत्कार! आपल्या जीवाची पर्वा न करता सेनापती, घोड्याला टाच मारून, पुढे झाला की काही काळापुरतेतरी सेनापतीचे रक्तामांसाचे शरीरच आंदोलक जनसमुदायाच्या विकीर्ण शरीराचा आत्मा बनतो आणि काय वाटेल तो त्याग, सहन करायला आंदोलक तयार होऊन जातात.

ध्येयासाठी हौतात्म्याचे मरण पत्करणे हे सोपे असते; पण, मनामध्ये जे दिव्य भव्य, जे उन्नत आणि उदात्त मानले त्यासाठी दुसऱ्याला इजा करण्याची वा प्रसंगी त्याचा जीव घेण्याची तयारी सर्वसामान्य धोपटमार्गी माणसाच्या मनाची होत नाही.

**सशस्त्र आणि निःशस्त्रांतील लढाई**

आंदोलनाच्या रसायनातील हा एक नवा गूढ प्रश्न उद्‌भवला. नाशिकच्या १९८० सालच्या ऊस कांदा आंदोलनात मंगरूळपीर फाट्यावर एसआरपी च्या जवानांनी शेतकऱ्यांना लाठीने बडवबडव बडवले. चांदवडच्या टेकड्यांच्या चढामुळे चढता येत नाही, अशा परिस्थितीतील शेतकऱ्यांना, चारपाच लांडग्यांनी मिळून एखाद्या शेळीला गाठावे तसे चारचार पाचपाच जवानांनी एका एका शेतकऱ्याला घेरले, गाठले, पाडले. प्रशिक्षणाच्या काळात शिपायांना निर्जीव चामडी पोत्यांना बडवण्याचा सराव देतात. ज्याला मारतो आहोत त्याला काही संवेदना आहेत, वेदना आहेत याची आठवणसुद्धा होऊ नये याचे शिक्षण स्वतंत्र भारताच्या शिपायांना स्वतंत्र भारताच्या नागरिकांना तुडवण्यासाठी दिले जाते. नाशिकच्या आंदोलनात आदलेच दिवशी खेरवाडी रेल्वे स्टेशनजवळ आंदोलनाच्या दंगलीत एका एसआरपी जवानाचा मृत्यु झाला होता. त्यामुळे, जवानांच्या लाठ्यांना काही असुरी जोर चढला होता. शेतकऱ्यांनी बेदम मार खाल्ला.

मी तेथे जाऊन पोचलो तेव्हा मार खाल्लेल्या शेतकरी तरुणांची श्वासांची

धापसुद्धा शांत झाली नव्हती. धड श्वास घेता येत नाही, धड बोलता येत नाही अशा अवस्थेत सारे तरुण मला एकच सांगत होते, "आता आम्हाला पुन्हा पोलीसासमोर मोकळ्या हाताने जायला सांगू नका. पुढच्यावेळी समसमानांचा सामना होऊ द्या. त्यांच्या हाती काठी तर आमच्याही हाती काठी असू द्या; मग जे व्हायचे ते होऊ द्या. लाठी चालवता चालवता डोके फुटले तरी बेहत्तर, पण 'समोरच्याच्या हाती लाठी आणि आमच्याकडे फक्त पाठी' या परिस्थितीत एक हताशपणाची स्त्रैण जाणीव होते ती लाठीच्या मारापेक्षाही भयानक असते."

हातापायांवर, पाठीवर बसलेल्या लाठीच्या माराचे वळ अजून टरटरून वर येत आहेत अशांना ब्रह्मज्ञान सांगण्यात काही अर्थ नव्हता, हाती नुसती काठी घेण्याची परवानगी देऊन भागणार नाही, ती चालवण्याचे, मार अडवण्याचे आणि वर्मी घाव घालण्याचे शास्त्रीय प्रशिक्षण द्यावे लागते हे त्यावेळी त्यांना पटले नसते.

सामना सशस्त्र शासनाशी आहे. शेतकरी लाठी घेऊन बाहेर पडले तर पोलीस बंदुक घेऊन बाहेर येतील; शेतकरी बंदुका घेऊन बाहेर पडले तर पोलीस मशीनगन्स घेऊन येतील, हंगेरी, पोलंड येथे घडले तसे रणगाडे घेऊन येतील, तोफा डागतील. १८५७ चे स्वातंत्र्ययुद्ध कोसळून पडले ते गावोगावच्या वेशीजवळील झाडांवर टांगून फाशी दिलेल्या हजारो वीरांच्या लटकत्या शरीरांच्या दृश्याने. 'शस्त्रांची स्पर्धा वाढवून जनआंदोलने प्रभावी होत नाहीत, यासाठी शत्रूच्या मनातील द्वेषभावना संपवावी लागेल, त्यासाठी आपल्या मनातही लवमात्रही हिंसा-विद्वेषाची भावना असता कामा नये' असा काहीसा विचित्र मंत्र महात्मा गांधींनी दिला होता.

इंग्रजांनी, अगदी नाईलाज झाला तेव्हाच, हिंदुस्थान सोडला. सोडता सोडता देशाची शकले केली, जातीय विद्वेषाचा आगडोंब भडकावून दिला आणि प्रत्यक्ष धुमश्चक्रीत पोसल्या जाणाऱ्या पौरुषी गुणांऐवजी बुळचट कायरतेलाच सद्‌गुण मानणाऱ्या लोकांच्या हाती सत्ता सोपवून इंग्रज गेले. हा काही फार मोठा विजय नाही पण निःशस्त्र, असंघटित, दरिद्री, निरक्षर, कोट्यवधी जनतेला उभे करण्याचा युद्धशास्त्रातला तो एक मोठा प्रयोग होता यात काही शंका नाही.

गेल्या पंचवीस वर्षांच्या शेतकरी संघटनेच्या आंदोलनाच्या कालखंडात अनेक तरुण कार्यकर्त्यांनी मला हिणवले आहे, 'शरद जोशी आम्हाला शांत बसायला लावतात त्यामुळे आंदोलन प्रभावी होत नाही, शरद जोशी हा शेतकरी आंदोलनाला मोठा अडथळा झाला आहे, अन्यथा आम्ही तरुणांनी काय चमत्कार करून

दाखवला असता ते सांगता येत नाही.' शेतकरी संघटना तिच्या प्रभावाच्या जोरात होती त्यावेळी शिवसेना ही नगण्य ताकद होती; भारतीय जनता पार्टी तर जवळजवळ समूळ संपली होती. शिवसेनेचे नेते बाळ ठाकरे यांनी शहरी गुंडांच्या टोळ्या, त्यांचे मार्ग, त्यांची साधने यांचा अनमान केला नाही; दगडफेक, मोडतोड, प्रसंगी रक्तपात यांच्या आधारे शिवसेनेविषयी लोकांच्या मनात त्यांच्या सैनिकांनी दहशत तयार केली त्याचे कौतुक केले. हिंगणघाटच्या शिवसेनेच्या आमदारकीच्या उमेदवाराने त्यांच्या शेजाऱ्याची बायको पळवली – प्रेमापोटी नाही, बाजारात विकण्यासाठी – तरी हिंदू हृदयसम्राटाने हिंदू संघटनांना अशा वीरांची गरज आहे अशी उघड शाबासकी दिली असे म्हणतात. यामुळे विचारशून्य हिंदुत्वाची लाट देशभर आली. याउलट, तर्कशुद्ध विचारसंपन्न शेतकरी संघटनामात्र पक्षाघात झाल्याप्रमाणे आंदोलनाच्या क्षेत्रात आणि निवडणुकीच्या तंत्रातही प्रभाव पाडू शकली नाही.

**माणसांचे दोन प्रकार**

दोस्तोवस्की या रशियन लेखकाने ऊीळाश । झींौळीहाशीीं या त्याच्या जगविख्यात कादंबरीत म्हटले आहे, "माणसामाणसांत दोनच प्रकार असतात. ज्यांनी कधी कोणा दुसऱ्या माणसाचा प्राण घेतला आहे ते एका बाजूला आणि हत्या केल्याचा अनुभव नसलेले दुसऱ्या बाजूला." हातून एक हत्या घडली की माणसाची सर्व मानसिकताच बदलते. आपण कोण? माणूस म्हणजे काय? हे जग काय आहे? चांगले म्हणजे काय? वाईट म्हणजे काय? या सगळ्या गोष्टींबाबत सारी धारणाच एकदम बदलून जाते. 'सत्यं शिवं सुंदरम्' नैतिकता सगळ्या उलट्यापालट्या होऊन जातात. एक खुनी आणि दुसरा कोणाची हत्या न केलेला अशा दोन माणसांत साधे संभाषणही होऊ शकत नाही. दोघेही बोलतात व्यवहारातलीच वाक्ये, शब्दकोशातलेच शब्द – परिचयाचे; पण, हत्यारा दुसऱ्या माणसाशी बोलताना हा आपल्यासारखाच माणूस आहे अशी भावना मनात आणूच शकत नाही. कसाई बकरीकडे जसा पाहतो तसाच काहीसा हत्यारा सर्वसामान्य लोकांकडे पाहतो. 'माहीत आहे वटवट करतो, एक वाताडा घातला तर उताणा पडेल', अशी एक वाचा न फुटलेली भावना हत्याऱ्याच्या मनात कायम असते.

साऱ्या जगात सध्या आतंकवाद्यांचे थैमान चालू आहे. जवळजवळ दररोज कोठे ना कोठे जीवावर उदार झालेले आतंकवादी हल्ले चढवतात, अनेकांना मारतात, स्वतःही मरण पत्करतात. ११ सप्टेंबर २००१ च्या न्यूयॉर्कमधील विश्व व्यापार केंद्राच्या दोन मनोऱ्यांवर दोन विमाने आतंकवाद्यांनी आदळवली

आणि अशा घातपाती कृत्यांना एक प्रतिष्ठा आली. ओसामा बिन लादेनसारख्या वृद्ध उंदराला शोधण्याकरिता अमेरिकेच्या, अत्याधुनिक शस्त्रांनी सुसज्ज सैन्याने जंग जंग पछाडले पण लादेन काही त्यांच्या हाती लागला नाही. अमेरिकनांना नाक खिजवून दाखवण्यासाठी तो नियमितपणे दूरदर्शनवर व इतर मार्गे आपण अजून चैतन्यशील असल्याचा पुरावा देत असतो.

**असमर्थांचे रडगाणे**

काश्मीर प्रश्नाबद्दल भारताची बाजू न्याय्य व योग्य आहे अशी बहुतेक भारतीय हिंदू सवर्णांची तरी खात्री आहे. भारताचे सात लाख लष्कर जम्मू काश्मीरमध्ये छावणी घालून बसले आहे तरीही प्रत्यही घातपाती हल्ले होतच आहेत. औरंगजेबाच्या सैन्याची संताजीधनाजींनी केली नाही अशी दुर्दशा काश्मीरातील घातपाती भारतीय लष्कराची करत आहेत. पाकिस्तानच्या आधाराने आणि मदतीनेच ही घातपाती कृत्ये चालू शकतात असे धीरगंभीर प्रकृति पंतप्रधान आणि कडवे उपपंतप्रधान दोघेही दिवसातून दहावेळा सांगत असतात. या रडगाण्याला काही अर्थ नाही, किंबहुना, हा युक्तिवाद हास्यास्पद आहे हे उघड आहे. हिंदुस्थान प्रत्येक क्षेत्रात पाकिस्तानपेक्षा किमान पाच पटीने जड आहे. इस्राएल हे मध्यपूर्वेतील चिमुकले राष्ट्र. सर्व बाजूने इस्रायलचा विद्‌ध्वंस करण्याची मनीषा बाळगणारी दोन डझनावर अरब राष्ट्रे आणि इस्रायलच्या लोकसंख्येपेक्षा कितीतरी पट अधिक अरब मुसलमान शत्रु म्हणून ठाकले आहेत. तरीही इस्रायलला कधीही 'हे अरब घातपाती अरब राष्ट्रांच्या मदतीने आमच्याविरुद्ध परोक्ष युद्ध चालवीत आहेत' असे आसू गाळीत म्हणावे लागत नाही; किंवा 'लादेन, सद्दाम यांच्यामागे लागण्यापेक्षा अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष बुशसाहेब यांनी मुशर्रफ विरुद्धच आघाडी उघडून आमच्या काश्मीरातील साप मारून द्यावा' अशी 'षंढ स्वप्ने' ते रंगवीत बसत नाहीत.

'मुंबई बंद', 'महाराष्ट्र बंद' असल्या कार्यक्रमांच्या वेळी गुंडगिरी करून मर्दुमकीच्या आवेशात मिशांवर हात फिरवीत आणि अधिकाधिक भडक भगवा टिळा लावून शिवसैनिक भले फिरोत; बाबरी मशीद पाडण्यात शिवसैनिकांचा मोठा हात होता अशी पडद्याआड फुशारकी हिंदुहृदयसम्राट खुशाल मारोत, तोगडियासारखे निरर्गल आपल्या हिंदू अनुयायांना 'मुसलमानाशी मैत्री अवश्य करा; त्यांच्या घरी सुंदर बायका असतील तर अवश्य करा' असा खास हिंदूवीर सल्ला देवोत, मुसलमान घातपाती हिंदुस्थानभर कोठेही – अगदी लोकसभेवर व लष्कराच्या प्रमुख छावणीवरही बेधडक हल्ले करतात, हरदिन निदान पाचदहा घातपाती त्यांच्या कामाकरिता बाहेर निघतात, आपण जिवंत परत येणार नाही

याची खात्री असताना नेटाने निघतात याला हिंदुवीरांकडे जवाब नाही.

हिंदू तरुणांनीही घातपाती कृत्यासाठी सज्ज व्हावे असा आदेश हिंदुहृदयसम्राटांनी दिला पण एकही जौहरी हिंदू आतंकवादी तयार झालेला दिसत नाही. एक लाखानी निघाला पण त्याचा कार्यक्रम ध्येयापोटी नाही, केवळ धनाशेपोटी. त्याने रॉकेट पुरवण्याचा कारभार केला तो पाकिस्तानी घातपात्यांना उत्तर देण्याकरिता नाही, तर अमेरिकेतील इस्लामी गटांना शस्त्रास्त्रे पुरवण्यासाठी.

**अर्थवादी आक्रमक बनत नाही**

शेतकरी संघटनेची लढाई अर्थवादी चळवळ आहे. त्यात स्वत:च्या फायद्याकरिता दुसऱ्याचे कोणाचे काहीही हिरावून घेण्याची हिणकसता नाही. 'घामाचे दाम तेवढे घेऊ, तो आमचा श्रमसिद्ध अधिकार आहे' या विचाराने मनात तामसी द्वेष उद्‌भवत नाहीत. त्यासाठी कोणाचा जीव घ्यावा अशी भावना तयार होत नाही. शेतकरी संघटनेचे तरुण कार्यकर्ते अलिकडे शेतकऱ्यांवर होणाऱ्या अन्यायाचे वर्णन करताना, 'तुमच्या आईबापांना यांनी असे घोळले' अशी भाषा वापरून काही त्वेष तयार करण्याचा प्रयत्न करतात. यातून निघणारे पराक्रम आणि पौरुष किरकोळ झेपेचे आणि फारच तात्कालिक असते. 'शेतकरी तितका एकएक' ही घोषणा अगदी जुनी आहे. शेतकऱ्यांच्या संघर्षाचे स्वरूप भटशाहीविरुद्ध आहे असे महात्मा जोतिबा फुल्यांनी मांडले. चालू कालखंडात लढाई 'इंडिया' विरुद्ध आहे असे तर्कशुद्ध युक्तिवादाने सांगितले गेले पण त्यातून तेजस्वी कार्यक्रम उभा राहिला नाही.

कारखानदारी कामगारांच्या, शेतमजुरांच्या किंवा आदिवासींच्या व दलितांच्या चळवळी, शेतकरी आंदोलनाच्या तुलनेने पाहिले तर, संख्याबळाने किरकोळ पण या आंदोलनांची शाहीरी ताकद अधिक, शहरी पांढरपेशांत त्यांच्याविषयी सहानुभूती आणि संवेदना अधिक. या आंदोलनात घातपाती किंवा आक्रमक कार्यक्रम होऊ शकतात. बाबासाहेब आंबेडकरांना दलितसमाजाने दैवी अवताराचे स्थान दिल्यामुळे निदान बाबासाहेबांच्या प्रतिष्ठेचा प्रश्न उद्‌भवला तर दलित घातपाती कृत्यांनाही तयार होतात.

शोषितांच्या चळवळीत सर्वसाधारणपणे जितकी आक्रमकता आहे तितकीही शेतकरी चळवळीत दिसून येत नाही. लोकसभेत, विधानसभेत शेतकऱ्यांची मुले बहुसंख्य आहेत, तरीही शेतकरी आंदोलक हिम्मत बांधत नाही आणि सरकार शेतकरी आंदोलकांना निर्घृण पद्धतीने दडपून टाकते, त्याविरुद्ध फारसा आवाजही खासदार आमदार मंडळी उठवत नाहीत.

अर्थवादी चळवळीत काव्यात्मकता नसते त्यामुळे वेडेपीर पोसण्याची अशा आंदोलनांची क्षमता कमी असते. याउलट, दररोजच्या जीवनातील आर्थिक, सामाजिक वास्तविकतेला दूर ठेवून जात, धर्म, राष्ट्र अशा अप्रस्तुत मुद्द्यांच्या आधारे तयार करण्यात आलेल्या संघटना व पक्ष लोकांच्या मनाला अधिक भावतात. 'वर्तमानकाळात प्रतिष्ठेने, स्वाभिमाने, सन्मानाने जगण्यासारखे काहीच राहिले नाही' म्हणत माणसाची भूतकाळात जाऊन इतिहासातली अभिमानस्थळे शोधून काढण्याची प्रवृत्ती होते. कालाच्या सुरवातीपासून ते इतिहासाच्या अंतापर्यंत, ना भूतकाळात ना भविष्यकाळात – अभिमान बाळगण्यासारखे काही नाही ही भावना मनुष्याला सोसणारी नाही. ज्यांना अभिमान बाळगण्यासारखे काही नाही असे लोकही काही मिथ्यके तयार करून अभिमानस्थळे उभी करतात. 'नर्मदामय्याने आदेश दिला म्हणून आम्ही परिक्रमावासियांना लुंगवतो' असे शूलपाणीश्वरच्या झाडीतील भिल्ल म्हणतात. 'सीतामाईच्या आदेशाप्रमाणे आम्ही लूटमारी करतो' असे रामोशी मानतात आणि स्वातंत्र्यवीर सावरकरांसारखे विवेकी प्रतिभावंतही, '१८५७ चे स्वातंत्र्यसमर हे प्रत्यक्षात केवळ चपात्यांचे बंड असले तरी ते स्वातंत्र्यसमर होते असे सिद्ध करणे आवश्यक आहे' असे आग्रहाने मांडतात.

माझ्या पोटात भूक आहे, माझी पोरं उपाशी आहेत या जाणीवेतून माणसे पराक्रमाला तयार होत नाहीत. बंगालच्या दुष्काळात हजारो माणसे धान्याच्या कोठारांच्या दरवाजासमोर भुकेने तडफडत मेली, पण कोणी दरवाजा फोडण्याचा प्रयत्नसुद्धा केला नाही.

मी हाती शस्त्र घेतो आहे, ते भुकेपोटी नाही तर पूर्वजांच्या प्रतिष्ठेसाठी, धर्माच्या निष्ठेपोटी, जातीच्या अभिमानासाठी ईश्वराच्या आदेशाप्रमाणे घेत आहे. अशा भावनेने माणसे मरायला तर तयार होतातच, पण मारायलाही तयार होतात.

संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत फ्लोरा फाउंटनच्या रणसंग्रमात बादल्या भरून पाणी कुणी आणले? पोलीसांवर दगडफेक कुणी केली, दुकाने कुणी लुटली? हे काही सर्वसामान्य नीटपंथे चालणाऱ्या लोकांच्या हातून होणारे नाही. अशा गोष्टी ते पोटात भूक आहे म्हणून करणार नाहीत, एवढेच नाही तर जाती, देव, धर्म, राष्ट्र यांच्या आवाहनापोटी करणार नाहीत. धोपटमार्गी अशा आवाहनांपोटी मरायला तयार होतील, मारायला तयार होणार नाहीत आणि मारायला तयार झाले तरी ती ऊर्मी प्रबळ शक्तींपुढे टिकणार नाही; फार तर, आपल्यापेक्षा कमजोर दुर्बलांविरुद्ध त्यांचा पुरुषार्थ दिसू शकेल.

फ्लोरा फाऊंटनची क्रांतीकारी बेशिस्त दाखवणारे कोण? ज्यांच्या आयुष्यात

एरव्हीही खून, मारामाऱ्या, दगडफेकी, लुटालुटी असे प्रसंग हरहमेश नाही, तरी वारंवार येतात ती माणसे आंदोलनाच्या किंवा क्रांतीच्या काळात त्यांच्या स्वधर्माप्रमाणे वागतात आणि उद्रेकाच्या त्या काळात त्याला क्रांतीकारी बेशिस्त म्हणतात.

धोपटमार्गी नेतृत्वगुणात काही ईश्वरी अंश असल्याची जाणीव झाली तर व्यवहारी माणसे प्रापंचिक चिंता दूर टाकून मरायला तयार होतात. अभिमानस्थळांसाठी धोपटमार्गीही मरायला तयार होतात, मारायलाही तयार होतात; पण, प्रचंड सामर्थ्याच्या विरोधकांशी पराक्रम न दाखवता चुटपूट कमजोरांना दादागिरी दाखवण्यापर्यंतच त्यांची वीरश्री टिकते.

**'टोळी' वृत्ती**

नेहरूवादी समाजवादाचा पाडाव झाला, आर्थिक पुरुषार्थाने सन्मान व स्वाभिमान मिळण्याची आशा दुरावली. कोणी एक नेता किंवा पक्ष साऱ्या देशाला मोठे करील ही आशा संपली. सारे लोक सैरावैरा जीवाच्या धास्तीने धावू लागले. जो कोणी पोटाला लावील त्यालाच नेता म्हणू लागले. अशा परिस्थितीत इतिहासकालातील अभिमानस्थळे उकरून काढून रामाच्या वा शिवाजीच्या नावाने पक्ष आणि सेना उभ्या राहू लागल्या. गतेतिहासात आमच्यावर अन्याय झाला त्याची भरपाई म्हणून मंडलवादही पुढे आला. समाजवाद हरला आणि पुरुषार्थी उद्योजकतावाद पुढे येण्याऐवजी इतिहासातील भुते नाचवणारे मंदीवादी, मंडलवादी सारा देश ताब्यात घेत आहेत.

**हिंदुत्ववाद्यांचे चढउतार**

'हिंदू हा सर्वसाधारण प्रकृतीने मवाळ असतो, त्याची स्वभावधारणा अतिरेकी जहाल क्रूरतेची नाही. मुसलमानांशी सामना करायचा असेल तर हिंदुंनी संघटित बनले पाहिजे, हिंदुत्वाचा गर्व बाळगला पाहिजे; भल्याबुऱ्या सर्व मार्गाने, हा आमचा देश आहे, येथे आमच्या मर्जीप्रमाणेच चालले पाहिजे, असे हिंदवेतरांना जाणवत ठेवले पाहिजे', ही महत्त्वाकांक्षा महात्मा गांधींनी खिलाफत चळवळ सुरू केल्यानंतर सर्व देशात हळूहळू मूळ धरू लागली. इंग्रज असेपर्यंत हिंदुत्ववाद्यांनी काही पराक्रम गाजवल्याचे दिसत नाही. उलट, राष्ट्रीय स्वातंत्र्याची चळवळ व समाजसुधारक चळवळ या दोघांनाही विरोध करत ही विषवल्ली ब्रिटीश सरकारच्या आश्रयाने फोफावली. महात्मा गांधींच्या हत्येनंतर यांचा जवळजवळ सफायाच झाला; पण, समाजवादाचा जसजसा पाडाव झाला तसतसे हिंदुत्व भावना चेतवण्यात मंदिरवादी, विश्व हिंदू परिषद, बजरंग दल, शिवसेना

यांना यश येऊ लागले.

**बेस्ट बेकरीत कोलीत पेटले -**

अलीकडच्या वर्षात या हिंदुवीरांचे परमदैवत म्हणजे गुजरातचे मुख्यमंत्री नरेंद्र मोदी. गोध्रा स्टेशनवरच्या जाळपोळीत काही अयोध्या कारसेवक जळून मेले. प्रत्यक्षात काय घडले ते कधी शाबीत झालेच नाही, पण हे सर्व मुसलमान गुंडांनी घडवून आणले असे वातावरण तयार करून, महात्मा गांधींच्या गुजरातमध्ये, नरेंद्र मोदी यांनी गोडसेवादाचा परमोच्च विजय करून दाखवला. गुजरातभर योजनापूर्वक दंगली घडवून आणल्या, हजारो निरपराध मुसलमानांना मारवले, पोलीसांनी निःपक्षपातीपणाचे सोंगसुद्धा आणले नाही. फार थोड्या दंगेखोरांना अटक झाली. साक्षीदारांना दमदाटी करून त्यांना फितवण्यात आले आणि साऱ्या हिंदू गुंडाची मुक्तता करण्यात आली. सुदैवाने, 'मानवाधिकार आयोगाने' लक्ष घातल्याने निदान, 'बेस्ट बेकरी' खटला व इतर दोनचार प्रकरणांची सुनावणी गुजरात राज्याबाहेर होण्याचे ठरते आहे. खोट्या इतिहासाची भुते उभी करून नरेंद्र मोदींनी गुजरात विधानसभेत प्रचंड बहुमत मिळविले, त्यामुळे मुसलमानांवर रुबाब दाखवण्याची त्यांची इच्छा काही पुरी होताना दिसत नाही. नरेंद्र मोदींनी उभी केलेली ही राक्षसी ताकद कोसळली ती शेतकऱ्यांच्या डोक्यावर.

**- कोलीत शेतकऱ्याला जाळीत सुटले**

विजेच्या दरात २५० ते ३०० टक्के वाढ करण्यात आली. त्याचे काही निरर्गल समर्थन एका 'चोपड्या'त मुख्यमंत्र्यांनी केले; आपले सरकार शेतकऱ्यांकरिता काय काय भल्या गोष्टी करते आहे याची जंत्री मांडली आणि विजेच्या अर्थकारणात सगळा दोष पूर्वीच्या काँग्रेस शासनाचा आहे असा कांगावा केला. आपल्याच सरकारने नर्मदेचे पाणी गुजरातभर आणून दिले अशी शेखी या चोपडीत मारली आहे. शेतकरी संघटनेच्या कार्यकर्त्यांना आठवत असेल की 'बायपास टनेल' खणून मुख्य कालव्याने पाणी साबरमतीपर्यंत नेण्याचा प्रस्ताव खेडूत समाजाने मांडला होता; त्यासाठी कारसेवेचे आंदोलन केले होते; हिंदुस्थानभरातून हजारो शेतकरी त्यासाठी गोळा झाले होते. त्यावेळी नरेंद्र मोदींच्या सांगण्यावरूनच केशूभाई पटेलांनी शेतकऱ्यांवर पोलिसी दडपशाहीचा वरवंटा फिरवला होता आणि आज जणू ही योजना आपलीच होती अशी शेखी गोबेल्सच्या पद्धतीने नरेंद्र मोदी मिरवीत आहेत.

१४ ऑगस्ट २००३ रोजी बडोद्यात नियोजित केलेल्या शेतकरी मेळाव्याला हजर राहण्यासाठी गुजरातच्या सर्व जिल्ह्यातून लाखो शेतकरी गावागावातून

निघाले. मुख्यमंत्र्यांनी सर्व पोलिस अधिकाऱ्यांना ताकीद दिली होती की ज्या अधिकाऱ्याच्या भागातून एकदेखील शेतकरी बडोदा येथे पोचेल त्याची नोंद घेतली जाईल. पोलीस अधिकारी म्हणजे 'आधीच मर्कट', त्यात अशी दारु पाजलेली. दंगलीत मुसलमानांविरुद्ध शस्त्र उचलताना प्रतिकार होण्याची मनात काहीतरी धास्ती होती. इथे तर फक्त 'धोतरे' खेडूत. पोलिसांनी शेतकऱ्यांच्या गाड्या जागोजागी अडवल्या आणि त्यांना अक्षरशः गुरासारखे बडवून काढले. मारण्याच्या श्रमाने एक पोलिस इन्स्पेक्टर छातीत कळ येऊन पडला आणि नंतर दुर्दैवाने इस्पितळात त्याचा देहांत झाला. हा इन्स्पेक्टर शेतकऱ्यांच्या दगडफेकीत मेला असा मुख्यमंत्र्यांनी सर्व माध्यमातून प्रचार केला आणि मग पोलिसांनी ज्या तऱ्हेने लाठीहल्ला केला त्याच्या दृश्यफिती उपलब्ध असूनही उघड्या डोळ्यांनी पाहणे सहृदयी माणसाला शक्य होत नाही.

मानवी हक्क आयोगाकडे यासंबंधी तक्रार करण्यात आली. 'बेस्ट बेकरी' प्रकरणात प्रसिद्धीचा आणि मोठेपणा मिळण्याचा मोका होता तसा येथे नसल्याने मानवी हक्क आयोगानेही दाद घेतली नसावी. या चित्रफितींचा उपयोग परदेशी वृत्तपत्रे व बीबीसीसारख्या वाहिन्या यांच्यामार्फत करण्याचा प्रयत्न चालू आहे.

**उपोद्घात**

गुजरात आंदोलनाहून मी आलो, आंदोलनाच्या अनुभवांची उजळणी मनात झाली ती संघटकच्या सगळ्या वाचकांना कळावी असे वाटले. सगळ्याचा सारांश असा – क्रांतीकाळातही क्रांतीकारी बेशिस्त करतात. ज्यांची सारी जीवनशैलीतच बेशिस्त झालेली असते अशी माणसे क्रांतीच्या चैतन्यकणाच्या अनुभवाने मरायला तयार होतात, मारायला नाहीत. पूर्वेतिहासातील भुते उकरून मंदिर, मंडल मार्गाने थातुरमातुर आक्रमकता तयार करता येते; पण, तिचा उपयोग बलशाली प्रतिस्पर्ध्यासमोर होत नाही, शेतकऱ्यांसारख्या अजापुत्रांवरच होतो. नरेंद्र मोदींनी सारी जमवाजमवी करून मुसलमान समाजाविरुद्ध केवळ सरावासाठी अत्याचार केले, हिंदुत्ववाद्यांच्या अत्याचारशक्तीचा खरा बळी भारतभरचा शेतकरीच ठरणार!

*(२१ ऑगस्ट २००३)*

◆◆

# कॅनकून : कोण जिंकले, कोण हरले?

होणार होणार म्हणून गाजत असलेली जागतिक व्यापार संस्थेची (Le{pe ची) कॅनकुनची मंत्रीपरिषद १४ सप्टेंबर २००३ रोजी आटोपली. शेवटच्या क्षणापर्यंत काय होईल, काय नाही अशी, एखाद्या स्टंट चित्रपटातील नायक एखाद्या दरीमधील झाडाला टांगून राहिल्यानंतर आता काय होईल, काय नाही अशी धाकधुकीची परिस्थिती असते तशी परिस्थिती निर्माण झाली होती. शेवटी, सर्व राष्ट्रांचं मिळून काही एक संयुक्त सहमतीचं निवेदन निघू शकलं नाही. मग, ज्यांना 'जितं मया, जितं मया' असं म्हणायचं होतं त्यांनी आरोळ्या टाकायला सुरूवात केली. आपलं काम इथं फत्ते झालं असं चित्र उभं राहिलं तर आपल्या देशातील आपलं राजकीय वजन थोडं वाढेल असंही या आरोळ्या ठोकणारांना वाटत असावं. त्यामुळे, आपण कॅनकुनमध्ये फारच कर्तबगारी गाजवली असं त्यांनी भासवलं. आणि, सर्वसाधारणपणे गरीब देशांतील पुढाऱ्यांना आंतरराष्ट्रीय वर्तुळामध्ये असं समाधान फार क्वचित मिळतं. संयुक्त राष्ट्र संघाच्या बहुतेक संस्थांमध्ये व्यवस्थाच अशी आहे की जे ताकदवान आहे, महासत्ता आहेत त्यांच्या हाती, गरीब राष्ट्रांच्या तुलनेने, अधिक जास्त अधिसत्ता आहे. त्यामुळे संयुक्त राष्ट्रसंघातील चर्चाबैठकांमधून काहीतरी मिळवून आल्याची भावना गरीब राष्ट्रांमध्ये क्वचित असते.

जागतिक व्यापार संस्थेची रचनाच वेगळी आहे. या संस्थेमध्ये, देश लहान असो, मोठा असो; गरीब असो, श्रीमंत असो; त्याचा आंतरराष्ट्रीय व्यापारातील वाटा लहान असो, मोठा असो – सर्व सदस्यराष्ट्रांना प्रत्येकी एक मत असल्यामुळे आणि गरीब राष्ट्रे संख्येनेतरी जास्त असल्यामुळे आपण काहीतरी मिळवू शकू असं मानायला जागतिक व्यापार संस्थेच्या रूपाने पहिल्यांदा जागा तयार झाली.

कॅनकुनमध्ये कोणतेही निवेदन न होताच जागतिक व्यापार संस्थेची मंत्री

परिषद आटोपली म्हणून, संख्येने अधिक असलेल्या या गरीब राष्ट्रांच्या 'जितं मया'च्या आरोळया, माझ्या मते, अवाजवी आहेत.

मराकेश येथे जागतिक व्यापार संस्थेची स्थापना झाली तेव्हा सर्व सभासदराष्ट्रांमध्ये समझोत्यांचे करार किमान २८ झाले. मराकेश येथे १९९५ साली झालेले करार काही अचानक झाले नाहीत; त्याला लांबलचक इतिहास आहे. दुसरे महायुद्ध संपल्यानंतर, १९४७ साली गॅटच्या माध्यमातून जागतिक व्यापारासंबंधी राष्ट्राराष्ट्रांमध्ये ज्या वाटाघाटींना सुरूवात झाली त्यांनी १९९५ साली एका तऱ्हेने अर्धविराम घेतला. आता त्या अर्धविरामानंतर अधिक समाधानकारक करार व्हावे याकरिता मराकेशच्या करारांतील सेक्शन २० मध्ये पुढच्या वाटाघाटी कशा चालाव्यात याचे एक वेळापत्रक आणि त्यांची उद्दिष्टे ठरवण्यात आली आहेत. आपण सध्या शेतीसंबंधीच्या करारांविषयी पाहू. कारण सर्वच करारांविषयी बोलायचे/लिहायचे ठरवले तर कित्येक दिवस पुरायचे नाहीत.

उरूग्वे वाटाघाटींच्या आधी हिंदुस्थानातील सर्व पुढारी, विशेषतः राजकीय पक्षांचे पुढारी आणि अर्थशास्त्री आग्रहाने मांडत असत की आपल्या येथील शेतकऱ्यांना फार मोठ्या प्रमाणावर अनुदाने दिली जातात. त्यांची अशी खात्रीही होती की आपली शेतीसंबंधीची जी काही धोरणे आहेत ती अगदी योग्य आहेत. त्यामुळे, वाटाघाटींना जाताना त्यांची अपेक्षा अशी मुळीच नव्हती की श्रीमंत राष्ट्रांमध्ये शेतकऱ्यांना आपल्यापेक्षा जास्त अनुदाने असतील. या वाटाघाटींसाठी जाताना आपल्या प्रतिनिधींची तयारी कच्ची राहिली आणि त्याचा फायदा श्रीमंत राष्ट्रांनी वाटाघाटींच्या उरुग्वे फेरीत घेतला. त्यांच्याकडे शेतकऱ्यांना अनुदाने देण्याच्या वेगळया वेगळ्या पद्धती आहेत. उत्पादनाच्या आधारावर रोख पैसे देण्याच्या पद्धतींत जितके जास्त पिकवाल तितके जास्त मिळतील. काही पद्धतींत एखाद्या मालाचे कमी उत्पादन ठेवण्यासाठी जास्त पैसे दिले जातात; अगदी जमीन पड ठेवण्यासाठीही दिले जातात. काही पद्धतीत उत्पादनाशी प्रत्यक्ष संबंध येत नाही; संशोधन, कीटकनाशकांच्या मोहिमा, संरचनात्मक सोयीसुविधा इत्यादी मार्गांनी शेतकऱ्यांना मदत दिली जाते. श्रीमंत राष्ट्रांनी वाटाघाटींच्या उरुग्वे फेरीत त्यांच्याकडील, शेतकऱ्यांना मदत करण्याच्या या वेगवेगळ्या पद्धतींच्या दोन याद्या करून चर्चेच्या टेबलावर टाकल्या आणि प्रस्ताव केला की या प्रकारची अनुदाने वगळून इतर अनुदानांवर जी काही बंधने घालायची ती घाला.

इंडियाच्या प्रतिनिधींचे मुळात शेतीविषयीचे ज्ञान अकटोविकटच! परदेशात शेतकऱ्यांना इतकी आणि अशा प्रकारची अनुदाने दिली जातात याचेच त्यांना मोठे आश्चर्य वाटले. श्रीमंत राष्ट्रांच्या प्रस्तावातली खुबी लक्षात न येता इंडियासह सर्व विकसनशील राष्ट्रांनी तो विचारात घेऊन त्यांच्या यादीतील अनुदानांच्या पद्धतींची 'ग्रीन बॉक्स्' आणि 'ब्ल्यू बॉक्स्' अशा दोन गटांत विभागणी केली आणि त्या दोन्ही बॉक्समधील अनुदाने सोडून, इंडियातल्या प्रतिनिधींना ओळखीची जी अनुदाने होती त्यावर त्यांनी बंधने घालून घेतली. श्रीमंत देशांनी तशा प्रकारची अनुदाने एकूण उत्पादनाच्या ५ टक्क्यांपर्यंत आणि विकसनशील देशांनी १० टक्क्यांपर्यंत ठराविक कालावधीत टप्प्याटप्प्याने उतरवावीत असा ठराव सर्वांनी मान्य केला. शेतीमालाच्या व्यापारासंबंधी आणखीही काही नियम मान्य करण्यात आले. उदाहरणार्थ, प्रत्येक देशाने इतर सर्व देशांसाठी अशाच अटी घालाव्यात की ज्या सर्वांत जास्त अनुकूल असतील. समजा, हिंदुस्थानचे पाकिस्तानबरोबर भांडण आहे आणि श्रीलंकेशी सख्य आहे. अशा परिस्थितीत हिंदुस्थानने श्रीलंकेसाठी व्यापारासाठी काही विशेष अनुकूल अटी मान्य केल्या तर त्याच अटी पाकिस्तानशी व्यापार करतानाही मान्य कराव्या लागतील. याला 'चीीीं ऋर्रीीीशव छरींळीी' कलम म्हणतात.

दुसरी अट अशी की एकदा तुमच्या देशाच्या सरहद्दीच्या आत माल आला की तो परदेशी माल आणि तुमच्या देशात तयार झालेला माल यांच्यात भेदभाव ठेवता येत नाही.

या दोन अटींच्या आधाराने जागतिक व्यापार संस्थेने नियमांचा एक मोठा संच तयार केला. ते नियम कोणालाच सर्वच्या सर्व समाधानकारक वाटले नाहीत हे साहजिकच आहे. जगामध्ये काही देश अत्यंत श्रीमंत आहेत तर काही देश अत्यंत गरीब आहेत. शेळी आणि वाघ यांना एकाच थाळीत खायला घातलं तर काहीतरी कुरबूर होणारच! विशेषतः, शेतीच्या बाबतीत तर असंतुलन फारच होतं. कारण १९३० च्या मंदीनंतर अमेरिकन अध्यक्ष रुझवेल्ट यांनी राबविलेल्या आर्थिक धोरणानंतर अमेरिकेतील आणि युरोपमधीलही शेतकऱ्यांना फार मोठ्या प्रमाणावर अनुदाने दिली जाऊ लागली, आजही दिली जातात. उलट, हिंदुस्थानसारख्या, बंदिस्त समाजवादी अर्थव्यवस्था राबविणाऱ्या देशांतील शेतकऱ्यांना अनुदाने तर नाहीतच, उणे अनुदाने आहेत. आणि ही गोष्ट मी १९८० सालापासून सातत्याने मांडत आलो आहे. हिंदुस्थानातील शेतकऱ्यांना उणे अनुदान आहे म्हणजे त्याचा जो काही उत्पादनखर्च आहे तितकेसुद्धा पैसे त्याला मिळत

नाहीत किंवा, जागतिक व्यापार संस्थेच्या शब्दांत सांगायचं झालं तर खुल्या बाजारपेठेमध्ये त्याला जितकी किंमत मिळाली असती तितकी किंमत हिंदुस्थानातील शेतकऱ्याला मिळू दिली जात नाही.

शेती अनुदानांच्या बाबतीत जगामध्ये दोन परस्परविरुद्ध टोकांचे देश आहेत. जपानसारखा देश शेतकऱ्याला खुल्या बाजारपेठेत जितकी किंमत मिळाली असती त्याच्यापेक्षा ९०% जास्त किंमत मिळावी अशी अर्थव्यवस्था राबवितो. आणि त्यांनी जागतिक व्यापार संस्थेला हे लेखी स्वरूपात सादर केले आहे; याच्या उलट, हिंदुस्थान सरकारने लिहून दिलं आहे की खुल्या बाजारपेठेमध्ये हिंदुस्थानच्या शेतकऱ्याला १८७ रुपये मिळणार असतील तर बाजारमध्ये त्याला फक्त १०० रुपये मिळावेत अशी आमची व्यवस्था आहे. यालाच उणे सबसिडी म्हणायचे. हिंदुस्थानातील शेतकऱ्यांना त्यांनी बाजारात पाठविलेल्या मालाची बऱ्याच वेळा 'उलटी पट्टी' येते, ती उणे अनुदानाचंच उदाहरण आहे. शेतकऱ्याला अनुभव असा येतो की त्याने वांगी, काकडी, पालेभाज्या असा काही माल बाजारात पाठवला तर कधी पैसे मिळतात तर कधी आडत्या त्यांना सांगतो की आम्ही तुमचा माल विकला, त्यातून जे पैसे आले त्याने हमाली, वाहतूक असे खर्चसुद्धा भागवता आले नाहीत; तुमच्या नंतरच्या मालाच्या हिशोबातून ते वसूल केले जातील. याला शेतकरी त्याच्या भाषेत 'उलटी पट्टी' म्हणतो; जगाच्या भाषेत त्याला उणे अनुदान म्हणायचे. हिंदुस्थानातील शेतकरी 'उलटी पट्टी' घेऊन शेती करतो हे जागतिक व्यापार संस्थेच्या वाटाघाटींच्या वेळी जगजाहिर झाले.

अशी ही दोन विरुद्ध टोकं. तरीही जागतिक व्यापार संस्थेच्या करारांनुसार दोघांचाही व्यापार खुला व्हावा अशी अपेक्षा आहे; पण चित्र असं की एका बाजूला अमेरिकेसारख्या श्रीमंत देशातील शेतकऱ्यांच्या जमिनी मोठ्या, त्यांच्याकडचं तंत्रज्ञान मोठं आणि त्यांना सरकारकडून प्रचंड प्रमाणावर अनुदानं दिली जातात. यूरोप आणि जपानमध्येही तशीच परिस्थिती आहे. त्यामुळे गरीब देशांची धारणा अशी की हे सर्व दुष्ट आहेत, ते त्यांच्या शेतकऱ्यांना भरपूर मदत करतात त्यामुळे ते स्वस्तात माल पिकवतात; तो आमच्या बाजारात आला की आमच्या बाजारातील किमती पडतात; त्यामुळे, काहीही करून त्यांना त्यांची अनुदाने कमी करायला लावलं पाहिजे. जर का एकत्र खुला व्यापार करायचा असेल तर व्यापारातील सर्व खेळाडूंनी अनुदाने सारख्याच पातळीवर ठेवणे आवश्यक आहे यात काही शंका नाही. माझ्या कृषि कार्यबलाच्या अहवालात याबाबत मी म्हटले आहे की एका बाजूला पाश्चिमात्य श्रीमंत देशातला शेतकरी म्हणजे सशक्त पहिलवान

आणि दुसऱ्या बाजूला हिंदुस्थानातला भुकेलेला काडीपहिलवान यांची ही कुस्ती आहे. मग, या दोघांनाही एका पातळीवर आणण्याचे काय काय मार्ग आहेत?

हिंदुस्थानातलं सरकार हिंदुस्थानातल्या शेतकऱ्याला उणे ८७ टक्क्याच्या ऐवजी जास्तीत जास्त (अधिक) १० टक्क्यांपर्यंत अनुदान देण्याची काही शक्यता दिसत नाही. श्रीमंत देशांतील शेतकऱ्यांना जवळजवळ ३०० अब्ज डॉलर्स अनुदान म्हणून दिले जातात. तेवढी रक्कम शेतकऱ्यांना देण्याची हिंदुस्थान सरकारची कुवतही नाही आणि राजकीय इच्छाही नाही. अशा परिस्थितीमध्ये हिंदुस्थानातील शेतकरी आणि अमेरिका युरोपमधील शेतकरी यांना स्पर्धेसाठी एका पातळीवर आणण्याचा एकच मार्ग राहतो तो म्हणजे अमेरिका आणि युरोपमधील शेतकऱ्यांची अनुदाने कमी केली पाहिजेत. हे करायला काय मार्ग आहे? जर का जागतिक व्यापार संस्था नसती तर अशा तऱ्हेचा प्रस्ताव अमेरिकेने आणि युरोपने ऐकूनही घेतला नसता. कारण, एक काळ असा होता की या अनुदानांमुळेच गरीब देश जगले. ज्या काळात आम्ही अन्नधान्याच्या बाबतीत स्वावलंबी नव्हतो तेव्हा अमेरिकेच्या शेतकऱ्यांनी अनुदानांच्या आधाराने गव्हाचं प्रचंड उत्पादन काढलं म्हणून झङ४८० चा गहू आमच्याकडे आला आणि आम्ही जगलो. युरोपमध्ये दूधउत्पादनाला प्रचंड अनुदाने असल्यामुळे तेथे दुधाची सरोवरे तयार झाली, लोण्यांचे डोंगर तयार झाले. त्यांना त्या सरोवरांचा आणि डोंगरांचा काही फायदा नव्हता, त्याचा फायदा घेतला हिंदुस्थानसारख्या देशांनी. युरोपातून दुधाची भुकटी आणि लोणी आणून त्याच्या पैशातून इथला दूध व्यवसाय उभा केला. तेव्हा, एक काळ असा होता की ज्यावेळी श्रीमंत देशातील या अनुदानांमुळे हिंदुस्थानसारख्या गरीब देशांचा फायदा झाला; पण, आता भिकेवर जगण्याची अवस्था टाकून व्यापारातील भागीदार म्हणून समोर यायचं झालं तर या नियमांमध्ये बदल होणे आवश्यक आहे. गरीब देशांना, साहजिकच, असं वाटत होतं की, बाकी काही का असेना, मराकेशच्या करारांवर सह्या करताना श्रीमंत देशांनी कबूल केलं होतं की ते त्यांची अनुदाने ५ टक्क्यांपर्यंत खाली आणतील ते त्यांनी प्रत्यक्षात केलं पाहिजे. याउलट, श्रीमंत देशांतील, विशेषत: अर्थकारणी धुरीणांचा अनुभव असा की आपण आता ज्या परिस्थितीत आहोत त्या परिस्थितीमध्ये जर हे करार तंतोतंत पाळले गेले तर त्याचा श्रीमंत देशांच्या आर्थिक परिस्थितीवर अत्यंत विपरीत परिणाम होईल. एवढंच नव्हे तर, त्यामुळे जी जागतिक मंदी तयार होईल त्या जागतिक मंदीचा गरीब देशांवरसुद्धा प्रतिकूल परिणाम होईल. आपल्याला वाटतं की ही स्पर्धा अयोग्य आहे त्यांच्याकडे सगळे

ताकदवान पहिलवान आहेत आणि आपल्याकडे काहीच नाहीत. अमेरिकेतल्या किंवा युरोपमधील अर्थतज्ज्ञांना असं वाटतं की हिंदुस्थानात किंवा इतर गरीब देशांमध्ये जे काही कायदेकानून आहेत त्याप्रमाणे पर्यावरणाविषयीचे नियम फारच ढिले झाले आहेत. कारखाना काढताना पर्यावरण अबाधित राहण्यासाठी ज्या तऱ्हेचा खर्च श्रीमंत देशातील कारखानदाराला करणे कायद्याने बंधनकारक असते तसे काही बंधन गरीब देशांतील कारखानदारांवर नसते. त्याच्या पलीकडे, गरीब देशांतील मजुरीचे दर फार कमी आहेत. लहान मुलंसुद्धा इथं काम करतात. अशा परिस्थितीमध्ये ज्या देशांमध्ये पर्यावरणविषयक दर्जा उच्च राखणे भाग पडते आणि मजुरीच्या अटीसुद्धा अधिक कडक आहेत आणि ज्या देशांमध्ये याच्या उलट स्थिती आहे अशा देशांमध्ये स्पर्धा होणे फार कठीण आहे. आणि, आणखी एक महत्त्वाची गोष्ट अशी की जर का शेतीकरता काही विशेष केलं नाही तर युरोप आणि अमेरिकेसारख्या देशांमध्ये आता अतिऔद्योगिकीकरणामुळे पर्यावरणाचा विनाश होईल आणि आपल्याप्रमाणेच तिकडेही शेती करणारे आणि बिगरशेती व्यवसायउद्योग करणारे असे दोन वेगळेवेगळे-विभक्त समाज तयार होतील; त्यांच्यात दरी निर्माण होईल. आजच युरोपमध्ये अशी परिस्थिती आहे की शहरातील मुली शेतकऱ्याच्या मुलाबरोबर 'डेटिंग'सुद्धा करू इच्छित नाहीत. शेतकऱ्यांना काही दिलासा दिला नाही तर ही दरी अधिक रूंदावण्याची भीती त्यांना भेडसावीत आहे.

अशा परिस्थितीत कॅनकूनच्या कुरुक्षेत्रावर जेव्हा कौरव आणि पांडव जमले तेव्हा आपली बाजू समर्थनीय आहे असं दोघांनाही वाटत होतं. त्यामुळे, चर्चेच्या वेळी साहजिकच आणखी एक महत्त्वाचा संदर्भ पुढे आला - हिंदुस्थानात लवकरच निवडणुका येत आहेत आणि अमेरिकेची राष्ट्राध्यक्षांची निवडणूकही जवळ येऊन ठेपली आहे. अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षांना अनेक कारणामुळे - इराकमध्ये मार खाण्यामुळे, अफगाणिस्थानातील अर्धवट यशामुळे - पुन्हा निवडून येण्याची शक्यता तयार होण्यासाठी काहीतरी लक्षणीय करण्याची गरज वाटते आणि हिंदुस्थानात भारतीय जनता पक्षालाही अशी आवश्यकता वाटते की काँग्रेसने उरुग्वे वाटाघाटींमध्ये जितका शेळपटपणा केला तितका काही आम्ही जागतिक व्यापार संस्थेच्या वाटाघाटींत दाखवत नाही असे लोकांना वाटावे. त्यांनी कॅनकूनमध्ये श्रीमंत देशांतील शेतीअनुदानांविरुद्ध झोड उठवली याचा अर्थ असा नाही की त्यांच्या मनामध्ये हिंदुस्थानातील शेतकऱ्यांविषयी कळकळ आहे किंवा हिंदुस्थानातील शेतीची भरभराट व्हावी किंवा हिंदुस्थानची शेती जागतिक दर्जाला

पोहोचावी अशी ईर्षा आहे; फक्त मतदारांवर प्रभाव पाडणे एवढाच त्यांचा हेतू आहे.

अमेरिकेत मोठ्या प्रमाणावर अनुदाने आहेत - अधिक अनुदाने आहेत. त्यामुळे गरीब देशांतील शेतीमालाच्या किंमती पडतात असा मुख्य युक्तिवाद अरुण जेटलींनी केला; पण अरुण जेटलींचं सरकार किंवा त्यांच्या आधीचं हिंदुस्थानातील प्रत्येक सरकार हे जाणीवपूर्वक उणे अनुदान शेतकऱ्यांवर लादून हिंदुस्थानातील शेतीमालाचे भाव पाडतच होतं. अमेरिकेतील अधिक अनुदाने आणि हिंदुस्थानातील उणे अनुदाने या दोघांचाही अंकगणिती परिणाम हिंदुस्थानातील शेतीला लुटण्यातच होतो. तेव्हा, जे लोक आपल्याच शेतकऱ्यांवर उणे अनुदान लादतात त्यांना बाहेरच्या देशांना तुम्ही अधिक अनुदाने देता म्हणून दोष देण्याचं आणि त्यांच्याविरुद्ध तक्रार करण्याचं काही कारण नाही. श्रीमंत देशांतील अधिक अनुदाने आणि गरीब देशातील उणे अनुदाने ही दोघेही एकाच दिशेने काम करतात. तेव्हा अमेरिकेतील बुश सरकारची शेतीविषयक धोरणे आणि हिंदुस्थान सरकारची शेतीविषयक धोरणे ही दोघेही हिंदुस्थानच्या शेतकऱ्याला अधिकाधिक कर्जात आणि गरीबीत लोटणारी आहेत.

मी १९८० सालापासून खुल्या बाजारपेठेचा पुरस्कार केला आहे आणि म्हणून, जागतिक व्यापार संस्थेविषयी, एखाद्या आईला आपल्या मुलाविषयी वाटावी तशी, माझ्या मनात आपुलकी आहे. कॅनकूनची मंत्रीपरिषद फिसकटली म्हणजे आम्ही जिंकलो, आता जागतिक व्यापार संस्था संपलीच अशा तऱ्हेची हाळी मारण्याचा उद्योग स्वदेशी जागरण मंच, जागतिकीकरणाला विरोध करणाऱ्या गैरसरकारी संस्था संघटना करीत आहेत तो शुद्ध वाह्यातपणा आहे; त्यांना जागतिक व्यापार संस्थेच्या काम करण्याच्या पद्धती आहेत त्या समजलेल्या नाहीत त्याचं हे लक्षण आहे. कॅनकून पडलं म्हणजे जागतिक व्यापार संस्था पडलेली नाही. सायकल आणि सायकलस्वार दोघेही पडू नयेत म्हणून काही किमान वेगाने सायकल चालतच रहावी लागते. तसंच, आंतरराष्ट्रीय व्यापाराविषयीच्या या चर्चा थांबू नयेत म्हणून याच्यापुढेही मंत्रीपरिषदा होतील आणि जिथं आज कॅनकूनला वाटाघाटी थांबल्या तेथून पुढे चर्चेला सुरुवात होईल.

काही गोष्टी स्पष्ट झाल्या. जागतिक व्यापार संस्थेत जे जे काही घडतं ते सगळंच चांगलं असतं असं काही मी समर्थन करीत नाही. या संस्थेच्या काम करण्याच्या पद्धतीमध्ये काही मोठ्या चुकाही आहेत. त्या चुका दुरुस्त करून एका नवीन स्वरूपात जागतिक व्यापार संस्था पुनरुज्जीवित होऊ शकेल. उदाहरणार्थ, जागतिक व्यापाराचे नियम ठरविताना या संस्थेने कायदेकानून

आणि नियम असे केले आहेत की त्यांचा अर्थ लावणे प्रकांडपंडित बॅरिस्टर असल्याखेरीज शक्य होत नाही. त्यामुळे, कोणालाही वादविवाद सोडविण्याकरिता या संस्थेची जी यंत्रणा आहे तिच्यापुढे जायचं झालं तर सामान्य शेतकरी काही जाऊ शकत नाही; त्याला वकील घेऊनच जावं लागतं आणि हा वकीलांचा धंदा आज मोठा फायद्याचा झाला आहे. शेतकऱ्यांच्या लुटीच्या अर्थव्यवस्थेने निदान मी १९८० साली 'उत्पादनखर्चाइतका भाव शेतकऱ्याला मिळत नाही' इतक्या साध्या शब्दांत केले. त्याच्याऐवजी जागतिक व्यापार संस्थेने, देशामध्ये मिळणारी किंमत आणि काल्पनिक खुल्या बाजारात मिळणारी किंमत यांची तुलना केल्यामुळे अनेक अर्थशास्त्र्यांची पोळी पिकली आहे. नवीन स्वरूपातील जागतिक व्यापार संस्थेला वाटाघाटींतील प्रगती करताना कायदेकानूंचा फार कीस पाडावा लागणार नाही, तसंच अर्थशास्त्रसुद्धा असं राहील की ज्यामुळे सर्वसाधारण शेतकरीसुद्धा त्याच्या भल्याचं होत आहे का त्याच्या तोट्याचं होत आहे हे समजू शकेल अशा तऱ्हेने करार नव्याने मांडावे लागतील. मग, कॅनकूनसारखी धुमश्चक्री आणि त्यानंतरचा गदारोळ होणार नाही आणि झालाच तर सर्वसामान्यांना तो अनाकलनीय वाटणार नाही.

कॅनकूनला नेमकं काय झालं? लोक कुठेतरी जमले, काय बोलले कोणास ठाऊक! कोणी म्हणतो हा जिंकला, कोणी म्हणतो तो हरला. जोतिबा फुल्यांनी त्यांच्या पुस्तकात एक छान वर्णन केलं आहे. एक शेतकरी कोर्टात जातो. एक वकील त्याची बाजू मांडतो त्याला न समजणाऱ्या भाषेत, दुसरा वकील त्याच्या विरुद्ध बाजू मांडतो तीही त्याला न समजणाऱ्या भाषेत, आणि न्यायाधीश शेवटी सांगतो की तुझी जमीन गेली. कॅनकूनला काहीसं असंच झालंय. काय झालं आहे, आपल्या बाजूनं कोण बोललं हेही शेतकऱ्यांना समजलं नाही, आपल्या विरुद्ध कोण बोललं हेही समजलं नाही आणि आपण जिंकलो का हरलो हेही समजलं नाही. अशा परिस्थितीत हिंदुस्थानातला सर्वसाधारण शेतकरी आहे.

हा सामना कोणीही हरलेला नाही, कोणी जिंकलेला नाही; सामना अनिर्णितही नाही; फार फार तर ही चहापानाची मधली सुट्टी आहे असं म्हणता येईल. इतिहासाचा क्रम पाहता, कुणालाही असे वाटत असेल की आपण पुन्हा मागे जाऊ आणि पुन्हा एकदा बंदिस्त समाजवादी पद्धतीचा आंतरराष्ट्रीय व्यापार सुरू होईल तर या आशा केवळ भोळसट आहेत.

*(६ ऑक्टोबर २००३)*

◆◆

# बळिराज्य – विदर्भ

**विदर्भाचा कोंडमारा फार जुना आहे. छत्तीस वर्षांपूर्वी मुक्तीच्या आशेने विदर्भ महाराष्ट्रात सामील झाला. मोठी भूल झाली. विदर्भाच्या आजच्या स्थितीने जीव गुदमरतो म्हणून विदर्भजनांपुढे आमचे हे निवेदन आणि आवाहन.**

आमच्यात कोणी पुढारी नाही. विविध क्षेत्रात सचोटीने कष्टाने काही करून दाखवलेली आम्ही सामान्य माणसे आहोत. आम्हाला कोणतीही राजकीय महत्त्वाकांक्षा नाही. पदांची अभिलाषा नाही.

छत्तीस वर्षांपूर्वी राज्य पुनर्रचनेच्यावेळी अनेकांच्या राजकीय सोयीसाठी विदर्भाला महाराष्ट्रात ढकलण्यात आले. यात सोय होती, मनोमीलन नव्हते. कागदोपत्री अटीतटी घालाव्या लागल्या यावरूनच हे स्पष्ट आहे. या अटी कागदावरच राहिल्या हे खरे, पण त्याहूनही महत्त्वाची गोष्ट ही की, नागपूर करारातील सर्व अटी कसोशीने अंमलात आल्या असत्या तरी विदर्भाची दैना कमी झाली नसती. कदाचित काहींना नोकऱ्या मिळाल्या असत्या, काहींना अधिकार. साखर सम्राटाच्या तोलामोलाचे सूतसम्राटही तयार झाले असते कदाचित, पण विदर्भाचे दुःख काही कमी झाले नसते.

राज्य पुनर्रचनेच्या वेळी सर्व वातावरण समाजवादाच्या स्वागताचे होते. समाजवादाने देशाच्या विकासाचे, वैभवाचे स्वप्न पुरे होणार आहे अशी दिशाभूल सोविएत युनियनच्या हवाल्याने विविध नेते करीत होते. सरकारी नियोजन आणि अंदाजपत्रकी तरतुदी यातून विकास साधण्याची स्वप्ने पाहणाऱ्यांना नागपूर कराराच्या कागदाच्या कपाट्यात विदर्भाचा उद्धार दिसला. असले ढिसाळ नेतृत्व सामान्य विदर्भवासीयांचे दुर्दैव ठरले.

आता समाजवादी स्वप्नविलास कोसळला आहे. नियोजन–अर्थव्यवस्थेच्या

परिणामामुळे सारा देश आर्थिक संकटात सापडला आहे. बेकारी, गरिबी, कर्जबाजारीपण याखेरीज भ्रष्टाचार आणि गुन्हेगारी नंगानाच घालत आहेत. विदर्भाने आशा केली नियोजित औद्योगिकरणाची, त्याच्या हाती आला मुंबईहून निघालेला जातीयवादाचा आणि गुन्हेगारीचा रोख नरक!

अशा परिस्थितीत विदर्भवासीयांनी आपल्या परिस्थितीचा पुन्हा फेरविचार करण्यात काय गैर आहे? विदर्भवासीयांनी आपली अस्मिता सावरली तर त्यात कोणता देशद्रोह आहे? कोणता महाराष्ट्रद्रोह आहे?

सारे मराठी भाषिक एका राज्यात यावे ही कल्पना पन्नास वर्षापूर्वी क्रांतीकारी होती. कारण मराठी भाषिक कोणी मध्यप्रदेशात, कोणी हैद्राबाद राज्यात, कोणी कर्नाटकात असे विखुरलेले होते. मराठी भाषेच्या आणि संस्कृतीच्या संबंधाने त्यांना एकत्र आणले. एका राज्यात एकच भाषा असावी तरच तेथे लोकांचे राज्य चालेल. ही जोतिबा फुल्यांची मांडणी होती पण, एका भाषेचे एकच राज्य असले पाहिजे असे काही तत्त्व नाही. सगळे मराठी भाषिक एकत्र आले पाहिजे असे म्हणणाऱ्यांचा हेतू भाषा प्रेमाचा आहे, संस्कृती प्रेमाचा आहे का उदात्त शब्दाआडून आपला स्वार्थ साधण्याचा आहे. हे बघायला नको का?

काही मोठी पंडित मंडळी विदर्भराज्य स्वावलंबी होणार नाही, तोट्याचे होईल अशी भीती दाखवत आहेत. धनाढ्य मुंबईशी जोडून रहा, त्यातच आपला फायदा आहे अशी लाचारीची भिकारी भूमिका ते मोठ्या डौलाने मांडत आहेत; पण हे सारे पांडित्यच खोटे आहे. महाराष्ट्र राज्यच मुळात बुडित आहे. त्यांच्या जमेच्या आणि खर्चाच्या बाबींची कशीही वाटणी केली तरी वाटेकरी बुडितच राहणार. बुडित राज्यांना जगण्याचा अधिकारच नसेल तर महाराष्ट्र राज्यही दुसऱ्या कोणत्या तरी सधन राज्यात टाकून दिले पाहिजे. आणि सगळा हिंदू देशच बुडित आहे. त्याला कोठे ढकलावे?

मुंबईच्या मोहाने परदेशातून येणारी गुंतवणूक सगळी तिकडे जाईल, विदर्भाच्या वाट्यास काही येणार नाही असाही बागुलबुवा काही स्वयंमान्य अर्थशास्त्री दाखवत आहेत. विदर्भाला सरकारी अंदाजपत्रकात न्याय मिळाला नाही, विदर्भाचा अनुशेष किती मोठा आहे हे दाखविण्यासाठी काही आकड्यांच्या कसरती करून एवढा पैसा विदर्भाकडे आला तर विदर्भाचे सोने होईल असा युक्तिवाद ते करत आहेत. हा युक्तिवाद भ्रामक तर आहेच, पण त्या आधाराने पश्चिम महाराष्ट्रातील सर्व लोकांविरुद्ध जी द्वेषाची मोहीम उघडण्यात आली आहे त्यामुळे सृजनशीलतेची परंपरा असलेले वैदर्भी विदर्भाच्या मागणीविषयीही साशंक झाले आहेत.

विदर्भाचा अनुशेष प्रचंड आहे, पण त्याचा संबंध सरकारी अंदाजपत्रकीय अनुशेषाशी नाही. हा अनुशेष कोणा एका प्रदेशाने विदर्भावर लादलेला नाही. विदर्भ जंगलांनी समृद्ध आहे. साऱ्या देशाला कोळसा, मँगनीज इत्यादी मौल्यवान खनिजे तो पुरवितो. विदर्भाच्या या सगळया पांढऱ्या, काळया, हिरव्या सोन्याची लूट गोऱ्या इंग्रजांनी केली. स्वातंत्र्यानंतर, समाजवादाच्या नावाखाली काळया इंग्रजांनीही ती लूट चालविली. या सर्वच कच्च्या मालाची लूट चालू राहिली. हजारो कोटी रुपयांची दरसाल लूट झाली. विदर्भाचा खरा अनुशेष या लुटीत आहे.

दिल्लीचे सरकार लुटीचे राजकारण चालवत होते आणि राज्यसरकारही दिल्लीला बांधलेले, विदर्भ मूर्तीमंत, 'भारत' आणि याउलट दिल्लीचे सरकार आणि महाराष्ट्र 'इंडिया'चा, मुंबई महाराष्ट्राची खरी, पण त्यापेक्षा अधिक इंडियाची हे विदर्भाच्या दु:खाचे मुख्य कारण आहे.

कापूस एकाधिकाराच्या नावाखाली विदर्भातील घरभेद्यांनी शेतकऱ्यांचा बळी देऊन स्वतः कापूस सम्राट, सूतसम्राट बनण्याचा प्रयत्न केला. आपले पांढरे सोने साठवण्याचे, विकण्याचे किंवा त्यावर काम करण्याचे स्वातंत्र्य विदर्भाला मिळाले नाही. कोणत्याच पक्षाने ही विदर्भाची कैफियत ऐकली नाही यातच विदर्भाच्या दु:खाचे मर्म आहे.

रामायणात पुष्पक विमानातून अयोध्येस परत जाताना राम सीतेस, 'हा पहा विदर्भ – बुद्धिवंतांचा प्रदेश', म्हणून सांगतो. प्रतिकालिदास भवभूती येथला, अर्थ गौरवात अजोड असा भारवि येथला, भास्कराचार्य येथले; पण भवभूतीप्रमाणेच, विदर्भाची जनता 'काळ अनंत आहे, पृथ्वी विपुल आहे, आपल्या गुणांची दाद घेणारा कुणी भेटेल' या आशेवर तगून आहे. विदर्भाची सृजनशील संस्कृती मागे पडली. तलवारीवर जगणारेच काय ते वीर अशी भावना झाली. लुटारू कर्तबगार ठरले. समाजवादाच्या रणगाड्यांना थांबवण्याचे धाष्टर्य कोणी करू धजले नाहीत. नेतृत्वाच्या भोवती खोट्या पुढाऱ्यांचे जंगल माजले. सत्तालोभापोटी त्यांनी विदर्भाला वापरून घेतले, लोकांच्या मनातील विदर्भप्रेम किती अथांग आहे याची जाणीव असल्याने त्यांनी त्याचा आपल्या स्वार्थाकरिता लाभ उठवला. आपल्या राजकारणाच्या सोयीसाठी विदर्भाची तकलादू कैफियत मांडली. आंदोलनाचा गवगवा केला पण जरा संधी मिळताच 'इंडिया'त सामील होऊन गेले. विदर्भाचे करंटे नेतृत्व हे विदर्भाचे दुसरे मोठे दु:ख.

विदर्भवासीयांना आम्ही आवाहन करतो, विदर्भाच्या निसर्गसंपत्तीला आणि

लोकांच्या संस्कृतीला न्याय देणारी व्यवस्था मुंबईहून उभी राहू शकत नाही अशी निश्चिती झाल्यामुळे हे आवाहन करत आहोत. केवळ वेगळे विदर्भ राज्य होऊन काहीही प्रश्न सुटत नाहीत ही आमची खात्री आहे. मुंबईच्या ऐवजी नागपूर राजधानी आणि कोणी विदर्भी मुख्यमंत्री असे झाल्याने आमच्या कल्पनेतला विदर्भ साकार होत नाही.

विदर्भाचे हितसंबंध जोपासायचे असतील तर विदर्भाच्या परंपरेशी मिळतीजुळती व्यवस्था येथे उभी करावी लागेल, लोकांना जाच करणारी नेता-तस्कर-गुंडा-अफसर चौकडी साऱ्या देशात आणि महाराष्ट्रात विषवल्लीप्रमाणे फोफावली आहे, तिचा बोजा डोक्यावर घेण्याचे नव्या विदर्भास काहीच कारण नाही. किमान नोकरदार, किमान नियमावल्या, किमान लायसेन्स-परमिट-कोटा व्यवस्था, किमान सरकारी हस्तक्षेप हा विदर्भातील जनतेच्या हितासाठी मार्ग आहे. काय करायची राजधानी? सरकार छोटे असावे, आधुनिक तंत्रज्ञानाच्या सहाय्याने वेगवेगळया जिल्ह्यात असलेल्या मंत्र्यांच्या खात्याशी संबंध सातत्याने राखले जावे. कायदा व सुव्यवस्था अशी असावी की प्राणाच्या, मालमत्तेच्या हानीचे भय राहू नये आणि न्यायालयात दोनतीन महिन्याच्या आत निर्णय मिळावा. अशा विदर्भाचे स्वप्न आम्ही पाहतो. असा विदर्भ समृद्ध होईल, वैभवशाली होईल. विदर्भाचे सरकार गरीब असेल पण लोक सर्व अर्थाने संपन्न असतील. असा हा 'बळीराज्य' विदर्भ असेल.

विदर्भवासीयांना आमचे आवाहन आहे की, त्यांनी या प्रश्नावर गंभीरपणे विचार करावा. कोणा मुंबईकर पुढाऱ्याने डोळे वटारले म्हणून घाबरून जाण्याचे कारण नाही. सर्व देश समाजवादी औद्योगिकीकरणाने ओढवून घेतलेल्या आर्थिक संकटाने घेरला गेला असताना 'बळीराज्य' विदर्भ एकविसाव्या शतकातील वैभवशाली प्रदेशाचा मार्ग दाखविण्याचे ऐतिहासिक कार्य बजावू शकतो.

देशभर थैमान घालणाऱ्या भ्रष्ट व्यवस्थेत, उद्दिष्टांच्या आशेने जगायचे, का विदर्भ संस्कृतीने देशाला नवा मार्ग दाखवून स्वराज्य संस्थापना करायची? निर्णय तुमचा आहे.

*(६ डिसेंबर २००३)*

◆◆

# मुंबईकर, मुंग्या आणि मधमाश्या

११ जुलै २००६ रोजी मुंबईत एकामागोमाग एक असे सात बाँबस्फोट झाले. सातही बाँबस्फोट पश्चिम रेल्वेच्या उपनगरी लोकल गाड्यांमध्ये वेगवेगळ्या स्टेशनांवर झाले. त्याच दिवशी श्रीनगर येथेही एका बाँबस्फोटात अनेक माणसे मरण पावली.

श्रीनगरच्या रहिवाशांना बिचाऱ्यांना वर्षानुवर्षे बाँबस्फोटांची आणि हल्ल्यांची सवय झाली आहे. त्यांच्या दृष्टीने ११ जुलैचा बाँबस्फोट हा शेकडो बाँबस्फोटांच्या मालिकेतील एक. थोड्याच कालावधीत त्याकडे दुर्लक्ष करून ते आपापल्या कामाला लागले. बाँबस्फोटात ज्यांच्या घरची माणसे जखमी झाली किंवा मरण पावली त्यांच्या नातेवाइकांपुरतेच काय ते दुःखाचे सावट राहिले; बाकीचे सारे श्रीनगर आपल्या नेहमीच्या कामधंद्याला, उद्योगाला लागले.

मुंबईच्या बाबतीत मात्र बाँबस्फोट हा इतका अंगवळणी पडण्यासारखा प्रकार नाही. १९९३ साली झालेल्या प्रचंड बाँबस्फोटानंतर वर्षादोनवर्षांनी एखादा बाँबस्फोट होत राहिला, पण तो मुंबईतील वेगवेगळ्या जागी. त्यांचा परिणामही स्थानिक. परंतु, १९९३ सालानंतर १३ वर्षांनी पहिल्यांदा सगळ्या मुंबईला व्यापून टाकणारा दहशतवादाचा हा प्रकार घडला.

स्फोट झाल्याझाल्या त्यात प्रत्यक्षात जखमी न झालेल्या लोकांनी डब्यामध्ये अडकलेल्या, रुळांवर पडलेल्या लोकांना ताबडतोब वाचवायला सुरुवात केली. आजूबाजूच्या इमारतींतील नागरिकांनीही अंथरुणे, पांघरुणे, साड्या जे काही हाती लागले ते जखमींच्या मदतीकरिता ताबडतोब देऊ केले. सगळे लोक एकदिलाने कामाला लागले. ज्यांना जखमा झालेल्या नव्हत्या अशा लोकांनाही घरी जाण्याकरिता रस्त्याने जाणाऱ्या सर्व वाहनचालकांनी – छोट्या गाड्या, मोठ्या ट्रक, सर्वांनीच – मदत केली.

दुसऱ्या महायुद्धाच्या काळात लंडनवर हिटलरच्या विमानांनी प्रचंड विध्वंसक बाँबहल्ले एकामागोमाग एक केले. प्रतिदिनी. एवढेच नव्हे तर, प्रत्येक तासादोनतासांनी विमानांचे थवेच्या थवे लंडनवर येत आणि मोठ्या प्रमाणावर बाँबचा वर्षाव करून निघून जात. लंडनवासियांनाही सवय झाली आणि त्यांनी ज्या शिस्तीने बाँबहल्ल्यांना तोंड दिले, एवढेच नव्हे तर आपले नेहमीचे दिनक्रम चालू ठेवले आणि, त्याहीपलीकडे जाऊन, युद्धासाठी लागणाऱ्या शस्त्रांच्या, दारुगोळयांच्या, रणगाड्यांच्या कारखान्यांची चाके फिरत ठेवली त्याचे जगभर कौतुक झाले.

मुंबईकरांनीही लंडनवासियांना शोभेल अशाच तऱ्हेची वर्तणूक दाखवली. बाँबस्फोट झाल्यानंतर २४ तासांच्या आत मुंबईच्या उपनगरी लोकल गाड्यांची वाहतूक सुरू झाली आणि बहुतांश मुंबईकर हा आपापल्या कामाला तत्परतेने लागला.

हिंदुस्थानभर, मुंबईवासीयांच्या या शिस्तबद्धतेची मोठी वाहवा झाली.

प्रत्यक्ष बाँबस्फोटांच्या वेळी प्रचंड धैर्य दाखवणारा मुंबईकर नंतरच्या काळात मात्र पुष्कळ बावरलेला दिसला. जागोजागी बाँबस्फोटाच्या अफवा उडाल्या आणि त्या अफवांनी मुंबईकरांची त्रेधा उडून गेली.

मुंबईकरांनी बाँबस्फोटांनंतर लगेच काम चालू ठेवण्यात जी शिस्त आणि धैर्य दाखवले ती शिस्त धैर्य हा पौरुषाचा प्रकार आहे का अगतिकतेचा परिणाम आहे?

लहानपणापासून आम्हाला मुलांना सारी तरुण मंडळी, शिक्षक, आईबापे नेहमी मुंग्या आणि मधमाश्यांच्या उद्योगीपणाचे कौतुक सांगत असत. त्याच्या कितीतरी कथा पंचतंत्रापासून इसापनीतीपर्यंत विखुरलेल्या आहेत. हे छोटे प्राणी उद्योग करतात, श्रमाने पावसाळयासाठी बेगमी करतात म्हणून ते जगू शकतात आणि उनाड टोळ कष्ट न करता बागडल्यामुळे त्याला पावसाळयाच्या दिवसात उपाशीतापाशी मरावे लागते.

अन्नधान्याचे कण गोळा करण्याकरिता रांगेने धावणाऱ्या मुंग्या आणि फुलाफुलांमध्ये जाऊन मधाचे आणि परागांचे कणकण गोळा करून मधाचे पोळे तयार करणाऱ्या मधमाशा या सगळयांच्याच कौतुकाचा विषय राहिल्या आहेत.

लहानपणी खोडसाळपणे आम्ही या मुंग्यांच्या रांगांशी खेळत असू. रांगेने चालणाऱ्या मुंग्यांच्या त्या रांगेत एखादा पाण्याचा थेंब किंवा एखादा लहानसा खडा टाकला तर क्षणभरच, ज्यांच्याजवळ खडा पडला असेल किंवा पाण्याचा

थेंब पडला असेल, त्या तेवढ्याच मुंग्या बावरल्यासारख्या होतात, काही वेळ स्तब्ध होतात, काही वेळ मागे किंवा डावीउजवीकडे धावपळ करतात; पण थोड्याच वेळामध्ये पुन्हा एकदा खडा किंवा थेंब पडलेल्या जागेला वळसा मारून रांगा धरून त्या चालू लागतात. हा त्यांचा मोठा गुण!

मुंबईकरांची मागील महिन्यात झालेल्या स्फोटानंतरची वागणूक ही मुंग्यांप्रमाणे होती. वरून आघात झाला, काही वेळ गोंधळल्यासारखे झाले; पण, त्यानंतर लगेचच पुन्हा आपला कार्यक्रम चालू झाला.

मुंबईकरांच्या या शिस्तीचे आणि धैर्याचे देशभर आणि जगभर मोठे कौतुक झाले. आणि, या कौतुक करणाऱ्यांच्या मनामध्ये एक भावना होती की, अशा तऱ्हेने जर हिंदुस्थानातील नागरिक आतंकवाद्यांच्या कारवायांना तोंड देऊ लागतील तर आतंकवादाचा काहीही परिणाम होणार नाही आणि आतंकवादाविरुद्धची आपली लढाई आपण सहज जिंकू शकू.

मुंबईकरांच्या या शिस्तबद्ध वागण्यामुळे आतंकवाद्यांचा एक हेतू, जो देशामध्ये जातीय वैमनस्य आणि दंगली माजवणे आहे तो जरी सफल झाला नाही तरीसुद्धा आतंकवादाविरुद्ध एक मोठी लढाई जिंकल्यासारखे होईल असे या कौतुक करणाऱ्या महात्म्यांचे म्हणणे!

मुंबईत राहणारे माझे अनेक नातलग, स्नेही, मित्र आहेत. त्यांच्यापैकी काहींची मी विचारणा केली, त्यांचे कौतुक केले; पण त्यांना त्या कौतुकाने फारसे काही गोंजारल्यासारखे वाटले नाही. उलट, असे कौतुक करणाऱ्यांच्या मनामध्ये काही एक मोठा डाव आहे असेच त्यांचे मत दिसले. ''नाही तर आम्ही काय करणार होतो?'' त्यांनी विचारले. मुंबईकरांना सकाळी उठून कामावर जाणे आणि संध्याकाळी कामावरून परत येऊन विश्रांती घेणे यापलीकडे आयुष्य माहीत नाही. काहीही विपरीत घडले की पुन्हा एकदा, शक्य तितक्या लवकर, आपल्या 'हापिस गोईंग मुंबई'च्या कार्यक्रमात ते मशगूल होऊन जातात. यात काही फार मोठे शौर्य आहे असे नाही, ही केवळ एक गतानुगतिकता आहे, असे त्यांचे मत दिसले.

जमिनीवर रांगा धरून चालणाऱ्या मुंग्यांच्या पद्धतीने मुंबईकर शिस्तीने वागले हे खरे; पण, याच मुंग्यांचे एक दुसरे दर्शनसुद्धा आहे. जमिनीवर दिवसाउजेडी त्यांच्यावर हल्ला झाला तर त्या अहिंसेच्या परमभक्त असल्यासारख्या वागतात. हल्ला कोठून आला त्याची चौकशीही करीत नाहीत; ते हल्लेखोरावर प्रतिहल्ला करून प्रत्युत्तर देण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही; पण याच मुंग्या, जेव्हा त्यांच्या वारुळामध्ये किंवा बिळामध्ये कोणी बाहेरचा प्राणी शिरतो तेव्हा अगदीच वेगळ्या

तऱ्हेने वागतात. बिळात शिरलेल्या अगदी सापालासुद्धा त्या मुंग्या चावून चावून खलास करून टाकतात. मुंबईत घर आणि ऑफिस या रस्त्यावर बाँबहल्ला झाला तर मुंबईकर मुंग्यांच्या आचारसंहितेप्रमाणे वागतात.

अशी वेळ न येवो, पण दुर्दैवाने त्यांच्या घरावर जर का आंतकवाद्यांचे हल्ले झाले तर मुंग्यांच्या निर्धाराने ते आक्रमकांना बेजार करून हाकून देतील अशी शक्यता फारशी वाटत नाही. पूर्वी मुंबईत दंगे झाले आहेत. मुंबईच्या गोदीतील प्रचंड बाँबस्फोट ज्यांना आठवत असेल त्यांना हेही आठवत असेल की त्यावेळी मुंबईकर मोठ्या संख्येने मुंबई सोडून आपल्या गावांकडे निघून जाण्याच्या धावपळीत होते. मुंबईकरांनी मुंग्यांच्या उद्यमशीलतेची एक पद्धत अंगी बाणवली आहे, पण मुंग्यांमध्येही असलेली कडव्या प्रतिकाराची प्रेरणा त्यांना झेपेल असे काही वाटत नाही.

१९९३ साली मुंबईत बाँबस्फोट झाले त्यावेळी ज्या संघटनांनी प्रतिशोध घेण्याचा प्रयत्न केला त्या संघटना यावेळी घरगुती भांडणे मिटविण्यात इतक्या गढून गेल्या होत्या की १९९३ चा इतिहास पुन्हा एकदा गिरवण्याचा विचारसुद्धा त्यांच्या मनात आला नाही.

मुंग्यांच्या बरोबरीने उद्यमशीलतेबाबत कौतुक होते ते मधमाश्यांचे. याखेरीज, मधमाश्यांच्याच वर्गातील गांधीलमाश्यांचा उल्लेख कोणी उद्यमशीलतेकरिता करीत नाहीत; पण, मधमाश्यांच्या मधाच्या पोळयावर कोणी नजर ठेवली आणि त्या पोळयाला नुसता खडाजरी मारला तर आपली नेहमीची उद्यमशीलता सोडून सगळया मधमाश्या ज्याने कोणी एवढे धाडस दाखवले असेल त्याच्यावर तुटून पडून त्याला अगदी रक्तबंबाळ करून टाकतात. एकदा का मधमाश्यांचे पोळे असे उठले की आजूबाजूला निव्वळ बघ्याच्या भूमिकेत असलेल्या लोकांनासुद्धा त्यांचा प्रसाद मिळाल्याखेरीज राहत नाही. गांधीलमाश्या नेमका काय उद्योग करतात हे स्पष्ट नाही; पण, त्यांचीही पोळी असतात आणि त्या पोळयांना कोणी धक्का लावल्यास किंवा धक्का लावेल असा त्यांना संशय आल्यास गांधीलमाश्यातर प्रचंड त्वेषाने अतिक्रमणकाऱ्यावर तुटून पडतात.

मुंगी आणि मधमाश्या – दोन्ही प्राणी उद्योगप्रिय. मुंगी निदान बाहरेच्या जगात अहिंसेने वागते पण, घरावर हल्ला झाल्यास निकराने प्रतिकार करते. मधमाश्यां उद्योगी खऱ्या, पण त्यांची वागणूक ही इस्त्राईलमधल्या नागरिकांप्रमाणे आहे. युद्ध नसेल तेव्हा प्रचंड परिश्रमाने शेती फुलवणारे, कारखानदारी वाढवणारे इस्त्रायली नागरिक युद्धप्रसंगी सैनिक बनतात आणि शत्रूवर तुटून पडून आठ–

दहा दिवसातच, संख्येने आणि ताकदीनेही प्रचंड क्षमतेच्या शत्रूलाही नामोहरम करतात. मुंबईकरांची वागणूक ही मधमाश्यांसारखी नाही हे स्पष्ट आहे.

याची कारणे काय? मधमाश्यांना एक विशेष इंद्रिय आहे. त्यांच्या पोळयावर कोणी हल्ला केला तर तो कोणी केला हे हेरण्याचे त्यांना एक सहावे इंद्रिय आहे. आणि त्यांचे एकमेकांतील संदेशवहन कसे होते कोणास ठाऊक, पण एकदम पोळे जे उठते ते एकाच दिशेने जाऊन खोडी काढणाऱ्याच्या अंगाला भिडते.

मुंबईकराला हे शक्य नाही. पहिले कारण असे की, मुंबईकरांवर होणारा हल्ला हा कोठून बाहेरून होत नाही, तर त्यांच्याच पोळयामध्ये एरवी उद्योगात असल्याचे दाखविणाऱ्या काही माश्या पोळयात उत्पात करण्याचा प्रयत्न करतात. त्या माश्यांना या उत्पाती माश्या कोण हे ठाऊकजरी असले तरी त्याविषयी बोलणे हे अनैतिक आहे, गैर आहे, एवढेच नव्हे तर, ते देशद्रोहासारखे आहे अशी, वर्षानुवर्षे एका विशिष्ट विचारसरणीमुळे मुंबईकरांची, मनाची घडण झाली आहे. त्यामुळे, हल्ला कोठून आला हे कळणे किंवा त्याबद्दल काही प्रतिकाराची कार्यवाही करणे हे संभवतच नाही.

मुंबईच्या बाँबस्फोटानंतर आणखी एक विचित्र प्रकार अनुभवास आला. बहुसंख्य जमातीच्या सर्व नागरिकांना हल्लेखोरांची नावे माहीत असतानासुद्धा त्यांच्याविषयी समुदायवाचक आरोप करणे त्यांना भावले नाही. याउलट, ज्या समाजातून आतंकवादाला पोसले गेले त्या समाजाचे लोकच बहुसंख्य समाजावर आरोप करताना दिसले – 'खबरदार, कोणी आमच्या समाजाने ही अनन्वित कृत्ये केली असे म्हटले तर! हे जे काही होते आहे ते सगळे बाबरी मशीद पाडल्यामुळे आणि गुजरातमध्ये झालेल्या दंग्यांचीच प्रतिक्रिया आहे. त्याबद्दल अल्पसंख्य समजाला दोष देणे योग्य होणार नाही. 'सिमी'सारखी संस्था जबाबदार आहे असे केंद्रातील गृहमंत्र्यांनी जाहीर केल्यानंतरसुद्धा उत्तरप्रदेशाचे मुख्यमंत्री त्या संघटनेच्या समर्थनार्थ पुढे आले. आणि राज्याराज्यातील त्या अल्पसंख्याक जमातीच्या मुखंडांनी 'सिमी'ला वर्तणुकीची प्रशस्तिपत्रके देण्यास सुरुवात झाली. त्यानंतर, गुजरातचे मुख्यमंत्री नरेंद्र मोदी मुंबईला भेटीसाठी गेले असता त्यांनाच 'मुंबईत याला तर खबरदार' असा इशारा एका समाजवादी खासदारांनी दिला. 'उलटा चोर कोतवाल को डांटे' असा हा प्रकार मुंबई बाँबस्फोटानंतर दिसू लागला. 'असुनि खास मालक घरचा, म्हणती चोर त्याला' अशी परिस्थिती पुन्हा एकदा तयार झाली आहे. थोड्याच दिवसांनंतर उत्तर प्रदेशात एक वेगळे मुस्लीम राज्य असावे अशी मागणी उघडपणे केली जाऊ लागली तर आश्चर्य

वाटायला नको.

१९४५-४६ सालामध्ये, फाळणीपूर्व काळात मी चांगला जाणता विद्यार्थी होतो. त्यावेळचे वातावरण आठवून पुन्हा एकदा देशावर फाळणीचे ढग फिरू लागले आहेत अशी जाणीव मला होत आहे.

सगळ्या हिंदुस्थानात कोठेही आतंकवादी प्रकार घडला आणि त्या प्रत्येक ठिकाणी सापडलेला गुन्हेगार हा एका विशिष्ट जमातीचाच असला तरीसुद्धा त्या सर्व जमातीला नावे ठेवणे योग्य होणार नाही हे तर्कशास्त्राला धरून आहे. इंदिरा गांधींच्या हत्येनंतर ९९ शिखांनी मिठाई वाटली तरीसुद्धा १००व्या शिखाला मारण्याचा अधिकार कोणालाही पोहोचत नाही अशी भूमिका मी स्वतः मांडलेली होती; पण त्यानंतर दिल्लीतील शिखांचे शिरकाण होऊनही शिखांमध्ये सबंध देशाविषयीची द्वेषभावना पराकोटीला गेलेली मी पाहिलेली नाही.

ढहंदुस्थान हे एक मधमाश्यांचे पोळे आहे असे समजले तर ते एकसंध राहिले नसून ६० वर्षांपूर्वी काही मधमाश्यांनी आपापल्या मधाच्या साठ्यासकट वेगळे होऊन नवे पोळे तयार केले आणि उरलेल्या पोळ्यातही काही अस्वस्थ मधमाश्यांनी वेगळे उपपोळे तयार केले आहे. या मधमाश्यांना आपल्या पोळ्यातील बाकीच्या मधमाश्यांची भाषा बोलायची इच्छा नाही, त्यांची लिपीही वापरायची नाही, स्वतःच्या धर्मग्रंथाखेरीज कोणतेही ज्ञान त्यांना मंजूर नाही आणि त्यांच्या धर्मसमजुतींना जराही हात लागलेला त्यांना सहन होत नाही. अशा तऱ्हेने स्वतःला कोंडून घेतल्यामुळे मधमाश्यांना या एकूण पोळ्यामध्ये एक अलगाववाद तयार झाला आहे. हा अलगाववाद बहुसंख्याकांच्या किरकोळ कडवेपणामुळे झाला आहे असे म्हणणे म्हणजे पुन्हा 'चोराच्या उलट्या बोंबा' असेच म्हटले पाहिजे. हा अलगाववाद अल्पसंख्यांक जमातीच्या कडव्या हट्टीपणामुळे तयार झाला आहे. त्यांनी जर का ज्ञानाकडे आणि प्रकाशाकडे अशा तऱ्हेने पाठ फिरवण्याचे ठरवले तर त्यामुळे त्यांचा तोटाच होईल आणि त्यांना त्याचा दोष दुसऱ्या समाजावर लादता येणार नाही. जे काही नवीन ज्ञान मिळेल त्या ज्ञानाचा उपयोग आपल्या समाजाच्या विकासाकरिता, उद्धाराकरिता करण्याचे सोडून विस्फोटके आणि विद्ध्वंसाची हत्यारे तयार करण्यातच केला तर सारे जग त्यांच्याकडे संशयाने पाहू लागेल, याबद्दल जगाला दोष देता येणार नाही.

या सर्व अल्पसंख्यांक समाजाची एक ऐतिहासिक ख्याती अशी आहे की त्यांना लोकशाहीच्या तंत्राने चालता येत नाही. आज जगात त्यांच्या समाजाचे एकही राष्ट्र असे नाही की ज्यामध्ये लोकशाही सुखाने नांदते आहे. याउलट,

हिंदुस्थानात मात्र मुसलमान राष्ट्राध्यक्ष, शीख पंतप्रधान आणि ख्रिश्चन कॉँग्रेस अध्यक्षा अशी सहिष्णुता उघडपणे नांदते. अल्पसंख्याकांचा कडवेपणा आणि बहुसंख्य समाजाची सहिष्णुता हे एकमेकांत सहज मिसळणारे नाही.

याला उत्तर काय? याला उत्तर एकच आहे. स्वातंत्र्य आणि स्वतंत्र विचार ही एकमेव औषधाची गुरुकिल्ली आहे. जर का अल्पसंख्यांक समाजाने आपला हेकटपणा सोडला नाही आणि आपली वेगळी कडी करून त्यातच पुरुषार्थ मानण्याचे तत्त्वज्ञान सोडले नाही तर इतिहासात त्यांना स्थान मिळणार नाही. याउलट, जर का आपापल्या धर्माविषयी योग्य तो आदर बाळगून, पण मनाचे मोकळेपण, विचारांचे स्वातंत्र्य आणि ज्ञानाची देवघेव हे सिद्धांत त्यांनी मान्य केले आणि, त्याबरोबरच व्यक्तिमाहात्म्य आणि ग्रंथप्रामाण्य यांचाही त्याग केला तर या समाजाला भविष्यात पुढे येणाऱ्या खुल्या व्यवस्थेत प्रचंड वाव आहे.

मुसलमान समाजावर अन्याय होतात ते आर्थिक; पण, हे आर्थिक अन्यायसुद्धा त्यांच्या स्वतःला कोंडून घेण्याच्या प्रवृत्तीतूनच तयार झाले आहेत; पण, या अन्यायाच्या काळामध्ये मुसलमान समाजातील तरुण माणसांनी काही मोठे गुण अंगी बाणवले आहेत. मुसलमान तरुण इमान मानतो, प्रामाणिकपणे काम करतो, एवढेच नव्हे तर, या जगात कायमची नोकरी आणि आश्वस्त भविष्य या कल्पना त्याला अनोख्या आहेत. एका दिवशी सकाळी एका कारखान्यात काम तर दुसऱ्या दिवशी संध्याकाळी दुसऱ्या कारखान्यात अशा सतत उलाढाल आणि बदल घडणाऱ्या जीवनाची त्याला सवय आहे. एक तऱ्हेने उद्योजकतेला लागणारे गुण मुसलमान समाजाने आपल्या अंगी बाणवलेले आहेत.

या गुणांचा उपयोग नव्या येणाऱ्या खुल्या व्यवस्थेमध्ये त्यांना आर्थिक, सामाजिक, राजकीय उन्नती करून देण्याकरिता करता येईल; पण, त्याच गुणांचा उपयोग रुढीनिष्ठ समाजांना मजबुती देत देत आणि सगळ्या जगाविरुद्ध भांडण करत करत केला तर सगळ्या जगभर पसरलेल्या इस्लामचे आणि आजही अनेक शोषित समाजांना ज्याचे आकर्षण वाटते, त्या इस्लामचे भविष्य काही फारसे उज्ज्वल राहणार नाही.

*(६ ऑगस्ट २००६)*

◆◆

# साठ वर्षांच्या कर्माचे फळ:
# अतिरेक्यांचा आड आणि नक्षलवाद्यांची विहीर

१९९८च्या डिसेंबर महिन्यात शेतकरी संघटना आणि स्वतंत्र भारत पक्ष यांनी अमरावती येथे जनसंसद भरवली होती. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर ५० वर्षांच्या काळात देशाने काय कमावले काय गमावले याचा ताळेबंद काढण्यासाठी ही जनसंसद भरवण्यात आली होती. तीन दिवसांच्या चर्चेनंतर जे काही सार निघाले ते 'स्वातंत्र्य का नासले?' या माझ्या पुस्तिकेत मांडलेले आहे.

५० वर्षांच्या काळात स्वातंत्र्याचे दूध नासले. नासलेले दूध, काही केले तरी, पुन्हा पहिल्यासारखे करता येत नाही असे म्हणतात; पण, नासलेल्या दुधाचेसुद्धा अनेक उपयुक्त पदार्थ करता येतात हे सगळ्या दूध सोसायट्यांच्या अध्यक्षांना चांगले माहीत आहे. दूध नासले नसले तरी ते नासले असे दाखवून त्याचे तूप वगैरे करून त्यातून ही मंडळी भरपूर फायदा कमावतात.

अमरावतीची जनसंसद होऊनही आता दहा वर्षे झाली. त्या दहा वर्षांत काही वेगळी कलाटणी देऊन देशाला उज्ज्वल भवितव्य देण्यासाठी काही प्रगती झाली आहे काय याचा आढावा घेण्यासाठी, खरे म्हटले तर, पुन्हा एकदा जनसंसद भरवायला पाहिजे.

१९९७ साली म्हणजे भारतीय स्वातंत्र्याच्या सुवर्ण महोत्सवाच्या वर्षी मी स्वातंत्र्याच्या सुवर्णमहोत्सव समितीचा सदस्य होतो. सुवर्णमहोत्सव साजरा करण्याकरिता जय्यत तयारी करण्यात आली होती; पण, प्रत्यक्षामध्ये जनतेचा उत्साहमात्र अत्यंत थोडा दिसला; सर्व सुवर्णमहोत्सवाला स्वरूप आले ते सरकारी कार्यक्रमांचे.

सन २००६च्या ६०व्या स्वातंत्र्यदिनाची परिस्थितीतर याहूनही विचित्र होती. ११ जुलै रोजी मुंबईला झालेले बाँबस्फोट, त्यानंतर आंतकवाद्यांनी लंडनच्या विमानतळावरून अमेरिकेत जाण्यासाठी सुटणारी दहा विमाने पाडण्याचा रचलेला

कट आणि खुद्द अमेरिकन सरकारने १५ ऑगस्टच्या आसपास दिल्ली आणि मुंबई येथे घातपात होण्याची शक्यता आहे असा अंदाज वर्तवल्यामुळे देशाच्या या ६०व्या स्वातंत्र्यदिनी सगळीकडे कडेकोट बंदोबस्त होता. 'आम लोकां'पैकी फारच थोडे दिल्लीमध्ये लाल किल्ल्यावरील कार्यक्रमाला गेले. शालेय विद्यार्थ्यांच्या दृष्टीने या कार्यक्रमाला उपस्थित राहता येणे, तेथे गाणी म्हणणे असा हा मोठा नवनवलोत्सवाचा कार्यक्रम; या कार्यक्रमात जाण्याचा त्यांना उत्साहही होता आणि त्यांना तेथवर आणण्यासाठी खास बंदोबस्तही ठेवण्यात आला होता; पण दिल्ली म्हणजे, त्या दिवशी, लष्करी छावणी बनली होती. दिल्लीतील जवळजवळ सगळे महत्त्वाचे रस्ते बंद केले होते. सुदैवाने, लाल किल्ल्याचा पंतप्रधानांच्या भाषणाचा कार्यक्रम सुरळीतपणे, कोणतेही व्यवधान न येता पार पडला. पंतप्रधानांनी आपल्या भाषणात विदर्भाच्या शेतकऱ्यांचा उल्लेख केला आणि शेतकऱ्यांसाठी डोळ्यांतून काही टिपेही गाळली. मुंबईच्या कार्यक्रमात महाराष्ट्राचे मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांनीही शेतकऱ्यांच्या आत्महत्या हे शासनापुढे मोठे आव्हान असल्याचे सांगितले. या भाषणांत काय सांगितले आणि त्यात तथ्य किती हा मुद्दा वेगळा, त्यासाठी एक वेगळा लेख लिहावा लागेल.

स्वातंत्र्याला ६० वर्षे झाल्यानंतर स्वातंत्र्यदिनाचा झेंडावंदनाचा कार्यक्रम हा पोलिसांच्या आणि लष्कराच्या कडेकोट पहाऱ्यात करावा लागतो हीच गोष्ट मोठी दुर्भाग्याची आहे.

१९४७ साली पंडित जवाहरलाल नेहरू यांनी लाल किल्ल्यावर पहिल्यांदा तिरंगा फडकावला त्यावेळी जनतेच्या उत्साहाला अपार उधाण आले होते. ज्याला ज्याला शक्य होते तो तो पहाटे उठून लाल किल्ल्याच्या प्रांगणात जमा झाला होता. त्याही वेळी निर्वासितांचे लोंढे दिल्लीमध्ये येत होते. वातावरण मोठे तापलेले होते; पण, आतंकवाद्यांचा विशेषतः स्फोटके बाळगणाऱ्या आत्मघाती आतंकवाद्यांचा प्रकार त्यावेळी माहीत नव्हता. त्यामुळे, असे काही घडेल अशी भीती त्यावेळी कोणाला वाटली नव्हती. खरे म्हटले तरी त्याही काळात शेजारच्या ब्रह्मदेशात पार्लमेंटमध्ये आतंकवाद्यांनी घुसून सर्व मंत्रिमंडळाला गोळ्या घालून खलास केले होते; पण, १५ ऑगस्ट १९४७ रोजी दिल्लीला लाल किल्ल्यासमोरील प्रांगणात जमलेल्यांपैकी कोणा एकाच्याही मनात शंकेची पालही चुकचुकली नाही की या ठिकाणी कोणी नतद्रष्ट येईल आणि या साऱ्या मंगल सोहळ्याला गालबोट लावणारा प्रकार करेल. आज ६० वर्षांनी असा काही अमंगल प्रकार घडला नाही म्हणजे नशीब असे म्हणण्याचे वेळ आली आहे.

‘स्वातंत्र्य का नासले?’ या पुस्तिकेत मी ‘स्वातंत्र्याचे दूध नासले याला जबाबदार केवळ स्वातंत्र्योत्तर नेते आणि नियोजन कार्यक्रम नाही; तर हा दोष मुळात स्वातंत्र्याच्या चळवळीतही कोठेतरी असला पाहिजे’ अशी मांडणी केली आहे. आणि या ६०व्या स्वातंत्र्यदिनी हा सिद्धांत मला अधिकच योग्य वाटत आहे. स्वातंत्र्याच्या ५० वर्षांनंतर, चर्चिलने केलेले भाकित खरे ठरले आणि स्वतंत्र भारतात भावाभावांची भांडणे होऊन रक्ताचे लोट वाहिले असे मी म्हटले होते. ६०व्या स्वातंत्र्यदिनीतर, चर्चिललासुद्धा आपण स्वतंत्र केलेल्या देशामध्ये इतकी भयानक परिस्थिती ओढवू शकेल याची कल्पना करता आली नसती इतकी भयानक परिस्थिती झाली आहे.

१९४७ साली देशाची फाळणी झाली आणि त्या फाळणीनंतर आता पुन्हा कधी देशाची धर्माच्या आधाराने फाळणी करण्याची वेळ येईल असे वाटले नव्हते. त्या काळी मुसलमान समाजही काहीश्या भीतीने, काहीशा समजुतदारपणे, नव्या स्वतंत्र भारतात आपले स्थान काय राहील या विवंचनेत असल्यामुळे पुन्हा पाकिस्तानसारखा स्वतंत्र देश विभाजन करून मिळावा अशी मांडणी त्यांच्यापैकी कोणाच्या मनातही आली नाही. आज परिस्थितीमात्र अगदी वेगळी आहे. आज देशामध्ये खरे राज्य इस्लामचे नाव घेणाऱ्या आतंकवाद्यांचे चालू आहे. मुंबई असो, दिल्ली असो, आयोध्या असो – आतंकवाद्यांना पाहिजे तेथे, पाहिजे त्या प्रकारे ते घातपात घडवून आणू शकतात आणि शासन असे प्रकार घडल्यानंतर गुन्हेगारांना पकडण्यासाठी काही करण्यास समर्थ आहे असे दिसत नाही.

गठ्ठा मतांच्या राजकारणासाठी, जिनांचासुद्धा जितका अनुनय झाला नसेल तितका अनुनय मुसलमानांतील फडतूस नेत्यांचा आजकाल होत आहे.

१५ ऑगस्ट २००६च्या लाल किल्ल्यावरील भाषणात पंतप्रधानांनी शिक्षणाचा प्रसार कोणकोणत्या समाजात व्हायला पाहिजे याचा उल्लेख करताना अनुसूचित जाती आणि जमातींबरोबर अल्पसंख्याक जमातींचाही उल्लेख केला. शिक्षणाचा प्रसार अल्पसंख्याक जमातीत करायचा आहे म्हणजे कोणत्या जमातीत करायचा आहे? पारशी समाजात शिक्षणाची काही वेगळी व्यवस्था करण्याची गरज नाही. शीख समाजही शिक्षणात हिंदू समाजापेक्षाही प्रगत आहे. हीच परिस्थिती जैनांची. अल्पसंख्याकांतील उरता उरले ते फक्त मुसलमान; पण, मुसलमानांमध्ये शिक्षणाचा प्रसार करायला पाहिजे एवढेसुद्धा वाक्य उच्चारणे पंतप्रधानांना धोक्याचे वाटले आणि त्यांनी फक्त त्यांचा उल्लेख अल्पसंख्याक असा केला.

पूर्वीच्या काळी जुन्या वळणाच्या बायका नवऱ्याचे नाव घेण्याचे टाळण्यासाठी,

ते जर घरी नसतील तर खुंटीवर पागोटे दिसत नाही किंवा कोपऱ्यात काठी दिसत नाही अशा तऱ्हेचा उल्लेख करत असत. आजकालच्या गठ्ठा मतांचे राजकारण करू पाहणाऱ्यांना अशाच प्रकारे मुसलमानांचे नाव घेण्याचीसुद्धा धास्ती वाटत आहे.

देशातील आजची परिस्थिती पाहिली तर १९४७ सालचे पाकिस्तान दंग्यांच्या रक्तपाताने झाले, तर या पुढील फाळणी आतंकवादाच्या दडपणाखाली मतांच्या गठ्ठ्यांचे राजकारण करणाऱ्या राज्यकर्त्यांची कमजोर बाजू ओळखून निवडणुकीच्या मतपेटीतून सुद्धा होईल अशी शक्यता वाटू लागली आहे.

१९४७ साली स्वातंत्र्य मिळाल्यानंतर हिंदुस्थानवर पहिला हल्ला झाला तो जम्मू आणि काश्मिरसाठी. जम्मू आणि काश्मिरचा प्रश्न आजही सुटलेला नाही. पंडित नेहरूंनी सरदार पटेलांचा सल्ला न मानता सगळे प्रकरण संयुक्त राष्ट्रसंघात नेले आणि तेंव्हापासून त्या प्रश्नाचा विक्राळ ढग हिंदुस्थानचे सगळे भवितव्य बरबाद करीत आहे.

हिंदुस्थानवर दुसरा हल्ला झाला तो चीनचा. चीनच्या फौजा ईशान्य सरहद्दीवर आल्या तसे भारतीय फौजेला पळता भुई थोडी झाली. सगळा देश चीनच्या विरोधात एक झाला पण त्या वेळीही कम्युनिस्टांतील काही ‘चेअरमन माओ, आमचा चेअरमन’ अश्या घोषणा करीत फिरत होते. १९४२ सालच्या ‘चले जाओ’ आंदोलनात इंग्लंडची तरफदारी करणारांची ही औलाद १९६२ साली पुन्हा एकदा देशाच्या स्वातंत्र्याच्या उघड उघड विरुद्ध भूमिका घेऊ लागली. सुदैवाने, तात्पुरते चीनचे सैन्य मागे घेतले गेले आणि त्यानंतर भारतीय लष्कराची जमवाजमव पुन्हा एकदा सुरू झाली.

आज परिस्थिती अशी आहे की जगामध्ये कोठेही साम्यवाद राहिला नसला तरी नव्याने साम्यवाद येण्याचा संभव असणारा देश म्हणजे भारत आणि त्यासाठी काही रक्तमय क्रांतीचा अवलंब करण्याची गरज नाही. तंत्र इस्लामवाद्यांचेच आहे. भारतातील १४ राज्यांमध्ये नक्षलवाद्यांचे राज्य चालू आहे. त्यांनासुद्धा कह्यात आणण्याची शासनाची मानसिकता नाही. आणि, त्यामुळे नक्षलवाद्यांचा धुमाकूळ उत्तरेतील जवळजवळ सगळया राज्यांत चालू आहे.

प्रत्यक्ष आतंकवादाच्या घटनांना जबाबदार असणाऱ्या इस्लामवाद्यांनाही पकडल्यानंतर त्यांना तुरुंगांमध्ये पंचतारांकित हॉटेलांसारखी व्यवस्था करून दिली जाते. दुबईला वारंवार जाणाऱ्या काही मुसलमानांची चौकशी करण्याचा प्रयत्न जरी पोलिस दलाने केला तर त्याबद्दलही तथाकथित सेक्यूलर लोक

आरडाओरड करतात. आणि, नक्षलवादी म्हणजे तर, बोलून चालून, गरिबांचे कैवारी!

१९९८ सालच्या जनसंसदेमध्ये "स्वतंत्र हिंदुस्थानने ५० वर्षांत आर्थिक प्रगती केली नाही, देशाची एक आर्थिक फाळणी झाली, 'भारता'चे शोषण चालू राहिले, सर्व आर्थिक कार्यक्रम आणि नियोजन यांना 'इंडिया'चा मुखवटा मिळाला आणि त्यामुळे देशाची प्रगती झाली नाही" अशी मांडणी झाली होती. त्यानंतर आज, केवळ दहाच वर्षांत परिस्थिती अशी आली आहे की निर्धार्मिक, लोकतांत्रिक प्रजासत्ताकतरी टिकून राहील किंवा नाही याची शंका वाटू लागली आहे.

सबंध देशामध्ये, हुकमी बहुमत मिळवील असा एकही पक्ष राहिलेला नाही. वेगवेगळ्या राज्यांत वेगळे वेगळे स्थानिक प्रश्न घेऊन, जातीयवादाचा आधार घेऊन आणि लोकांना खूष करणारे कार्यक्रम जाहीर करून स्थानिक पक्ष उभे राहत आहेत. राष्ट्रीय पक्ष काय आणि स्थानिक पक्ष काय – सर्वच पक्ष मतांच्या गठ्ठ्यांसाठी जातीयवादाचा वा अल्पसंख्याकवादाचा आश्रय घेत आहेत.

'साठी बुद्धी नाठी' अशी म्हण आहे. स्वातंत्र्याच्या ६० वर्षांत भारताची पूर्ण दुर्दशा होत आहे आणि येत्या काही काळात जातीयवाद आणि अल्पसंख्याकवाद यांचा बडेजाव चालू राहिला तर देशाचे पुन्हा तुकडे तुकडे होतील आणि त्यातच काही लोक धन्यता मानतील अशी चिन्हे दिसत आहेत.

*(२१ ऑगस्ट २००६)*

◆◆

# स्वातंत्र्याचा हिरक महोत्सवाची पार्श्वभूमी

भारतीय स्वातंत्र्याचा सुवर्ण महोत्सव १९९७ साली साजरा झाला त्यावेळी 'स्वातंत्र्यानंतर ५० वर्षांत काय कमावले, काय गमावले?' याचे व्यापक विश्लेषण शेतकरी संघटनेने भरवलेल्या जनसंसदेत (अमरावती, डिसेंबर १९९८) करण्यात आले. या जनसंसदेत भाग घेण्यासाठी पूर्व-अभ्यास म्हणून 'स्वातंत्र्य का नासले?' ही पुस्तिकाही काढण्यात आली होती. या पुस्तिकेत

१. स्वातंत्र्याच्या ५० वर्षानंतर स्वातंत्र्यासाठी हौतात्म्य पत्करणाऱ्या शहीदांना समाधान नाही, स्वातंत्र्यसैनिकांना नाही, आम जनतेलाही नाही, याउलट 'भारताला स्वातंत्र्य देऊ नका, स्वातंत्र्य दिल्यास हे लोक एकमेकांच्या उरावर बसतील' हे चर्चिलचे भाकित खरं ठरलेले दिसते अशी मांडणी केली होती.

२. हा दोष कोणाचा? स्वातंत्र्यानंतर ज्यांनी देशाचे सुकाणू हाती घेतले ती सारीच माणसे - जवाहरलाल नेहरू, इंदिरा गांधी आदरणीय, मग स्वातंत्र्य का नासावे? महात्मा गांधींच्या नेतृत्वाखाली स्वराज्याचे आंदोलन म्हणजे तर शुद्ध दिव्यतेचा अविष्कार. मग, अशा शुद्ध बीजापोटी इतकी जहरीली फळे कशी आली? याची चर्चा करण्यात आली आहे.

३. भारत-पाकिस्तान अशी राजकीय फाळणी होऊन स्वातंत्र्य मिळाले. परंतु, महात्मा ज्योतिबा फुल्यांच्या भाकिताप्रमाणे पेशवाई परतली आणि राजकीय भारताची आणखी एक फाळणी झाली. गांधी विचारातील गावे, शेती व ग्रामोद्योग मागे हटले आणि शहरे, कारखानदारी आणि सरकारी क्षेत्र सर्व प्रभावी ठरले. शेतीचे शोषण सुरू राहिले, वाढले आणि त्यातूनच शेतकऱ्यांचा कर्जबाजारीपणा आणि शेतीचा मागासलेपणा पुढे आला.

पुढील वर्षी म्हणजे २००७ साली भारताच्या स्वातंत्र्याला ६० वर्षे पुरी

होतील. उत्सवासाठी निमित्त शोधणाऱ्यांना सुवर्णजयंती नंतर दहाच वर्षांत आणखी एक संधी मिळाली. २०२२ साली पुन्हा अमृतमहोत्सव साजरा करण्याची संधीही ते सोडणार नाहीत. तोपर्यंत आजच्या भारताचा राजकीय नकाशा कायम राहिला तरी भारतातील एक भाग पाकिस्तानच्या खाणाखुणांकडे बघणारा, एक दुसरा मोठा भाग नक्षल प्रभावाखालील, तिसरा रोमन कॅथॉलिक प्रभावाखालील आणि बाकीचा भाग प्रादेशिक पक्षांच्या प्रभावाखाली अशी परिस्थिती झाली तरी उत्सव साजरा करणाऱ्यांना त्याचे कांही सोयरसुतक राहणार नाही.

स्वातंत्र्याच्या ६० वर्षांचा आढावा घ्यायचा झाला तर त्यातली पहिली ३० वर्षेतरी सारे वाल्मिकी रामायण चार ओळीत सांगावे तशा पद्धतीनेच गुंडाळून घ्यावे लागेल. माझ्या लिखाणात शेतीतील उत्पादनाचे, उत्पादकतेचे, जमीन धारणेचे असे आकडेवारीचे तक्तेही मी वापरत नाही. तसेच, माझ्या मांडणीच्या पुष्ट्यर्थ किंवा विपरीत मांडणीच्या खंडणासाठी कुणाची अवतरणेही वापरत नाही. जे काही घडले ते सूत्ररूपाने मांडणे ही माझी शैली आहे.

भारताची फाळणी झाली ती दुसरे महायुद्ध संपल्यानंतर. तीनचार वर्षात अन्नधान्याच्या जागतिक तुटवड्याचा काळ संपलेला नव्हता. महायुद्धाच्या काळात इंग्रज सरकारने सुरू केलेले, येथील अन्नधान्य परदेशात पाठविण्याचे व परदेशातील लाल ज्वारी आणि मका येथील जनतेला पुरवण्याचे धोरण चालूच होते. इंग्रजांच्या काळात सर्वात अधिक धरणे आणि कालवे यांच्या योजना ज्या भागात राबविण्यात आल्या तो पश्चिम पंजाब पाकिस्तानात गेला त्यामुळे स्वतंत्र भारतात अन्नधान्याचा तुटवडा भीषणपणे जाणवू लागला. जातीय दंगे आणि निर्वासितांचे स्थलांतर यामुळे सार्वजनिक वितरण व्यवस्था – त्यावेळची रेशन व्यवस्था – मोडकळीस आली. १९५०–५१ साली वरूणाची कृपा झाली. पाऊसमान चांगले राहिले. आणि देशात अन्नधान्याची रेलचेल झाली. त्यावेळचे अन्नमंत्री रफि अहमद किडवाई यांनी रेशन व्यवस्था बरखास्त करून धान्यबाजारपेठ खुली करण्याचा आग्रह धरला होता. रेशन व्यवस्थेत तळातल्या ग्राहकाला काहीही स्वारस्य नसले तरी ती व्यवस्था टिकवण्यात नोकरशाहीचे सज्जड हितसंबंध गुंतलेले होते. एका अनुकूल पावसाच्या आधारावर महायुद्धाच्या असाधारण काळात तयार झालेली वितरण व्यवस्था खुली करण्याच्या कल्पनेला सर्वांनीच विरोध केला. पंडित नेहरूंचा समाजवादाचा प्रयोग अजून त्यांच्या मनात शिजतच होता. त्यांनीही अशा खुलीकरणाला विरोध केला. भारतीय शेतीच्या स्वातंत्र्योत्तर इतिहासातील ही पहिली दुर्दैवी घटना.

अन्नधान्याची परिस्थिती बिकट असतांना खाणारी तोंडे तरी मर्यादित ठेवण्याचा कार्यक्रम राबवला जाणे आवश्यक होते. भारताची लोकसंख्या ३५ कोटीच्या आसपास असतांना कुटुंबनियोजनाचे कार्यक्रम उत्साहाने राबवले गेले असते तर, कदाचित, आजची लोकसंख्या ५०-६० कोटीच्या वर गेली नसती. तत्कालीन आरोग्यमंत्री राजकुमारी अमृता कौर यांच्या धार्मिक निष्ठांना कुटुंबनियोजन मानवणारे नव्हते. आणि त्यांना नाराज करणे पंडितजींना मानवणारे नव्हते तो विषय १५-२० वर्षे आलवणात गेला. शेतीच्या प्रगतीच्या दृष्टीने स्वातंत्र्योत्तर काळात घडलेली ही दुसरी दुर्दैवी घटना.

पंडित नेहरूंच्या काळात सारेच काही विपरीत घडले असे नाही. स्टॅलीन, नासेर यांच्यासारखे हुकूमशहा मोठमोठ्या धरणांच्या योजना राबवत होते. भारतातील सिमेंटचे उत्पादन प्रचंड वाढले होते. त्याचा उपयोग करणेही आवश्यक होते. त्यामुळे, भाक्रा-नान्गल, दामोदर व्हॅली यासारखे मोठे प्रकल्प उभे राहू लागले. भाक्रा-नान्गल उभे राहिले नसते तर लाल बहादूर शास्त्रींच्या काळातही हरित क्रांती येऊ शकली नसती.

सोव्हिएत रशियाप्रमाणे आपल्याकडेही सहकारी शेती तयार व्हावी, हजारो एकर जमीन एकएका व्यवस्थापनाखाली असावी, मोठी अवजड यंत्रे चालत असावी, नांगरणी, पेरणी, कापणी, मळणी, सारे काही यंत्राने व्हावे अशी, शेताच्या मातीचा स्पर्श पायाला न झालेल्या नेहरूंची स्वप्नसृष्टी होती. सहकार व्यवस्थेचे जाळे हळूहळू पतव्यवस्थेत आणण्यास त्यांच्या काळात सुरुवात झाली आणि त्याकाळीतरी राजकीय आधारामुळे सहकार किती महाराक्षस बनू शकतो याची जाणीव नसलेल्या आणि सावकारी पाशामुळे बिथरलेल्या शेतकऱ्यांना मोठे समाधान वाटले. त्यामुळे, आणखी एक पाऊल पुढे जाऊन शेतीच्या सहकारीकरणाचा पंडित नेहरूंनी घाट घातला. त्यांचा हा उपक्रम राजाजींच्या नेतृत्वाखालील स्वतंत्र पक्षाच्या आणि चौधरी चरणसिंग व पंजाबराव देशमुखांच्या कडव्या विरोधामुळे बारगळला. पंडितजींच्या काळात शेतीच्या क्षेत्रात घडलेली ही दुसरी मंगल घटना.

दुसऱ्या पंचवार्षिक योजनेपासून महालनोबीस पॅटर्नला सुरुवात झाली. औद्योगिकीकरणावर सर्वाधिक भर देण्यात आला. देशातील अन्नधान्याचा तुटवडा कायमच होता. धरणांकरिता वापरले जाणारे सिमेंटही आता देशातील रस्त्यांच्या बांधणीसाठी वापरण्यात येऊ लागले. अन्नासाठी कटोरी घेऊन जगभर फिरणाऱ्या देशांच्या मदतीसाठी अमेरिकेने केवळ वाहतूक खर्चापोटी गहू पुरवण्याची योजना

आखली. त्यामुळे निदान रेशन व्यवस्थातरी चालू राहत होती. प्रख्यात समाजवादी नेते साथी अशोक मेहता त्यावेळी झङ ४८० पुरवठ्यावर कितपत भरवसा ठेवता येईल याचा तपास करण्यासाठी अमेरिकेत गेले होते. त्यांनी इ्थ ४८० म्हणून मिळणारा गहू बंद झाला तरी जागतिक बाजारपेठेत गहू अत्यंत मुबलक आणि स्वस्त भावात मिळत असल्यामुळे भारतीय शेतीकडे सद्भावना ठेवून दुर्लक्ष (ुँग्ह ुतम्) करायला हरकत नाही अशी शिफारस केली. त्या काळच्या परिस्थितीत त्यात विचित्र वाटण्यासारखे काहीच नाही. स्वातंत्र्याच्या ५९ व्या वर्षी इ्थ ४८० नाही. आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत मुबलक गहू नाही, गव्हाची किंमत देशातील बाजारपेठेपेक्षा दीड पटीने जास्त आहे तरीसुद्धा केंद्रीय कृषिमंत्री मा. शरद पवार आणि त्यांचे संपुआतील साथीदार आयातीचे समर्थन करतच आहेत.

नेहरू गेले, इंदिरा गांधी तयार होईपर्यंत तात्पुरते लाल बहादूर शास्त्रींना पंतप्रधानपदावर विराजमान करण्यात आले. आपली वेळ आली अशी इंदिरा गांधींची खात्री पटताच त्यांच्या उज्वल राजयोगामुळे लाल बहादूर शास्त्रींचे आकस्मिक निधन झाले; पण, या अल्पशा काळात शेतीच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाच्या घटना घडल्या.

जगभरच्या शास्त्रज्ञांनी गव्हाचे भरघोस पीक देणारे वाण तयार केले होते. मुबलक पाणी पुरवठा, रासायनिक खते आणि औषधे यांचा पर्याप्त उपयोग यांना भूमिती श्रेणीने प्रतिसाद देणारे हे वाण अनेक देशांत वापरले जात होते. भारतात ते आणावे किंवा नाही याची चर्चा चालू होती. साम्यवादी, समाजवादी आणि नेहरूवादी अक्रोशाने 'हरित क्रांतीतून रक्ताचे पाट वाहतील आणि लाल क्रांती येईल' अशा युक्तिवादाने या नव्या प्रयोगाला विरोध करीत होते.

शेतकऱ्यांच्या सुदैवाने पाकिस्तानला दिग्गज नेहरू गेले, बटुमूर्ती लाल बहादूरशास्त्रांना अजून स्थिरस्थावर होता आलेले नाही याचा फायदा घेऊन काश्मिरवर हल्ला करण्याची दुर्बुद्धी झाली. लालबहादूर शास्त्रींनी त्या काळातही, देश सर्व बाजूंनी संकटाने घेरलेला असतांना जी हिम्मत दाखवली ती हिम्मत आजच्या 'महासत्ता (डींशिी झुशी) असण्याची वल्गना करणाऱ्या भारताच्या पंतप्रधानांची होत नाही. किंबहुना 'इंडिया शायनिंग'वाल्या अटल बिहारी वाजपेयींचीही कारगील हल्ल्याच्या वेळी तशी हिम्मत झाली नाही. लाल बहादूर शास्त्रींनी 'काश्मिरातील प्रत्यक्ष ताबारेषा ओलांडली गेली म्हणजे भारतावरच हल्ला झाला आहे' असे जाहिर करून भारत-पाकिस्तानमधील आंतरराष्ट्रीय सरहद्द ओलांडून भारतीय सैन्याला लाहोरकडे कूच करण्याचे आदेश दिले. अन्नधान्याच्या तुटवड्याला

सामोरे जाण्यासाठी देशातील सर्व लोकांना आठवड्यातून एकदा उपवास करण्याचे आवाहन खुद्द पंतप्रधानांनी केले. जनतेने त्याचे स्वागतही केले. सगळे राष्ट्र एकसंध होऊन युद्धाला सामोरे जाण्यास तयार झाले. शास्त्रींची प्रसिद्ध 'जय जवान, जय किसान' ही घोषणा त्याच काळातली.

पाकिस्तानशी युद्ध सुरू झाल्यावर अमेरिका गव्हाचा पुरवठा बंद करेल, त्यासाठी तयारी म्हणून त्या बटुमूर्ति पंतप्रधानाने नेहरूंच्या विचारधारेला मूठमाती देत हरित क्रांतीसाठी दरवाजे उघडले. एक जहाज भरून नव्या वाणाचे बियाणे हिंदुस्थानात आले आणि एका हंगामामध्ये पंजाबातील शेतकऱ्यांनी अन्नधान्याच्या तुटवड्याचे युग संपवले. शेतकऱ्यांनी उत्पादकता दहा दहा, वीस वीस पटींनी वाढवली. या नव्या चमत्काराचे त्यांना कौतुक वाटले; पण हे कौतुक फार काळ टिकणार नाही, नव्या समृद्धीत वाटा मिळण्याची शेतकऱ्यांना खात्री वाटली पाहिजे या हेतूने लाल बहादूर शास्त्रींच्या काळात कृषि मूल्य आयोग (अझउ) स्थापन झाला. पहिल्या काळात या आयोगाने केलेल्या शिफारशी आणि किमतीबद्दलचे सरकारी निर्णय शेतकऱ्यांच्या दृष्टीने चांगले लाभदायक होते. त्यामुळे, १९६५ ते ७० या काळात हरित क्रांतीच्या प्रदेशात पिके उदंड आली. एवढेच नव्हे तर शेतकऱ्यांच्या हाती पैसाही बऱ्यापैकी खेळू लागला. जपानी शेतकऱ्याप्रमाणे पंजाबी शेतकऱ्यांनीही छोटे छोटे उद्योगधंदे सुरू करून एका नव्या औद्योगिक क्रांतीची सुरुवात केली. नेहरूप्रणालीत सार्वजनिक उद्योगधंद्यांसाठी प्रचंड गुंतवणूक मिळूनही बिहार औद्योगिकदृष्ट्या मागास राहिला आणि कोणतीही सरकारी औद्योगिक गुंतवणूक नसतांना पंजाब पुढे आला. लाल बहादूर शास्त्रींचे निधन अनैसर्गिक होते याला कांही पुरावा नाही; पण, त्यांच्या मृत्यूने भारताच्या इतिहासाला जी विपरीत कलाटणी मिळाली ती पहाता कोण्या भारतद्वेष्ट्या किंवा सत्तालोलुप ताकदींचा त्यांच्या मृत्यूमागे हात असावा ही शक्यता नाकारता येत नाही.

शास्त्री गेले, इंदिरा गांधी पंतप्रधानपदावर आरूढ झाल्या. स्वातंत्र्यासाठी घरातल्या घरात वानरसेना उभारणे एवढाच त्यांचा जनसंपर्क आणि वर्षभराच्या माहितीखात्याच्या मंत्रीपदाचा अनुभव एवढ्या भांडवलावर त्यांनी सत्तेची सूत्रे हाती घेतली. शेतीचा अनुभव तर तीन पिढ्यांत नाही. शक्य असते तर त्यांनी हरित क्रांतीही पलटवली असती आणि पंडित नेहरूंची तंत्रज्ञानविरोधी प्रणाली पुन्हा एकदा प्रस्थापित केली असती; पण, त्यांचे पाय अजून रोवले गेले नव्हते. त्यामुळे, हरित क्रांती उलवथवण्यासाठी त्यांनी कराटेनीति वापरली आणि शेतकऱ्यांना हरित क्रांतीच्या तंत्रज्ञानात असलेले स्वारस्य नष्ट करण्यासाठी त्यांना शेतीमालाचा

रास्त भाव मिळू नये यासाठी एक क्लुप्ती योजली. इंदिराजींच्या कारकीर्दीपासून कृषिमूल्य आयोगाच्या अध्यक्षपदी शेतकरीद्वेष्टा कम्युनिस्ट किंवा डाव्या पठडीचा नेमण्याचा पायंडा पडला तो आजतागायत चालू आहे. १९७५ सालापर्यंत देशातल्या शेतीची स्थिती अशी झाली की शेतकरी जितके अधिक पिकवतील तितके त्यांच्या हाती पडणारे उत्पन्न कमी. अशा परिस्थितीत देशभर असंतोषाचे वादळ उठले, इंदिराबाईंवर पदच्युतीची वेळ आल्यावर त्यांनी देशावर आणीबाणी लादली.

आणीबाणी संपली. थोड्याच काळात जनता पक्षाची राजवटही संपली. इंदिरा गांधी पुन्हा निवडून आल्या. अखंड काँग्रेसच्या सत्तेच्या काळात परंपरागत विरोधी पक्षतरी जनतेच्या प्रश्नांना काही वाचा फोडीत. त्या पक्षांवरही आता लोकांचा विश्वास राहिला नाही. शेतीउत्पादन आणि उत्पन्न यांचे व्यस्त प्रमाण आणि राजकीय पक्षावरील अविश्वास यातून शेतकरी आंदोलनाची पहाट उगवली आणि थोड्याच काळात तामिळनाडूपासून पंजाबपर्यंत वेगवेगळया राज्यांत स्थानिक शेतकरी आंदोलने उभी राहिली आणि त्यांना शेतकऱ्यांचा प्रचंड पाठिंबाही मिळू लागला.

नेहरू-गांधी घराण्याची समाजवादी विचारपठडीची धोरणे चालत राहिली. शेतकऱ्यांच्या दुरवस्थेतून पंजाबसारख्या राज्यांत असंतोषाची लाट उसळून तिने खलिस्तानच्या मागणीचेही रूप घेतले. इंदिराजींच्या कारकीर्दीचा शेवटचा काळ आर्थिक प्रश्नांना डावलून बांगला देश स्वातंत्र्य लढा, खलिस्तानी आतंकवाद आणि काँग्रेसमधीलच दुफळी हे प्रश्न सोडविण्यात गेला.

खलिस्तानी आतंकवाद निपटून काढण्यासाठी बाईंनी अमृतसरच्या सुवर्णमंदिरातील अकाल तख्तावर लष्करी कारवाई केली. सारा शीख समाज दुखावला गेला आणि त्यातच बाईंना हौतात्म्य पत्करावे लागले.

बाईंना दोन मुले. राजकारणात रस असलेला संजय आणि राजकारणात पडण्यासाठी शिक्षण व अनुभव नसलेला राजीव. संजय बाईंच्या मृत्यूआधीच विमान अपघातात  मृत झाला. पहिली सून मनेका गांधी हिच्याशी बाईंचे जमले नाही म्हणून तिने सासूचे घर सोडून दिलेले. गादीवर बसण्यास एकमेव वारस राजीव गांधी. त्याला घाईघाईने कलकत्त्याहून बोलावून गादीवर बसवण्यात आले.

शेतीक्षेत्राच्या दृष्टीने उल्लेख करण्यासारख्या राजीव गांधीच्या काळात दोनच घटना घडल्या. त्यांच्या कारकीर्दीच्या अगदी सुरुवातीच्या काळातच कृत्रिम धाग्याचे कारखानदार अंबानी आणि वाडिया यांची हनुमान उडी आणि स्पर्धा

दोन्हीही गाजत होती. लायसन्स्-परमिट-कोटा राज्यातही प्रचलित सरकारकडून आपली कामे कशी काढून घ्यायची या कलेत दोन्ही मंडळी निष्णात. परिणामतः, कृत्रिम धाग्याच्या सुतासाठी आणि वस्त्रासाठी लागणारा कच्चा माल आयात करण्यावरची बंधने आणि आयातशुल्क घटवण्यात आले. कृत्रिम धाग्याच्या आणि वस्त्रांच्या निर्यातीला प्रोत्साहन देण्यात आले. तसेच, कापसाबरोबर कृत्रिम धागा मिसळून मिश्रित धाग्यांचे कापड करण्यासाठी उत्तेजन देण्यात आले. कापसाच्या किंमती घसरल्या. महाराष्ट्रातील कापूस एकाधिकार खरेदी व्यवस्थेतदेखील हमी भाव आधारभूत किंमतीपेक्षा जास्त असू नये असे फर्मान राजीवजींच्या काळात निघाले. शेतकऱ्यांनी, एकाधिकार हवा असेल तर हमीभाव आधारभूत किमतीपेक्षा किमान २० टक्के जास्त असला पाहिजे अशी मागणी केली; आधारभूत किंमत हीच हमी भाव असेल तर खाजगी व्यापारांनाही कापूस बाजारात उतरण्याची परवानगी पाहिजे अशी मागणी केली. १० नोव्हेंबर १९८६ रोजी चालू झालेले आंदोलन पुरी १८ वर्षे चालले आहे.

हा प्रश्न समाजावून घेण्यासाठी राजीव गांधी यांनी शेतकरी नेत्यांना बोलावले,त्यांचे म्हणणे ऐकून घेतले; पण, शेतकरी नेत्यांचा राजकारणात काँग्रेसबरोबर राहण्याचा इरादा नाही असे दिसून आल्यावर महाराष्ट्रात येऊन त्यांनी कृषि मूल्य आयोगाचे नाव बदलून 'कृषि उत्पादनखर्च आणि मूल्य आयोग' असे नामकरण केले. हेतू असा की, आयोगाने ठरवलेल्या किंमती या उत्पादनखर्च लक्षात घेऊन ठरवलेल्या असतात असा आभास निर्माण व्हावा. इंदिरा गांधीच्या हत्येनंतर दिल्ली आणि इतरत्र झालेल्या दंगलीमुळे शीख समाजात असंतोष खदखदत होता. राजीवजींची राजवट आपल्याला भावणारी असावी अशा कल्पनेने ईशान्येतील बंडखोरी फोफावली. या दोन्ही बंडखोरांशी बोलणी करून काही मार्ग काढण्याचा प्रयत्न त्यांनी केला. कागदोपत्री करारमदारही झाले; पण, निष्पन्न काहीच झाले नाही.

राजीव गांधींनी काँग्रेसमधील सत्ता-दलालांना शाब्दिक झटका दिला. सरकारी खर्चातील रुपयातील १५ पैसेही आम जनतेपर्यंत पोचत नाहीत असे जाहिर करून नोकरशाहीलाही मोठा धक्का दिला. तळागाळाशी संपर्क साधण्यासाठी तडक जिल्हाधिकाऱ्यांबरोबर बैठका इत्यादि प्रत्यक्ष संपर्काचे प्रयोग केले. सर्वात महत्त्वाचे म्हणजे घटनादुरुस्ती करून पंचायत राज्याची स्थापना केली.

आंबेडकरी राज्यघटनेत पंचायतीला काहीच स्थान नव्हते. गाव आणि ग्रामीण व्यवस्था जातीयवादाचा उकिरडा आहे असे बाबासाहेबांचे मत होते त्यामुळे

त्यांनी भारतीय प्रजासत्ताकाची उतरंड केन्द्र आणि राज्य इतपतच मर्यादित ठेवली होती. राजीवजींच्या घटनादुरुस्तीमुळे आता केन्द्र, राज्य, जिल्हा, तालुका, आणि गाव अशी उतरंड तयार झाली. राजकीय दलालांवर तोफ डागणाऱ्या तरूण पंतप्रधानाला त्यानंतर लगेचच बोफोर्स तोफाप्रकरणी दलाली खाल्ल्याच्या आरोपास सामोरे जावे लागले. विश्वनाथ प्रताप सिंह यांनी त्यावेळी अर्थमंत्रीपदाचा राजीनामा देऊन पर्यायी पक्ष स्थापण्याचा जबरदस्त प्रयत्न केला. राजीवजींचा अखेरचा काळ बोफोर्सच्या बालंटातून सुटावे कसे आणि क्वात्रोचीचा कलंक झटकून कसा टाकावा याची चिंता करण्यातच गेला.

पंजाबमधील अतिरेकी कारवायांना पाकिस्तानचा पाठींबा आहे, ईशान्येतील आदिवासी बंडखोरांना सरहद्दीवरील आणि इतर ख्रिश्चन धर्मीयांचा पाठींबा आहे तोपर्यंत ही बंडाळी शमणारी नाही; पण, त्याविरूद्ध तक्रार करण्याचा हक्क, जोपर्यंत तामीळवाघ श्रीलंकेचा तुकडा तोडून मागत आहेत तोपर्यंत मिळणार नाही अशा भावनेने दुसऱ्या देशात भारतीय लष्कर पाठवण्याची कुबुद्धी राजीवजींना झाली. त्यांनी श्रीलंका लष्कराचाही राग ओढवून घेतला. एका औपचारिक कवायतीच्या वेळी एका श्रीलंकन सैनिकाने भर कवायतीत रायफलचा दस्ता राजीवजींना मारला; पण, खरी नाराजी होती ती तमीळ वाघांची. भारतात निवडणुका चालू असतांनाच पहिली निवडणुकीची फेरी काँग्रेसच्या विरूद्ध गेली असतांना तमीळ वाघांच्या एका आत्मघाती मुलीने राजीवजी आणि त्यांचे साथी यांच्या चिंधड्या उडवून दिल्या. या हत्येविषयी चौकशी झाली, खटले चालले, दोघातिघांना फाशीची शिक्षा झाली; पण, अद्यापही त्यांना फासावर चढवण्यात आले नाही हे पाहता राजीवजींची हत्या घडवण्यामागे काही भारतीय संदर्भही असावा असे अनेक जाणकारांचे मत आहे.

एकदा सुरू झालेली निवडणुकीची प्रक्रिया थांबवता येत नाही; पण, शेषन साहेबांनी दुसऱ्या टप्प्यातील निवडणुका पुढे ढकलल्या आणि दुसऱ्या टप्प्यात काँग्रेसला लोकसभेच्या अनेक जागा जिंकता आल्या. तरीही राजीव गांधींविरूद्ध बंड उभारतांना विश्वनाथ प्रताप सिंह यांनी केवळ बोफोर्स दलालीचाच प्रश्न उठवला नव्हता; काँग्रेसमध्ये जन्म काढलेल्या राजासाहेबांनी नव्या स्वातंत्र्याच्या पहाटेची ललकारी दिली. राजीवस्त्राविरुद्धच्या शेतकरी आंदोलनास उचलून धरले, एवढेच नव्हे तर शेतकरी आंदोलनाने कर्जमुक्तीसाठी चालवलेल्या आंदोलनास महत्त्वाचे स्थान दिले. निवडणुकीतून सत्तेवर आलो तर शेतकऱ्यांची संपूर्ण कर्जमुक्ती केल्याखेरीज राहणार नाही असे त्यांनी वारंवार छातीवर हात

ठेवून सांगितले. पंतप्रधान झाल्यानंतरही शेतकरी संघटनेच्या एका महामेळाव्यात त्यांनी 'कर्जमुक्तीचा भुर्दंड १२ हजार कोटी असो की १५ हजार कोटी असो, शेवटी पंतप्रधानाच्या शब्दाचीही काही किंमत आहे' या शब्दात आपली प्रतिज्ञा जाहिर केली.

शेतकरी आंदोलनही त्यावेळी दलित समाजाला जोडून घेण्याचा प्रयत्न करीत होते. ज्या नागपूरच्या मेळाव्यात पंतप्रधानांनी पंतप्रधानाच्या शब्दाची आण घेतली तो मेळावा फुले-आंबेडकर विचार मेळावा होता आणि नागपूरच्या दीक्षाभूमीवरच तो योजिला होता.

येथूनच राजासाहेबांची वेगळी वाटचाल सुरू झाली. त्यांचे उपपंतप्रधान चौधरी देवीलाल, काहीही करून, त्यांना उलथवण्याच्या खटाटोपात होते. आघाडीचे अल्पमतातील सरकार टिकवण्यासाठी राजासाहेबांची धावपळ चालू झाली. मंडल आयोगाच्या शिफारशी मान्य करून इतर मागासवर्गीयांना आरक्षण दिले तर जनता दलाला सत्तेवरून वीस वर्षे तरी कोणी हलवू शकणार नाही अशी ग्वाही काही मागासवर्गीय नेत्यांनी दिली. राजासाहेबांनाही बुद्ध आणि आंबेडकर यानंतरचा दलितजनांचा सर्वात मोठा तारणहार होण्याची लालसा होती.

त्या तुलनेने शेतकऱ्यांचा प्रश्न मागे राहिला. चौधरी देवीलाल यांनी दिल्लीतील बोट क्लबवर शेतकऱ्यांचा प्रचंड मेळावा भरवून आपले आव्हान जाहिर केले. त्याला उत्तर म्हणून राजासाहेबांनी मंडल आयोगाच्या शिफारशी स्वीकारल्या. शेतकऱ्यांच्या कर्जमुक्तीलाही त्यांनी तत्त्वतः मान्यता दिली परंतु त्यांचे अर्थमंत्री समाजवादी नेते श्री. मधु दंडवते यांनी शेतकऱ्यास कर्जमुक्ती दिली तर काय प्रसंग गुदरेल याचे भयानक चित्र उभे केले. पंतप्रधानांच्या शब्दालाही किंमत आहे असे निक्षून सांगणाऱ्या राजासाहेबांनी काय करता येईल ते दाखवा परंतु नादारीचे अर्ज भरलेल्या शेतकऱ्यांची संपूर्ण कर्जमुक्ती झाली पाहिजे असे निक्षून बजावले. नादारीचे अर्ज भरणाऱ्या शेतकऱ्यांनाच फक्त पूर्ण कर्जमुक्ती देणे चौधरी देवीलाल यांना परवडणारे नव्हते कारण त्यामुळे त्यांच्या मागे असलेला जाट शेतकरी नाराज झाला असता. मधु दंडवते यांनी सर्व शेतकऱ्यांना सरसकट १०,००० रुपयांपर्यंत कर्जातून सूट देण्याची घोषणा केली. या घोषणेची अंमलबजावणीही वेगवेगळ्या बँकांनी वेगवेगळ्या प्रकारे केली. काही बँकांनी व्याजाची रक्कम तेवढी दहा हजारांनी कमी केली, काही बँकांनी 'वसुली होणे नाही' अशा शेऱ्यांनी बंद केलेल्या खात्यांत दहा हजार रुपये जमा केले. थोडक्यात, विश्वनाथ प्रताप सिंह यांनी शेतकऱ्यांना दाखवलेली कर्जमुक्तीची आशा विफल

केली आणि ते विस्थापितांच्या वगैरे लढ्याचे नेतृत्व करू लागले.

मंडल आयोगाच्या शिफारशी मान्य करण्याचा निर्णय झाल्यावर दिल्लीत विद्यार्थ्यांनी आत्मदहनाचे आंदोलन सुरू केले. भारतीय जनता पक्षाने सरकारचा पाठिंबा काढून घेतला. विश्वनाथ प्रताप सिंहांचे सरकार कोसळले. त्यानंतर तीन चार वर्षे, दिल्लीच्या बादशाहीच्या अखेरच्या काळात जशी तख्तासीनांची रांग लागली त्याचीच पुनरावृत्ती दिल्लीत झाली.

चंद्रशेखर जुने समाजवादी, निष्कलंक चारित्र्याचे म्हणून गाजलेले. जनतादलाचे पंतप्रधान होण्याची त्यांची इच्छा होती; पण, चौधरी देवीलालांच्या चलाखीमुळे ती फसली होती. आता ती संधी पुन्हा चालून आली, गावगन्ना समाजवाद्यांना कधी स्वप्नात वाटले नव्हते अशी संधी आली. जिल्ह्याचे पुढारीसुद्धा दिल्लीत मंत्री आणि राज्यमंत्री बनले. जणू काही नवा इतिहास घडतो आहे हे दाखवण्याकरिता आणि आपला जनाधार सिद्ध करण्याकरिता आपला शपथविधी लोकसभेच्या केन्द्रीय सदनात न घेता खुल्या पटांगणात विजय चौकात घेतला. काँग्रेसच्या आधारावर चालणारे हे राज्य सोनिया गांधीच्या एका क्रोधकटाक्षाने कोसळले; पण, जे काही दिवस मिळाले तेवढ्यात चन्द्रशेखर यांच्या सरकारने राष्ट्रीय कृषिनिती तयार करण्याकरिता पूर्वीच्या सरकारने नेमलेली स्थायी समिती बरखास्त करून टाकली आणि गव्हाची प्रचंड प्रमाणावर आयात करण्याची तयारी सुरू केली. प्रत्यक्ष आयात पंतप्रधान गुजराल यांच्या काळात कॉम्रेड चतुरानन मिश्रा यांनी राबवली. याविरूद्ध शेतकऱ्यांचे प्रचंड आंदोलन उभे राहिले. वाघा सरहद्दीपर्यंत शेतकरी हजारोंच्या संख्येने मोर्चा काढून गेले. शेवटी, आयात केलेल्या गव्हात अत्यंत घातक तणांची बियाणी होती हे सिद्ध झाले, एवढेच नव्हे तर पंतप्रधान इंद्रकुमार गुजराल यांच्या सुपुत्रांचा दलालीचा हिस्सा होता हे स्पष्ट झाले.

गुजराल पडले आणि त्यांच्या जागी देवेगौडा आले. स्वतःला किसानपुत्र म्हणवून घेणाऱ्या देवेगौडांनी त्यांच्या अल्पावधीच्या राजवटीत भर सभेत लोकांदेखत पेंगण्याकरिता प्रसिद्धी मिळवली. शेतकऱ्यांकरिता काहीही आशादायक घडले नाही.

पाच वर्षांत चार पंतप्रधान बदलले. कोणाचा पायपोस कोणाच्या पायात नाही अशी परिस्थिती तयार झालेली. आंतरराष्ट्रीय व्यापारातील घट वाढत राहिली आणि दैनंदिन व्यवहार चालवण्यासाठी रिझर्व बँकेकडील सोने गहाण ठेवण्याची वेळ आली. कामगारांचा, शेतकऱ्यांचा असंतोष भडकतच होता. हेही सरकार काँग्रेसच्या क्रोधकटाक्षानेच पडले आणि नव्या निवडणुका जाहिर झाल्या. देशाच्या

आर्थिक दुर्दशेच्या पार्श्वभूमीवर, खरे म्हटले तर, लोकसभेच्या निवडणुकीत काँग्रेसला सज्जड बहुमत मिळावयास हवे होते पण तोपर्यंत राजकीय पक्षांची फुटाफूट आणि राज्यस्तरीय पक्षांचा वाढता प्रभाव यामुळे निवडणुकीत काँग्रेसला सर्वांत मोठा पक्ष एवढेच स्थान मिळाले. काँग्रेस पक्ष पहिल्यांदा आघाडीचे सरकार बनवण्यास तयार झाला.

पंतप्रधानपदावर राजीव गांधींच्याही आधी दावा सांगणारे प्रणव मुखर्जी, अर्जुन सिंग यांना बाजूला टाकून 'अंगम् गलितम् मुंडम् पलितम्' अशी अवस्था झालेल्या आणि निवृत्तीच्या तयारीने रामटेक येथे जाऊन राहिलेल्या पी. व्ही. नरसिंह राव यांना पंतप्रधानपदासाठी बोलावण्यात आले. काँग्रेस राजवटीत केवळ घराण्यालाच महत्त्व आहे, गुणवत्तेला नाही; त्यामुळे नरसिंह राव बाजूला फेकले गेले होते; पण अनेक शाखात निपुण, प्रभावी लेखक, अनेक भाषा जाणणारा आणि अनेक मंत्रालयातील प्रशासकीय अनुभव असलेला हा कुशल मुत्सद्दी ऐतिहासिक अपघातांच्या कारणाने पंतप्रधानपदावर पोहचू शकला. नेहरू घराण्याबाहेरचा शास्त्रीनंतरचा हा काँग्रेसचा पहिला पंतप्रधान थोड्या दिवसातच लाल बहादूर शास्त्रीसारखीच त्याची गत होईल असे अनेकांना वाटत होते पण झाले वेगळेच. सत्ता ही मोठी शक्तिवर्धक आहे याचा पूर्ण अनुभव नरसिंहरावांना आला. म्हाताऱ्याची प्रकृती सुधारली टुणटुणीत झाली.

*(६-२१ सप्टेंबर २००६)*

◆◆

# नरसिंहरावांच्या कारकीर्दीचे वेगळेपण

काँग्रेस पक्षाचा नेहरू-गांधी घराण्याबाहेरील लाल बहादूर शास्त्री सोडता पहिला पंतप्रधान ही जबाबदारी त्यांच्यावर होतीच. राजीव गांधी भर तारुण्यातील आणि नेहरू घराण्याच्या प्रभावळीतील. त्यातून आईच्या मृत्युच्या प्रसंगी बजावलेल्या धीरोदात्त भूमिकेमुळे सहानुभूतीच्या लाटेवर लोकसभेत दोन तृतीयांश बहुमत मिळविलेले. त्यांच्या तुलनेत नरसिंह राव वयोवृद्ध, परंपरेची प्रभावळ नाही, पक्षातील अनेक जुने नेते त्यांच्या नेमणुकीमुळे दुःखी झालेले आणि सगळयात वरकडी म्हणजे लोकसभेत हुकुमी बहुमतसुद्धा नाही. लोकसभेत हुकुमी बहुमत नसलेले ते काँग्रेसचे पहिले पंतप्रधान.

पण, सर्व बाबी अनुकूल असतांना राजीव गांधी यांनी पाच वर्षांत सत्ता गमावली तर एकही गोष्ट अनुकूल नसतांना नरसिंह रावांनी पाच वर्षांच्या काळात मोठी कामगिरी करून दाखविली.

नरसिंह राव मृदुभाषी. विनाकारण टेंभा मिरविण्याचा त्यांचा स्वभाव नव्हता. आपली वास्तविक कामगिरी जरी लोकांपुढे मांडली तर ती 'घराण्या'ला पसंत पडेल की नाही ही धास्ती. त्यामुळे, त्यांचे कर्तृत्व लोकांच्या नजरेत फारसे भरले नाही.

नरसिंह राव यांनी दोन 'न भूतो न भविष्यति' असे चमत्कार करून दाखविले. पहिला चमत्कार म्हणजे, १९८४ सालापासून पेटत असलेल्या खलिस्तानी आतंकवाद्यांचा बीमोड करणे. खालिस्तानी आतंकवाद्यांची कृत्ये अधिकाधिक भयानक होत होती. दिवसाढवळया बस थांबवून प्रवाशांना उतरण्यास भाग पाडून बिगरशीख प्रवाशांना गोळयांच्या वर्षावात ठार करणे येथपासून ते निवडक नामवंतांना टिपून मारणे हा त्यांच्या हातचा खेळ झाला होता. पुण्यात झालेली जनरल वैद्य यांची हत्या, दिल्लीतील कृषि उत्पादनखर्च व मूल्य आयोगाचे

अध्यक्ष श्री. डी. एस्. त्यागी यांची हत्या आणि एअर इंडियाचे सबंध विमान उडवून देणे यांत त्यांनी दाखविलेल्या क्रूरतेमुळे खलिस्तानी कोठे हल्ला करतील याची कोणालाही शाश्वती देता येत नव्हती. खलिस्तानच्या घोषणा आणि ध्वजारोहण देशात व परदेशांतही होत होते. पाकिस्तानच्या मदतीने खलिस्तानवादी अतिरेकी बेबंद बनले होते. त्यांच्या बंदोबस्तासाठी नेमलेले श्री. रिबेरो अतिरेक्यांच्या हल्ल्यातून बालंबाल बचावले होते. पंजाबमधल्या कोणत्याही खेड्यात जाणे सशस्त्र संरक्षणाखेरीज अशक्य झाले होते. एका अर्थाने पंजाबवर सत्ता खलिस्तानवाद्यांचीच चालली होती; पण, अश्याही परिस्थितीत धैर्याने सामना देऊन एकएक आतंकवादी गट टिपून काढीत खलिस्तानी उठाव संपविण्यात नरसिंह राव यांनी यश मिळविले.

त्याआधी किंवा त्यानंतर असे यश कोणाला कमावता आले नाही. आजही ईशान्येतील टोळयांची बंडखोरी, जम्मू-काश्मिरातील पाकिस्तान्यांची बंडाळी किंवा नेपाळच्या सरहद्दीपासून केरळपर्यंत हुकुमत चालविणारी नक्षलवाद्यांची बंडखोरी यांचा बंदोबस्त मनमोहन सिंग यांच्या सरकारलाही जमलेला नाही. नरसिंह रावांच्या काळी सारा देश आर्थिक विपन्नावस्थेत होता तरीही नरसिंह रावांनी ही कामगिरी करून दाखविली. आज देश आर्थिक महासत्ता होण्याच्या उंबरठ्यावर आहे अश्या वल्गना केल्या जात आहेत; पण, दररोज घातपाती कृत्यांत, बॉंब स्फोटांत शेकडो निरपराध नागरिक आणि सैनिकही मारले जात असताना अतिरेक्यांचा बंदोबस्त होत नाही. मोठमोठे नेते आपली असमर्थता लपविण्यासाठी निर्धार्मिकतेचा आणि गरीबगुरीब जनतेच्या कळवळयाचा बुरखा पांघरीत आहेत.

पंजाबमधील बंडाळी मोडून काढणे ही नरसिंह रावांची किरकोळ कामगिरी झाली; त्यांची खरी मोठी कामगिरी आर्थिक क्षेत्रात घडली.

प्रत्यक्ष स्वातंत्र्य पदरात पडण्याच्या आधीपासून आपली प्रतिमा कॉंग्रेसमधे थोडी जहाल रहावी यासाठी पंडीत नेहरू समाजवादाचा पुरस्कार करीत असत. त्यांची अर्थकारणातील मते महात्मा गांधींना बिलकुल पटत नसत. एका पत्रव्यवहारात गांधीजींनी 'प्रिय जवाहर'ला निक्षून सांगितले होते की, अशी तुमची मते असतील तर त्याविरुद्ध आंदोलन करण्यासाठी स्वातंत्र्याच्या काळातही मला उठावे लागेल.

१५ ऑगस्ट १९४७ पासून चारपाच महिन्यांतच नेहरूंची पावले भलत्याच दिशेने जात आहेत हे गांधीवाद्यांच्या लक्षात येऊन चुकले. याच आक्रोशातून साने गुरुजींसारख्या निर्मळ मनाच्या गांधीवाद्याला जीव नकोसा झाला. १९४८ सालच्या

फेब्रुवारी महिन्यात सेवाग्राम येथे गांधीपरंपरेतील प्रमुख विचारवंतांची बैठक होणार होती आणि त्या बैठकीत नेहरू सरकारच्या धोरणाविषयी सखोल अवलोकन करायचे ठरले होते; पण, तसे घडायचे नव्हते. जानेवारीच्या शेवटासच गांधीजींची हत्या झाली.

महात्मा गांधी कुशल सेनापती होते तसेच मोठे भाग्यवानही होते. १९३० सालचे आंदोलन फसले, यापुढे सत्याग्रहाचे आंदोलन प्रभावी ठरण्याची शक्यता नाही या जाणिवेने महात्मा गांधी आणि त्यांचे अनुयायी विधायक कार्यक्रमांकडे वळले होते. १९३५ साली इंग्रज शासनाने गव्हर्नमेंट ऑफ इंडिया ॲक्ट प्रसृत केला आणि त्यानंतर चारच वर्षांनी दुसऱ्या महायुद्धाच्या ज्वाला भडकल्या आणि महायुद्ध संपल्यानंतर स्वातंत्र्याचे ताट समोर वाढून आले; एवढेच नव्हे तर त्याचे सारे श्रेय 'राष्ट्रपिता' अश्या बिरुदावलीने महात्मा गांधींच्या पदरात पडले. स्वातंत्र्य आले त्याबरोबर फाळणीही आली; त्याबरोबर प्रचंड कत्तली, बलात्कार, जाळपोळ, निर्वासितांचे लोटही आले. हिंदुमुसलमानांच्या ऐक्याची ध्वजा फडकावणाऱ्या गांधीजींच्या नशिबी त्यांच्या विचाराचा दारूण पराभव आला. हिंदू समाजातील अन्यायकारक जातिव्यवस्था संपविण्याकरिता त्यांनी दहा वर्षांत अस्पृश्यता संपविण्याची घोषणा केली होती; पण, त्यांच्या विषयी हरिजनांच्या मनात कधीही आपुलकीची भावना उपजली नाही. 'शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा' अशी घोषणा देणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकरच हरिजनांचे तारणहार दैवत म्हणून मान्यता पावले. आज तर, दलितांना 'हरिजन' या शब्दाचीही शिसारी आहे.

गांधीजींच्या अर्थकारणात गाव, शेती, ग्रामोद्योग यांना सर्वांत महत्त्वाचे स्थान होते. आर्थिक विकास घडवता घडवता अंत्योदयही साधण्याची त्यांची रणनीती होती. नेहरूंच्या इंग्रजाळलेल्या बुद्धीस हे पटणारे नव्हते. मग, गांधी गेले आणि नेहरूंना रान मोकळे झाले. गांधीजींचा शेती, गाव आणि ग्रामोद्योग यांच्यावर आधारलेला अर्थविचार त्यांनी दूर केला. आचार्य नरेंद्र देव, लोहिया इत्यादी भारतीय समाजवाद्यांचा 'कसेल त्याची जमीन आणि श्रमेल त्याची गिरणी' हा विचारही त्यांनी अव्हेरला आणि, दुसऱ्या महायुद्धानंतर महासत्ता म्हणून उजेडात आलेल्या आणि हिटलरच्या पराभवात सर्वांत मोठी कामगिरी बजावणाऱ्या समाजवादी रशियाचा अर्थविचार त्यांना भावला. पाकिस्तान वेगळे झाल्यामुळे आता त्यांना लियाकत अली किंवा जिना यांना बरोबर घेऊन चालण्याची आवश्यकता राहिली नव्हती. आपला हेतू कधीही स्पष्ट न करता, या विषयावर व्यापक चर्चा

घडवून न आणता त्यांनी घटनेत कोणतीही तरतूद नसताना 'नियोजन मंडळ' तयार केले. घटनेतील संपत्तीचा, मालमत्तेचा मूलभूत हक्क खच्ची करीत करीत संपवला आणि देशभर उद्योगधंदे, विशेषत: जड उद्योगधंदे, शहरे आणि सार्वजनिक क्षेत्र यांच्या बडेजावाची व्यवस्था उभी केली. यासंबंधीचा तपशील पहिल्या लेखांकात येऊन गेला आहे. त्याशिवाय, सुवर्ण महोत्सवी 'अवलोकन' (स्वातंत्र्य का नासले? – १९९८) यात नेहरूंच्या धोरणाचा अधिक तपशीलवार विचार केला आहे.

ढनयोजनाचा आराखडा उभा करण्यात आला तो केवळ गणिती अर्थशास्त्रज्ञांचा बुद्धिविलास होता. नियोजनाचे आराखडे पाहिले म्हणजे असल्या अचरट योजनांना सरकारने मान्यता दिली आणि लोकांनीही त्यावर विश्वास ठेवला याचे आश्चर्य वाटते. नियोजनात अंदाजपत्रकी तूट नोटा छापून भरून काढण्यास मोठे प्राधान्य दिले गेले होते आणि, तरीही, अन्नधान्य व कच्चा माल यांच्या किमती भडकू नयेत म्हणून शेतीमालाच्या किमती योजनाबद्ध रीतीने पाडण्याचे तंत्र परिपूर्ण करण्यात आले होते.

इंदिराजींच्या काळाततर 'समाजवाद' हा शब्द घटनेच्या प्राक्कथनामध्येच घुसडण्यात आला होता; पण, व्यवहारचतुर इंदिरा गांधी आपली पावले हळूहळू खुल्या व्यवस्थेकडे वळवीत होत्या. त्यांचे चिरंजीव संजय गांधी यांनी परदेशी सहाय्याने मारुती मोटारींचा कारखाना काढला तेंव्हाच ही गोष्ट स्पष्ट झाली.

ढवश्वनाथ प्रताप सिंह, चंद्रशेखर, गुजराल आणि देवेगौडा या चार पंतप्रधानांच्या कारकीर्दीत एकूण पाचच वर्षांच्या अवधीत महागाईचा डोंब उसळला. उत्पादनातील वाढ कासवापेक्षाही कमी गतीने होऊ लागली. निर्यात मंदावली. परदेशातून येणारी गुंतवणूक नगण्यच होती. आयातीतमात्र भरमसाठ वाढ झाली. गुजराल यांच्या कारकीर्दीत शेतकी मंत्री चतुरानन मिश्रा यांनी ३० लाख टन गव्हाची आयात केली. याच काळात पाचव्या वेतन आयोगाच्या शिफारशी स्वीकारण्यात आल्या. या सगळ्यांचा परिणाम म्हणून देशाच्या सहा आठवड्याच्या गरजेपुरतेसुद्धा परकीय चलन गंगाजळीत न राहिल्यामुळे देशातील सोने हलवून ते गहाण ठेवण्याची वेळ आली.

भारताच्या आर्थिक दुर्दशेला पायाभूत संरचनांची कमजोरी हे सर्वांत महत्त्वाचे कारण होते. समाजवादाच्या काळात गुंतवणुकीचे निर्णय लाल फितीच्या विळख्यात अडकले. राजकीय प्रचारासाठी कारखानदारी आणि रोजगारी सांभाळणे आवश्यक असल्यामुळे सरकारची सारी शक्ती त्या क्षेत्रांत लागली. परंतु, वाहतुकीला चांगले

रस्ते नाहीत, रेल्वेला ना नियमितपणा ना सुरक्षा, समुद्रावरील बंदरांची स्थिती निर्यातीला नाउमेद करणारी; दूरभाष व्यवस्था सरकारी नियंत्रणाखाली आणि त्यामुळे निकामी. फोन मिळणे अवघड, मिळाले तर चालू असणे कठीण, चालू असले तर योग्य नंबर मिळणे अशक्य, मिळाल्यास त्यासाठी तास न् तास प्रतीक्षा करावी लागे अशी स्थिती. संरचना क्षेत्राकरिता आग्रहाने तरफदारी करणारे कारखानदार, निर्यातदार प्रभावहीन असल्यामुळे अशी परिस्थिती तयार झाली. समाजवादी व्यवस्थेत हे अपरिहार्य असते. समाजवादी सोव्हिएत रशियाचा पाडाव झाल्यानंतर रशिया आर्थिक महासत्ता असल्याचा बुडबुडा फुटला. तेथील तेलवाहतुकीसाठी बांधलेले नळ रशियातील थंडीत आता टिकू शकत नाहीत असे दिसून आले. रशियाच्या विलयानंतर तेथील मोठे मोठे निवृत्त सेनापतीदेखील पावाच्या रांगेत उभे राहू लागले किंवा भीक मागू लागले. आणि इकडे, रशियाचा आदर्श पाळणारा सारा हिंदुस्थान देशच दिवाळखोर बनून खानदानी सोने गहाण टाकण्याच्या कडेवर येऊन पोहोचला.

इतक्या गंभीर परिस्थितीत पंजाबची आघाडी एका हाताने सांभाळत नरसिंह राव यांचे अर्थमंत्री डॉ. मनमोहन सिंग यांनी आर्थिक सुधारांचे रणशिंग पहिल्याच अंदाजपत्रकात फुंकले. नवी कारखानदारी उभी करण्यासाठी किंवा कारखान्यांची क्षमता वाढविण्यासाठी कारखानदारांना लाल फितीच्या ज्या चक्रव्यूहातून जावे लागे त्याच्या काटछाटीने आर्थिक सुधारांना सुरुवात झाली. देशी कारखानदारीतील परकीय भांडवलाच्या हिश्शासंबंधीची बंधने ढिली करण्यात आली. एवढेच नव्हे तर, समाजवादाच्या काळात सुरू झालेले सार्वजनिक क्षेत्रातील उद्योग, कार्यक्षमता वाढविण्यासाठी, खासगी क्षेत्राकडे सुपुर्द करण्याचीही सुरुवात झाली.

परिणाम तातडीने दिसून आले. आर्थिक सुधारांना सुरुवात झाल्यानंतर, तीनच महिन्यांच्या आत, देशाबाहेर गेलेले सोने परत आले आणि भांडवलाचा व परकीय चलनाचा प्रवाह देशात येऊ लागला. हे सर्वच अर्थकारण, समाजवादात पिंड पोसल्या गेलेल्या जनतेला समजण्यासारखे नव्हते; पण, उद्योजकांनामात्र अधिक विस्तृत आर्थिक सुधारांची चाहूल लागली आणि त्यांच्यात उत्साह संचारला. भारताची बुद्धिमत्ता समाजवादाच्या काळात कुजत होती, तिचे श्वास मोकळे होऊ लागले. जुन्या काळात साडेतीन टक्क्यांच्या वर राष्ट्रीय उत्पन्नाची वाढ कधी झाली नव्हती; पण १९९१ नंतर वाढीचा दर हळूहळू ४, ५, ६ करीत आता ८ टक्क्यांच्या पुढे जाऊन स्थिर झाला आहे याचे श्रेय नरसिंह राव यांनी उद्योजकांच्या पाठीवर जी थाप मारली तिला आहे.

नरसिंह राव यांचे अर्थमंत्री अर्थशास्त्री, त्यांचा अनुभव प्रामुख्याने बिगरशेती क्षेत्रातला; पण 'शेतकऱ्याचे मरण, हेच सरकारचे धोरण' या परिस्थितीकडे त्यांचे विशेष लक्ष गेले नाही.

त्याआधी १० वर्षे, चीनमध्ये आर्थिक सुधारांची सुरुवात झाली होती. तेथे प्राधान्याने शेतीवरील निर्बंध काढून टाकण्यात आले होते आणि सामूहिक शेतीऐवजी शेतकऱ्यांच्या खासगी उत्पादनास बढावा देण्यात आला. परिणामी, तेथे जो चमत्कार घडला तो सर्वविदितच आहे. भारतातमात्र असे घडले नाही. समाजवादाच्या काळात शेतीचे शोषण झालेच, पण आर्थिक सुधारांच्या पहाटेनंतरही शेतीमालाच्या वाहतुकीवरील, साठवणुकी-वरील, व्यापारावरील, प्रक्रियेवरील आणि निर्यातीवरील बंधने उठविली गेली नाहीत; कायमच राहिली.

जमिनीचा सैद्धांतिक मालकीहक्क सरकारकडेच राहिल्यामुळे शेतकऱ्यांना नवी गुंतवणूक करण्याची उमेद आली नाही. त्यामुळे, आर्थिक सुधारांचा परिणाम म्हणून कारखानदारीच्या क्षेत्रात जो चमत्कार घडला त्याची झलकही शेतीच्या क्षेत्रात दिसू शकली नाही. भारताच्या गेल्या पंधरा वर्षांतील आर्थिक प्रगतीचे श्रेय डॉ. मनमोहन सिंग यांना देताना शेती क्षेत्र मागास ठेवल्याबद्दल दोषाचे मापही त्यांच्या पदरात घालावे लागेल.

हरित क्रांतीनंतर २० वर्षे रासायनिक खते आणि औषधे यांच्या वापरामुळे जमिनीची सुपिकता घटत चालली होती आणि शेतीमालाला मिळणारा भाव पाडण्याचे सरकारी धोरण चालूच राहिले. त्यामुळे, शेतकऱ्याचा कर्जबाजारीपणा वाढत राहिला. परिणामतः, १९९५ सालापासून जवळजवळ दीड लाख शेतकऱ्यांनी विष पिऊन किंवा फाशी लावून घेऊन जीवन संपविण्याचा निर्णय घेतला.

नरसिंह राव यांच्या काळात आणखी एक मोठे प्रकरण उभे राहिले. विश्वनाथ प्रताप सिंह यांचे सरकार पाडल्यानंतर भारतीय जनता पक्षाने अयोद्धयेतील राम मंदिराचा प्रश्न निकराने हाती घेतला. रथयात्रा निघाल्या, देशाच्या कोन्याकोपऱ्यातून विटा जमा झाल्या, मोठ्या संख्येने रामसैनिकही अयोद्धयेकडे जाऊ लागले. 'मंदिर वहीं बनाएंगे' म्हणजे जेथे बाबरी मशीद आहे तेथेच मंदिर बनविण्याचा आग्रह असल्यामुळे जातीय/धार्मिक वैमनस्य आणि दंगे वाढण्याचा प्रचंड धोका होता. शेवटी, ६ डिसेंबर १९९३ रोजी रामसैनिकांनी पहाता पहाता बाबरी मशिदीची वीट न् वीट उखडून टाकली. या कृत्यात रामसैनिकांना भडकवून देणारी भाषणे करणाऱ्या नेत्यांचा सहभाग होताच, पण त्यापलीकडे, तेथील बंदोबस्तावरील सर्व पोलिस दलाच्या जवानांच्या मनातील रामाबद्दलची भावनाही कारणीभूत

ठरली. या काळात, नरसिंह राव यांनी ठरविले असते तर मशीद धराशायी होणे त्यांना नक्कीच टाळता आले असते; पण, अनेक क्षेत्रांत कार्यक्षमता दाखविणाऱ्या नरसिंह राव सरकारने, जाणता न जाणता, मशिदीवरील हल्ला होऊ दिला हे खरे.

नव्या निवडणुका जवळ आल्यावर नरसिंह राव यांनी पहिल्यांदा स्वत:च्या नेतृत्वाची प्रतिमा उभी करण्याचा प्रयत्न केला; पण, नेहरू-गांधी घराण्याच्या सावलीत त्याला फारसे यश आले नाही. निवडणुकीत काँग्रेसचा पराभव झाला आणि पहिल्यांदा 'अब की बारी, अटल बिहारी' ही घोषणा समूर्त झाली.

*(२१ सप्टेंबर २००६)*

◆◆

# नवव्या अनुच्छेदाच्या तबेल्याची साफसफाई

राज्यघटनेचा उघडउघड भंग कितीही होताना दिसत असला तरी भारतीय न्याययंत्रणा त्याची आपणहून दखल घेत नाही. अशा प्रकरणी एखादे विशिष्ट प्रकरण न्यायप्रविष्ट झाले तरच ती त्याबाबतीत आपली भूमिका जाहीर करते. तामिळनाडूच्या राज्यशासनाने ६९ टक्के आरक्षणाच्या संदर्भात दाखल केलेल्या एका खटल्याचा निकाल देताना ११ जानेवारी २००७ रोजी सर्वोच्च न्यायालयाने म्हटले आहे की एखादा कायदा घटनेच्या नवव्या अनुच्छेदात घातला याचा अर्थ असा होत नाही की त्याची न्यायालयीन छाननी करताच येणार नाही.

भारतीय राज्यघटनेच्या पहिल्या व चौथ्या घटनादुरुस्त्यांनी घटनेमध्ये नववा अनुच्छेद घालण्यात आला. या घटनादुरुस्त्या जमीनदारी विरोधी अतिउत्साहाने केल्या गेल्या. मोठ्या जमीनदारांकडून जमिनी काढून घेण्याचा कायदा हा राज्यघटनेचा आणि घटनेने नागरिकांना दिलेल्या संपत्तीच्या मूलभूत अधिकाराचा भंग करणारा असल्याचा निकाल जमीनदारांनी केलेल्या दाव्यांमध्ये विविध न्यायालयांनी दिला. सरकारने पळवाट काढली. वादग्रस्त कायद्यात दुरुस्ती करण्याऐवजी सरकारने राज्यघटनेतच दुरुस्ती करण्याची शक्कल लढवली आणि ती चालते असे दिसल्यावर उत्तरोत्तर वाढत्या प्रमाणात तिचा वापर आजतागायत सुरू आहे.

सुरुवातीच्या काळात नवव्या अनुच्छेदाचे हे विचित्र हत्यार प्रामुख्याने जमीन सुधार-विषयक कायदे सुखेनैव वापरता यावेत यासाठी चालविण्यात आले. नंतर, 'कालचाच धडा आज पुन्हा' या चालीवर ज्या ज्या कायद्यांच्या बाबतीत समर्थन करणे सरकारला अडचणीचे वाटू लागले ते एकापाठोपाठ एक सरकारने नवव्या अनुच्छेदात बंद करायचा धडाका लावला.

भारतातील शेतकऱ्यांच्या संघटना गेली २५ वर्षे सार्वजनिक हिताच्या योजनांच्या

बहाण्याने होणाऱ्या सक्तीच्या भूसंपादनाला विरोध करीत आहेत आणि भूसंपादनाचा कायदा ज्या नवव्या अनुच्छेदाच्या कोषात सुरक्षित ठेवला आहे तो अनुच्छेद रद्द करणे आणि नागरिकाचा संपत्तीचा मूलभूत अधिकार परत मिळविणे यासाठी लढा देत आहेत. सर्वोच्च न्यायालयाचा ताजा निकाल म्हणजे शेतकऱ्यांच्या संघटनांचा विजय असून, नवव्या अनुच्छेदाला आव्हान न देता आणि संपत्ती अधिकाराच्या अपहरणाचा निषेध न करता विस्थापित शेतकऱ्यांच्या केवळ पुनर्वसनाचा हेका धरणाऱ्या पर्यावरणवाद्यांचे पितळ उघडे पाडणारा आहे.

हा निकाल देताना सर्वोच्च न्यायालयाने, फक्त २४ एप्रिल १९७३ नंतर नवव्या अनुच्छेदात घातलेले कायदेच न्यायालयीन छाननीखाली येतील असे म्हटले आहे, यात न्यायालयाचे अवघडलेपणच जाणवते. ही तारीख कोठून आली? केशवानंद भारती विरुद्ध केरळ राज्यशासन या खटल्यात २४ एप्रिल १९७३ रोजी निकाल देताना न्यायालयाने म्हटले होते की ज्या कायद्यांतील बदलांमुळे राज्यघटनेच्या मूळ ढाच्याला धक्का लागण्याची शक्यता आहे असे कायदे सोडून इतर कायद्यांमध्येच दुरुस्ती करण्याचे संसदेला अधिकार आहेत. वास्तविक, नवव्या अनुच्छेदाच्या प्रास्ताविकेतील शब्दरचनाच एक महत्त्वाच्या मूलभूत हक्कावर अतिक्रमण करणारी असल्यामुळे हा अनुच्छेदच राज्यघटनेचा भंग करणारा आहे; पण, त्या न्यायालयाने त्याचा उल्लेखसुद्धा आपल्या निकालात केला नाही. कदाचित, त्या खटल्यात न्यायालयाने याबाबतीतही निकाल द्यावा अशी मागणी केली नव्हती म्हणूनच असेल.

राज्यघटनेत नंतर घुसडण्यात आलेल्या या नवव्या अनुच्छेदाच्या अडथळयामुळे १९५१ पासून किती नागरिकांना कायद्याच्या आधाराने, अन्यायाविरुद्ध दाद मागण्या/मिळवण्याच्या संधीस मुकावे लागले असेल याची गणती करणे केवळ अशक्य होईल.

सर्वोच्च न्यायालयाच्या ताज्या निर्णयामुळे आता नवव्या अनुच्छेदात कोंबलेले सर्वच कायदे तेथून काढले जातील आणि त्यांची न्यायालयीन छाननी होईल का असे मोठे कोडे पडले आहे.

आजमितीस तरी असे दिसते की, जमीनसुधारासंबंधी ज्या कायद्यांना नवव्या अनुच्छेदाचे अभय लाभले आहे ते सर्व कायदे १९७३ पूर्वी या अनुच्छेदात टाकले गेले आहेत त्यामुळे, भविष्यातही या कायद्यांन्वये झालेल्या कारवाईला न्यायालयात आव्हान देता येणार नाही. लवकरच, विस्थापित शेतकऱ्यांच्या पुनर्वसनासाठी एक नवीन 'पुनर्वसन धोरण' आखण्याचा मनोदय केंद्र सरकारने

जाहीर केला आहे.

शेतकऱ्यांच्या जमिनी संपादन करण्याचा कायदेशीर कावा सरकार सोडून देईल हे केवळ असंभव दिसते आहे.

सर्वोच्च न्यायालयाच्या या ताज्या निर्णयाने शेतकऱ्यांना जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ च्या संदर्भात थोडा फार लाभ होण्याची शक्यता आहे. कारण, हा कायदा बराच आधी तयार झाला असला तरी तो १९७६ मध्ये नवव्या अनुच्छेदात घालण्यात आला. आणि, या निकालामुळे तो आता न्यायालयीन छाननीच्या कक्षेत आला आहे. अर्थात, या कायद्यान्वये अन्याय झाल्यास न्यायालयाकडे धाव घेण्यासारखे खर्चिक पाऊल उचलण्यासाठी शेतकरी पुरेशी साधनसामग्री कितपत गोळा करू शकेल हा वेगळाच प्रश्न आहे.

लक्षात घेण्यासारखी गोष्ट आहे की, एकतरी राज्यशासन असे आहे की ज्याने. जीवनावश्यक वस्तू कायद्याचा भंग केला म्हणून शेतकऱ्यांच्या शेतजमिनी जप्त केल्या आहेत. योगायोग म्हणजे, हेसुद्धा त्याच राज्यात घडले ज्या केरळचे सरकार १९७३ मध्ये केशवानंद भारतीच्या दाव्यात हरले होते.

केरळ सरकारने आपल्या अधिसूचना क्र. (इ) २२५/६७/Agri.dt. १७-६-१९६७ ने भू-वापर अध्यादेश, १९६७ (Land Utilization Order, १९६७) जारी केला. १९६७ च्या सुमारास देशात हरित क्रांती झाली होती आणि अन्नधान्याच्या तुटवड्याची काळी छाया नष्ट होऊन तुटवडा संपला होता. अन्नसुरक्षेचा मार्ग म्हणजे उत्कृष्ट तंत्रज्ञान वापरून शेतीतील उत्पादन, उत्पादकता व बियाण्यांचा उतारा वाढवणे हाच आहे हे त्यामुळे सिद्ध झाले होते. उत्तरेतील पंजाब व हरयाणा या राज्यांनी गहू उत्पादनासाठी हरित क्रांतीची कास धरली; पण, त्यासाठी त्यांनी 'तुम्ही गहूच पिकवायला पाहिजे किंवा गव्हाखेरीज इतर काही पिकवता कामा नये' अशी त्यांच्या शेतकऱ्यांवर सक्ती केली नाही. केरळ सरकारच्या १९६७ च्या अध्यादेशातील तरतुदी आणि शब्दरचना पाहिली की स्टॅलिनने शेतकऱ्यांविरुद्ध राबविलेल्या मोहिमेची आठवण होते. या अध्यादेशात म्हटले आहे :-

'एखाद्या क्षेत्रात अन्नधान्याचे उत्पादन वाढविण्यासाठी आवश्यक आणि, अनैतिक असले तरी, उपयुक्त आहे असे जर राज्यशासनाला पटले.... तर त्या क्षेत्रातील प्रत्येक जमीनधारकाने या अध्यादेशाने निर्देश दिलेली धान्य पिके घ्यावीत असा आदेश शासन काढील. जर एखाद्या शेतकऱ्याने त्या आदेशाकडे काणाडोळा केला तर संबंधित जिल्हाधिकारी त्या जमीनधारकाला नोटीस बजावेल.

दहा दिवसांच्या आत त्या नोटिशीला शेतकऱ्याने सकारात्मक प्रतिसाद दिला नाही तर जिल्हाधिकारी त्या जमिनीच्या वहितीचा ३ वर्षांसाठी लिलाव करील आणि लिलाव खरेदीदाराने निर्देशित अन्नधान्य उत्पादन करण्यासाठी त्याच्या ताब्यात देईल.'

केरळमधील परिस्थितीतील शब्दकोशात 'धान्यपीक' म्हणजे भात, मासे, ऊस, भाज्या, टॅपिओका, याम, कॉफी, दालचिनी, मिरी, भुईमूग, केळी, राजाळी. १९६७ च्या या अध्यादेशाने एका धान्यपिकाऐवजी दुसरे धान्यपीक घेण्यावरही शेतकऱ्यांना बंदी होती. लिलाव खरेदीदारासुद्धा त्या जमिनीत जे पीक घेण्याचे निर्देश अध्यादेशाने दिले असतील तेच धान्यपीक घेण्याचे बंधन असते. त्याने ते पीक न घेता तो दुसरेच पीक घेऊ लागला तर त्याचा करार रद्द होऊन त्याला त्या जमिनीतून हुसकावून लावले जायचे. अध्यादेशातील स्टॅलिनी अटींमुळे आपण दिलेल्या आदेशाप्रमाणे शेतकरी पीक घेत नसतील असे दिसले आणि त्याविरुद्ध कारवाई करणे आवश्यक आहे असे वाटले तर बळाचा वापर करणे किंवा करविणे याचे अधिकार जिल्हाधिकाऱ्याला मिळाले होते. एखाद्याचा समज असा होईल की अशा प्रकरणी जिल्हाधिकारी पोलिसदलासारख्या कायदेशीर बळाचाच वापर करीत असतील. दुर्दैवाने, तसे नाही. बहुतांश प्रकरणांमध्ये 'केरळ स्टेट कर्षक तोझिलाली युनियन (KSKTU)' या शेतमजुरांच्या संघटनेने हस्तक्षेप केलेला दिसतो. केरळ सरकारने शेतमजुरीचे दर कृत्रिमरीत्या वाढवून न परवडणाऱ्या पातळीवर नेले आणि भाताचे भावमात्र अ-किफायतशिरच राहिले. त्यामुळे, एकदीड एकराच्या भातउत्पादक शेतकऱ्यांमध्ये भातपीक घेण्याची इच्छाच राहिली नाही अशी अनेक उदाहरणे आहेत. जेव्हा या शेतकऱ्यांनी आपल्या जमिनीच्या तुकड्यांमध्ये भाताऐवजी रबराची किंवा सुपारीची रोपे लावली तेव्हा शेतमजूर युनियनचे सदस्य हुल्लडबाजी करीत त्या शेतांत शिरले आणि सर्व रोपे उपटून नष्ट केली. एकाही प्रकरणात जिल्हाधिकाऱ्यांनी या बेकायदेशीर कृत्ये करणाऱ्या हुल्लडबाजांविरूद्ध काही कारवाई केली नाही की कोण्याही अन्यायग्रस्त शेतकऱ्याला नुकसानभरपाई दिली नाही.

केरळमधील कम्युनिस्ट सरकारने भातशेतीत काम करणाऱ्या मजुरांचे मजुरीचे दर वाढवताना हे दर देणे भातशेतीच्या शेतकऱ्याला शक्य होईल का याचा काहीही विचार केला नाही. गेल्या २० वर्षांत या शेतमजुरांचे मजुरीचे दर दरवर्षी सरासरी ११.९५% नी वाढले. १९८१-८२ मध्ये स्त्रीमजुराला ८.८३ रुपये तर पुरुषमजुराला १२.७४ रुपये रोज मिळत असे. वाढता वाढता २००३-०४ मध्ये

हेच आकडे अनुक्रमे १०१.६४ रुपये व १४८.७२ रुपये झाले. याच काळामध्ये भाताच्या भावामध्येमात्र दरवर्षी सरासरी ७.३६% नीच वाढ होत गेली. – १९८१–८२ मध्ये भाताचा प्रति क्विंटल भाव १७८.७८ रुपये होता तर २००३–०४ मध्ये तो  ६९४.६९ रुपये होता.

प्रश्न असा पडतो की इतका कडक अध्यादेश राबविल्यानंतर केरळचे सरकार अन्नधान्य पिकांखालील क्षेत्र वाढविण्यात किंवा किमानपक्षी 'जैसे थे' राखण्यात यशस्वी झाले का? भात उत्पादन करण्यासाठी सरकारने शेतकऱ्यांकडून मोठ्या प्रमाणावर जमिनी काढून घेतल्याची अनेक प्रकरणे आहेत. यातील बहुतेक जमिनी वर्षानुवर्षे पडून आहेत आणि राजकारणी पुढारी व जमीनव्यवहारातील दादा लोकांचा या जमिनी बांधकामासाठी मिळाव्यात म्हणून त्यावर डोळा आहे. १९८०–८१ मध्ये केरळमध्ये ८,०१,६९१ हेक्टर जमीन भाताखाली होती आणि भाताचे उत्पादन १३,६४,८६७ टन होते. २००३–०४ पर्यंत भातपिकाचे क्षेत्र घसरून एक तृतीयांशापेक्षा कमी झाले (२,८७,३४० हेक्टर) तर भाताचे उत्पादन निम्म्याहून कमी (५,७०,०४८ टन) झाले.

समाजवादाची आण घेणाऱ्या सत्ताधीशांचे या तऱ्हेचे हस्तक्षेप ही नित्याचीच बाब झाली होती. शेतीक्षेत्राच्या बाबतीत ते नेहमीच ठेचकाळत राहिले. आतातरी सरकारने नवव्या अनुच्छेदातील सर्व कायदे–निदान १९७३ नंतर घातलेले कायदे – सरळसरळ रद्द केले तर ते सर्वस्वी समर्थनीय ठरेल; आवश्यकता वाटली तर त्यांच्या बदली वर्तमानकाळाशी सुसंगत असे नवे कायदे बनवता येतील.

*(२१ जानेवारी २००७)*

◆◆

# मुर्दाडांचा देश, कचखाऊ शासन, बुळी प्रजा

बिजिंगच्या ऑलिंपिक खेळांत अखेर भारताचे घोडे गंगेत न्हाले. एका बिंद्राला एका विशिष्ट प्रकारच्या नेमबाजीच्या स्पर्धेत अखेर सुवर्णपदक मिळाले. हा खेळ काही जलतरणासारखा लक्ष वेधून घेणारा नाही. नेमबाजी अचूक लागण्यात काही नशिबाचा आणि योगायोगाचाही भाग असू शकतो; पण, आधुनिक ऑलिंपिकच्या इतिहासात पहिल्यांदा भारतीय खेळाडू सुवर्णपदक विजेता झाला. साहजिकच, आनंदीआनंद जाहला. वेगवेगळया राज्यांनी बिंद्रावर पैशाचा आणि देणग्यांचा वर्षाव केला. दोन दिवस भारतातील सगळया वर्तमानपत्रांत पहिल्या पानावर हे कौतुक झळकले.

योगायोगाची गोष्ट अशी की, या स्पर्धेत १९७२ च्या म्युनिच येथील स्पर्धेतील अमेरिकन तरुणपटु मार्क स्पिट्झचा सात सुवर्णपदके जिंकण्याचा विक्रम तोडण्याकरिता अहमहमिका चालू होती. अमेरिकच्याच २३ वर्षीय मायकेल फेल्प्सने ७ नवीन उच्चांक प्रस्थापित करीत या स्पर्धेत ८ सुवर्णपदके जिंकून हा विक्रम मोडून नवा विक्रम प्रस्थापित केला. त्याने गेल्या अथेन्सच्या स्पर्धेत ६ सुवर्णपदके व २ कांस्यपदकांची कमाई केली होती. त्यामुळे त्याची सुवर्णपदकांची एकूण संख्या १४ झाली आहे.

अगदी किरकोळ छोट्याशा देशातही सुवर्णपदक विजेते अनेक आहे. एवढ्या प्रचंड लोकसंख्येच्या भारत देशात एक सुवर्णपदक मिळवण्याचे एवढे अप्रूप का असावे?

बिंद्रावरील पारितोषकांच्या वर्षावामुळे कदाचित, यापुढील खेळात आणखी एखादे सुवर्णपदक जिंकणाराही भारतीय निघण्याची शक्यता आहे. क्रिकेट खेळामध्ये पैसा खेळू लागला तशी काही खेळाडूंच्या कामगिरीत चांगल्यापैकी सुधारणा दिसून आली त्याचप्रमाणे.

एरवी २१ वे शतक चीन आणि भारत या दोन देशांचे आहे असे दिवसरात्र ओरडून सांगणाऱ्या मंडळींना चीन अमेरिकेशी स्पर्धा करीत सुवर्णपदके मिळवतो आणि भारताला एकाच सुवर्णपदकावर समाधान मानावे लागते याची खंत वाटत नाही. भारतीय तसे समाधान मानतात. कोणत्याही क्षेत्रात तेजस्वीपणे आणि आक्रमकतेने जग पादाक्रांत करण्याची प्रवृत्ती भारतीयांना फारशी सोसत नाही असे दिसते.

इतिहासकाळात राजपूत वीरांची सारी मर्दुमकी परकीयांचा हल्ला झाला, आता तो हल्ला परतवण्याची काहीही शक्यता नाही असे स्पष्ट झाल्यानंतर सर्व स्त्रियांना जोहारासाठी पाठवून देऊन त्यानंतर 'जय एकलिंग जी' अशा घोषात शत्रूवर तुटून पडून अतुल पराक्रम दाखवणे इतपतच मर्यादित होती. असे प्रसंग सर्व इतिहासात भरून राहिले आहेत. या शौर्याचा उपयोग दिल्लीश्वरांवर स्वारी करण्यापर्यंत कधी फारसा पोहोचला नाही. विजिगिषुपणाच्या या अभावाला सामाजिक, आर्थिक आणि इतरही कारणे असतील. कदाचित, या सर्व कारणांचा एकत्रित परिणाम म्हणून भारतीयांच्या मनात मरण स्वीकारून हौतात्म्याची तयारी होते, पण 'मारू आणि जिंकू' अशी आक्रमकता भारतीयांना पेलत नाही, पचत नाही; किंबहुना, अशी आक्रमकता ही अनैतिक आहे अशी सर्वदूर भावना या भारतात पसरली आहे.

ढक्रकेटच्या खेळातसुद्धा जागतिक विक्रम करणारे वीर भारतात अनेक झाले; पण, भारतीय संघाची सगळ्यात चांगली कामगिरी अनेक वेळा 'फॉलो ऑन' मिळाल्यानंतर डावाचा पराभव वाचवण्याकरिता दिसून आली आहे. या उलट, श्रीलंकेसारख्या छोट्या देशानेसुद्धा अलीकडच्या कसोटी सामन्यांत भारतातील रथीमहारथी खेळाडूंची कशी त्रेधातिरपीट करून टाकली हे सर्वांनी पाहिले आहे.

अगदी अलीकडे, बंगलोर आणि अहमदाबाद शहरात आतंकवाद्यांनी लागोपाठ बॉम्बस्फोट घडवले. अहमदाबादमध्ये पन्नासावर माणसे मेली, शंभरावर जखमी झाली. ज्या कुटुंबांतील माणसे गेली, अपंग झाली त्या कुटुंबातील लोकांना प्रचंड संताप येऊन अंगाची लाहीलाही झाली असेल; पण, ती चीड आणि संताप क्षणभरच टिकला. गुजरातमध्ये भेट देण्यासाठी केंद्रीय गृहमंत्री आले, स्वतः प्रधानमंत्री आले. त्यांनी गुजराथी जनतेची पाठ थोपटली आणि आतंकवाद्यांच्या प्रक्षोभक कृत्यांनंतरही मनाची शांती ढळू न देता संयम ठेवल्याबद्दल प्रशंसा केली. गुजरातचे मुख्यमंत्री स्वतः नरेंद्र मोदी यांनीही अशीच शाबासकी दिली. आपल्या घरची माणसे मारली गेली तर त्याबद्दल दुःख ठीक आहे; पण, संताप

येऊ देणे ही काही फारशी चांगली गोष्ट नाही हे आता सर्वमान्य झाले आहे. आतंकवादी कोण आहेत, त्यांचे करविते कोण आहेत हे सर्वांना माहीत आहे. हे सारे कोठे रहातात, कोठे लपतात, स्फोटके कोठे जमवतात हेही सर्वांना माहीत आहे; पण, त्याबद्दल बोलणे सभ्यतेचे मानले जात नाही. पोलिसांच्या चौकशीत एखाद्या संशयितावर पोलिसांनी काही बळाचा वापर केला तर पोलिसांचा निषेध करण्याकरिता छॠज (गैरसरकारी स्वयंसेवी संस्थां) चे मोठे जाळे तयार झाले आहे. आतंकवाद्यांच्या कृत्यांना बळी पडलेल्या निरपराध नागरिकांकरिता आसवांची दोन टिपे गाळणारेसुद्धा दुर्मिळ. आतंकवाद्यांच्या मानवी हक्कांची जपणूक झाली पाहिजे, याबद्दल आग्रह धरणाऱ्या संस्था अनेक आहेत; पण, प्रस्थापित शासनाविरुद्ध हत्यार घेऊन उठणाऱ्या आतंकवाद्यांना जास्तीत जास्त युद्धकैदी म्हणूनच वागणूक दिली जाऊ शकते असे छातीठोकपणे म्हणण्याची कोणी हिम्मत करीत नाही. आतंकवाद्यांमार्फत त्यांचे करविते धनी भारतावर अप्रत्यक्ष युद्ध (ईर्देबें) चालवीत आहेत असे अनेकांनी म्हटले, तर त्याचे तर्कशुद्ध उत्तर द्यायला कोणी धजावत नाही. भारतीयांतील तेजस्विता कोठे गेली? प्रतिकार न करता मार खाऊन घेऊन आत्मपीडनातच महात्मेपण मानण्याची ही प्रवृत्ती का बळावली? या पलीकडे जाऊन, आपला छळ करणाऱ्यासमोरच नाकदुऱ्या काढाव्या, त्याचेच कौतुक करावे हे का घडते आहे?

ही लाचारीची मनोवृत्ती इतरत्र कोठे दिसत नाही असे नाही. विमानांच्या अपहरणातून सुखरूप वाचलेले प्रवासी अपहरणाच्या काळात अपहरणकर्त्यांनी त्यांना कसे धाकात ठेवले आणि प्रवाशांपैकी काहींना कसे मारुन टाकले याचाही विसर पडून, बाहेर आल्यावर आतंकवादी व्यक्तिशः किती भली माणसे होती, ज्यांनी काही प्रतिकार केला नाही त्या सगळ्या प्रवाशांना त्यांनी किती चांगले वागवले याचे गुणगान गातात; पण, भारताच्या या साऱ्या राष्ट्राचे अपहरण कधी झाले, कसे झाले, अपहरणकर्ते कोण होते आणि साऱ्या देशाला पक्षाघात घडवणारा हा षंढपणा सर्व भारतीयांना कसा काय ग्रासू शकला?

नागरिकांनी आतंकवाद्यांबद्दलची आपली चीड दाखवण्याकरता सूडबुद्धीने काही करू नये असे राज्यकर्ते बजावून सांगतात ते समजण्यासारखे आहे. राज्यकर्ते व पोलीस अधिकारी यांच्या मनात अशा घटनांच्या वेळी एकच विचार असतो – प्रथम सारे शांत शांत होऊ द्या, मग बाकीच्या साऱ्या गोष्टींचा विचार करता येईल. ज्या राज्यकर्त्यांनी इंदिरा गांधींच्या वधानंतर दिल्ली शहरभर शिखांचे शिरकाण घडवून आणले, एवढेच नव्हे तर त्यावर, 'एखादा मोठा वृक्ष कोसळला,

तर धरणी हादरायचीच' असे समर्थन केले त्यांच्याच पक्षाची मंडळी आता 'चिडू नका, रागवू नका, आहे ते सोसून घ्या' असा उपदेश करतात आणि हाच या देशातील सभ्याचार आहे, शिष्टाचार आहे असे स्वीकारून लोकही पुढच्या आतंकवादी घटनांची वाट पहात बसून रहातात; पण, निवडून गेलेल्या सरकारला आणि त्यातील जबाबदारी व्यक्तींना अशी भूमिका घेता येणार नाही. लोक शांत राहिले, त्यांनी नागरिकांचे कर्तव्य बजावले; पण, यानंतर जबाबदारी चालू होते ती शासनाची. दोषी लोकांना शोधून काढणे, त्यांना मदत, आसरा आणि शस्त्रपुरवठा करणारांनाही वेचून काढून, त्यांना प्रस्थापित कायद्याप्रमाणे तत्परतेने शिक्षा देणे ही सरकारची जबाबदारी आहे. षंढपणा अंगी बाणवणारा पक्षाघात सर्वसामान्य भारतीयांनाच झाला आहे असे नाही तर त्यांच्या शासनालाही झाला आहे.

शासनकर्त्यांनी दयाळू असावे, कष्टाळू असावे अशा बुद्धीचे सम्राट अशोकाचे भूत भारतीय शासकांच्या डोक्यावर बसते. कोणाही पंतप्रधानाची आपल्या एका निर्णयामुळे कोणालाही धक्का पोहोचू नये, कोणाचाही जीव जाऊ नये अशी आत्यंतिक इच्छा असते. आतंकवाद्यांपुढे शरणागती पत्करल्यामुळे ते अधिक शेफारतात. आतंकवादाला सर्वंकष विरोध झाला पाहिजे ही गोष्ट नुसती बोलायची. राज्यकर्त्यांना जो कठोरपणा अपरिहार्यपणे दाखवावा लागतो तो दाखविण्याची हिम्मत असलेले राज्यकर्ते स्वातंत्र्यानंतर देशाला मिळालेच नाहीत.

''गांधी आणि त्यांचे अनुयायी ही सारी काड्यामोड्याची माणसे आहेत, त्यांना देशावर शासन करणे जमणार नाही'' ही चर्चिलची भविष्यवाणी खरी ठरली. कोणताही कठोर निर्णय घेण्याची वेळ आली की ऐनवेळी कच खाणे याला इंग्रजीत 'पिवळेपणा' असा शब्द आहे. मराठीतला शब्दमात्र अर्वाच्य आहे. गांधींच्या स्वातंत्र्यआंदोलनातून तयार झालेले सर्व नेतृत्व पिवळे निघाले. गांधीजींनी भ्याडपणाला अहिंसेचा मुलामा कधी दिला नाही; पण, त्यांचे सारे शिष्य आपला भ्याडपणाच अहिंसा शब्दाच्या आड लपवून राहिले आहे.

मुफ्ती सईद यांच्या मुलीचे आतंकवाद्यांनी अपहरण केले त्या वेळी मी विश्वनाथ प्रताप सिंगांच्या जवळ होतो. त्यांनी माझे मत विचारल्यानंतर मी स्पष्टपणे आतंकवाद्यांची मागणी फेटाळून लावण्याचा सल्ला दिला होता. विश्वनाथ प्रताप सिंग हा भारतातील सर्वाधिक लेचापेचा पंतप्रधान. त्यांना ते झेपले नाही. आतंकवाद्यांची भूक वाढली.

कंदाहार विमान अपहरण प्रकरणाच्या वेळीसुद्धा जे व्हायचे असेल ते होऊ द्या, आम्ही आतंकवाद्यांच्या मागण्या मान्य करणार नाही अशी भूमिका अटल

बिहारी वाजपेयी यांच्या शासनालासुद्धा घेण्याची हिम्मत झाली नाही. भाजपाची मंडळी नेहमी उत्तुंग ध्येयवादाच्या गप्पा ठोकतात, पण ऐनवेळी त्यांनीही कच खाल्ली. त्याची किंमत त्यांना २००४च्या निवडणुकीत मोजावी लागली. खरे म्हटले तर, 'तेजस्वी भारत' ही घोषणा मोठी क्रांतीकारी होती. त्याचे इंग्रजी भाषांतर कोणा गळबटाने केले. 'खपवळर डहळपळपस' याचा अर्थ 'वरवर चमकणारा भारत' किंवा 'चकाकणारा भारत' असा होतो; 'तेजस्वी भारत' असा नाही. निवडणुकीच्या वेळी भारताला एकदम जागतिक महासत्ता बनवण्याचे आश्वासन लोकांना पटले नाही. कंदाहारच्या विमान अपहरणप्रकरणी भाजपाच्या नेतृत्वाखालील रालोआ सरकारने कच खाल्ली नसती आणि खुद्द सुरक्षामंत्र्यांनाच आतंकवाद्यांपुढे नाकदुऱ्या काढायला पाठवले नसते तर मतदारांना 'तेजस्वी भारत' ही घोषणा भावली असती. कथनी आणि करणी यातील हा फरक राष्ट्रीय लोकशाही आघाडीला भोवला.

खेळाचे मैदान असो का दैनंदिन नागरी जीवन असो, भारतीय समाजाला षंढपणाने ग्रासले आहे. त्यांचे नेतृत्वही पिवळ्यांच्या हाती गेले आहे हे ऐतिहासिक सत्य आहे. सर्व भारतखंड ही एक शापित भूमी आहे, ग्रीक परंपरेतील 'उेपींळपशपीं ेष उळील' प्रमाणे या भूमीला जो जो स्पर्श करतो त्याचे वीरत्व संपते हा सिद्धांत एका प्रख्यात बंगाली विचारवंताने यापूर्वीच मांडला आहे. येथे आर्य आले, निस्तेज झाले. मुसलमानी आक्रमणाचा वेगही येथेच संथावला. साम्राज्यशाहीसुद्धा येथे नबळ झाली.

'जनता वीर्यहीन आणि नेतृत्व पिवळे' या निष्कर्षात एक मोठा विचित्र भाग आहे. पराक्रमहीन लोक आपल्यापेक्षा कमजोर कोणी दिसला तर त्याच्यापुढे शौर्य गाजवण्यात धन्यता मानतात. भारतीय समाजाचे असेच आहे. शंभरेक माणसे विमानात नष्ट होतील म्हणून आतंकवद्यांपुढे शेपूट घालणारे, खुद्द भारतीय संसदेवर हल्ला करणाऱ्या अफजल गुरूला फाशी देण्यची हिम्मत न करणारे शासन पंधरा वर्षांत दीड लाखावर शेतकरी दारिद्र्यामुळे, कर्जबाजारीपणामुळे हताश होऊन आत्महत्या करतात तरी शेतकऱ्यांना जीव देण्यास भाग पाडणारीच धोरणे क्रूरपणे अमलात आणणारे सरकार इतक्या आत्महत्या झाल्यानंतरही अजून शेतीमालाचे भाव पाडण्याचेच कारस्थान पुढे चालवते. याचा अर्थ असा की, संयमाबद्दल गुजराथी जनतेची पाठ थोपटणारे डॉ. मनमोहन सिंग यांचा संयम सशक्तापुढे नमण्याचा आणि दुबळ्यांवर लाथा झाडण्याच्या मानसिकतेचा आहे. 'वरच्या लत्ता झेलित माथां, सवे झाडिती खाली लाथा' अशांना कवीने 'न

ती निवारी, न ही आवरी बेशरमी हैवान' अशी बिरुदावली देऊनच ठेवली आहे.

एकेकाळच्या तेजस्वी भारतात हे षंढत्व कोठून आले? इतिहासाचार्य राजवाडे यांच्या शब्दात, 'अन्न सौलभ्य आणि अन्न सौकर्य' यांचा त्यात भाग किती? हे षंढत्व आणण्यात बौद्ध मताची भूमिका केवढी महत्त्वाची? अध्यात्मवादी संतपरंपरेने देशावर ही मरगळ आणली काय? भारतीयांच्या खाण्यापिण्याच्या सवयींचा या घसरगुंडीत भाग केवढा? या सगळ्या प्रश्नांची उत्तरे विश्लेषण करून द्यावी लागतील. त्याहीपलीकडे जाऊन पुन्हा एकदा भारत 'पराजित' रहाण्यापेक्षा 'आक्रमक' झालेला जास्त चांगला असा आणि राष्ट्राच्या पुनरुत्थानासाठी तेजस्वितेचा विचार या षंढ समाजात रूजू शकेल काय, रुजवायचा झाला तर तो कसा याचाही विचार आवश्यक आहे.

*(२१ ऑगस्ट २००८)*

◆◆

# आतंकवाद्यांचे भारतावर उपकार

तीन दिवस ५९ तास. फक्त १० आतंकवादी मुंबईत घुसले आणि सगळ्या भारताच्या ताकदीला त्यांनी जबरदस्त आव्हान दिले. या धक्क्यातून देश अजून सावरलेला नाही. आजच (३० नोव्हेंबर २००८) पंतप्रधानांनी सर्व राजकीय पक्षांची एक बैठक दिल्लीत बोलावली आहे. आज हा लेख लिहिताना मी स्वतः पुष्कळसा सावरलो आहे. २६ नोव्हेंबरपासून आतंकवाद्यांची पुढची पायरी काय असले, त्याचा धक्का आपल्याला पोहोचेल काय या भीतीने सारे भारतीय नागरिक वागले आणि जगले; मीही त्यातलाच एक.

मोठे अरिष्ट टळले असे दिसते. १० पैकी ९ आतंकवादी ठार झाले. जवळपास २०० नागरिक आणि सुरक्षाकर्मी शहीद झाले. ३००वर लोक जखमी झाले. एकट्या ताजमहाल हॉटेलचेच नुकसान ५०० कोटी रुपयांच्या वर गेले आहे असे म्हटले जाते.

या सगळ्या धक्क्यातून काहीसा सावरून मी, गेल्या तीन दिवसांत काय घडले त्याचा विचार करतो आहे. ८-१० नोव्हेंबर च्या औरंगाबाद अधिवेशनाचे एक महत्त्वाचे सूत्र होते - प्रत्येक संकट एक संधी समोर आणते.

गेल्या तीन दिवसांत मूठभर आतंकवाद्यांनी साऱ्या भारतीय व्यवस्था आणि समाज उघडा-नागडा करून दाखवला आहे. योग्य वेळी या आतंकवाद्यांचे आभार मानण्याची वेळ येईल - अर्थात, या सगळ्या घटनेतून योग्य निष्कर्ष काढले आणि आवश्यक त्या सुधारणा केल्या तरच.

भारतीय शासन आणि प्रजाजन या दोघांमध्येही, जे काही झाले त्याच्या प्रकाशात कठोर आत्मपरीक्षण करण्याची शक्ती नाही आणि आवश्यक ती पावले उचलण्याची इच्छाही नाही. साऱ्या समाजाला पक्षघाताचा झटका आला आहे. आणि त्याबरोबर विवेकक्रियाही सुस्तावली आहे.

हल्ला मुंबईवर झाला. सगळ्या देशावर भयानक घातक परिणाम घडवून आणण्याची आतंकवाद्यांची इच्छा असती तर त्यांनी समुद्रमार्गाने तुर्भे आणि तारापूर येथे हल्ला केला असता, छत्रपती शिवाजी टर्मिनस आणि मुंबई सेंट्रल टर्मिनस ताब्यात ठेवले असते. तुर्भे तारापूर उद्ध्वस्त करून आणि दोन रेल्वे स्थानकांचा ताबा मिळवून त्यांना देशाच्या आर्थिक आणि राजकीय ताकदीवर अधिक गंभीर परिणाम घडवून आणता आले असते. त्यांच्या हल्ल्यांचा मुख्य रोख दोन पंचतारांकित हॉटेलांवर होता. या हॉटेलात काही भारतीय अतिविशिष्ट व्यक्ती उतरतात; याही वेळी एनडीडीबीच्या अमृता पटेल आणि खासदार गायकवाड तेथे उतरलेले होते; पण नेहमीच्या तुलनेत परदेशी प्रवाशांचा हंगाम असूनही त्यांची संख्या त्या मानाने कमी होती. हल्लेखोरांना याचा अंदाज नव्हता असे कसे म्हणावे?

उपलब्ध माहितीनुसार, हल्लेखोरांचे साथीदार बराच काळ आधी या हॉटेलात पाहुणे म्हणून उतरले होते, काहीनी तर हॉटेलांच्या नोकरवर्गात दाखल होऊन तेथील खडान् खडा माहिति हस्तगत केली होती.

हल्लेखोर सर्व सामुग्री पाठीवरच्या आणि हातातल्या पिशव्यांत भरून घेऊन आले होते. तेवढ्या सामुग्रीवर त्यांना ६० तास झुंज देता आली नसती. त्या अर्थी २६ नोव्हेंबरच्या आधीपासूनच नरीमन हाऊस, ताज महाल आणि ओबेरॉय हॉटेल येथे त्यांनी दारूगोळयाचा साठा जमा करून ठेवला असावा हे उघड आहे. कुलाब्यातील लिओपोल्ड हॉटेलमध्ये किंवा त्याच्या आसपास त्यांचे दारूगोळयाचे भांडार असावे, अन्यथा सगळी ठिकाणे सोडून या हॉटेलवरच हल्ला करण्याचे आतंकवाद्यांना काही कारण होते असे दिसत नाही.

आतंकवादी भारताविरुद्ध काही मोठे कारस्थान रचीत आहेत, त्यांचा रोख मुंबईवर दिसतो, एवढेच नव्हे तर हल्ला ताज महाल आणि ओबेरॉय या हॉटेलांवर होणार आहे अशी माहिती सर्व संबंधित अधिकारी आणि सुरक्षा दले यांना मिळाली होती हे आता उघड झाले आहे. ते समुद्रमार्गाने येणार आहेत याचीही खबर होती. समुद्रमार्गाच्या प्रवासात बांगलादेशी खलाश्यांची मोठी कामगिरी राहणार आहे. या समाजाची दाट वस्ती मुंबईच्या साऱ्या समुद्रकिनाऱ्याने झाली आहे, हे सगळे माहीत असताना मुंबई इतकी बेसावध कशी पकडली गेली? संताजी घोरपडे आणि धनाजी जाधव यांनी औरंगजेबाच्या लष्करी तळावर हल्ला करून औरंगजेबाच्या तंबूचे सोनेरी कळस काढून आणले एवढा एकच समांतर प्रसंग इतिहासात दिसून येतो.

छत्रपती शिवाजी टर्मिनस, कामा हॉस्पिटल येथे हल्ला सुरू झाला त्यानंतर चार तासापर्यंत मुंबईतील सुरक्षा दले आणि अलिबाग मुक्कामी असलेले संरक्षण दल यांना कामगिरीसाठी जाण्याचे आदेश मिळाले नाहीत. आदेश देणारे अधिकारी त्यांच्या संध्याकाळच्या 'कार्यक्रमांत' व्यस्त असावेत किंवा पूर्वनियोजित कारस्थानाप्रमाणे त्यांनीच सुरक्षादलांना थोपवून ठेवून हल्लेखोरांना बस्तान बसवायला मुभा दिली असावी. असा संशय कोणाच्या मनी आला तर त्यात वावगे काय असेल?

राज्यशास्त्राचा सिद्धांत सांगतो की, शासन हा नागरिक आणि सरकार यातील एक करार असतो. या कराराने नागरिक आपला हत्यारे बाळगण्याचा हक्क सोडून देतो आणि त्या बदल्यात शासन त्यांच्या जीविताच्या व मालमत्तेच्या सुरक्षेची जबाबदारी घेते. राज्यशास्त्रातील तितकाच महत्त्वाचा आणखी एक सिद्धांत आहे. शासनकर्त्यांचा अधिकार त्यांना सत्ता कोणत्या मार्गाने प्राप्त होते त्यावर आणि त्या प्रमाणात ठरतो. हत्याराच्या आधारे नागरी किंवा लष्करी क्रांती घडवून आणून सत्तेवर आलेल्या शासनाच्या अधिकारास काहीच धरबंध नसतो. माओ-त्से-तुंग ने म्हटल्याप्रमाणेच त्यांची सत्ता बंदुकीच्या नळीतून आलेली असते.

मग, मतपेट्यांतून आलेल्या सरकारांचे अधिकार कोणते, कर्तव्ये कोणती आणि त्यांच्या मर्यादा काय? प्रत्येक मतदाराला समान मतांचा अधिकार दिला तर निवडून येणाऱ्या सरकारचा अधिकार काय असेल? इंग्रजांच्या काळात मतदानाचा हक्क काही किमान मिळकत, मालमत्ता किंवा शिक्षण असलेल्या मतदारांपुरताच मर्यादित होता. मतांचा अधिकार हा आयकराच्या किंवा संपत्तीकराच्या प्रमाणात ठरवला तर निवडणुकांच्या निकालांचा अर्थ वेगळाच होईल. वयात आलेल्या प्रत्येक नागरिकास सारखेच म्हणजे एकच मत अशी निवडणुकीची पद्धत असेल तर निवडून येणाऱ्या उमेदवाराचा आणि शासनाचा अधिकार ज्या क्षेत्रात सर्व नागरिक समान आहेत तेवढ्यापुरताच मर्यादित राहील. अशी क्षेत्रे कोणती? सर्वांनाच आपला जीव प्यारा असतो, त्याचे रक्षण व्हावे, आपल्या मालमत्तेचे संरक्षण व्हावे व ते शासनाने करावे अशी सर्वांचीच धारणा असते. शेजाऱ्याने किंवा दुसऱ्या नागरिकाने काही खोडी काढली, खोटेपणा केला तर त्याचा न्यायनिवाडाही सरकारकडून झाला पाहिजे ही प्रत्येकाची इच्छा असते. हा न्यायनिवाडा विना दिरंगाईने व्हावा आणि निःपक्षपातीपणाने व्हावा असे प्रत्येकाला वाटते. परदेशी शत्रूचा देशावर हल्ला झाला तर युद्धकाळातही

जानमालाचे संरक्षण व्हावे अशी सगळ्या नागरिकांची सारखीच अपेक्षा असते. थोडक्यात, कायदा व सुव्यवस्था, न्याय आणि सुरक्षा एवढ्याच क्षेत्रात सर्व नागरिक समान असतात. 'दरडोई एकमत' पद्धतीच्या निवडणुकीत निवडून आलेल्या शासनाने आपला कारभार एवढ्याच क्षेत्रांपुरता मर्यादित ठेवला पाहिजे, आपल्याला मिळालेला जनादेश तेवढ्यापुरताच मर्यादित आहे हे स्वीकारले पाहिजे.

याउलट, 'दरडोई एकमत' पद्धतीने निवडून आलेल्या शासनाने शिक्षणाची व्यवस्था काय असावी, विद्यापीठे कोठे असावीत, शिक्षणक्रम काय असावेत, प्राध्यापकांचे वेतन काय असावे अशा विषयांत ढवळाढवळ सुरू केली तर अनाचार माजणारच.

अर्थकारणात तसेच शिक्षणक्षेत्रात मागास असणाऱ्यांना समान पातळीवर आणण्याच्या हेतूने का होईना, आरक्षणासारखे अधिकार घेण्याचा जनादेश त्यांना मिळालेला नसतो. असा जनादेश आहे असे दाखविणारे राजकारणी फक्त उदंरभरणाचेच काम करतात.

'गरिबी हटवा'च्या अनेक घोषणा झाल्या, शेकडो कार्यक्रम झाले; पण गरिबांना खरीखुरी मदत पोहोचली ती गुरुद्वारातल्या लंगरसारख्या संस्थांची, सरकारची नाही;

दु:खितांना खरीखुरी मदत पोहोचली ती रामकृष्ण मिशन किंवा मदर तेरेसासारख्या, खऱ्याखुऱ्या करुणेने प्रेरणा मिळालेल्या संस्थांची, सरकारची नाही.

'कायदा आणि सुव्यवस्था, न्याय एवढेच सरकारचे काम असावे; अर्थकारण, शिक्षण, समाजसुधारणा, करुणा ही शासनाची कामे नव्हेत.' हा स्वतंत्र भारत पक्षाचा मूलभूत सिद्धांत आहे. सरकार असावे, मजबूत असावे, प्रसंगी आवश्यक तर धाक वाटण्याइतके कठोरही असावे पण ते त्याच्या कार्यक्षेत्रांत. इतर सर्व क्षेत्रांतून शासन हटावे हा स्वभापचा कार्यक्रम आहे. शासनाने त्याच्या निहित वैध क्षेत्रात कामगिरी करून दाखवली, नागरिकांना सुरक्षितपणे जगता येऊ लागले, घराबाहेर पडलेले माणूस, संध्याकाळी घरी परत येण्याबद्दल धाकधूक वाटेनाशी झाली, शेजारी राष्ट्रांना आपल्या देशाकडे वाकडी नजर करून पाहण्याची हिंमत होईनाशी झाली म्हणजे पुरे.

राज्यशास्त्रातील हा नियम न पाळल्यामुळे आणि प्रत्येक मतदारसंघात त्यातल्या त्यात जास्त मते मिळालेला उमेदवार विजयी ठरविण्याच्या पद्धतीमुळे मोठी

दुरवस्था माजली आहे.

'दर डोई एकमत' या पद्धतीच्या निवडणुकीत निवडून येण्यासाठी निम्म्या मतदारांचाही पाठिंबा असण्याची आवश्यकता नाही. दोनचार अल्पसंख्याक जमातींची एकगठ्ठा मते मिळविण्याची व्यवस्था करता आली, त्या जमातींच्या वस्तीतील दादांना विकत घेण्याइतका पैसा भ्रष्टाचार, काळाबाजार, अगदी खूनदरोडेसुद्धा अशा मार्गाने मिळवला की वर्षानुवर्षे पुढारी निवडून येतात आणि सरकारचे मूळ काम सोडून बाकी सगळ्या कामात लुडबुड करतात. अलीकडे कायदा आणि सुव्यवस्था यंत्रणाही भक्कम भ्रष्टाचारी बनली आहे. खात्यांतील नेमणुकांपासून ते गुन्हेगारांच्या सोडवणुकीपर्यंत काळा पैसा कमावता येतो; पण, बांधकामाची कंत्राटे, कारखानदारीचे व आयात-निर्यातीचे परवाने इत्यादींत होणाऱ्या मिळकतीच्या तुलनेने हे उत्पन्न किरकोळ असते.

इंग्रजांनी आपले राज्य स्थापन केल्याबरोबर पहिले काम केले ते ठग आणि पेंढारी यांच्या बंदोबस्ताचे. काठीच्या टोकाला सोने बांधून बिनधास्त काशीयात्रेला जावे अशी सुव्यवस्था झाल्यानंतर इंग्रजांनी हळूहळू शाळा, इस्पितळे, रस्ते, टपाल, रेल्वे इत्यादी व्यवस्था आणावयास सुरुवात केली.

याउलट, स्वातंत्र्यानंतर समाजवादाच्या झेंड्याखाली शासनाला घाई झाली ती उद्योगधंदे वाढवण्याची. उद्योगधंदे, व्यापार यांची लायसन्स-परमिट व्यवस्था पुढाऱ्यांना खूपच सोयीस्कर झाली. त्यातून काळाबाजारवाले, तस्कर, घरे-जमिनी खाली करून देणारे गुंडभाई यांची सर्वदूर उपज झाली आणि सर्व सुव्यवस्था ढासळली. स्वतंत्र भारताच्या शासनाने असा उलटा कार्यक्रम आखल्यामुळे आर्थिक प्रगतीही झाली नाही आणि सगळीकडे अंदाधुंदी मात्र माजली.

अशा उलट्या सरकारी व्यवस्थेचा सैद्धांतिक शेवट १९९१ साली सध्याचे पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांच्या पुढाकारानेच झाला. अकार्यक्षम आणि तोट्यात चालणाऱ्या सरकारी संस्था आणि उपक्रम यांचे खासगीकरण किंवा निर्गुंतवणूक होऊ लागली; पण, १९९१ सालापासून आतापर्यंत अगदी आत्यंतिक उदारमतवादीसुद्धा 'शासन कायदा आणि सुव्यवस्थेच्या क्षेत्रातही अपयशी आणि अकार्यक्षम ठरले आहे, या क्षेत्रातही सर्वंकष खासगीकरण आणावे' असे मत मांडीत नाही.

मुंबईत ५९ तास धुमाकूळ घालणाऱ्या आतंकवाद्यांनी सरकारी सुरक्षा व्यवस्थेबद्दलच एक मोठे प्रश्नचिन्ह उभे केले आहे. मुंबईतील ५९ तासांचा इतिहास हा केवळ सरकारी व्यवस्थेच्या अजागळपणामुळे होऊ शकला हे

आपण वर पाहिले आहे. सर्वसमावेशकतेचा आव आणणाऱ्या आणि निर्धार्मिकतेच्या मुखवट्याखाली अल्पसंख्याकवादाला खतपाणी घालणाऱ्या शासनाला कायदा आणि सुव्यवस्था सांभाळणे शक्य होणार नाही हे मुंबईला ५९ तास वेठीस धरलेल्या फक्त १० आतंकवाद्यांनी सिद्ध करून दाखवले आहे. दक्षिण मुंबईतील काही मोजक्या ठिकाणात थरारक नाट्य घडले. ते संपवण्यात राष्ट्रीय सुरक्षा दल, पोलिस आणि अग्निशामकदल यांना यशही आले. त्यामुळे, आता हा प्रश्न निकाली निघाला असे कोणी समजेल तर त्याची झोप थोड्याच दिवसात खाडकन उघडेल.

आतंकवाद्यांचे कृत्य मोठे बहादुरीचे काम आहे असे मनोमन मानणारा समाज मुंबईतच नव्हे तर महाराष्ट्रभर आणि देशभरही सर्वत्र फैलावला आहे. भारत-पाकिस्तान क्रिकेट सामन्यांच्या वेळी भारताची बाजू पडती झाली की हर्षोल्लासाच्या घोषणा देणारी प्रवृत्ती मुंबईत वस्त्यावस्त्यांत आहे. दुर्दैवाची गोष्ट ही की, ५९ तास थरारनाट्याचे चित्रण करणाऱ्या टी.व्ही. चॅनल्स्‌ना या वस्त्यांत जाऊन कुशलतेने खऱ्याखुऱ्या प्रतिक्रिया मिळविण्याची बुद्धी झाली नाही. सबंध ताज महाल हॉटेलची इमारत जमीनदोस्त होईल इतक्या शक्तीचे बाँब, दारूगोळा आणि तीन दिवस थकवा व झोप यांचा त्रास होऊ नये अशा प्रकारची खाद्यसामुग्री ही काही हल्लेखोरांनी कराचीहून आणली नव्हती.

शरीरावर कोठे फोड दिसला की त्याची जुजबी मलमपट्टी करणे अशा प्रकारचे सुरक्षा धोरण स्वातंत्र्यानंतर सर्व सरकारांनी राबवले आहे. या बुळया धोरणाचा अंत झाल्याची द्वाहीही गेल्या तीन दिवसांनी फिरवली आहे. 'आग रामेश्वरी आणि बंब सोमेश्वरी' असल्या धोरणाने आतंकवादाचा सामना करता येत नाही.

कालच्या (२९ नोव्हेंबर) वर्तमानपत्रांतून हा बदल झाल्याचे दाखवणाऱ्या काही घडामोडी दिसल्या. भारतीय क्रिकेट संघाचा पाकिस्तानचा दौरा रद्द करण्यात आला आहे. एका जबाबदार नेत्याने 'पाकिस्तानने आतंकवाद्यांचे प्रशिक्षण तळ उद्‌ध्वस्त करण्याचे आश्वासन न पाळल्यामुळे भारताला ती कामगिरी करावी लागेल' असे स्पष्ट म्हटले आहे. गेली पाच वर्षे भारत-पाकिस्तानमधील सुरू केलेल्या दळणवळण आणि संचारव्यवस्था बंद करण्याचे प्रस्तावही विचाराधीन आहेत. रेल्वे, विमानसेवा आणि संचार सवलती यांनी आतंकवाद्यांचेच काम सुलभ झाल्याचे दिसून आले.

साऱ्या मुंबईवर खरेखुरे राज्य चालते ते दाऊद इब्राहिमचे. बॉलिवूड एवढेच नव्हे तर शेअरबाजार त्याच्या इशाऱ्यावर चालतात हे सर्वांना माहीत आहे. तो

जगात कोठे रहात असेल ते राहो बापडा, पण त्याची शक्तिस्थळे मुंबईभरच्या विशिष्ट वस्त्यांत दूरवर पोसलेली आहेत हे सर्व पोलिसखाते जाणते.

मुंबईवर हल्ला झाला तसा इस्त्रायलमधील एखाद्या शहरावर झाला असता त्या चिमुकल्या देशाने काय सडेतोड उत्तर गेली पन्नास वर्षे दिले आहे ते उदाहरण गिरवणे भारताला शक्य नाही हे मी समजू शकतो; पण, देशातल्या देशात, मुंबईतल्या मुंबईत दाऊद इब्राहिमच्या शक्तिस्थळांवर हल्ला करणे फार दुरापास्त नाही.

सर्वसमावेशकतेची आणि सर्वधर्मसमभावाची नौटंकी दिल्ली शासनाला पक्षाघात झाल्याप्रमाणे लुळी पाडत आहे. सुरक्षा आणि सुव्यवस्था यांवर सरकारी मक्तेदारी नसती तर केवळ काही खुळचट कल्पनांपोटी खासगी सुरक्षादलांना दाऊद इब्राहिमच्या शक्तिस्थळांना नेस्तनाबूत करणे जड वाटले नसते.

केंद्र शासनाची आता रंगसफेदी चालू झाली आहे. शिवराज पाटील यांचा गृहमंत्रीपदाचा राजीनामा स्वीकारण्यात आला आहे. त्यांच्या जागी, श्रीलंकेतील आतंकवादी तामीळ वाघांबद्दल उघड सहानुभूती बाळगणाऱ्या विद्यमान वित्तमंत्र्यांची नेमणूक झाली आहे. त्याहूनही अद्‌भुत गोष्ट म्हणजे या सगळ्या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी पंतप्रधान मनमोहन सिंग यांनी पाकिस्तानची मदत मागितली आणि त्यासाठी पाकिस्तानी फौजेचे तसेच आयएसआयचे प्रमुख यांना हिंदुस्थानात पाठविण्याची विनंती पाकिस्तानच्या पंतप्रधानांना केली. थोडक्यात, आज (३० नोव्हेंबर) संध्याकाळच्या सर्वपक्षीय बैठकीत कितीही घोषणाबाजी झाली तरी फरक काहीच पडणार नाही. कायदा आणि सुव्यवस्था सरकार आपल्या हातातून सोडणार नाही. सत्ता हातात टिकवण्यासाठी वेगवेगळ्या समाजांचा अनुनय चालूच राहणार. एका मागोमाग एक एका विशिष्ट प्रकृतीचे लोकच घातपात घडवतात हे स्पष्ट झाले तरी त्यांना दुखवण्याची राजकीय क्षमता कोणातही राहणार नाही. थोडक्यात, आणखी महिन्याभरात सर्वांना मुंबईच्या थरारनाट्याचा विसर पडेल, मग पुन्हा एकदा असेच काही भयानक घडेल. शिवराज पाटलांच्या जागी पी. चिदंबरम काहीतरी लुळेपांगळे समर्थन करतील. हे असेच चक्र चालू राहील. जोपर्यंत देशातील प्रत्येक नागरिक खऱ्या अर्थाने स्वतंत्र होत नाही तोपर्यंत राष्ट्र तेजस्वी बनणार नाही. संपुआचे सरकार २००९ साली पुन्हा एकदा निवडून आले तर मी पूर्वी भाकीत केल्याप्रमाणे, सारा वायव्य भारत पाकिस्तानात जाईल आणि ईशान्य भारताला चीन गिळून टाकील. भारताविषयी काही प्रेम असलेले ज्यू समाजाप्रमाणे निर्वासित होऊन देशोधडीला लागतील.

हे टाळता येईल. शिवराज पाटील तसे सज्जन गृहस्थ आहेत. त्यांच्याशी बोलताना आपण नक्षलवाद्यांचा सामना करण्यात आणि मुसलमानी आतंकवादाला तोंड देण्यात अपुरे पडत आहोत याची खंत त्यांच्या अंतर्मनात वाटत असे अशी मला अनेकदा जाणीव झाली आहे. पाटील पक्षनिष्ठेने भारले आहेत. २००४ सालच्या निवडणुकीत रूपाताई निलंगेकरांसारख्या साध्या गृहिणीने त्यांचा पराभव करावा ही गोष्ट त्यांना खूप लागली होती. अश्याही परिस्थितीत सोनिया गांधींनी मेहेरबानी करून त्यांना राज्यसभेत घेतले, एवढेच नव्हे तर ज्या आसनावर सरदार वल्लभभाई पटेल, गोविंद वल्लभपंत अशा दिग्गजांचा स्पर्श झाला त्या जागेवर बसवले या विषयीच्या कृतज्ञतेपोटी ते सर्वसमावेशकता आणि भोंदू निर्धार्मिकता यांची नौटंकी इतकी मनापासून करतात की त्यांची स्वत:ची या पोकळ तत्त्वज्ञानाबद्दल खात्री पटली आहे.

अलीकडे मालेगाव प्रकरणात अटक झालेल्या साध्वी प्रज्ञासिंग, कर्नल पुरोहित इत्यादींची नार्को टेस्ट घेण्यात आली. शिवराज पाटील यांचीही नार्को टेस्ट घेतली तर कोणत्या मानसिकतेतून त्यांनी जाणूनबुजून नक्षलवाद्यांचा विस्तार वाढू दिला, धार्मिक आतंकवाद्यांचा कठोरपणे पाठपुरावा केला नाही आणि महाराष्ट्रातील अनेक नेत्यांचे दाऊद इब्राहिम याच्याशी खुल्लम् खुल्ला संबंध माहीत असतानाही त्या नेत्यांना अटक केली नाही हे साऱ्या जगापुढे येणे आवश्यक आहे. शिवराज पाटलांची नार्को टेस्ट केल्यास गेली पाच वर्षे दिल्लीतून चालवले जाणारे हे देशबुडवे कारस्थान उघडकीस येईल आणि कदाचित....

कदाचित, भारतीयांचे देशप्रेम जागृत होऊन लोकमान्य टिळकांच्या निर्वाणानंतर देशावर आलेले नेभळटपणाचे सावट दूर होईल.

*(३० डिसेंबर २००८)*

◆◆

# स्वतंत्रते भगवती

इंग्लंडमधून भारतातील शेतकरी आंदोलनाच्या आणि, विशेषतः शेतकरी संघटनेच्या इतिहासाचा अभ्यास करण्यासाठी रिचर्ड नावाचा एक विद्यार्थी हिंदुस्थानात आला आहे. गेला महिनाभर तो मला भेटायचा प्रयत्न करतो आहे आणि योगायोग असा की निवडणुकीतील प्रचाराच्या कामामुळे त्यांची माझी भेट प्रत्येक वेळी हुकत गेली. अखेरीस त्यांची इंग्लंडला परत जाण्याची वेळ आली आणि काल शेवटी टेलिफोनवरच काही प्रश्नोत्तरे करता आली. शेतकरी आंदोलनाच्या मागची प्रेरणा ही निर्बंधस्वातंत्र्याची आहे याचा सगळा इतिहास मी रिचर्ड यांच्यापुढे मांडला. शेवटी त्यांनी एक प्रश्न विचारला, ''अमेरिकेतील स्वतंत्रावादी (र्थ्र्ींिहे) आणि तुमच्या विचारात नेमका काय फरक आहे?''

मी जे उत्तर दिले ते निवडणुकीचे पडघम वाजत असताना फार महत्त्वाचे आहे :

''स्वातंत्र्य हे माझ्या दृष्टीने सर्वश्रेष्ठच नाही, एकमेव जीवनमूल्य आहे. सत्य, शिव, सुंदर किंवा समता, बंधुत्व ही सारी स्वातंत्र्याचीच रूपे आहेत. विचाराची शक्ती निसर्गाने फक्त 'व्यक्ती'ला दिली आहे. कोणत्याही 'समुदाया'ला नव्हे. त्यामुळे, प्रत्येक माणसाच्या व्यक्तिमत्त्वाच्या अभिव्यक्तीच्या आड येणाऱ्या सर्व सामाजिक, राजकीय, धार्मिक संस्था या निसर्गक्रमाच्या विरुद्ध जाणाऱ्या आहेत. त्रिकालाबाधित आणि सम्यक सत्य अगदी परमेश्वराचा अवतारसुद्धा सांगू शकत नाही. अनंत सत्याचा आविष्कार व्यक्तीव्यक्तीतील परस्पर संपर्क, सहकार्य आणि स्पर्धा यांतूनच होऊ शकतो. स्पर्धा हा स्वातंत्र्याचा आत्मा आहे. कोणत्याही देशाच्या व्यवस्थेत व्यक्तिमत्वाच्या परिपोषास जास्तीत जास्त वाव असला पाहिजे. आंतरराष्ट्रीय पातळीवरही हे खरे आहे. कोणत्याही एका देशाची सर्वंकष अधिसत्ता ही सर्व जगाच्या आणि प्रत्येक देशाच्या विकासास मारक

ठरते. प्रत्येक देशाने आपलेआपले व्यक्तिमत्त्व, संस्कृती, इतिहास आणि अर्थकारण जोपासावे. यासाठी राष्ट्र ही संकल्पना महत्त्वाची आहे. देशामध्ये व्यक्तीला आणि जगामध्ये इतिहास, भाषा, वंश आणि संस्कृती यांच्या आधाराने उभ्या राहिलेल्या राष्ट्रांना सर्वोपरी स्थान असले पाहिजे. व्यक्तिस्वातंत्र्याच्या माझ्या निष्ठेतूनच राष्ट्रप्रेम आणि राष्ट्रभक्ती यांचा उगम होतो.

"जन्माच्या अपघाताने लाभलेल्या धर्म, भाषा, वंश, जाति यांचा अभिमान बाळगणे हे क्षुद्रवादाचे लक्षण आहे. याउलट, आजच्या परिस्थितीत, 'राष्ट्र' या संकल्पनेला मोठे महत्त्व आहे.

"अमेरिकेतील स्वतंत्रावादी, आयन रॅण्डचा अपवाद सोडल्यास, राष्ट्रभावनेला महत्त्व देत नाहीत किंवा त्या भावनेचा उपहासच करतात. माझे असे नाही. क्षुद्रवादाच्या माझ्या व्याख्येला अपवाद करत मी 'राष्ट्र' या संकल्पनेचे महत्त्व मानतो. एका अद्‌भुत जैविक बांधणीमुळे व्यक्तीला अनुभूती घेण्याची आणि विचार करण्याची शक्ती मिळते. अशीच शक्ती राष्ट्र या बांधणीलाही असते अशी इतिहासाची साक्ष आहे.

"इतिहासामध्ये अनेक घडामोडी घडतात. सदासर्वकाळ राष्ट्रभावना सारखीच जाज्ज्वल्य राहिली असे नाही. व्यक्ती हे अनुभूतीचे आणि विचाराचे अनंतकालीन एकक आहे. माणसाने या शक्तीचा ईश्वरी ठेवा शाबूत ठेवण्यासाठी वेगवेगळे गट आणि संघटना तयार केल्या. जंगली माणसाच्या टोळ्या झाल्या, जातिव्यवस्थेची स्थापना झाली, धर्म, भाषा, वंश आणि भौगोलिक सलगता यांच्या आधाराने राष्ट्रे उभी राहिली. हजारो वर्षांच्या आक्रमणांच्या, लढायांच्या आणि साम्राज्यवादाच्या इतिहासाने राष्ट्रांच्या भौगोलिक नकाशांची वारंवार आखणी आणि फेरआखणी केली; जगातील आजचे सर्व महत्त्वाचे देश जुन्या काळच्या विविध संघराज्ये आहेत.

"आजच्या इतिहासात या संघराज्यांना जोडणारी महासंघराज्ये करण्याचाही कल आहे. याउलट, संघराज्यांचे विभाजन होऊन जास्त एकसंघ राष्ट्रे उभी रहाण्याचाही कल दिसतो. जगाची विभागणी आज राष्ट्रांत झाली आहे; उद्या ती, कदाचित, आंतरराष्ट्रीय कंपन्यांत होईल. एक गोष्ट निश्चित की, जागतिक व्यवस्थेत स्पर्धेत उतरणाऱ्या राष्ट्रसदृश संघटनांचा अनन्यसाधारण महत्त्व आहे."

रिचर्ड या विद्यार्थ्याला मी हा मुद्दा इतक्या तपशीलाने सांगितला कारण हे बोलताना भारतातील आजच्या परिस्थितीत या सर्व सिद्धांतांचे संदर्भ मला जाणवत होते.

योगायोगाची गोष्ट अशी की गेले काही आठवडे मी एका बाजूला निवडणुकांसंबंधी बातम्या ऐकतो आहे आणि बरोबरीने, दोन मोठी ऐतिहासिक महत्त्वाची पुस्तके वाचतो आहे. एक पुस्तक आहे सुभाषचंद्र बोस यांचे चरित्र 'महानायक' आणि दुसरे शहिद भगतसिंग यांचे चरित्र 'इन्कलाब'. निवडणुकांच्या या मोसमात अनुभूती आणि विचार यांच्या समानतेवर आधारलेल्या 'पक्ष' या संकल्पनेचेच विसर्जन झाले आहे. निवडणुकीतील लाभाच्या आशेने आणि हिशेबाने वेगवेगळ्या आघाड्या आणि युत्या बांधल्या जात आहेत. अनेक वर्ग आणि जाती सत्तेच्या खिरापतीत आपलाही हात असावा म्हणून असंभाव्य अशा क्षुद्रवादी मंचांची मोर्चेबंदी करीत आहेत. सगळा हिशेब आहे तो सत्तेच्या हव्यासाचा आणि राष्ट्रीय संपत्तीवर जास्तीत जास्त डल्ला मारण्याचा.

याच शतकात सुभाषचंद्र आणि भगतसिंग यांच्यासारखी लोकोत्तर माणसे होऊन गेली आणि त्यांनी राष्ट्रभक्तीच्या भावनेने लाखलाख लोकांना आपल्या प्राणांच्या आहुत्या देण्यास तयार केले. हे चित्र खरे की ते चित्र खरे असा मनात संभ्रम तयार होतो.

हा एवढा अध:पात झाला कसा?

हुतात्मा भगतसिंग यांनी फाशीच्या कोठीकडे जाता जाता आपले एक स्वप्न मांडले ते इतके विद्रूप कसे झाले?

महात्मा जोतिबा फुले यांनी देशाचे स्वातंत्र्य मिळवण्याची घाई करणाऱ्यांना स्पष्ट इशारा दिला होता. ''समाजाची 'गतशतकांची पापे घोरे' यांचे प्रक्षालन केल्याखेरीज इंग्रजांना हाकून लावण्याचाच धोशा लावला तर देशात पुन्हा एकदा 'पेशवाई' अवतरेल.'' जोतिबांना पडलेले हे दु:स्वप्न इतक्या भयानक पद्धतीने समोर येऊन कसे ठाकले?

हरियाणाचे शेतकरी नेते सर छोटूराम यांनी गांधीजींना असाच इशारा दिला होता. ''इंग्रजांनी देशात कायदा आणि सुव्यवस्था स्थापन केली आहे. विरोध करायचाच असेल तर ब्रिटिशांविरुद्ध दंड थोपटून पुढे व्हा. त्यांनी केलेल्या कायद्यांचा भंग सत्याग्रहाच्या नावाने करायची शिकवण लोकांना देऊ नका.'' सर छोटूराम यांचा दृष्टेपणा व्यर्थ का ठरला?

सर विन्स्टन चर्चिल या एकाच माणसाने स्वातंत्र्योत्तर भारताचे अचूक भाकित सांगितले. ''स्वातंत्र्याच्या आंदोलनातील गांधींचे सहकारी ही कचकड्याची बाहुली आहेत. यांच्यामागे काही आदर्शवाद नाही, प्रतिभा नाही, त्याग नाही. या असल्या नेत्यांच्या हाती देश गेला तर सर्वत्र बेबंदशाही माजेल, लोक एकमेकांच्या

उरावर बसतील. भारतातील गरिबांवर दया करा आणि या नंग्या फकिराच्या भुसकट सहकाऱ्यांच्या हाती सत्ता देऊ नका.'' चर्चिलचा कोणी राग करो, तिरस्कार करो; तो एक महान दृष्टा होतो हे कोणाला नाकारता येणार नाही.

प्रांताप्रांतांतील आदिवासी समाजांनी आणि भद्र समाजातील काही तरुणांनी सशस्त्र क्रांतीचे केलेले उठाव इंग्रजांनी निर्घृणपणे दडपून टाकले. परिणामी, इंग्रजी सत्ता आणि शासन यांच्याशी सशस्त्र संघर्ष करण्यासाठी आवश्यक ती बांधणी, साधनसंपत्ती त्याबरोबर विज्ञान आणि तंत्रज्ञान संपादन करणे या पिढीततरी शक्य होणार नाही अश्या निराशाग्रस्त भावनेने भारतीय जनतेने पर्याय शोधण्याचा प्रयत्न केला. सत्य आणि अहिंसा या शस्त्रांनी व्यापक जनजागृती घडवता येते याचे प्रत्यक्ष उदाहरण गांधीजींनी दक्षिण आफ्रिकेत दाखवून दिले होते. गांधी भारतात परतल्यावर सर्वच जहालपंथी निष्प्रभ झाले; स्वातंत्र्यलढ्याचे अनभिषिक्त नेतृत्व गांधींकडे आले.

'बिहारमध्ये भूकंप होऊन हजारो लोक मेले हा अस्पृश्यतेबद्दल मिळालेले प्रायश्चित्त आहे' असे अकटोविकट तर्कटही लोकांनी मुकाटपणे गिळले. चौरीचौरातील रणछोड नीतीचेही त्यांनी स्वागत केले. 'नौखालीतील हत्याकांड आपल्या व्यक्तिगत ब्रह्मचर्यातील कमजोरीमुळे झाले' हेही ऐकून घेतले. सुभाषचंद्र बोसांचा मोठ्या कारस्थानीपणाने केलेला तेजोभंग लोकांनी पाहिला. भगतसिंगांसारख्या हुतात्म्यांना 'वाट चुकलेले देशभक्त' असे नामाभिधान दिल्याचेही पाहिले. दक्षिण आफ्रिकेत बोअर युद्धातील इंग्रज सैन्यात भरती करण्यासाठी मोहीम चालवणारे गांधी महात्मा ठरले आणि दुसरे महायुद्ध ही इंग्रजांच्या विरोधात आवश्यक बांधणी, सामग्री, विज्ञान आणि तंत्रज्ञान संपादन करण्याची संधी आहे असा विचार मांडणाऱ्यांना देशद्रोही ठरवले गेले.

भारताला स्वातंत्र्य मिळाले याचे प्रमुख श्रेय हिटलरकडे जाते. जर्मनीने इंग्रजी साम्राज्याच्या नाकी नऊ आणले नसते तर इंग्रज भारतातील साम्राज्य सोडण्यास कधीही तयार झाले नसते.

सुभाषचंद्र बोस यांच्या आझाद हिंद फौजेमुळे भारतीय फौजेत प्रक्षोभ माजला नसता आणि मुंबईतील खलाश्यांच्या बंडामुळे देशी सैन्याची स्वामीनिष्ठा हादरली नसती तर दुसऱ्या महायुद्धानंतरही इंग्रज भारत सोडून गेले नसते. काँग्रेस, गांधीजी, नेहरू यांना स्वातंत्र्याचे श्रेय अनाठायी मिळाले.

''मागू नका कधीही, कुणी राज्य काय दिधले?'' किंवा कवी गोविंदाची 'रणावीण स्वातंत्र्य कोणा मिळाले?'' या साऱ्या विचारधारेचाच अधिक्षेप झाला

आणि देशाच्या फाळणीची किंमत देऊन नादानांनी सत्ता आपल्या पदरी पाडून घेतली.

गांधीजींनी शूराची अहिंसा सांगितली त्याबरोबर, दंगलग्रस्त भागात फक्त जागतिक प्रसार माध्यमांचे संरक्षण घेऊन जाण्याचेही त्यांच्यात नैतिक धैर्य होते. त्यांची नैतिक भाषा आता आपल्या प्रासादाच्या कुंपणाच्या बाहेर झेड-सिक्युरिटी घेतल्या खेरीज पाऊल न टाकणारे उघडपणे वापरू लागले आहेत. सगळा देश पुरुषार्थहीन झाला; इतका की अलीकडे रॅण्ड कॉपोरेशनने भारतातील आतंकवादाचे विश्लेषण करताना ''भारत हा अल् कायदाचा 'सॉफ्ट टार्गेट' झाला आहे'' असे स्पष्ट मांडले.

गांधीजींचे कचकडी मानसपुत्र यांनी प्रतिअशोक बनण्याची स्वप्ने रंगवीत लायसन्स-परमिट-कोटा राज्य स्थापण्याचा उपद्व्याप केला आणि त्यातून नेता, तस्कर, गुंडा, अफसर आणि काळा बाजारवाले यांच्या हाती सत्ता सोडून दिली. शेती कनिष्ठ आणि नोकरी वरिष्ठ करून दलित, आदिवासी, मुसलमान या समाजांच्या आरक्षणवादी राजकारणाला खतपाणी घातले.

या अशा अवस्थेत महिन्याभरात मतदार निवडणुकीच्या मतदानयंत्रासमोर जाणार आहे.

समाजवादाचा झटका खाल्ल्यानंतर खुल्या व्यवस्थेवर निष्ठा नसणाऱ्या पुढाऱ्यांनी खुली व्यवस्था आणण्याची नौटंकी केली. जागतिक मंदीच्या पहिल्या वादळातच नेत्यांची आणि नागरिकांचीही हिंमत खचली आहे. हवामानातील बदल आणि ऊर्जेचा तुटवडा यांनी आर्थिक संकट अधिकच गडद केले आहे. समाजवादी रशियाचे पतन झाल्यानंतर अमेरिका आता एकमेव महासत्ता राहिली अशा हिशेबाने रशियन दोस्तीचा कालखंड झाकून ठेवून अमेरिकेशी दोस्ती करणाऱ्यांना एका नव्याच वादळाला तोंड द्यावे लागत आहे.

जगातील सर्व लोकशाहीविरोधी, ग्रंथप्रामाण्यवादी, विभूतिपूजावादी आणि जगभर आपली अनिर्बंध सत्ता स्थापण्याची लालसा बाळगणारे सर्व डावे आणि इस्लामचा दुरुपयोग करणारे आणि आतंकवादाच्या छत्राखाली मादक द्रव्यांची वाहतूक करणारे यांनी क्रेमलिन नसेल तर काबूलमध्ये एक महासत्ता तयार केली आहे.

तालिबानच्या पहिल्याच झटक्याने पाकिस्तान गुढग्यावर आला आहे. नजिकच्या भविष्यकाळात सिंध, बलुचिस्तान आदी राज्यांत पाकिस्तानपासून वेगळे होण्यासाठी उठाव होणार आहेत. पाकिस्तानची शकले उडणार आहेत.

सत्य स्थिती ही आहे की भारतापुढील भवितव्य फारसे आशादायक नाही. गांधीजींचा अजागळ वारसा चालवून अल्पसंख्याकांच्या लांगूलचालनाचे धोरण आणि 'आम आदमी'चे अर्थकारण डाव्यांच्या मदतीने चालवणारी देशातील सत्ताधारी आघाडी पुन्हा सत्तेवर आली तर वायव्य हिंदुस्थान पाकिस्तानात जाईल, ईशान्य भारताला चीन गिळंकृत करील आणि भारतीय आपले 'ब्रह्मचर्य' सांभाळत राहतील.

ढतसऱ्या आघाडीच्या झेंड्याखाली अनेक माजी आणि आशावादी प्रधानमंत्री निवडणूक लढवण्यासाठी एकत्र होऊ पाहत आहेत. त्यांच्या हाती सत्ता गेली तर देशात लायसन्स्-परमिट-कोटा राज्याचे पुनरुज्जीवन होईल आणि पाच वर्षात रुपया घरंगळत प्रति डॉलर ७० रुपयांपर्यंत घसरेल हे सांगायला कोण्या ज्योतिष्याचीही गरज नाही.

एका बाजूला संयुक्त पुरोगामी आघाडीची दरी आणि दुसऱ्या बाजूला डाव्या पक्षांच्या तिसऱ्या आघाडीची खाई या पेचातून सुटण्याकरिता विकल्प म्हणून मतदारांमध्ये राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे आकर्षण आहे. ही आघाडी निखळ राष्ट्रवादी आहे. कायदा आणि सुव्यवस्था पुनर्स्थापित करण्याकरिता लागणारी शासकीय आणि प्रशासकीय कठोरता देणारे नेतृत्व या आघाडीकडे आहे. दुर्दैव असे की, निवडणूक जवळ आली की हिंदू राजांतील जुनापुराणा ऐतिहासिक भाऊबंदकीचा प्रकार या आघाडीला ग्रासतो. येत्या निवडणुकीच्या रणनीतीची घोषणा करतानाच लालकृष्ण अडवाणी रालोआचे भावी पंतप्रधान राहतील अशी घोषणा करण्यात आली. या नेमणुकीबद्दल उघड उघड बंड करण्याची कोणाची तयारी नाही. माजी उपराष्ट्रपती भैरोसिंग शेखावत यांनी बंडाचा झेंडा उभारण्याचा अर्धवट प्रयत्न केला आणि मग तो नाद सोडून दिला. यामुळे, गाढवही गेले आणि ब्रह्मचर्यही गेले. शेखावत यांचा फायदा काहीच झाला नाही, अडवाणींच्या प्रतिमेला काहीसा डाग लागला, एवढेच. त्यानंतर, ओरिसात बिजू जनता दलाशी लवकरच फाटले. बिहारमध्ये नितीशकुमार यांच्याशीही कुरबुर चालू असल्याच्या अफवा आहेत. पंजाबमध्येही अकाली दलाशी जमवून घेणे भाजपाच्या नेत्यांना कठीण जात आहे. अलीकडे भाजपचे रणनीतितज्ज्ञ अरुण जेटली यांनी केलेला रुसवा-फुगवाही या बेबंदशाहीचेच द्योतक आहे. एका काळचे भाजपचे आधारस्तंभ कल्याणसिंग यांनीही भाजप सोडून मुलायम सिंगांच्या समाजवादी दावणीस स्वत:ला बांधून घेतले आहे.

महाराष्ट्रातही स्वतंत्र भारत पक्षाला किमान सन्मानाची वागणूक देणे भाजप व

शिवसेना यांना मोठे अवघड वाटत आहे.

थोडक्यात, राष्ट्रापुढील भयानक प्रश्न सोडवण्यासाठी शुद्ध राष्ट्रवादी, स्पष्ट आर्थिक विचार असलेला पर्याय मतदारांसमोर नाही.

या महिन्यात होणाऱ्या सार्वत्रिक निवडणुकांची पार्श्वभूमी ही अशी आहे. याच अंकात संपादकांनी २००४ सालच्या निवडणुकांनंतर मी केलेल्या परिस्थितीच्या अवलोकनासंबंधीचा 'राजकीय भूमिकेचा चक्रव्यूह' हा लेख पुनर्मुद्रित केला आहे. वाचकांच्या लक्षात सहज येईल की २००४ नंतर परिस्थिती अधिकच बिघडली आहे.

देश वाचवण्याचे ज्यांना महत्त्व वाटत नाही त्यांना या सर्वच परिस्थितीशी ना देणे, ना घेणे. स्वातंत्र्याच्या आंदोलनाच्या काळात देशभक्ती हा एक पागलपणाचा प्रकार मानला गेला. 'जय जगत्'च्या नाऱ्याखाली राष्ट्रप्रेम झाकोळून टाकण्यात आले. सुभाषचंद्र बोस, भगतसिंग, वीर सावरकर यांच्या ज्वलंत राष्ट्रप्रेमाची ज्योत पुन्हा चेतवली तरच देश वाचू शकतो. अन्यथा, गांधीनेहरूंचे तकलादू स्वातंत्र्य, पहिले प्रजासत्ताक हे सारेच एक भयानक दुःस्वप्न पडून गेले असे समजून पुन्हा एकदा भारताच्या दुसऱ्या आणि खऱ्याखुऱ्या स्वातंत्र्यासाठी नव्याने राष्ट्रउभारणीच्या यज्ञाचे होमकुंड चेतवणारा ऋत्विज देशाला शोधावा लागेल.

*(२१ मार्च २००९)*

◆◆◆

गरिबांचे कल्याण करण्याचा सरकारचा खटाटोप गेली ५० वर्षे चालला आहे. गरीब गरीबच राहिले, पुढारी मात्र गब्बर झाले. गरिबांच्या कल्याणाच्या नावाखाली अर्थव्यवस्थेचा ताबा ठेवण्याचा डाव संपला पाहिजे. गरिबांचे काही भले करणारी एक झाली, तिचे नांव अहिल्याबाई होळकर. दीनदुबळ्या अपंगांचे पालन, संगोपन करणे, दुखणाईतांवर औषधोपचार करणे हे काम पुढाऱ्यांचे नाही, हे काम करुणेने करायचे आहे. खऱ्याखुऱ्या धर्मभावनेने प्रेरलेल्या लोकांचे हे काम आहे. ते धर्मसंस्थांकडेच राहिले पाहिजे.

भारताचे पहिले गणराज्य कोसळले आहे. दुसरे गणराज्य उभे करणे आवश्यक आहे. सर्वंकष सत्ता केंद्रित करण्याची कल्पना सोडून मानवी जीवनातील वेगवेगळ्या पैलूंकरिता स्वतंत्र स्वायत्त संस्था आपोआप उभ्या राहू लागतील. सत्तेचा जादूचा दिवा अशी गोष्टच राहणार नाही आणि त्या जादूच्या दिव्याच्या प्राप्तीकरिता चाललेले खेळ बंद पडतील.

- शरद जोशी

जनशक्ती वाचक चळवळ

₹ ३००